ग्रंथ भांडशाळा मंडळ
वाई.

जानुआरी. १८७५.

A MONTHLY MAGAZINE

पुस्तक ७. MARATHI LITERATURE, अंक १.

FOR

LADIES AND GENTLEMEN.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

ठगाची जबानी..... १
पुराणग्रंथ २
मातृशिक्षा..... ९
प्राचीन हिंदुलोकांचें कित्येक कलासंबंधी ज्ञान..... १३
उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याची आवश्यकता..... १७
गंगाधरशास्त्री याचा मृत्यु—पोवाडा..... १८
पत्रेवगैरे..... १९

मुंबई.

एशियाटिक छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पांच.

नवीन पुस्तकें.

(हीं पुढील पुस्तकें वगैरे त्यांच्या त्यांच्या प्रसिद्धकर्त्यांनीं मेहेर्बानीनें पाठविलीं, त्यांचा आम्ही आनंदानें स्वीकार केला.)

कर्नाटक ज्ञानमंजरी.– या नांवाचें कानडी मासिक पुस्तक गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून बेळगांव शहरीं छापून प्रसिद्ध होत असतें. यांतील निबंधादिक लिहिणारे लोक कर्नाटकस्थ विद्वान असून स्वदेशाच्या हिताविषयीं व सुधारणेविषयीं उत्सुक असे आहेत. यामध्यें विद्या, नीति, इतिहास, प्राचीन भाषांतील काव्यनाटकादि, नवीन कथा प्रबंध, इत्यादिक उपयुक्त विषयांचा समावेश होत असतो. अशाप्रकारचें हें त्या प्रांतीं पहिलेंच पुस्तक असून त्यांतील भाषा शुद्ध व प्रौढ आणि विषयांची निवडणूकही चांगली असल्यामुळें यापासून कर्नाटकस्थांस फार उपयोग होईल असें आम्हास वाटतें. याचे सांचा आमच्या विविधज्ञानविस्ताराएवढा असून पृष्ठें २४ आहेत, छापणीही सुरेख असते. या पुस्तकास सर्व कर्नाटकहितेच्छुंनीं व कर्नाटक भाषाभिमानी जनांनीं साहाय्य करणें योग्य आहे. हें पुस्तक सुरळीतपणें चालून यापासून चिरकाळ सदुपयोग होत जावा अशी आमची इच्छा आहे.

सूर्यासावित्री विवाह.– या नांवाचें लहानसें वेदांतील सूक्त वे० रा० रा० विष्णु शास्त्री पंडित यांहीं अर्थासहित छापविलें आहे. विवाह म्हणजे काय? व त्याला काय काय गोष्टी अवश्य आहेत, हें यावरून सहज लक्षांत येण्याजोगें आहे. याकरितां हें पुस्तक प्रत्येकानें वाचण्याजोगें आहे.

"Pandurang Hari पांडुरंग हरि," आणि "Economy of Human Life. इकानमि आव्ह यूमन लाएफ्" या दोन प्रसिद्ध पुस्तकांच्या पुनरावृत्तीचा थोडयोडा भाग छापीत असलेला ही फार उपयुक्त आहे. व त्यांत दुसरें पुस्तक आश्रयास विशेष पात्र आहे.

The Eagle Printing office Almanack For 1875. (इगल् छापखान्यातील इंग्रजी पंचांग सन १८७५ सालाबाबद.) यामध्यें मुंबईतील सरकारी कचेऱ्या, व्यापारी पेढ्या, आगगाड्यांचीं मुख्य ठिकाणें, आगबोटींचे टप्पे व दर, छापी कागदाचे कायदे, टपाल हपीसें, मोठमोठे कामदार, प्रतिदिवसाचे सूर्योदय सूर्यास्त, मुख्य मुख्य सणाचे दिवस वगैरे बरीच माहिती दिली आहे. हें पंचांग चांगल्या जाड्या तक्त्यावर चिकटलेलें असून किंमत १ रुपया आहे.

डोंगरी "ज्ञानवर्धक" समेत वाचलेल्या निबंधांचीं दोन पुस्तकें त्या समेकडून आम्हांस आलीं आहेत.

वर्गणी.

(मे १८७४पर्यंत.)	रु. आ.
रा. रा. नानाभाई सदानंद काळे	३—०
रावसाहेब आबाजी विष्णु काथवटे	३—१०
रा. रा. विश्वनाथ बाळकृष्ण.....	३—०
रा. रा. गोपिनाथ महादेव.	३—०
रा. रा. काशिनाथ भाकजी	३—०
रा. रा. आपाजी विश्वनाथ.....	१२—०
रा. रा. सदाशीव रघुनाथ.....	३—०
रा. रा. आत्माराम नारायण	३—०
रा. रा. पुनळाजी सोकाजी.....	३—०
रा. रा. बाबा लक्ष्मणजी.....	२—६
रा. रा. रामचंद्र नारायण	३—०
रा. रा. ज्ञानाराम भंगेश मे १८७३पर्यंत..	३—०
रा. रा. अण्णा मार्तंड, जुलै १८७५पर्यंत..	३—०
डॅगरी पुस्तकालय ,, ,, ..	३—०
रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक डिसेंबर १८७५पर्यंत.....	३—६
रा. रा. चिंतामण बळिराम जोशी दिक्षित सप्टेंबर १८७५पर्यंत.	३—६
रा. रा. हरि आबाजी दिक्षित, टोकें फेब्रुआरी १८७६पर्यंत.....	३—६
रा. रा. नारायण लक्ष्मणजी बाकीपैकीं....	३—८

विशेष सूचना.

विविधज्ञानविस्ताराचें काम कांहीं मोठया अडचणीमुळें बरेच महिने अगदीं बंद पडलें. परंतु कळविण्यास आनंद वाटतो कीं, ते पुनः चालू करणें अवश्य आहे ह्मणून सर्व व्यवस्था नीट करून, या महिन्यापासून सातव्या पुस्तकाला आह्मी आरंभ केला आहे, व वर्गणीदारही कृपा करून आपला आश्रय पूर्ववत कायम ठेवतील अशी आशा धरिली आहे. पुस्तक बंद पडल्यामुळें ज्यांची जितकी वर्गणी आह्मांपाशीं शिलक आहे, तितकी त्यांची आज मितीस जमा धरली जाईल, त्याविषयीं कांहींच अडचण राहणार नाहीं. ज्यांकडे वर्गणी यावयाची आहे, त्यांणीं ती सत्वर पाठविण्याची कृपा करावी; त्यांजकडची बाकीही त्यांच्या नावें आजच्या मितीस लिहून पुढें हिशेब चालू होईल. या पुढें पुस्तक दरमहा वेळच्यावेळीं निघून, सर्व व्यवस्था मोठया प्रयत्नानें होईल तितकी चांगली ठेविली जाईल.

तारीख १ माहे ज्यान्युअरि सन इ० १८७५. व्यवस्थापक.

विविधज्ञानविस्तारबद्दल पत्रें पाठविणारांनीं तीं या पुस्तकाच्या शेवटल्या पृष्ठावरील पत्त्यावर, अगर कालकादेवीच्या रस्त्यावर (देवी समोर) आम्ही नवीन पुस्तकालय स्थापन केलें आहे, त्या पत्त्यावर पाठविल्यासही आम्हास पोंचतील.

श्री.

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक १.

ठगाची जवानी.

खण्ड ५वें.

(पुढें चालू.)

—ooo—

ह्याप्रमाणेंच सर्वांहीं मोठ्या श्रद्धेनें देवीची प्रार्थना केली. आणि नंतर माझ्या बापानें ओंजळींत पाणी घेऊन त्या कुऱ्हाडीवर शिंपडलें, व थोडेंसें पाणी त्या खळग्यांत ओतलें. तें झाल्यावर त्यानें जमलेल्या सर्व मंडळीस गूळ वांटिला तो सर्वांहीं भक्तिपुरःसर मुकाट्यानें खाल्ला. गूळ वांटितेवेळीं मला मात्र दिला नाहीं; कारण आमच्या धंद्याच्या नियमाप्रमाणे माझ्या हातांनीं कोणाचा गळा दाबला जाईपर्यंत मी त्यांच्या समागमें गूळ खाण्यास पात्र नव्हतों. तरी माझ्या बापानें आपल्या वांट्यापैकीं थोडासा गूळ राखून ठेवून तो मागाहून मजला खाण्यास दिला. म्यां तो खाल्यावर माझा बाप मला ह्मणाला—

"आतां त्वां गूळ खाला त्यापेक्षां तूं अंतर्बाह्य ठग बनलास. ह्या उपर आह्मांस सोडून जाण्याचें जरी त्वां मनांत आणिलें तरीं तुझ्या हातून तसें होऊं शकणार नाहीं. कारण असेंच ह्या गुळाचें सामर्थ्य आहे. ह्या गुळाचा यत्किंचित अंश ही जरी कोणाच्या हातीं लागला आणि त्यानें तो खाला कीं लागलाच तो ठग होऊन जातो; मग त्याची पूर्वीची स्थिति कशीही असो—तो कोणी मोठा गृहस्थ असो अथवा लहानसान असो. त्याच्यानें तें टाळवणार नाहींच. ह्या गुळाचें सामर्थ्य त्यास दुर्जय होऊन जातें.

म्यां ह्मटलें "हा खचीत मोठा विलक्षण चमत्कार आहे. पण अशा गोष्टी कधीं घडलेल्या तुह्मांस ठाऊक आहेत काय?"

तो ह्मणाला "मला वेळ असता तर म्यां तुला शेंकडो गोष्टी घडलेल्या सांगितल्या असत्या. पण तूं हुसेनाला किंवा आणखीं कोणाला पूस. तो तुला असेंच सांगेल."

संध्याकाळीं जेव्हां नेहेमीप्रमाणें सर्व मंडळी जमून गोष्टी सांगत बसली तेव्हां मजमध्यें धारिष्ट नसल्याबद्दल माझ्या बापानें मला मोठा दोष दिला. "मुला," तो ह्मणाला "हें कांहीं उपयोगी नाहीं. असें करून कधींही चालणार नाहीं. तूं मोठ्या धैर्यानें वाघावर चालून गेलास त्यापेक्षां असल्या निवळ पोरखेळांच्या प्रसंगीं कच खाणें तुला अगदीं योग्य नाहीं. तुला आंगीं पुरुषत्व धारण केलें पाहिजे, व ह्याहून चांगल्या रितीनें वागलें पाहिजे. त्वां गूळ खाला आहे ह्याचें मनांत नेहेमी स्मरण ठेविलें पाहिजे."

"छः भय्या, हें नीट नाहीं," असें हुसेन माझ्या बापास ह्मणाला, "मुलाला असें मर्मभेदक शब्द बोलून लाजवूं नकोस. आरंभीं खुद्द तूंच त्याजपेक्षां काडीभर देखील हुशार नव्हतास हें ध्यानांत ठेव. त्या– ठिकाणचा प्रसंग विसरलास काय ? वास्तविक तूं मोठा होतकरू असल्या बद्दल गणेशाच्या मनाची खात्री करून देण्याच्या कामीं मला किती श्रम पडले त्याची आठवण आहेना ? ह्याच मुलाला आणखीं एक दोन प्रसंग असेच पाहूंदे ह्मणजे पाहा मग काय होतें तें. हाच मग पाहा किती बदलून जाऊन आपलें काम करण्यांत कसा वाघासारखा पटाईत होतो तो. मुला," तो मजकडे वळून व माझी पाठ थोपटून ह्मणाला, "माझ्या मनांत तुजविषयीं तिळभर देखील धास्ती नाहीं; कारण कईक जणांनीं आरंभीं तुजहून चांगलें काम केलें; परंतु ते परिणामीं अगदी भेकड निपजले आहेत. व प्रेतें पुरण्यासाठीं खाडे खणणें किंवा गुप्त रितीनें बातम्या आणणें ह्या खेरीज अन्य कामीं ते सर्वथैव निरुपयोगी ठरले आहेत. हा हुसेन आज ह्यातारा झाला आहे; पण ह्यानें कोणाविषयींही केलेलें भविष्य आजपर्यंत कधीं अन्यथा झालें नाहीं. इनशाल्ला ! देव करील तर तूं आपल्या बापावरही तान करशील. 'बापसे बेटा सवाई' हेंच तुजविषयीं खरें होईल. असो; तूर्त ह्याला," तो पुनः माझ्या बापाकडे वळून ह्मणाला, "ह्याला फक्त आणखीं एक दोन प्रसंग नजरेनें पाहूंदे; आणि मग बेलाशक खुद आपला हात चालवूंदे. मग पाहा मी ह्मणतों हें खरें कीं खोटें."

माझा बाप ह्मणाला "तें ठीक आहे, पण मुला मी जें तुला बोललों तें ह्मणजे तुझ्या अंतःकरणाला लागावें अशा छळक बुद्धीनें बोललों असें तूं आपल्या मनांत समजूं नकोस. काल तुझ्या मनानें हबक खाल्ली. ही भीती मनांत राहून जाईल; व पुढें हरएक प्रसंगीं तुझें मन असेंच भेदरून आंच खाण्यास प्रवृत्त होईल एवढ्यासाठींच मी तुला बोललों. आपल्या जवळच्या लोकांवर तूं हवी तशी मेहेरबानी कर. आपल्या नातलगांवर व स्नेह्यांवर पाहिजे तितकी प्रीति कर. गरिबांवर दया कर. भिकाऱ्यांस भिक्षा घाल. सारांश योग्य प्रसंगीं सर्वांवर उपकार कर. परंतु तूं ठग आहेस; व अल्ला तुझ्या हातीं जेजे लोक देईल त्यांशीं हाडवैर करण्याची व त्यांचे प्राणहरण करण्याची त्वां प्रतिज्ञा केली आहे ह्या गोष्टीचें पक्कें स्मरण राहूंदे."

म्यां झटलें "बाबा, आतां पुरे; आपण माझी पुष्कळ पुजा केली; आपले शब्द माझ्या हृदयांत अगदीं भिनून गेले; माझी चुकी म्या पदरांत घेतली; ह्या पुढें मी आपलें कर्तव्य बजाविण्याच्या कामांत आंचका खाला किंवा मागें पाऊल घेतलें असें ह्मणण्याचा आपल्यास कदापि प्रसंग येणार नाहीं. तुह्मी ह्मणाल त्यावेळीं रुमाल हातांत घेण्यास मी सिद्ध आहें." इतकें ह्मणून त्या प्रकरणावरील बोलणें फिरविण्यासाठीं म्या हळूच दुसरी गोष्ट काढिली. म्या झटलें "कालच्या गृहस्थाचा कांहीं वृत्तांत सांगण्याचें महंमदानें मला कबूल केलें आहे. कांरे महंमद, चल, आपलें वचन पार पाड."

त्या सरसे दहा पंधराजण एकदम ओरडून ह्मणाले "वः फार उत्तम सांगितलें. गोष्टी सांगण्यांत झटलें ह्मणजे महंमद पक्का वस्ताद. चल, महंमद ऐकूंदे तुझी गोष्ट."

महंमदानें बटव्यांतून पानसुपारी वगैरे

काढून एकदां तंबाखूचा यथेच्छ बार भरला आणि पांचचारदां पचपच थुंकी वगैरे टाकिल्या नंतर तो मांडी ठोकून बसला आणि माझ्या बापाकडे वळून, माझ्या आठवणीनें सरासरी खालील वृत्तांत सांगूं लागला. तो ह्मणाला.—

"नागपूर प्रांतांत बोरी ह्मणून एक लहानसें गांव आहे तेथें माझें जन्म. आपण सर्वजण जाणतच आहां कीं माझा बाप ठग होता; व हाच धंदा वंशपरंपरेनें आज कईक पिढ्या आमच्या घरांत चालत आला आहे. माझ्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी बापापासून मुलानें—त्याजपासून त्याच्या मुलानें—अशा क्रमानें माझे वाडवडील ऐकत आले आहेत; म्याही आपल्या बापापासून त्या ऐकिल्या आहेत. परंतु त्यांचा कांहीं मी सांगणार ह्या गोष्टीशीं तादृश संबंध नाहीं; मात्र त्यांजवरून इतकेंच पाहायाचें कीं ह्या धंद्यांत त्यांस यश येऊन त्यांहीं चार पैसे कमाविले; व नागपुरच्या दरबारांत पुष्कळ पैका भरून त्यांहीं आपल्या कुटुंबा करितां आमच्या गांवच्या पाटीलकीचें वतन व कांहीं जमीन संपादन केली, तरी त्यांहीं ठगीचा व्यासंग सोडिला नाहीं. माझा आजा कासीम हा मोठा नामांकित व अग्रगण्य ठग होता हें तुह्मां सर्वांस विदित आहेच. तो वारला त्यावेळीं माझा बाप फार लहान होता. माझ्या आज्याचें वतन व इतर सर्व जिंदगी वारशाच्या हक्कानें माझ्या बापास मिळाली; त्यानें बरेच दिवस सर्वांचा उपभोग घेतला; त्याजला हरकत करण्यास तेव्हां कोणी उभे राहिले नाहीं.

"पण त्याचे चांगले दिवस फार काळ नांदण्याचें त्याच्या नशीबीं नव्हतें. काय सांगूं? एक दिवस दरबारांतून पेषकाराच्या हुकुमानें माझ्या बापास हुजुरांत नेण्याकरितां कांहीं शिपाई आमच्या गांवीं आले; तो दिवस मला पक्केपणें आठवतो. सरकारी महसूल वगैरे वेळच्या वेळीं नियमानें भरीत असतां असें एकदम बोलावणें होण्याचें कारण काय ह्मणून माझ्या बापानें त्या शिपायांस पुष्कळ काकुळतीनें पुनःपुनः विचारिलें. पण व्यर्थ. शेवटी नुसत्या शब्दांनीं ते गांठत नाहींत असें पाहून त्यांच्या जमादाराचा हात दाबण्याचा माझ्या बापानें घाट घातला; तरी कांहीं निष्पन्न झालें नाहीं. अखेरीस घर सोडून त्याला त्यांजबरोबर निघावें लागलें. तेव्हां म्यां पुष्कळ विनवणी केल्यामुळें माझ्या बापानें मजला आपल्या बरोबर घेतलें त्यावेळीं मी ज्ञानींत होतों. माझें वय तेव्हां सुमारें आपल्या जमादार साहेबांच्या चिरंजिवां एवढें असेल. कांहीं दिवस वाट चालल्यानंतर आह्मीं नागपुरास पोंचलों. मार्गांत मजला भारी लांबीच्या होत; व सर्व रस्त्याभर आह्मांस पायीं चालत जावें लागलें. नागपुरास पोंचतांच आह्मांस नेऊन एका घाणेऱ्या तुरुंगांत घातलें; व तेथें आमच्या पायांतून मोठमोठ्या लोखंडी बिड्या ठोकिल्या. आमची खाण्यापिण्यापासून साधारण सोईही तेथें कोणी केली नाहीं. खाण्यास पान नाहीं कीं तंबाखु नाहीं. पांघरण्यास वस्त्र नाहीं. कोणासही भेटण्याची परवानगी नाहीं. पोटाला अगदीं वाईट व जाडें भरडें अन्न. ह्या स्थितींत एक एक दिवस एक एका वर्षाप्रमाणें असे चार महिने आह्मी तेथें काढिले. आपल्यावर कोणत्या गुन्ह्याचा आरोप आहे व फिर्यादी कोण आहे हें समजण्यासाठीं माझ्या बापानें पुष्कळ अर्ज केले. परंतु उपयोग काय? दाद घेतो कोण?

आपली स्थिति आपल्या कुटुंबांतील माणसांस व आपल्या मित्र वर्गाला कळविण्यासाठीं हा त्यानें पुष्कळ इलाज केला; पण ते देखील साधले नाहीं. आम्हांवर असा प्रसंग गुजरण्याचें कारण काय असावें ह्याविषयीं तुरुंगांत बसल्या बसल्या आम्ही पुष्कळ तर्क चालविला— तर्क चालवून चालवून थकलों; पण खरे कारण ध्यानांत येईना. शेवटीं एक दिवस हा दुष्ट चांडाळ ब्रिजलाल— गेल्या रात्रीस माझ्या हातून प्राणास मुकला हा—कांहीं शिपाई बरोबर घेऊन तुरुंगांत आम्ही होतों तेथें आला. त्याला पाहतांच माझ्या बापानें जीवाची आशा सोडिली. आपली शंभर वर्षें आतांच पुरीं भरलीं असें त्यास वाटून तो मूर्च्छा येऊन बेशुद्ध पडला. क्षणभरानें पुनः शुद्धीवर येऊन त्यानें ब्रिजलालाकडे पाहिलें; व तो तोच आहे असें पक्कें ओळखून त्याजवर शिव्यांचा भडिमार चालविला.

"माझ्या बापाचें तोंड थांबल्यावर ब्रिजलाल रागानें त्याजकडे पाहून ह्मणाला,—

" 'पाटीलजी, आपल्या गावांत जयसुख दास सावकार राहत होता त्याच्या जिंदगीच्या वगैरे चवकशीसाठीं सरकारानीं मला आपल्या गावीं कांहीं वर्षांवर पाठविलें होतें हे आपल्यास पुर्तेपणें माहित आहेच. मला वाटतें कीं निदान आतां तरी आपल्या डोल्यांवरील धूर उतरला असेल. आतां तरी आपण जयसुखदासाच्या मालमिळकतीचा वगैरे सर्व कच्चा हिशेब देण्याची मेहेरबानी कराल! मी आपल्या गावीं आलों होतों त्यावेळीं आपण माझें कसें आतिथ्य केलें. व माझी कशी शोभा केली त्याचेंही आपल्यास स्मरण असेलच. ठीक आहे. ईश्वरकृपेनें आतां ह्या सर्वांची सव्याज फेड माझ्या हातून होते किंवा नाहीं हेंही मी पाहतों.'

"माझा बाप मोठ्या संतापानें ह्मणाला, 'अरे जारे! लुच्चा माणूस! कमस्सल! मोठा मुत्सद्याचा लेक आला आहे मला विचारण्याला. तुला तर माझ्या तोंडून एक शब्द ही समजणार नाहीं. तुजहून कोणी एखादा भला व योग्य मनुष्य मजकडे पाठीव, ह्मणजे मला माहीत असेल तें मी सांगेन. पण कुत्र्याच्या लेका, तूं जर विचारशील तर तुला एक अक्षर सुद्धां सांगणार नाहीं.'

"तो पाषाणहृदय अधम ह्मणाला, 'बरें, तेंही आम्ही पाहूं.' असें ह्मणून त्यानें आपल्या बराबरील शिपायांस खूण केली; तिजसरसें त्याशिपायांहीं माझ्या बापास धरिलें, व एका तोबऱ्यांत उन्हून राख भरून आणिली होती तो तोबरा त्याच्या तोंडास बांधिला; आणि पाठीमागून लाथाबुक्क्यांचा मार चालविला; त्यामुळे आपोआप त्याचें तोंड उघडून राखाडी घशांत शिरली; तेणें करून त्याचा जीव गुदमरून अगदी कासावीस झाला व प्राणांताचा समय येऊन ठेपला. पुनः पुनः ब्रिजलालानें त्याजला ती हकीगत पुसावी; व पुनः पुनः त्यानें 'सांगत नाहीं,' ह्मणून झटलें कीं सदरहु प्रकाराची पुनरावृत्ति करावी. ह्या प्रमाणें कांहीं वेळ घडल्या नंतर तें दुःख मनुष्याच्या सहनशक्तीच्या पलीकडे जाऊन तेणें करून माझा बाप मुर्च्छा येऊन प्रेतवत भुईवर पडला. तेव्हां तो खाटीक तेथून निघून गेला, तरी जातानां 'ह्याला बिलकुल पाणी देऊं नका' असा सक्त हुकूम करून तो चालता झाला. पण तो त्याचा दुष्ट हेतु ईश्वर कृपेनें सिद्धीस गेला नाहीं; कारण त्या दिवसीं सकाळीं आम्हास नेहेमी प्रमाणें जें

पाणी मिळालें होतें त्यांतून दैव योगानें थोडेसें शिल्लक राहिलें होतें, तें म्यां आपल्या बापाच्या तोंडावर शिंपडलें; व थोडेसें त्याच्या तोंडांत घातलें; त्यानें त्याला किंचित शुद्धि येऊन तो उठून बसला; आणि त्यानें आणखीं पाणी पियास मागितलें. तेव्हां बाकी राहिलेलें पाणी म्यां त्याला पाजलें तेणें करून तो अगदी चांगला सावध झाला.

पुराणग्रंथ.

[पुढें चालू.]

महाभारताचे आदिपर्वांत व्यासचरित पुढें लिहिल्याप्रमाणें वर्णिलें आहे.—

एका कोळ्याची मुलगी यमुनेवर नांव चालवीत असतां पराशर ऋषि तेथें आले. त्या कोळ्याच्या सुंदर मुलीस पाहून ऋषीस कामोद्भव झाला. तेव्हां "तूं मला भज" अशी तिची ऋषीनें प्रार्थना केली. तिनें सर्व लोक पाहत आहेत ही अडचण दाखविली. तेव्हां ऋषीनें सर्वत्र धुकें उत्पन्न केलें. ती कन्या एका मत्स्याचे उदरापासून उत्पन्न झाली होती म्हणून तिचे अंगास घाण येत असे ती जाण्याचा तिनें वर मागितला तो ही ऋषीनें दिला. नंतर आपलें कन्यात्व नष्ट न होण्याचा वर मागून घेऊन ती त्यास अनुकूल झाली. तिचे ठायीं तत्काल पुत्र उत्पन्न झाला. तोच कृष्णद्वैपायन व्यास. तो काळ्या रंगाचा असल्यामुळें त्याचें नांव कृष्ण हें पडलें. यमुनेच्या द्वीपांत (बेटांत) त्याची उत्पत्ति झाल्यामुळें त्यास द्वैपायन हें नांव मिळालें. त्यानें वेद व इतर ग्रंथ यांची जुळणी केल्यामुळें त्याचें व्यास किंवा वेदव्यास असें नांव पडलें. त्याचा बाप पराशर हा वसिष्ठाचा मुलगा शक्ति याचा पुत्र होता. यावरून व्यास वसिष्ठाचा पणतू होतो. व्यासाच्या आईचें नांव सत्यवती. ती पुढें भीष्माचा बाप शांतनु याची बायको झाली. "तूं जेव्हां जेव्हां माझें स्मरण करशील तेव्हां तेव्हां मी तात्काळ येत जाईन" असें आईस सांगून कृष्णद्वैपायन व्यास तपश्चर्या करण्याकरितां गेला.

बोपदेव हा भारतवर्षीय एक वैयाकरण होता. त्यानें मुग्धबोध म्हणून एक व्याकरण लिहिलें आहे त्याची मुख्यत्वेंकरून बंगाल्यांत फार प्रसिद्धी आहे. मुग्धबोधावर दुर्गासाची टीका आहे. पाणिनीची अष्टाध्यायी व बोपदेवाचा मुग्धबोध या दोहोंची रचना व परिभाषा ह्या फार भिन्न आहेत. पाणिनीचे व्याकरणा पासून जें आपणास ज्ञान होतें, तें दुर्गासाचे टीके खेरीज मुग्धबोधापासून व्हावयाचें नाहीं. कविकल्पद्रुम म्हणून एक कवितात्मक ग्रंथ बोपदेवानें केला आहे. त्यांत संस्कृत भाषेतील सर्व धातूंचा संग्रह केला आहे. कविकल्पद्रुमावर बोपदेवानेंच काव्यकामधेनु म्हणून टीका लिहिली आहे. राम व्याकरण म्हणून एक ग्रंथ आहे तोही बोपदेवानेंच केला असें म्हणतात. श्रीमद्भागवत बोपदेवानें केलें असें पुष्कळ लोक मानितात. म्हणून वर सांगितलें आहेच. परंतु दुर्जनमुखचपेटिका म्हणून एक लहानसें पुस्तक आहे त्यांत श्रीमद्भागवत व्यासकृतच आहे असें सांगून, पुढें परमहंसप्रिय, मुक्ताफळ, व हरिलीला हे तीन ग्रंथ बोपदेवानें केले असें सांगितलें आहे. शतश्लोकचंद्रिका म्हणून एक वैद्यकावर लहानसा ग्रंथ आहे तो बोपदेवाचेच नांवानें मोडत असतो. बोपदेव

इ० स०च्या १२व्या किंवा १३व्या शतकांत होऊन गेला असें युरोपांतील संस्कृतभाषाभिज्ञांचें मत आहे.

१२. अष्टादश पुराणांतील विषयांचें संक्षिप्त विवरण.

मत्स्यपुराणाचे ५३ वे अध्यायांत प्रत्येक पुराणांतील विषयांचें व ग्रंथसंख्येचें दिक्प्रदर्शन थोडक्यांत केलेलें आहे. त्यांतून प्रत्येक पुराणाविषयीं प्रथम श्लोक घेऊन मग वर्णन करण्याचा क्रम धरिला आहे.

१लें ब्रम्हपुराण.—

ब्रह्मणाभिहितं पूर्वं यावन्मात्रं मरीचये ।
ब्राह्मं तु दशसाहस्रं पुराणं परिकीर्तितम्॥१॥

भावार्थ.—जें पूर्वी ब्रह्मदेवानें मरीची ऋषीस सांगितलें व ज्यांत दहा हजार श्लोक आहेत तें ब्रह्मपुराण.

पुराणांच्या यादींत ब्रह्मपुराणाचें नांव प्रथम असल्यामुळें त्यास आदिपुराण ह्मणजे पहिलें पुराण ह्मणण्याची चाल आहे. तसेंच यांत सूर्याचे अर्चेविषयीं पुष्कळ मजकूर असल्यामुळें यास सौरपुराण असें ही ह्मणतात. हल्लीं जें ब्रह्मपुराण उपलब्ध आहे त्यांत वर लिहिल्याप्रमाणें दहा हजार श्लोक नसून फक्त सात किंवा आठ हजार श्लोक आढळतात. ब्रह्मोत्तरपुराण ह्मणून याचा एक भाग आढळतो तो व स्कंदपुराणांतील ब्रह्मोत्तरखंड हीं फार भिन्न आहेत हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

वरील मत्स्यपुराणांतील श्लोकांत हें पुराण ब्रह्मदेवानें मरीचीस सांगितलें असें आहे. परंतु हल्लीं जें ब्रह्मपुराण उपलब्ध आहे त्यांत तें ब्रह्मदेवानें दक्षास सांगितलें व तेंच लोमहर्षणानें नैमिषारण्यांत ऋषींस सांगितलें असें आहे. हें ब्रह्मदेवानें दक्षास सांगितलें आहे ह्मणून याचें नांव ब्रह्मपुराण.

ब्रम्हपुराणाचे आरंभीं जगदुत्पत्ति, मन्वंतरें, व कृष्णापर्यंत सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांचा इतिहास हीं प्रकरणें आहेत. पुढें संक्षेपानें सर्व विश्वाचें वर्णन केलें आहे. नंतर उत्कल क्षेत्र ह्मणजे ओडीसा प्रांत व त्यांतील सूर्य, चंद्र, व जगन्नाथ यांचीं देवालयें व वनें यांचें वर्णन आहे. पुढें कृष्णचरित आहे तें विष्णुपुराणांतील कृष्णचरितासीं शब्दशः जमतें. ग्रंथाचे शेवटीं योगाभ्यासाविषयीं थोडासा मजकूर आहे. ब्रम्हपुराणास पुराणाचें लक्षण मुळींच लागू पडत नाहीं. उत्कल क्षेत्रांतील ह्मणजे ओडीसा प्रांतांतील देवालयांविषयीं यांत मजकूर आहे त्यावरून हें इसवी स०च्या १३व्या किंवा १४व्या शतकाचे पूर्वी रचिलें नसावें असें दिसतें.

ब्रम्हपुराणाचें उत्तर खंड हें एकाद्या माहात्म्यासारखें आहे. त्यांत मुख्य विषय म्हटला ह्मणजे बलजा नदी ह्म० मारवाड प्रांतांतील वनास नदी इचा महिमा हा आहे. तो महिमा स्पष्टपणें दाखविण्याकरितां अनेक आख्यानें लिहिलीं आहेत.

२रें पद्मपुराण.—

एतदेव यदा पद्ममभूद्धैरण्मयं जगत् ।
तद्वृत्तांताशयं तद्वत्पाद्ममित्युच्यते बुधैः ॥
पाद्मं तत्पंचपचाशत्सहस्राणीह कथ्यते ।

अर्थ— ज्या वेळीं हें जगत् सुवर्ण कमलासारखें होतें त्या वेळेच्या कथा ज्यांत आहेत व ज्यांत ५५००० श्लोक आहेत त्यास पद्म पुराण ह्मणतात.

पद्म पुराण हा फार विस्तीर्ण ग्रंथ आहे. ह्याची ग्रंथसंख्या महाभारताचे निम्मेहून अधिक आहे. ह्याचीं पांच खंडें आहेत. पहिलें सृष्टिखंड. यांत सृष्टीच्या उत्पत्तीचा प्रकार आहे. दुसरें भूमिखंड. यांत भूगोलाची माहिती आहे. तिसरें स्वर्गखंड. चवथें पातालखंड. ५वें उत्तर खंड. कांहीं पुस्तकांत क्रियायोगसार ह्मणून एक साहावें खंडही आढळतें.

हें पुराण रोमहर्षणाचा पुत्र उग्रश्रवा याणें नैमिषारण्यांत ऋषींस सांगितलें. जगदुत्पत्तीच्या वेळीं ज्या पद्मांत ब्रह्मा उद्भवला त्या पद्माचें ह्मणजे कमलाचें यांत वर्णन असल्यामुळे यास पद्म पुराण हें नांव पडलें आहे. पूर्वी ब्रह्मदेवानें पुलस्त्यास जें सांगितलें व पुलस्त्यानें भीष्मास जें सांगितलें तेंच उग्रश्रवस् सूत यानें ऋषींस सांगितलें आहे. सृष्टिखंडांत जगदुत्पत्ति व प्रजापतिवंशकथन हीं दोन प्रकरणें आहेत, तीं विष्णु पुराणांतून उतरून घेतल्या सारखीं आहेत. पुढें मन्वंतरांचें वर्णन करून शेवटीं पुष्कर ह्म० अजमीराजवळचें पोखर सरोवर याचें वर्णन आहे.

दुसरें भूमिखंड—याच्या पहिल्या १२७ अध्यायांत अनेक आख्यानें व कथा आहेत. त्यांत पत्नी, मातापितरें, व गुरू या मानिलेल्या तीर्थांचें व पृथ्वीवरील क्षेत्रांचें वर्णन आहे. शेवटीं भूगोलवर्णन आहे.

तिसरें स्वर्गखंड— यांत भूलोकाच्या वर अंतरिक्षांत जे सप्तलोक आहेत त्यांचें वर्णन आहे. त्यांत सर्वांचे शेवटीं वैकुंठ आहे असें सांगितलें आहे. नंतर कांहीं प्रसिद्ध राजांच्या कथा सांगून शेवटीं वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत.

चवथें पातालखंड—ह्यांत पाताल लोकांचें ह्मणजे नाग लोकांचें प्रथम वर्णन करून पुढें कालिदासकृत रघुवंशांत ज्या कथा आहेत, त्यांचें निरूपण केलें आहे. शेवटीं श्रीमद्भागवतमाहात्म्य, कृष्णलीला, विष्णुपूजामहिमा हीं प्रकरणें अहेत.

पांचवें उत्तरखंड—यांत माघस्नानापासून प्राप्त होणारें पुण्य, लक्ष्मीनारायण या मंत्राचा महिमा, विष्णुभक्ति, वैष्णव मुद्राधारण, विष्णूच्या मूर्ति करण्याचा प्रकार इतकीं प्रकरणें आहेत. शेवटीं भगवद्गीतामाहात्म्य, हीं आहेत.

कलियुगांत तपश्चर्या व योगसाधन करण्यास मनुष्यें असमर्थ झाल्यामुळें त्यांस मोक्षप्राप्तीचें दुसरें साधन कोणतें असा जैमिनीनें प्रश्न केल्यावरून व्यासानें विष्णूचें ध्यान, नमस्कार, मुद्राधारण, व पूजन केल्यानें सर्व धर्मांचें फळ कलींत येतें, असें सांगितलें. हा मजकूर किल्येक पद्म पुराणाचे पुस्तकांत साहावें क्रियायोगसार म्हणून जें प्रकरण आढळतें त्यांत आहे. हें प्रकरण विष्णु पुराणाचे शेवटचे अंशांतील मजकुराशीं पुष्कळ अंशीं जमतें.

३रें विष्णुपुराण.—

वराहकल्पवृत्तांतमधिकृत्य पराशरः ।
यत्प्राह धर्मानाखिलांस्तदुक्तं वैष्णवं विदुः ॥
त्रयोविंशतिसाहस्रं तत्प्रमाणं विदुर्बुधाः ।

भावार्थ.—ज्यांत पराशरानें वराहकल्पाचे संबंधानें सर्व धर्म सांगितले आहेत तें विष्णुपुराण. त्यांत २३,००० श्लोक आहेत.

हें पुराण पराशरानें आपल्या मैत्रेय नामक शिष्यास सांगितलें आहे. ह्याचे साहा भाग आहेत. प्रत्येकास अंश असें नांव आहे. पहिल्या अंशांत विष्णु व प्रधान आणि

पुरुष यांची उत्पत्ति कशी झाली तो प्रकार, नेत्रांचें पातें हलण्यापासून कल्पापर्यंत कालविभाग, वराह अवताराचें वर्णन, निरनिराळे प्राण्यांचे उत्पत्तीचा प्रकार, दुर्वास ऋषी इंद्रावर कोपल्यामुळें लक्ष्मी व अमृत हीं नष्ट झालीं तीं प्राप्त होण्याकरितां केलेल्या समुद्रमंथनाचें वर्णन, दक्षकन्या व ऋषी यांचे संततीचा प्रकार, उत्तानपाद राजाचा धाकटा मुलगा ध्रुव याला अढळपद मिळाल्याचा प्रकार, ध्रुवाच्या वंशजांचें वर्णन, आणि विश्वाचे निरनिराळे विभाग व त्यांचे स्वामी यांचें वर्णन इतकीं प्रकरणें आहेत.

दुसऱ्या अंशांत पृथ्वीच्या द्वीपांचें वर्णन, सप्तपाताल व नरक यांचें वर्णन, ग्रहांची स्थिति, गति, व रथ यांचें वर्णन हीं प्रकरणें आहेत. सूर्याचे रथाचें वर्णन फार चमत्कारिक व विस्तृत आहे. शेवटीं विष्णूचा महिमा व संसाराची अनित्यता हीं दोन वेदांतशास्त्राचीं मूलतत्वें स्पष्ट करून दाखविण्याकरितां भरताचें आख्यान दिलें आहे.

तिसऱ्या अंशांत मनु व त्यांचे वंशज यांचें वर्णन; अठ्ठावीस वेदव्यास, वेद व पुराणें यांची उत्पत्ति; वेदांच्या शाखा; पुराणांचीं नांवें; वर्णाश्रम धर्म हीं प्रकरणें आहेत. शेवटीं यमगीता ह्मणून एक प्रकरण आहे त्यांत विष्णुभक्तांना यमाचे दूत स्पर्श करीत नाहींत असें दर्शविलें आहे.

चवथ्या अंशांत सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांच्या वंशजांचा इतिहास कलियुगांतील अगदीं अर्वाचीन कालापर्यंत सांगितला. ह्या अंशाच्या ११व्या अध्यायापासून १५ व्या अध्यायापर्यंत कृष्णावर स्यमंतक मणी चोरल्याचा आळ आला होता त्याची कथा आहे. मागध राजांचे इतिहासांत झटलें आहेकीं,—

यावत्परीक्षितो जन्म यावन्नन्दाभिषेचनम् ।
एतद्वर्षसहस्रं तु ज्ञेयं पंचदशोत्तरं ॥

(वि. पु- अं. ४, अ. २४, श्लो० ३२.)

महानंदिसुतः शुद्रागर्भोद्भवोऽतिलुब्धो महापद्मो नंदः परशुराम इव अपरोऽखिलक्षत्रांतकारी भविता ॥४॥ तस्याप्यष्टौ सुताः सुमाल्याद्या भवितारस्तस्य च महापद्मस्यानु पृथ्वीं भोक्ष्यंति। महापद्मस्तु पुत्राश्च एकं वर्षशतमवनीपतयो भविष्यंति । नवैतान्नन्दान् कौटिल्यो ब्राह्मणः समुद्धरिष्यति ॥६॥ तेषामभावे मौर्य्याश्च पृथिवीं भोक्ष्यंति । कौटिल्य एवं चंद्रगुप्तं राज्येऽभिषेक्ष्यति ॥७॥ अं. ४ अ. २४.

भावार्थ— परीक्षित राजाचे जन्मापासून १०१५ वर्षें लोटल्यावर महापद्मनंद राजास राज्याभिषेक झाला. तो व त्याचे आठ पुत्र अशा नऊ नंदांनीं १०० वर्षें राज्य केलें. नंतर चंद्रगुप्त राजा झाला.

चंद्रगुप्त इ० स० पूर्वी ३१५ वे वर्षी गादीवर बसला असें युरोपियन इतिहासकारांनीं सिद्ध केलें आहे. तेव्हां ३१५त १०१५ व १०० ह्मणजे १११५ मिळविले असतां इ० स० पूर्वी १४३० वर्षें हा परीक्षित राजाचे जन्माचा व भारती युद्धाचा शक निघतो.

पांचव्या अंशात कृष्णचरित आहे. देवानीं प्रार्थना केल्यावरून विष्णूनें आपल्या डोक्याचा एक केंस उपटून त्यास देवकीच्या उदरांत भूभार हरण करण्याकरितां जन्म घेण्यास सांगितलें असा उपक्रम करून पुढील कथा भागवतांतील कथेप्रमाणेंच सांगितली आहे. नंतर अनिरुद्ध व बाणासूर यांचें युद्ध, काशीचा राजा पौंड्र यानें वासुदेव हें नांव धारण केलें होतें त्याचा कृष्णाचे हातून वध, यादवाचा संहार, कृष्णनिर्याण, व

कृष्णाचें निजधामास गमन हीं आख्यानें आहेत.

साहाव्या ह्म० शेवटच्या अंशांत कालाचे कल्प ह्मणून जे विभाग आहेत त्याविषयीं सांगून नंतर मानवी शरीरास जीं अनेक दुःखें होतात तीं फक्त विष्णुभक्तीनें नष्ट होतात, दुसऱ्या कोणत्याही उपायानें नष्ट होत नाहींत; अतएव सर्वांनीं विष्णुभक्ति करावी, असें सांगून ग्रंथसमाप्ति केली आहे.

४थें, वायुपुराण.—

श्वेतकल्पप्रसंगेन धर्मान्वायुरिहाब्रवीत् ।
यत्रैतद्वायवीयं स्याद्रुद्रमाहात्म्यसंयुतम् ॥
चतुर्विंशत्सहस्राणि पुराणं तदिहोच्यते ।

भावार्थ—ज्यांत श्वेतकल्पाचे संबंधानें वायूनें धर्म सांगितले आहेत व ज्यांत रुद्राचें माहात्म्य आहे त्यास वायुपुराण ह्मणतात. त्यांत २४,००० श्लोक आहेत.

पुराणांच्या कित्येक यादींत वायुपुराणाचें नांव नसून त्या ठिकाणीं शिवपुराणाचें नांव आढळतें असें वर दर्शविलेंच आहे. आतां वरील मत्स्यपुराणांतील श्लोकांत वायुपुराणांत रुद्राचें माहात्म्य आहे असें सांगितलें आहे, त्यावरून वायुपुराण व शिवपुराण हीं दोन्ही एकाच पुराणाचीं नांवें आहेत असें दिसतें. मिताक्षरेचा टीकाकार बालंभट्ट याचेंहि हीं दोन्ही एकाचींच नांवें असेंच मत आहे. या गोष्टीस दुसरें एक असें प्रमाण आहे कीं,दोन्हींची ग्रंथसंख्या अनुक्रमें मत्स्यपुराणांत व भागवतांत सांगितली आहे ती अगदीं जमते. शिवाय हीं दोन्ही एकाचींच नांवें याविषयीं रेवामाहात्म्यांत ह्मटलें आहे कीं:—

चतुर्थं वायुना प्रोक्तं वायवीयमिति स्मृतम् ।
शिवभक्तिसमायोगाच्छैवं तच्चापराख्यया॥१॥

हें सूतानें नैमिषारण्यांत ऋषींस सांगितलें आहे. पूर्वी तें त्याच ठिकाणीं वायूनें ऋषींस सांगितलें होतें ह्मणून त्याचें नांव वायुपुराण असें पडलें. ह्याचे चार भाग आहेत. प्रत्येक भागास पाद असें नांव आहे. पहिला प्रक्रियापाद. दुसरा उपोद्घात पाद, तिसरा अनुषंग पाद, व चवथा उपसंहार पाद.

पहिल्या पादांत सर्गाचें ह्म० उत्पत्तीचें वर्णन आहे. दुसऱ्यांत सर्गाचे वर्णनाची समाप्ति करून कल्पांचें वर्णन केलें आहे. त्यांत एकंदर ३३ कल्प आहेत, व शेवटच्या कल्पाचें नांव श्वेतकल्प असें सांगितलें आहे. पुढें प्रजापतींचे वंश, पहिल्या साहा मन्वंतरांतील गोष्टींचें निरूपण, व विश्ववर्णन हीं प्रकरणें आहेत. मधून मधून दक्षयज्ञ, महेश्वरमाहात्म्य, नीलकंठ स्तोत्र, इ० शिवस्तुतिपर प्रकरणें आहेत.

तिसऱ्या पादांत सप्तर्षि व त्यांचे वंशज यांचें वर्णन व दक्षकन्यापासून उत्पन्न झालेल्या सृष्टींतील नानाविध पदार्थांचें निरूपण हीं करून पुढें पितृपूजन व श्राद्धकल्प हीं प्रकरणें आहेत. श्राद्धकल्पानंतर चंद्रवंशी व सूर्यवंशी राजांचें वर्णन आहे.

शेवटच्या उपसंहारपादांत पुढें होणारीं मन्वंतरें, कालमान, क्षेत्रमान, सृष्टिलय, योगसाधनाचें फल, व शिवपुरमाहात्म्य यांचें संक्षेपानें वर्णन केलें आहे. (पुढें चालेल.)

मातृशिक्षा.

२. प्रसवकाळची वर्तणूक.

(पुढें चालू.)

—ooo—

प्रसवकाळीं पुष्कळ वेळ एकसारखें अडून बसल्यामुळें किंवा एकाच अंगावर पडून रा-

हिल्यामुळें एकादे वेळीं, मांडीचें, किंवा जांघेचें, किंवा कुशीचें हाड खिळल्यासारखें होतें, असें मागें सांगितलें आहे. थोडासा वेळपर्यंत यापासून किंचित् असमाधान वाटतें, परंतु यापासून मोठासा अपकार होण्याची कांहीं भीति नाहीं. हात किंचित् उष्ण करून त्यांणीं तो भाग चोळला असतां, किंवा गर्भिणीनें उठून इकडे तिकडे अमळ फिरल्यानें या विकाराचें सहज निवारण होईल.

५७. मूत्रत्याग—प्रसवकाळच्या प्रथमावस्थेमध्यें कित्येकींना वारंवार मूत्रत्यागाची इच्छा उत्पन्न होते. आणि बहुतेकींना किंचित् वेदना वाटून त्या वेदनेबरोबरच नकळत मूत्रस्राव ही होतो. तेणेंकरून गर्भिणीला आणि जवळ असणाऱ्या दुसऱ्या लोकांनां ही खरी गोष्ट न समजतां, तो प्रसूतीचा जलस्राव असें त्यांना वाटूं लागतें. परंतु अमळ सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां याविषयीं भ्रम मुळींच उत्पन्न होणार नाहीं.

केव्हां केव्हां प्रसवदशेच्या उत्तरावस्थेमध्यें, व विशेषत: प्रसवावस्था लांबली ह्मणजे, मूत्रत्यागाची इच्छा असतां ही गर्भिणीला मूत्रत्याग होत नाहीं. असें घडून आल्यास या गोष्टीकडे दुर्लक्ष न करितां वैद्याचा विचार घ्यावा. या अवस्थेचा नीट विचार करून मूत्रत्याग न करविल्यास, प्रसवकाळीं फार कष्ट पडून पुढें आणखी फार अनिष्ट प्रकार घडून येण्याचा संभव आहे.

५८. वैद्याकडून परीक्षा.—आमच्या देशींच नव्हे, पण युरोप खंडामध्येंही सभ्य जातीच्या स्त्रिया, प्रसवकाळीं वैद्याकडून परीक्षा करविण्यास सहसा आपलें मत देत नाहींत. परंतु प्रसवव्यापार दीर्घस्थायी आणि अतिशय कष्टकर झाल्यास याविषयीं अवश्य संमति दिली पाहिजे. अशी गोष्ट खरी कीं वैद्याच्या साह्यावांचून पुष्कळ स्त्रिया सहज प्रसूत होतात, परंतु केव्हां केव्हां वैद्याचें साह्य घेतलें नसल्यामुळेंच गर्भिणी आणि उत्पन्न होणारें बालक या दोहोंचा ही नाश होतो, या गोष्टीचें स्मरण ठेविलें पाहिजे. गर्भाचें मुख व्हावें तसें प्रसृत झालें आहे किंवा नाहीं, त्यामध्यें कांहीं प्रतिबंध आला आहे किंवा कसें, संतान ह्मणजे बालक याचें मस्तक पहिल्यानें पुढें न येतां शरीराचा दुसरा कोणचाही भाग पुढें आला आहे किंवा कसें, मस्तक असावें त्यापेक्षां फार घट्ट किंवा फार मोठें आहे कीं काय, प्रस्तुत होणाऱ्या वेदना त्या खरोखरीं प्रसववेदनाच होत किंवा नव्हेत, इत्यादि विषय जर प्रसूतिकेच्या जवळ उभें राहिल्यानें सहज समजतील, तर पुन: परीक्षेची कांहीं गरज नाहीं. आमच्या देशीं सुईणींचे ज्ञान आणि दूरदर्शीपणा बहुश: इतका अल्प असतो कीं, त्यांच्याकडून परीक्षा करवून कांहीं बरोबर समजेल असें बहुधा घडत नाहीं; तसेंच त्यांच्या सांगण्यावरच विश्वास ठेवल्यानें अनेक प्रसंगीं अनिष्टें घडून आली आहेत, हें प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत चालू असणाऱ्या वेदना याच प्रसववेदना होत किंवा नव्हेत, वैद्याच्या साह्यावांचून प्रसवक्रिया नीट सिद्धीस जाईल किंवा नाहीं, प्रसवक्रिया लांबत पडून प्रसूतिकेला कष्ट होतील किंवा कसें, इत्यादि गोष्टींचें ज्ञान होण्याकरितांच केवळ परीक्षेची गरज आहे असें नाहीं, तर बालकाचें स्वाभाविक संस्थान कसें आहे, ह्मणजे बालकाचें निरनिराळे अवयव कसकसे कोठें कोठें कोणच्या स्थितीनें आहेत, ही गोष्ट मुख्यत्वें समजून घेतली पाहिजे, हें या परीक्षेचें मुख्य कारण.

ह्मणून याविषयीं जर कांहीं अडथळा दिसला नाहीं, तर बहुधा निश्चित राहण्यास कांहीं हरकत नाहीं.

५९. वैद्याकडून परीक्षा करविण्याची असल्यास, आणि प्रसूतिकेची त्याविषयीं संमति पडल्यास, तिला डाव्या बाजूस निजवून तिच्या आंगावर एक मोठें वस्त्र किंवा चादर अवश्य झाकावी. आणि अशा स्थितीमध्यें तिनें आपल्या दोन्ही मांड्या पोटाच्या बाजूस अर्ध्या वांकड्या करून धराव्या. योग्य वाटल्यास प्रसूतिकेला मच्छरदानीच्या मध्यें निजविण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें सोई करून वैद्यानें जवळ बसून परीक्षा केल्यास यापासून कांहीं धास्ती धरण्याचें कारण नाहीं.

अनेक स्थळीं असें दिसून येतें कीं, अतिशय अज्ञान सुइणी या अवस्थेमध्यें पुनःपुनः परीक्षा करून प्रसूतिकेला त्रास आणतात. पण पुनःपुनः परीक्षा करणें हें अत्यंत निष्प्रयोजनीय, आणि बहुशः व्यर्थ कष्टकर याविषयीं कांहीं संदेह नाहीं. योग्य वाटेल त्यावेळीं, या अवस्थेची एकवार परीक्षा केली, आणि नंतर त्या अवस्थेमध्ये फेरफार झाल्याचीं कांहीं चिन्हें नसलीं तर पुनः आणखी परीक्षा करण्याची कांहीं गरज नाहीं.

६०. पथ्य.—प्रसवावस्थेमध्यें थोडथोड्या मानानें, लवकर पचणारा असा कांहीं सामान्य आहार देण्याची व्यवस्था ठेवावी. मध्यें मध्यें थोडें दूध, अरोरूट (तवकील), यवाचा मंड, चहा, किंवा क्षुधा असून इच्छा असल्यास प्रवासच्या प्रथमावस्थेमध्यें भात, आणि मत्स्य ही देण्यास कांहीं हरकत नाहीं. साखरलिंबू, अनानस, आंबा, इत्यादि अल्पमधुर फळें पाहिजे तर देण्यास हरकत नाहीं. व हीं बेतानें खाल्यास यांपासून कांहीं अपकार होणार नाहीं. वैद्याचे सल्ल्यावांचून कोणत्याही प्रकारचा उत्तेजक पदार्थ, किंवा (पोर्टवाईन) वगैरे दारू देऊं नये. प्रसूतिकेची शक्ति राखण्याकरितां ह्मणून जर असे कडक पदार्थ तिला अमळ जास्त पडले, तर बाळंत झाल्यानंतर तिला त्यांपासून ज्वर आणि दुसऱ्या कित्येक पीडा होण्याचा फार संभव आहे.

या वेळीं जर प्रसूतिकेला अन्नाची इच्छा होत नसेल, तर शक्ति राखण्याकरितां ह्मणून कांहीं पदार्थ खाण्याला देऊं नये. बहुशः तिला आपण होऊन जर कांहीं खाण्याची इच्छा होईल तर मात्र देणें योग्य आहे. आणखी असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, पोट फार भरलें असलें तर प्रसव लवकर न होतां त्यापासून उलट जास्त उशीर लागणार आहे.

६१. शरीराची संस्था इत्यादिक.—प्रसवकालीं ज्या रीतीनें वागणें अवश्य त्या रीतीनें विचारपूर्वक वागल्यास, प्रसवाला अतिदीर्घ काळ लागणार नाहीं. प्रसवाच्या प्रथमावस्थेमध्यें, प्रसूतिकेला ज्या तऱ्हेनें राहण्याची ह्मणजे बसण्याची किंवा निजून राहण्याची इच्छा होईल त्या तऱ्हेनें राहूं देणें हें फार योग्य आहे. या समयीं सर्वदा शयन करून ह्मणजे पडून राहिल्यानें जिवाला थाक व आळस वाटतो, आणि कुशींचीं, मांडीचीं, आणि जांघाचीं हाडें खिळल्यासारखीं होऊन व्यर्थ त्रास होतो. कोठें कोठें या प्रसंगीं प्रसूतिकेला उठून फिरायाला सांगतात. जोंपर्यंत थकल्यासारखें वाटत नाहीं, तोंपर्यंत उठून उभें राहण्यामध्यें विशेष हानी नाहीं; परंतु थाक वाटल्यास बसावें हें चांगलें. एकादे वेळीं प्रसूतिकेला झोंप येत आहे असें वाटलें, तर कोणत्याही प्रकारें तिच्या झोंपेला अडथळा करूं नये. तिला स्वस्थ निजूं द्यावें. थोडीशी निद्रा

घेतल्यानें शरीर हुशार होऊन नव्या जोरदार वेणा येऊन लवकर बाळंतपण होतें.

६२. प्रसवाच्या प्रथमावस्थेमध्यें वेणा उत्पन्न न झाल्यास कोणी कोणी अज्ञान सुइणी, प्रसूतिकेला वेग द्यायाला सांगतात. परंतु यापासून कांहीं लाभ न होतां, फक्त अपकार मात्र होण्याचा संभव आहे, यांत संशय नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं प्रसूतिका कितीही शरीरानें बळकट असली, तरी तिच्या स्वत:च्या नेटानें ती प्रसूत होऊं शकेल असें कधींही व्हायाचें नाहीं; यापासून ती दुर्बल आणि निस्तेज मात्र होऊन जाईल, आणि त्यामुळें स्वाभाविक वेदनाही मंद पडतील. पण जेव्हां प्रसूत होण्याच्या वेणा येतात त्यावेळीं, तिची इच्छा नसली तरी शरीरामध्यें आपोआपच वेग उत्पन्न होतील.

वेणा मंद मंद झाल्यास, प्रसव होण्यास ह्मणजे पुष्कळ वेळ लागेलच असें कांहीं ह्मणवत नाहीं. कोठें कोठें अशा मंद वेदना वृद्धिंगत करण्याकरितां प्रसूतिकेला नाना प्रकारचे पदार्थ खायाला देत असतात. परंतु अनेक स्थळीं यापासून कांहीं हित न होतां, पुष्कळ स्थळीं यापासून अपकार मात्र घडले आहेत. प्रसूत होण्याच्या ज्या वेणा येतात, त्यांपासून कित्येकींच्या पाठीमध्यें ताणा लागून फार कष्ट होतात. अशा वेळीं नीट जपून पाठीवर हळूहळू हात चोळला तर त्यापासून पुष्कळ उपशम होईल. परंतु हें कृत्य बळानें हात दाबून करूं नये.

६३. याप्रमाणें प्रसूतीची प्रथमावस्था जाऊन पुढें द्वितीयावस्था, ह्मणजे बळकट वेदना येऊं लागल्या ह्मणजे तिला हातरूणाच्या डाव्या आंगास निजवावें. आमच्या देशीं कोठें कोठें अशा प्रसंगीं सुइणीच्या पायांवर बसून, खालीं पाय नीट टेकून, दोन्हीं गुडघे वर करून, सुइणीच्या मानेस धरून, वेग द्यायाला सांगतात. केव्हां केव्हां मांड्यांवर जोर देऊन शरीराचा वरचा भाग वांकवून सुइणीच्या मानेला धरून मग नेट द्यायाला सांगतात; बळकट वेणा न आल्यास किंवा, कोठें कोठें, सुइणीचे पाय विस्तीर्ण करून त्यांवर आपले दोहोंकडे दोन्ही पाय लांबवून बसून सुईणीची मान धरून खूब जोरानें नेट द्यायाला सांगतात. याप्रमाणें कित्येक प्रथा फार भयंकर रीतीच्या पडल्या आहेत. त्या दिसण्याला ही वाईट, आणि प्रसूतिका आणि सुईण या दोहोंना ही फार त्रासदायक होत हें, हा मजकूर वांचणारांच्या सहज लक्षांत येईल. केव्हां केव्हां दहा दहा पंधरा पंधरा तास पर्यंत प्रसूतिकेला याप्रमाणें पायांवर बविल्यानें, पाळी पाळीनें चार चार पांच पांच माणसें थकून जाऊन ही, प्रसव न होऊन, शेवटीं वेणा तर अगदीच नाहींशा होऊन गेल्याचें पाहण्यांत आलें आहे. या प्रकारची ती प्रसूतिकेची अवस्था पाहिली असतां, पाहणारांच्या शरीरांतील रक्त सुकून जाऊन आंगाला कंप सुटेल. या सर्व भयंकर चाली कधीं नाहींशा होतील, गर्भारपणाचे त्रास सोसून त्यांवर आणखी आमच्या देशीं जे हे बाळंतपणाचे विनाकारण त्रास सोसावे लागतात, त्यांपासून या बाळंतिणी कधी मुक्त होतील, त्यांचे नवरे, आया, बंधू, बाप, इष्टमित्र हे त्यांचे ते दुरूह क्लेश पाहून त्यांच्या निवारणास कधी उद्युक्त होतील, आणि सूतिकागृह ह्मणजे बाळंतिणीची खोली, ती कारागृहाप्रमाणें भयंकर न वाटतां, तें त्रास निवारणाचें स्थान असें कधीं वाटूं लागेल, हें सांगवत नाहीं.

६४. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, प्रसवाच्या द्वितीयावस्थेमध्यें गर्भिणीला हांतरुणांवर डाव्या बाजूस निजवावें. कित्येक देशांमध्यें कांहीं निराळ्या स्थितीनें राहून प्रसूत होण्याच्याही रीति आहेत. परंतु सुइणीच्या कामामध्यें अतिविख्यात जे लोक त्यांहीं असें पाहिलें आहे कीं, गर्भिणीला आपल्या सोईस पडेल त्या रीतीनें राहाण्यास सांगितलें असतां, बहुतकरून स्वभावतःच त्या आपल्या डाव्या बाजूला जाऊन प्रसूत होतात. यावरून बिछान्याच्या डाव्या बाजूस निजणें हेंच चांगलें यांत कांहीं संदेह नाहीं.

६५. प्रसवाच्या द्वितीयावस्थेमध्यें, डाव्या बाजूला निजून, वेणा येतील तेव्हां त्यांच्या बरोबरच नेट द्यावा, वेणा आल्यावांचून नेट दिल्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं. आणखी असें कीं, वेग देण्याच्या वेळेस हायहूय न करितां दम छाटून धरल्यास तितकें चांगलें. पूर्वी सांगितलें आहे कीं, खाटेच्या डोक्याकडे डाव्या खुराच्यावर एक लहानसें फडकें बांधून ठेवावें. यावेळीं, त्या फडक्याला धरून वेग देण्याला फारच सोई उत्पन्न होते. परंतु हें फडकें धरून नेट देण्याच्या वेळीं, शरीराचा मध्य भाग, ह्मणजे पोट आणि छाती हीं अगदीं स्थिर ठेवावीं, त्यांची उचंबळ होऊं देऊं नये. वेणा येतील तेव्हांच त्या फडक्याला धरून वेग द्यावा. वेणा नसतील तेव्हां कोणत्याही प्रकारे हालचाल करूं नये. (पुढें चालेल.)

प्राचीन हिंदु लोकांचें कित्येक कलासंबंधी ज्ञान.

अर्वाचीन हिंदुलोकांचीं जी स्थिति आहे ती अत्यंत निकृष्ट होय. प्राचीन हिंदुलोकांची हरएक विषयसंबंधीं माहिती बरीच पक्की होती व त्यांनी अनेक शास्त्रसंबंधीं शोधही बरेच लाविले होते असें सर्व निष्पक्षपाती लोकांचें ह्मणणें आहे. त्यांचे त्या वेळचे शोध व ज्ञान पाहून आपलीं मनें थक्क होऊन जातात. प्राचीन हिंदुलोकांचे विचार स्वतंत्र असत. हरएकप्रकारें ज्ञानाची वृद्धि करण्यास ते फार झटत. अर्वाचीन हिंदु लोक तर विलक्षण रीतीनें निकृष्ट दशेस पावले आहेत. त्यांचे धर्मसंबंधीं विचार ही विलक्षण रीतीनें पोरकट झाले आहेत. व्याकरण व न्याय या दोन शास्त्रांवांचून तृतीय शास्त्राचें अध्ययन करण्याची जरूरी फारशी कोणास नसतेच. गुर्जर देशांत तर त्यांचें ही दुर्भिक्ष. मुहूर्त पाहतां आला तर तो पंडित; तेव्हां अर्थांतच कोणी मुहूर्ताध्यायी, कोणी लघुजातकाध्यायी, कोणी सारस्वतपंचसंध्याध्यायी, असे लोक तेथें आढळतात. आपल्या कित्येक लोकांचा तर समज असा आहे, कीं संध्या रडत कुथत येऊन थोडा भागवताचा अर्थ सांगतां आला ह्मणजे झालें. सारांश नवीन शोध नाहीं तर नाहीं; पण प्राचीन लोकांनीं केलेले शोध तरी जपून राखणें हें देखील अर्वाचीन लोकांस दुष्कर. माधवाचार्यादिक मध्यंतरीय लोकांनीं कांहीं बहुत राखून ठेविलेलें ही आतां लयास जाऊं पहातें; कारण कीं त्याचा भोक्ता तर दूर; पण द्रष्टाही आधुनिक शास्त्रिमंडळांत कोणी दिसत नाहीं. शेतकीसंबंधीं, बागांसंबंधी अलंकारांसंबंधी व अशाच दुसऱ्या विषयांसंबंधी आपल्या पूर्वजांनीं ग्रंथ करून ठेविले नाहींत असें नाहीं. पण हल्लीं त्यांचा कोणी भोक्ता नसल्यामुळें ते प्रायः दुर्मिळ आहेत. तशांतही एकादा ग्रंथ मोठ्या प्रयासानें मिळविल्यास लेखकाच्या

अनाडीपणामुळें व, नंतर मार्मिक वाचणारानें मूळ प्रतीवरून शुद्ध न केल्यामुळें, चुक्यांचा इतका अगाध सागर बनून गेलेला असतो कीं त्यांत ढकललेल्या बुद्धिरूप जहाजास भ्रमरूपी वादळ डळमळवीत नाहीं असें क्वचितच घडतें.

हा वरील विचार उघड करून दाखविण्यास "चिंतामणि" नांवाचा एक अपूर्व ग्रंथ कारणभूत होय. हा ग्रंथ सहज आमच्या नजरेस पडला. पहिल्यानें हा इतका अमोलिक असेल असें आह्मांस वाटलें नाहीं. पण अवलोकनाअंतीं त्याची योग्यता आह्मांस बरीच वाटली. मोठें दुर्दैव कीं या ग्रंथाचें पहिलें पान त्रुटित झालें आहे. या ग्रंथाच्या शेवटीं "इति श्रीमहाराजाधिराजप्रतापरुद्रदेवकृति चिंतामणिग्रंथ" असें लिहिलें आहे. त्यावरून प्रतापरुद्र राजानें हा ग्रंथ रचला असें स्पष्ट होतें. **प्रतापरुद्रयशोभूषणाख्य** साहित्यशास्त्रीय ग्रंथाचा कर्ता विद्यानाथ यास आश्रय देणारा **प्रतापरुद्र** या नांवाचा राजा इतिहासांत विख्यात आहे. तो शालि० शके १४२५ या वर्षीं विजयनगरच्या गादीवर बसला. तो व हा ग्रंथकर्ता एकच असावा. कारण व्यक्तिभिन्नत्वाचा शुष्क तर्क करण्यास कांहीं आधार दिसत नाहीं. तेव्हां या ग्रंथास आज साडेतीनशें वर्षें झालीं. आमच्या पोथीचा लेख सुमारें ४०(चाळीस) वर्षांचा आहे. कारण **"संवदष्टादशशतनवतितमे वर्षे शाके सप्तदश अष्टपंचाशत्प्रवर्तमाने (संवत् १८९३ व शालिवाहन शके १७५८) उत्तरायणगते श्रीसूर्ये माघमासे शुक्लपक्षे दशम्यां सौम्यवासरे समाप्तोऽयं चिंतामणिग्रंथः"** असा सरते शेवट शेरा मारिला आहे. त्यांत तरतरेचे मनोरंजक विषय पुष्कळ आहेत. हा ग्रंथ जर चांगला शुद्ध असता, तर त्यापासून विलक्षण लाभ झाला असता. परंतु लेखकाचा लेख कित्येक ठिकाणीं अत्यंत अशुद्ध आहे. यामुळें ग्रंथाचा शब्दशः सारांश वाचकांपुढें ठेवितां येईल असें आह्मास वाटत नाहीं. तशांत कित्येक ठिकाणीं लेखकानें **'चरण'** व क्वचित् **'अर्ध'** ही सोडून दिलेलें असतें. तरी आह्मी वाचकांस यथाशक्ति मधून मधून शब्दशः सारांश अथवा तसें घडणें अत्यंतच कठिण असल्यास याचा थोडासा संक्षेप तरी सादर करूं. पहिल्यानें सव्विसाव्या पानासच आरंभ करूं या.

इदानीं पादपदोहदमुच्यते ।

अर्थ— आतां वृक्षांचें दोहद काय तें सांगतों. अर्थात् ज्याच्या योगानें वृक्ष दृढमूल व पुष्ट होऊन पुष्कळ दिवस जगून मधुर फळें देऊन आपल्या स्वामीस खुश करितील, तें साधन सविस्तर वर्णन करितों.

तत्रादौ वृद्ध्युपयोगितया वृक्षसेचनमुच्यते ।

अर्थ—पाणी शिंपलें असतां वृक्ष लवकर वाढतो यासाठीं पाणी शिंपण्याचेंच पहिल्यानें निरूपण करितों.

सायं प्रातश्च घर्मर्तौ शीतकाले दिनांतरे ।
वर्षासु च भुवः शोषे सेक्तव्या रोपिता द्रुमाः ॥
हेमंते शिशिरे देयं तोयं चैकांतरे दिने ।
वसंते च तथा ग्रीष्मे सायं प्रातः सदा बुधैः ॥
आलवालस्थितं तोयं शोषं न भजते यदा ।
अजीर्णं तद् विजानीयान्न देयं तादृशं जलम् ॥
खनित्वा तं तथा भूमौ शोषयित्वा स्थितं जलम् ।
पश्चात् प्रसेचनं कार्यं वृक्षाणां वृद्धिमिच्छता ॥
बीजवापात् समारभ्य कुंभैर्नैकेन सेचनम् ।
यावद्वर्षं ततः कुंभः प्रतिवर्षं विधीयते ॥

अर्थ— ग्रीष्मऋतूंत (उन्हाळ्यांत) लावलेल्या वृक्षांस सकाळीं व संध्याकाळीं यापमाणें नेमानें दोन वेळ पाणी घालावें; हिंवाळ्यांत एक दिवसा आड घालावें; पावसाळ्यांत पा-

ऊस नें पडल्यामुळें जमीन जर शुष्क होऊं लागली तर मात्र घालावें. हेमंत व शिशिर या दोन ऋतुंत एक दिवसाआड पाणी शिंपावें; वसंत व ग्रीष्म या दोन ऋतुंत तर सकाळीं व संध्याकाळीं याप्रमाणें दिवसाचें दोन वेळ पाणी शिंपलें पाहिजे. वृक्षाच्या मुळांत (अळ्यांत अथवा कुंडींत) घातलेलें पाणी वृक्षानें बरोबर ओढून न घेतल्यास वृक्षास "अजीर्ण" झालें असें समजावें; याप्रमाणें अजीर्ण होईल इतकें पाणी वृक्षाच्या मुळांत कधीं ही ओतूं नये. वृक्षास अजीर्ण झाल्यास मुळाजवळील माती खणून तें पाणी आंत सर्व जिरवून टाकलें पाहिजे; तें बरोबर जिरल्यानंतरच पुनः पाणी शिंपण्यास आरंभ करावा; ह्मणजे वृक्ष चांगला वाढतो. भुईंत बीं पेरल्यापासून एक च कुंभानें रोज पाणी घालावें; एक वर्ष झाल्यानंतर कुंभ पुनः नवा करावा; याप्रमाणें दर वर्षास नवा नवा कुंभ आणून त्यानें पाणी घालावें.

दोहदस्य प्रकाराः ॥

अर्थ— आतां कोणतें दोहद मिळालें असतां कोणता वृक्ष पुष्ट होतो तें सांगतों.

मधुसर्पिर्गुडक्षीरैः फाणितेन विमिश्रितैः
कपित्थश्रीद्रुमौ सिक्तौ भूरिस्वादुफलान्वितौ ॥

अर्थ— मध, तूप, गूळ, दूध, हीं काकवींत मिळवून त्या काकवीनें रोज शिंपणें केलें तर कंवीट व बेल यांवर अत्यंत मधुर फळें येतात.

खर्जूरनालिकेराणां वंशस्य कदलस्य च
पललेन सतोयेन सेको वृद्धिकरः स्मृतः ॥

अर्थ— मांस पाण्यांत उकडवून त्या पाण्यानें शिंपलें असतां खजुरी, नारळ, वंश, व केळ हे वृक्ष चांगली वाढ घेतात.

माषमुद्ग...पीजैः क्वथितैर्वारिशीतलैः
चूर्णितैर्मांदिरामिश्रैर्लवणेन समन्वितैः ॥
कृतलेपो विभावर्यौ फलहीनोपि सर्वदा
नारिकेलतरुः सूते बहुस्वादु बृहत् फलम् ॥

अर्थ— उडीद, मूग,...हीं तीन द्रव्यें पाण्यांत उकळावीं नंतर तीं बाहेर काढून त्यांत मद्य व मीठ घालून तीं बारीक वाटावीं मग त्यानें रोज रात्रीं मुळास लेप करावा. असें केलें असतां नारळीच्या झाडावर गोड व मोठे असे पुष्कळ नारळ लागतात.

शृगालमांसखंडेन मूलदत्तप्रलेपनः
बीजपूरी फलत्युग्रं गुडमांसजलोक्षिता ॥

अर्थ—कोल्ह्याच्या मांसाचे तुकडे तुकडे करून तें मुळांत टाकावें; व वर रोज गुळानें संसृष्ट केलेलें मांसोदक शिंपीत जावें; ह्मणजे माहाळुंगीस पुष्कळ चांगलीं फळें येतात.

यस्य कस्यापि मांसेन मोक्षीरगुडसंयुता
तेन सिक्तेन नारंगी सुस्वादा सुफला स्थिता ॥

अर्थ—कोणत्या तरी पशूंचें मांस घेऊन, त्यांत गाईचें दूध व गूळ घालून, तें पाण्यांत उकळावें; व त्या उकाळ्यानें रोज नारंगाचें झाड शिंपावें, ह्मणजे मधुर मधुर नारिंगें वर धरतात.

मेषमांसैःकीर्णमूला तत्केशामिषधूपिता
दाडिमी फलसंपत्तिं महतीं लभतेतरां ॥

अर्थ—मेंढ्याचें मांस मुळांत टाकावें; व त्याच्याच केंसाचा व मांसाचा धूर द्यावा; ह्मणजे डाळंबीवर डाळंबें फार चांगलीं धरतात.

क्वाथः शशकमांसस्य यदि मूलेप्रदापयेत्
द्राक्षा भवति सुस्वादुफला भूरिरसान्विता ॥

अर्थ—सशाच्या मांसाच्या काढ्यानें जर द्राक्षालतेचें मूळ शिंपीत गेलें तर फार मधुर व मिष्ट अशीं पुष्कळ द्राक्षें वर लागतात.

मुस्ताजंबूफलोशीरतप्तक्षीरजलोक्षितः
इतरास्त्रो भवेद्वृक्ष्यः सहकारोत्तिसौरभः ॥
जंबूफलघनोशीरक्वथितोदकसेकतः
बालचूतो भवेत् स्वादुरसामोदफलान्वितः ॥

अर्थ—मोथा, जांभळें, व वाळा, हीं द्रव्यें

आंत टाकून दूध चांगलें तापवावें; मग तें पाण्यांत घालून त्या पाण्यानें शिंपीत गेलें असतां आंब्याचें झाड कितीही खराब असलें, तरी त्यांजवर दिव्य, मधुर, सुवासयुक्त असे आंबे धरतात. अथवा दूध नसलें तरी हरकत नाहीं. शुद्ध पाण्यांत वर लिहिलेलीं द्रव्यें उकळून त्या उकाळ्यानें आंब्याचें झाड शिंपलें असतां, त्यानेंही सुंदर आंबे वर लागतात.

प्रथमं कुसुमोन्मेषे कुठारेण क्षते कृते
जंघाया तिलचूर्णेन समेन मधुसर्पिषा ॥
कर्दमाकृतिमानेन क्षतदेशे विलेपयेत्
फलमामलकी सूते स्वादूनि सुबहूनि च ॥

अर्थ—आंबळीस फुलें येतात त्याच वेळेस पाहिल्यानें कुठारानें तिच्या खोडावर लहानसा घाय करून त्याच्यावर, तिळाचें चूर्ण मधांत व तुपांत पातळ कालवून, त्या पदार्थानें वर लेप करावा. ह्मणजे वर मधुर व पुष्कळ आंवळे धरतात.

क्षीरेण सेचिता मूले जपा कुसुमलोहिता
धवलं कुसुमं सूते शशांककिरणोज्वलं ॥

अर्थ— तांबड्या फुलांच्या जासवनीच्या मुळांत जर दुधानें थोडा थोडा सेक करित गेलें तर चंद्राच्या किरणासारिख्या सफेत फुलानीं वृक्ष सुशोभित होतो.

आणखीही याच विषयावर श्लोक आहेत; परंतु ते अत्यंत अशुद्ध व क्वचित् क्वचित् विच्छिन्न असल्यामुळें आह्मीं देऊं शकत नाहीं. या विद्येस संस्कृतांत "वृक्षायुर्वेद" असें ह्मणतात. वृक्षांचें आयुष्य ह्मणजे ते पुष्ट होऊन कसे दीर्घायु होतील याचें या विद्येपासून ज्ञान होतें. या विषयावर प्रख्यात ज्योतिराचार्य वराहमिहिर यांनीं आपल्या बृहत्संहितेतही "वृक्षायुर्वेद" या नांवाचा एक अध्याय लिहिला आहे. तेव्हां या संबंधानें आपल्या पूर्वजांनीं बराच विचार केला होता हें स्पष्ट होतें. वराहमिहिराचार्यानीं जमीन वगैरे संबंधीही थोडा विचार केला आहे. त्यापैकीं थोडे श्लोक उतरून घेतों. ते येणेंप्रमाणें —

मृद्वी भूः सर्ववृक्षाणां हिता तस्मात् तिलान् वपेत्
पुष्पितांस्तांश्च गृह्णीयात् कर्मैतत् प्रथमं भुवि ॥
उत्तमं विंशतिर्हस्ता मध्यमं षोडशांतरं
स्थानात् स्थानांतरं कार्यं वृक्षाणां द्वादशावरं ॥
अभ्याशजानास्तरवः संस्पृशंतः परस्परं
मिश्रैर्मूलैश्च न फलं सम्यग्यच्छंति पीडिताः ॥
शीतवातातपैः रोगो जायते पांडुपल्लवा
अवृद्धिश्च प्रवालानां शाखाशोषो रसस्रुतिः ॥

अर्थ—कोणता ही वृक्ष असो; जमीन मऊ असली तरच तो चांगला वाढतो. यासाठीं ज्या जमिनीवर आपणास लागवड करणें असेल, तीवर प्रथम तीळ पेरावे, त्यांस फुलें आलीशीं झालीं ह्मणजे तीं तिळांचीं झाडें सर्व तेथेंच मळून टाकावीं ह्मणजे जमीन चांगली मऊ होत्ये. लावलेल्या वृक्षा पासून वीस हाताच्या आंत दुसरा वृक्ष लावूं नये हें फार चांगलें; जागा थोडी असल्यास सोळा हात अंतर ठेवावें. कशी ही अडचण पडली तरी कधीं बारा हाताच्या आंत दुसरा वृक्ष लावूं नये. फार जवळ जवळ वृक्ष लावले तर त्यांच्या खांद्या एकमेकास लागतात, व त्यांचीं मुळें परस्पर मिश्र होऊन उभयतांस हीं फार पीडा येत्ये; व त्यामुळें एकावरही चांगलीं फळें लागत नाहींत. थंडी, वारा, व ऊन यांच्या दीर्घ पीडेनें वृक्षांस रोग उत्पन्न होतो; कित्येकांची पानें सफेत निस्तेज होतात. कित्येकांचे प्रवाल वाढत नाहींत. कित्येकांच्या शाखा सुकून जातात; व कित्येकांतून रस बाहेर पागळूं लागतो. वृक्षांच्या कित्येक रोगांवर वराहमिहिराचार्यानीं औषधें ही सांगितलीं आहेत. "चिंतामणि" ग्रंथांतील "सायं प्रातश्च धर्मर्तौ" हा श्लोक मात्र

बृहत्संहितेंत अढळतो. यासाठीं ज्या ग्रंथांतून चिंतामणिकारानें आणखीं आपले अनेक उतारे घेतले आहेत, ते बृहत्संहितेहून भिन्न असावे असे दिसतें. असो, आतां पुढच्या खेपेस दारूकामाविषयीं थोडीशी माहिती वाचकांस सादर करूं.

उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याची आवश्यकता.*

—ooo—

हल्लींचा काळ मोठ्या आगिबाणीचा आहे. याकरितां जुन्या ग्रंथांचे शोध, शरीराचा मनाशीं असणारा संबंध व त्याचें शास्त्र, व इतर गूढतर विषय यांचें ज्ञान आपण मिळवून घेण्यापेक्षां, जर प्रस्तुत उपयुक्त असे विषय समजून घेतले, तर आपला व देशाचा फायदा होण्याचा विशेष संभव आहे असें मला वाटतें. ज्ञान कोणत्याही प्रकारचें झालें तरी त्यापासून उपयोग व्हावयाचाच; परंतु त्यांत कांहीं काळाच्या स्थितीप्रमाणें भेद करावे लागतात. दिनचर्येला जसे कित्येक पदार्थ अवश्य असतात व कित्येक ख्यालीखुशालीचे असतात, त्याप्रमाणें ज्ञानाचेही वर्ग करितां येतात. स्वार्थसंबंधी ज्ञान व पारमार्थिक ज्ञान हे दोन शब्द आपल्या लोकांत बहुतेक प्रसिद्ध आहेतच, याकरितां मी आपल्या विषयाच्या प्रतिपादनार्थ एथें त्यांचीच योजना करितों. स्वार्थसंबंधी ज्ञानाला अलिकडे 'उपयुक्तज्ञान' अशी संज्ञा आहे; परंतु नांवांच्या भेदामुळें अर्थाचा घोटाळा बराच झाला आहे. स्वार्थसंबंधि ज्ञान व परमार्थविषयक ज्ञान हीं दोन्हीं सर्वांस इष्ट आहेत हें सांगावयास नको. परंतु यांतून कोणतें विशेष जरूरीचें आहे हें मला आपणांस सांगणें आहे. आपणांत अशी म्हण आहे कीं स्वार्थ साधल्या शिवाय परमार्थ साधत नाहीं, व अशी जर म्हण सार्थ आहे तर तिचा दाखला नित्यशः पदोपदीं आपणांस येतो किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. प्राचीनकालीं जे महान प्रसिद्ध पुरुष झाले त्यांनींही स्वार्थसंबंधी ज्ञानाचें महत्व वर्णन केलें आहे व ज्यांत या ज्ञानाचा विस्तारपूर्वक विचार केला आहे असे ग्रंथ आपणास क्वचित् सांपडतात, तरी कित्येक पुरुषांच्या आयुष्याचा इतिहास कळण्याविषयीं पुराणादि साधनें आढळतात. त्यांजवरून ज्यांनीं उत्तमप्रकारचे उद्योग व कला संपादन केल्या त्यांसच परमार्थ चांगला साधला असें कळतें. अर्जुन, नलदेव इत्यादि महापुरुषांच्या पराक्रमाकडे व क्षात्र धर्माच्या तत्परतेकडे पाहिलें म्हणजे हें म्हणणें सार्थ आहे असें वाटल्या खेरीज राहणार नाहीं. याकरितां जर अशा थोर पुरुषांसही इतर विषयांकडे लक्ष देऊन त्यांचें यथार्थज्ञान संपादण्याची आवश्यकता होती, तर ज्यांच्या शारीर व मानसिक शक्ति पूर्वीच्या लोकांपेक्षां अतिशय कुंठित झाल्या आहेत असे जे प्रकृतकालीन लोक, त्यांना प्रथमतः विषय कोणता इष्ट व फलदायक आहे यांचा विचार करणें जरूर आहे. या देशांत आजपर्यंत जें ज्ञान अनेक मार्गांनीं व रीतीनीं प्रसृत झालें त्याचा उपयोग ऐहिक लाभाकडे व्हावा तितका झाला नाहीं असें मला वाटतें. ज्या ज्ञानापलिकडे दुसरें जाणणें राहत नाहीं अथवा ज्याविषयीं मोठमोठ्या विद्वानांचेही वाद आहेत अशाप्रकारच्या ज्ञानाचा लौकिकदृष्ट्या उपयोग थोडाच आहे, हें जर गृहीत झालें तर

*डा० पांडुरंग गोपाळ यांणीं ता० १० माहे एप्रील सन १८७४ इसवी रोजीं मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढें दिलेलें व्याख्यान.

आपल्या सभेच्या नांवाप्रमाणें तिचे मुळचे उद्देश हल्लींच्या क्रमानें सिद्धीस जाणें फार लांबणीवर जाईल असें मला वाटतें.

हल्लींच्या काळाकडे व आपल्या लोकांकडे विचारपूर्वक पाहिलें तर जिकडे तिकडे, ह्मणजे बहुधा अलिकडच्या पिढींत निराशवृत्ति, औदासीन्य, धंद्याची मंदाई, देशाच्या व लोकांच्या भाविस्थितीविषयीं अनिश्चितपणा, अशीं एकंदर चिन्हें दिसून येतात. तर ही स्थिति होण्यास कारण अथवा कारणें काय असावीं असा सहज प्रश्न उद्भवतो. याविषयीं विचारक्षम लोकांनीं निरनिराळीं कारणें दिलीं आहेत व कित्येक, विद्वान वर्तमानपत्रकारांनीही बरींच समर्पक काढलीं आहेत. या सर्व कारणांची चालना केली तर त्यांचे दोन मुख्य वर्ग करतां येतात. १लें, प्रजेच्या हिताविषयीं राजाची अनास्था व त्याची स्वार्थावर दृष्टी; व २रें, प्रजा निर्द्रव्य व निःशक्त झाल्यामुळें स्वत: उद्योग करून परकीय व राजकीय लोकांबरोबर टिकाव धरण्यास अशक्त आहे, अशीं दोन मुख्य व महत्त्वाचीं कारणें माझ्या नजरेस येतात. आतां या कारणांचा आपण पृथक् पृथक् विचार करूं.

पहिल्या कारणाचा ह्मणजे राजाच्या अनास्थेविषयीं विचार करितांना त्यांच्या राजचक्राकडे पाहिलें पाहिजे. हल्लीं जें सरकारी विद्याखातें बनून राहिलें आहे त्याकडे नजर दिली तर उत्तम विद्या शिकविण्याकडे व कलाकौशल्याच्या उत्तेजनाकडे सरकारचें लक्ष कमी आहे किंबहुना नाहींच असें दिसतें; व दिवसानुदिवस सरकारच्या समजाप्रमाणें विद्या शिकणाऱ्या लोकांनीं विद्येचा उपयोग कोणत्या रीतीनें करावा या विषयीं विचार करणें अवश्य आहे. राजानें प्रजेची अनास्था केल्यास प्रजेजवळ जीं साधनें असतील त्या साधनांचा उपयोग करावा व त्यांत ज्या वास्तविक अडचणी येतील त्यांतून पार नपडवेल तर सरकाराची मदत मागावी हाच मार्ग एक राहिलेला दिसतो. या साधनांचा समावेश स्वतंत्र उद्योग, कला व कौशल्यें यांत होतो. आतां नवीन लोकांनीं हे उद्योग स्वीकारण्या पूर्वी चालू असलेले उद्योग चांगल्या रीतीनें चालतात किंवा नाहीं व त्यांच्या कृतीपासून कारागीर लोकांचा चरितार्थ चांगला चालतो किंवा नाहीं हें पक्केपणीं समजेल तर देशी लोक आपल्या उद्योगांत सुखी आहेत किंवा कसें हें बिनचूक कळून येईल.

(पुढें चालेल.)

पोवाडा.

गंगाधर शास्त्री यांचा मृत्यु व खडकीची लढाई यांवर.

—ooo—

दक्षणच्या पेशव्याशीं घाला कधीं नव्हता आला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥ध्रु०॥ गंगाधर शास्त्री मारिले पंढरपुरांत । चोर बातमी गेली इंग्रजाच्या घरांत । तेथुन कज्जा झाला ऐका आश्चर्याची शांत । त्रिंबकजी डेंगळे हवालीं करून झाले मात । दोन दिशीं तंटा मिटवुन ठेवला ठाण्यांत । बडिल पंत होयाचे पळून गेले साऱ्या महिन्यांत । इंग्रजाच्या पाहाऱ्यांतुन असा कोण गेला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥१॥ कोट किल्ले देऊं केले त्रिंबकजी साठीं । एक महिन्याचा वायदा मसलत केली उफराटी । वसई सुभा देऊं केला अडकेल्या ताटीं । कसा तरि जिव वांचो प-

डल्या दुष्टांच्या गांठी । बाबासाहेब गेले पंढरीला विठलाच्या भेटी । उजवें फूल द्यावें आह्मा माहुलीच्या कांठीं । गोविंदराव काळ्यानें मनसुबा पक्का नाहीं केला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥२॥ बापू गोखले मुळींच ऐका बेटावर गेले । बेट जाळुन निघुनशानें खडकीवर आले । दोघांचे मोरचे भिडले आकाश कडकडलें । बापूगोखले जाऊनशानें तोफेवर पडले । टोपीवाल्याची फरडी झडली लडिवान पडली । लहान थोर जन रणभूमिशीं युद्धास आला । दोहो सैन्याचा बहुतसा चेंदा तो झाला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला॥३ दोन पलटणी येऊन पुण्यावर गारपिरीं भरल्या । युक्ति युक्तीनें उठवुन लावितां खडकीवर ठरल्या । आश्विन महिना एकादशी तरवारी झडल्या । तेराव्या दिसचा समाचार ऐकुन घ्या दाखला । एकुणचाळीस ईश्वरी नाम संवत्सराला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥४॥ लाख फौजेचा जमाव झाला श्रीमंतांपाशीं । रणभूमिवरि येऊन पडल्या तोफांच्या राशी । अलपिष्ट साहेब स्मित साहेब आले रागाशीं । सिंधुराच्या टकलीवर दिल्या तोफेच्या राशी । अलपिष्ट साहेबाचा हुकुम तो झाला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥५॥ करनल साहेब होते पलटणींत । आले धाऊन खडकीच्या मैदानांत । लढाइ करून बहुत केली मात रंजुक झडत । पाचेचा हिरा दडेना वाटोवाटी चंद्र गगनांत । बापुगोखल्या सुरवर स्तविती रणांत । तिन लाख फौज पळून गेली बापु गोखला राहिला रणांत । युद्ध केलें त्याने युद्ध केलें बहुत । बाबासाहेब विश्वास देऊन माहुलीस गेला । बापु गोखला लढतां सवाप्रहर दिवस आला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥६॥ आधि गेले ते पार पडले पुण्याच्या पारीं । दाण्यासंगें किडे रगडिले ह्मणती नरनारी । जो येतो तो लढतो हातामध्यें भाला घेउनी । शहरांत लोक आतां रडतात भारी । सगन भाऊ ह्मणे ऐशी ईश्वराची करणी । विबिछन कवि ह्मणे चंद्र सूर्यासीं कलंक लागला । गंगाधर शास्त्री वरून राज्याचा नाश झाला । दक्षणच्या पेशव्याशीं घाला कधीं नव्हता आला ॥७॥ ॥

पत्रेंवगैरे.

रा०रा०विविधज्ञानविस्तार कर्ते यांस.—

वि. वि. आपल्या गेल्या अंकांत २३९ व्या पृष्ठावर कांहीं पद्यें छापलीं आहेत त्यांपैकीं दुसरें व पांचवें खेरीजकरून बाकीच्यांचा अर्थ यथामति मित्रांच्या साहाय्यानें करून पाठविला आहे तो योग्य वाटल्यास मर्जीनुरूप छापण्याची मेहेरबानी व्हावी.

श्लोक १. गोवर्धनगिरिछत्र दंडतामुपयाति कः । गृध्रा इत्युत्तरं दत्तं तदेवोत्तरमुच्यते ॥ या श्लोकाचें उत्तर, 'केशवभुजः' ह्मणजे केशवाचा (कृष्णाचा) भुज, हा गोवर्धन पर्वतरूपी छत्राचा दंड झाला असें आहे. परंतु 'दत्तं' याबद्दल 'यस्य' असा पाठ असावा. ह्मणजे गृध्राः हें ज्या प्रश्नाचें उत्तर (के—शवभुजः) तो प्रश्नच प्रथमार्धांतील प्रश्नाचें उत्तर. (के—शवभुजः= शव खाणारे कोण—याचें उत्तर गृध्राः हें होय.)

श्लोक ३. यांत साहा प्रश्न आहेत. पैकीं प्रथमाचें जें उत्तर त्याचीं अक्षरें उलटीं वांचलीं असतां दुसऱ्याचें उत्तर निघतें. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तरावरून चवथ्याचें व यांप्रमाणेंच पुढें या साहा प्रश्नांचीं उत्तरें अनुक्रमें—

भारं—रंभा; कालें—लंका; दीनें नंदी; हीं आहेत.

४था श्लोक (कृष्णशास्त्री भाटवडेकरकृत) सुभाषितरत्नाकरांत १५५ वे पृष्ठावर सटीक छापला आहे तो वाचण्याची मी सर्वांस सिफारस करतों.

६व्या श्लोकांत वर्णन केलेल्या स्त्रीनें पाणी न पिण्याचें कारण इतकेंच कीं तिला स्वनेत्राचें प्रतिबिंब मत्स्यासारिखें वाटलें सबब तें पाणी तिनें प्राशन केलें नाहीं.

७व्या श्लोकांत राम सेतु दाखवी व सीतेनें तो पाहण्याकरितां विमानाचे बाहेर मुखचंद्र काढिल्याबरोबर चंद्र (मुखचंद्र) दर्शनानें समुद्रास भरती येऊन तो सेतु तिच्या योगानें अदृश्य होई सबब सितेला "तो कोठें आहे! कोठें आहे" असें विचारावें लागे.

पुढील श्लोकार्धांत कनक शब्दाचा अर्थ हरिद्रा घेऊन कनकसंपन्नां याचा अर्थ हरिद्रायुक्तां असा केला ह्मणजे द्विरुक्ति नाहींशी होते. कळावें लोभ असावा हे विनंति.

मु० रत्नागिरी, ता० ४ अक्टोबर सन १८७४. } क्ष.

देवास अर्जा.—(पुढें चालू.)

घडे, घडतसे, पुढें घडुनि येइ जें तें तुला ।
सदा कळतसे असें बहुत सांगती ते मला ॥
समर्थ विभु! तूं जसा—गुण तुझाहि सर्वज्ञता ।
असें परिसुनी मनीं बहु विरोध ये या मता ॥७२॥
कसें करुनि देशि तूं सतत पापलोकांस या ? ।
किमर्थ मग दंडिशी प्रथम जाणुनीयां तया ? ॥
तुझीं गरिब लेंकरें नर समस्त आहों जरी, ।
कशी विकट हे पित्या! वघशि ही परीक्षा तरी? ॥७३॥
अमुक जन या दिनीं खचित पाप हें आचरी"
असें समजतां तुला—मग अवश्य तो तें करी!॥
स्वतंत्र न असे पहा! उरलि मुक्तता कोणती? ।
कशास्तव गमे तया सहज शासनाची भिती? ॥७४॥
"समस्त कळतें तुला" जरि असें मनाला कळे ।
"करीन न करीन वा" मति अशी समस्ता पळे ! ॥
तुला विदित जें विभो! खचित तें घडावें सदा, ।
तरी न मग का ह्मणा—"बदलतें न रेषा कदा!" ॥७५॥
नशीब तर आमचें कधि न देवराया! चुके! ॥
त्वदाधिन समस्त हीं अखनि सर्वदा चालकें। ।
कळे तुजसि कीं करी जन अमूक हीं पातकें!
भविष्य न वृथा घडे तव जगन्निवासा! निकें ॥७६॥
विरोध निघनात हे ! शमन पावती हो कसे ? ।
"अगाध महिमा तरी प्रकृतिचा" ह्मणावें असें ! ॥
निरर्थक विशेषणें तुजसि देत बुद्धी वसे !
विचार करितां परी हळु हळू, भ्रमानें फसे ! ॥७७॥
किती चतुर बोलती प्रकटवून विद्या-धन, ।
शहाणपण आगळें गरिब या अह्मां दाउन ॥
"अहो! सकळ पातकीमनुज जन्मती हे पहा!"
"समर्थ विभुचा असे प्रबळ शत्रु सैतान हा!" ॥७८॥
असो. बहुत भांडणें सतत चालती यापरी ।
जगांत झगडा घडे! स्थिति कळे न देवा! खरी! ॥
न कांहिं समजे अह्मां—असशि तूं कुठे, केवढा! ।
कशास कळतां असें उगिच तोच पाढा पढा ? ॥७९॥
प्रचण्ड जगतीं कुठे ? अणु-समान हा मी कसा ! ।
अनादिहि अनंत हा भव ! तयांत मी कायसा? ॥
कुठे मति अजाण ही! कुरुप लावुनी ठेविली! ।
न केश गणिले शिरीं—कधि न पाठही पाहिली! ॥८०॥
विचारहि करावया प्रभु! अम्हां नसे सुप्रभा!
किती उचलिला वरी कर, तरी न लागे नभा ! ॥
बदेल जरी मुंगि मी "हिमनगास धुंडाळितें!"
कसें तरि विचारिला श्रम करून हें साधतें? ॥८१॥
हितार्थ आपुल्या सदा मनुज बंधुला मारिती ।
असंख्य अपराध का करुनि निंद्यता पावती ॥
धनी धनविहीन हे जन परस्परें भांडती ।
जशीं उसनि मांजरें सतत एकमेकांस तीं ॥८२॥
दयाब्धि! जनका! सख्या मनुज सर्व ही सारखे ।
तथापि निजबंधुला कवण तो न कां ओळखे? ॥
गरीब कुणबी जरी कठिण लोंगटी लावुनी ।
बसे जवळ तों धनी बहुत जाड संतापुनी! ॥८३॥
तया बघुनि नागवा नच दया कधीं येतसे! ।
करांतुनि न दाम ही व्यथितरक्षणीं जातसे ! ॥
बघून अवतार तो उसळतें त्वरें पित्त तें! ।
मळीण अति कांबळी हिडिस त्यास ती वाटते! ॥८४॥
अशी स्थिति सदा दिसे मजसि मोठमोठ्या जनीं ।
तुला गणिती जे "पिता", इतर लोक "बंधु"—मनीं ।
मुखें मधुर बोलती—विभुर वर्तनें वर्तती! ।
अशा बहुत गोंधळामधिं न चालते मन्मती!! ॥८५॥
असें अनृत काय तें? विशद सत्य तें कोणतें ।
असे नियत नीतिचा क्रम कसा? न हो ज्ञात तें ॥
अशा विलग सृष्टिची गति पुढें कशी काय हो! ।
समस्त कळवा मला! करुनि कांहिं देवा! अहो! ॥८६॥

[पुढें चालेल.]

BOMBAY:—"ASIATIC PRINTING PRESS" KALKADEVI ROAD,
BY H. SHRAVAN.

विविधज्ञानविस्तार गृहांत असलेलीं विक्रीचीं पुस्तकें.

कायदे व आक्ट.

इंग्रजी	मू. किं. रु. आ.	टपा. रु. आ.
Broom's Selection of Legal Maxims	17—8	1-12
Steele's Law and Custom of Hindoo Castes	10—8	1—4
The Criminal Procedure Code (Act No. X. of 1872.)	2—8	0—6
The Indian Evidence Act (Act No. I. of 1872.)	1—8	0—1
Act No. XI. of 1874	0—4	0—3

मराठी.

न्यायसारसंग्रह	२५—०	३—०
अपकृत्यशास्त्र	९—०	१—८
टार्ट शास्त्रावरील टीका	१—८	०—२
करारसंबंधी नुकसानी परीमाण	१—४	०—१
प्रमाणशास्त्र	०—८	०—२
करारशास्त्र	०-१२	०—२
सन १८७१चा आक्ट ९	०-१२	०—२
सन १८७०चा ७	०—६	०—२
सन १८६०चा ४५	१—८	०—२
सन १८७१चा ८	०—६	०—१
सन १८६९चा १८	०—६	०—१
सन १८६४चा २०	०—२	०—१
सन १८६५चा १०	०—४	०—२
हायकोर्टाचे निवडि	१—४	०—२
सन १८६५चा ११	१—८	०—३
सन १८७२चा १०	१—८	०—३
सन १८७४चा ११	०—३	०—१

वैद्यक ग्रंथ.

निघंट रत्नाकर प्राकृत	२३—०	४—८
शारंगधर प्राकृत टीका	४—०	०-१४
माधवनिदान प्राकृत टीका	४—०	०-१३
वैद्यसार प्राकृत टीका	२—८	०—८
वैद्यजीवन प्राकृत टीका	०-१२	०—३
वैद्यामृत प्राकृत टीका	०-१०	०—३
त्र्यंबकी प्राकृत टीका	०—६	०—१
बादेव शतक प्राकृत टीका	०-१२	०—२
वैद्यावतंस प्राकृत टीका	०—६	०—१
रुग्णोपचिकित्सा, डा. पां. गो. कृत.	१—४	०—४
बालवैद्य	१—०	०—२

संस्कृत प्राकृत ग्रंथ वगैरे.

श्री भावार्थ रामायण	३५—०	३—०
यथार्थ दीपिका	१०—०	२—८
सर्वार्थ चिंतामणी	१—४	०—३
पंचरत्नगीता, रेशमी पुठ्ठा	०-१२	०—२
प्राकृत जैमिनि अश्वमेध	४—८	०-१४
हरिविजय	३-१२	०-१२
पांडवप्रताप	५—०	१—८
निर्णयसिंधु	४—४	०-१४
भागवत चूर्णिका	४—०	०-१४
देवी माहात्म्य	१—८	०—४
नासिकेतोपाख्यान	२—०	०—८
अगमनिगम	१—८	०—४
पदबोधिनी गीता	२—८	०—६
भगवद्गीता	०—६	०—२
स्वप्नचिंतामणी	०—८	०—२
सहजबोध	०—६	०—२

मनोरंजक गोष्टी वगैरे.

उपयुक्त चमत्कारसंग्रह भाग १ला	०—५	०—१
,, ,, भाग ४था	०—५	०—१
,, ,, भाग ५वा	०—५	०—१
मराठी प्रचारांतील म्हणी	०—७	०—१
तंतुवाद्य	१—८	०—३
सुवर्णमालीनी	१—८	०—३
बागोबहार अथवा चार दरवेश भाग १ला	१—०	०—२
,, ,, ,, भाग २रा	१—०	०—२
,, ,, ,, भाग ३रा	१—४	०—२
,, ,, ,, भाग ४था	१—०	०—२
कादंबरीसार	०-१०	०—२

DIARY FOR 1875.

सन १८७५ सालाची रोजनीशी.

यांत स्टांप, बंग्या, रेलवे कडील भाडें, मनी आरडर इत्यादि विषयांचें थोडक्यांत समजूत होण्यासारिखें विवेचन केलें आहे. किंमत ८६ आणे व टपालखर्च ८१ आणा. पुस्तकाचा साचा पाकेट डिक्शनेरी सारिखा आहे. स्मरणवही करितां नोटबुक वापरणारांस मिती, वार, महिना, तारीख अगर सन लिहिण्याची जरूर न पडतां फारच उपयोगी पडेल. काळका देवीच्या रस्त्यावर (देवी समोर) विविधज्ञानविस्तार गृहांत विकत मिळेल.

याशिवाय शाळेत्यांत उपयोगी पडणारीं इंग्लिश मराठी व गुजराथी पुस्तकें हीं पूर्वी पैसा पाठविल्यास जरूर रवाना करण्यांत येतील.

Registered No. 102
1875.

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय, स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी, रूपकें, कविता, विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें, इतिहास, देशज्ञान, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, आरोग्यरक्षणार्थ सूचना, नवीन पुस्तकांवर टीका, नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची अगाऊ..... रूपये ३.
सहामाही अगाऊ..... रूपये २.
फुटकळ दर प्रतीस..... आणे ६.
टपालहशील वर्षाचे..... आणे ६.

वर्गणीदारांनीं अगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांच्या आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रूपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या, व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरअेळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

फेब्रुआरी. १८७५.



A MONTHLY MAGAZINE

पुस्तक ७. OF अंक २.

MARATHI LITERATURE,

FOR

LADIES AND GENTLEMEN.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

संक्षिप्तभारतवर्षीय दर्शनसंग्रह. २१
पुस्तकपरीक्षा—शांकरदिग्विजय नाटक. २७
पुराणग्रंथ. ३१
उपयुक्तज्ञानाचा प्रसार करण्याची आवश्यकता..... ३५
ठगाची जबानी..... ३७
पत्रें वगैरे..... ३९

मुंबई.

एशियाटिक छापखान्यांत छापिला.
आणि
पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पत्रें पाठविणेविषयीं.

"P.J.N.P." पत्र थोडें उसरां आलें. पुढच्या खेपेस विचार होईल.

"मल्हारीचा येळकोट." छापण्यांतहांशील नाहीं.

पोंच.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत)	रु० आ०	(मे १८७४ पर्यंत)	रु० आ०
जनार्दन पुरुषोत्तमजी.....	३—०	रा. रा. सुंदर मदन.....	३—०
दत्तो नरसिंह जोशी.....	३—०	रा. रा. आत्माराम भंतोबा.....	३—०
पंढरपुर नेटीव लायेब्ररी.....	३—६	डाक्टर गोपाळ शिवराम.....	३—०
इंदूर नेटीव लायेब्ररी.....	३—६		
श्री० रा० विनायकराव गणेश कीरे.....	३—६		

काशीनाथोपाध्याय उर्फ बाबापाध्ये यांच्या घरांतील मूळप्रतीवरून छापलेला

धर्मसिंधु.

ह्या ग्रंथ रत्नागिरी येथें रा० रा० जनार्दन हरि आठल्ये यांनीं, पंढरपुरीं स्वत: जाऊन मोठ्या श्रमानें बाबापाध्यांच्या घरच्या पुस्तकाचें प्रयंतर करून, त्यावरून जाड्या कागदावर सुवाच्य व मोठ्या अशा टैपांनीं छापिला आहे. आजपर्यंत ज्या धर्मसिंधुच्या आवृत्ति निघाल्या आहेत, त्या सर्वांत ही खुद्द मूळपुस्तकावरूनच असल्यामुळें विद्वज्जनांस फार मान्य आहे. त्याच्या बरोबरच, आंत असणाऱ्या कठिण शब्दांचा कोशहा छापला आहे. याची किंमत रु० ४; व टपालखर्च आणे ८; मिळून रु० ४॥ रोख विविधज्ञानविस्तारगृहांत पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना करण्यांत येईल.

वराहमिहिरकृत बृहत्संहिता.

मराठी भाषांतरासहित.

ह्या ज्योतिषाचा ग्रंथ रत्नागिरी येथें रा०रा० जनार्दन हरी आठल्ये यांनीं आपल्या जगन्मित्र छापखान्यांत जाड कागदावर मोठ्या सुवाच्य टैपांनीं छापिला आहे. यामध्यें सुगंधी पाणी करणें, वृक्षांवर ज्यांच्यायोगानें चांगलीं फळें धरतील अशा योजना करणें, पांढरे केश काळे व सुगंधी करणें, वास्तुविद्या, (इमारती बांधणें), शकुनविचार, इत्यादि अनेक व्यवहारसंबंधी प्रकरणांचें उत्कृष्टनिरूपण केलें आहे. किंमत रु० ८॥; व टपालखर्च आणे १०; मिळून रु० ९८= रोख "विविधज्ञानविस्तार" गृहांत पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना करण्यांत येईल. टिकिटा पाठविल्यास त्या अर्धा आण्याच्या असून चालण्यासुद्धां असल्या पाहिजेत.

आमच्या वर्गणीदारांनीं चालू सालाची वर्गणी या महिन्याच्या आंत पाठविण्याची मेहेरबानी करावी. ज्यांकडे मागील बाकी राहिली असेल, त्यांनीं ही ती लवकरच पाठविण्याची तसदी द्यावी.

श्री.

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक २.

संक्षिप्त भारतवर्षीय दर्शनसंग्रह.

रामानुजदर्शन.

—ooo—

आतां हें आर्हतमत आह्मां प्रामाणिकांस मान्य नाहीं; कारण परमार्थसत् असा जो घट त्याच्या ठिकाणीं परमार्थसत् अशा सदसत्त्वांचा एककालावच्छेदानें समावेश होऊं शकत नाहीं. दोन धर्मांचा समुच्चय न झाला तर काय हरकत आहे, विकल्प तर होईल असें ही ह्मणणें रास्त नाहीं; कारण विकल्प क्रियेचा[१] होऊं शकेल, पण वस्तूचा कधींहि होणार नाहीं. आतां गणपतिनरसिंहप्रभृतींचें शरीर असें कांहीं स्वभावतः आहे, कीं त्यास आपण मनुष्य ह्मणूं शकत नाहीं व पशु ही ह्मणूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें सर्व वस्तूंचा असा कांहीं स्वभाव आहे, कीं त्या "आर्हत" असें आपण ह्मणूं शकत नाहीं व "नार्हत" असेंही आपल्याकडून उपपादन होत नाहीं, अर्थात त्या अनेकांत आहेत, असें ही ह्मणणें बरोबर नाहीं; कारण एका भागांत नरत्व व एकांत पशुत्व असल्यास, भाग भिन्न असल्यामुळें कांहीं विरोध नाहीं; पण एकच भागांत सदसत्त्वाचें उपपादन करणें हें किती विलक्षण व विरुद्ध होय, याचा वाचकांनींच विचार करावा. यासाठीं परस्पर विरुद्ध अशा सदसत्त्व धर्मांचा एककालावच्छेदानें एकत्र समावेश करणें यासारखें दुसरें मोठें साहस आह्मांस दिसत नाहीं. हीच शिलक राहिलेल्या भंगांचीही अवस्था समजावी. अथवा विस्तार तरी कशास पाहिजे. या सर्व आडंबराचें मूळ जो सप्तभंगीनय तोच एकांत कीं अनेकांत असें जैनांस विचारावें. एकांत ह्मटल्यास, हें सर्व अनेकांत असा जो जैनांचा सिद्धांत त्यास हरताळ लागतो; अनेकांत ह्मटल्यास, तो अनेकांत ह्मणूनच तो सर्वथा प्रमाण होऊं शकत नाहीं. ही स्याद्वादाची गति. आतां जीव देहपरिमाण[२] आहे असें जें जैनांचें ह्मणणें तेंही पोकळ पहा, तसें असल्यास मरणानंतर कर्मदोषामुळें गजयोनींत जन्म व्हावयाचा असल्यास मनुष्याचा जीव गजाचें सर्व शरीर व्यापण्यास असमर्थ होईल; व गजाच्या जीवाचा मुंगीच्या शरीरांत जन्म होणें असेल तर जीव बराच तोडून टाकावा लागेल. ज्याप्रमाणें प्रदीप-

१. "उदिते जुहोति" (सूर्याचा उदय झाला ह्मणजे आहुती देतात). "अनुदिते जुहोति" (सूर्याच्या उदयापूर्वीच आहुती देतात). यांत सूर्याच्या उदयानंतर आहुती देणें व सूर्याच्या उदयापूर्वी आहुती देणें हीं परस्पर विरुद्ध आहेत, त्यापक्षीं त्यांचा समुच्चय होत नाहीं; तर शाखाभेदानें हा "विकल्प" आहे, असें समजावें. आतां हा "विकल्प" वस्तुभूत जो होम त्याचा नव्हे, तर हवनक्रियेचा होय. अर्थात वस्तूचा "विकल्प" होत नाहीं, तर क्रियेचा होतो.

२. देहाचें जें परिमाण तेंच आत्म्याचें परिमाण; देहाची लांबी साडेतीन हात; तर तितकीच आत्म्याची लांबी; हा अर्थ.

प्रभा मोठी खोली असल्यास पसरत्ये, तीच लहान खोली असल्यास तींत संकोच पावत्ये, त्याचप्रमाणें जीव तत्तच्छरीरप्रवेशसमयीं मोठा होतो व लहानही होतो असें ह्मटल्यास जीव प्रदीपाप्रमाणें अनित्य असें स्पष्ट होतें; व त्यामुळें कृतप्रणाश व अकृताभ्यागम हे बळकट दोष दर्शन देऊं पहातात. हीच आर्हतांच्या अवांतर सिद्धांतांची गति जाणावी. यासाठीं नित्य व निर्दोष अशा वेदास विरुद्ध असल्यामुळें या मतार्चे कोणी ग्रहण करूं नये. हाच "नैकस्मिन्[१]संभवात्" या सूत्राचा अर्थ, असें सूत्रभाष्यांत एतत्सूत्रव्याख्यानावसरीं **रामानुज** उपपादन करितो.

रामानुज हा दक्षिण हिंदुस्थानांत [२]भूतपुरी येथें शालिवाहन शकाच्या ११व्या शतकांत जन्मला. याच्या बापार्चे नांव केशव व आईचें नांव मति. याचा यादव नांवाचा एक स्मार्तमती मामा होता,[३]त्याजवळ यानें वेदादिकांचें अध्ययन केलें. नंतर वेदांतसूत्रांवर शांकरमतखंडनात्मक एक भाष्य रचून, विशिष्टाद्वैत नांवाचा एक नवीनच संप्रदाय यानें काढिला.

रामानुजाचा सिद्धांत हा आहे, कीं पदार्थ ह्मणून काय ते तीनच आहेत; त्यांचीं नांवें **चित्, अचित्,** व **ईश्वर.** चित् ह्मणजे जीव. पुण्यापुण्यात्मक कर्मांच्या फलाचा उपभोग घेणारा तोच. अचित् ह्मणजे ज्याचा उपभोग जीव घेतो, व जें स्वभावतः जड असें जें जग तें. ईश्वर ह्मणजे जीवांचा व जगाचा नियंता विष्णु.

आतां 'सर्व विशेष ज्याच्यांतून गलित होऊन गेले आहेत, असें जें केवल चिन्मय ब्रह्म, हाच एक पदार्थ; तें स्वभावतःच नित्य, शुद्ध, बुद्ध, व मुक्त असें आहे; त्याच्याहून व्यतिरिक्त असा जो हा भोक्तृभोग्यादिभेदप्रपंच तो त्याच्या ठिकाणीं अविद्या कल्पित करत्ये;"सदेव सोम्येदमग्र[४] आसीत्, एकमेवाद्वितीयं," इत्यादि अनेक श्रुति यास प्रमाण आहेत; या ब्रह्मार्चे यथार्थ ज्ञान झाल्यास अनादि अशी जी अविद्या तिची निवृत्ति होऊन पुरुष परमपदास पावतो; "तरति[५] शोकमात्मवित्" ही श्रुति हें निर्विवाद सिद्ध करित्ये; जीव हा ब्रह्माहून भिन्न आहे असी कधीं ही कल्पना करूं नये; कारण "मृत्यु[६]माप्नोति य इह नानेति विंदति" या श्रुतीनें भेदाची स्पष्ट निंदा केली आहे; यासाठीं अभेदवादच श्रेयस्कर होय;' असें कोणी आचार्य ह्मणतात. तर आह्मी असें ह्मणतों कीं अविद्या ही "आहे," यासच पहिल्यानें प्रमाण काय? अविद्याविषयीं आपणच असें ह्मणतां कीं;—

१. "न एकस्मिन् असंभवात्" हा पदच्छेद. "एकस्मिन्" एका वस्तूंत. "न" नाहींत. (सत्त्वासत्त्व दोन परस्परविरुद्ध धर्म) हें अध्याहृत. "असंभवात्" कारण कोणत्याहीप्रकारें असें संभवत नाहीं.

२. यास सध्या "प्रेमभूला" असें ह्मणतात.

३. हें "संप्रदायप्रदीपावरून" घेतलें आहे. विश्वगुणादर्शकारानें "यामुनतीर्थसेवापर" असें रामानुजास विशेषण दिलें आहे; त्यापक्षीं "यामुनतीर्थ" या नांवाचा कोणी वैष्णव रामानुजाचा गुरु होता असें दिसतें. "यादव" हा कदाचित् विद्यागुरु असेल; व "यामुनतीर्थी"नें त्यास वैष्णवदीक्षेचा उपदेश केला असेल. असें ग्रहण केल्यास कांहीं विरोध नाहीं.

४. हे "सौम्य". "इदं" ह्मणजे हें सर्व. "सत्" ह्मणजे ज्यास अस्तित्वमात्र आहे असें. "अग्रे" ह्मणजे जगाच्या आरंभीं. "आसीत्" ह्मणजे होतें. (तें) अध्याहृत. "एकमेव" ह्मणजे एकच. आणि "अद्वितीयं" ह्मणजे ज्यास दुसरा कोणी सहाय नाहीं असें. (होतें) अध्याहृत.

५. "तरति" तरून जातो. "शोकं" शोकास, शोकरूपी महासागरास. "आत्मवित्" आत्मा ह्मणजे काय हें यथातथ्यानें जाणणारा.

६. "मृत्युम् आप्नोति" मरण पावतो; अनेकवार या संसारसागरांत भ्रमतो. "यः" जो. "इह" या जगीं. "नानेति" आत्मे पुष्कळ आहेत असें. "विंदति" जाणतो.

अनादि भावरूपं यद्विज्ञानेन विलीयते
तदज्ञानमिति प्राज्ञा लक्षणं संप्रचक्षते ॥ १ ॥

अर्थ—ज्याचा ज्ञानाच्या योगानें लय होतो व जें अनादि भावरूपी त्यास पंडितलोक अज्ञान असें ह्मणतात.

आतां "प्रत्यगर्थ" ज्यापक्षीं ज्ञानाचा "विषय" व "आश्रय" आहे त्यापक्षीं "व्यावर्तक[1]" ही असला पाहिजे. जर "व्यावर्तक" आहे तर स्वरूपज्ञानानें अज्ञानाची निवृत्ति व्हावयाचीच त्यापक्षीं स्वरूपज्ञान झालें ह्मणजे अज्ञान राहूंच शकत नाहीं. जर "व्यावर्तक" नाहीं, तर "व्यावर्तक, विषय," व "आश्रय" नसल्यामुळें अज्ञानाचा कोणत्या ही रीतीनें अनुभव होऊं शकत नाही. कदाचित् अज्ञान ह्मणजे ज्ञानाभाव असें ते ह्मणतील तर तें ही निःसार; कारण अभाव षष्ठप्रमाणगोचर व ज्ञान तर नित्य अनुमेय. अर्थात कोणत्या ही रीतीनें अज्ञान प्रत्यक्षप्रमाणसिद्ध होत नाहीं. आतां ज्याप्रमाणें प्रदीपप्रभा अंधकाराने आवृत झालेल्या अप्रकाशित अर्थाचें प्रकाशन करिते, त्याच प्रमाणें ज्ञान हें अज्ञानानें आवृत झालेल्या अप्रकाशित अर्थाचें प्रकाशन करतें. अर्थात अज्ञान अनुमानप्रमाणसिद्ध होय असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं असें कोणी ह्मणेल तर त्यास आह्मीं असें सांगतों कीं या आपल्या अनुमानाची परीक्षा तर दूर राहो; पण अप्रकाशित अर्थाचें प्रकाशन करण्यास प्रदीपप्रभा मुळींच समर्थ नाहीं; तर तें काम खुद्द ज्ञानाचेंच होय, इतकें ह्मणणें पुरे.

एतं ब्रह्मलोकं न विंदति अनृतेन हि प्रत्यूढाः

ही श्रुति ही अभेदवादी यांस अनुकूल नाहीं; कारण यांत अनृत ह्मणजे अज्ञान नव्हे. तर "ऋतं पिबंतौ" या श्रुतिप्रामाण्यानें ऋत ह्मणजे फलाचा अभिलाष केल्याशिवाय शुद्ध परमार्थबुद्धीनें अनुष्ठित नित्यप्रभृति कर्म; व तें नव्हे तें अनृत; अर्थात अभिलाषपूर्वक केलेलें नित्यप्रभृति कर्म; त्याचा आश्रय केल्यास मनुष्यास परमपद मिळत नाहीं; हाच "एतं ब्रह्मलोकं" या श्रुतीचा खरा अर्थ. "मायां तु प्रकृतिं विद्यात्" या श्रुतीतही माया ह्म० या विचित्र जगाची उत्पत्ति करणारी त्रिगुणात्मक प्रकृति असाच होय. यावरून सुज्ञ वाचकांच्या नजरेस लागलेंच येईल, कीं अज्ञान आगमप्रमाणानेंही सिद्ध होत नाहीं. "तत्त्वमसि" ही श्रुति जीवब्रह्मैक्याचें उपपादन करीत नाहीं. कारण तदैक्षत प्रजायेयेति या उपक्रमावरून जें समस्त दोषांच्या पलीकडे असून, अमर्याद व असंख्य असे जे कल्याणकारी गुण तींहींकरून युक्त असें जें ब्रह्म त्याचेंच ग्रहण "तत्पदानें" केलें पाहिजे असें स्पष्ट दिसतें. "त्वंपदानें" जीवाचें ग्रहण करावयाचें. आतां कदाचित् अभेदवादी असें ह्मणतील, कीं ज्याप्रमाणें "सोयं देवदत्तः" (तो हा देवदत्त) या वाक्यांत विरुद्ध जें देवदत्ताचें तत्कालविशिष्टत्व व एतत्कालविशिष्टत्व या दोहोंचा त्याग करून अविरुद्ध जें स्वरूपैक्य त्याचें ग्रहण करितात, त्याचप्रमाणें विरुद्ध जें जीवाचें अज्ञत्व व परमेश्वराचें सर्वज्ञत्व त्या दोहोंचा ही त्याग करून, अविरुद्ध जें त्या दोहोंचें स्वरूपैक्य त्याचें ग्रहण करण्यास काय हरकत आहे? तर आह्मीं असें ह्मणतों कीं एकाचाच भूत व वर्तमान या दोहों कालांशीं संबंध असणें कांहीं विरुद्ध नाहीं. पण एकाचाच अज्ञत्व व सर्वज्ञत्व याच्याशीं संबंध असणें हें किती विलक्षण

१. भेदक.

आहे, त्याचा वाचकानेंच विचार करावा. आतां तत्त्वमसि या श्रुतीची काय गती? तर आह्मीं असें ह्मणतों कीं, "जीव" हा ब्रह्माचें शरीर; व ब्रह्म हें जीवाचा आत्मा; याप्रमाणें दोहोंचा तादात्म्यरूपी संबंध आहे, असें समजावें. श्रुति ही आहे कीं—

य आत्मनि तिष्ठन्नात्मनोंतरः य आत्मानं वेद यस्यात्मा शरीरं।

अर्थ—जो आत्म्यांत वास करितो व जो आत्म्याच्या आंत आहे, ज्याला आत्म्याचें ज्ञान आहे, व आत्मा ज्याचें शरीर आहे.

फार तर काय जितके शब्द आहेत तितके सर्व परमात्म्याचेच वाचक होत; कारण देवमनुष्यादि शब्दांपासून आरंभीं तदभिमानि जीवाचा बोध होऊन त्यांचाच अंतर्यामी जो परमात्मा त्याचाही क्रमानें निर्विवाद बोध होतो. हें सर्व, वेदार्थसंग्रहांत नामरूपश्रुतीचें विवरण करतेसमयीं रामानुजानें विस्तृत केलें आहे. एक कारणरूपी मातीचें ज्ञान झालें ह्मणजे तत्कार्यरूपी जे घटादि पदार्थ तेही जाणलेसे होतात, त्याचप्रमाणें एक कारणरूपी ब्रह्माचें ज्ञान झालें ह्मणजे कार्यरूपी प्रकृति, पुरुष, महान्, अहंकार, तन्मात्रें[१], भूतें, इंद्रियें, चतुर्दशभुवनात्मकब्रह्मांड, तदंतर्गत देवतिर्यङ्मनुष्यस्थावरादि सर्व प्रकार जाणलेसे होतात, असाच एकविज्ञान श्रुतीचा अर्थ केला पाहिजे. ब्रह्मव्यतिरिक्त सर्व मिथ्याच असें जर ह्मटलें तर एकविज्ञानानें असत् असें जें हें जग त्याचें ज्ञान तें काय होणार? ब्रह्मरूपी कारणांत मिळून जाऊन नामरूप विभागास अनर्ह होणें हाच प्रलय व नामरूप विभागास योग्य होऊन स्थूलभावाप्रत धारण करणें हीच सृष्टि. आतां निर्गुणवादांची व नानात्वनिषेधवादांची गति काय? तर निर्गुणवाद अल्पशक्तित्व, असर्वज्ञत्व, इत्यादि प्राकृत गुणांचा मात्र निषेध करितात; व नानात्वनिषेधवाद तर सर्वात्मक जें ब्रह्म त्याहून पृथग्भूत असें वस्त्वंतर मुळींच नाहीं, अशीच दंवडी पिटतात.

आतां अभेदवाद परमार्थ; भेदवाद परमार्थ; कीं उभयात्मक परमार्थ. ज्या पक्षीं हें सर्व ब्रह्माचें शरीर होय, त्यापक्षीं ब्रह्मच एकवह सर्व त्याचेच प्रकार; अर्थात अभेदवाद युक्त होय; ब्रह्म एकच असतां चिदचित्प्रकारांत निरनिराळें राहिलें आहे, ह्मणून भेदाभेदवाद युक्त; तथापि चित्, अचित्, आणि ईश्वर यांचीं स्वरूपें स्वभावानें अगदीं भिन्न आहेत ह्मणून भेदवाद ही युक्त. चिद्रूपी जे जीव ते अनादि जी कर्मरूपी अविद्या तिनें आवृत झाले आहेत; व त्यामुळें त्यांस सुखदुःखप्राप्ति होते; व भगवंताचें आराधन केल्यास त्यांस परमपद मिळतें. अचिद्रूपी जें जड जगत् तें त्या जीवांचें भोग्यभूत होय. ईश्वर हा भोक्ता व भोग्य या दोहोंचा अंतर्यामी आहे; त्याचें ज्ञान, ऐश्वर्य, वीर्य, शक्ति, तेज हीं सर्व अपरिमित आहेत; तो असंख्य कल्याणकारी गुणांचें निधान आहे; व तो आपल्या संकल्पमात्रानें चिदचिद्वस्तु उत्पन्न करितो. जीवात्मा हा परमात्म्यापासून भिन्न[२] आहे; व [३]नित्य ही आहे. याचें अणुत्व[४] वेदांत प्रसिद्ध आहे. ईश्वरासच पुरुषोत्तम, वासुदेव, इत्यादि नामें

१. "शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध;" हीं पांच "तन्मात्रें".

२. "द्वा सुपर्णा सयुजा सखाया" या श्रुतीवरून.

३. "अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे" या श्रुतीवरून. हा श्लोक गीतेंत ही आहे.

४. "बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च भागो जीवः स विज्ञेयः" या श्रुतीवरून.

लोक देतात. वासुदेव एकच आहे; तरी भक्तांस संतुष्ट करण्यास त्यानें **अर्चा, विभव, व्यूह, सूक्ष्म,** आणि **अंतर्यामी** हीं पांच रूपें धारण केलीं आहेत. **अर्चा** म्हणजे प्रतिमा अर्थात **मूर्ति.** 'विभव,' म्हणजे रामादि अवतार. **वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न,** आणि **अनिरुद्ध** हे व्यूहाचे चार भेद. ज्यास **वासुदेव** असें म्हणतात व जो षड्गुणांनीं युक्त तो **सूक्ष्म.** अपहतपाप्मत्व, विरजस्त्व, विमृत्युत्व, विशोकत्व, विजिघित्सत्व[1], आणि सत्यसंकल्पत्व, हे 'षड्गुण.' **अंतर्यामी** म्हणजे सकल जीवांचा नियामक. यांत पूर्वपूर्वरूपाची उपासना केली म्हणजे उत्तरोत्तररूपाची उपासना करण्यास योग्यता येते. **अभिगमन, उपादान, इज्या, स्वाध्याय,** आणि **योग,** हे **उपासनेचे** पांच प्रकार. देवालयांतील कचरा काढणें, जमीन सारवणें, असल्या उपासनेस **अभिगमन** म्हणतात. गंध, फूल, धूप, इत्यादि पूजासामग्री संपादन करणें हें **उपादान** होय. देवतेच्या पूजेस **इज्या** असें म्हणतात. अनुसंधानपूर्वक मंत्रांचा जप करणें, वैष्णवसूक्तांचा व स्तोत्रांचा पाठ करणें, नामसंकीर्तन करणें, व तत्त्वप्रतिपादक शास्त्राचा अभ्यास करणें, हें सर्व **स्वाध्याया**खालीं येतें. **योग** म्हणजे देवतेचें ध्यान करणें. याप्रमाणें उपासनेचें व कर्मांचें सांग अनुष्ठान केल्यास परमकारुणिक व भक्तांचा वत्सल असा जो परमेश्वर तो तुष्ट होऊन आपले याथात्म्याचा बोध करून पुनर्जन्माने विरहित असें जे आपलें पद तें भक्तांस देतो. हें सर्व ध्यानांत आणून, **महोपनिषन्मता**चें अवलंबन करून **बौधायनाचार्या**नें केलेली वेदांतसूत्राची वृत्ति फारच विस्तीर्ण आहे, असें पाहून रामानुजानें परिश्रम करून सूत्रांवर संक्षिप्त असें एक नवीनच भाष्य रचलें.

वेदांतसूत्रांतील "अथातो ब्रह्मजिज्ञासा" या पहिल्या सूत्राचे विवरणप्रसंगीं रामानुज असें म्हणतो कीं, सांग वेदाचें सार्थ अध्ययन केलें म्हणजे पुरुष कर्मफलांच्या ठिकाणीं विरक्त होतो; कारण कर्म कितीही उत्कृष्ट झालें तरी त्याचें फल परिमित व क्षयि असेंच असतें. नंतर स्थिर व शाश्वत असें जें मोक्षरूपी फल तें मिळवून घेण्याविषयीं उत्सुक होऊन, तदुपायभूत जें ब्रह्म त्याचें ज्ञान करून घेण्याची इच्छा त्यास साहजिक होत्ये. समस्त दोषांच्या पलिकडे असा जो अनेक कल्याणकारी गुणांनीं युक्त पुरुषोत्तम तोच या ब्रह्मशब्दाचा अर्थ. याप्रमाणें कर्मज्ञान व कर्मानुष्ठान हीं वैराग्योत्पादनपूर्वक चित्त निर्मळ करून ब्रह्मज्ञानाचें ग्रहण करण्याची योग्यता त्याच्यांत आणितात; म्हणून तीं ब्रह्मज्ञानाचें साधन होत. अर्थात पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा या दोघांचा कार्यकारणभाव संबंध स्पष्ट होतो. या प्रमाणें कर्मविशिष्ट ज्ञानच मोक्षाचें साधन होय. हें "विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह"- ही श्रुति जाहीर करीतच आहे. "पांचरात्ररहस्यांत" ही म्हटलें आहे—

> एवं ह्यहरहः श्रौतस्मार्तधर्मानुसारतः
> उक्तोपासनया पुंसां वासुदेवः प्रसीदति
> प्रसन्नात्मा हरिर्भक्त्या निदिध्यासनरूपया
> अविद्यां कर्मसंघातरूपां सद्यो निवर्तयेत्
> ततः स्वाभाविकाः पुंसां ते संसारतिरोहिताः
> आविर्भवंति कल्याणाः सर्वज्ञत्वादयो गुणाः
> एवं गुणाः समानाः स्युर्मुक्तानामीश्वरस्य च
> सर्वकर्तृत्वमेवैकं तेभ्यो देवे विशिष्यते

अर्थ—याप्रमाणें श्रौत आणि स्मार्त कर्मांचें अनुष्ठान करून यथोक्त व्यूहोपासना केली असतां, वासुदेव प्रसन्न होतो. नंतर

१. "विजिघित्सत्व" = खाण्याची इच्छा नसणें.

निदिध्यासनरूप भक्तीनें प्रसन्न झालेला वासुदेव पुरुषाच्या कर्मसंघातरूपी अविद्येचें निरसन करितो. मग संसारामुळें अंतर्धान पावलेले कल्याणकारी असे सर्वज्ञत्वादिक जीवाचे स्वाभाविक गुण आपोआप प्रकट होतात. याप्रमाणें मुक्ताचे व ईश्वराचे गुण सारखेच असतात. मात्र इतकेंच कीं ईश्वराचें सर्वकर्तृत्व जीवास कधीं हि येत नाहीं. यासाठीं तापत्रयानें आतुर झालेल्या जीवांनीं मोक्षपदप्राप्तीसाठीं पुरुषोत्तमादि अनेक नामांनीं प्रसिद्ध जें ब्रह्म त्याचेंच ज्ञान करून घेण्याचा हेतु धरावा. ज्ञान ह्मणजे शब्दतः ज्ञान नव्हे. कारण तें व्युत्पन्न मनुष्यास सहज असल्यामुळें त्याचें विधान करण्याची गरज नाहीं. यासाठीं ज्ञान ह्मणजे ध्यानोपासनादिक, असाच अर्थ केला पाहिजे. भक्ति हाही ज्ञानाचाच एक भेद आहे; व त्याची सिद्धि होण्यास 'विवेक,' 'विमोक,' 'अभ्यास,' 'क्रिया,' 'कल्याण,' 'अनवसाद,' आणि 'अनुद्धर्ष' हीं कारणभूत होतात. 'विवेक' ह्मणजे दुसऱ्याची नजर ही ज्यावर न पडली अशा अन्नापासून सत्त्वशुद्धि करणें. 'विमोक' ह्मणजे कामादिकांपासून आपला पराभव होऊं न देणें. पुनः पुनः संशीलन करणें हा 'अभ्यास.' श्रौतस्मार्तकर्मांचें यथाशक्ति अनुष्ठान करणें याचें नांव 'क्रिया.' सत्य, आर्जव, दया, दान, वगैरे गुणांस 'कल्याण' ह्मणतात. दैन्याचा त्याग करणें हाच 'अनवसाद' होय. अनवसादापासून होणाऱ्या तुष्टीस 'अनुद्धर्ष' ह्मणतात. या 'विवेकादिकांपासून' उत्पन्न झालेली भक्ति पुरुषास पुरुषोत्तमाचें परम पद मिळवून देत्ये; व तेथें तो शाश्वत आनंदाचा अनुभव घेतो.

रामानुज हा शेषाचा अवतार असें तत्संप्रदायी लोक ह्मणतात. याचे अनुयायी ऊर्ध्व त्रिपुंड लावतात. यांच्या दाक्षिण हिंदुस्थानांत दोन गाद्या आहेत. त्या दोहोंच्या तिलकांत थोडासाच फरक आहे; तरी त्यांचा परस्पर द्वेषभाव अत्यंत आहे. रामानुजसंप्रदायी 'श्रीवैष्णव' या नांवानें ही प्रसिद्ध आहेत. हे सर्व तप्तमुद्रा धारण करितात. यांच्या तप्तमुद्रांचा प्रभाव असा जबरदस्त आहे कीं चोर असो, जार असो, कुसाही पापी असो तो तप्तमुद्रा मिळतांच मोक्षाचा अधिकारी होऊन, 'श्रीवैष्णवांत' मोडतो. 'तप्तमुद्रा, पुंड, मंत्र, नाम, नित्यविधि' हे त्याचे पांच मोठे संस्कार. यांचा पाकविधि व भोजनविधि या दोहोंवरही कोणाची नजर पडतां कामां नये. हे अन्यसंप्रदायीयांबरोबर कधीं भोजन करीत नाहींत. पंचयज्ञांची यांस जरूर नाहीं. हिंसा होये म्हणून पश्वादियाग करूं नये, असें ह्मणतात. श्राद्धांचा लोप करितात. प्रतिदिवशीं एकदाच भगवंताचें वंदन करावें असें ह्मणतात. लक्ष्मीची पूजा स्वतंत्र करितात. पूजाप्रसंगीं घांट वाजवीत नाहींत. 'ग्रहण, संक्रांति,' इत्यादि पर्वांचें माहात्म्य मानीत नाहींत. गंगास्नान करीत नाहींत. समुद्रस्नान करूं नये असें ह्मणतात. 'पंचगव्य,' प्राशन करीत नाहींत. याप्रमाणें यांचा संप्रदाय आहे. यांचे द्रविड भाषेंत धर्मसंबंधी ग्रंथ बरेच आहेत. 'शठारि, बकुलधर,' वगैरे अनेक पंडितांनीं द्रविड भाषेतच संप्रदायसंबंधी ग्रंथ रचले आहेत. 'रामानंदी' संप्रदाय हा 'रानुजाचाच' एक पोटभेद होय. यांच्या व रामानुजांच्या तिलकांत बराच भेद आहे. रामानंदीतून 'रामसनेही' या नांवाचा संप्रदाय हल्लीं निघाला आहे. त्यास सुमारें शंभर

वर्षें झालीं आहेत. या संप्रदायाची मुख्य गादी 'मेवाडांत' 'धोल्का' येथें आहे. यांचा 'मारवाडांत' बराच भरणा आहे. यांचे साधु गोपीचंदनाचा एकरेखामय व साधारण जाडा असा एक उर्ध्व तिलक लावतात. यांचे सर्व साधु शिखा राखितात. सर्व ठिकाणीं दोन दोन साधु रहातात. 'रामसनेही' साधु एकटा कधींही रहात नाहीं. हे लोक कोणत्याही रीतीचा परिग्रह ठेवीत नाहींत. गुरु हेंच मोठें दैवत असें समजतात. त्यांचा स्थापक जो 'रामसनेह' त्याची वाणी सिंहासनावर ठेऊन, तीचीच गंध, धूप, वगैरे पदार्थांनीं पूजा करितात. असो. आतां वाचकांची रजा घेऊन 'रामानुजदर्शन' पुरे करितों. पुढच्या खेपेस संक्षिप्त 'माध्वदर्शन' वाचकांस सादर करूं.

पुस्तकपरीक्षा.

शंकरादिग्विजय नाटक.

—o-o-o—

[पुस्तक ६ अंक ७ वरून पुढें चालू].

शंकर दिग्जय हाच विषय धरून नाटक रचण्याचे 'किर्लोसकर' यांचे दोन मोठें हेतु प्रस्तावना वाचतांच ध्यानांत येतात ते येणेप्रमाणें—

१. फार थोड्या काळांत घडलेली जी गोष्ट व जेणेकरून धर्मसंबंधी या भरतखंडांत मोठाच फेरफार झाला, असा जो श्रीपरमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमच्छंकराचार्यभारथी याचा इतिहास (तो) सर्व लोकांस कळण्यासारिख्या एखाद्या ग्रंथाची आवश्यकता;"

हा एक, आणि

२. "कितीएक लोक त्या आमच्या आचार्यांस विष्णवापुत्र ह्मणतात; कितीएक मंडनमिश्रास जैन असें ह्मणतात; कितीएक आचार्यांस सरस्वतीचा शाप आहे असें ह्मणतात; असे अनेक कुतर्क त्यांचा खरा इतिहास माहित नसल्यामुळें मोठमोठे लोक करितात, ह्या सर्व अडचणी दूर व्हाव्या;"

हा दुसरा.

आतां 'आचार्यांचा' खरा प्रादुर्भावकाल व इतिहास अज्ञानलोकांस समजावा व तेणेंकरून त्यांच्याविषयीं जे त्यांचे विलक्षण तर्क आहेत ते सर्व दूर व्हावे, हे जे 'किर्लोसकर' यांणीं मनांत आणलेले दोन मोठे उद्देश ते सर्वथैव स्तुत्यच होत. पैकीं पहाणें इतकेंच कीं, 'किर्लोसकर' यांचा यत्न सिद्धीस गेला आहे किती. तर पहिल्यानें पहिल्याच कलमाविषयीं विचार करूं या.

याच नाटकाच्या एकोणसाठाव्या (५९) पृष्ठावर "प्रासूततिथ्यशरदां" हा श्लोक 'किर्लोसकर' यांणीं घातला आहे. त्यावरून 'आचार्यांचा' जन्म होऊन आज पक्कीं एकहजार शायशीं (१०८६) वर्षें झालीं. आतां हा श्लोक वाचतांच पहिल्यानें अशी शंका उत्पन्न होये कीं यास प्रमाण काय? शुद्ध संस्कृत श्लोक ह्मणूनच प्रमाण असें मानल्यास अनेक ठिकाणीं बाध येणार. आतां **आर्यविद्यासुधाकरांत** वर लिहिलेला श्लोक **नीलकंठभट्टकृत शंकरमंदारसौरभांत** आहे असें लिहिलें आहे खरें. तरी त्या ग्रंथाचें व त्याच्या कर्त्याचें बरेंच प्राचीनत्व सिद्ध झाल्याखेरीज तो ग्रंथ प्रमाण करितां येत नाहीं. तशांत **माधवकृत शंकरदिग्विजयांत** 'आचार्यांच्या' जन्मकालाविषयीं कांहीं लिहिलेलें नाहीं. त्याहूनही प्राचीन जो **अनंतानंदगिरिकृत शंकरदिग्विजय** त्यानें ही तत्संबंधी मौनव्रताचाच स्वीकार केला आहे. तेव्हां प्राचीन ग्रंथकारांचा कांहीं उल्लेख नसतां शुद्ध एकाच अनिश्चित श्लोकावर प्रमाण ठेऊन 'आचार्यांच्या' कालाचा निश्चय करणें हें एक

मोठें साहसच होय असें आह्मांस वाटतें. आतां कोणी असें ह्मणेल कीं इंग्रज लोकांचें ह्मणणें या श्लोकाशीं मिळतें, कारण याचवेळेस ह्मणजे सुमारें 'ख्रिस्ती शकाच्या' आठव्या शतकांत 'बौद्ध' लोकांचा व 'ब्राह्मण' लोकांचा द्वेषभाव वाढून, 'ब्राह्मण' लोकांनीं जयी होऊन 'बौद्ध' लोकांस देशपार करून टाकलें, असें ते ह्मणतात; तर त्यास आह्मी असें विचारतों कीं त्यावेळच्या सुमारास दोघांचा द्वेषभाव वाढला ही अपूर्व माहिती कोठे सांपडली. ज्या वेळेस दोघांचा द्वेषभाव वाढला असें इंग्रज लोकांचें ह्मणणें आहे, त्याच वेळेस कविमुकुटमणिक्यायमान **भवभूति** हे

"कविर्वाक्पतिराजश्रीभवभूत्यादिसेवितः ।
जितौ ययौ यशोवर्मा तद्गुणस्तुतिवंदितां"

या **कल्हणकृतराजतरंगिणी**वचनावरून आपल्या नाटकरूपी उंच इमारती बांधून आपल्या कीर्तीनें त्रिभुवनरूपी अंगण श्वेत करूं लागले असें स्पष्ट होतें. **भवभूति** हा वैदिक असून अनेक यज्ञयागादिक आपल्या पूर्वजांनीं केल्याचा मोठाच अभिमान बाळगीत असे हें त्यानें रचलेल्या नाटकावरून लागलेंच कळतें. हाच **भवभूति** आपल्या काळांत 'बौद्धांचा' व 'ब्राह्मणांचा द्वेषभाव तर कोठें उपवर्णित करीत नाहींच; पण उलट 'मालतीमाधवांत' दोघांचा मित्रभावच उघड करितो हें काय? इंग्रज लोकांच्या मताप्रमाणें त्याच काळीं प्रादुर्भूत झालेले जे **बाणभट्ट** यांनीं ही अनेकस्थळीं 'ब्राह्मणांचा' व 'बौद्धांचा' मित्रभावच उपनिबद्ध केलेला आहे. यावरून आठव्या शतकाच्या सुमारास 'ब्राह्मणांचा' व 'बौद्धांचा' द्वेषभाव वाढला व 'ब्राह्मणांनीं' जयी होऊन 'बौद्धांस' याच सुमारास देशपार केलें हें ह्मणणें आह्मांस पोकळ वाटतें. फार तर काय? **भवभूती**चीं नाटकें वाचल्यानें तो **आचार्यां**च्या नंतरच झाला असावा असा लागलाच ग्रह उत्पन्न होतो. आतां 'माधवानें' 'शंकरदिग्विजयांत' पांचव्या सर्गांत,—

नाटकत्रयमबोचदपूर्वम् ॥२५॥

असें ह्मटलें आहे यांत कांहीं संशय नाहीं. तरी **माधवाचा** लेख भ्रांत नव्हे यास, व **बालरामायणप्रभृति** नाटकाचा जो **राजशेखराख्य** कर्ता, तोच हा **नाटकत्रयकर्ता केरलदेशाधिपति राजशेखर**, यास काय प्रमाण? तशांत **बालरामायणा**च्या प्रस्तावनेंत तर—

तेनैव महामांत्रिपुत्रेण
देवो यस्य महेंद्रपालनृपतिः शिष्यो रघुग्रामणीः १८

असें आपणाविषयीं **राजशेखर** ह्मणतो. कदाचित् गौणत्वानें **माधवानें** हा प्रधान असतांही याच्यावर "**राज**शब्द" आरोपित केला असेल, असें ह्मटलें तरी तो आठव्या **ख्रिस्ती** शतकांतच झाला यास काय प्रमाण? असें असल्यास "भवभूति" आठव्या शतकाच्या बराच पलिकडेस होता असें दिसतें; कारण **बालरामायणांतच राजशेखरानें**

स्थितः पुनर्यो भवभूतिरेखया १६.

अशी **भवभूती**ची स्तुति केली आहे. आतां **राजतरंगिणीकारासच** प्रमाण मानून **भवभूति** आठव्या ख्रिस्ती शतकांतच होता; व त्यानंतर कांहीं वर्षांनीं ह्मणजे सुमारें १०व्या किंवा ११व्या शतकांत 'आचार्य' प्रादुर्भूत झाले असेंही ह्मणणें सयुक्तिक दिसत नाहीं; कारण तसें ह्मटल्यास **आचार्यां**च्या पाठीमागून झालेले **भामतीकार, कुसुमांजलिकार**, आणि **खंडनकार**, यांच्यामध्यें कांहींच संभवितें अशी जुळणूक रहात नाहीं. यासाठीं आमच्यामतें

आचार्यांचा प्रादुर्भाव कोणत्या शतकांत झाला तें निश्चयानें सांगणें फार कठिण आहे. आतां "**प्रासूत तिष्यशरदां**" या श्लोककारास व त्याबरोबर इंग्रजलोक व किर्लोसकर यांसही मान देण्याच्या हेतूनें जरी 'आचार्यांचा' प्रादुर्भाव आठव्या खिस्ती शतकांत झाला असें झटलें, तरी ही गोष्ट "फार थोड्या काळांत घडलेली" व "ही गोष्ट अर्वाचीन काळांत घडलेली" असा शेरा मारणें हें बरोबर नाहीं असें आह्मांस वाटतें. हजार वर्षांपूर्वी झालेल्या गोष्टी जर आपण थोड्या काळांत घडल्या असें झटलें तर 'भट्टोजिदीक्षितांदिकांस' आज सकाळीं सात वाजतां जन्मलेलीं मुलें असेंच झणणें भाग पडेल. तशांत यथार्थ इतिहासाची उपलब्धि नसल्यामुळें, ज्या देशांत भट्टोजिदीक्षितासारिख्यांचेंही चरित्र लिहिण्यास कोणाची लेखणी धजत नाहीं, यामुळें तेही चांगले प्राचीन भासूं लागतात, त्याच देशांत उत्पन्न झालेल्या 'आचार्यांस,' त्यांचे यथार्थ इतिहास 'किर्लोसकर'यांस कितीही मिळाले असले, तरी "प्राचीन काळांत झालेले" हेंच उपपद शोभतें, व सूक्ष्म विचार केला असतां हेंच उपपद त्यांस दिलें पाहिजे. आतां कदाचित् 'किर्लोसकर' असें झणतील कीं, आचार्यांचा' प्रादुर्भावकाल अनिर्णीत असला तर काय हरकत आहे? कित्येक लोकांच्या "ते विधवापुत्र होते" इत्यादि खोड्या कल्पना तरी ऐतिहासिक ज्ञानाधारानें रचलेल्या आमच्या नाटकाच्या अवलोकनानें दूर होतील. तर पहिल्यानें आह्मांस लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें, कीं 'किर्लोसकर' यांस 'आचार्यांच्या' संस्कृतांत उपनिबद्ध झालेल्या इतिहासाचें सूक्ष्म ज्ञान ताद्दशच आहे. यामुळें यांचें नाटक वाचणारा क्वचित् क्वचित् अज्ञानरूपी कूपांतून बाहेर पडतांच दुर्ज्ञानलवदुर्विग्धत्वरूपी अफाट महासागरांत सर्वथैव बुडून जाण्याचा मोठाच संभव आहे. तशांत असा विषय हातांत घेण्यास जितकें दार्शनिक ज्ञान पाहिजे तितकें 'किर्लोसकर' यांस नाहीं, असें आह्मास वाटतें. आचार्यांसारिख्या मोठया पुरुषांस प्रस्तावनेंतच 'किर्लोसकर' 'शृंगेरीमठांतील' भारत्याख्ययतिभेदावयवरूपी ठरवून त्यांच्या सार्वत्रिक यशोरूपी डिंडिमाचा लोप करून,

"**तीर्थाश्रमवनारण्यगिरिपर्वतसागराः । सरस्वती भारती च पुरी नाम यतेर्दश**"

या स्फुट व अप्रमाणिक श्लोकास प्रामाण्य आणूं पहातात. **तीर्थप्रभृति दशनामी गोसांवी** शंकरमती आहेत, कीं नाहीं याचा विचार करण्याची सध्या फारशी गरज नाहीं. पण हे "**दशनामी**" 'आचार्यांच्या' वेळेपासून नाहींत हें स्पष्ट आहे. अलीकडचे सर्व परमहंसपरिव्राजकाचार्य **दशनामींतील** नाम धारण करणारे असतात खरे. तरी **ज्ञाननिधिमार्तंडातिलकादिक भवभूतिवाचस्पतिप्रभृतींचे** गुरु परमहंसपरिव्राजक असून ही **तीर्थादिक** बिरुदांचें धारण करणारे नव्हते, हें सुप्रसिद्ध आहे. "**विज्ञानेश्वर**" यांच्या पुढें ही "**तीर्थादिक**" पदाचा कोठें उल्लेख केलेला दिसत नाहीं. यासाठीं जरी **भारती**प्रभृति यति 'आचार्यांचे' खुद्द शिष्य असा प्रायः सध्या पुष्कळ लोकांचा ग्रह आहे, तरी तो प्रामाणिक आहे, असें आह्मास वाटत नाहीं. आतां **अनंतानंदगिरिकृत शंकरदिग्विजयाच्या** बासष्ठाव्या प्रकरणांत **भारती** संप्रदायाचें अभिधान आढळतें, तरी वर विवृत केलेल्या कारणावरून तें कदाचित् प्रक्षिप्त असण्याचा ही संभव आहे. तशांत दाक्षिणात्य पीठाचे प्रथमाध्यक्ष जे **सुरेश्व-**

राचार्य त्याच्या पुढें ही भारतीरूपी पुच्छ जोडलेलें कधीं नजरेस पडत नाहीं. यासाठीं या आर्यभूमींत सर्वत्र सुप्रसिद्ध झालेल्या आचार्यांस "भारती" हें बिरुद देणें आह्मास अगदीं पोरकट वाटतें. सारांश, किर्लोस्कर यांची आचार्यांचा इतिहास अज्ञानलोकांस थोडक्यांत कळविण्याची शैली ही; व करदीरसिंहासनांचें प्राचीनत्व स्थापून तदध्यासी यतींचें मन संतुष्ट करण्याची ही हीच असें ह्मणण्यास कांहीं हरकत आहे काय? दार्शनिक विषयांचा जो घोंटाळा या नाटकांत आढळतो, त्याची देखील हद्दच आहे. "आचार्यांस विधवापुत्र ह्मणतात, मंडन मिश्रांस जैन ह्मणतात;" इत्यादि जें अज्ञानलोकांचें अज्ञान तें निरसन करण्यासाठींच केलेल्या शंकरदिग्विजय नामक नाटकांत,

"अर्हद्भ्यो नमो नमः अर्हद्भ्यो नमो नमः— वः काय आमचा धर्म, भगवान् बौद्धाचार्यांनीं स्थापित केला आहे. नास्ति परलोकः भूतान्येव चेतयंते मृत्युरेवापवर्गः ऋणं कृत्वा घृतं पिबेत् हीं बौद्ध वचनें कर्णांस किती तरी सुख देतात आहेत." पान १५.

इत्यादि शेरे मारून चार्वाक, चतुर्विधबौद्ध, जैन, या सहा नास्तिकांत भेदाभावाचें उपपादन करून, सर्वदर्शनसंग्रहकारादिकांची तर कथा काय, पण खुद्द "आचार्यकृत जें "भाष्य" त्यास ही मोठ्या जोरानें सव्वासोळा आणे हरताळ लाऊन, अज्ञान लोकांच्या डोळ्यांत या अंजनाच्या योगानें किर्लोस्कर हे अपूर्व प्रकाशाचीच उत्पत्ति करूं पहातात, असें ह्मटलें पाहिजे. असो. आतां जी गोष्ट किर्लोस्कर अगदीं अर्वाचीन काळांत घडली असें ह्मणतात, तविर वाचणारानें कितपत श्रद्धा ठेविली पाहिजे, याचा आतां थोडा खुलासा करूं या. बौद्धांचें खंडन करून आचार्यांनीं कर्ममार्गाचें स्थापन केले असा जो आमच्या लोकांचा साधारण समज तो अगदीं निर्मूल आहे. बौद्धांच्या युक्ति खंडनाचें श्रेय भट्ट ऊर्फ कुमारिल ऊर्फ भट्टपाद यासच मिळालें पाहिजे. आचार्यांनीं वेदांतसूत्रांवर भाष्य करून उपनिषद्वाक्यांचा मात्र उद्धार केला. यांत कांहीं संशय नाहीं, असें तत्तद्ग्रंथावलोकनांतीं ज्ञान उत्पन्न होतें. मीमांसाभाष्यावरील वार्तिकांचे कर्ते कुमारिल व वेदांतसूत्रांवरील भाष्याचे कर्ते आचार्यशंकर हे दोन प्राचीनकालीं होते व त्यापैकीं आचार्यांस योगाभ्यासमूलक कांहीं सामर्थ्य होतें, यांतही कांहीं संशय नाहीं. या खेरीज इतिवृत्ताविषयीं जें कांहीं आमच्या जवळ आहे, तें आह्मीं वाचणारासच सादर करितों, ह्मणजे झालें.

देवर्षिदेवरपुराश्रितः

आकाशालिंगनाम्ना तु विख्यातोभून्महीतले
तत्र विद्वन्महेंद्रस्य कुले द्विजगणाश्रिते
जातः सर्वज्ञनाम्ना तु कश्चिद् द्विजकुलेश्वरः
कामाक्षीति सती चाभूत् तस्य लक्षणलक्षिता
चिदंबरेश्वरं ध्यात्वा तावुभौ प्रापतुः सुतां
सा कुमारी सदा ध्यानसक्ताऽभूज्ज्ञानतत्परा
विशिष्टेति च नाम्ना तु प्रसिद्धाऽभून्महीतले
तामष्टमेऽब्दे विप्राय ज्ञानायाद्भुतकर्मणे
प्रददौ विश्वजिन्नाम्ने सर्वज्ञोऽस्याः पिता स्वयं
सा सदा पतिमद्वैतं ध्यात्वाऽऽकाशात्मकं शिवं
तस्याऽऽराधनमन्युग्रमाचकार विवेकिनी
तादृशीमपि संत्यज्य ययौ विश्वजिदद्भुतं
अरण्यं तपसे कृत्वा मनो निश्चयनां गते
तदा प्रभृति सा नारी चिदंबरमहेश्वरं
तोषयामास पूजाभिर्ध्यानैरान्मगतैः सदा
स देवः सर्वपूर्णोपि तस्या वदनपंकजं
प्रविश्य विस्मितान् कुर्वन् जनानन्यान् समागतान्
महोग्रतेजसा जुष्टा विशिष्टाऽभूद्यथांबिका
सर्वैः संपूजिता नित्यं विप्रादिभिरुपाश्रिता
अतीते मासि गर्भस्य वृद्धिरासीद्दिने दिने
चिदंबरेश्वरं कृत्वा यजमानं द्विजोत्तमाः
तृतीयादिषु मासेषु चक्रुः कर्माणि वेदतः
प्राप्ते तु दशमे मासि विशिष्टागर्भगोलतः

प्रादुरासीन्महादेवः शंकराचार्यनामतः
द्वितीयं प्रकरणं.
पुनर्भट्टाचार्यः प्राह तथाऽदग्धशेषशरीरः
मद्भगिनीभर्ता सर्वज्ञ इव सकलविद्यासु
पितामह इव वर्तते.
पंचपंचाशत्तमं प्रकरणं.
हस्तिनपुरादाग्नेयदिग्भागस्थलं विद्यालयमतिप्रसिद्धं
तद्देशवासिनस्तु विजिलबिंदुरिति वदंति तत् पुरं प्राप्य
षट्पंचाशत्तमं प्रकरणं.
पतियत्याश्रमग्रहणात् पूर्वक्षणे महानसाद्
गगनमवलंब्य ब्रह्मलोकं गच्छंतीं सरसवाणीं दृष्ट्वा
सप्तपंचाशत्तमं प्रकरणं.

हे उतारे **अनंतानंदगिरी**च्या ग्रंथांतून घेतले आहेत.

अर्थ—नंतर **चिदंबरपुरा**चा आश्रय करून रहाणारा तो महादेव पृथ्वीवर **आकाशलिंग** या नांवानें प्रसिद्ध झाला. त्याच पुरांत अनेक ब्राह्मणांनीं आश्रित असें जें **महेंद्र** नामक विद्वानाचें कुल त्यांत सर्व द्विजकुलांचा ईश्वर असा **सर्वज्ञ** नांवाचा एक मोठा पुरुष उत्पन्न झाला. त्याची बायको सर्व शुभलक्षणांनीं युक्त होती. तिचें नांव **कामाक्षी** होतें. अनेक दिवस **चिदंबरेश्वरा**ची सेवा केल्यामुळें त्याच्या कृपेनें त्या उभयतांस एक मुलगी झाली. ती लहान असतांच मुनिधर्मांत व विद्येत निष्णात झाली. ती **विशिष्टा** या नांवानें लोकांत प्रसिद्ध झाली. आठव्या वर्षी तिच्या बापानें **विश्वजिन्नामक** एक शांत व अद्भुत ब्राह्मणाबरोबर तिचा विवाह केला. ती इतकी पतिव्रता होती कीं आपल्या पतीस शिवस्वरूपी समजून विवेकानें त्याचें नित्य आराधन करीत असे; तरी देखील तप तपण्याचा निश्चय करून तिला टाकून **विश्वजित्** अरण्यांत गेला. तेव्हांपासून **विशिष्टा** ध्यानादिकांनीं **चिदंबरेश्वरा**चें उग्र आराधन करूं लागली. कांहीं दिवसांनीं सर्वव्यापक महादेव तिच्या तपानें तुष्ट होत्साता आसपास बसलेल्या लोकांस विस्मित करून तिच्या वदनकमलांत प्रवेश करिता झाला. तेव्हांपासून त्या उग्र तेजानें गर्भित झाल्यामुळें **विशिष्टा पार्वती**प्रमाणें शोभूं लागली; व तिच्या आईबाप प्रभृतींनीं तिचा मोठा आदर केला. हळू हळू गर्भ वृद्धिंगत होऊं लागला हें पाहून **चिदंबरेश्वरास** यजमान करून ब्राह्मणांनीं त्याच्या **पुंसवना**दिक वेदोक्त क्रिया केल्या. नवव्या महिन्यांत विशिष्टेच्या कुशींतून **शंकराचार्य** नाम धारण करणारे **महादेव** जगांत प्रकट झाले.

द्वितीय प्रकरण.

ज्याचे सर्व अवयव अग्नीनें दग्ध झाले नाहींत, असा **भट्टाचार्य** (कुमारिल) पुनः ह्मणाला कीं माझ्या बहिणीचा नवरा **मंडन**मिश्र हा **ब्रह्मदेवा**प्रमाणें सर्व विद्यांत कुशल आहे. पंचावन्नावें प्रकरण.

हस्तिनापुराच्या आग्नेय दिशेस जें एक मोठें विद्येचें प्रसिद्ध स्थान आहे व ज्यास तद्देशीय लोक **विजिलबिंदु** असें ह्मणतात तेथें जाऊन. छपन्नावें प्रकरण.

मंडन यत्याश्रम ग्रहण करण्यास आरंभ करितो आहे इतक्यांतच स्वयंपाकगृहांतून बाहेर पडून आकाशमार्गानें **सरसवाणी ब्रह्मलोकास** गमन करित्ये आहे असें पाहून. सत्तावन्नावें प्रकरण.

[पुढें चालेल.]

पुराणग्रंथ.

—ooo—

[पुढें चालू.]

५वें श्रीमद्भागवतपुराण.

यत्राधिकृत्य गायत्रीं वर्ण्यते धर्मविस्तरः।
वृत्रासुरवधोपेतं तद्भागवतमुच्यते ॥१॥

सारस्वतस्य कल्पस्य मध्ये ये स्युर्नरामराः।
तद्वृत्तांतोद्भवं लोके तद्भागवतमुच्यते ॥२॥
अष्टादशसहस्राणि पुराणं तत्प्रकीर्तितम्।

भावार्थ—ज्यांत धर्माचें विस्तारानें वर्णन केलें आहे, ज्याचा गायत्रीनें आरंभ होतो, ज्यांत वृत्रासुराचा वध वर्णिला आहे, ज्यांत सारस्वत कल्पांतील देव व मनुष्य यांचें वृत्त आहे तें भागवत पुराण. त्यांत १८,००० श्लोक आहेत.

पुराणांच्या ज्या यादी आढळतात त्या सर्वांत या पुराणाचें पांचवें स्थान आहे. फक्त पद्मपुराणांत मात्र भागवत हें सर्व पुराणांचें सार आहे असें सांगून त्यास अठरावें स्थान दिलें आहे. ह्याचे बारा भाग आहेत. प्रत्येक भागास स्कंध असें नांव आहे. एकंदर अध्याय ३३२ आहेत.

व्यासपुत्र शुकाचार्य यानें परीक्षित् राजास जें सांगितलें तेंच सूतानें नैमिषारण्यांतील ऋषींस भागवतांत सांगितलें आहे.

आरंभीं सृष्टीच्या उत्पत्तीचें वर्णन आहे. इतर पुराणांत उत्पत्तीचें वर्णन सांख्यशास्त्रास अनुसरून केलेलें असतें तसें यांत नसून तें वेदांतशास्त्रानुसार केलें आहे.

द्वितीय स्कंधांत सर्व भागवत संक्षेपानें सांगितलें आहे.

तिसऱ्या स्कंधांत वक्ता मैत्रेय व पृच्छक विदुर आहे. प्रथम ब्रह्मदेवाची उत्पत्ति व कालविभाग सांगितल्यावर वराह अवतारांचें लांबलचक वर्णन केलें आहे. पुढें प्रजापति व स्वायंभुव यांची उत्पत्ति सांगून स्वायंभुवाची कन्या देवहूति इचें कर्दम ऋषीशीं लग्न झाल्याचा प्रकार वर्णिला आहे. देवहूतीचा पुत्र कपिल यानें सांख्यशास्त्र आपल्या मातेस सांगितलें तो प्रकार या स्कंधाच्या शेवटच्या नऊ अध्यायांत दिला आहे.

स्वायंभुवमन्वंतरवर्णन; प्रजापति वंशवर्णन; ध्रुव, वेण, पृथु इ० राजांच्या कथा, हीं प्रकरणें चौथ्या व पांचव्या स्कंधांत आहेत. यांतील कथा विष्णुपुराणांतील कथेशीं पुष्कळ अंशीं जमतात. व कित्येक स्थळीं तर त्या शब्दशः उतरून घेतल्यासारख्या आहेत.

साहाव्यांत विष्णुपूजनाचें पुण्य फार आहे हें दाखविण्याकरितां पुष्कळ कथा सांगितल्या आहेत.

सातव्यांत प्रल्हादचरित्र आहे.

आठव्यांत बाकी राहिलेल्या मन्वंतरांचें वर्णन व अनेक कथा आहेत. त्यांत गजेंद्रमोक्ष, समुद्रमंथन, वामन अवतार, व मत्स्य अवतार या मुख्य आहेत.

९व्या स्कंधांत वैवस्वत मन्वंतरांतील सूर्यवंशी व चंद्रवंशी राजे कृष्णापर्यंत सांगितले आहेत.

१०व्यांत कृष्णचरित्र विस्तारानें सांगितलें आहे.

११व्यांत यादवांचा संहार व कृष्णनिर्याण आहे.

१२व्यांत कलियुगांत होणारे राजे सांगून व्यासानें वेदांचा विचार केला व पुराणें रचिलीं याविषयीं व मार्कंडेयाविषयीं कथा सांगून शेवटीं भागवतस्तुति करून ग्रंथसमाप्ति केली आहे.

६वें नारदपुराण.

यत्राह नारदो धर्मान् बृहत्कल्पाश्रयानिह।
पंचविंशत्सहस्राणि नारदीयं तदुच्यते ॥१॥

भावार्थ—ज्यांत नारदानें बृहत्कल्पांतील धर्म वर्णिले आहेत व ज्यांत २४,००० श्लोक आहेत तें नारदपुराण. याशिवाय दुसरें

एक बृहन्नारदीय पुराण ह्मणून ही एक पुस्तक प्रसिद्ध आहे.

ह्या नांवाच्या दोन्ही ग्रंथांस पुराणाचें लक्षण लागू पडत नाहीं. ह्यांत वैष्णवपंथ व विष्णुभक्ति हे दोन मुख्य विषय आहेत. ह्या विषयानुरूप विष्णूचीं स्तोत्रें, व्रतें, व विष्णुभक्तीचें महात्म्य दाखविण्याकरितां अनेक आख्यानें हीं यांत आहेत.

नुसतें जें नारद पुराण ह्यांत ध्रुवाख्यान व प्रल्हादचरित हीं आहेत. पुढें रुक्मांगद राजाच्या मोहिनी नांवाच्या मानसकन्येनें एकादशी व्रताचा भंग कर किंवा आपला पुत्र ठार मार असा आग्रह धरिला तेव्हां विष्णुभक्तीच्या भंगापेक्षा पुत्रहत्येचें पातक कमी असें समजून राजानें पुत्रवधाचें पातक स्वीकारलें यावद्दल कथा आहे.

यांत वैष्णव पंथाचें फारच प्राबल्य दिसतें ह्यावरून हें सोळाव्या किंवा १७व्यां शतकांत रचिलें असावें.

बृहन्नारदीय हें नुसत्या नारद पुराणासारखेच वैष्णवधर्म प्रतिपादक आहे.

७वें मार्कंडेयपुराण.

यत्राधिकृत्य शकुनीन् धर्माधर्मविचारणान् ।
व्याख्यातं यन्मुनिप्रश्ने ऋषिभिर्धर्मचारिभिः १
मार्कंडेयेन कथितं तत्सर्वं विस्तरेण तु ।
पुराणं नवसाहस्रं मार्कंडेयमितीर्यते ॥२॥

भावार्थ—मुनींनें प्रश्न केल्यावरून ऋषींनीं जें उत्तर दिलें त्याच्या अनुरोधानें मार्कंडेयानें धर्माधर्म जाणणाऱ्या पक्षांच्या कथानकास आरंभ करून जें विस्तारानें वर्णिलें आहे त्यास मार्कंडेय पुराण ह्मणतात. त्यांत ९,००० श्लोक आहेत.

व्यासशिष्य जैमिनी यानें मार्कंडेयास वासुदेवाचें स्वरूप कथन करण्याविषयीं विनंती केल्यावरून मार्कंडेयानें शमीक ऋषीनें पाळलेल्या विंध्याचलस्थ पक्ष्यांस विचारण्यास सांगितलें. तेव्हां पिंगाक्षादि पक्ष्यांस वासुदेवानें मृत्युलोकीं अवतार कशा करितां घेतला ? पांच पांडवांची द्रौपदी स्त्री कशी झाली ? बलदेवानें ब्रह्महत्येचें पातक जाण्याकरितां प्रायश्चित्त कां केलें ? व कृष्णार्जुन असतां द्रौपदीच्या पुत्रांचा संहार कां झाला ? हे चार प्रश्न जैमिनीनें केले.

ह्या चार प्रश्नांचीं प्रथम उत्तरें देऊन मग वृत्रासुरवध, हरिश्चंद्राख्यान, व वसिष्ठविश्वामित्र कलह हीं आख्यानें सांगितलीं आहेत. नंतर जन्म, मृत्यु, व पाप यांचा विचार केला आहे. पापाचे संबंधानें निरनिराळ्या नरकांचें वर्णन केलें आहे. पुढें सृष्टीची उत्पत्ति व मन्वंतर वर्णन हीं प्रकरणें आहेत. मन्वंतराचे वर्णनांत देवीमाहात्म्य ह्मणून एक लांबच लांब प्रकरण आहे. बंगाल प्रांतांत दुर्गापूजा ह्मणून जो मोठा उत्साह होतो त्यास हें देवीमाहात्म्यच आधारभूत आहे. या पुराणांत कोणत्याही पंथाचें माहात्म्य किंवा कोणत्याही एखाद्या विशेष दैवताचें माहात्म्य नसल्यामुळें हिंदुस्थानांत शैवादिपंथ प्रबल होण्यापूर्वी ख्रि० इ० स० च्या ९ व्या किंवा १० व्या शतकांत हें रचिलें असावें असें दिसतें.

८वें अग्निपुराण.

यत्तदीशानकं कल्पवृत्तांतमधिकृत्य च ।
वसिष्ठायाग्निना प्रोक्तमाग्नेयं तत्प्रचक्षते ॥१॥
तच्च षोडशसहस्रं सर्वक्रतुफलप्रदम् ।

भावार्थ—ज्यापुराणांत ईशानकल्पांत झालेल्या गोष्टी वर्णिल्या आहेत व जें अग्निनें वसिष्ठास सांगितलें त्यास अग्निपुराण ह्मणतात. त्यांत १६,००० श्लोक आहेत.

हें अग्निनें वसिष्ठास सांगितल्यामुळें याचें नांव अग्निपुराण असें पडलें आहे. याचे३३२ अध्याय आहेत. यांत नानातऱ्हेचे अनेक विषय असल्यामुळें हें फार मनोरंजक आहे. परंतु यांतील बहुतेक विषय दुसऱ्या ग्रंथांतून घेतलेले आहेत.

अग्निपुराणाच्या आरंभीच्या अध्यायांत दहा अवतारांचें वर्णन आहे. त्यांपैकीं राम व कृष्ण या दोहोंचें वर्णन रामायण व महाभारत या ग्रंथांतील वर्णनानुसार आहे. यावरून भारत व रामायण हे ग्रंथ झाल्यानंतर याची रचना झाली असावी असें दिसतें. पुढें शिवाचे लिंगार्चनाविषयीं हकीकत आहे. नंतर होम, मंत्र, मंडळें, व पवित्रकें यांविषयीं सांगून पुढें देवालयें कशीं बांधावीं; मूर्ति कशा कराव्या; तळीं, बागा, निशाणें, घट, इत्यादि वस्तु कशा कराव्या याविषयीं माहिती दिली आहे. लिंगार्चनाचेवेळीं व दुर्गापूजेचेवेळीं योजावयाचे मंत्र व मुद्रा यांविषयीं यांत जो मजकूर आहे तो शारदातिलक व मंत्रमहोदधि यांतील मजकुराशीं बराच जुळतो.

पुढें भुवनकोश ह्मणून एक प्रकरण आहे त्यांत तीर्थांचें वर्णन आहे. त्यांत नर्मदा, श्रीशैल, अविमुक्तानगरी, व तेथील देव अविमुक्तेश्वर यांचें वर्णन केलें आहे. हल्लीं वाराणशी ह्मणजे काशी, वारणा व अशी या दोन नद्यांचे मध्यें आहे त्याप्रमाणेंच अविमुक्तानगरी ही याच दोन नद्यांचे मध्ये होती असे सांगितलें आहे. सगळ्या तीर्थवर्णनांत गयामहात्म्य मोठें आहे.

तीर्थवर्णना नंतर भरतखंड व इतर देश यांचें वर्णन आहे. पुढें सत्यादिग्रहांचें वर्णन करून ज्योतिषप्रकरण सांगितलें आहे. नंतर मन्वंतरांचें वर्णन करून जनन, उपनयन, विवाह, मरण, इ० संस्कार व वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत. पुढें परमात्मध्यानाचें व अनेक व्रतांचें वर्णन केलें आहे. नंतर दान करण्याचे पुण्याविषयीं व शरीरदंडनाविषयीं सांगितलें आहे.

पुढें राजधर्म सांगितले आहेत त्यांपैकीं कांहीं दशकुमार चरितांतील राजनीतीशीं जमतात. नंतर शस्त्र व धनुर्विद्या यांचें वर्णन केलें आहे. पुढें धर्मशास्त्रावर जे अध्याय आहेत ते मिताक्षराग्रंथाशीं अगदीं अक्षरशः जमतात. नंतर वेदाध्ययन, दुर्दैवशमन, हवन, व अनेक देवतांचें पूजन यांचें वर्णन केलें आहे. पुढें वेदशाखा, पुराणें, आणि सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांचें वर्णन, याविषयीं लिहिलें आहे. चंद्रवंशी राजांचें वर्णनांत यदूचा वंश कृष्णा पर्यंत व पुरूचा पांडवांपर्यंत सांगितला आहे. नंतर सुश्रुताचे ग्रंथाधारें वैद्यक प्रकरण लिहिलें आहे. त्यांत वनस्पतींचे योगानें जसे रोग दूर होतात त्याप्रमाणेंच मांत्रिक उपायांनी ही दूर होतात असें सांगितलें आहे.

पुढें शिव व देवी यांच्या अवतारांची पूजा करतेवेळीं योजावयाचे मंत्र सांगितले आहेत. नंतर काव्य व साहित्य शास्त्र यांविषयीं माहिती दिली आहे. पुढें पिंगल मुनीच्या ग्रंथाधारें छंदशास्त्र सांगून ग्रंथाचे शेवटीं व्याकरणशास्त्र सांगितलें आहे त्यांत तिङंत प्रकरण नाहीं. व्याकरणाचे नियम पाणिनि व कात्यायन यांचे ग्रंथाधारेंच लिहिले आहेत.

९वें भविष्यपुराण:—

यत्राधिकृत्य माहात्म्यमादित्यस्य चतुर्मुखः ।
अघोरकल्पवृत्तांतप्रसंगेन जगत्स्थितिम् ॥

मनवे कथयामास भूतग्रामस्य लक्षणम्।
चतुर्दश सहस्राणि तथा पंचशतानिच ॥२॥
भविष्यचरितप्रायं भविष्यं तदिहोच्यते।

भावार्थ—ज्यांत ब्रह्मदेवानें आदित्याचें माहात्म्य वर्णिलें आहे व मनूस अघोर कल्पांतिल जगदुत्पत्ति व सृष्ट वस्तूंची लक्षणें सांगितलीं आहेत तें भविष्य पुराण. त्यांत १४,५०० श्लोक आहेत.

हें पुराण सुमंतूनें शतानीक नांवाच्या पांड्य राजास सांगितलें आहे. ह्याचे पांच भाग आहेत. त्यां पैकीं पहिल्या चौहोंत ब्रह्मा, विष्णु, शिव, व त्वष्टृ यांचें वर्णन असावें असें त्या चौहोंच्या नांवावरून दिसतें. तसेंच पांचव्यांत प्रतिसर्गाचें ह्मणजे लय झाल्यावर होणाऱ्या पुनरुत्पत्तीचें वर्णन असावें असें वाटतें. समग्र ग्रंथ कोठें आढळत नाहीं. या पुराणाचा जेवढा भाग उपलब्ध आहे त्या भागाच्या आरंभी सृष्टीच्या उत्पत्तीचें वर्णन आहे. तें मनुस्मृतीच्या १ल्या अध्यायांतून उतरून घेतल्या सारखें आहे. पुढें दहा संस्कार, संध्यावंदन, गुरूपासना. वर्णाश्रमधर्म, व व्रतें सांगितलीं आहेत, मधून मधून आख्यानें आहेत त्यापैकीं च्यवनाचें आख्यान फार मोठें आहे. नागपंचमीचें व्रत सांगितल्यावर सर्व जातीचें वर्णन केलें आहे. नंतर कृष्ण, त्याचा पुत्र सांब, वसिष्ठ, नारद, व व्यास यांचा, सूर्याची शक्ति, प्रभा, व पूजा यांविषयीं संवाद आहे. (पुढें चालेल).

उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याची अवश्यकता.

—ooo—

(पुढें चालू.)

देशाच्या संपत्तीचा व धंदेकरी लोकांच्या साधारण भरभराटीचा आसरा काढण्यास, एकंदर लोकसंख्येमध्यें कित्येक लोक संपत्तीनें ह्मणजे द्रव्यानें मातब्बर असले ह्मणजे बहुधा लोक सुखी आहेत असें अनुमान काढवत नाहीं. त्या संख्येंत स्वतंत्र धंदे चालविणारे कारागीर ह्मणजे कसबी लोक यांचा उद्योगांत नफा झाला पाहिजे अथवा निदान त्यांतील शेतकी करणारे लोक सधन व सुखी असले पाहिजेत. यापैकीं शेती करणाऱ्या लोकांस कसबी लोकांपेक्षां भांडवलाची गरज आरंभीं विशेष लागते. तें नसल्यास शेतकऱ्यांस आपला धंदा चालविण्याकरीतां अर्थात निराळा सावकार पाहावा लागतो. यामुळें तो केवळ त्याचा चाकर होतो व आपलें उत्पन्न पोटास लागेल त्यापेक्षां अधिक वाढविण्याची त्यास विशेष उमेद राहत नाहीं. अशी स्थिती बहुधा आपल्या देशांतील शेतकरी लोकांची झाल्यामुळें सुधारणा होण्याचा काळ फार दूर गेला आहे. तशांत ही सरकारचा सारा अम्मलदारांच्या मर्जी प्रमाणें. मग काय विचारतां! जेथे देशी सावकाराचें लक्ष केवळ आपला पैका वाढविण्याकडे आहे; तेथें गरीब शेतकऱ्यांस शेती सुधारण्याचा संभव फारच कमी असें समजले पाहिजे. ही निकृष्ट स्थिति सुधारण्यास उघड उपाय हाच आहे कीं समंजस लोकांनी द्रव्य जमवून शेतकरी लोकांस सावकार व्हावें व त्यां उद्देशाच्या जाहिराती चहूं कडे पसराव्या. या उद्देशानें एक दोन मंडळ्या निघाल्याचें कित्येकास कळलें असेलच. परंतु त्यांचें काम सुरळीत चालल्याचें कोठें नजरेस आलेलें आढळत नाहीं. मी आपणास वर सांगितलें कीं या देशांत कारागीर लोकांचा व शेतकरी लोकांचा चरितार्थ कसा चालतो याकडे आपलें लक्ष दिल्यानें देशांत धंदा किती

कमी आहे हें कळेल. सबब या गोष्टीचा थोडासा विचार करूं.

कारागीर लोकांचा ह्मणजे कोष्टी, रंगारी, तांबट, सुतार, लोहार, सोनार व कुंभार यांचा उद्योग आज ४० वर्षां पेक्षां कमी अथवा जास्त झाला आहे. असें खात्रीनें सांगण्यास कांहीं साधन नाहीं तरी यांत विशेष तफावत पडली नाहीं, हें उघड दिसतें. यांत कोष्टी लोकांचा उद्योग बराच कमी झाला असें वाटतें, कारण विलायती कापड आपल्या देशांत बरेंच खपतें. मादरपाठ, जगन्नाथी दुमेटी, चिटें, जामदानी व सणाचें कापड यांचा हल्लीं खप पुष्कळच आहे. व ह्या कापडाच्या सर्व तऱ्हा विलायतेहून येतात; तेहां केवळ खादीवर, मलमलीवर, व जगन्नाथीवर जो लोकांचा निर्वाह होत होता तसा पुन्हः होईल असें वाटत नाहीं. द्रव्याचा संचय ज्यास्त होत चालला ह्मणजे सुंदर व शोभिवंत पदार्थ वापरण्याची इच्छा उत्पन्न होये हें स्वाभाविक आहे व ते पदार्थ नेहमी वापरण्यांत येतात. यामुळें ह्या साधारणतः कारागीर लोकांच्या स्थितीकडे न पाहतां जिकडून माल चांगला मिळेल तिकडून घेण्याची इच्छा सर्व मनुष्यास साहजिक असते. ती इच्छा केवळ नियमानें मोडत नाहीं. अशीच स्थिती इतर उपयोगी पदार्थांस लागू आहे ह्मणजे मातीचीं भांडीं, विळ्या, सुऱ्या, चाकू, खिळे इत्यादि पदार्थांसही लागू आहे. अलिकडे, देशी कापड जितकें वापरावें, तितकें विलायती वापरूं नये अशाविषयीं चौहोकडे आपल्या नवीन मंडळींत नियम करण्याविषयीं विचार चालू आहेत; असे विचार एकंदर खर्चाचा आटप करण्याविषयीं कांहींसे बरे आहेत परंतु नियम नेहमी सारखा चालवितील असें मला वाटत नाहीं. असा नियम करण्यापेक्षां देशी माल जितका ज्यास्ती अंशानीं वापरवेल तितका वापरावा असा ठराव केला तर तो ज्यास्त टिकण्याचा संभव आहे.

असो. हल्लीं कारागीर व शेतकरी लोकांची स्थिती कशी आहे याविषयीं आपण शोध केला पाहिजे या दोन्हीं धंदेकरी लोकांकडे पाहिलेंतर मूळचे चांगले व वाकबगार लोक बरेच नाहींसे झाले जे व आहेत त्यांतील कित्येकांनीं दुसरे धंदे पत्करले. याचें कारण एकच आहे. कारागीर लोकांच्या मालावर विलायती मालाची सुबकपणाच्या संबंधानें वरचढ होऊन व किमतीचा उतार होऊन त्यांचा माल फार उशिरानें खपूं लागला; यामुळें त्यांच्या मुद्दलास धक्का बसला व शेतकरी लोकांच्या उत्पन्नावर प्राप्तीच्या मानानें कर वाढला यामुळें त्यांचा धंदा निर्जीव झाला. मला असेंही वाटतें कीं साऱ्याचें कारण हल्लींच्या दुष्काळाच्या आधीस बऱ्याच अंशीं कारणभूत असावें.

आतां ही सर्व धंद्याची निकृष्ट स्थिति सुधारण्याकरितां दोन उपाय करावे लागतील. १ ला, जे लोक धंदे फार दिवस करीत आले आहेत त्यांस द्रव्याचा आश्रय देऊन, त्यांच्याजवळ नवीन शिकलेले लोक अभ्यासाकरितां ठेवावे, व त्यांस धंद्याची सुधारणूक करण्याकरितां वेळोवेळीं द्रव्याची मदत करावी. जे धंदे हल्लीं सुधारण्यासारिखे आहेत त्यांचीं नांवे पुढें लिहितों. कोष्टी लोकांस हातानें माग फिरवितां यावे ह्मणून त्यांस जे कोणी शिल्पज्ञ हातानें अथवा पायांनें माग फिरण्यासारखे काढतील त्यांस प्रत्येक वर्षीं बक्षीस द्यावें. या प्रमाणें कापड रंगण्यांत सुधारणा

करतील त्यांस, व रंगाचें तेज व टिकाउपणा कोणत्या मिश्रणानें वाढेल या विषयीं जो आपली रीत परीक्षक मंडळीस दाखवील त्यास ही इनाम मिळेल अशी तजवीज ठेवावी. जमिनीची लागवड उत्तम रीतीनें करतां यावी म्हणून जमिनीची परीक्षा करविण्याचा क्रम सुरू ठेवावा व ती हिणकस असली तर निरनिराळ्या धान्यांच्या घटनेप्रमाणें तींत जे अंश वाढाविण्यासारखे असतील त्या अंशां प्रमाणें जमिनीस खताचा पुरवठा द्यावा. असे जे विचार व सुधारणा हल्लीं आपल्यास जरूरीच्या आहेत त्या अमलांत आणण्याकरितां मुख्य व आरंभीचा उपाय हा दिसतो कीं आपल्या लोकांस रसायनशास्त्राचें ज्ञान जितकें देववेल तितकें द्यावें; व त्या ज्ञानाचा जुन्या वहिवाटलेल्या लोकांच्या अनुभवास मेळ घालून कोणती कमतर आहे हें पाहून प्रत्येक धंद्याच्या इसमानें आपला अनुभव व विचार एका नेमलेल्या मंडळीमध्ये अथवा त्या धंद्यातील जाणत्या लोकांत प्रसिद्ध करावे. असें केल्यानें व्यावहारिक विषयाचें ज्ञान नेहमी डोळ्या पुढें राहून आपल्या देशांत त्यांचें यथास्थित संगोपन होईल, व उद्योगास खऱ्या अडचणी कोणत्या येतात व त्या दूर कशा कराव्या या विषयीं उपाय आपल्या आपण सुचूं लागतील.

[पुढें चालेल.]

ठगाची जबानी.

खण्ड ५वें.

(मागल्या अंकापासून पुढें चालू.)

शेवटीं माझा बाप म्हणाला, "मुला, मला वाढलें कीं आतां मी मरतों. माझी म्हातारपणाची त्यानें अशी दुर्दशा केली म्हणून त्या चांडाळाचें अंतःकरण किती कठोर असेल हें तूंच पहा. गुलामाचा सत्यानास होईल. चार दिवस त्याची सद्दी आहे तोंपर्यंत तो मौज करो; पण त्याच्या ह्या व इतर दुष्टकृत्यांबद्दल अखेरीस त्याला प्रायश्चित्त भोगावें लागेलच लागेल."

"म्यां म्हटलें, 'बाबा, तुमचा तो इतका छळ करितो तेव्हां असा तुमचा आणि त्याचा दावा तरी काय आहे तें मला सांगा.'

"तो म्हणाला, 'मी सांगतों हें ऐक, म्हणजे तुझें तुलाच समजेल. कांहीं वर्षांवर—तेव्हां तूं अगदीं लहान—जयसुखदास शेट—आपल्या गांवांत तो मोठा सावकार—वारला. अंतकाळीं त्यानें मला बोलाऊं पाठविलें. मी जवळ जातांच मोठ्या काकुळतीनें तो मला म्हणाला, 'हीं माझीं बायकामुलें आतां मी तुमच्या स्वाधीन करितों. मी तर आतां ह्यांस मुकणार. ह्यास्तव तुम्हीं ह्यांचा सांभाळ करा. पहा तुम्हीं मुसलमान आहां; तुम्हांला तुमच्या पैगंबराची आण आहे. तुम्हीं माझ्या मुलाबाळांस ह्या दुष्ट ब्रिजलालाच्या हातून वांचवा. माझी बेइज्जत करण्याच्या हेतूनें ह्या ब्रिजलालानें मजवर नाहीं तोच खोटा आळ घातल्यावरून नागपुरास भरदरबारांत म्या त्याला जोडा काढून मारिला आहे; त्याचा सूड आतां तो ह्या बापड्या उघड्या पडलेल्यांवर उगवूं पाहील.' ब्रिजलालानें जयसुखदास शेटावर सरकारी महसुलाच्या पैशाचा अपहार केल्याचा आरोप आणिला होता. आपला गांव व आपल्या परगण्यांतील आणखी कित्येक गांव मिळून सालीना सरासरी एक लाख रुपये जमाबंदी असून तेवढ्या साऱ्या पैक्याचा सरकारांत भरणा शेटजींच्या मार्फत होत असे. तेवढेंच त्या-

ला निमित्त पुरलें. परंतु दैववशांत शेटजींचा लौकिक पडला मोठा, ह्यामुळें असल्या हलकट चहाडखोराच्या कुभांडानें त्यांच्या अब्रूस किंवा योग्यतेस लेशमात्रही धक्का पोंचला नाहीं; ह्या भिकाऱ्याची बडबड कोणी मनासही आणिली नाहीं. तथापि आपली अप्रतिष्ठा झालेली ब्रिजलाल विसरला नाहीं. ती त्याच्या पोटांत नेहमी खंवखंवत होतीच; व शेटजींचा घात करण्यासाठीं त्यानें आपल्याकडून होता तेवढा उपाय केला. दरबारांत शेटजींना ही शत्रू होतेच; ह्यामुळें तेव्हांपासून शेटजींच्या मनांत, कधीं ना कधीं तरी आपल्यावर कांहीं एखादें खोटें नाटें कचाट उपस्थित होऊन आपलें घरदार लुटलें जाईल किंवा आपल्या पायांत शृंखला पडतील अशी धास्ती उत्पन्न झाली. पण तसा कांहीं प्रकार न घडतां अखेरीस त्यांचा तर काळ झालाच. परंतु अंतकाळीं पुनः पुनः विनवणी करून त्यांनीं मला सांगितलें कीं 'माझ्या मुलांमाणसांस, त्यांजपाशीं डागडागिणे व सोनें नाणें आहे त्यासुद्धां, व लोकांकडे माझें घेणें आहे त्याची जी तुमच्यानें उगवणी होईल ती करून वसूल झालेल्या पैशासुद्धां, माझ्या देशीं मारवाडांत पावती करा." त्याप्रमाणें मजकडून झाली तेवढी त्वरा करून म्या त्यांच्या कुटुंबाची, मार्गांत त्यांस ढगांचा वगैरे उपद्रव होऊं नये ह्मणून आपल्या पदरची मंडळीसमागमें देऊन, स्वदेशींरवानगी केली. त्यांस जाऊन आठएक दिवस झाले असतील नसतील इतक्यांत हा ब्रिजलाल व ह्याजबराबर आणखी एक मुन्सदी, असे दोघेजण आपला यजमान नारायणराव पेषकार याजकडून जयसुखदासाचीं बायकामुलें कैद करण्याविषयीं व त्याची जिंदगी जप्त करण्याविषयीं हुकूम घेऊन आले. पण तो हुकूम लेखी नसून तोंडजबानी होता. हा प्रकार नेहेमींच्या शिरस्त्याप्रमाणें नसल्यामुळें म्या 'शेटजींच्या माणसा विषयीं किंवा जिंदगी विषयीं तुह्मास मी कांहीं एक वर्तमान कळवीत नाहीं' असें त्यांस साफ सांगितलें. त्यावरून ब्रिजलाल मजला नानाप्रकारें दहशत घालूं लागला; व अखेरीस त्यानें मजवर यथेच्छ तोंड सोडण्यासही आरंभ केला. तेव्हां मला राग येऊन म्या पायांतील जोडा हातांत घेऊन त्याची मनःपूत चांगली पूजा केली; आणि त्याला गावांतून बाहेर काढून लाविलें; त्यावेळीं रस्त्यांतून टवाळ पोरांनीं त्याला मनास येईल त्याप्रमाणें शेणमार करून त्याची दुर्गो केली.

" 'त्या नंतर कित्येक दिवस पर्यंत ह्या ब्रिजलाला विषयीं कांहीं एक वर्तमान माझ्या कानीं आलें नाहीं. तरी दरबारांत होईल तिकडून माझें वांकडे करण्याच्या उद्योगांत तो होता हें मला समजलें. शेजारच्या गांवचा पाटील मला अनेक प्रकारें त्रास देऊं लागला; त्यानें माझी जमीन बळकाविली; आणि कईकवेळा कापून ठेविलेलें धान्य शेतांतून जबरदस्तीनें त्यानें लुटून नेलें. त्याजबद्दल म्या हत्यातितक्या फिर्यादी केल्या; पण माझी मिळून दरबारांत दाद लागली नाहीं; त्याचें सर्व कारण हाच. त्या पाटलानें दिवसें दिवस आपला पुंडावा अधिक अधिक चालविला. शेवटीं त्याच्या उपद्रवाची कमाल झाली तेव्हां आपल्या तर्फेनें दरबारांत अर्ज करण्याकरितां कोणी वकील पाठवावे असा म्या निश्चय केला; परंतु तेंही सर्व निष्फळ झालें. त्या संधीस दरबारांत ब्रिजलालाची मोठी चलती होती असें वाटतें;

तो मोठ्या अधिकारास चढला होता. त्याने उघडपणें मजकडून गेलेल्या लोकांच्या उलट पक्ष उचलिला. आपल्या गांवची पाटीलकी माझा कांहीं एक हक्क नसतां जबरदस्तीनें मी बळकावून बसलों आहें अशी मजवर उघड तोहमत आणून पाटिलकीचा खरा हकदार ह्मणून ब्रिजलालानें एकजण मध्येंच तोतया उभा केला. त्या माणसाला चोहोंकडून सर्वांची मदत; दरबारांत त्याची इतकी तरफदारी होऊं लागली कीं तो प्रकार पाहून माझ्या तर्फेनें गेलेली मंडळी निराश होऊन व घाबरून परत आली.

"'मुला, ह्या गोष्टीला आज सुमारें पांच वर्षें होत आलीं. तेव्हां पासून नागपुराहून माझ्या चार स्नेही मंडळीकडून वेळोवेळीं मला जें वर्तमान समजे त्याच्या योगानें माझ्या पोटांत वारंवार मोठी धास्ती उत्पन्न होई.—'कधीं मारेकरी येऊन घात करितील त्या साठीं नीट जपत जा;'—'भलत्याच लोकांस गावांत येऊं देऊं नको;'—चांगली सोबत बराबर घेतल्यावांचून कोठें बाहेर पडूं नको;'—अशा अनेक प्रकारच्या सूचना मला चोहोंकडून येऊं लागल्या. आतां इतकाही प्रकार झाला तरी त्या पासून आपल्या ठगीच्या धंद्यांत कोणत्याही तऱ्हेनें व्यत्यय आला नाहीं, समजलास? त्या कामाकडे म्या कधीं ही दुर्लक्ष केलें नाहीं. बाकी इतर गोष्टींत मी नेहेमी फार जपून चालत होतों. तरी पहा! अखेरीस आपण सर्व प्रकारें त्याच्या हातीं सांपडलों. आतां एथून अला आपली कशी तरी सुटका करो एवढीच माझी इच्छा आहे.'

"पुढें कांहीं दिवस पावेतों तो चांडाळ आमचा छळ करण्यास आला नाहीं. पण मागाहून तो पुनः आला; आणि फिरून माझ्या बापाचा त्यानें नानाप्रकारें छळ मांडिला. तथापि त्याजपासून कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. कांहीं केल्यानें माझा बाप कबूल होईचना.

"माझा बाप ब्रिजलालास ह्मणाला अरे, तूं काफर आहेस, मला ठाऊक आहेस. तुजसारिख्या गांडूंच्या हातून काय होणार आहे? तुझी काय छाती लागली आहे माझा जीव घेण्याची! इन्षाला! एकवार ह्या घाणेरड्या बंदीखान्यांतून मला सुटून तर जाऊंदे, ह्मणजे खऱ्या मुसलमानाच्या बीजाचा पुरुष आपल्या जीवासाठीं काय काय करितो तें मी तुला दाखवीन. तूं मात्र मग संभाळून राहा.'

(पुढें चालेल.)

पत्रें वगैरे.

देवास अर्जी—(पुढें चालू.)

कुठे न मजला जगीं मानें तसा सख्या! दीससी
अशा परम गुप्त म्या स्थळिं तरी कुठें राहसी।
विनोद-मति! मांडिला प्रभु तुवां लपंडाव कीं।
न शक्ति मुळिं राहिली पकडितां तुला सेवकीं॥ ८७॥

तमांत अथवा जसा बहुत अंध तों चांचपी
स्वदर्थ गत-दृष्टि मी सतत बुद्धिला ओरपीं
परंतु परमेश्वरा! परम पापिया पामरा
यथेच्छ मज सांपडे नच तुझ्या कृपेचा झरा!॥ ८८॥

कधीं कधिं गमे मला "खचित तूंच आहेस हा
ह्मणें बहुत गौरवें गंवसला प्रभू हो पहा!"॥
क्षणांत मग गर्वजो पुढति येउनी बोलनी।
"असे कुशल कायहो? ग्रहण ही करा मन्नती"॥८९॥

त्वरें चढुनि जातसें मग पुसा पिढा कायती।
परींच जणुं चालुनी प्रबळ आंधि ये आयती॥
मनीं समजतों तुझा भवडता असें दास मी।
नसे मजवरी तुझा खचित लोभ देवा कमी!॥९०॥

वृथा भ्रम पडे असा ह्मणुनि निंदितों बांधवा।
तदीय अपमान मी करितसें सदा केशवा॥

परी लवकरी हरीं मम महाविवेक भ्रमा ।
तुझा जगिच होतसे मजसि भास सृष्टिक्रमा ॥ ९१ ॥

मनो-विहित-कल्पना-कुटिल-जालकीं गम्य कीं ?
विवेक-युत-मानवाश्रितच मात्र तूं देव कीं ।
जगज्जनक तूं कसा ! भरंवसाच निर्मी तुला ।
कशास्तव न आपुला उघड मार्ग त्वां दाविला ? ॥९२॥

न जों अजुनि मृत्युनें सदनिं आपुल्या नेइलें ।
चिरातन सुषुप्तिनें नयन जों न हे झांकिले ॥
महाबुधविवेक तों पडति कार्णि या अक्षरें ।
पित्या ! हृदय वल्लभा ! मजसि भेट तों द्या वरें ! ॥९३॥

विचार करण्यास जों बहुत काल लाभे मला
बरीच मानें चालते हळू हळू जरी, प्रेमला !
तुला मानें पहावया परम हौस जों ही असे।
स्वरूप मज तों वरी त्वरित दावि देवा ! कसें ! ॥९४॥

अहर्निशा कितीक हे जन यमालया चालती ।
सकाळि असती परी क्षणभरांत जाती किती ॥
सुमित्र मजशी पहा सुभगतत्ववेत्ता वदे ।
परंतु घटिके-मधीं रुसुनि कीं न तो हांक दे ॥ ९५ ॥

किती हलविला तरी नुघडि नेत्र ना आयके ।
मुका करुनि टाकिनें मरण आपुल्या सायकें ॥
मला मग गमे "अहो करुनि हा समाधी बसे ।
विचार करि एकटा निर्जनि गाढ वेद्या" असें ॥ ९६ ॥

क्षणांत परि देखतों तव सुहृज्जनांचा थवा ।
तयास वघुनी किती करिति दुःख शोका रवा ॥
किती पडति त्यावरी, कवळिती किती प्रीतिनें ।
तथापि मम मित्र तो त्यजि जणो न अभ्यायनें ॥९७॥

अनंतर तयास ते उचलुनीच खांद्यावरी ।
त्वरें पळविती कुठे ! मिळुनि जाय रक्षाकरीं ॥
मला म्हणति मित्र वा तव परस्थळीं पातला ।
पुन्हा न जगतींत या कधिं हि भेट देतो तुला ॥९८॥

दशा न घडली अशी मम परात्परा जोवरी ।
कसें करुनि आपली प्रकटता करी लौकरी ॥
असाधु जन साधु वा सकळ एक तूंतें जरी ।
मनो-मल-सयुक्त हा नर उपेक्षिसी कां तरी ? ॥ ९९ ॥

असें बहुत नेणता, बहुत तेंवि निर्भीड मी ।
करीं न तुज सांगण्या हृदयकांक्षितें हीं कमी ॥
वदोत मज दुर्वचें जन मुखें सुखें सर्वदा ।
वदेन मनिंच्या परी सकळ कल्पना, सर्वदा ! ॥१००॥

(पुढें चालेल.)

नक्कल.

एकेदिवशीं भोजराजा सभेंत बसला असतां भुकुंड नांवाचा एक चोर ग्रामरक्षकांनीं पकडून राजसभेंत आणला. त्याची चौकशी होऊन राजानें त्यास मृत्युची शिक्षा सांगितली. तेव्हां तो चोर ह्मणतो—

भट्टिर्नष्टो भारविश्चापि नष्टो
भिक्षुर्नष्टो भीमसेनोऽपि नष्टः।
भुकुंडोऽहं भूपतिस्त्वं हि राजन्
भव्भापंक्त्यामस्ति कालःप्रविष्टः॥

हे राजा, पहा भट्टि नष्ट झाला, भारवि नष्ट झाला, भिक्षु नष्ट झाला, भीमसेन ही नष्ट झाला. यावरून भभाच्या बाराखडी मार्गें काळ लागला असें दिसतें. आणि आतां तर मी जो भुकुंड त्या माझी पाळी येऊन ठेपली. यांत माझ्या मरणाचें मला दुःख नाहीं, पण माझी पाळी संपतांच पुढें तूं भूपति आहेस ह्मणून लागलीच तुझी पाळी येईल, याचा मात्र तूं नीट विचार कर ह्मणजे झालें. हें धीटपणाचें भाषण ऐकून राजा चकित झाला, आणि त्यानें त्यास मृत्युची शिक्षा न देतां दुसरी कांहीं साधी शिक्षा सांगितली.

प्रश्न.

श्लोक.

अशी कोणती वस्तु आहे जगांत
जिचें जीव ते एकदां पाहतात ।
पुनः प्राप्त कोणा नसे ती पहाया
नसे शक्ति देवाहि ती दाखवाया ? ॥

दोहरा.

सकल सृष्टिके जीवनें दर्शन कीने जोनें ।
फिर दर्शन दुर्लभ भये वह वस्तु कहों कोन ?॥

BOMBAY:—"ASIATIC PRINTING PRESS" KALKADEVI ROAD,
By H. Shravan.

जाहिरखबर.

निम्नलिखितसंस्कृतपुस्तकानि विविध-ज्ञानविस्तारगृहे लभ्यानि।

पुस्तकनामानि।			मूल्यम्।
काव्यशास्त्रम्।			
रामायण, बालकाण्ड त्रयोदशसर्गावधि सटीक		.....	१—११
शिशुपालवध	,,	.....	६—८
किरातार्जुनीय	,,	.....	२—१४
रघुवंश	,,	.....	१—१४
कुमारसंभव	,,	.....	१—१४
मेघदूत	,,	.....	०—१४
ऋतुसंहार	,,	.....	०—८
नलोदय	,,	.....	०—१३
भामिनीविलास	,,	.....	१—२
भट्टीकाव्य	,,	.....	४—१२
पुष्पबाणविलास	,,	.....	०—१०
काव्यसंग्रह		.....	५—८
महिषशतक, पादारविंदशतक, स्तुतिशतक, मन्दस्मितशतक, कटाक्षिशतक		.....	१—२
विद्वन्मोदतरंगिणी चम्पूकाव्य		...	०—१०
माधवचम्पू	,,	...	०—८
चन्द्रशेखर	,,	....	३—६
बेहुलानखिन्दर	,,	...	१—३
कादम्बरी सटीक		.....	४—८
दशकुमारचरित	,,	.....	१—१२
वासवदत्ता	,,	.....	२—३
हितोपदेश	,,	.....	१—२
पञ्चतन्त्र		.....	२—१२
भोजप्रबन्ध		.....	०—१५
वेतालपञ्चविंशति		.....	०—१५
नाट्यशास्त्रम्।			
वेणीसंहार सटीक		.....	१—४
मुद्राराक्षस	,,	.....	१—१३

पुस्तकनामानि।			मूल्यम्।
रत्नावली	,,	.....	०—१४
मालविकाग्निमित्र	,,	.....	१—१२
धनञ्जयविजय	,,	.....	०—५
विक्रमोर्वशी	,,	.....	१—११
महानाटक	,,	.....	१—१२
चण्डकौशिक	,,	.....	१—१०
उत्तररामचरित	,,	.....	१—८
प्रियदर्शिका	,,	.....	०—१०
विद्धशालभञ्जिका	,,	.....	१—२
मृच्छकटिक	,,	.....	२—६
शाकुन्तल	,,	.....	१—०
मालतीमाधव	,,	.....	२—०
प्रबोधचन्द्रोदय	,,	.....	२—३
चैतन्यचन्द्रोदय	,,	.....	२—४
नागानन्द	,,	.....	१—२
प्रसन्नराघव	,,	.....	१—३
महावीरचरित	,,	.....	१—१२
वसन्ततिलक भाण		.....	०—८
अलंकारशास्त्रम्।			
कुवलयानन्द सटीक		.....	३—५
काव्यप्रकाश	,,	.....	४—८
काव्यादर्श	,,	.....	३—१२
काव्यदीपिका		.....	०—१४
दशरूप		.....	२—४
साहित्यदर्पण		.....	१—१२
चन्द्रालोक		.....	०—१०
तर्कसंग्रह		.....	०—१०
धातुरूपादर्श		.....	२—५
छन्दोमञ्जरी तथा वृत्तरत्नाकर स०			०—१२
लीलावती		.....	०—१४
बीजगणित		.....	१—४
मेदिनी कोश		.....	१—४
वीरमित्रोदय (स्मृतिशास्त्र)		.....	१०—८

Registered No. 102
1875.

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा नियतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी, रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची अगाऊ..... रुपये ३.
सहामाही अगाऊ..... रुपये २.
फुटकळ दर प्रतीस..... आणे ६.
टपालहशील वर्षाचे..... आणे ६.

वर्गणीदारांनीं अगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांच्या आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रूपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या, व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

A MONTHLY MAGAZINE

पुस्तक ७. OF MARATHI LITERATURE, अंक ३.

FOR

LADIES AND GENTLEMEN.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
अर्थशास्त्र.....	४१
संक्षिप्त भारतवर्षीय दर्शनसंग्रह.....	४३
तर्कसंग्रह...	४७
पुस्तकपरीक्षा—शांकरादिग्जय नाटक.....	४९
ठगाची जबानी.....	५२
उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याची आवश्यकता.....	५७
देवास अर्जी.....	६०

मुंबई.

एशियाटिक छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पोंच.

पुस्तक—गंगावर्णना. या नांवाचें काव्य राव साहेब पांडुरंग व्यंकटेश चिंतामणीपेटकर, बेळगांव जिल्ह्याचे डे. ए. इनस्पेक्टर यांणीं केलें तें दक्षणाप्राइझ कमीटीनें पसंत केल्यावरून बेळगांव समाचार छापखान्यांत सुंदर ठशांनीं छापिलें आहे. कर्त्यानें आह्मास एक प्रत पाठविण्याची मेहरबानी केली आहे. त्याबद्दल आह्मीं त्याचे आभारी आहों. मत सवडीप्रमाणें येईल.

वर्गणी.

(डीसेंबर १८७५ पर्यंत.)	रु० आ०
रा० साहेब नारायण विष्णु बापट.....	३—०
रा. रा. विठ्ठल आत्माराम वेखंडे.....	१—६
अड्जज ब्योसेफ ब्यानीयल हा. अ.....	३—६
बेलापुर नेटिव ज. लायब्रेरी.....	३—६

(डीसेंबर १८७५ पर्यंत.)	रु० आ०
मालकमपेट नेटिव लायब्रेरी.....	१—६
पनवेल नेटिव लायब्रेरी.....	३—६
संगमनेर नेटिव लायब्रेरी.....	३—६
रा. रा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते बाकी पैकीं.	३—०
रा. रा. नारायण लिंबक वैद्य बाकी पैकीं...	३—०

जाहिराती.

चातुर्यसंग्रह.

हें पुस्तक शिवराम रामकृष्ण निस्सुरे यांणीं अनेक ग्रंथ संग्रहाच्या साह्यानें जनमनोरंजनार्थ तयार करून गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापविलें. किंमत १ रुपया टपाल खर्च २ आणे.

विद्याधनप्रशंसा.

ही मनोरंजक कविता शिवराम रामकृष्ण निस्सुरे यांणीं रचली आहे. किंमत ८ आणे टपाल खर्च २ आणे.

परिमाणमाला.

हें लहानसें पुस्तक नवीन विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरीतां कित्येक मराठी व इंग्रेजी ग्रंथाधारें शिवराम रामकृष्ण निस्सुरे यांणीं तयार केलें. यांत मराठी व इंग्रेजी कोष्टकांची सुलभ रितीनें विद्यार्थ्यांस माहिती मिळेल, किंमत सवा आणा. पोष्ट खर्च १ आणा अगर जास्त प्रती घेतल्यास ही० प्रती पर्यंत १ आणाच पडेल असा अंदाज आहे.

क्रमिक पुस्तकांचें पहिल्या पुस्तकापासून पांचव्या पुस्तका पर्यंत गुढार्थ शब्द संग्रह ही पुस्तकें ही आमच्याकडे विक्रीस आलीं आहेत.

किरकोळ अॅक्ट—माजीस्ट्रेटच्या कामास लागु असणारा सन १८६७चा ३, ७, ८ आणि १८७१चा १ला. मुख्यत्वें पोलीस कारभारी व ग्रामपाटील यांस फार उपयोगीं पडतो, किंमत दाहा आणे. पोष्ट खर्च दिड आणा.

सदर्ह व दुसरीं सर्व जातींचीं सर्व पुस्तकें ज्यांस पाहिजे असतील त्यांणीं आमच्या नवीन पुस्तकालयांत कालकादेवीच्या रस्त्यावर (देवी समोर) अशा पत्त्यानें अगर या पुस्तकाच्या शेवटल्या पृष्ठावरील पत्त्याने आमच्या नांवें पैसा पाठविल्यास जरूर पाठवि, ण्यांत येतील.

व्यवस्थापक वि० ज्ञा० विस्तार.

श्री.

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ३.

अर्थशास्त्र.

प्रकरण पांचवें चालू.

—ooo—

६. भांडवल हें संपत्तीची उत्पत्ति पुनः पुनः केल्यानें टिकतें, रक्षण केल्यानें टिकत नाहीं.

कांहीं पुरुषांच्या उधळेपणामुळें देशसंपत्तीस होणारें नुकसान कित्येक गोष्टी घडल्यानें कांहींसें कमी होतें किंवा तें नुकसान होतें म्हणूनच परिणामीं ज्या गोष्टींनीं तें कमी किंवा जास्ती भरून येतें त्या गोष्टींकडे येथें लक्ष पोंचविणें योग्य आहे. त्या गोष्टींपैकीं एक गोष्ट ही आहे कीं, उधळे लोक जो खर्च करितात त्या सर्व खर्चाचा उपभोग त्यांना घेववत नाहीं. खर्चाविषयीं ते स्वभावतः काळजी वहात नसल्यानें मितव्ययी लोक त्यांनां वारंवार चोंहूकडून ठकवितात व नाडीतात. संपत्तिवान उधळे लोकांचे, गुमास्ते, मोदी आणि त्यांचे घरूचाकर देखील एकसारखा मोठा संचय सतत करीत असतात व जे लोक आपला खर्च फार जपून करितात त्या लोकांपेक्षां उधळे लोक सर्व सौद्याला फार अधिक किंमत देतात व यामुळें जितका पैसा ते उडवितात तितक्या पैशाच्या मोलाची संपत्ति फस्त करून टाकण्यास त्यांच्या हातीं येत नाहीं. त्यांच्या पैशांपैकीं पुष्कळ पैसा त्यांच्या हातून केवळ दुसऱ्याच्या हातीं मात्र जातो व त्यांतून थोडाबहुत पैसा ते दुसरे लोक संग्रहास टाकतात. आणखी एक गोष्ट लक्षांत आणली पाहिजे ती ही कीं, या पुरुषांच्या उधळेपणामुळें दुसरे कित्येक पुरुषांनां अल्पव्यय करण्यास भाग पडते. मनांत असें आणूं या कीं कोणा उधळ्यांच्या लहरेमुळें ख्यालीं खुशालीच्या एखाद्या जिनसावर अकस्मात झोडपून त्या जिनसाला खप फार आला व असा खप येईल हा अजमास पूर्वी न झाल्यानें नेहमींच्या पुराव्याहून त्या जिनसाचा पुरावा अधिक झाला नाहीं. असें झाल्यानें त्या जिनसाची किंमत वाढेल; कदाचित् ज्या लोकांस त्याचा नेहमीं खप असेल त्या लोकांपैकीं कित्येकांच्या इच्छेपलीकडे किंवा शक्तीपलीकडेही ती किंमत जाईल; मग ते लोक आपल्या नेहमींच्या उपभोगाचून चालवितील व त्या उपभोगाकडे खर्च होणारी रकम शिलकेस टाकतील. परंतु जर त्यांणीं असें केलें नाहीं व त्या जिनसावर पूर्वी जितका खर्च ते करीत होते तितकाच खर्च त्यांणीं पुढेंही चालविला तर त्या जिनसाचा व्यापार करणाऱ्यांना पूर्वीच्या इतक्याच मालावर होणाऱ्या परत उत्पन्नावर वाढवा

येईल व तो वाढवा उधळे लोकांनीं जितका जास्त पैसा दिला असेल तितका होय. या प्रमाणें होऊन जितकी रकम उधळ्याकडून गमाविली जाईल तितकी जशीची तशीच त्यांच्या हातून त्या व्यापाऱ्यांच्या हातीं येईल व मग ते व्यापारी ती आपल्या भांडवलास मिळवितील. व इतर गिऱ्हाइकांनां पूर्वीच्या इतकाच पैसा लागून त्यांचा नेहमीचा उपभोग्य त्यांना कमती मिळून त्यांच्या सुखांत झालेल्या न्यूनतेनें, या उधळ्यांच्या वाढलेल्या खासगी खर्चास पुरवठा पडेल. या पदार्थाच्या संबंधानें वर लिहिल्या प्रमाणें जें घडेल त्याच्या उलट दुसऱ्या कोणच्या तरी पदार्थाच्या संबंधानें घडलें पाहिजे; कारण या पदार्थाच्या वाढलेल्या खरेदीचा वचपा काढून घेण्याकरितां दुसऱ्या कोणच्या तरी पदार्थांची खरेदी उधळ्यांनीं कमी केली पाहिजे. उत्पादक उद्योग चालविण्यांत घातलेला पैसा कदाचित् त्याणें काढून घेतला असावा; आणि त्या उद्योगाच्या साधनांचा व पुरवठ्याचा व्यापार करणाऱ्यांच्या हातीं माल शिलक पडला असावा किंवा पूर्वीच्या इतक्याच मालावर त्यांना नेहमीपेक्षां कमी उत्पन्न झालें असावें. परंतु उद्योगी पुरुषांना प्राप्तीमध्यें किंवा भांडवलामध्यें अशा प्रकारचीं होणारीं नुकसानें, तीं पराकाष्टेचीं मोठीं नसलीं तर, उपासमारा व सुखोपभोगाचा लोप अधिक होऊन भरून येतात. तेणेंकरून देशभांडवलास धक्का पोंहचत नाहीं. आणि उधळे लोकांची शानशोकी, व मजा हीं दुसऱ्या लोकांचीं सुखें अल्पकाल कमती होऊन पण देशसंपत्त्युत्पत्तीचीं शाश्वत साधनें कमी न होतां चालतात. कारण हरएक प्रसंगी कोणचाही मनुष्य जितकें अनुत्पादक व्ययानें उडिवतो तितकें, त्या उडिवण्याच्या योगें, कमी खर्च करण्यास दुसऱ्यास अगत्य न पडलें तर तितक्यानें देश भिकारी होतो. कांहीं लोकांच्या उधळेपणामुळें दुसरे लोक अधिकाधिक संग्रह करूं लागल्यानें उधळलेल्या संपत्तीनें झालेल्या नुकसानाहून अधिक भरून येण्यांचें वर सांगितल्या सारखे आणखीही अधिक गहन प्रकार आहेत पण ते पुढें योग्य स्थलीं सांगतां येतील.

६. आपण आपल्या मूलसिद्धांताकडे पुनः वळूं या. तो सिद्धांत हा कीं, जें जें उत्पन्न होतें तें तें सर्व खर्चिलें जातें; ह्मणजे जें शिलकेस उरविलें असतें व जें खर्चून टाकिलें असें आपण ह्मणतों ह्या दोहोंचाही व्यय होतो व जितक्या त्वरेनें या दुसऱ्याचा व्यय होतो तितक्याच त्वरेनें त्या पहिल्याचाही होतो. परंतु साधारण भाषणाच्या प्रकारांनीं या सिद्धांतास भिन्नरूप येतें. देशाची ही अमुक संपत्ति जुन्या काळाची आहे. हें धन बाडबंडिलांपासून प्राप्त झालेलें आहे व आणखी कांहीं असीं वाक्यें जेव्हां लोक बोलतात तेव्हां मनामध्यें असा समज होतो कीं ही असी परंपरागत आलेली संपत्ति बहुत कालामागें ह्मणजे ज्यावेळीं ती प्रथमतः प्राप्त झाली त्यावेळीं, उत्पन्न झालेली होय; व अशा एकंदर संपत्तीस चालत्या वर्षीं जितकी नवी संपत्ति मिळविली असेल तितक्या संपत्तीवांचून देशभांडवलाचा दुसरा कोणचाही अंश सालमजकुरीं उत्पन्न केलेला नाहीं. परंतु खरें तें वेगळेच आहे. देशामध्यें चालू सालीं जी संपत्ति आहे तिचा बहुतेक भाग, तिच्या मोलाकडे पहातां, गेल्या बारमाहीमध्यें मनुष्याच्या हातांनीं उत्पन्न केलेला आहे. एवढ्या मोठ्या संपत्तीचा फारच थोडा अंश सुमारें दहा वर्षांमागें देशामध्यें होता. शेतावरील

घरें, यंत्राच्या कारखान्यांचीं घरें आणि थोडींशीं तारवें व हत्यारें यांखेरीज हल्लींच्या उत्पादक भांडवलाचा कोणताही अंश दहा वर्षांपूर्वीं क्वचित् असेल. आतां ह्या वस्तु देखील, त्या दहा वर्षांच्या कालांत त्यांची तोडजोड करण्याकडे नवीन श्रम योजिला नसता तर, इतक्या लांबवर बहुतेक ठिकाणीं टिकल्या नसत्या. सर्वकाल जमीन टिकत्ये आणि बहुधा जमीनच कायती सर्वकाल रहात्ये. तिजवांचून उत्पन्न होणारी हरएक वस्तु नष्टत्ये; त्यांत बहुतेक वस्तू फार त्वरित नष्टतात. बहुतप्रकारचीं भांडवलें त्याच्या जातिगुणामुळें पुष्कळ दिवस टिकण्याजोगीं नसतात. उत्पन्न होणाऱ्या पदार्थांमध्यें पुष्कळ दिवस टिकण्याजोगे पदार्थ थोडे आहेत, फारच थोडे आहेत. कधींमधीं तोडजोड होऊन इंग्लंड देशांतील वेस्ट मिन्स्टर आबे ही इमारत शेकडोंवर्षं तगली आहे. ग्रीस देशांतील खोदीव कामें व पुतळे दोन हजारांहून अधिक वर्षं राहिले आहेत. त्यांच्या द्विगुणित किंवा त्रिगुणित काल इजिप्त देशांतील पिरमिडें किंवा मनोरे खडे आहेत. याचप्रमाणें हिंदुस्थानांत दिल्हीजवळ कुतुबुद्दिनाची कुतुबमिनार, दिल्हींतील झुमामस्जिद, आग्ऱ्याचा ताजमहल, इलाहबादचा चालीससेतूनमहल व अनेक ठिकाणच्या गुहा किंवा कोरीवलेणीं हीं बहुत काल अभंग राहिलीं आहेत. पण हीं सर्व अनुत्पादक उपयोगाकडे लावलेलीं होतीं. पूल, नाहर, व कित्येक देशांतील तळीं, नदीच्या कांठचे घांट किंवा बंद हे जर सोडले तर, थोड्याच इमारती आढळतील कीं त्या कारखान्याच्या कामाकडे लागल्या होत्या व दीर्घकाल टिकल्या. अशा इमारती वर्दळीपुढें टिकाव धरीत नाहींत; व त्या शाश्वत राहण्यास, जितकी मजबुती पाहिजे, तितक्या मजबूत त्या बांधणें हा व्यवस्थिक खर्च नव्हे. युगानुयुग भांडवल राखलें जातें तें त्याचें संरक्षण केल्यानें नव्हे, तर सतत संपरत्युत्पति केल्यानें होय. भांडवल उत्पन्न झाल्यावर बहुधा लौकरच त्याचा हरएक अंश वापरला जाऊन नष्टला जातो; परंतु जे कोणी भांडवल खर्च करितात ते तें खर्च करीत असतांना अधिक उत्पन्न करण्याकडे लागलेले असतात. भांडवलाची वृद्धि प्रजेच्या वृद्धीसारखी आहे. हरएक मनुष्य, जो जन्मास येतो तो, मरतो; पण जन्मलेल्यांची संख्या मरणाऱ्यांच्या संख्येहून प्रतिवर्षीं वाढत्ये. ह्मणून जे लोक मिळून प्रजा बनत्ये त्या लोकांपैकीं एकही असामी आलीकडल्या बऱ्याच दिवसांवर जिवंत नसला तरी प्रजा ही सदैव वाढत असत्ये. (पुढें चालेल).

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.

मध्वदर्शन.

—०००—

जीव अणु आहे; वेद अपौरुषेय* आहेत, व त्यांचें प्रामाण्य स्वतः सिद्ध आहे; प्रमाणें तीनच† आहेत; पंचरात्र‡ वेदांप्रमाणेंच प्रमा-

* "पौरुषेय" पुरुषानें केलेला. असा नव्हे तो "अपौरुषेय". कालिदासादिक कवींनीं रघुवंशादिक काव्यें रचिलीं आहेत, तीं आपणास सर्वथैव प्रमाण मानतां येत नाहींत; कारण किती मोठे असले तरी ते पुरुष होते; व क्वचित् क्वचित् चुकणें हा पुरुषाचा स्वभाव आहे. ते पुरुष होते त्यापक्षीं त्यांची चूक घडण्याचा संभव; ह्मणून त्यांच्या वाक्यावर आपणास विश्वास ठेवितां येत नाहीं. पण वेद हे तसे नव्हेत; ते "अपौरुषेय" आहेत; ह्मणून सर्वथैव आमच्या विश्वासास पात्र आहेत.

† प्रत्यक्ष, अनुमान, आगम. उपमान, अर्थापत्ति, आणि अभाव, यांचा अनुमानांत अंतर्भाव होतो.

‡ पुरा कृष्णो हि गोलोके शतशृंगे च पर्वते ३५

ण आहे; हा सर्व प्रपंच सत्य होय; हीं रामानुजाचीं मतें प्रामाणिक आहेत यांत कांहीं संदेह नाहीं; तथापि भेदवाद, अभेदवाद, उभयवाद हे तीन ही वाद परमार्थिक असें म्हणणारा रामानुज, सप्तभंगीनय उपपादन करणाऱ्या जिनाचाच एक नवा अवतार, असें म्हटले पाहिजे; अर्थात तत्त्वमसीत्यादि वेदांतवाक्यांचा खरा अर्थ रामानुजास समजला नाहीं असें **मध्व** म्हणतो.

यास कधीं कधीं **पूर्णप्रज्ञ** व कधीं कधीं **आनंदतीर्थ** असेंही म्हणतात. याचा इतिहास असा आहे कीं, आपल्या पतीनें जैनधर्माचा स्वीकार केला तें पाहून, **गुजराथचा** राजा **कुमारपाल** याची वैदिकधर्म पाळणारी एक राणी होती, ती फार खिन्न झाली. रस्त्यांत जैनांचे यति पाहून,

किं करोमि क्व गच्छामि* को वेदानुद्धरिष्यति

असें खिडकींत उभी राहून रोज म्हणत असे. एक दिवस **वेदप्रबोध** नामक मोठा विद्वान् गौड ब्राह्मण रस्त्यानें जात होता, तो हें ऐकून,

मा विषीद वरारोहे भट्टाचार्योऽस्ति† भूतले

असें म्हणाला. तें ऐकून, आनंदित होऊन त्यास वर बोलाऊन, त्याचा मोठा संमान करून, राणीनें आपलें सर्व दुःख प्रदर्शित केलें. नंतर **वेदप्रबोधानें** जैन पंडितांचा वादांत पराभव करून **कुमारपालास** पुनः वैदिक धर्मांत आणलें. तें ऐकून दक्षिणेतील शांकरपीठाच्या मालकानें ही आपल्या शिष्यांस, "तुम्ही सर्व वादांत नास्तिकांचा पराभव करून वैदिक मताचा फैलाव करा" अशी आज्ञा केली. त्यापैकीं **मध्व** नामक शिष्यानें जुन्या मताचा फैलाव केल्यापेक्षां, नवाच संप्रदाय सुरू केला तर आपलें नांव यावच्चंद्रदिवाकर या लोकांत राहील, असा विचार करून, शांकरमताचें खंडन करून उडुपीप्रभृ

सुपुण्ये विरजातीरे वटमूले मनोहरे
पुरतो राधिकायाश्च ब्रह्माणं कमलोद्भवं ३६
तमुवाच महाभक्तं स्तुवंतं प्रणतं सुतं
पंचरात्रमिदं पुण्यं श्रुत्वा च जगतां विधिः ३७
प्रणम्य राधिकां कृष्णं प्रययौ शिवमंदिरं ३८
सर्वं तं कथयामास पंचरात्रादिकं शुभं ४०

शंभुश्च कथयामास स्वशिष्यं नारदं मुनिं
नारदः कथयामास पुष्करे सूर्यपर्वणि ४२
मां भक्तमनुरक्तं च पुण्याहे मुनिसंसदि ४३
रात्रं च ज्ञानवचनं ज्ञानं पंचविधं स्मृतं
तेनेदं पंचरात्रं च प्रवदंति मनीषिणः ४४

पंचरात्रं सप्तविधं ज्ञानिनां ज्ञानदं परं ५६
ब्राह्मं शैवं च कौमारं वासिष्ठं कापिलं परं
गौतमीयं नारदीयमिदं सप्तविधं स्मृतं ५७

सर्वस्वं वैष्णवानां च प्रियं प्राणाधिकं सुत ६०
सारभूतं च सर्वेषां वेदानां परमाद्भुतं
नारदीयं पंचरात्रं पुराणेषु सुदुर्लभं ६१

अर्थ—पूर्वी गोलोकामध्यें शतशृंग नामक पर्वतावर विरजानदीच्या तटावरील एका मनोहर वटवृक्षाखालीं राधेच्या प्रत्यक्ष, हें पवित्र पंचरात्र कृष्णानें ब्रह्मदेवास सांगितलें. तेंच ब्रह्मदेवानें शिवाच्या घरीं जाऊन शिवास सांगितलें. ३५. ३६. ३७. ३८. ४०.

तेंच शिवानें नारदास सांगितलें; पुष्करतीर्थांत एकेसमयीं सूर्यग्रहणाच्या वेळेस नारदानें मला (व्यासाला) सांगितलें. "रात्र" म्हणजे ज्ञान. ज्ञान पांच प्रकारचें आहे. तें सविस्तर यांत निरूपण केलें आहे. म्हणून यास पंचरात्र म्हणतात. ४२. ४३. ४४.

ब्राह्म, शैव, कौमार, वासिष्ठ, कापिल, गौतमीय आणि नारदीय; मिळून एकंदर पंचरात्रें सात. ५६.५७.

हें पंचरात्र वैष्णवांचें सर्वस्व होय; व हें सर्व वेदांचें सार होय; याचा पुराणांत ही लाभ होणें नाहीं. ६०.६१.

हे उतारे नारदपंचरात्राच्या पहिल्या अध्यायांतून घेतले आहेत. यांत वैष्णवांचें पूजादि प्रकरण सविस्तर निरूपण केलें आहे.

* "किं"—काय. "करोमि"—करूं. "क्व"—कोठें. "गच्छामि"—जाऊं. "कः"—कोण. "वेदान्" —वेदांला. "उद्धरिष्यति" उद्धारील.

† "मा विषीद"—तूं दुःखी होऊं नको. "वरारोहे"—हे सुंदरि. "भट्टाचार्योऽस्ति"—भट्टाचार्य जीवंत आहे. "भूतले" पृथ्वीवर.

नामक ग्रामांत आपली गादी स्थापन केली.*

याचें मत असें आहे कीं **स्वतंत्र** व **अस्वतंत्र** हे तत्त्वाचे दोन भेद. तत्त्वविवेकांत ही श्लोक आहे कीं—

स्वतंत्रमस्वतंत्रं च द्विविधं तत्त्वमिष्यते
स्वतंत्रो भगवान् विष्णुर्निर्दोषोऽशेषसद्गुणः

अर्थ—**स्वतंत्र** व **अस्वतंत्र** हे तत्त्वाचे दोन प्रकार. एक भगवान् विष्णु मात्र स्वतंत्र; तो दोषांच्या पलीकडेस असून, सर्व सद्गुणांनीं अलंकृत आहे.

आतां "सर्व भेद ज्यांतून गलित झाले, असें जें ब्रह्म तेंच एक तत्त्व," असें जे कित्येक म्हणतात, त्यांस आम्हीं असें विचारितों कीं तुमच्या अभेदवादास प्रमाण काय? तत्त्वमसीत्यादि वेदांतवचनें त्यास प्रमाण मानतां येत नाहींत; कां कीं भेद प्रत्यक्षप्रमाणानें सिद्ध होतो. हें नील, हें पीत, हें सर्व आपण प्रत्यक्ष पाहतों. प्रत्यक्षप्रमाणाच्या विरुद्ध उपदेश **आगम** कधींहि करणार नाहीं; कारण आगम स्वतः सिद्ध व निर्दोष असा आहे. अनुमानानें ही भेदवादाची सिद्धि होये. जीव परमेश्वरापासून भिन्न आहे; कारण परमेश्वर जीवास सेव्य होय. सेव्य सेवकापासून भिन्न असतो. राजा व त्याचा चाकर हे एकमेकांपासून भिन्न असतात, हें सुप्रसिद्ध आहे. जीवानें परमेश्वराच्या ऐश्वर्याचा अभिलाष केल्यास, सर्व अनर्थ त्याच्यावर येऊन पडतील; व चाकराप्रमाणें त्याची **सेवा** केल्यास परमेश्वर संतुष्ट होऊन जीवास पुष्कळ ऐश्वर्य देईल. लोकप्रसिद्धि ही आहे, कीं—

घातयंति हि राजानो राजाऽहमिति वादिनः
ददत्यखिलमिष्टं च स्वगुणोत्कर्षवादिनां

अर्थ— मी राजा असें जो, आपण राजा नसतां, लोकांस सांगत फिरतो, त्यास राजे लोक दंड करितात; व जो त्यांच्या गुणांचें व पराक्रमाचें वर्णन करितो, त्याच्या सर्व कामना पूर्ण करितात.

ही **सेवा** तीन प्रकारची आहे; **अंकन, नामकरण,** आणि **भजन. अंकन** म्हणजे विष्णूचें पुनः पुनः स्मरण होण्यासाठीं व आपल्या कामना पूर्ण होण्यासाठीं, **शंखादिक** आयुधांचे शरीरावर छाप मारून घेणें. **शाकल्यसंहितापरिशिष्टांत** ही श्लोक आहे, कीं—

उरुक्रमस्य चिन्हैरंकिता लोके सुभगा भवामः

अर्थ—विष्णूच्या आयुधांच्या चिन्हांचे छापे आमच्या शरीरावर मारून घेतल्यास आम्हीं इहलोकीं पवित्र होऊन जातों.

आग्नेयपुराणांत स्थानविशेषाचें ही स्पष्टीकरण असें केलें आहे, कीं—

दक्षिणे तु करे विप्रो बिभृयाद्वै सुदर्शनं
सव्येन शंखं बिभृयादिति ब्रह्मविदो विदुः

अर्थ—ब्राह्मणानें आपल्या दक्षिण हस्तावर **सुदर्शनाख्य** चक्राचा व सव्य हस्तावर **पांचजन्याख्य** शंखाचा छाप मारून घ्यावा, असें ब्रह्मवेत्ते म्हणतात.

नित्य विष्णूचें नाम स्मरण व्हावें, एतदर्थ आपल्या पुत्रादिकांचीं केशवादिक वैष्णवच नामें ठेवणें यास **नामकरण** म्हणतात. **भजन** म्हणजे प्रत्येक कर्म केल्यानंतर लागलेंच विष्णूला समर्पण करणें. **सत्य, हित, प्रिय, स्वाध्याय, दान, परित्राण, परिरक्षण, दया, स्पृहा, श्रद्धा,** हे **भजनाचे** दहा भेद.

"सत्यं भिदा* सत्यं भिदा" ही श्रुति ही

* हें संप्रदायप्रदीपावरून घेतलें आहे. संप्रदायप्रदीप हा ग्रंथ कोणी वल्लभमतवाल्यानें रचला आहे. कुमारपाल राजाच्या अभिषेकास हल्लीं जवळ जवळ साडेसातशें वर्षें होत आलीं आहेत.

* "सत्यं"— प्रमाणसिद्ध. "भिदा"— भेद, भेदवाद; अर्थात् जीवात्मा परमात्म्यापासून भिन्न आहे हा.

जीवब्रह्माचा भेद स्पष्ट करित्ये. या प्रमाणें भेदच तत्त्व होय, असें प्रमाणत्रयानें सिद्ध होतें. आतां ज्या श्रुति वेदांत्यांस अभेदपर भासतात, त्यांचें विवरण करूं या.

"ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति" या श्रुतीचा अर्थ, "संपूज्य ब्राह्मणं भक्त्या शूद्रोऽपि ब्राह्मणो भवेत्" याच्या अर्थाप्रमाणें करावा. "ब्राह्मणाची भक्तिपुरःसर पूजा केल्यास शूद्र ब्राह्मण होतो," या वाक्याच्या बलानें ज्या प्रमाणें शूद्राचें शूद्रस्वरूप जाऊन त्याच्यावर ब्राह्मणस्वरूप येऊन झेंप घालीत नाहीं, अर्थात ही प्रशंसा होय, त्याच प्रमाणें ब्रह्म जाणल्यानें मनुष्य ब्रह्मच होऊन जातो, असें कधींही समजूं नये; तर ही फक्त ब्रह्मज्ञानाची प्रशंसा होय. "प्रपंचो यदि वर्तेत निवर्तेत न संशयः। मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः" याचा खरा अर्थ हा कीं, "जर प्रपंच उत्पन्न झाला असेल, तर त्याची निवृत्ति होणार; पण हा प्रपंच मुळींच उत्पन्न झालेला ह्मणजे सादि नव्हे; अर्थात अनादि होय; हा "अविद्यमान" असें आपण ह्मणूं शकत नाहीं; कारण हा "मायामात्र" आहे; "माया" ह्मणजे महामायेत्यविद्येति या श्लोकावरून परमेश्वराची इच्छा, ती आहे "मात्र" ह्मणजे मान व त्राण करणारी, अर्थात सर्वांशतः जाणणारी व रक्षण करणारी, ज्याला; तें "मायामात्र;" अर्थात ज्यापक्षीं परमेश्वर भ्रांत नव्हे, त्यापक्षीं त्याच्या इच्छेनें ज्ञात व त्रात केलेला हा द्वैतप्रपंच ही भ्रांत ह्मणजे मिथ्या नव्हे; आतां अद्वैतवादाची गति काय? तर ह्मणतात कीं, "अद्वैतं परमार्थतः;" परमाश्रुतीचा अर्थ मनांत घेऊन, "अद्वैत" ह्मणजे ज्याच्या सदृश अथवा ज्याच्याहून वरचढ कोणी नाहीं, असा विष्णु आहे;" हा याचा खरा अर्थ. परमा श्रुति ही कीं—

जीवेश्वरभिदा चैव जडेश्वरभिदा तथा
जीवभेदो मिथश्चैव जडजीवभिदा तथा
मिथश्च जडभेदो यः प्रपंचो भेदपंचकः
सोऽयं सत्योपनादिश्च सादिश्चेन्नाशमाप्नुयात्
न च नाशं प्रयात्येष न चासौ भ्रांतिकल्पितः
कल्पितश्चेन्निवर्तेत न चासौ विनिवर्तते
द्वैतं न विद्यत इति तस्मादज्ञानिनां मतं
मतं हि ज्ञानिनामेतन्मितं त्रातं हि विष्णुना
तस्मान्मात्रमिति प्रोक्तं परमो हरिरेव तु

अर्थ— "जीव ईश्वराहून भिन्न आहेत; जड जगत् ईश्वराहून भिन्न आहे; जीव एकमेकापासून भिन्न आहेत; जड जगत् जीवांहून भिन्न आहे; जड (भौतिक) पदार्थ एकमेकापासून भिन्न आहेत; या भेदपंचकानें युक्त असा हा सर्व प्रपंच सत्य व अनादि आहे. सादि असता, तर नाश पावला असता; पण हा नाश पावत नाहीं. हा भ्रांतिकल्पित ही नव्हे; भ्रांतिकल्पित असता, तर निवृत्ति झाली असती; पण याची निवृत्ति होत नाहीं. यासाठीं द्वैत नाहीं असें ह्मणणारे लोक मूर्ख होत. पंडित लोक तर, हें सर्व विष्णुनें "मित" व "त्रात" ह्मणजे "ज्ञात" व "रक्षित" आहे, ह्मणून यास मात्र ह्मणतात. विष्णु हाच सर्वांत "परम" ह्मणजे उत्तम होय". या परमाश्रुतीच्या आधारानें "परमार्थतः" हें पद विवृत करावयाचें. "तत्त्वमसि" या श्रुतिविषयीं ही असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं—

आह नित्यपरोक्षं तु तच्छब्दो ह्यविशेषितः
त्वंशब्दश्चापरोक्षार्थं तयोरैक्यं कथं भवेत्
आदित्यो यूप इतिवत् साहश्यार्था तु सा श्रुतिः

अर्थ—"तत्त्वमसि" या श्रुतींत "तत्" शब्द नित्य परोक्ष अशा वस्तूचें अभिधान करितो. "त्वं" शब्द तर नित्य प्रत्यक्ष अशा वस्तूचें अभिधान करितो. तेव्हां दोघांचें ऐक्य होईल कसें? यासाठीं ज्याप्रमाणें 'आदित्यो यूपः' या श्रुतीचा अर्थ करतात, त्याप्रमाणेंच "त-

त्वमसि" या श्रुतीचा ही अर्थ करावा. यानें ही जर वादीचा संतोष होत नाहीं तर—

अतत्त्वमिति वा च्छेदस्तेनैक्यं सूनिराकृतं

अर्थ—"अतत्" असेंच पद पाडावें; ह्मणजे तूं तें ब्रह्म नव्हेस, अर्थात तूं त्याहून भिन्न आहेस, असा अर्थ लागलाच उघड होतो. अर्थात अपौरुषेय श्रुति अभेदवादास कोणत्याही प्रकारानें घरांत शिरूं देत नाहीं, हे सर्व अवलोकन करितांच वाचकांच्या नजरेस येईल.

आतां सर्वांत उत्तम असा जो विष्णू त्याचें आराधन केलें असतां, मनुष्य परमपदास पावतो; व त्याचा द्वेष केल्यास घोर नरकांत जाऊन पडतो; हें सर्व **महोपनिषदांत** विस्तारानें सांगितलें आहे. यासाठीं भेदज्ञानपूर्वक सर्वोत्तम विष्णूचें आराधन करून सर्व लोकांनीं परमपदाची प्राप्ति करून घ्यावी.

मध्व हा वायूचा अवतार असें तत्पंथी लोक समजतात. एतत्संप्रदायीय लोक काळा एकरेखामय उर्ध्व तिलक लावतात; यांचे गुरू चतुर्थाश्रमी असतात; व ते अश्वादिकांवर बसून आपल्या शिष्यांपासून द्रव्य मिळविण्याच्या हेतूनें दूर दूर प्रवास करितात. यांची एकादशी मोठी कडक असल्ये. मुलांबाळांवर सुद्धां तिचा जबरदस्त अंमल असतो इतकेंच नव्हे, तर अग्निहोत्राचा बिचारा अग्निही तिच्या कचाट्यांत सांपडतो. हे लोक जैनांप्रमाणें जबरदस्त अहिंसावादी आहेत. "अग्नीषोमीयं पशुमालभेत" या श्रुतीचा अर्थ जीवंत बोकड मारावा असा नव्हे; कारण अपौरुषेय व निर्दोष श्रुति, अनेक दोषांनीं दुष्ट अशी जी हिंसा, तिचें कधींहि उपपादन करणार नाहीं; यासाठीं पिठाचा पशु करून तोच यज्ञांत मारावा, असें हे ह्मणतात. यांस **वीरवैष्णव** असेंही ह्मणतात. हे परसंप्रदायीयांचा अत्यंत द्वेष करितात. यामध्यें **राधावल्लभ** या नांवाचा एक नवीन संप्रदाय हल्लीं निघाला आहे.

असो. आतां **वल्लभदर्शन** वाचकांस पुढच्या खेपेस सादर करूं.

तर्कसंग्रह.

उपोद्घात.

—ooo—

तर्कशास्त्र हें लोकप्रसिद्ध प्राचीन सहा शास्त्रांपैकीं एक आहे. हें बहुधा न्यायशास्त्र ह्या नांवानें लोकांत मोडतें. हीं दोनही शास्त्रें पदार्थांचे यथायोग्य विवेकापासूनच मोक्ष (याच्या तथ्यार्थ ज्ञानासाठीं आमच्या सर्व शास्त्रांचा इतका खटाटोप चालत आला आहे) प्राप्त होतो असें मानितात. दोहोंनाही युक्तीनें साधलेले सिद्धान्त मान्य आहेत. दोन्हीही प्रमाणाचेंच योगानें यथार्थज्ञान होतें असें मानितात. आणि दोहोंसही वेदवाक्यें सिद्धान्तानें खरीं ठरतात ह्मणून प्रमाणें आहेत. परंतु तीं दोनही परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत. त्यांचे शास्त्रोत्यापक मुनि दोन निरनिराळे आहेत. न्यायशास्त्राचा उत्थापक गौतम मुनि; आणि तर्कशास्त्राचा कणादमुनि. त्यांतील मतें ही भिन्नभिन्न आहेत. न्यायशास्त्र षोडश पदार्थवादी आहे; आणि तर्कशास्त्र सप्तपदार्थवादी आहे. तर्कशास्त्र विशेष ह्मणून एक स्वतंत्र पदार्थ मानितें; हें मत ह्यांचें इतकें विलक्षण आहे कीं ह्या मतांत हें शास्त्र दुसरे कोणतेच शास्त्राशीं मिळत नाहीं.

तरी ही त्यांची भिन्नतेपेक्षां एकताच विशेष आहे. प्राचीन ग्रन्थकारांपैकीं कांहीं, आणि

अर्वाचीन ग्रन्थकारांपैकीं सगळेच ग्रन्थकार न्यायशास्त्र आणि तर्कशास्त्र ह्यांमध्ये भेद राखीत. तर्कशास्त्रास ही न्यायशास्त्र असें कधीं-कधीं ह्मणतात. षोडशपदार्थवाद आणि सप्तपदार्थवाद, ही जी त्यांची मुख्य खूण तिचा देखील भेद ठेवीत नाहींत. एका शास्त्रांतील मतांनीं आरंभ करून युक्तीस पडेल त्याप्रमाणें मध्ये दोहोंपैकीं पाहिजे त्या शास्त्रांतील मतें घेतात. तर्कशास्त्रांतील सप्तपदार्थवादानें आरंभ करून, बाकी सर्व किंवा पाहिजे तितकीं मतें न्यायशास्त्रांतून घेतात; किंवा न्यायशास्त्रांतील षोडशपदार्थवादानें आरंभ करून बाकी सर्व, किंवा पाहिजे तितकीं मतें, तर्कशास्त्रांतून घेतांत. फार लांब जावयास नको. हा आपण हातांत घेतलेला ग्रंथ तर्कशास्त्रापैकीं आहे असें जरी त्याच्या नांवावरूनच दिसतें; तरी ह्यांत न्यायशास्त्राचीं मतें घेतलीं आहेत. असें ग्रन्थकर्ता आपणच ह्याचे शेवटीं सांगतो.

वर दर्शविलें आहे कीं न्यायशास्त्राचा उत्थापक गौतममुनि; आणि तर्कशास्त्राचा कणादमुनि. हे दोघे ह्या शास्त्रांतील सूत्रकार होत. त्यानंतर वात्स्यायन मुनीनें गौतमसूत्रांवर भाष्य केलें. कणादसूत्रावरचें भाष्य आढळांत येत नाहीं. बहुतकरून त्यांवर भाष्य नसावें असें दिसतें. कदाचित् असल्यास तें फार अप्रसिद्ध असलें पाहिजे. त्याचा अभ्यास तर करीत नाहींतच. उदयनाचार्यानें ह्या दोन शास्त्रांचें एकत्र संमेलन केलें. तरी ह्याचा तर्कशास्त्राकडे झोंक विशेष होता. हा सप्तपदार्थवादी होता. ह्या दोनही शास्त्रांचा संमेलनकर्ता हाच प्रथम असावा असें वाटतें. ह्या नंतर चिंतामणिभट्टाचार्य, शिरोमणिभट्टाचार्य जगदीश, आणि मथुरानाथ, असे मोठमोठे चार पांच प्राचीन ग्रंथकार प्रसिद्ध आहेत. चिंतामणिभट्टाचार्यानें उदयनाचार्याचा ग्रंथ फार विस्तृत असल्यामुळें अध्ययन करण्यास निरुपयोगी असें पाहून त्याचें सार काढिलें. शिरोमणिभट्टाचार्यानें सिद्धांतशिरोमणि नांवाचा ग्रंथ केला. त्यांत उदयनाचार्याचे ग्रंथामधून निवडक सिद्धांत मात्र घेतले आहेत. जगदीशानें जागदीशी या नांवाचा एक ग्रंथ सिद्धांतशिरोमणिवर टीकारूप केला. मथुरानाथी ही मथुरानाथानें सिद्धांत शिरोमणीवर केलेली टीकाच आहे. गदाधर, कृष्णभट्ट, विश्वनाथपंचाननभट्टाचार्य हे अर्वाचीन ग्रंथकार प्रसिद्ध आहेत. हल्लीं गदाधराचा गदाधरी नामक ग्रंथ न्यायशास्त्रांत सर्व मान्य आहे. हा ग्रंथ एक लक्ष आहे. ह्यांत न्यायशास्त्रांतील सिद्धांत घेऊन त्यांच्यावर पूर्णपणें वादविवाद करून निर्णय ही केले आहेत. ह्याच्याएवढा न्यायशास्त्रांत दुसरा मोठा व विख्यात ग्रंथच नाहीं. ह्या ग्रंथाचें सार काढून कृष्णभट्टानें कृष्णभट्टी यानांवाचा ग्रंथ रचिला. विश्वनाथपंचाननभट्टाचार्यानें ह्याच शास्त्रावर मुक्तावली नांवाचा एक संक्षिप्त ग्रंथ रचिला. त्याची संख्या पंधराशें आहे. ह्यापेक्षां लहान न्यायशास्त्रांत दुसरा ग्रंथ शिष्टमान्य नाहीं. ह्यास्तव न्यायशास्त्राचें ह्मणूनच जर अध्ययन करणें असेल तर मुक्तावलीपासून आरंभ करण्याची वहिवाट आहे.

इतका तर्कशास्त्राचा इतिहास सांगितला. आतां थोडक्यांत त्याचें साध्यसाधन सांगून हा आजचा प्रस्ताव पुरा करूं. प्रथम सामान्यतः शास्त्र ह्मणजे काय हे सांगूं. आपण जगतांतील वस्तु पाहतों, आजपर्यंत पाहिल्या अशून पुढें पाहूं; असें असूनही माझ्या जन्मघटकेचे पूर्वी मला हें सर्व जगत् कांहीं नव्हतें. आईचे उदरांतून बाहेर येतांच मला हे जगतांतील चमत्कार दिसावयास लागले. मरणोत्तर

हे पुनः नाहींसे होतील असें दिसतें. तर हें जगत् काय आहे? मी उभा असतां ज्या वस्तू माझ्या समोरून चालल्या आहेत, ह्या खऱ्या आहेत, किंवा एखाद्या जादुगाराचे खेळांतील पदार्थाप्रमाणें मिथ्या आणि क्षणभंगुर आहेत? ह्यांत तथ्यांश काय आहे? बरें, बाह्यवस्तूंविषयीं राहूंद्या; पण खाणें, पिणें, बसणें, उठणें, वगैरे, ज्यांत आमच्या आयुष्याचा बहुतेक भाग खर्च होतो, अशीं कृत्यें ज्याकरितां करितों, जो जीवंत आहे तर सर्व जगत् मज संबंधानें आहे, नाहीं तर नाहीं, असा जो मी ह्मणून एक पदार्थ आहे तो काय? मला खचित कळतें कीं मी कांहीं माझें शरीर नव्हे, शरीरापैकीं कोणताही स्पर्श, दृश्य, अवयव नव्हे. पण खचित मी शरीराचे बाहेर नाहीं. हा मी कोण आहें? जन्मण्याचे पूर्वी कोठें होतों? आणि कोणत्या स्थितींत होतों? मरणोत्तर माझें काय होईल?* इत्यादि बाह्य जगताविषयीं आणि अंतरात्म्याविषयीं विचार शांत, गंभीर, चिन्तनशील मताचे मनुष्यांस आल्यावांचून रहात नाहींत. शास्त्र ह्या प्रश्नांचीं उत्तरें देतें, निदान देण्याविषयीं यत्न तरी करितें.

आमचीं शास्त्रें ह्मणतात कीं मोक्ष ह्मणून कांहीं एक पदार्थ आहे, तो यथार्थ शोधिला असतां ह्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळतील ह्मणून मोक्ष हा आमच्या सर्व शास्त्रांचा साध्य विषय होय.

तर्कशास्त्र ह्मणतें कीं मोक्षाचें यथार्थ ज्ञान होण्याकरितां जगतांतील पदार्थांचें ज्ञान झालें पाहिजे. ह्मणून तें आपण सिद्ध केलेले सप्त पदार्थांचें परिगणन आरंभीं करितें; आणि ह्या सप्त पदार्थांत जगतांतील सर्व वस्तूंचा अन्तर्भाव होतो असें पुढें सिद्ध करून दाखवितें.

(पुढें चालेल).

*हे सर्व प्रश्न, शंकराचार्यांचे चर्पटपंजरिका नामक ग्रन्थांतील ह्या पुढील प्रसिद्ध श्लोकार्धामध्यें संक्षिप्त रीतीनें दिले आहेत. कस्त्वं को वा कुत आयातः । का तव कान्ता कस्ते पुत्रः संसारोऽयमतीव विचित्रः ॥

पुस्तकपरीक्षा.

शांकरदिग्जयनाटक.

(पूर्वी चालू.)

—०००—

आतां **अनंतानंदगिरीची** संमति घेऊन गेल्या अंकांत लिहिलेल्या मुख्य मुख्य गोष्टींविषयींच **माधवाचार्य** काय ह्मणतात तें पाहूं या.—

ततो महेशः किल केरलेषु श्रीमद्वृषाद्रौ करुणासमुद्रः
पूर्णानदीपुण्यतटे स्वयंभूलिंगात्मनाऽनंगभगाविरासीत् १
कश्चित् तदभ्याशगतोऽग्रहारः कालव्यभिख्योस्ति महान् मनोज्ञः ३
कश्चिद्विपश्चिदिह निश्चलधीर्विरेजे
विद्याधिराज इति विश्रुतनामधेयः
रुद्रो वृषाद्रिनिलयोऽवतरीतुकामो
यत्पुत्रमात्मपितरं समरोचयत् सः ४ [ख्यः ५
पुत्रोऽभवत् तस्य पुराऽऽत्तपुण्यैः सुब्रह्मतेजाः शिवगुर्वभिविद्याधिराजमघपंडितनामधेयौ
संप्रत्ययं व्यतनुतामभिपूज्य दैवं ३३
खिद्यन्मनाः शिवगुरुः कृतकार्यशेषो
जायामचष्ट सुभगे किमतः परं नौ
सांगं वयोऽर्द्धमगमत् कुलजे न दृष्टं
पुत्राननं यदिह लोक्यमुदाहरंति ४३
इतीरिते प्राह तदीयभार्या शिवाख्यकल्पद्रुममाश्रयावः ४६
तस्योपयाम किल संनिहिताऽऽपगैका
स्नात्वा सदाशिवमुपास्त जले स तस्याः ४९
तस्मिन् दिने शिवगुरोरुपभोक्ष्यमाणे
भक्ते प्रविष्टमभवत् किल शैवतेजः
भुक्तान्नविप्रवचनादुपभुक्तशेषं
सोऽभुंक्त सापि निजभर्तृपदाब्जभृंगी ५६
गर्भं दधार शिवगर्भमसौ मृगाक्षी ५७
द्वितीय सर्गः

किं केन संगतमिदं सति मा विचारी-
र्यो वैदिकीं सरणिमग्रहतां पुरस्तात्

प्रातिष्ठिपत् सुगतदुर्जयनिर्जयेन
शिष्यं यमेनमशिषत् स च भट्टपादः ॥३६॥
तृतीय सर्गः

सर्वासु शास्त्रसरणीषु स विश्वरूपो
मत्तोऽधिकः प्रियतरश्च मदाश्रयेषु ॥१७॥
सप्तमः सर्गः

अथ प्रतस्थे भगवान् प्रयागात् तं मंडनं पंडितमाशु जेतुं
गच्छन् खसृत्या पुरमालुलोके माहिष्मतीं मंडनमंडितां सः १
अवातरद्रत्नविचित्रवप्रां विलोक्य तां विस्मितमानसोऽसौ २
प्रफुल्लराजीवने विहारी तरंगरिंगत्कणशीकरार्द्रः
रेवामरुत् कंपितसालमालः श्रमापहद् भाष्यकृतं सिषेवे ३
रेवातटे रम्यकदंबसाले देवालयेऽवस्थितवांस्तृतीयः ५४
ततः समादिश्य सदस्यतायां सर्वासमीणां मंडनपंडितोऽपि
स शारदां नाम समस्तविद्याविशारदां वादसमुत्सुकोऽभूत५८
अष्टमः सर्गः

अर्थ—नंतर मदनास जाळणारा व करुणेचा सागर असा जो **सदाशिव** तो स्वयंभूलिंगात्मक बनून केरल देशांत वृषपर्वतावर पूर्णानदीच्या किनाऱ्यावर प्रकट झाला. १

त्या नदीच्या जवळच **कालटी** नांवाचा मोठा व मनोज्ञ असा एक **अग्रहार** होता.३

वृष पर्वतावरील **सदाशिवास**, ज्या भाग्यशाली पुरुषाच्या पुत्रास आत्मपितृत्वाचा मोठा मान देणें, प्रशस्त वाटलें, असा जो **विद्याधिराज** नांवाचा महापंडित तो या **कालटी** नांवाच्या **अग्रहारांत** रहात असे.४

जन्मांतरीं संचित केलेल्या पुण्याच्या प्रभवानें, मोठा तेजस्वी असा त्यास एक मुलगा झाला; त्याचें नांव **शिवगुरु**. ५

(तो सांग वेदाचें अध्ययन करून गुरुकुलाहून परत आल्यानंतर), त्यास **मधपंडित** नामक विद्वान् ब्राह्मणानें, **विद्याधिराजाचें** अनुमत घेऊन, सुमुहूर्तावर गणेशादिकांची पूजा करून, आपली कन्या वागुदत्त केली. ३३

(विवाह झाल्यानंतर बरींच वर्षें गेलीं तरी आपणास पुत्र होत नाहीं हें पाहून), खिन्न होऊन, नित्यादिक कर्मे आटपून, एकेदिवशीं **शिवगुरु** आपल्या बायकोस ह्मणाला, कीं हे सुभगे आपलें अर्धें आयुष्य सरून आपणावर म्हातारपणाची छाया पडूं लागली, तरी ज्याच्या सकृद्दर्शनीं उभयलोक प्राप्त होतात, असें जें पुत्रमुखकमल तें अद्यापि आपणास पहावयास मिळालें नाहीं; तर आतां करावें तरी काय. ४३

हें ऐकून त्याची बायको ह्मणाली, कीं आपण **शिवरूपी** कल्पवृक्षाचा आश्रय करूं या; (ह्मणजे आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील.) ४६

तें ऐकून **शिवगुरु** आनंदित झाला; व फार चांगलें असें बोलून वराजवळच एक नदी (वृषपर्वतावरील पूर्णा नदी) होती, तींत स्नान करून तिच्या जवळच वास करणाऱ्या **सदाशिवाची** (वृषपर्वतावरील स्वयंभू लिंगाची) प्रथमतीं पूजा करूं लागला. ४९

(एक रात्रीं **सदाशिवानें** स्वप्नांत येऊन **शिवगुरूस** सांगितलें कीं जा, स्वस्थ रहा, कांहीं भिऊं नको, तुला मोठा गुणवान् असा एक पुत्र होईल); नंतर दुसऱ्या दिवशीं **शिवगुरूच्या** स्वयंपाकगृहांत सिद्ध झालेल्या अन्नांत **शिवाच्या तेजानें** प्रवेश केला. नंतर अतिथिपूजनादिक उरकून **शिवगुरुनें** तें शिवतेजोगर्भित अन्न भोजन केलें; त्याच्या मागून त्याच्याच पदकमलांजवळ भ्रमरीप्रमाणें आचरण करणारी जी त्याची बायको तिणें ही तें तदुच्छिष्ट भोजन केलें. ५६

त्या शिवतेजोगर्भित अन्नाच्या प्रभावानें, तिनें शिवावताररूपी गर्भ धारण केला. ५७

दुसरा सर्ग.

आतां ही तुलना बरोबर झाली नाहीं असें तूं ह्मणशील, तर त्यांत फारसें हांशील दिसत

नाहीं. कारण ज्यानें मोठ्या मोठ्या बौद्धाचार्यांचा पराजय करून, अत्यंत श्रम घेऊन, वैदिकमार्गाचा उद्धार केला, असा जो भट्टपाद त्याचाच हा साक्षात् शिष्य; (यासाठीं हां जांवई आपणास सर्वथैव अनुरूप आहे, असें मला वाटतें.) ३६

तिसरा सर्ग.

सर्व शास्त्रांमध्यें तो विश्वरूप (मंडनमिश्र) माझ्यापेक्षांही निपुण आहे; व माझ्या शिष्यांमध्यें तोच मला फार प्रिय आहे. १७

सातवा सर्ग

नंतर मंडनास जिंकण्यासाठीं, प्रयागाहून आचार्य आकाशमार्गानें निघाले. थोड्याच वेळानें जींत मंडनमिश्र रहात असे अशी जी माहिष्मती नामक नगरी ती आचार्यांच्या नजरेस पडली. १

तिचा रत्नानीं चित्रविचित्रित केलेला कोट पाहून, विस्मित होत्साते आचार्य खालीं उतरले. २

तेथें विकसित झालेल्या कमलांच्या वनांत संचार करणारा, लाटांचे तुषार आंत उडत असल्यामुळे अत्यंत शीतल, आणि अनेक वृक्षांस कंपित करून वहाणारा, असा नर्मदेच्या तीरावरील वारा आचार्यांचा थाक नाहींसा करिता झाला. ३

आसपास लावलेल्या कदंववृक्षांनीं सुशोभित झालेलें असें जें नर्मदेच्या तीरावरील देवालय त्यांत आचार्य परत आले. ५४

नंतर सर्व विद्यांत निपुण अशी जी सरस्वती नामक स्वताची पत्नी तीस मध्यस्थ नेमून वाद करावयाचा, असा मंडनमिश्रानें इरादा केला.

आठवा सर्ग.

या उताऱ्यांचें परिशीलन करितांच, आचार्यांच्या स्थूल इतिवृत्ताचेच ज्ञान होणें किती अशक्य आहे, हें सुज्ञ वाचणाऱ्यांच्या ध्यानांत येईल. यासाठीं जर किर्लोसकर यांची आचार्यांचा खरा इतिहासच लोकांस समजावा अशी खरोखर इच्छा होती, तर हें सर्व यथालब्ध इतिवृत्त यथाशक्ति एकत्र मिळवून, त्याच्या प्रत्येक भागाच्या परीक्षापूर्वक तद्विचारात्मक एक गद्यमयच ग्रंथ रचला असता तर फार चांगलें झालें असतें, असें आह्मांस वाटतें.

नाटकें करण्याचा उद्देश ह्मटला ह्मणजे मनोवृत्ति आनंदमय करून टाकणें हाच होय. यासाठीं जसजशी गरज लागेल तसतशीं नवीं पात्रें नाटककार कवि कल्पितात व अनेक स्थलीं प्रसिद्ध गोष्टींचें अन्यथा उपनिबंधन करितात. हें संस्कृतांत तर सर्वत्र सुप्रसिद्ध आहे. धनंजयानें ही ह्मटलें आहे कीं—

आनंदनिष्यंदिषु रूपकेषु
व्युत्पत्तिमात्रं फलमल्पबुद्धिः
योपीतिहासादिवदाह साधु—
स्तस्मै नमः स्वादुपराङ्मुखाय ॥५॥ प्र०१०

अर्थ— आनंदानें मनोवृत्ति आर्द्र करून टाकणारीं अशीं जीं नाटक, प्रकरण, इत्यादि रूपकें, तीं एकाद्या इतिहासाच्या ग्रंथाप्रमाणें व्युत्पत्तिमात्र दृढ करितात असें ह्मणून जो मधुर मधुर गोष्टींपासून आपलें वैमुख्य उघड करणारा कोणी महापंडित असेल, त्यास आह्मीं दुरूनच नमस्कार करितों.

हें सर्व "क्रीडतां मृन्मयैर्बालैः" इत्यादि श्लोकानीं धनंजयानेंच पुढें सोपपत्तिक विस्तृत ही केलें आहे. तशांत नाटक हें गद्यपद्यात्मक काव्य होय. काव्यादर्शात ही ह्मटलें आहे कीं—

मिश्राणि नाटकादीनि तेषामन्यत्र विस्तरः ॥२१॥ प्र०१०

अर्थ—नाटकप्रभृति जीं रूपकें व उपरूपकें हीं मिश्र ह्मणजे गद्यपद्यात्मक असतात, व त्यांचें नाटकीय ग्रंथांत सविस्तर निरूपण केलें आहे.

पद्यें प्रसादादिक गुणानीं युक्त व क्लिष्टार्थत्वादिक दोषांनीं विरहित असावीं अशीं काव्यप्रकाशकारादिकांचीं अनेक वचनें जागरूक आहेतच. असें असतां, प्रस्तावनेतच—

आतां ह्या ग्रंथाचें नाटकरूपानें वर्णन करण्याचें हेंच मुख्य कारण आहे कीं तशा प्रकारच्या वर्णनांत शृंगारादि रस येतात, त्यामुळें अनेक जनांस त्याची गोडी लागून त्यांतील मुख्य जो आचार्यांचा इतिहास तोही प्रसिद्धीस येईल."

हा एक व—

"नाटक हें गद्यपद्यात्मक असणें योग्य आहे परंतु हा ग्रंथ वाक्यरूपानें करण्याचें कारण हेंच कीं पद्यें हीं कवीच्या वक्रदृष्टीमुळें आणि दूरान्वयामुळें केव्हां केव्हां फार कठिन होतात याकरितां त्यांतील अर्थ सर्वांस समजणार नाहीं व कथा विच्छेद होईल."

असा दुसरा शेरा मारणारे किर्लोसकरच चौथ्या पानावर—

"भरतशास्त्रास फार चुकूं न देतां"

अशी मोठी आढ्यता मिरवितात ती पाहून आह्मांस मोठेंच नवल वाटतें.

आचार्यांचा इतिहास तर नाटकास योग्य विषय नव्हे. कारण तो शांतरसप्रधान आहे; व धनंजयानें तर असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं,—

शममपि केचित् प्राहुः पुष्टिर्नैतस्य नाट्येषु॥४०॥दृ० प०

अर्थ—शम हा नववा स्थायीभाव असें कित्येक ह्मणतात खरें; तरी त्याचा परिपोष नाटकांत होत नाहीं. अर्थात शांतरसाचा नाटकांत मुळींच उपयोग नाहीं; तर सहृदयहृदयानंदी व नाटकोपयोगी रस ह्मणून कायते आठच. हें कालिदासानें ही स्पष्ट सांगितलें आहे. ही किर्लोसकर यांनीं गृहीत केलेल्या वस्तूची अवस्था. अर्थात् किर्लोसकर यांचे नाटक रचण्याचे उद्देश कोणत्याहीप्रकारें तडीस गेले नाहींत इतकेंच नाहीं, तर नाटकाचा खरा उद्देश अन्यथा झाल्यामुळें, त्यांच्या हातून नाटकास योग्य असा विषय देखील शोधून काढणें झालें नाहीं, असें ह्मणणें आह्मांस भाग पडतें.

(पुढें चालेल.)

ठगाची जवानी.

खण्ड ५वें.

(पुढें चालू.)

—000—

"आंगीं कांहीं सामर्थ्य नसतां माझा बाप उगीच मोठमोठ्या भेवडावण्याच्या गोष्टी सांगूं लागला ह्मणून ब्रिजलाल पोट धरधरून हंसला आणि पुनः तेथून निघून गेला.

"ह्याप्रमाणें एक सारिखे तीन महिने पर्यंत आह्मी त्या कारागृहांत दिवस काढिले. शेवटीं पहाऱ्यावरील एका शिपायाला माझ्या बापानें कांहीं बक्षीस देण्याचें कबूल केल्या वरून, व त्याला आह्मांवर जो जुलूम चालला होता तो पाहून दयाही आली होती खरीच—तो वळला; आणि माझ्या बापाच्या ओळखीचा एक सावकार नागपुरांत राहत असून आमच्या गांवच्या जमाबंदीच्या वसुलाचें वगैरे काम करीत होता त्याजकडे, माझ्या बापानें एक अर्ज लिहून तयार केला होता तो नेऊन देण्याचें त्यानें पतकरिलें.

"आमच्या स्थितीचें वर्तमान ऐकून त्या सावकारास विलक्षण चमत्कार वाटला; व आमची सुटका होण्याविषयीं त्यानें लागलीच खटपट चालविली. पण ती गोष्ट कांहीं

सोपी नव्हती. ब्रिजलाल मुख्य दिवाणाच्या कानाशीं लागणारा होता; ह्यामुळें आमचा मित्र आह्मांसाठीं जो जो यत्न करी तो तो निष्फळ होई. अखेरीस त्यानें आमचें प्रकरण नागपुरच्या नगरशेटास कळविलें. तो गृहस्थ शहरांतील सर्व सावकारांत श्रेष्ठ असल्यामुळें दरबारांत ही त्याचें वजन भारी असे. तो मुद्दाम आह्मां करितां स्वत: आपण दिवाणाकडे गेला. नंतर लागलीच आह्मास समजूत मिळाली कीं 'उद्यां तुह्मास दरबारांत नेलें जाईल व तुह्मांवर जो आरोप आहे त्याज बद्दल तुमचें ह्मणणें काय आहे तें ऐकिलें जाईल.' त्याप्रमाणें दुसऱ्या दिवसीं नेमल्या वेळीं आह्मास पेषकारांच्या घरीं नेलें. त्यांज पुढें चालणाऱ्या कज्जांची चौकशी ते आपल्या घरींच करीत असत. त्यांचें नांव नारायणराव पंडित.

"नारायणराव पंडित त्या वेळीं वयानें तर लहानच होते; पण त्यांजविषयीं सर्वांच्या मनांत मोठी पूज्य बुद्धि असे. ते मोठे न्यायी आहेत; व शांतपणानें दोन्ही पक्षांकडील तक्रारी ऐकून घेतल्या वांचून कधीं ही फैसला करित नाहींत अशी त्यांची सर्वत्र कीर्ति होती. परंतु आमचा हाडवैरी ब्रिजलाल त्यांच्या मोठया भ. रंवशांतील असामी; आणि हा तर बेटा पक्का मुत्सदी. वर दर्शनीं असला भलेपणा दाखवी व सदाचरणाचें इतकें उत्कृष्ट सोंग आणि कीं तेणें करून त्याचा जुलूम कधीं बाहेर पडतच नसे."

"ब्रिजलालानें माझ्या बापावर फिर्याद दिली. त्यानें असें जाहीर केलें कीं कोणी मातबर सावकार पोटीं पुत्र नसतां मरण पावल्यास त्याच्या मालमिळकतीचा हिशेब सरकारांत दिला पाहिजे असा ह्या राज्यांतील कायदा आहे. जयसुखदासशेट मोठा श्रीमान होता हें प्रसिद्ध आहे; त्याजला दोन तीन मुली आहेत पण मुलगा नाहीं; ह्मणून सरकारांत हिशेब वगैरे होण्यापूर्वी त्याच्या जिंदगी पैकीं एका पैशास देखील हात लावण्याचा ह्या माणसास अधिकार नव्हता. त्यानें आणखीं असें जाहीर केलें कीं बोरीच्या पाटीलकीचा वास्तविक हकदार हा (माझा बाप) नाहीं; हा जबरदस्तीनें तें वतन बळकावून बसला आहे. मूळ तें वतन संपादन करणाराचा खरा वंशज आपल्या वतना बद्दल व जमीनी बद्दल दावा करीत आहे. शेवटीं ब्रिजलाल ह्मणाला 'महाराज आपण केवळ ब्रह्मदेवाचेच अंश आहांत. ह्या माणसाच्या हातून माझी कशी कशी अवस्था झाली आहे तें मी पाल्हाळानें सांगत नाहीं. दोन वेळा मी ह्याच्या गांवीं गेलों होतों; व दोन्ही वेळा ह्यानें माझी अशी अप्रतिष्टा केली कीं त्या गोष्टींची आठवण झाली ह्मणजे माझ्या आंगाचा संताप होऊन जातो. मी ह्याच्या गांवीं गेलों होतों तो सरकारच्या फायद्या करितां गेलों होतों; आणि त्याच वेळेस म्या ह्याजवर फिर्याद केली असती तर, महाराज, आपली तात्काळ ह्याजवर इतराजी होऊन याच्या बायका पोरांची धूळधाणी झाली असती. पण त्या वेळीं मी आपलें दु:ख सारें गिळून गेलों. आतां जेव्हां हुजुरा समोर येण्या विषयीं अनेक वेळा निरोप पाठविले तरीं ह्यानें येण्याचें साफ नाकारिलें, व जयसुखदासाच्या जिंदगी विषयीं ह्याजला हुकूम पाठविले तेही ह्यानें जुमानिले नाहीं. त तेव्हां हा सरकारचीही पर्वा करीत नाहीं अशी माझी खात्री झाली; आणि यासाठींच आतां मी ह्याला कैद करून बंदीखान्यांत ठेवण्याविषयीं हुकूम दिला.'

"माझा बाप ह्मणाला 'या अल्ला ! अल्ला ! महाराज, हें सारें तर्कट आहे. सरकारी हुकूम शिरस्त्याप्रमाणें आला असतां आजपर्यंत कधींही म्या त्याचा अवमान केला नाहीं ह्यास अल्ला साक्ष आहे. हा लुचा मनुष्य जन्मास येण्याच्या पूर्वीपासून मी सरकारचें निमक खात आहें. सरकारची नोकरी करितां करितां मी ह्यातारा झालों, असें असतां ह्याजला आपण आपल्या देखत मला शिव्या देऊं द्याव्या असा हा कोण मोठा आला ! महाराज, आपण परवानगी द्याल तर मी सांगतों कीं मजकडे कांहीं एक कसूर नाहीं. उलट आपल्या दासाचे ह्या दुष्टानें जे हाल केले आहेत त्यां जबद्दल ह्याजला भारी शिक्षा झाली पाहिजे."

"पंडित ह्मणाले 'ठीक आहे; तुमची सुनवाई उद्यां करूं. इतक्यांत तुह्मीं आपल्या सर्व हकीगतीची नीट चांगली कैफीयत तयार कराल तर बरें होईल; ह्मणजे त्यांत सगळा मजकूर थोडक्यांत येऊन समजण्यालाही चांगलें पडेल'!

"नंतर माझ्या बापानें विनंती केली कीं 'दरोडखोरांप्रमाणें आह्मास पायांत बेड्या घालून कैदेंत ठेवूं नये. पाहिजे त्यावेळीं हजर राहाण्याविषयीं हवे असल्यास ह्या दोघाही सावकारांस जामीन देतों.' 'ह्याचे जामीन बिमीन कांहीं उपयोगी नाहींत' अशी ब्रिजलालानें पुष्कळ तक्रार केली; पण ती सारी व्यर्थ गेली. पंडितांनीं माझ्या बापाची विनंती मान्य केली. आणि आह्मीं त्या सावकारांबराबर निघालों. ब्रिजलालाच्या आंगावरून आह्मीं जाऊं लागलों तेव्हां माझा बाप मिशांवर ताव देऊन व ब्रिजलालाकडे वांकड्या डोळ्यानीं पाहून तोंडांतल्या तोडांत 'इनषाला!' 'माषाला!' अशी पुटपुट करीत चालला. ब्रिजलालही कपाळाला आठ्या घालून मोठ्या संतापानें माझ्या बापाकडे पाहत होता.

"नंतर संध्याकाळीं माझ्या बापानें आरंभापासून शेवट पर्यंत ब्रिजलालाच्या वर्तणुकी बद्दलच्या हकीगतीची कैफीयत फारसी भाषेंत लिहून तयार केली; आणि ती घेऊन आह्मीं दरबारांत गेलों. आमच्या मनांत आशा कीं आतां, ब्रिजलालानें आमचा छळ केल्या बद्दल आमच्या डोळ्यां समोर त्याची अप्रतिष्ठा होईल. परंतु आमच्या कपाळीं निराशाच लिहिलेली होती. नारायणराव पंडितानीं आमचा अर्ज वांचिला आणि लागलाच आपला निवाडा सांगितला. ते ह्मणाले ह्या पाटलास कैद करण्याचें काम ब्रिजलालानें अगदीं आपल्या अधिकारा बाहेर केलें; त्या प्रमाणेंच जयसुखदासावर व त्याच्या कुटुंबावर वृथा जुलम ब्रिजलालानें केला हे ही फारच गैर केलें; कारण कागदपत्रांवरून पाहतां जयसुखदासाकडे कोत्याही बाबतींत सरकारचें कांहीं घेणें निघत नाहीं. हा प्रकार ब्रिजलाला विषयीं झाला. आतां ह्या पाटलानें ही ब्रिजलालाची आगळीक केली आहे. त्यानें ब्रिजलालास गांवांतून हांकून लाविलें हे अगदीं बराबर केले नाहीं; तसेंच ज्या गृहस्थाकडे सरकारांतून हिशेब घेण्याचें काम सोपलें होतें त्यानें हिशेब मागितला असतां पाटलानें विनतक्रार हिशेब दिला नाहीं ह्यांत सरकारच्या हुकुमाची पाटलानें अवज्ञा केली'.

"ह्यावर माझा बाप जबाब देणार होता. पण इतक्यांत त्या सावकारानें त्याला दाबला. तो ह्मणाला 'लढाईंत ठार मरण्यापेक्षां अर्धमेले होऊन येणें बरें. आतां तुह्मीं उगाच रहा. ह्या कचाटांतून तुह्मी सुखरूप पार प-

डलां हेंच मोठें भाग्य समजा. त्या कपट पटूनें तुह्मांवर हा केवढा भयंकर पाश टाकिला होता! अशा पाशांतून मुक्त होऊन जाणारे दैवशाली थोडेच हें ध्यानांत ठेवून स्वस्थ बसा आणि ईश्वराचे आभार माना.'

"ब्रिजलालाशीं गैर रीतीनें वागल्या बद्दल माझ्या बापास थोडासा दंड भरावा लागला; तरी तेवढ्यावरच सुटल्यामुळें आज आपण मोठा जय मिळविला असें त्यास वाटलें. तें प्रकरण तितक्यावरच आटोपलें.

"पुढें कांहीं दिवसपर्यंत आह्मीं त्या सावकाराकडेस राहिलों. त्यानें आह्मांस मेजवानी वगैरे दिली. नंतर आह्मीं आपल्या गांवीं जाण्यास निघालों. निघते वेळीं त्या सावकारानें माझ्या बापास जो उपदेश केला तो मी कधींही विसरणार नाहीं. तो ह्मणाला 'पाटीलजी त्या ब्रिजलालाला मी पक्का ओळखितों. तो आपला सूड उगविल्या वांचून कधीं रहाणार नाहीं. आपल्या यजमानापुढें तो पाहिलातना कसा कुत्र्यासारिखा पुढें पुढें हांजी हांजी करीत असतो ना? पण, वेटा तेथून अंमळ पलिकडे झाला कीं अंत:करणाचा शुद्ध लांडगा पाहून घ्या. आचरणही गुलामाचें तसेंच क्रूर. पण दरबारांत वजन पुष्कळ असल्यामुळें त्याजला आडवें येण्यास कोणी धजतच नाहीं बघा. तुह्मीं मोठ्या नशिबानें त्याच्या तडाक्यांतून सुटलां. पण तुह्मीं हें पक्कें समजा कीं जर आमच्या शेटजींनीं आंत पडून तुमचें काम हातीं घेतलें नसतें तर कांहीं एक होतेना. तुरंगातल्या तुरंगातच तो तुमचा नाहीं नाहीं त्या प्रकारें जांच करून प्राण घेता.'

"माझा बाप ह्मणाला. 'शूरक अला! देवा, ह्या संकटांतून मी सुखरूप पार पडलों ही तुझी मोठी कृपा."

"तो सावकार ह्मणाला, 'पण पुढें नीट जपून चालल्या वांचून तुह्मीं सुखरूप राहाल असें मात्र समजूं नका.' तुह्मीं कोठें ही गेलां तरीं तुमच्या पाठीवर त्याचे लोक आहेत असेंच समजा; आणि त्यांच्या तावडींत सांपडूं नये ह्मणून तुह्मास मोठ्या सावधगिरीनें व दक्षतेनें राहिल्या वांचून दुसरी तोड नाहीं. पाटीलजी तुह्माला माझी आण आहे; मी सांगतों एवढें ऐकाच; माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करूं नका; नाहीं तर पस्तावाल बरें!"

"माझा बाप ह्मणाला 'छ: मी तसें कसें करीन? तुह्मीं स्नेहभावानें मला माझ्या बऱ्याच्या गोष्टी सांगतां; हे तुमचे शब्द मी अमृता प्रमाणें सेवन करितों. परंतु आतां तुह्मीं हें ही ध्यानांत ठेवा कीं इत:पर हा महंमदजी पाटील त्या ब्रिजलालाच्या हातीं लागणें दुर्घटच आहे. त्याचे हात इतके लांब नाहींत; व त्यांच्यांत इतकें सामर्थ्य ही नाहीं.'

"हा प्रकार झाल्या नंतर आह्मीं त्या सावकाराचा निरोप घेऊन आपल्या घरीं निघून आलों. पण चमत्कार पाहा कीं पूर्वी भाकीत केल्याप्रमाणेंच गोष्टी घडूं लागल्या. आह्मीं घरीं येऊन दोन तीन महिने झाले नाहींत तोंच आमच्या गांवाच्या आसपास नवीननवीन माणसें फिरताना आढळूं लागलीं. आणि सगळ्यांत जास्त चमत्कार हा कीं आह्मीं सर्वांहीं माझ्या बापास, 'निदान काळोख पडल्यावर तरी एकटा दुकटा बाहेर फिरूं नको' ह्मणून हव्या तितक्या विनवण्या करून सांगितलें; पण त्यानें ह्मणून ऐकिलें नाहीं.

आमच्या दृष्टीस पडलेल्या माणसांबद्दल त्यास सांगितलें म्हणजे त्यानें म्हणावें 'असतील ते कोणी वाटसरू;' आणि संध्याकाळीं मुद्दाम पुष्कळ रात्र होई पावेतों बेपर्वाईनें बाहेर फिरावें. तेणें करून शेवटीं माझी आई मोठ्या काळजींत पडली; व वारंवार परकीय लोकांच्या येण्यानें तिला फारच भय वाटूं लागलें. ती मला म्हणाली 'तूं दिवसभर त्यांच्या जवळून हलूं नकोस; आणि शेतावरून संध्याकाळीं नेमानें तूं त्यांस घरीं घेऊन येत जा. त्या प्रमाणें पुष्कळ दिवस पावेतों मी नेहेमी करीत होतों. परंतु एका दिवसीं—जळला तो दिवस तो उगवला नसता तर बरें होतें—आम्हीं शेतावर गेलों होतों. तेथें दुसऱ्या दिवसीं आमचा ऊंस कापायाचा होता, त्याची व्यवस्था जिकडे तिकडे लावतां लावतां बरीच रात्र झाली. घरीं येण्यास निघालों तों अगदीं काळोख पडला. शेजारच्या गांवचीं माणसें आम्हांस थोड्या दूर पावेतों पोंचविण्यास आलीं; पण आमचा गांव सुमारें अर्ध कोस राहिला तशीं तीं परत गेलीं. त्याठिकाणापासून आमच्या गांवांत, हेलपटा घेतल्यावांचून येण्यास जी अगदीं समोरची वाट होती त्या वाटेंत भीति फार. बहुत करून रात्रीस काळोखांतून त्या वाटेनें येण्यास जाण्यास कोणी धजत नसे. म्हणून म्या दुसरी वाट धरिली; तें पाहून लागलेंच माझ्या बापानें मला छेडलें. तो म्हणाला 'छः भलत्याच रस्त्यानें काय चाललास? तिकडून पुष्कळ हेलपटा पडेल. घरीं पोंचण्यास दोन घटका आणखी उशीर लागेल. तो रस्ता टाळण्याचें कारण उघडपणें मला सांगतां येईना. फक्त त्या रस्त्यांत भय असल्याबद्दलचा विचार माझ्या मनांत घोळत होता एवढ्यामुळेंच तो रस्ता सोडून मी दुसऱ्या मार्गानें जाणार होतों; पण काय हो? नशिबापुढें जाववेल कोणाच्यानें? आपण मरावें असें देवाच्याच जर मनांत असेल तर आपण माणसांनीं हवा तसा बंदोबस्त केला म्हणून उपयोग काय? आपली दूरदृष्टि कितीशी कामास येणार! जातांजातां आम्हीं एका शेताच्या बाजूनें मोठी उंच शेराची कुपण होती तिच्या बाजूनें रस्ता वळला होता तेथपर्यंत जाऊन पोंचलों. पायांखालीं अंधुक अंधुक दिसण्या पुरता सरासरी उजेड होता. परंतु रस्त्यांतील खड्यानखडा आम्हांस चांगला माहीत असल्यामुळें चालण्याला कांहीं कठिण पडलें नाहीं. ह्याप्रमाणें चालत जातां जातां रस्त्यावर एक मोठी वई आडवी आली होती तिच्या पलीकडे बंदुकींच्या तोड्याप्रमाणें कांहीं चकमकत आहे असें एकाएकीं माझ्या दृष्टीस पडलें.

"म्या बापाला म्हटलें 'बाबा, आज वया आपल्याला वैऱ्यांहीं ऐथें रस्त्यांत गांठिलें; ते पाहा वई पलीकडे तीन पेटलेले तोडे दिसताहेत.'

"तो म्हणाला 'छः भलतेंच; तुला वेड लागलें. अरे, ते काजवे. काय तूं घाबरलास? माझा मुलगा आणि असला भेकड!' ह्याप्रमाणें त्याच्या तोंडांतून शब्द निघाले मात्र तों एकदम तीन गोळ्या येऊन लागल्या. माझा बाप लागलाच उपडा पडला; त्याच्या तोंडांतून किंचित ध्वनि मात्र बाहेर निघाला. माझ्या पाठीला एकदम झटका लागल्यासारिखें होऊन सगळी पाठ जणु एक सारखी मेहेरून जाऊन थंड पडली. साऱ्या आंगाला वेधना फार होऊं लागली. एक पाय ही अगदीं लुला पडल्यासारिखा झाला. त्यासर सेमाझें तर अवसान खचलें. मी उठून धडपडत सरा-

सरी पांच चार पावलें चाललों असेन नसेन इतक्यांत पुनः खालीं पडलों, पण माझी शुद्धि मात्र नाहींशी झाली नव्हती. त्या वईच्या पाठीमागून तीन असामी तलवारी उपसून आमच्या अंगावर धांवून आले. आह्मीं कांहीं हालचाल करित नाहीं व अचेतन पडलों आहों असें पाहून एकानें मला उताणें केलें. ते माझ्या तोंडाकडे पाहूं लागला; तेव्हां म्या डोळे मिटले; कारण मला ठाऊक होतें कीं डोळे उघडे राहिले कीं जीव गेलाच. तो गुलाम माझ्या छातीवर उभा राहून ह्मणाला, छः, हा नव्हे तो. आपण नेम चुकलों.'

" इतक्यांत दुसरा आला. तो ह्मणाला 'ठीक आहे; कांहीं चिंता नाहीं; हें ही बरेंच झालें. अरे, हा गुलाम धाकटा खबीस—त्याचा पोरगा. खचीत, माझें ऐक तो पलीकडला त्याचा बापच आहे; चल पाहा ये, पाहिजे तर.' असें ह्मणून ते मला सोडून गेले.

"माझा बाप पडला होता त्या ठिकाणीं ते गेले. त्यांनीं तेथें काय काय प्रकार केला तो मला दिसला नाहीं. पण मला वाटतें कीं त्यांनीं त्यास नीट न्याहाळून पाहिलें. कारण एकजण मोठ्यानें ओरडून ह्मणाला 'अहमदुल्लिला; आपलें काम फत्ते झालें. आतां मालकापुढें तोंड दाखविण्यास कांहीं हरकत नाहीं. इतके दिवस टपतां टपतां आज सहज चटकन डाव साधला, हीतर गोष्ट मनांत आणा. हा ह्मातारडा कुत्रा गुलाम कोल्ह्या सारिखा सावध आणि मात्रागमनी कीं हो;'

"तिसरा एकजण होता तो तोवेळ पावेतों बोलला नव्हता; त्याचें तोंड तेव्हां उघडलें. तो ह्मणाला 'हे सगळे माझे उपकार आहेत असें समजा. त्याच्या उंसाच्या शेतांत जपणीवर बसून तेथून त्याच्या घराकडे जाण्यास अगदीं जवळचा रस्ता कोणता हें म्या जर शोधून काढिलें नसतें तर अजून कईक दिवस हा आपला मतलब साधता ना. आणि वास्तविक ह्मणाल तर मी तर बाबानों खचीत अगदी कंटाळून गेलों होतों. असो; चला. आतां एथून पोबारा करा कसे. एथें आतां आग भडकेल; ह्यामुळें आपला ह्या स्थळीं निभाव नाहीं. महादु आपल्यास नागपुरा पर्यंत पोंचवून देईल. यास्तव जितके लवकर आपण त्याच्या एथें जाऊन पोंचूं तितकें चांगलें. घोडेही कसून बिसून तयार आहेत.' याहून जास्त म्या कांहीं त्यांच्या तोंडून ऐकिलें नाहीं. मी अगदीं व्याकुळ होऊन गेलों होतों, व मूर्च्छा येऊन पुष्कळ वेळ पावेतें बेशुद्ध पडलों होतों. मला जखमा झाल्यो होत्या त्यांची वेधना पराकाष्टेची दुःसह होऊन मी कळवळत होतों. त्यारात्रीस थंडीही अतिशय पडली होती तेणेंकरून माझें आंग अगदीं ताठून जाऊन जागेवरून हलण्याचें देखील माझ्यामध्यें सामर्थ्य राहिलें नव्हतें. पलीकडेस माझा बाप उताणा पडलेला होता तेथपर्यंत तरी निदान उठून जावें ह्मणून आपल्याकडून झाला तेवढा इलाज केला; परंतु नाव कशाला? चलनवलन मला अगदीं दुर्घट झालें होतें. तसाच पडला राहून म्या मोठमोठ्यानें आक्रोश केला. तेथून जवळच माणसें बोलत चालत तें ऐकूं येई. ह्मणून माझ्यानें ओरडवलें तितक्या मोठ्या स्वरानें मी ओरडलों, पण तें कोणास ऐकूं गेलें नाहीं. कांहीं बंदुकींचे आवाज झालेले माझ्या कानीं आले ते आह्मांस इशारा करण्यासाठीं ह्मणून लोकांहीं केले होते असें मागाहून मला समजलें. परंतु उपयोग काय? त्यांस जबाब देण्याचें मला सामर्थ्य न.

व्हतें. एखादें जिवाणूं चेचून टाकावे त्या प्रमाणें माझी दशा होऊन मी पडलों होतों. अशा स्थितींत माझ्या हातून काय होणार? मी क्षणभर शुद्धीवर येई; पुनः बेशुद्ध पडें—जसें काय मी पुनः पुनः जिवंत होऊन पुनःपुनः मरतों असें मला भासलें. मित्र हो, त्या रात्रीचा तो प्रसंग व तें दुःख तुह्मांला मी काय सांगूं? खरोखर माझ्यानें तें वर्णन करवत नाहीं. शेवटीं कांहीं असामीनीं येऊन मला सावध केलें. म्या पाहिलें तों ते पेटलेली मशाल घेऊन मजपाशीं उभे आहेत. त्यांस म्या ओळखिलें. ते आमच्या गांवचेच मजूरदार लोक होते. आह्मांसाठीं त्यांहीं झाडून सर्व गल्लीन गल्ली शोधिली; शेवटीं त्यांजला आह्मीं ह्या ठिकाणीं सांपडलों. ते काय करीत व काय बोलत तें कांहीं एक मला समजेना. पण एवढें मला आठवतें कीं माझ्या बापाचें प्रेत पाहून ते दीर्घस्वरानें आक्रोश करूं लागले. नंतर त्यांहीं मला उचलून एका कांबळ्याच्या झोळींत घालून गांवांत नेलें आणि माझ्या बापाच्या दाराशीं ठेविलें. अरेरे! आतां तें त्याचें दार कशाचें?

"मित्र हो, घरांत बापावर, भावावर किंवा मुलावर मृत्युचा धाडा येऊन पडला असतां बायकांनां किती दुःख होतें व त्या कशा शोक करितात हें तुह्मीं सर्वांहीं पाहिलें असेलच. अशा प्रसंगीं तो बायकांचा आक्रोश ऐकून पुरूषांच्या अंतःकरणांला कसा द्रव येतो व त्यांची कालिजें कशीं वितळून जातात हें तुह्मीं सर्वजण जाणतच आहांत. माझ्या बापाचें प्रेत घरीं येऊन पोचे पर्यंत कांहीं रडारड झाली नव्हती. माझी आई उगीच एका कोपऱ्यात स्फुंदत बसली होती. तीं मधून मधून माझ्या बापाचें नांव घेऊन शोक करी व ऊर बडवी. माझी बहीण मजपाशीं येऊन बसली; व तोंड कोरडें पडल्यामुळें माझ्यानें बोलवेना ह्मणून तोंडाला ओलावा येण्यासाठीं ती माझ्या तोंडांत थेंबथेंब पाणी घालीत होती. सभोवतीं चाललेला हा सर्व प्रकार मला समजत होता. गांवांतल्या कांहीं ह्माताऱ्या ह्माताऱ्या बायका माझ्या आईपाशीं येऊन बसल्या होत्या; व आपल्यांतच कांहीं हळूहळू बोलत होत्या.

(पुढें चालेल).

उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याची आवश्यकता.

(पुढें चालू.)

—ooo—

इंग्लिश लोकांत व्यावहारिक विषयांचें ज्ञान किती आहे याविषयीं जर शोध केला तर त्यांच्याकडे सर्व विषयांवर मासिक पुस्तकें व तद्विषयक विचार करण्यास मंडळ्यांचा भरणा पाहूनच अचंबा वाटेल. मग त्या लोकांस साधारण माहिती प्रत्येक विषयाची किती असते याचा तर तपास करण्याची जरूर नाहीं.

आलिकडे सर्व देशभर विद्येचा प्रसार फार झाला आहे, याविषयीं चोहोंकडे उदाहरणें दृष्टीस पडतातच; परंतु जितका अभ्यास व वेळ खर्चला जातो त्या मानानें या विद्येचें फळ आलेलें दृष्टीस पडत नाहीं. कदाचित् हें माझें मत आपल्या कित्येक विद्वानांस आर्ष वाटेल व जे विद्यावृक्षाच्या उच्च शाखांवर आरूढ होऊन सृष्टीचा अनुभव घेत आहेत त्यांस तर विशेषेंकरून आर्ष वाटेल. परंतु यांसच काय, याविषयीं युरोपियन विद्यापीठाचे मूलस्तंभ उभारणार हल्लीं-

च्या सरकारी खात्यांतील वरिष्ठ अम्मलदार त्यांचें हें मत कांहींसें निराळें पडतें. यामुळें माझें एकट्याचें मत विशेष ग्राह्य होणार नाहीं असें आहे, तरी जे विचार उपयुक्त ज्ञानाच्या महत्त्वाविषयीं माझ्या मनांत येतात ते आपणांस सादर केल्याशिवाय राहवत नाहीं. सदरीं सांगितलेल्या अम्मलदारांचें मत असें पडतें कीं उपयुक्त विद्या शिकविण्यास व त्यांचें महत्त्व विशेष वाढविण्यास अद्यापि अवकाश आहे. थोड्या दिवसांवर कलकत्ता युनिवर्सिटीचा वार्षिक समारंभ होतेवेळेस आनरबल इ. सी. बेली साहेब असें बोलले कीं "आलिकडे तीन वर्षांत येथील युनिवर्सिटीच्या सभासदांहीं, 'व्यावहारिक ज्ञानांत' उमेदवार कितपत तयार आहेत हें पाहण्याकडे इकडील परीक्षक लोकांनीं विशेष लक्ष द्यावें व सृष्टीपदार्थांच्या ज्ञानाविषयीं जीं शास्त्रें आहेत त्यांचा अभ्यास लवकर व्हावा असा यत्न करावा ह्मणून वाटाघाट केली, अशी हकीकत मला समजते; परंतु मला स्वत: असें वाटते कीं, सदरील विषयांचें ज्ञान उमेदवारांस जितकें आहे त्यापेक्षां ज्यास्त असण्याची इच्छा केली तर बुद्धी व धारणाशक्ती जशा वाढाव्या तशा वाढणार नाहींत व या विद्याभ्यासाच्या पूर्वभागीं वाढल्या तरच सृष्ट पदार्थांचें ज्ञान उत्तरभागीं पूर्तेपणीं होण्याचा संभव आहे." बेलीसाहेबानें आणखी असें सुचविलें कीं, इंग्लंडांत सदरील ज्ञान वाढविण्याविषयीं जे प्रयत्न झाले ते फलद्रुप झाले असें ह्मणवत नाहीं; व याकरितां आपण इकडे ह्मणजे हिंदुस्थानांत तसा क्रम चालविण्यापूर्वी फार जपावें; नाहीं तरयाचा परिणाम पोकळ ज्ञान वाढेल असा मात्र होईल.

आतां हे त्या थोर अधिकाऱ्याचे विचार मनन करण्यासारखे आहेत व अर्थात, राजाश्रयानें जो अभ्यास व्हावयाचा तो अशा कित्येक मोठ्या अम्मलदारांच्या ह्मणण्याप्रमाणेंच होईल यांत संशय नाहीं. परंतु या सदरील बेली साहेबांनीं इंग्लंडांत उपयुक्त ज्ञान वाढविण्याचे प्रयत्न निष्फल झाले असें जें सांगितलें त्यास एकादें प्रमाण दिलें असतें ह्मणजे बरें झालें असतें. प्रमाणाशिवाय अशीं मतें विशेष ग्राह्य होणें फार कठीण आहे. आलिकडल्या १०-१५ वर्षांत प्रसिद्धीस आलेले रसायनवेत्ते सदरील शिक्षणाच्या पद्धतीनें तयार झाले असतील किंवा नाहीं याविषयीं मला निश्चयानें सांगण्याला जरी आधार देववत नाहीं, तरी इंग्लंडांत काय परंतु फ्रान्स व जर्मनी देशांत आलिकडल्या ३०-४० वर्षांत जे नवीन शोध इतक्या त्वरेनें सिद्ध झाले व हल्लीं चालू आहेत त्यांस अनेक बुद्धिमान् पुरुषांस एका पद्धतीनें थोड्या कालांत पदार्थविज्ञानशास्त्राचें पूर्ण ज्ञान झालें हे कारण झालें नसेल असें ह्मणवत नाहीं.

शाळेंत विद्याभ्यास चालत असतां विद्यार्थ्यांस अनेक विषयांचें थोडेंबहुत ग्रहण होतें, त्यापैकीं मनांत चांगले ठरणारे विषय दोनचारच असतात. असें असून जर इतर विषयांपैकीं पदार्थविज्ञानाची कोणती हीं एक शाखा विद्यार्थ्यास ज्यास्त रुचली तर त्या शाखेचें ज्ञान त्याला चालू व शिक्षणपद्धतीस अनुसरून असलेल्या विषयांपेक्षांही ज्यास्त होईल असें होतें, परंतु पुढें अडचणीमुळें अथवा विशेष प्रकारच्या धंद्याचें ज्ञान संपादण्याकडे त्याचें लक्ष वळलें असतां साहजिक तो विषय त्यास मुकतो. व असे प्रसंग बहुतांस येत असल्यामुळेंच, द्रव्यार्जन करणाऱ्या धंद्याकडे बहुतांचा कल झाला ह्मणजे पदार्थ-

विज्ञानाचे उपयोग तादृश दिसेनासे होतात. हीच स्थिती हल्लींच्या विद्यार्थ्यांची आहे. यामुळें पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास पूर्णपणें होण्यास मुळींच संधि राहत नाहीं. याकरितां जर कदाचित् कला अथवा शिल्प व बांधकामाच्या संबंधानें किंवा वैद्यकांतील औषधी गुणधर्मांच्यासंबंधानें, सदरील विषयांचा अभ्यास झाला तर होतो. नाहीं तर होतच नाहीं.

आतां मी उपयुक्त ज्ञानास इतकें महत्व देतों याचें कारण काय हें आपणास सांगितलें पाहिजे व हें महत्त्व जर सिद्ध होईल तर त्या ज्ञानाचा प्रसार करण्याची आपणास हल्लीं किती आवश्यकता आहे हें दाखविलें पाहिजे.

(पुढें चालेल.)

देवास अर्जी (पुढें चालू.)

———ooo———

समस्त मम भूमिचें प्रथम वैभव भ्रष्ट हो।
किमर्थ घडलें तसें सकल राष्ट्र हें नष्टहो ॥
अगा प्रभुवरा तुझी वळलि कीं कृपादृष्टि ती।
झणून जननीचिही घडलि शोचनीया गती ॥ १०१ ॥
अनेक असती सख्या क्षितितलावरी देश जे।
पुराण समयीं कसें भरत खंड मध्ये सजे ॥
कला विविध जातिच्या चमकती किती सुंदरी।
अहा! भुलुनि त्या कशा पळति दूर देशांतरीं ॥ १०२ ॥
पुराण मुनि ते तुझ्या उदरिं गुप्त कीं जाहले।
प्रचण्ड अति वीरही जन निपुण सारे भले ॥
प्रतापयुत आर्य ते सहज काळ भक्षी कसा।
अहो मजसि भासतें स्मरण हें जसा आरसा १०३।
तयांत दिसती मला विमल कीर्तिचे आर्य ते।
विचित्र दिसते प्रभा रुचिर कांति ती भासते ॥
सुखावरण मस्तकीं पसरलें तयांच्या गमें।
भिऊनि पळतें पहा गरिब दुःख दुःखें भ्रमें ॥ १०४ ॥
अखंडधनराशि ही पडति तेथ विस्तीर्ण सा।
भरी अनेक घागरी जलधिची सुना या कशा ॥
परस्थलज लोक हे पसरुनी मूखें पाहती।
तपून वसती किती परिन काकिणी लाभती ॥ १०५ ॥
विचित्र बघुनी असें सुभग चित्त आनंद हो।
पुढेंच दुसरें सरे लवकरी पहा हें अहो ॥
तुह्मांसह दयानिधे बघतसें—मला सांवरा।
न नेत्र मम देखण्या शकति हे कृपासागरा ॥ १०६ ॥
विपज्जलधिमाजि ही बुडतसे स्वभूमण्यंबिका।
तिला कवण तारिगा तुजाविणें जगच्चालका ॥
तिचे तनुज आगळे वसुनि हात हे गाळिती।
पहा नवल! बांगड्या स्वकारें घालुनी चालिती ॥ १०७ ॥
किती यवन किंकर प्रबळ पूर्वजां निंदिती।
अह्मीं चतुर जाणते सुमति हे पहा हो किती ॥
असें झणुनि धन्यता जगति माजिया मानिती।
परस्थलज आगळें बहुत चागलें लेखिती ॥ १०८ ॥
न कांहि निज भूमिचें सुभगही तयां आवडे।
स्वदेशज जनां सर्वे हृदय सर्वदा वांकडें ॥
परंतु पर भौमजें अखिल तन्मनो हारितें।
प्रचण्ड परतंत्रता अहह! विश्व हें दावितें! ॥ १०९ ॥
हितार्थ अपुल्या किती झटति लोक राबंदिनी।
परि क्षण न घालिती जननि भूमिच्या सेवनीं ॥
विचार न मनांत ये कशि तिची दशा काय हो।
असें पुरुष जन्मती भरतखण्डि देवा अहो! ॥ ११० ॥
असे घडलि संप्रति स्थिति अह्मां जगन्नायका।
तुह्मीं श्रवणिं सर्वथा खचित कीं सख्या नायका ॥
तुह्मां विण परंतु मी कथुनि काय अन्यासतीं।
शिशु स्वजननी विणें रडत जाय कोणा प्रती ॥ १११ ॥
तथापि गणिती विभो! तुजसि सर्व साक्षी सदा।
तुला विदित वृत्त हें सकळ कीं नसे; कामदा! ॥
वदा तरी कशी वहा न मनिं आमुची कळजी।
तुह्मां असलि पाहिजे प्रभुवरा बहू काळजी ॥ ११२ ॥
समस्त तुह्मि आर्यहों! बुडति माय ही सांवरा!
भरून निजपूर्वजां प्रति मनांत लज्जा धरा ॥
असें मनुजजन्म या प्रभृति तें तुह्मां दीधलें।
तरी कृति नरापरी करुनि पाहिजे वर्तलें ॥ १३ ॥
स्वदेश जन आगळे सतत फोडिती हे गळे।
तुह्मांस न कळे, वळे नम न, तें कसें वा कळे।
खळे अखिल शूरता, सदभिमान सारा गळे।
जळे न हृदिं वासना! अळस दुष्ट कां ना पळे ॥ १४ ॥

BOMBAY:—"ASIATIC PRINTING PRESS" KALKADEVI ROAD,
BY H. SHRAVAN.

विविधज्ञानविस्तार गृहांत असलेलीं विक्रीचीं पुस्तकें

कायदे व आक्ट.

इंग्रजी	मू. कि. रु. आ.	टपा. रु. आ.
Broom's Selection of Legal Maxims	17—8	1-12
Steele's Law and Custom of Hindoo Castes	10—8	1—4
The Criminal Procedure Code (Act No. X. of 1872.)	2—8	0—6
The Indian Evidence Act (Act No. I. of 1872.)	1—8	0—1
Act No. XI. of 1874	0—4	0—3

मराठी.

न्यायसारसंग्रह	२५—०	३—०
अपकृत्यशास्त्र	९—०	१—८
टार्ट शास्त्रावरील टीका	१—८	०—२
करारसंबंधी नुकसानी परीमाण	१—४	०—१
प्रमाणशास्त्र	०—८	०—२
करारशास्त्र	०-१४	०—२
सन १८७१चा आक्ट ९	०-१४	०—२
सन १८७०चा ७	०—६	०—२
सन १८६०चा ४५	१—८	०—२
सन १८७१चा ८	०—६	०—१
सन १८६९चा १८	०—६	०—१
सन १८६४चा २०	०—२	०—१
सन १८६५चा १०	०—४	०—२
हायकोर्टाचे निवाडे	१—४	०—२
सन १८६५चा ११	१—८	०—३
सन १८७२चा १०	१—८	०—३
सन १८७४चा ११	०—३	०—१

वैद्यक ग्रंथ.

निघंट रत्नाकर प्राकृत	२३—०	४—८
शारंगधर प्राकृत टीका	४—०	०-१४
माधवनिदान प्राकृत टीका	४—०	०-१३
वैद्यसार प्राकृत टीका	२—८	०—८
वैद्यजीवन प्राकृत टीका	०-१२	०—३
वैद्यामृत प्राकृत टीका	०-१०	०—३
ज्वरकी प्राकृत टीका	०—६	०—१
बोधदेव शानक प्राकृत टीका	०-१२	०—२
वैद्यावतंस प्राकृत टीका	०—६	०—१
बालरोग चिकित्सा, डा. पां. गो. कृत.	१—४	०—४
बालवैद्य	१—०	०—२

संस्कृत प्राकृत ग्रंथ वगैरे.

श्री भावार्थ रामायण	३५—०	३—०
यथार्थ दीपिका	१०—०	२—८

	मूळ कि. रु. आ.	बं. पो. रु. आ.
सर्वार्थ चिंतामणी	१—४	०—३
पंचरत्नगीता, रेशमी पुठ्ठा	०-१२	०—२
प्राकृत जैमिनि अश्वमेध	४—८	०-१४
हरिविजय	३-१२	०-१२
पांडवप्रताप	५—०	१—८
निर्णयसिंधु	४—४	०-१४
भागवत चूर्णिका	४—०	०-१४
देवी माहात्म्य	१—८	०—४
नासिकेतोपाख्यान	२—०	०—८
अगमनिगम	१—८	०—४
पदबोधिनी गीता	२—८	०—६
भगवद्गीता	०—६	०—२
स्वप्नचिंतामणी	०—८	०—२
सहजबोध	०—६	०—२

मनोरंजक गोष्टी वगैरे.

उपयुक्त चमत्कारसंग्रह भाग १ला	०—५	०—१
,, ,, भाग २ रा	०—५	०—१
,, ,, भाग ३ रा	०—५	०—१
,, ,, भाग ४था	०—५	०—१
,, ,, भाग ५वा	०—५	०—१
मराठी प्रचारांतील म्हणी	०—७	०—१
तंतुवाद्य	१—८	०—३
सुवर्णमालीनी	१—८	०—३
बागोबहार अथवा चार दरवेश भाग १ला	१—०	०—२
,, ,, ,, भाग २रा	१—०	०—२
,, ,, ,, भाग ३रा	१—४	०—२
,, ,, ,, भाग ४था	१—०	०—२
कादंबरीसार	०-१०	०—२

ज्योतिष प्रकरणी संस्कृत प्राकृत ग्रंथ.

जोतिषसार	१—१२	३
ग्रहलाघव	१— ०	२
पंचांगसाधनसार–(ग० दै० ल०)	१— ०	२
मुहूर्तमार्तंड	०—१२	२
लघुजातक	०— ७	१
स्फुटज्योतिष	०— ४	१
वास्तुप्रकरणीकोष्टकें	०—६॥-	१
विश्वतोद्दाहकालिका	०— ८	१
कुंडार्क	०— ५	१
सर्वार्थचिंतामणी	१— ४	३

याशिवाय शाळाखात्यांत उपयोगी पडणारीं इंग्रेजी व मराठी व गुजराथी पुस्तकें हीं पूर्वी पैसा पाठविल्यास जरूर रवाना करण्यांत येतील.

Registered No. 102
1875.

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय, स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची अगाऊ..... रुपये ३.
सहामाही अगाऊ..... रुपये २.
फुटकळ दर प्रतीस..... आणे ६.
टपालहशील वर्षाचे..... आणे ६.

वर्गणीदारांनीं अगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांच्या आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या, व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

एप्रील. १८७५.



A MONTHLY MAGAZINE

पुस्तक ७. OF अंक ४.

MARATHI LITERATURE,

FOR

LADIES AND GENTLEMEN.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

भरतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें आणि
उत्कर्षाचे उपाय..... ..... ६१
देवास अर्जी..... ..... ८०घ

मुंबई.

एशियाटिक छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पोंच.

पुस्तकें— { १ स्त्रीगीतसंग्रह भाग ३ रा.
{ २ बालविवाहनिषेधक निबंध संग्रह.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत.)

रा. रा. विश्वनाथ मोरोबा वर्दे.....	३—०
,, ,, जनार्दन रामचंद्रजी.....	३—०
,, ,, द्वारकानाथ रायबा तर्खडकर....	३—०
,, ,, केशव वामन कीर्तने.....	३—०
श्रीमंत राजेसाहेब संस्थान देवासें.....	३—६
रा. रा. लक्ष्मण रामचंद्र गोऱ्हेवलकर.....	८—४
,, ,, चिंतामण अनंत परांजपे.....	३—६
,, ,, विठ्ठल वासुदेव गुर्जर.....	४—१२
,, ,, वामन आगाजी गुप्ते.....	१०—२
,, ,, लक्ष्मण अनंत तारे.....	३—६

(डिसेंबर १८७५ पर्यंत.)

,, ,, शेषो रामचंद्र.....	३—६
नरगुंद नेटिव लायब्ररी.....	३—६
नेटिव लायब्ररी संस्थान महेश्वर...	३—६
(मे १८७४ पर्यंत)	
रा. रा. नारायण लक्ष्मणजी.....	४—०
,, ,, दत्तात्रय दाजी अधिकारी.....	३—०
,, ,, रामचंद्र नारायण पिळगांवकर....	३—०
,, ,, व्यंकटेश अनंत.....	३—०
पंडित विजयशंकर सपटंबर १८७५ पर्यंत..	३—६
रा. रा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते बाकी किंमत.	४—०

जाहिराती.

विक्रीस तयार.

प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे व आबा जोशी मोघे वसईकर यांणीं मुंबईचे रेखांश संबंधानें तयार केलेलें शके १७९७ सालचें नवीन पंचांग विक्रीस तयार आहे. किंमत दोन आणे. बाहेर गांवच्या लोकांस टपाल खर्च एक आणा जास्त पडेल. या खेरीज गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांतील पंचांगही विक्रीस तयार आहे. किंमत चार आणे. टपाल एक आणा. वि० ज्ञा० वि० गृहांत मिळेल.

स्त्रीगीतसंग्रहभागतिसरा.

किंमत आणे साहा.

पाहिल्या दोन भागांप्रमाणेंच ह्यांत स्त्रियांच्या म्हणण्यांत येणारीं अशीं देवादिकांच्या रसाळ कथेचीं गाणीं असून चित्तरंजनार्थ शेवटीं उखाणें आहेत. गाण्यांचा भावार्थ, कठीण शब्दांवर टीका इत्यादि पूर्ववत् आहेत.

ज्यांस हें पुस्तक घेणें असेल त्यांणीं आमच्या पुस्तकालयांत काळकादेवीच्या रस्त्यावर (देवीसमोर) डांकहाशीलासुद्धां किंमत आणे सात. पाठविली असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

बृहज्जातक.

(दैवज्ञानाचें "सूक्ष्मदर्शक.")

सदर्हु पुस्तकाचें मराठी भाषांतर भट्टोत्पल टीकेच्या आधारानें माधवराव ब्रह्माजी संगमनेरकर यांणीं करून सुंदर ठशानीं छापविलें आहे. किंमत रुपये पावणे दोन. आमच्या पुस्तकालयांत मिळेल.

श्री दत्तमंजरी.

हें पुस्तक हरीभक्तपरायण रा० रा० कृष्णनाथ ऊर्फ बापूबावा ठाकुरदास तारगांवकर यांणीं श्री अक्कलकोटस्थ स्वामीच्या प्रसादानें तयार केलें आहे. यांत प्रथम श्रीस्वामी अक्कलकोट यांचें निरनिराळ्या वृत्तांत स्तवन असून पुढें श्री दत्तमहाराजांचें त्याचप्रमाणें स्तवन आहे. स्तवनारंभीं उभयतांच्या उत्कृष्ट तसबिरी जोडल्या आहेत. किंमत १ रुपया, टपाल दोन आणे—आमचेकडे मिळेल.

श्री.

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ४.

भरतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें आणि उत्कर्षाचे उपाय.*

—ooo—

प्रिय विद्वज्जन हो !

आजच्या निबंधाचा जो हा विषय, तो फारच अगत्याचा आहे; इतका अगत्याचा, कीं त्याचा विचार प्रत्येक मनुष्यानें अवश्य केलाच पाहिजे; कां कीं याचा संबंध, एक दोन किंवा दहापांच मनुष्यांशीं नव्हे, पण या आमच्या भरतखंडांतील वीस कोटींहून अधिक जनांच्या, किंबहुना सर्व पृथ्वीच्या बऱ्या वाइटाशीं अगदी निकट रीतीनें गुंतला आहे. परंतु अशा मोठ्या गहन विषयाचें परिशुद्ध रीतीनें विवेचन करणें ह्मणजे कठीण काम होय. तथापि याच्या संबंधानें जे मला चार शब्द सुचतात ते मी आपणां सर्वांस सादर करीत आहें. त्यांत माझी इच्छा मिळून इतकीच कीं या विषयाकडे प्रत्येक गृहस्थाचें लक्ष लागावें, या विषयाचा जितका बारीक विचार होईल तितका व्हावा, आणि जेणेंकरून आपल्या भरतभूमीचें लेशभर तरी खरें हित होईल अशा प्रकारचे उद्योग करण्याकडे सर्वांच्या अंतःकरणाचा कल व्हावा. इतकें घडून आल्यास या निबंधाचा उद्देश सफळ झाला असें मी समजेन.

आजचा विषय ह्मटला ह्मणजे "भरतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें आणि उत्कर्षाचे उपाय" हा होय. निकृष्टावस्था ह्मटली ह्मणजे उच्च स्थितीपासून खालीं ओढून आणलेला कोणताही पदार्थ किंवा प्राणी, किंवा देश, त्याला निकृष्ट हें विशेषण लागतें, आणि तशा निकृष्ट वस्त्वादिकांची जी अवस्था ह्मणजे दशा ती निकृष्टावस्था होय. ह्मणून भरतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें सांगण्यापूर्वी, खरोखरीं भरतखंडाची सांप्रत निकृष्टावस्था आहे, व मागें कधीं त्याची वरिष्ट स्थिति होती हें दाखविलें पाहिजे. नाहीं तर मूळपायाच अशुद्ध धरल्यास त्यावर रचलेली सर्व इमारतही अशुद्ध होण्याचा संभव आहे. याकरितां पहिल्यानें आपल्या देशाची प्राचीन स्थिति कशी होती हें पाहूं.

"प्राचीनकाळ" हे शब्द जेथें जेथें मी या निबंधांत योजितों तेथें तेथें तो अमुकच वर्षांमागचा काळ असें सांगणें कठीण पडेल; कारण सर्व देशीं अशीच गोष्ट अढळते कीं

* उपयुक्त मराठी ज्ञानप्रसारक सभेमध्यें रा० रा० रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांणीं, ता० १९ मार्च सन १८७५ इसवी या दिवशीं वाचलेला निबंध.

फार पुरातनकाळच्या संबंधाचे शुद्ध इतिहासपर ग्रंथ मिळणें फार कठीण पडतें. यामुळें जुन्या ग्रंथांत लिहिलेल्या अनेक गोष्टींचा खरा काळ, व त्या गोष्टींचें सर्वांशीं खरें स्वरूप शोधून काढणें हें हीं त्या प्रमाणेंच बरेंच कठीण पडतें. हीच गोष्ट आमच्या ही देशास लागू आहे. अर्वाचीन विद्वानांचे या मोठ्या गोष्टींविषयीं पुष्कळ शोध चालले आहेत, व ते हळूहळू सफळही होत आहेत. परंतु सद्यःक्षणीं ह्मटलें असतां, पुष्कळ वर्षांमागें घडून गेलेल्या अनेक गोष्टींचा काळ नेमकेपणानें आपणांस सांगतां येत नाहीं. त्या गोष्टीच्या काळाचा निर्णय करणें हें कांहीं आजच्या निबंधाचें काम नव्हे, व त्या निर्णयावांचून ह्मणजे या निबंधास मोठीशी अडचण पडेल असेही नाहीं. ह्मणून नेमकीं वर्षें किंवा महिने न उच्चारितां असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं कीं ज्यावेळीं बहुतेक इतर देश केवळ रानटी स्थितींत होते, हिरवें मांस खाणें व कच्चीं कातडीं पांघुरणें किंवा आंगास नुसता रंग लावून राहणें अशी इतर देशांची स्थिति होती, त्यावेळीं आमचा हा भरतदेश मोठ्या भरभराटींत असून, तो, सुधारणेच्या मार्गास लागलेल्या किंवा लागणाऱ्या इतर सर्व देशांना गुरुस्थानीं होता हें सर्वलोक कबूल करितात. या आमच्या देशीं पूर्वकाळीं कोणकोणत्या रीतीनें सर्वप्रकारची व्यवस्था होती, या विषयीं इत्थंभूत वर्णनाचे लेख मिळत नाहींत, यामुळें पूर्वीच्या सर्व गोष्टी निश्चितपणें सांगणें फारच कठीण आहे. तथापि तशांतही कालगतीच्या तडाख्यांतून निसटून जें जें मागें राहिलें आहे, त्यांतील कित्येक निःसंशय गोष्टीवरून पुष्कळ अनुमान करितां येतें.—१. आमच्या देशीं हरिश्चंद्र, दिलीप, रामचंद्र, युधिष्ठिर, परीक्षित्, जनमेजय, विक्रमादित्य, इत्यादि जगद्भूषण जगद्विख्यात **सार्वभौम राजे** अनेक होऊन गेले. २ **धर्मव्यवहारशास्त्रामध्यें** मनु, वसिष्ठ, पराशर, याज्ञवल्क्यादि, असे असे महान पुरूष होऊन गेले कीं, ज्यांचे धर्मशास्त्र ग्रंथ प्राचीन ग्रीकदेशांतील लैकरगसादि धर्मशास्त्रकर्त्यांनीं आपल्या देशांत नेऊन, त्यांजवर आपल्या कायद्यांची इमारत उभारली, असें, कोलब्रुक इत्यादि संस्कृतज्ञ इंग्लिश विद्वानांचें ह्मणणें आहे. ३ **व्याकरण** शास्त्रामध्यें शाकल, पाणिनि, कात्यायन, पतंजल्यादि जे समर्थ वैयाकरण होऊन गेले, त्यांचा हात धरण्यास दुसरा कोणीही पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही देशीं आजपर्यंत जन्मला नाहीं व पुढेही जन्मेल असेंही वाटत नाहीं. ४ **गणितज्योतिषामध्यें**—पृथ्वीसभोंवतीं सूर्य फिरत नाहीं, पण पृथ्वीच आपल्या अक्षासभोंवती फिरत असल्यामुळें दिवसरात्री घडतात असा जो आलीकडे दोनतीनशें वर्षांत युरोपखंडांतील ग्यालिलियो वगैरे ज्योतिषांनीं सिद्धांत केला आहे, तो कनिष्ठपक्षीं दोन हजार वर्षांपूर्वी आर्यभटादि भारतवर्षीय ज्योतिष्यांनीं सिद्ध केला होता; व ग्रहणादिकांचा वास्तविक प्रकारही स्पष्ट केला होता. याशिवाय ब्रह्मसिद्धांत, सूर्यसिद्धांत, सिद्धांतशिरोमणी इत्यादि अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. बीजगणितादि विषय व आपले संख्या लिहिण्याचे आंकडे आरब लोकांनीं इकडून युरोपांत नेले हेंही सर्व लोकांस माहीत आहे. ५ **आदिकविवाल्मीकिप्रणीत** रामायण आणि महर्षिवेदव्यासप्रणीत महाभारत हे ग्रंथ पाहून तर सर्व जग माना डोलवीत आहे; कालिदास, भवभूति, श्रीहर्ष, बाण इत्यादि सहृदयहृदयाल्हादक कवींचें तर हें माहेरच होय.

अमरादि अनेक कोशकारांच्या नांवांचीच एक मोठी माला होईल. ६ **आयुर्वेद** ह्मणजे वैद्यक यामध्यें धन्वंतरि, सुश्रुत, चरक, वाग्भटादि भिषग्वरांचे सर्वमान्य प्राचीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. व कित्येक विद्वानांचें तर असें मत आहे कीं, आलीकडे शेंपन्नास वर्षांत जो वैद्यकामध्यें फेरफार झाला त्यापूर्वी सर्व युरोपखंडामध्यें भारतवर्षीय वैद्यकाच्या आधारानें रचलेले वैद्यग्रंथ चालू होते व अद्यापिही आरबलोकांच्या वैद्यकामध्यें आपल्या वैद्यकाचा पुष्कळ संबंध दृष्टीस पडतो. ७ **नाट्यअलंकार** शास्त्रामध्यें भरतादि मुनी व दुसरे अनेक ग्रंथकार होऊन गेले. ८ **राजनीति** शास्त्रामध्यें नारद, बृहस्पति, शुक्र, कामंदक इत्यादि. आपला पंचतंत्र ग्रंथ तर पृथ्वीवरील बहुतेक सर्व भाषांमध्यें प्रसिद्ध झाला आहे. ९ **गांधर्व** संगीत, १० चित्रकला, ११ पाकशास्त्र इत्यादिकांमध्येंही आपले पूर्वज फार प्रसिद्ध होते. १२ **शिल्पशास्त्राचे** ग्रंथ विचारण्यापेक्षां हिमालयापासून सेतुबंधापर्यंत जे असंख्य प्राचीन प्रासाद, देवालयें, गुहा, कोरीव लेणी, इत्यादि सहस्रावधि वर्षें सतत सीत वात उष्ण पर्जन्य यांच्या, व राक्षसप्राय दुष्टलोकांच्या भडिमाराला न जुमानतां जशाचीं तशीं उभीं आहेत त्यांचीच साक्ष घ्यावी हें बरें. सांप्रतकाळीं सुधारलेले ह्मणविणाऱ्या लोकांच्या शिल्पविद्येच्या दमाखालीं कोट्यावधि रुपये खर्चून ज्या नवीन इमारती होतात त्या तयार होण्यापूर्वीच दुरुस्तीच्या तजविजीस लागावे लागतें ! व दहापांच वर्षांच्या आंतच त्या साष्टांग नमन करण्याच्या लागास येतात, हें तर आपण प्रत्यक्ष पाहत आहों. तेव्हां प्राचीन शिल्पविद्येची पुनः पुनः तारीफ करावी तितकी थोडीच हें उघड आहे. १३ आपल्या येथील नागपुरी धोतरजोडे, ढाका मलमली, इत्यादि कार्पासवस्त्रें आणि काश्मिरी शालजोड्या इत्यादि उर्णावस्त्रें पाहून अद्याप सर्व पृथ्वी तारीफ करते. १४ **सोन्यारुप्याचे व रत्नाचे अलंकार** याविषयीं तर भरतखंडासारखी दुसऱ्या कोणत्याही देशाची कीर्ति नाहीं. आपल्या या देशावर अनेक परकीय लोकांच्या स्वाऱ्या ज्या आजपर्यंत होत आल्या त्या सर्व या संपत्तीला भुलूनच झाल्या हें इतिहासप्रसिद्ध आहे. भरतखंडाला "सुवर्णभूमिका" असें नांव सर्व परदेशियांनीं दिलें होतें. कोलंबसानें अमेरिकाखंड शोधून काढलें खरें, परंतु त्या उद्योगास लागण्यास मूळकारण पाहतां हिंदुस्थानच्या संपत्तीची कीर्ति हीच होय. याशिवाय दुसऱ्या अनेक गोष्टींविषयीं हा देश पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. १५ परंतु ह्या सर्व गोष्टींहून अतिशय श्रेष्ठ असें जें **परमार्थज्ञान** त्याची तर सर्व पृथ्वीला भरतखंडापासूनच मूळप्रेरणा जाहली आहे. पहा सर्व पूर्वोत्तर देशीं ह्मणजे ब्रह्मदेश, सिंहलद्वीप, चीन, जपान, तिबेट, इत्यादि पृथ्वीच्या मोठ्या विस्तीर्ण प्रदेशीं जो आजकाल बौद्धधर्म चालत आहे, त्याचा आदिपुरुष जो बुद्ध तो या आमच्या देशीं गौतम गोत्री वैदिक धर्मी मातापितरांच्या पोटीं जन्मला होता, आणि या आमच्या देशांतून त्याणें आपला नवीन धर्म चोहोंकडे प्रसृत केला. प्राचीन मिस्त्री ह्मणजे इजिप्त लोक, तसेच ग्रीक आणि लाटीन लोक, आणि सांप्रतचे पारशी यांचे मूळ पूर्वज जे इराणी लोक हे सर्व, तसेंच त्या सर्वांचे धर्म, भाषा, कायदे कानु, रीतिभाती इत्यादिकांचा उगम, या आमच्या भारतवर्षीय आर्य जनाच्या पूर्वजांपासूनच आहे, ही गोष्ट

आपल्या कित्येक प्राचीन ग्रंथांत स्पष्ट आहे. असें ह्मटल्यास कित्येकांस हें बोलणें हास्यास्पद वाटेल, परंतु आल्लीकडील विद्वानांच्या शोधांवरून तर याविषयीं कांहींच शंका राहत नाहीं. पिथागोरास, साक्रेटीस, जरथुष्ट इत्यादि मोठमोठे परदेशीय विद्वान भरतखंडामध्यें स्वतां येऊन शिकलेले, किंवा भरत खंडांतून शिकून गेलेल्यांचे शिष्य होते हें ही प्राचीन शोधावरून सर्वमान्य आहे. कित्येक ह्मणतात कीं इजिप्त, ग्रीस आणि रोम येथील लोक केवळ* हिंदूपासूनच ह्मणजे सिंधूतीरीं किंवा सिंधूच्या पूर्वेस राहणारे लोकांपासून अर्थात् भरतखंडस्थांपासून उत्पन्न जाहले असें नव्हे, तर त्या सर्वांचे आणि पारशांचे आणि हिंदूचेही पूर्वज ज्या वेळीं हिमालयाचे उत्तरेस किंवा वायव्येस राहत असत, त्यावेळींच तेथूनच निरनिराळ्या देशीं त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या गेल्या. आमचे पूर्वज अतिप्राचीनकाळीं कोणे एके समयीं हिमालयाच्या उत्तरेस राहत होते, हें मत आमच्या लोकांसही संमतच आहे, व मकर राशीला सूर्याची संक्रांति झाल्यापासून कर्क संक्रांतीपर्यंत जो उत्तरायण काल त्याला आपले लोक देवांचा दिवस आणि कर्क संक्रांतीपासून मकर संक्रांती पर्यंत जें दक्षिणायन त्याला देवांची रात्र असें जें ह्मणतात, त्याचा तथ्यांश पाहतां वरील मतास बळकटी येते. कारण उत्तरायणामध्यें अतिउत्तर देशीं सहा महिने पर्यंत सतत दिवस असतो, आणि दक्षिणायनामध्यें सहा महिने पर्यंत सतत रात्र असते हें सर्व भूगोल शास्त्रज्ञांस विदितच आहे. ह्मणून कसेंही ह्मटलें तरी आपल्या भरतवर्षीय लोकांचे पूर्वज पूर्वकाळीं या देशाच्या पलीकडे राहत होते, व त्यांपासूनच इराण, इजिप्त, ग्रीस, रोम इत्यादि स्थळीं सर्व सुधारणांचा प्रवाह चालत गेला, असें ह्मणण्यासही कोणतीही हरकत नाहीं. जसा या आपल्या देशींच विद्याभ्यास करून बुद्धानें आपल्या देशी लोकांच्याच धर्माविरुद्ध आपला नवा बौद्ध धर्म स्थापित केला, तद्वतच इजिप्त देशांमध्यें मोशे किंवा मोझेस या नावाच्या एका दासीपुत्रानें राजाश्रयानें विद्याभ्यास करून शेवटीं तद्देशीय धर्माच्या विरुद्ध असा एक आपला नवीन यहुदी धर्म स्थापित केला. तथापि जसा बुद्ध धर्माला मूळ आधार वैदिक धर्म, तद्वतच यहुदी धर्माला मूळ आधार इजिप्त लोकांचा धर्म हेंही ह्मणणें अर्थातच कबूल करणें प्राप्त होतें. कोणताही नवीन धर्म जुन्या सिद्धांताला कितीही सोडून असला, तरी तेवढ्यावरूनच तो त्यापासून उत्पन्न झाला नाहीं असें ठरत नाहीं. यहुदी धर्मापासून ख्रिस्ती धर्म, आणि यहुदी आणि ख्रिस्ती या दोहोंपासून महंमदी धर्म उत्पन्न जाहला हें तर सुप्रसिद्ध आहेच. आपल्या देशांतील वैदिक देवतांचीं नावें, धर्मसंस्कार, रीतिभाती, प्रेतदहनाची वहिवाट, यज्ञयाग, मनुष्यांचें स्वरूप, संस्कृत भाषा, या सर्व गोष्टी इजिप्त, ग्रीक, रोमन आणि पारसी यांच्या मूळच्या सर्व गोष्टींशीं अगदीं बराबर जमतात, तसेंच यहुदी लोकांचें स्वरूपही ज-

* येथें "हिंदु" या शब्दा विषयीं मला थोडेसें बोलणें आहे. कित्येक ह्मणतात कीं हिंदु ह्मणजे काळे लोक, या अर्थावरून आह्मांस इराणी लोकांनीं हे नांव दिलें. परंतु मला तर हें ह्मणणें अगदीं निराधार वाटतें. "सिंधु" शब्दांतील "स" च्या जागीं "ह" येऊन हा शब्द उत्पन्न झाला. "स" च्या जागीं "ह" येणें ही गोष्ट पारशांच्या इराणी व जुन्या झंद भाषेंत फारच साहजीक आहे सारांश "हिंदु" ह्मणजे सिंधुतीरीं राहणारे हा मूळचा अर्थ– व त्या पासून हिंदुस्थान असा शब्द सिद्ध झाला.

मतें, आणि त्यांच्या यज्ञयागादि क्रिया, आणि लौकिक व पारमार्थिक कायदे हेही आपल्या मन्वादिस्मृतींशीं इतक्या बारीक रीतीनें जमतात कीं ते सर्व आमच्या धर्मग्रंथांपासूनच घेतले असावेत हें उघड दिसतें. ह्मणून या सर्व गोष्टी जर नीट लक्षांत आणिल्या तर आज काल सर्व युरोपखंड, सर्व एशियाखंड, सर्व आफ्रिकाखंड आणि सर्व अमेरिकाखंड यांवरील, अर्थात सर्व पृथ्वीवरील जे वैदिक, बौद्ध, यहुदी, ख्रिस्ती आणि महंमदी लोक, त्या सर्वांच्या धर्माला मुळीं आपल्या भारतवर्षीयांच्या पूर्वजांपासूनच प्रेरणा झाली, याविषयीं कांहींच शंका राहत नाहीं.

या तर मुख्य मुख्य गोष्टी झाल्या. यांशिवाय दुसऱ्या कितीक गोष्टींचीं कालांतरामुळें नांवें सुद्धां नष्ट होऊन गेलीं असतील हें सांगवत नाहीं. छापखाने, अग्निरथ, अग्निक्रीडा, तारायंत्रें इत्यादि कृत्यें आपल्या देशीं पूर्वी असावींत असें दिसत नाहीं. तथापि आपल्या शेजारच्या चीन देशामध्यें अग्निक्रीडा ह्मणजे दारूकाम, छापखाने इत्यादि कला हजारों वर्षांपासून चालू आहेत यावरून पाहतां, कोण जाणे, इकडेही त्या नसतीलच असें कशावरून ह्मणावें ! तथापि त्यांच्या अस्तित्वाविषयीं स्पष्ट पुरावा नसल्यामुळें कांहींच ह्मणवत नाहीं. असें आहे तरी विमानक्रिया, मृतसंजीवनीविद्या, योगसाधन इत्यादिकांचा बारंवार उल्लेख आढळतो, तेव्हां याचा निकाल कसा व्हावा ? यावरून पुनः वाटतें, कोण जाणें, पूर्वीची विद्या कोणत्या शिखरास जाऊन पोंचली असावी ?

असो याप्रमाणें आश्चर्यकारक गोष्टी ऐकून आपल्या मनास केवढा बरें विस्मय वाटतो ! परंतु ह्मण आहे ती खोटी नव्हे, कीं वाडवडिलांच्या नावांवर खोटी फुशारकी मिरविणें या सारखे दुसरें मूर्खत्व नाहीं. समर्थ रामदासस्वामींनींही ह्मटलें आहे.

"सांगे वडिलांची कीर्ति तो एक मूर्ख."

तथापि ज्या हेतूनें मागच्या या गोष्टी मीं एथें कळविल्या तो हेतु लक्षांत ठेविला असतां— कीर्ति सांगण्याजोगे श्रेष्ट असे आपले पूर्वज असणें हें तरी आपलें मोठेंच भाग्य होय. कारण पूर्वजांच्या कीर्तीपासून जी आपणास ईर्षा उत्पन्न होते ती इतर सर्व गोष्टींच्या ईर्षेपासून अगदीं वेगळ्याप्रकारची आहे, तिच्यापासून मोठ मोठीं कामें सहज घडून येतात. असो या प्रमाणें आपल्या पूर्वजांची स्थिति वर्णिल्यानंतर, आतां आमच्या सांप्रतच्या स्थितिकडे वळूं.

पहिल्यानें राजेलोक—यांची स्थिति कशी आहे हें येथें विस्तारानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. आपल्या देशीं पूर्वी जे राजे होऊन गेले त्यांस आपण ज्या अर्थानें राजे ह्मणत होतों, त्या अर्थाचे राजे आतां कोणी आहेत असें ह्मणण्यासच मोठी शंका वाटते, कारण राजा ह्मटला ह्मणजे त्याला मनाचें किंवा शरीराचें कांहीं तरी स्वातंत्र्य असलें पाहिजे. परंतु सध्यां पिंजऱ्यांतील पक्ष्यांचीही स्वतंत्रता त्यांना आहे असें दिसत नाहीं. बरें तशांत त्यांची संख्या तरी मोठी ? तेंही नाहीं. जे आहेत ते दिवसें दिवस नाहींसेच होत चालले आहेत. पृथ्वी वरील सर्व देशांमध्यें राजे ह्मटले ह्मणजे, पहिल्यानें जबरदस्तीच्या बळानेंच होत आले आहेत, तथापि राजाचे गुण कसे असावे याविषयीं, पूर्वीच्या विद्वान लोकांचें मत कसें होतें हें दाखविण्याकरितां कालिदास कवीनें रघुवंश काव्यामध्यें एके ठिकाणीं रघुराजाचें वर्णन केलें आहे त्यावरून सहज लक्षांत येईल.

यथा प्रल्हादनाच्चन्द्रः प्रतापात्तपनो यथा ।
तथैव सोऽभूदन्वर्थो राजा प्रकृतिरञ्जनात् ॥

अर्थ—'चंद्र' या शब्दाचा अर्थ 'आल्हादकारक' असा आहे, ह्मणून तें "चंद्र" हें नांव, रात्रीपतीला जसें अन्वर्थक, ह्मणजे त्याच्या गुणाला केवळ अनुसरून आहे; किंवा "तपन" ह्मणजे ज्याचा प्रताप मोठा तो, असें हें नांव, दिवाकर जो सूर्य त्याला जसें अन्वर्थक आहे; तद्वतच "राजा" ह्मणजे सर्व प्रजेचें रंजन करणारा* हें नांव त्या रघुला अन्वर्थक ह्मणजे त्याच्या गुणांला केवळ अनुसरून होतें.

यावरून पाहतां राजा ह्मटला ह्मणजे त्यानें सर्व प्रजेच्या कल्याणाकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे हें उघड आहे. परंतु हा अर्थ आतांच्या राजांमध्यें वसतो आहे काय ? आपल्या ज्या प्रजा आहेत त्यांना सुखदुःखें कोणतीं आहेत, आपल्या राज्याचें उत्पन्न काय, त्याचा खर्च किती, देशामध्यें कलाकौशल्यें, विद्या वगैरे कोणकोणत्या वाढताहेत, कोणत्या बुडताहेत, दुष्ट लोक कोण, त्यांचे आचार कसे, त्यांपासून प्रजेला पीडा काय होते, त्यांच्या निराकरणार्थ आपण काय करीत आहों, सज्जन कोण, त्यांच्या कल्याणार्थही आपण काय करीत आहों, याजकडे लक्ष देणें हें कितपत घडत आहे हें सांगण्याची कांहीं गरज नाहीं. पण सामान्यतः राजे ह्मटले ह्मणजे हेकट, अविचारी, सदाचैनी, आणि खुषमस्कऱ्यांचे आणि विलासीजनांचे भक्त असा मात्र उलट समज होत चालला आहे. एकदोनस्थळीं या लक्षणाला बाध येईल असें कित्येक जण ह्मणतात. ईश्वर करो आणि खरोखरी तो बाध येवो. त्यांना "राजा" शब्दाचा खरा अर्थ लागू होवो ह्मणजे झालें. तथापि बहुतांशीं पाहतां राजे लोक जसे असावे तसे नाहींत हें तर स्पष्ट दिसत आहे. मध्यें मध्यें कांहीं रत्नें उत्पन्न होऊन गेलीं खरीं, पण तीं शेवटचींच. सर्व देशभर दारू, भांग, गांज्या इत्यादि मादक पदार्थांच्या सेवनास उत्तेजन देऊन लोकांना रंगेल करणें हा जर प्रकृतिरंजनाचा अर्थ घेतला तर मात्र सर्वत्र प्रकृतिरंजन ठीक चाललें आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं!!

धर्मज्ञान व परमार्थज्ञान यांजकडे पाहिलें तर तेथें ही तीच अवस्था. याच्या संबंधानें पाहतां, हरदास, पुराणिक, भिक्षुक आणि वेदांती हा एक वर्ग; दुसरा वर्ग म्हटला ह्मणजे संन्यासी; आणि तिसरा उपाध्ये.

हरदास, पुराणिक, भिक्षुक आणि उपदेशक वेदांती यांची सध्यांची स्थिति जर पाहिली तर द्रव्यावर सर्वांची नजर. 'कोण कोणाचें आहे, या सृष्टीमध्यें येतो कोण, जातो कोण; द्रव्य कोणाचें, घर कोणाचे, तुमचें तें आमचें, आणि आमचें त्याची गोष्ट मात्र निराळी, हा सर्व मायापाश आहे, जें कांहीं दानधर्मांत खर्चेल तेवढेंच उपयोगी पडेल, इंद्रियांचीं कर्में इंद्रियांनीं केलीं तेथें कोणाचा अभिमान कोणाला'!! आलीकडेस बहुतेकांच्या तोंडून अशी एक म्हण म्यां ऐकिली आहे ती ही कीं "सर्व पत्करतील पण वेदांत्याशीं गांठ पडूं नये". ही म्हण अशा वेदांत्यांस खरोखरी लागू आहे असें मला वाटतें. वेदांताचें मी कांहीं अध्ययन केलें आहे असें नाहीं, परंतु त्याविषयीं मला थोडेंसें जें कांहीं समजतें त्यावरून मला तर

* 'राजा' ह्मणजे 'रंजन करणारा' हा अर्थ फक्त कवीनें केलेला आहे. मूळचा अर्थ, 'जो शोभतो तो राजा' असा आहे. तथापि कवीच्या मनावरून त्याविळच्या लोकांच्या मनचा अर्थ असा होता ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

स्पष्ट दिसते कीं सांप्रत जे वेदांती या नांवानें शेंकडों लोक मोडतात त्यांमध्यें खरे वेदांती क्वचितच असतील. सांप्रतच्या वेदांत्यांनीं आळस वाढविला आहे, परंतु खरे वेदांती या मताचे नसावेत असें मला वाटतें. जर भगवद्गीता हें सर्व वेदांताचें सार ही गोष्ट खरी, तर त्या गीतेचा मुख्य हेतु अर्जुनाला आळसांतून व मोहांतून दूर करून उद्योगाला लावणें हा स्पष्ट आहे. पांडवांना दुर्योधनानें अनेकपरी पीडा देऊन शेवटीं अरण्यवासास पाठविलें, अज्ञातवास करविला, परंतु तें सर्व सहन करून, पांडव परत येऊन, आपला राज्यभाग मागूं लागले; त्यांचा धिक्कारच झाला, कृष्णानें पुष्कळ मध्यस्था केल्या, कलह वाढूं नये ह्मणून नानातऱ्हा सांगितल्या, सर्व राज्याचा तंटा फक्त दोनचार खेड्यांवर मिटण्यास पांडव तयार झाले; परंतु कोणत्याही प्रकारें दुर्योधन त्यांना सुख होऊं देईना. तेव्हां युद्धाची तयारी झाली. सर्व सैन्य सिद्ध होऊन आतां युद्धास आरंभ होणार, अशा वेळीं अर्जुनास दया आणि मोह उत्पन्न होऊन, लढाई सोडून निघून जाण्यास तो पाहूं लागला. तेव्हां कृष्णानें त्याला नानाप्रकारें उपदेश करून, त्याचा मोह घालवून भित्रेपणाचा धिक्कार करून त्याला आपल्या क्षात्र धर्माचें सत्व राखण्याची प्रेरणा केली, त्याचें आलस्य घालविलें. सारांश त्याला फक्त दैवावर हवाला ठेवून आलस्यामध्यें राहूं दिलें नाहीं. त्याला उद्योगाला प्रवृत्त केलें. या वेळचा जो कृष्णाचा अर्जुनास उपदेश त्यालाच "भगवद्गीता" हें नांव आहे, व सर्व वेदांतांचें हें सार होय, असें सर्वांचें मत आहे. या गोष्टीवरून पाहतां सांप्रतच्या वेदांत्यांमध्यें आळसाची वृद्धि करणें व दैवावर भार ठेवून बसणें हें जें मत पसरत चाललें आहे, हीं अगदीं नीच स्थिति होय, यांत कांहीं संदेह नाहीं. आणि हें तर उघड आहे कीं जे खरे वेदांती ते संसारामध्यें राहूनच परमेश्वर प्राप्तीची इच्छा धरणें हाच उत्तम मार्ग ह्मणतात. यावरून पाहतां पैसा काढण्याचा जो वेदांत हल्लीं पसरत चालला आहे तो नीच स्थितिसूचक होय यांत संशय नाहीं.

आतां संन्यासी. यामध्यें खरे संन्यासी नाहींत असें मीं ह्मणूं शकत नाहीं, तथापि बहुतेक सामान्य संन्याशाची स्थिति पाहिली असतां ईश्वराला सुद्धां फसविण्याकडे त्यांचा कल. पहा संन्याशाच्या वर्तणुकीच्या नियमांवरूनच स्पष्ट दिसतें कीं, त्याणें आपल्या जन्माचें सार्थक करावें हा तर एक हेतु खरा, पण तो कोणत्या रीतीनें ? तर आपले काम क्रोधादि षड्रिपु जिंकून सर्व पृथ्वीवरील लोकांच्या कल्याणार्थ त्यांस सदुपदेश करीत निरंतर भ्रमण करीत असावें. सर्व जगाचें कल्याण हाच त्याच्या आश्रमाचा मुख्य हेतु असल्यामुळें धर्मशास्त्रकर्त्यांनीं लोककल्याणाच्या संबंधानें कोणतीही अडचण ठेविली नाहीं. कोठेंही जा, कोठेंही खा, सर्व जग तुमचेंच समजा, पण वेगळा द्रव्यसंग्रह करण्याची इच्छा धरूं नका. पोटाची काळजी करूं नका. शारीर क्लेशाला भिऊं नका. हे सर्व कशाकरितां ? तर सर्व जगाच्या कल्याणाकरितां. ह्मणून तो कोठेंही गेला, कोठेंही मेला, तरी त्याला उत्तरक्रिया नको, जाळा, पुरा, किंवा पाण्यांत बुडवा, पाहिजे तें करा, सर्व जगाच्या कल्याणामुळें तो जीवन्मुक्तच आहे. त्याला वेगळ्या संसाराची इच्छा होऊं नये ह्मणून मात्र त्याला अशा अडचणी करून ठेविल्या कीं त्याणें द्रव्याला शिवूं नये, द्रव्याचे नांवही घेऊं नये, स्त्रीचें दर्शन करूं नये,

अग्नीला शिवूं नये, पर्जन्य काळचे चार महिने शिवाय करून तीन दिवस एकास्थळीं राहूं नये, परंतु सध्याची स्थिति जर पाहिली तर द्रव्याला शिवूं नये हें खरें. पण तें आपल्या शाटीमध्यें बांधून घेण्यास कांहीं अडचण नाहीं, त्याला हात लावूं नये ह्मणजे झालें! पैशाचें नांव घेऊं नये, तरी वरचे नारायण, मुळचे नारायण, या नांवांनीं व्याज मुद्दल करून सावकारी करण्यास कांहीं अडचण नाहीं! अग्नीला शिवूं नये ही तर नफ्याची गोष्ट, तेणेंकरून शिष्यमंडळी जमविण्यास किंवा *पुडीचा हक्क चालविण्यास फार चांगली सोय सांपडते. स्त्रीचें दर्शन करूं नये, तर स्वारीमागें कोस अर्धकोस तिला ठेवून मेहुणे सासरे इत्यादि प्रकारें संसार चालविण्यास कांहीं नड नाहीं!! हें सर्व यथास्थित. पण उपदेशाच्या नांवानें मात्र बोलूं नये. तेव्हां ही स्थिति कशी काय, हें सांगणें नकोच!

आतां उपाध्याय. उपाध्याय ह्मटला ह्मणजे यजमानाचें सर्व गुरुत्व ह्याजकडे, परंतु हल्लीं पाहतां यजमानाच्या जिवावर ते हजारो रुपये कमावितात. जन्मआरभ्य उत्तर संस्कार पर्यंत त्यांची दक्षिणा ताजी आहेच. तरी त्यांस धर्म ह्मणून आपल्या पूर्वजांनीं काय सांगितलें आहे हें आधीं समजण्याचीच मारामार. मग यजमानास तदनुसार उपदेश. सामान्य भिक्षुकांमध्यें आणि उपाध्यायामध्यें ह्मणण्यासारखा कांहींच भेद दिसत नाहीं; पण दक्षणेच्या वेळीं मात्र यजमानाच्या दरिद्र स्थितीकडे पाहणें हें तर त्यांना सर्व दुःखांत मोठें दुःख वाटतें. इतकें मात्र ह्मणतील कीं आतां काय? कलियुगाचा पाया, तेव्हां सर्वांस धर्म नकोसा झाला, त्याला काय करणार! पण भटजीबावांना स्वतःना कांहीं समजतें काय? त्याची मारामारच. यामध्येंही अपवाद नाहींत असें नाहीं, पण सामान्य स्वरूप असें आहे.

सामान्य जनांकडे पाहिलें तर ईश्वरोपासनेचें त्यांना कितपत ज्ञान असतें व त्यांची ते कितपत काळजी करितात, हें पाहून फार वाईट वाटतें. अगदीं कनिष्ट लोकांमध्यें एक भक्तीचें बळ तरी मोठें आहे. परंतु इतर ठिकाणीं आलीकडे ईश्वरभक्ति किंवा उपासना हा एक चेष्टेचा प्रकार होऊन गेला आहे. मनामध्यें कसेही असो, तें तर कांहीं दुसऱ्याला समजतच नाहीं, तरी आचार कसाही असो—पण जुन्या लोकांमध्यें सोवळें ओवळें* याचा मोठा बाऊ आणि पाण्याचा शिंतोडा यामध्येंच कायतो सर्व धर्म तुंबून राहिला आहे, आणि नव्या लोकांमध्यें डोळे झांकून आकाशांतील निराकार देवा ह्मणून हाका मारणें यामध्येंच सर्व धर्माचें सार भरलें आहे. जुन्या लोकांची चेष्टा करणें आणि नव्यांची प्रशंसा करणें हाच कित्येकांचा धर्म, तसेंच नव्यांची चेष्टाकरून जुन्याची स्तुति करणें हा दुसऱ्या कित्येकांचा धर्म, आणि सर्वांचीच चेष्टा करून—"अः, धर्म धर्म ह्मणजे काय? सर्व ढोंग आहे" असेंही ह्मणणारे बरेच वाढत चालले आहेत. तेव्हां ही स्थिति कितपत बरी वाईट हें उघड दिसत आहे.

व्याकरण, अलंकार, तर्क, नाटक, काव्यादि यांची स्थिति जर पाहिली तर तीही

*यावरून, सोवळें ओवळें इत्यादि विचार वस्तुतः वाईट असें माझें ह्मणणें अगदीं नाहीं. त्यांचा मूळचा हेतु फार उत्तम, स्वच्छतेला व आरोग्याला त्यापासून मोठी मदत हें मी कबूल करतों; तथापि तेंच काय तें सर्व ब्रह्मकर्म मानणें, व उगीच ओढाताणीचें सोवळें करणें, अर्थात् मूळचा अर्थ विसरणें हें वाईट, इतकेंच माझें ह्मणणें आहे.

मोडतीच आहे. परंतु पुनः आलीकडे दहापांच वर्षांत विद्यालयीं परीक्षेकरितां म्हणून या विषयांकडे कांहीं लक्ष लागत चाललें आहे. तथापि इतर सर्व चलनवलनाच्या म्हणजे उद्योगाच्या गोष्टी मागें पडत चालल्या असून, यांजकडे जरी लक्ष लागलें तरी त्यांत मोठेसें हांशील नाहीं. म्हणून त्यांचें तितकें महत्व मानतां येत नाहीं.

आतां वैद्यशास्त्राकेडे पाहूं. वैद्यकाच्या नावानें खपणारे बरेच संस्कृत प्राकृत ग्रंथ आलीकडे झाले आहेत. परंतु त्या आलीकडच्या ग्रंथकारांतील बहुतेकांस मूळच्या जुन्या ग्रंथांच्या पलीकडे कांहीं ज्यास्त समजत होतें किंवा नाहीं, याची भ्रांतिच आहे. हें तर असो. पण त्यांतील बहुतेकांनीं जुने ग्रंथ पाहिले होते किंवा नाहीं, व पाहिले असल्यास त्यांस ते समजत होते किंवा नाहीं याचाहि संशयच दिसतो. लांबलचक औषधांच्या यादी, भस्माच्या कृति, मात्रांचे प्रकार, इत्यादि पुष्कळ पाहण्यांत येतात; परंतु शारीरज्ञान, इंद्रियव्यापारज्ञान, औषधांच्या उपपत्ति, त्यांचे क्रियाकलाप, रोगनिदान, चिकित्सा, वगैरे ज्या गोष्टी शेकडों किंवा हजारों वर्षांमागील वैद्यांनीं लिहून ठेविल्या होत्या, त्यांमध्ये खरें खोटें व आलीकडच्या काळास अनुसरून किती आहे, हें तपासून ते ग्रंथ ताजे करण्याची शक्ति आलीकडच्या वैद्यांमध्यें आहे असें म्हणणें फारच कठीण पडेल. कित्येक नाडीपरीक्षेची, कित्येक मार्मिक औषधांची, कित्येक भस्में करण्याची फुशारकी सांगतात. पण धन्वंतरीच्या म्हणण्याप्रमाणें वैद्यकाचा पायाशुद्ध अभ्यास केलेले व अनुभवानें धीट जाहलेले वैद्य आपल्या देशीं किती असतील हें परमेश्वरासच ठाऊक. या विषयाच्या संबंधाने जो आपल्या देशीं इंग्लिश वैद्यकाचा प्रसार चालला आहे त्याविषयींही थोडेसें बोलणें अवश्य आहे. सांप्रतच्या युरोपियन वैद्यकामध्यें, शस्त्रक्रियेइतक्या, औषधीविद्या आणि रोगपरीक्षा या दोन्ही गोष्टी परिपक्व जाहल्या आहेत असें जरी नाहीं, तथापि दिवसेंदिवस अनुभवानुसार त्यांमध्यें चालन होत असून तेणेंकरून सुधारणा होत असल्यामुळें त्यांपासून पुष्कळ हित होण्याचा संभव आहे, यांत किंमपि संशय नाहीं. तथापि आजपर्यंत ज्या रीतीनें युरोपियन वैद्यकांत प्रवीण जाहलेले आपले लोक त्या वैद्यकाचा उपयोग करीत आले, त्याच रीतीनें पुढेंही करण्याचा पाठ ठेवतील तर माझ्या अल्पमतीला असें वाटतें कीं, जरी त्यांच्या श्रमाबद्दल त्यांना पुष्कळ मोठी फी (गिऱ्हाईकाकडून दस्तुरी) मिळेल व ते पुष्कळ सधन होतील, तथापि त्यांच्या हातून खरोखरी आपल्या देशावर मोठासा उपकार घडला, व त्यांहीं देशाचें कांहीं कल्याण केलें, असें म्हणण्यास मोठीच अडचण राहील. आपल्या देशीं वैद्यकाचे जे प्राचीन ग्रंथ आहेत त्यांचा उद्धार करण्याचें काम सध्यां त्यांचें आहे; असें असतां जुने वैद्यक आणि नवें वैद्यक हे जसें कांहीं एकमेकांचे प्राण घातक शत्रुच, असें वाटण्याजोगें नव्या वैद्यांचें जुन्या वैद्यकांशीं आचरण असतें ही मोठी दुःखाची गोष्ट होय. ते म्हणतील कीं "जुन्या वैद्यांनीं हवी तर आपली बाजू सांभाळावी." परंतु हें म्हणणें अगदीं अप्रशस्त होय. जुन्या वैद्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, म्हणून त्यांना कदाचित् नवें वैद्यक सहन होत नसलें तर यांत त्यांचा मोठासा दोष नाहीं, व नवीन नवीन प्रकार शिकण्यांचें त्यांचें आतां वयही नाहीं. त्या पक्षीं जुन्या वैद्यां-

चीं मतें वगैरे नीट समजून घेऊन तीं आलीकडच्या मतांशीं नीट ताडून पाहून, त्याची उत्तम रीतीनें व्यवस्था करण्याचें ओझें नव्या वैद्यांवर असतां, जर ते त्याचा धिक्कार करितील, तर ते खचित दोषी आहेत यांत कांहीं संशय नाहीं. दुसरें, आपल्या देशीं हजारों वनस्पती व औषधें असतां, व युरोपियन वैद्यकाला लागणाऱ्या औषधांशींही त्यांतून बहुतेक मिळत असतां त्यांना तिकडूनच सर्व औषधें आणल्यावांचून निर्वाह नाहीं हीं दुःखाची गोष्ट होय. या गोष्टीला ते अनेक सबबा सांगतील, पण माझी तर अशी खात्री आहे कीं कित्येक अगदींच आपल्या देशीं न मिळणारीं औषधें शिवाय करून, बाकीचीं मिळणारीं तींही औषधें आमच्या देशांतून सिद्ध करून घेतां येत नाहींत अशी स्थिति जोंपर्यंत राहील, तोंपर्यंत आमच्या देशचें वैद्यक चांगल्या स्थितींत आहे असें म्हणतां येणार नाहीं, आणि गोरगरिबांचें ओझेंही कमी होणार नाहीं. दुसरी एक गोष्ट येथें कळविण्यास मला मोठें दुःख वाटतें कीं, दुखणेकऱ्याच्या रोगाची परीक्षा, त्याचे मानसिक विकार, त्याला योग्य औषधोपचार, त्याची रोगनिर्मुक्तता, व त्याच्या आयुष्याची काळजी, यांजकडे जितकें लक्ष लावावें, त्यापेक्षां आपल्या फीकडे व पांचचार मिनिटांच्या आंतच झटपट आपली फेरी आटपून तेथून चटपट निघून जाण्याकडे जास्त लक्ष ठेवणें, हें खऱ्या डाक्टराचें लक्षण अशी आलीकडे समजूत होत चालली आहे. या माझ्या स्पष्ट बोलण्याबद्दल माझे मित्र डाक्टर लोक यास राग येईल तर त्यांनीं मला क्षमा करावी अशी मी त्यांस विनंती करितों.

व्यापार—प्राचीनकाळीं आपल्या देशीं व्यापार कसा चालत होता व तो कोण चालवीत होते याविषयीं स्पष्ट लेख नाहीं. परंतु सध्याच्या स्थितीकडे पाहतां ती फार शोकास्पद आहे. भरतखंडाच्या बाहेरचा म्हणजे युरोप, चीन, अमेरिका इत्यादि स्थळींचा सर्व व्यापार परकीय लोकांच्या हातीं आहे. फक्त किरकोळ व्यापार—देशांतल्या देशांतच कोठें तेल, तांदुळ, मिर्ची, तंबाखू, वगैरे जिनस आपल्या लोकांच्या हातीं आहेत; पण तेही किती दिवस चालतील याचा नेम नाहीं. तेव्हां ही कांहीं चांगली स्थिति आहे असें नाहीं.

शेती—याविषयीं ही पूर्वीची कांहीं माहिती नाहीं. तथापि जरी आपल्या देशची जमीन फार सुपीक आहे तरी इतर देशांच्या तुलनेनें पाहतां आमच्या देशीं शेतीकडे जसें लक्ष लागावें तसें अद्यापि लागत नाहीं. यामुळें रयतेचें दरिद्र दूर होण्यास पुष्कळ अडचणी आहेत. जमीन तयार करणें, खत घालणें, वारंवार नवीं नवीं पिकें उत्पन्न करणें, पाट बांधारे बांधून जमीन भिजविणें, बागाईत तयार करणें वगैरे पुष्कळ गोष्टी अद्यापि अगदीं बाल्यदशेतच आहेत.

कलाकौशल्याच्या संबंधानें पाहतां सांप्रतकाळीं आपल्या देशाची फारच वाईट स्थिति चालली आहे. कलाकौशल्यांत येणाऱ्या गाणें वजावणें वगैरे गोष्टीही मोडक्या दशेतच आहेत; तथापि त्यांजकडे फारसें लक्ष न देतां केवळ संसाराला अगदी आवश्यक अशा गोष्टींकडेसच जरी पाहिलें तरी, आपला चरितार्थ चालविण्याला, राहण्याला, पांघरण्याला, डामडौलाला, वगैरे ज्या शेकडो वस्तु आपणास नेहमीं लागतात त्यांचा शतांशही आमच्या देशीं सांप्रत उत्पन्न होत नाहीं. पहा, धोत्रें घ्या, अंगरखे घ्या, बनात घ्या, लुगडीं

ड्या, सुई, दोरा, चाकू, कातर, आरसे, हांड्या, झुंबर, कागद, लेखणी, शाई, खिळे, कुऱ्हाडी, कोयते, पाहरा, गाड्या, पेनसिली, पाट्या, घड्याळें, छत्र्या, जोडे, काठ्या, ग, ळसऱ्या, खेळणीं, बाहुल्या, लाखोटे, लाख, सुतळी, मेणबत्त्या, साबण, सर्व औषधी, इत्यादि बहुतेक सर्व प्रकारच्या जिनसांचे कारखाने, परदेशांत असून, तेथील माल इकडे येत आहे. त्यांतील शेकडो जिनसा आमच्या एथें होण्याजोग्या असून, त्यांचे कारखाने कोणी घालीत नाहीं, व ज्यांणीं घालण्याचा प्रयत्न केला त्यांस द्रव्यादिकांचें साह्य मिळत नाहीं. याप्रमाणें कलाकौशल्याची दशा!

यारीतीनें इतर देशांतून इकडे माल येत असल्यामुळें, आमच्या लोकांचा तितका धंदा बसला. लोकांना मार्ग ह्मटला ह्मणजे एक चाकरी राहिली. अमरकोशामध्यें अमरसिंहानें चाकरी शब्दाला संस्कृत शब्द दोन दिले आहेत; एक "सेवा," आणि दुसरा "श्ववृत्ति." "सेवा" शब्द उघड आहेच; "श्ववृत्ति" ह्मणजे कुत्र्याची स्थिति. जसा कुत्रा भाकरीच्या तुकड्यासाठीं सदासर्वदा तोंड पसरून धन्याची मिन्नतवारी करीत असतो, तशीच चाकराची स्थिति आहे, यांत कांहीं संशय नाहीं. ह्मटलें आहे.—

सेवया धनमिच्छद्भिः सेवकैः पश्य यत्कृतम् ।
स्वायत्तत्वं शरीरस्य मूढैस्त्वदपि हारितम् ॥

अर्थ—चाकरीच्या योगानें संपत्ति मिळविण्याचा जे प्रयत्न करितात, त्या मूढांनीं काय केलें तें पहा—आपल्या शरीराचें स्वातंत्र्य मात्र घालविलें, आणि शेवटीं संपति नाहींती नाहींच. हें तर काय! पण दुसरा एक कवि ह्मणतो—

सेवा श्ववृत्तिर्येरुक्ता न तैः सम्यगुदाहृतम् ।
स्वच्छंदचारी कुत्र श्वा विक्रीतासुः क्व सेवकः ॥

अर्थ—चाकरी ह्मणजे कुत्र्याची स्थिति असें जे ह्मणतात, त्यांचें ह्मणणें बरोबर नाहीं; कारण कुत्रा जरी ह्माला तरी तो स्वच्छंदचारी असतो, पण चाकर ह्मटला ह्मणजे त्याचें सर्व जन्म दुसऱ्याला विकलेलें असतें. तेव्हां या दोघांची स्थिति सारखी, असें कसें ह्मणावें?

दुसरा एक कवि ह्मणतो.—

मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातलो जल्पको वा
धृष्टः पार्श्वे वसति च सदा दूरतस्त्वप्रगल्भः ।
क्षान्त्या भीरुर्यदिह सहते प्रायशो नाभिजातः
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ॥

अर्थ—जर मौन धरलें, तर मुका असें नांव मिळतें; बोलण्यामध्यें चांगला चतुर असला, तर चावट, बडबड्या हें विशेषण लागतें; जरा जवळ उभा राहिला, तर कायरे, किती उद्धत हा! दूर उभा राहिला, तर भितरा; सहनशीलता धरली तर भेकड; कांहीं जबाब केला, तर याला रीत नाहीं. सारांश सेवाधर्म ह्मणजे चाकरी ही योग्यांना सुद्धां फार कठीण आहे.

याप्रमाणें प्राचीनकाळापासून चाकरीचा धिक्कारच होत आला असतांही, सध्यांच्या स्थितीमध्यें बहुधा दुसरा मार्गच राहिला नसल्यामुळें, चाकरी ह्मणजे एक परब्रह्म अशी आमच्या लोकांची समजूत होऊन गेली आहे. मुलगा बारा चौदा वर्षांचा झाला ह्मणजे त्याला जिकडून तिकडून प्रश्न होऊं लागतात, "कारे बोभा, आतां तूं चाकरी कधीं करूं लागणार? अजून किती दिवस शिकायचें?" सारांश जितकी जितकी ह्मणून वाईट स्थिति, तितकी तितकी आह्मास ती अधिकाधिक चिकटत चालली आहे. यावरून ह्मणजे कोणी चाकरी करूंच नये, तें कांहीं महापा-

तक आहे असा माझा भाव नाहीं. तसा प्रकार झाल्यास सृष्टि मुळींच चालणार नाहीं. मीही स्वत: चाकर असल्यामुळे मला आधीं पोट बांधून ठेवावें लागेल. माझें म्हणणे इतकेंच कीं चाकरी हा आपद्धर्म आहे, अडलेल्या मनुष्यानें ती केलीच पाहिजे. परंतु चाकरी मिळविली म्हणजे आपण कृतकृत्य झालों, आकाशास हात लावले, असें न समजतां, तींतून मुक्त होऊन, स्वतंत्रतेचा कांहीं धंदा उद्योग आपल्यास मिळविण्याचा प्रत्येकानें योग्य प्रयत्न केला पाहिजे. परंतु ही गोष्ट आम्ही लक्षांत न ठेविल्यामुळें आमच्या देशीं चाकरी करणारे पुष्कळ आणि चाकऱ्या थोड्या, अशी दुर्धर अवस्था होऊन गेली आहे. तशांत आणखी देशांतील सर्व मोठ्या पगारांच्या जागा युरोपियन लोकांकरितांच केलेल्या किंवा नेमलेल्या असल्यामुळें, मोठ्या प्रयत्नानें एकादी कोठें चाकरी मिळाली, तरी तिजपासून म्हणण्याजोगें कांहीं फळ निष्पन्न होत नाहीं, व सदाचें दरिद्र चुकत नाहीं. आगगाडी, तारायंत्र, जमाबंदी, फौजदारी, न्यायखातें, विद्याखातें, जंगल, मिठागर, जकात, लश्कर वगैरे अनेक खात्यांपैकीं हरएकामध्यें पाहिलें तरी हीच स्थिति. तेव्हां चाकरीच्या संबंधानें ही आपल्या देशाची दशा नीट आहे असें नाहीं.

जमीनदार वगैरे लोक हळू हळू नष्ट होत चालले, यामुळें त्यांच्या इलाख्यामध्यें ही चाकरी मिळण्याच्या गैरसोई वाढत चालल्या आहेत.

आपल्या लोकांची शारीरिस्थिति तर फारच दुःखकारक आहे. आपल्या देशीं दिवसें दिवस उत्पत्ति अशक्त व अल्पायुषी होत चालली, ही तर फारच भयंकर गोष्ट होय. साठ सत्तर वर्षां मागचे लोक जर आपण पाहिले, तर त्यांच्या आणि आतांच्या लोकांच्या शरीराचा बांधा, यांमध्येच जमीन अस्मानांचें अंतर दृष्टीस पडतें. आणि अशीच स्थिति जर कांहीं दिवस चालली, तर तिचा परिणाम कोठवर पोंचेल याचा कांहींच तर्क होत नाहीं.

कालिदास कवीनें, रघुराजा तारुण्यांत आला असतां त्याच्या शरीराचें वर्णन केलें आहे तें असें—

युवा युगव्यायतबाहुरंसल:।
कपाटवक्षा: परिणद्धकन्धर:।

रथाचें जें जुखाड त्यासारखे त्याचे दीर्घ बाहु होते; शरीरानें चांगला पुष्ट असून बलवान्; त्याची छाती जशी कांहीं एखाद्या मोठ्या दरवाज्याचें रुंद कवाडच; त्याची मान घेरदार.

तसेंच एके ठिकाणीं दिलीप राजाचें वर्णन करतांना तो म्हणतो—

व्यूढोरस्को वृषस्कन्ध: शालप्रांशुर्महाभुज:।

त्याची छाती मोठी रुंद होती. मोठ्या वृषभाच्या स्कंधासारखे त्याचे स्कंध पुष्ट होते. तो शालवृक्षासारखा उंच होता. त्याचे भुज मोठे विशाळ होते.—हीं वर्णनें जरी किंचित् अतिशयोक्तीचीं असलीं, तरी पूर्वीच्या लोकांना आपलें शरीर कसे असावेसे वाटत असे, याचें सहज अनुमान होतें.

पण आलिकडे या दहावीस वर्षांत जन्मलेले तरुण पुरुष, व त्यांत विशेषें करून या मुंबईत शहरांतले, यांजकडे जर आपण नीट नजर लावून पाहिलें, तर खरोखरीं आपणांस फार दु:ख वाटतें. एथील एलफिन्स्टन् विद्यालयांत सातआठ वर्षें शिक्षकीचें काम मी करीत असल्यामुळें, बारांपासून अठरा वीस वर्षांपर्यंत वयाचे मुलगे दोन चार हजार

तरी माझ्या नीट पाहण्यांत आले असतील. त्यांशिवाय बाहेरचे. परंतु बहुधा छाती दुखण्याचे रोग, अशक्ताई, किंवा दृष्टिमांद्य यांणीं सोडलेले, असे धष्टपुष्ट, सशक्त व तरुण या नांवाला योग्य, असे त्यांमध्ये फारच थोडे माझ्या दृष्टीस पडले आहेत. हें तर काय, मनुष्य चांगला धष्टपुष्ट असणें, हें कांहींसें हलकटपणाचें लक्षण व तें सभ्य जनांस अयोग्य, अशी कांहीं पोरकट समजूत ओलीकडे होत चालली आहे.—"आमचा मुलगा फार नाजूक, त्याला दुसऱ्यांच्या मुलांसारिखें पुष्कळ जेवण चालत नाहीं. आंगावरचें धोतर सुद्धां जड लागतें, म्हणून मुद्दाम अगदी बारीक धोतरजोडा नुकताच घेऊन दिला आहे." अशीं आपल्या मुलांची वेडी तारीफ करण्याचा आईबापांस संतोष वाटतो, व मुलालाही वाटतें कीं "वाः ! एकून मी तर मोठा नाजूक श्रीमंती मनुष्य आहें !" याप्रमाणें त्याचे विचार अगदी बिघडून गेले असल्यामुळें, कोणेकानें जर त्यांच्या शरीराची अमळ तारीफ करून म्हटलें, "कांहो, तुम्ही तर बोआ चांगले धष्टपुष्ट आहां, तुम्ही मोठे दैववान्", तर त्यांना मोठा राग येतो, व जशा कांहीं त्याणें आपणास शिव्याच दिल्या, असा त्यांस भास होतो. आधींच पिंड अशक्त, त्यांत आणखी स्वतंत्रतेचा अभाव, अल्पवयामध्ये लग्न, शरीर व्यायामाचा तिरस्कार, खोटी छानछोकी, वाईट व्यसनें, अशा अशा गोष्टी जर एकत्र मिळाल्या, तर मग काय पुसायाचे ! यापासून पुढें जी संतति व्हायाची तिची दशा काय होईल हें सांगायास नकोच. हरहर! ही गोष्ट लक्षांत आणितां मोठमोठ्या शाळांतील मुलांनीं चेंडूफळी किंवा कसरत या दोहोंतून कोणत्याही एका प्रकारचा तरी व्यायाम अवश्य केला पाहिजे, असा ठराव अमलांत आणण्याचा प्रयत्न चालला आहे, तसेंच फौजदारीकडे काम मागणाऱ्या लोकांना घोड्यावर बसण्याची चांगली सवई असली पाहिजे असा सरकारानें ठराव केला आहे, हें पाहून तितकें समाधान वाटतें.

आपल्या लोकांचा सांप्रत नीतिदृष्ट्या आचार पाहिला असतां, त्यासारखी दुःखकारक स्थिति तर दुसरी कोणतीच दिसत नाहीं, ही मोठी लज्जेची गोष्ट होय. पण काय करावें? लज्जेची गोष्ट म्हणून लपवून ठेवणें अयोग्य, व ती कधीं लपणारही नाहीं. याजकरितां, ती बाहेर काढून तिचा जितका, उच्छेद होईल तितका अवश्य अवश्य केलाच पाहिजे.—

पूर्वी हरिश्चंद्र राजा झाला, त्याणें स्वप्नामध्ये दिलेलें वचन राखण्याकरितां, सर्व राज्य ही त्यागिलें, पण आपलें सत्त्व जाऊं दिलें नाहीं. केवढा धन्य तो पुरुष ! दाशरथी रामचंद्रानें फक्त पित्याची आज्ञा पाळण्याकरितां चौदा वर्षें वनवास काढून अनेक दुःखें भोगिलीं. भरतानें आपला सापत्नबंधु रामचंद्र राज्य सोडून गेला, म्हणून तो परत येई तों पर्यंत चौदावर्षें रडून दिवस काढिले. शिबिराजाने एका पारव्याचें रक्षण करण्याचें वचन दिल्यानंतर आपल्या शरीराचें मांसही तोडून दिलें, पण तो पारवा दिला नाहीं. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कृपाचार्य असे असे महान् पराक्रमी वीर, आपला राजा जो दुर्योधन तो दुष्ट, आपले प्रतिपक्षी पांडव हे सत्त्वशील, असें स्पष्ट जाणत होते, आणि दुष्ट कृत्य सोडण्याविषयीं वारंवार ते दुर्योधनास आपल्याकडून होईल तितका उपदेशही करीत असत, तथापि युद्धाची वेळ येतांच ते, आपल्या अन्नास स्मरून, शेवटपर्यंत आपल्या त्या ध-

न्याचाच पक्ष धरून राहिले; आणि जरी आपला मोड होणार हें त्यांना स्पष्ट समजलें होतें, तरी शेवटपर्यंत शौर्यानें लढून त्यांनीं आपल्या अन्नाचें सार्थक्यच केलें. कर्णानें दुर्योधनाचा पक्ष सोडून पांडवांस मिळावें, म्हणून त्याची आई जी कुंती तिनें पुष्कळ गोष्टी सांगितल्या, राज्यप्राप्तीची आशा कृष्णानें त्यास दाखविली; परंतु शेवटीं तो इतकेंच म्हणाला, "तुम्ही जा, तुमच्या राज्याची मला गरज नाहीं. आजपर्यंत मी ज्याचें अन्न खालें, आणि तुमच्याशीं युद्धास प्रवृत्त व्हावें ही गोष्ट ज्याच्या मनामध्यें मी होऊन भरून दिली, त्याचा त्याग करून मी तुम्हांस येऊन मिळेन असें तुम्हांला वाटतें काय? पण अशी गोष्ट कधीही घडणार नाहीं." शकुनिमामा जो दुष्ट मनुष्य, जो दुर्योधनाचा नाश करण्याच्या हेतूनेंच त्याचा हितशत्रु होऊन त्याच्या घरीं राहिला होता, तो असा दुष्ट असतांही, जेव्हां दुर्योधनाचा मोड झाला, तेव्हां तो फक्त आपल्या अन्नाला स्मरून, शत्रूच्या पक्षाला मिळाला नाहीं, आणि जिवाच्या आशेनें युद्धांतून पळून गेला नाहीं. सत्यवक्ता युधिष्ठिर, ज्यास धर्मराज हें नांव योग्य, त्यास, द्रोणाचार्यानें अश्वत्थाम्याच्या मरणाची वार्ता खरी किंवा खोटी असें विचारल्या वेळीं, फक्त सर्वांच्या आग्रहास्तव मोठ्या नाखुषीनें त्यानें "नरो वा कुंजरो वा" असे शब्द उच्चारिले, व तितक्यांत मतलबी लोकांनीं रणवाद्यांचा गजर करून "नरो" याच्या पुढील "वा कुंजरो वा" हे शब्द द्रोणाचार्यांच्या कानीं पडूं दिले नाहींत; यामुळें पुत्रशोकास्तव द्रोणाचार्य मृत्युवश झाला, येवढ्याकरितांच सर्व ब्रह्मांडभर युधिष्ठिराच्या नांवाची छीथू झाली!! या तर मागच्या गोष्टी, पण पन्ना दासीनें, आपल्या राजाच्या एकुलत्या बालकाचा, दुष्ट लोक खचीत वध करणार असें ऐकतांच खुद्द आपलें बालक त्या राजपुत्राच्या जागीं ठेवून, तो खरा राजपुत्र फळाच्या पाटीमध्यें लपवून दूर नेवून त्याचा जीव वांचविला. अशीं अशीं मनुष्यें ज्या देशांत होऊन गेलीं, त्या देशीं प्रत्यक्ष आपल्या पोटची अर्भक मुलगी नव्वद वर्षांच्या थेरड्यास दिल्यानें जर हजार बाराशें रुपये मिळून आपलें पोट जळतें अशी खात्री दिसली, तर त्या दुष्ट कृत्याला मागें पुढें न पाहणारे लोक हजारों दृष्टीस पडूं लागले! दहा पांच रुपये संग्रहास राहण्याजोगें, किंवहुना सरासरी मोठ्या काटाकाटीनें पोट चालेल अशा प्रकारचें एकादें काम आपल्या शेजाऱ्यास मिळत असलें, तर हरप्रयत्न करून, निनावी अर्ज पाठवून, खोट्या चाडड्या सांगून, तोंडपुजेपणा करून, किंवा कोणत्याही प्रकारची निंद्य वर्तणूक करून, त्याचें अन्न काढण्याला मागें पुढें न पाहणारे लोक वाढत चालले! कोणचाही कांहीं धंदारोजगार आरंभला असतां, त्यांतील इतर भागीदारांना व त्यांबरोबर दुसऱ्या अनेक लोकांना समूळ बुडवून फक्त आपलाच हात साधण्याचा पहिल्यापासूनच हेतु धरून, संधी प्राप्त होतांच, तसें अधम कृत्य करण्यास मागें न सरणारे लोक वाढत चालले! या कृत्यांपासून त्यांना जरी यश येत नाहीं ही गोष्ट खरी, तथापि दुसऱ्यांचा नाश करण्याची इच्छा वाढत चालली ही दुःखकारक गोष्ट होय.—ज्याचें अन्न खावें त्याच्या मुलांबाळांना दुर्गुण शिकवून, दुर्व्यसनांत निमग्न करून त्यांची सर्व संपदा लुटून फस्त करणारे लोक सर्वत्र वाढत चालले!—ज्याच्या अन्नावर स्वतः भि-

क्षापतीचे लक्षापति किंबहुना कोट्यधीश बनले, त्याला विसरून, थोड्याशा इनामाकरितां, किंवा दुसऱ्या कांहीं क्षुद्र लाभाकरितां, किंवा फक्त आपला मत्सरी स्वभाव तृप्त करण्याकरितां, राज्याचीं राज्यें धुळीस मिळविण्यास मागेंपुढें न पाहणारे लोक उत्पन्न झाले! हरहर! हें आपल्या देशाचें केवढें दुर्भाग्य! धिक्कार असो या आमच्या नीचावस्थेला! असें असतां ज्या देशामध्यें वालेससारखे स्वदेशाभिमानी थोर पुरुष होऊन गेले, त्या स्काटलंड देशाची उपमा आमच्या या नीचावस्थेप्रत पावलेल्या देशाला, व मुख्यत्वें या देशाच्या पश्चिम भागाला कित्येक लोक देऊं पाहतात! केवढें हे आश्चर्य! अशी ही अवस्था सर्व देशभर जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत एक इंग्रजी भाषा तर सोडा, पण आणखी दुसऱ्या दहा दहा भाषा जरी आम्ही शिकलों, शेकडों सभा केल्या, हजारों व्याख्यानें दिलीं, आणि वर्षांवीं वर्षें किंवा जन्माचे जन्म प्रार्थनेंत घालविले, तरी कांहीं निष्पन्न होणार नाहीं. पुराणांतील वांगी पुराणांत, आणि घरीं जातांच कांहीं नाहीं, अशीच अवस्था होऊन जाईल, तुकाराम साधूंनीं म्हटलें आहे.—

"नळी फुंकिली सोनारें
इकडुन तिकडुन गेलें वारें."

अशीच अवस्था आमच्या देशाची आहे.

अगदी जंगली, क्रूर व दुष्ट असे ज्यांना आम्ही मोठ्या तिरस्कारानें म्हणतों, त्या भिल्ल मांग, बेरड, लोकांपेक्षांही आम्ही नीच झालों. ते आम्हांपेक्षां श्रेष्ठ यांत संशय नाहीं. ते क्रूर खरे, पण ज्याच्या घरचें ते मीठ किंवा दूध खातील, त्याची चोरी किंवा नाश प्राणांतींही ते करणार नाहींत, अशी त्यांची निर्विवाद कीर्ति आहे. शाबास त्यांची!

प्राचीनकाळीं रोमन लोकांमध्यें रेग्युलस नांवाचा एक सेनापति होऊन गेला त्याला शत्रूंनीं पकडलें, आणि सांगितलें, कीं जर परत येण्याचें वचन देशील, तर सुटका करण्याचें बोलणें करण्याकरितां तुला स्वदेशीं जाऊं देऊं. तेव्हां तो वचन देऊन निघून गेला, पण सुट्याची गोष्ट त्याने काढलीच नाहीं; शत्रूंच्या राज्यांतील सर्व बातमी आपल्या लोकांस देऊन, लढाई चालू करण्याचाच त्यांच्या मनामध्यें त्याने विचार भरवून दिला. आणि शत्रु आपणास अनेक दुःखें देतील हें माहित असतां आपलें वचन राखण्याकरितांच त्यांपाशीं तो परत गेला; तेव्हां त्यांनीं त्याचें हें कृत्य पाहून, त्याला, आंतून खिळे लावलेल्या एका पिपांत घालून हालहाल करून त्याचा जीव घेतला. पण तो भ्याला नाहीं!

हें तर काय! पण शंभर सवाशें वर्षांमागें इंग्लंडामध्यें एक बंडवाला उत्पन्न झाला होता, त्याला "यङ् प्रिटेंडर" म्हणत. त्याचा जेव्हां अगदीं मोड झाला, तेव्हां तो पळून गेला. मग त्याला जो पकडून किंवा दाखवून देईल, त्याला तीन लाख रुपयांचें इनाम सरकारानें देऊं केलें. परंतु त्या तीन लक्षांना न जुमानतां एका चोरानें त्याला आपल्या खोपटामध्यें नेऊन लपवून ठेविलें, आणि आपलें वचन राखण्याकरितां चोरी करून त्याणें त्याच्या पोटास घालावें. शेवटीं दहा पंधरा रुपयांची एक गाय चोरल्यामुळें, त्याला पकडून फांशीं दिलें. पण यावरून पहा कीं दहापांच रुपयांची चोरी कोठें, आणि तीन लक्ष रुपये कोठें! पण नाहीं. एका वचनापुढें तीन लक्ष रुपये त्याला धुळीसमान! वहावा!

पण आमच्या देशाची स्थिति कशी? इ.

रहर ! प्राचीनकाळीं याची योग्यता काय होती! आतां काय झाली! सर्व पृथ्वीचें गुरुत्व कोठें आणि आमची ही नीचावस्था कोठें ! या स्थितीचें या स्थितीशीं कांहीं तरी साम्य आहे काय! पण गेली गोष्ट मागें येत नाहीं. याकरितां दुःख करीत न बसतां ही दुष्ट स्थिति दूर होण्यास कांहीं उपाय आहे कीं नाहीं हें पाहूं. पण आधीं, आपली स्थिति अशी नीच होण्याला मूळ कारण काय झालें, हें पाहिलें पाहिजे, ह्मणजे त्यावरून तरी कांहीं उपाय सुचला तर सुचेल.

नीट विचार करून पाहतां असें लक्षांत येतें कीं ज्यावेळीं आमच्या देशीं सर्वप्रकारें भरभराट होता, सर्वप्रकारें विद्यावृद्धि होती, त्या वेळीं इतर देश बहुधा रानटी स्थितींत असल्यामुळें, आपणांला इतर देशांपासून कांहीं घेण्याजोगें आहे, असें त्या वेळच्या आमच्या लोकांना वाटेनासें झालें. वास्तविक पाहतां कांहीं दिवसपर्यंत तशी गोष्ट होती खरी, पण सर्वकाळ तीच स्थिति राहील असें जें आमच्या लोकांनीं निर्धास्तपणें मानिलें, यांत त्यांची मोठी चूक झाली. इतर देशांमध्यें सुधारणेची इच्छा वाढत चालली, आणि आमच्या देशीं, पूर्वीच्या स्थितीच्या खोट्या गर्वामुळें, इतर देशांतील गोष्टी ह्मणजे केवळ क्षुद्र, त्यांकडे लक्ष देणें कांहीं उपयोगी नाहीं असे खोटे विचार वाढत चालले. "बालादपि सुभाषितं ग्राह्यम्" हें तत्त्व आपले लोक विसरून गेले. आणि, अँ:! आह्मी आर्यजनांनीं आणि म्लेच्छांकडून कांहीं शिकायाची इच्छा धरावी ह्मणजे काय? अशा घमंडीखालींच हजारों वर्षें निघून गेलीं. आमच्या पूर्वजांनीं ही खोटी घमंडी चालविली, ही त्यांची मोठी चूक झाली यांत संदेह नाहीं; तथापि परक्यांच्या कृत्यांचा तिरस्कार उत्पन्न होण्यास त्यांची राक्षसी वर्तणूक हीच बहुतांशीं कारण झाली असें ही दिसतें. आमच्या देशावर पश्चिमेकडून, गेल्या हजारों वर्षांमध्यें ज्या इतर लोकांनीं स्वाऱ्या केल्या त्यांची तऱ्हा पाहिली, तर— लूटालूट, माराहाण, धर्म भ्रष्ट करणें, आणि देवळें मोडणें,— हाच त्यांचा मुख्य हेतु असल्यामुळें त्यांचा सर्व प्रकारें आपल्या लोकांस वीटच उत्पन्न झाला; त्यांशीं कोणत्याही प्रकारें संपर्कसुद्धां होऊं देऊं नये, त्यांशीं व्यवहार ठेवूं नये, इत्यादि नियम आपल्या लोकांनीं केले, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण जे लोक, आपलें सर्वस्व हरण करूनच उगी राहतील असें नाहीं, पण आपला धर्म, आपल्या स्त्रियांचें पातिव्रत्य, आपल्या पूज्य वस्तूंचा भंग मुद्दाम करूं पाहणारे, त्यांच्याविषयीं विरोध उत्पन्न होणें हें साहजिकच आहे—पण नुसता तिरस्कार केल्यानें त्यांचा प्रतिकार होत नाहीं, त्यांचें निवारण करण्याचे खरे उपाय योजिले पाहिजेत, हा गोष्ट त्यांहीं लक्षांत ठेविली नाहीं. ह्मणजे खरी स्वदेशप्रीति ह्मणून जी कांहीं आहे तिची वृद्धि करण्याकडे त्यांहीं लक्ष दिलें नाहीं. प्रथमतः, आपला देश ह्मणजे आहे केवढा, त्यामध्यें कोणत्या ठिकाणीं कोण आहेत; त्यांची स्थिति कशी आहे, आपली स्थिति कशी आहे, कोणी शत्रु येत असल्यास कोठून व केव्हां येईल, हें कांहींच माहित नाहीं. इत्यादि सर्वप्रकारच्या अव्यवस्थेमुळें आमच्या लोकांची स्थिति धुक्यांतून चालणाऱ्या मनुष्यांप्रमाणें होऊन गेली. आपणा सर्वांस माहित आहेच कीं, जेव्हां दाट धुकें पसरतें, तेव्हां आपल्या सभोवतीं पांचचार हातपर्यंत मात्र आपणांस सरासरी दिसतें, पलिकडे सर्व अंधार, जिकडे जावें तिकडे हिच दशा,

आपल्या जाग्यापासून पलीकडे कांहीं अंतरावर आहे काय? हें कांहींच समजत नाहीं. त्याप्रमाणेंच सर्व अवस्था होऊन गेली. इतकेंच नव्हे, पण पलिकडे काय आहे हें पाहण्याची इच्छा ही कोणास झाली नाहीं, व ज्यांस कचित् झाली, त्यांस अनेक अडचणी उत्पन्न झाल्या. यामुळें एकमेकांचां संशय उत्पन्न होऊन आपापल्यांतच द्वेष वाढूं लागले. येणेंकरून सर्वत्र एकच घोटाळा झाला. एका भरतखंडामध्यें इतके भेद झाले, कीं, निरनिराळया भाषांप्रमाणेंच नव्हे, प्रत्येक प्रांताप्रमाणेंच नव्हे, प्रत्येक तालुक्या प्रमाणेंच नव्हे, कोंकणचे लोक देशी लोकांचा द्वेष करितात, आणि देशी कोंकणी लोकांचा द्वेष करितात, हें तर काय ? पण एका खेड्यांतले लोक शेजारच्या खेड्याचा द्वेष करून हद्दीसाठीं मारामाऱ्या आणि खून करूं लागले. पण इतक्यांतच संपलें नाहीं, एका गांवीं, एका आळीमध्यें, एका घरीं ही असे प्राणघातक द्वेष उत्पन्न झाले! "दायाद" या शब्दाच्या अर्थाकडे जर लक्ष लाविलें तर ही गोष्ट अतिशयोक्तीची नाहीं असें सहज लक्षांत येईल. पहा—"दायाद" याचा मूळ अर्थ म्हटला म्हणजे, पित्रादिकांच्या संपत्तीचा भाग ज्याला मिळणें योग्य आहे तो. परंतु सांप्रत 'दायाद' आणि 'दुस्मान' हे दोन शब्द केवळ समानार्थक होऊन गेले आहेत!

जे विद्वान म्हणविणारे, त्यांहीं तर आपल्या विद्येचें सर्व भारूड पोकळ वाद करण्या मध्यें खर्चून टाकलें. जुन्या ग्रंथाच्या खऱ्या हेतूकडे न पाहतां, केवळ आपलेंच मत खरें ठरवावें, आणि वादामध्यें इतरांस जिंकून, अजितपत्रें मिळवावीं, शब्दांवर कांहीं तरी विचित्र कोट्या करून, एका वाक्याचे अनेक अर्थ काढावे, किंवा मूळच्या अर्थाहून अगदीं च उलट अर्थ काढून, अज्ञ जनांमध्यें आपलें पांडित्य मिरवावें,—हेंच त्यांना आपल्या सर्व विद्येचें सार्थक्य वाटूं लागलें. वैयाकरणांस वाटूं लागलें कीं नुसता एक शब्द जर शुद्ध रीतीनें उच्चारला, तर तेवढ्यानेंच आपणास मोक्षप्राप्ति होईल, दुसऱ्या कशाचीही गरज नाहीं. नैयायिक म्हणूं लागले कीं सप्तपदार्थ खरे मानणें हाच मोक्षप्राप्तीचा मार्ग. तिसरा एक म्हणतो कीं नुसता निंबाच्या पाल्याचा रस खाऊनच जर बारा वर्षें देहदंडन केलें, तर राज्यप्राप्ति होईल. चवथा म्हणतो कीं देवीची उपासना करून मद्यमांसभक्षण आणि बीभत्स वर्तणूक करणें हें तर सर्व सिद्धि प्राप्त करून देणारें साधन. पांचवा म्हणतो कीं उदक म्हणजे सर्व जीवांचें जीवन त्याचा नाश करणें ही मोठी हत्या, याकरितां त्याचा व्यय न करितां मलिनपणानेंच जो राहणारा त्यालाच निर्वाण प्राप्त होईल. एक म्हणतो, शनवारच्या दिवशीं चणे खाल्यानें दरिद्र येतें, पण शुक्रवारच्या दिवशीं खाल्यानें संपदा येते. एक म्हणतो एकमुखी रुद्राक्ष जवळ असल्यानें संपत्ति येते. एक म्हणतो शालग्राम पूजेला शंखोदक नसेल तर कृष्णपरमात्म्याची प्राप्ति कधींही होणार नाहीं. एक म्हणतो सोमवारीं श्मश्रु करविल्यानें पुत्ररत्न दृष्टीस पडतें. एक म्हणतो काळें पागोटें बांधल्यानें शनीची पीडा होत नाहीं. याप्रमाणें संपत्शनिवार, कोकिळाव्रत वगैरेच्या सारखीं अनेक व्रतें, व हजारों वेडगळ क्षुद्र गोष्टी यांनींच आमच्या लोकांचीं मनें व्यापून टाकिलीं. मोठमोठीं कृत्यें आम्ही मुळींच विसरून गेलों. कित्येक क्षुद्र दिसणाऱ्या गोष्टींच्या पोटीं जे अनेक गंभीर विचार आहेत त्यांकडे

लक्ष न देतां, उगीच पोकळ बाह्य गोष्टींच्या नादांतच आम्ही राहिलों. सूर्यचंद्रांच्या ग्रहणांचा प्रकार नीट पाहण्याकरितां म्हणजे वेध करण्याकरितां आधींपासून तयार राहणें व ईश्वराच्या अगाध शक्तीची स्तुति करणें यामध्यें जो काळ घालवावयाचा, त्याचा अर्थ भलताच होऊन, राहुकेतु हे सूर्यचंद्रांस भक्षितात हीं अलंकारिक भाषणें खरीं समजून, त्या दैत्यांच्या मुखांतून त्यांस सोडविण्याकरितां अनुष्ठानें वगैरे करण्याचा तो काळ, अशी समजूत झाली.

याप्रमाणें पहिल्यानें खोटा गर्व हेंच आमच्या नाशास कारण झालें. गर्वापासून अन्य देशांचा तिरस्कार, आणि तिरस्कारापासून अज्ञान, यांची उत्पत्ति झाली. आणि अशा संधीस परक्यांनीं हात साधला, यांत त्यांचा काय बरें अन्याय? अज्ञानामुळें, आम्ही करितों काय, हें लक्षांत न आणितां एकमेकाचा दुष्टपणाच करूं लागलों, आणि अझूनही त्यांतून सुटत नाहीं. म्हण आहे कीं एकदा मनुष्य आपल्या बंधापासून सुटला म्हणजे तो कोठवर बहकत जाईल याचा नेम नाहीं. तशींच अवस्था आमची झाली. सत्य सुटलें, सदाचार सुटला, मोठें मन नाहींसें झालें, आपला शब्द राखणें, अबरू राखणें, याची चाड वाटेनासी झाली. आपल्या अन्नावर आणि जन्मभूमिकेवर प्राणांतींही न फिरणें, हे विचार नाहींसे झाले. ज्याला त्याला आपलें एकट्याचेंच वर्चस्व असावें, मग दुसऱ्याचें कांहीं होवो अशी इच्छा उत्पन्न झाली. आपला शेजारी सुखी असला तर आपणही त्या प्रमाणें सुखी होण्याचा सुयत्न करणें, ही इच्छा एकीकडेसच राहिली; पण त्याचा नाश करून त्यापासून आपलें हित करून घ्यावें अशी दुष्ट इच्छा वाढत चालली.— त्यांत आणखी आपल्या सर्व कृत्यांचें दैवाला दूषण देऊन त्यावर सर्व ओझें ठेवण्याचा प्रयत्न झाला. "काय करावें, आपल्या देशाचें दैवच तसें," असे उद्गार निघूं लागले. त्यावरून अर्थात् आळस उत्पन्न झालाच. आळसाचा परिणाम दरिद्र हें तर उघड आहेच. याप्रमाणें सर्वोपरी आपल्या देशाची धूळधाणी झाली. सारांश आपल्या देशाची दुर्दशा होण्यास मूळ कारण गर्व, पण ती दुर्दशा इतक्या पंथास पोचण्यास खोटा स्वार्थ आणि दैवावर हवाला हीं दोन मोठीं कारणें झालीं. त्यांमध्येंच संपत्तीचे विभाग आणि भिकाऱ्यांचा धंदा यांपासून देशाचें दरिद्र फारच वाढलें. आपल्या नजरेस बहुधा असें पडतें कीं, बापापाशीं जर दौलत आहे, तर त्याचे सर्व मुलगे बहुतकरून त्या दौलतीच्या नादावर राहून, कांहीं काम धंदा न शिकतां मूर्खपणानें व आळसानें आपले दिवस घालवून आपल्या हिशाच्या दमावर कर्ज करून चैन मिरवितात, व तंटे बखेडे करून, सर्व दौलतीची दुर्दशा करून, सर्व कुटुंब दरिद्रामध्यें बुडवितात. इंग्लिश लोकांच्या चाली प्रमाणें आपल्या देशींही दौलतीचा हिस्सा न होईल तर तितका आळस, तंटे बखेडे आणि अर्थात् दरिद्र कमी होईल यांत कांहीं संशय नाहीं. कित्येक प्रसंगीं गरीबानां दानधर्म करणें हें जरी फार आवश्यक आहे, तरी केवळ भिक्षेचा धंदाच ज्यांणीं मांडला आहे, व पिढ्यानपिढी ज्यांना दुसरें कामच नाहीं, अशा आळशी लोकांपासून सर्व देशाला मोठी हानि आहे यांत कांहीं संशय नाहीं. हजारों रिकामटवळे लोकांना आळसामध्ये ठेवून त्यांना अन्न देणें, यापेक्षां त्यांना कांहींना कांहीं जनहिताचा कामधंदा देऊन मदत करणें हें अधिक पुण्याचें कृत्य होय.

असो.—खोटा स्वार्थ आणि दैवावर हवाला यांविषयीं मला बरेंच बोलणें आहे. परंतु तत्पूर्वी, सांप्रत इतर देशांची स्थिति कशी काय आहे, तिजकडे अमळ लक्ष दिलें पाहिजे.

आमच्या देशाला इकडे खोट्या गर्वामुळें आणि खोट्यास्वार्थामुळें अवदसा येत चालली, आणि दैवाच्या भानगडींत आम्ही गुंतत चाललों. पण इतर देशांना आपापली सुधारणा करण्याची इच्छा वाढत चालली. प्रथमत: त्यांहीं निरनिराळ्या देशांचे प्रवास आरंभून, ज्या ज्या देशीं जें जें चांगलें दिसलें तेंतें मिळविण्याचा योग्य प्रयत्न चालविला. दुसऱ्या देशापासून अमुक एक गोष्ट कशी शिकावी, अशी त्यांना लाज वाटली नाहीं, व अझूनपर्यंतही त्यांचा तोच क्रम चालू आहे. ज्ञानप्राप्तीची इच्छा सुरू होतांच सहजच नवीन नवीन कला कौशल्याकडे त्यांचें लक्ष लागलें. पहिल्यानें त्यांना मुद्रायंत्राची म्हणजे छापण्याची युक्ती सांपडली. ही युक्ति सांपडेतोंपर्यंत त्यांचा म्हणण्यासारखा भरभराट नव्हता. परंतु त्यांच्या उद्योगी स्वभावाला हें प्रचंड मुद्रायंत्र साह्यकारी झाल्या दिवसापासून त्यांच्या स्थितीमध्यें विलक्षण त्वरेनें अवाढव्य फेर पडत चालला. जें जें कांहीं नवीन समजेल, तेंतें ते छापून प्रसिद्ध करूं लागले. धर्मसंबंधी असो, नीतिसंबंधी असो, व्यापारसंबंधी असो, विद्यासंबंधी, कलाकौशल्यसंबंधी, कोणत्याही प्रकारचें सामान्य किंवा विशेष ज्ञान असो, त्यासंबंधी झराझर ग्रंथ करण्याकडे, व होईल तितका त्याचा उलगडा करण्याकडे सर्वांचें लक्ष लागलें. यामुळें दिवसेंदिवस शोध वाढत जाऊन सर्व विषयांमध्यें त्यांचे विचार परिपक्व होत चालले. पोरकट मतें नष्ट होत चाललीं— खुजट विचार पुष्कळ दूर झाले, स्वदेशप्रीति वाढत चालली, धारिष्ट वाढलें, वशेवटीं त्यांचा असा सिद्धांत ठरला कीं, एकट्यानेंच आपलें हित केलें म्हणून सुधारणा होत नाहीं, तर The greatest good of the greatest number, (अति मोठ्या जनसंख्येचें अति मोठें कल्याण) हाच खऱ्या सुधारणेचा पाया होय. ही गोष्ट एकदा सर्वांच्या मनांत भरतांच लोकांचा आळस अगदी उडाला, परस्परांचे द्वेष कमी झाले; विद्याभ्यास वाढला, उपयुक्त ज्ञानाकडे अधिकाधिक लक्ष लागत चाललें, आगगाडी, तारायंत्रे, आगबोटी, वगैरे हजारों कृत्यें त्यांमध्यें उत्पन्न झालीं, त्यांच्यामध्यें आपोआप एकी वाढली. आणि आजकाल युरोपखंडांतील लोक सर्व पृथ्वीवर आपलालीं निशाणें फडकावीत आहेत, असा हा त्यांच्या सुधारणुकेचा परिणाम झाला!

हें सर्व खरें, पण आतां आमच्या देशाला कांहीं आशा उरली आहे कीं नाहीं? मी या प्रश्नाचें उत्तर असें देतों कीं, अझूनही आपल्या देशाला आशा आहे. खरोखरीं आशा आहे. ती कोणत्या रीतीनें? तर, "अति मोठ्या जनसंख्येचें अति मोठें कल्याण,* हाच सर्व सुधारणेचा पाया," हें तत्व आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. या पासूनच आपल्या देशाची खरी सुधारणा होईल. परंतु या वाक्याची रचना इंग्लिश भाषेच्या तऱ्हेची असल्यामुळें त्याचें खरें महत्त्व आमच्या लोकांच्या मनांत पूर्णपणें भरणें अमळ कठीण पडेल. याकरितां आमच्या बोलण्याच्या रीतीप्रमाणें म्हटलें असतां, "खरा स्वार्थ" हाच माझ्या मतें सर्व सुधारणेचा मूळ पाया आहे. जर आपले लोक आपापला खरा स्वार्थ पाहतील, तर

*"सर्वांचें कल्याण," असा या वाक्याचा भावार्थ घेण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

आमच्या देशाची सुधारणा होण्यास अवकाश लागणार नाहीं. पण "खरा स्वार्थ" ह्मणजे काय? तर ज्या स्वार्थाच्या योगानें दुसऱ्याचा कांहीं तोटा न होतां, एकंदरीनें सर्व जनांचें कांहींना कांहीं कल्याणच होईल, तोच **खरा स्वार्थ.** एथें नुसता "स्वार्थ" असा शब्द घालण्यासही कांहीं हरकत नव्हती; परंतु नुसता "स्वार्थ" या शब्दामध्यें कुटाळखोर लोकांना चेष्टा करण्यास अवकाश मिळेल. ह्मणून मी "खरा स्वार्थ" असा शब्द घातला आहे. या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ हें पुढील उदाहरण घेऊं.—असें समजूं कीं पन्नास जण वाटसरू अरण्यांतून चालले असतां रात्रीस त्यांणीं मुकाम केला. आतां जर ते अंधारामध्यें एकमेकांचे जिन्नस चोरण्याचा यत्न करूं लागले, तर त्यांतील प्रत्येक मनुष्य आपापला स्वार्थच पाहतो खरा; परंतु या चोरीपासून सर्वांचा तोटा आहे. कदाचित् या कृत्यापासून मारामारी होऊन खूनही पडावयाचे; किंवहुना सर्वांचा विध्वंस होऊन जायाचा. ह्मणून तो खरा स्वार्थ नव्हे. पण तेच पन्नासजण मुकामास उतरतांच, कोणी जागा नीट करतील, कोणी पाणी आणतील, कोणी जेवण तयार करतील, कोणी पाहरा करतील, कोणी कांहीं, कोणी कांहीं, याप्रमाणें जी जी पाहिजे ती ती मदत करतील, तर प्रत्येकाचा स्वार्थ सिद्धीस जाईल. प्रत्येकाला श्रम कमी पडून सुख जास्त होईल, आणि एकंदरीनें सर्वांचें कल्याण होईल. ह्मणून अशा रीतीनें जो स्वार्थ साधला तोच खरा स्वार्थ. दुसरें उदाहरण घेऊं.—एकहजार शिपायांची एक पलटण लढाईला गेली आहे असें समजूं. लढाईला जाऊन उभें राहतांच प्रत्येकानें असें मनांत आणलें, कीं एका क्षणामध्यें कदाचित् शत्रूची गोळी लागून मी ठार होईन, मी सर्वस्वास मुकेन. त्यापक्षीं आपण हळूच पाय मागें घेऊन जर गच्छंति केली आणि आपल्या सोबत्यांची जी कांहीं चीजवस्तु तडाख्यास मिळेल, ती ही पार केली, तर जिवाचा जीव राहून आणखी वर खिसाही ताजा राहील. अशीच जर प्रत्येकानें कल्पना केली, तर काय बरें परिणाम होईल? काय होईल तो स्पष्ट दिसतच आहे. सर्व पलटणीमध्यें एकदम पळ सुटेल, आपापसांत छाटाछाटी सुरू होईल. शत्रु येऊन पडल्यापूर्वीच आपणहोऊन ते धुळीस मिळून जातील. तेव्हां हा परिणाम कशाचा? तर फक्त खोट्या स्वार्थाचा. पण अशी गोष्ट न होतां, जर प्रत्येक मनुष्य असें ह्मणेल, कीं कांहीं कां होईना. लढाईतून मी पाय मागें काढणार नाहीं, आणि असें ह्मणून जर तो त्याप्रमाणें वागूं लागेल, तर खरोखरीं शत्रूला जिंकल्याचून ते कधीही राहणार नाहींत, व बहुतेक सर्व मनुष्यें त्यांतून कायमच राहतील. याचें नांव खरा स्वार्थ; कारण यामध्यें एकंदरीनें सर्वांचें कल्याण होऊन, प्रत्येकाचें हितच होईल. सारांश ज्या स्वार्थाच्या योगानें कोणाचाही तोटा न होतां, एकंदरीनें सर्वांचें कांहींना कांहीं कल्याणच होईल, तोच खरा स्वार्थ, व तोच सर्व सुधारणेचा मूळपाया आहे, व तोच प्रत्येकानें साधला पाहिजे.

कित्येकजण या विषयाची व्यवस्था कांहीं वेगळ्या रीतीनें करितात. जरी त्यांचा हेतु एकंदरीनें माझ्यासारखाच आहे, तथापि त्यांच्या माझ्या विचारामध्यें मोठा एक भेद आहे. ते ह्मणतात, कीं आजकाल जे विद्वान म्हणवितात, त्यांणीं सर्वांच्या कल्याणाकरितां झटलें पाहिजे. तें त्यांचें कर्तव्यच होय. पण त्यांचें

हें ह्मणणें जरी खरें आहे, तरी विद्वानांनीं तसें कां करावें हें स्पष्ट झालें पाहिजे. विद्वानांनीं सर्वांच्या कल्याणाकरितां जें झटावयाचें तें केवळ त्या सर्वांकरितांच नव्हे, तर स्वतःकरितांही, ह्मणजे आपल्या खऱ्या स्वार्थाकरितां. कोणतेंही कृत्य करावयाचें, तें जर आपल्या हिताकरितां नाहीं, तर तें करण्याविषयीं कोणी कितीही गोष्टी जरी सांगितल्या, तरी तें करण्याकडे आपलें मन कधींही लागणार नाहीं. ईश्वराची भक्ति आपण कां करावी? तो चांगला आहे, व त्यापासून आपलें कल्याण आहे ह्मणून. सत्य कां बोलावें? त्यापासून आपलें हित आहे ह्मणून. नीतीनें कां वागावें? आपलें हित आहे ह्मणून. त्याप्रमाणेंच सर्व देशाच्या कल्याणाची इच्छा कां धरावी? त्यामध्यें आपलें खरें कल्याण आहे, व त्यावांचून आपलें खरें कल्याण कधींही होणार नाहीं, ह्मणून. सारांश, हा केवळ दुसऱ्यावर उपकार नव्हे, त्यामध्यें आपलेंच हित आहे. ह्मणून ज्या कृत्यापासून सर्वांचें हित होईल, निदान दुसऱ्याचा कांहीं तोटा तरी होणार नाहीं, असें कृत्य करून प्रत्येकानें आपापला खरा स्वार्थ साधला पाहिजे. हाच प्रत्येकाचा खरा स्वार्थ, व याशिवाय जो दुसरा स्वार्थ, तो खरा स्वार्थ नव्हे. त्यापासून आपलें कधीं ही हित होणार नाहीं.

कित्येक अविचारी लोक स्पष्ट ह्मणतात, "कसली सुधारणा? होईल तितकें करून आपलें हित पाहावें, दुसऱ्याचें मग कांहीं कां होईना." पण ही त्यांची मोठी भयंकर चूक आहे. कारण लोक कोण आणि मी कोण असा जो द्वैतभाव, तोच सर्व सृष्टीचा महारिपु होऊन बसला आहे. मी एथें वेदांत मतानें बोलतों असा अर्थ नाहीं, कारण दुर्दैवेंकरून त्यामध्यें माझी फारशी गति नाहीं. पण सर्व लोकांच्या कल्याणावांचून माझें खरें कल्याण कधींही होणार नाहीं, इतक्या अर्थानें तरी सर्व लोक आणि मी एक असें मानल्यावांचून सृष्टि कधींही वैभवास चढणार नाहीं. सर्व लोकांच्या कल्याणामध्यें जरी मी मेलों, तरी आतांचे व पुढें होणारे सर्व लोक जिवंत आहेत तोंपर्यंत मी जिवंतच आहें, व जीं सुखदुःखें ते भोगतील, तीं सर्व मीच भोगल्याप्रमाणें आहेत, असें जंवपर्यंत लोक समजणार नाहींत, तंवपर्यंत खरी सुधारणा फार दूर आहे, असेंच समजलें पाहिजे. जो ह्मातारा मनुष्य आपला मरणकाळ समीप येऊन ठेपला असें समजत असून, परक्यांकरितां वृक्षवाटिका लावून छायेची तजवीज करितो त्याला असें वाटत असतें, कीं जरी मी मेलों तरी दुसरे लोक या छायेचा अनुभव घेतील, हा मला मोठा आनंदच आहे. तेव्हां त्या आनंदस्वरूप शरीरानें तो जिवंत नाहीं काय? आपल्या सभोवतीं पटापट मनुष्यें ठार होताहेत, हें प्रत्यक्ष पाहत असून, हातांत शिर धरून लढाईमध्यें शिरणारे जे शूर शिपाई, त्यांचे विचार काय बरें असतात? जरी आपण लढाईंत पडलों, तरी ज्यांकरितां आपण लढतों, त्यांना जर यश मिळालें, तर तें आह्मांलाच मिळालें, ते जिवंत आहेत तोंपर्यंत आह्मी जिवंतच आहों, असें ते मानीत नाहींत काय? व अशा विचारानें आपला प्राण ते कस्पटासमान मोजीत नाहींत काय?—त्याचे ते विचार खरे असतात याविषयीं दुसरा पुरावा नको. त्यांनाच ईश्वर यश देतो, आणि तसे विचार ज्यांचे नाहींत, त्यांचाच मोड होतो, हें आपण प्रत्यक्ष पाहतों. सारांश सर्वांचें हित तें आपलें हित या अर्थानें तरी सर्व मनुष्यें आणि आपण एका-

त्मक आहों. याकरितां प्रत्येकानें आपला खरा स्वार्थ ह्मणजे खरें आत्महित करणें, हेंच सर्व सुधारणेचें मूळबीज होय.

हें खरें आत्मतत्व एकदा सर्वांच्या अंत:करणांत बिंबून गेलें, ह्मणजे तेथें सर्व चांगल्या गोष्टी आपोआप उद्भवूं लागतील. सर्वप्रकारें नीति, सदाचार, उपयुक्त कलाकौशल्यें, स्वदेशप्रीति, इत्यादि सर्व गोष्टींकडे अवश्य लक्ष लागेल. आणि परिणाम उत्तम होईलच होईल.

असें जरी खरें, तरी प्रत्येकानें आपल्या कल्याणाची खरी आस्था ह्मणून धारलीच पाहिजे. आमच्या देशामध्यें "दैवांत असेल तर सर्व कांहीं होईल, नसेल तर कितीही प्रयत्नानें कांहीं होणार नाहीं," अशा वेड्या विचारानें मोठी दुर्दशा करून टाकिली आहे. दैव ह्मणून कांहीं आहे कीं नाहीं? याविषयीं विचार करीतां माझी अशी खात्री झाली आहे कीं, सृष्टिक्रमानें किंवा कांहीं अज्ञात कारणांमुळें ज्या कांहीं गोष्टी घडून येतात, तें "दैव;" याशिवाय "दैव" ह्मणून दुसरें कांहीं नाहीं. सारांश दैवाला मर्यादा आहे. ती मर्यादा जरी आपणांस स्पष्टपणें समजत नाहीं, तरी त्यास मर्यादा आहे, यांत कांहीं संशय दिसत नाहीं. त्या मर्यादेच्या आलिकडे दैव आपल्या कृत्यास कोणत्याही प्रकारें आड येत नाहीं. ह्मणजे, कित्येक गोष्टींमध्यें आपणांस सिद्धि प्राप्त होणार नाहीं, व त्याचे कारणही समजणार नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि सर्वच गोष्टीमध्यें आपले ग्रह फिरले आहेत, आपलें दैवच फिरलें आहे, आपल्याला तें कोणतेंही चांगलें फळ मिळूं देणार नाहीं इत्यादि बडबड अगदी पोरकटपणाचे होय. त्या दैवमर्यादेच्या आलीकडे आपणास पुष्कळ कर्तृत्व येण्याजोगें आहे. आणि तितकेंच जरी आम्ही केलें तरी पुष्कळ होईल.

सारांश; खरा स्वार्थ, ह्मणजे मागें सांगितलेलें हें खरें आत्मतत्व, आणि दैवाची खरी किंमत आपण जाणली, ह्मणजे आपल्या हिताची आपणास सहज कळकळ लागेल. आणि ती कळकळ खरोखरी लागली, याचें लक्षण आस्था आणि परिश्रम हें होय. नाहीं तर, बोलायाला कांहीं तरी विषय पाहिजे ह्मणून, किंवा लोकांनी स्तुति करावी ह्मणून सभा केल्या. कांहींतरी चळवळ असावी ह्मणून वादविवाद चालविले, आणि घरीं जातांच सर्व नाहींसे झाले, तर या निरर्थक जलताडनापासून काय निष्पन्न होणार? महिना दोन महिने नवी उमेद असे तों धांवाधांव केली, आणि पुढें जिकडे तिकडे थंडगार!

पण कित्येक ह्मणतात कीं आपल्यामध्यें कोणत्याही कामाला एकी नाहीं, त्यामुळें असा हा परिणाम होतो. एकी नाहीं ही तर गोष्ट खरी, पण आपण "एकी करूं, एकी करूं" असें ह्मणून कोठें एकी होणार आहे काय? प्रत्येकानें आपणास योग्य जें जें कृत्य तें तें अंत:करणापासून करूं लागावें, ह्मणजे आपोआप किंवा अल्पश्रमानें एकी होऊन जाईल. याला उदाहरण मागें सांगितलेल्या पलटणींचेंच घ्या- जर पलटणींतील प्रत्येक मनुष्यानें ह्मटलें कीं, बाकीचे सर्व शिपाई मला मदत करतील कीं नाहीं कोण जाणें, मीच कशासाठीं ह्मणून लढायाला लागूं? तर काय बरें अवस्था होईल? पण प्रत्येकानें जर असें ह्मटलें, कीं दुसरे लोक काय पाहिजे तें करोत, मी तर आपला धर्म करणार, तर सर्वांची एकी आपोआप झालीच, आणि सर्व गोष्टी सुरळीत सिद्धीस गेल्या, सारांश, कोणीही आपलें कर्तव्य करण्यास कधीही मागें पाहूं नये, ह्मणजे सहज एकी होईल. यामध्यें इतकें

मात्र नीट लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जें कांहीं करावयाचें तें कसें तरी केलें पाहिजे, केल्यावांचून सुटका नाहीं, अशा तऱ्हेनें निष्काळजीपणानें मात्र करूं नये. आपणा सर्वांस ही गोष्ट माहित असेलच, कीं कोणेएके गृहस्थाच्या घरीं वाढपे व उष्टी काढणारे इतके शाहणे होते कीं, एके दिवशीं यजमानास बाहेरून यावयास अमळ उशीर लागला, तरी नेमलेल्या वेळीं वाढप्यांनीं ताटें वाढलीं, व घटका अर्धघटका होतांच ताटें काढणारांनीं तीं काढून टाकलीं. मागाहून यजमान येऊन पाहतात तों जिकडे तिकडे सामसूम! असा प्रकार मात्र होऊं नये.

तरी आतां पुनः असा प्रश्न निघेल, कीं, देशाचें हित हित ह्मणून आतां वास्तविक करावयाचें तें काय? व तें साध्य होईल कसें? याचें उत्तर पुनः इतकेंच देतों, कीं गर्व तर आपला निघून गेलाच आहे. तेव्हां आतां, खरा स्वार्थ लक्षांत ठेवून देव या शब्दाची खरी किंमत जाणून, मागें सांगितलेल्या आपल्या देशांतील ज्या दुष्ट स्थिति, त्या सर्व दूर करण्याला आपण प्रत्येकानें झटलें पाहिजे. आमच्या शाळांमध्यें, पहिल्यानें नीति, सदाचार, सभ्यता, सत्य, मनाचें स्वातंत्र्य, ईश्वरभक्ति देशप्रीति, मनाचें औदार्य, मितव्यय, निरालस्य, नीच वर्तणुकीचा तिरस्कार, परकी लोकांच्या पोशाखाचें व निरर्थक चालीचें पोरकट अनुकरण यांचा त्याग, वैभवाची इच्छा, या गोष्टी प्रत्येक मुलाच्या अंतःकरणामध्यें बिंबविल्या पाहिजेत. लिहिण्या वाचण्याचा सर्वत्र प्रसार केला पाहिजे; कलाकौशल्य, रसायनशास्त्र, औषधिशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, गणित, इत्यादि उपयुक्त शास्त्रें, तसेंच शारीर आणि मानसिक व्यायाम यांजकडे लक्ष दिलें पाहिजे; मोठे मोठे कारखाने, शेती, व्यापार यांजकडे लक्ष दिलें पाहिजे; व या सर्व गोष्टीं मध्यें पोकळ डौल सोडून देऊन सर्व लोकांशीं मिळून त्यांशीं गोडीनें राहण्याचें शहाणपण शिकलें पाहिजे. या सर्व गोष्टी करण्यास ईश्वर कृपेनें आपणास इंग्रजी वगैरे ग्रंथांचें, इंग्रजी विद्वानांचें व यंत्रादिकांचें आजकाल जसें साह्य मिळेल, तसें पूर्वी कोणत्याही देशीं कोणत्याही लोकांस मिळालें नसतें. ज्या पाहिजे त्या विषयावर इंग्रजी ग्रंथ आहेत, यंत्रें आहेत, तीं आह्मीं शिकावीं आणि त्यांचा योग्य उपयोग करावा, हीच आमच्या शहाण्या इंग्रज सरकारची इच्छा आहे. हें आमचें केवढें भाग्य! पृथ्वीवर जे जे कांहीं नवीन शोध होताहेत ते जसे कांहीं आह्मां करितांच! आमच्या देशीं मुद्रायंत्रस्वरूप प्रचंड सूर्याचा प्रकाश जिकडे तिकडे मोठ्या वेगानें पसरत चालला आहे, व त्याच्या योगानें इंग्रजी वगैरे पुस्तकांतिल किंवा वर्तमान पत्रांतील सर्व उपयुक्त गोष्टी आमच्या देशभाषेंत आणण्यास केवढ्या सोई आहेत. सारांश ईश्वरकृपेनें सर्व कांहीं अनुकूल आहे; एक उद्योग मात्र केला पाहिजे. परंतु त्या सर्व गोष्टींचा मूळपाया मागें सांगितल्याप्रमाणें आमचें **स्वार्थसाधन** जें खरें **आत्महित** त्यावर, ह्मणजे सर्व लोकांचें हित तें प्रत्येकांचें हित, या गोष्टीवर रचून देवाची खरी किंमत जाणून त्याला न जुमानतां आपल्या सुधारणेची इमारत उभारली पाहिजे. ह्मणजे परमेश्वराच्या कृपेनें आपला देश सांप्रतच्या नीचावस्थेंतून उठून पुनः वर डोकें करील, व पुनः आपल्या प्राचीन कीर्तीला योग्य असा होईल यांत कांहीं संशय नाहीं.

हा विषय इतका मोठा आहे कीं याचें पूर्ण विवेचन अशा एका निबंधांत संपावयाचें नाहीं. भरतखंडाच्या उत्कर्षाला जीं जीं साधनें मी सांगितली आहेत, त्यांतील प्रत्येकाविषयीं एकेक मोठा निबंध लिहितां येईल. परंतु प्रस्तुत प्रसंगीं तसें करतां येत नसल्यामुळें, सुधारणेचें मूळ बीज प्रथमतः स्पष्ट करून त्याच्या आधारानें ज्या ज्या गोष्टी करावयाच्या त्यांचीं नुसतीं नांवें मात्र दिलीं आहेत यांमध्यें स्त्रीशिक्षण वगैरे कित्येक गोष्टी आमच्या देशीं आलीकडे चालू झाल्या आहेत त्याविषयीं कांहीं लिहिलें नाहीं, तथापि यावरून ह्मणजे त्या निरुपयोगी आहेत असें नव्हे. सर्व शिक्षणामध्यें तें येतें ह्मणून वेगळें धरलें नाहीं. तथापि आमच्या देशीं पुरुषांच्या स्थिती पेक्षां स्त्रियांची स्थिति नीतिदृष्ट्या पुष्कळ चांगली आहे ही गोष्ट निःसंशय आनंदाची होय. संसारांतील कित्येक गोष्टीमध्यें त्यांचें ज्ञान वाढलें पाहिजे, मुलांबाळांना उत्तम शिक्षा देणें, व त्यांना वडिलांच्या आज्ञेंत ठेवणें वगैरे प्रकार आलीकडे मंदावलेले जागृत केले पाहिजेत, हें खरें तथापि नीतिमध्यें हे सर्वप्रकार येत असल्यामुळें याचेंही निराळें विवेचन केलें नाहीं.

यामध्यें दुसरी एक गोष्ट लक्षांत येण्याजोगी आहे ती ही कीं या निबंधामध्यें मी "आमचे लोक" असे शब्द जेथें तेथें योजले आहेत; परंतु "एतद्देशीय" हा शब्द एकदा सुद्धा योजला नाहीं. याचें कारण असें कीं "एतद्देशीय" हा शब्द परकी लोकांनीं मात्र योजावा, आणि आह्मी जर योजला तर आह्मीं कोणी परके आहों असा अर्थ ह्यापासून ध्वनित होतो. ह्मणून तो शब्द आमच्या लोकांनीं आमच्या देशीं कधींही योजूं नये, असें माझें मत आहे.

देवास अर्जी. [पुढें चालू].

—०००—

अनेक गुणयुक्त ही वनविलीस तूं आर्यभू ।
तरी तिजसि भोगितो प्रबळ अन्यदेशी प्रभू ।
अनेक विध भूषिता रुचिर कामिनी ती जशी ।
पडे परकरीं तिचा पति विनष्ट होतां—तशी ॥११५॥
अहा! तदनुरूप तत्पति जरी लया पावले ।
जरी वय वहू तिचें धन परस्थलीं पातलें ।
तथापि नवयौवना अजुनि तेंच सौंदर्य ही ।
अशी घडविली प्रभो वसती आमुची काय ही! ॥११६॥
असंख्य उदरीं हिच्या धन भरोनियां राहिलें ।
हिरे अमित माणकें कनक मौक्तिकें पोशिले ।
अहा ! उपजली कशी सकळ ही गुणी संतती ।
शनैश्चरच पोटि-ये उदरीं भानुच्या संप्रती ॥ ११७ ॥
जगज्जनक! माधवा! क्षितिपते! दयासागरा!
त्वदन्य वद रक्षितो कवण धन्य आर्यागरा!
किती दिवस ठेविशी प्रभु अह्मांस दुःखांकरीं ।
समस्त शिणलों पहा! त्वरित धांव रक्षा करी! ॥११८॥
स्वदेशज जनार्थ हो अहह! हा कवी भागला!
अहर्निश विलापही निज मुखें करूं लागला ।
पराक्रम न मानवी मुळिच कांहीं चाले—असें ।
बघून करुणास्वरें विनवण्यास तूतें बसें ॥ ११९ ॥
अनेक विध बाळ हें तुज पुढें पित्या! खेळलें ।
कुतर्क मनिंचे तसे अभय सर्वथा काढिले ॥
पुरें समजतों दयाघन! नितांत वाचाळ मी ।
स्व भूमि-हित-बुद्धि हा तुजसि दीन देवा! नमी ॥ १२० ॥
सुमान्य तुजला सख्या! मम समस्त अर्जी घडो ।
न संशयमय प्रभो! कधिं न जाल कंठीं पडो ॥
यदर्थ मन हें झटो! कधिं न दुर्वचेंही हटो ।
भवाब्धि-तरणा-पटो! तुज सर्व सुखानें नटो!! ॥१२१॥

वाणी ऐशी कवीची **सु**फल मग पडे त्या चिद्घनाचे ।
देतां स्वानुग्रहाचें **व**चन सदय तो चातकातुल्य नाचे ॥
या सत्कर्मांत आतां **स**हज भुवनें या कीर्ति जी ये कवीस ।
प्रेमें अर्पी पित्यातें करुनि सुकविता एकशें येकवीस ॥

"देवास अर्जी" **समाप्त.**

BOMBAY:—"ASIATIC PRINTING PRESS" KALKADEVI ROAD,
BA H. SHRAVAN.

जाहिराती.

THE ORIENTAL FIGARO.
NOTICE.

बडोदे कमिशनची चित्रासहित हकीकत.

The Managing Agents of the "O. F." have the pleasure to announce that by the Mail Train of the 8th instant, they despatched

"CARO,"

The First Artist in India, to Baroda,
On a Special Mission to illustrate and report on the famous *cause célèbre,*

The trial of Mulhar rao Gaekwar of Baroda.

We shall publish in the form of an
ALBUM
Portraits of the Gaekwar, the Commissioners, Counsel, Witnesses, and all the other celebrities connected with this important trial, together with

ILLUSTRATIONS OF SCENES IN COURT,
THE GAEKWAR'S PALACE,
THE RESIDENCY,
AND OTHER PLACES OF INTEREST.

The price will be Rs. 2 only.
A liberal discount on the above prices to Booksellers and Storekeepers.
Orders will be registered by
HENRY M. JONES & Co.,
Managing Agents.

"Oriental Figaro" Office,
1 Hare Street,
Calcutta, 9th March 1875.

धर्मसिंधु

(प्राकृत भाषांतर सहित)

विक्रीस तयार.

धर्मजिज्ञासु लोकांस कळविण्यांत येतें कीं, हा ग्रंथ ज्यां कोणास घेणें असेल त्यानीं खालीं सही करणारांच्या नांवें मुंबईमध्यें काळकादेवीच्या रस्त्यावर निर्णयसागर छापखान्यांत अगर विविधज्ञानविस्तारचे व्यवस्थापक यांजकडे कि० रु० ६. ८० हा० १२ आणे पाठविले असतां त्वरित पुस्तक रवाना केलें जाईल. टिकिटा पाठविणें झाल्यास वर्ताळ्यासुद्धां पाठवाव्या. नाटपेट पत्रं घेतलें जाणार नाहीं.

ता० ५ एप्रिल १८७५. } जावजी दादाजी.

विज्ञापनम्.

निम्नलिखित संस्कृतपुस्तकानि विविधज्ञानविस्तारगृहे लभ्यानि।

पुस्तकनामानि।	मूल्यम्।
वैद्यशास्त्रम्।	
भावप्रकाश	१०—१२
चक्रदत	१—१४
सुश्रुत	४—१०
शार्ङ्गधर	१—४
मदनपालनिघण्टु	१—३
गणितशास्त्रम्।	
लीलावती	०—१४
बीजगणित	१—४
क्षेत्रतत्वदीपिका	१—४
छन्दःशास्त्रम्।	
छन्दोमञ्जरी तथा वृत्तरत्नाकर सटीक	०—१४
पिङ्गलछन्दःसूत्रम् ,,	२—४
स्मृतिशास्त्रम्।	
वीरमित्रोदय	१०—८
मनुसंहिता सटीक	५—८
इतिहासशास्त्रम्।	
राजतरङ्गिणी	६—०
सर्वदर्शनसंग्रह	१—४
कारण्डव्यूह	२—३
शङ्करविजय	२—४
ललितविस्तर	३—१३
नानाविधग्रंथाः।	
तर्कसंग्रह	०—१०
धातुरूपादर्श (व्याकरण)	२—५
मेदिनी (कोष)	१—४
नारदपञ्चरात्र	३—०
नीतिमाला	०—१४
संस्कृत शिक्षामञ्जरी १ भाग	०—२
संस्कृतशिक्षा ,, २ भाग	०—५

Registered No. 102
1875.

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची अगाऊ..... रुपये ३.
सहामाही अगाऊ..... रुपये २.
फुटकळ दर प्रतीस..... आणे ६.
टपालहशील वर्षाचे..... आणे ६.

वर्गणीदारांनीं अगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांच्या आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या, व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी व्यवस्थापक यांजपाशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

A MONTHLY MAGAZINE

पुस्तक ७. OF MARATHI LITERATURE, अंक ५.

FOR

LADIES AND GENTLEMEN.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.....	८१
पुराण ग्रंथ	८६
भोजप्रबंध.....	८९
तर्कसंग्रह	९३
ठगाची जबानी.....	९६
श्रीमंत मल्हारराव गायकवाड.....	९८

मुंबई.

एशियाटिक छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

वर्गणीदारांस विनंती:—वर्गणीदारांस जीं आमच्याकडून पत्रें जातात त्यांच्याकडे लक्ष पुरवून त्यांणीं वर्गणी पाठविण्याची त्वरा करावी.

पोंच. व्यवस्थापक.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत.)	रु.	आ.	(डिसेंबर १८७५ पर्यंत.)	रु.	आ.
रा. रा. श्रीपादराव बाबाजी ठाकूर, सी.एस्.	१०	०	रा. रा. रामचंद्र विष्णु माउगांवकर	३	०
श्री. रा. पांडुरंगराव तात्यासाहेब	३	६	रा. रा. गोपाळराव विनायक भानप.....	३	०
रा. रा. सदाशिव नाना.....	३	०	रा. रा. रामभाऊ माने सरबेअर	३	०
,, ,, आनंदराव नारायणराव दाभोलकर.	३	०	,, ,, गणेश रामजी.....	३	०
रा. सा. वासुदेव बापुजी कानीटकर.....	३	०	,, ,, कृष्णाजी सगुण महासेकर.....	३	०
रा. रा. शिवराम महादेव नामजोशी.....	३	०	,, ,, हरी शिवराम शृंगारपुरे.....	३	६
,, ,, रामकृष्ण शिवराम राजाध्यक्ष....	३	०	डा० विश्राम रामजी घोले.....	३	६
डा० अनंत चंद्रोबा.....	३	०	रा. रा. मोरोबा भोंडजी.....	३	०
रा. रा. कृष्णराव बापु तेलंग.....	३	०	,, ,, विष्णु मोरेश्वर महाजनी बाकीविकी.	३	६

जाहिराती.

श्रीगुरुचरित्र.



(महाप्रासादिक ग्रंथ अ० ५३)

सर्वांस विनयपूर्वक कळवितों कीं सदरहू पुस्तक आम्हीं निर्णयसागर छापखान्यांत सुंदर ठशांनीं छापण्यास आरंभ केला आहे. याचे कागद चांगले जाड असून अक्षर सुवाच्य मोठें आहे. प्रत्येक अध्यायारंभीं सुशोभित चित्रें आहेत. ता० ३० जून १८७५ चे आंत किंमत देणारांस रु० ३ व मागाहून रु० ६ पडतील. किंमतीचा पैका भरणें तो टपाल खर्चासह काळकादेवी समोर विविधज्ञानविस्तार आफीसांत भरावा. पुस्तक सुमारें जुलई अखेर तयार होऊन वर्गणीदारांच्या हातीं मिळेल.

जनार्दन महादेव गुर्जर,
गंगाधर गोपाळ पत्की. } मालक.

मुंबई ता० २५ एप्रिल सन १८७५.

श्रीमद्भागवत.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं हल्लीं आम्हीं श्रीमद्भागवत सटीक छापण्यास आरंभ केला आहे. याचा कागद जाडा, सफेत मोहरेदार असून सांचाही उत्तम बेताचा केला आहे व हें शिळाछापावर उत्तम अक्षरांनीं छापीत आहों. तरी या सत्कृत्यास शेट सावकार लोक आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे. या पुस्तकाची किंमत आज तारखे पासून जून अखेर पर्यंत देणारास दरएक प्रतीस ८ रुपये पडेल, पुस्तक सुमारें आठ महिन्यांनीं ग्राहकांस मिळेल. पुस्तक शुद्ध करण्याची तजवीज फार उत्तम प्रकारें ठेविली आहे. याजबद्दल कोणास विशेष माहिती व पुस्तकाचा नमुना पाहाण्याची इच्छा असल्यास रामवाडीचे नाक्यावर आमचे बुकांचे दुकानीं मिळेल. याजबद्दल कोणास पत्र पाठविणें असल्यास सदरीं लिहिलेल्या आमचे दुकानीं पोष्टपेड पाठवावें ह्मणजे आह्मास पोंचेल.—ता० १ एप्रील १८७५.

काशिनाथ वासुदेव खांडेकर.

श्री.

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ५.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.

—०००—

वल्लभदर्शन.

"सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति[1]" शांत उपासीत, तत्त्वमसि, यत्र हि त्वस्य सर्वमात्मैवाभूत् तत्र केन कं पश्येत्," इत्यादि अनेक श्रुति अभेदच प्रमाण असें निर्विवाद जाहिर करित असतां प्रत्यक्षच प्रमाणांमध्यें प्रधान असा आग्रह धरून, तदनुरोधानें अपौरुषेय व अदुष्ट अशा श्रुतींची व्यवस्था करूं पहाणारा मध्व यास मूर्तिमान् चार्वाक असें उपपद दिल्यास कांहीं हरकत आहे, असें आह्मां प्रामाणिकांस वाटत नाहीं; अर्थात् भेदवाद श्रुतीस संमत नाहीं, व—

वेदाः श्रीकृष्णवाक्यानि व्याससूत्राणि चैव हि
समाधिभाषा व्यासस्य प्रमाणं तच्चतुष्टयं
एतद्विरुद्धं यत् सर्वं तन्मानं न कथंचन

अर्थ—ऋक्, यजुस्, साम, अथर्व, हे वेद; श्रीकृष्णाचीं वाक्यें ह्मणजे भगवद्गीता; व्याससूत्रें ह्मणजे वेदांतसूत्र; ज्या ग्रंथाच्या रचनेनें व्यासाचें समाधान झालें तो ग्रंथ ह्मणजे श्रीमद्भागवत; हीं चार प्रमाणें; अर्थात् हीं सर्व प्रत्यक्ष भगवंताचीं वाक्यें ह्मणून निर्दोष व यांचेंच प्रामाण्य निर्विवाद, यांच्यापुढें प्रत्यक्षादिकांची ह्मणून मातब्बरी मुळींच नाहीं; यासाठीं या चतुष्टयाच्या विरुद्ध असेल तें कांहीं, कसें, व कितीही असो तरी पौरुषेयत्वादिक दोषांनीं आघात असल्यामुळें आपणांस प्रमाण मानतां येत नाहीं, असें वल्लभ म्हणतो.

वल्लभ हा दक्षिणेंहुंस्थानांत कांकरव नामक एका गांवांत रहाणाऱ्या लक्ष्मणभट्ट

---

१ "सर्वं"—सर्व जग. "खलु"—निश्चयें करून. "इदं"—हें, अर्थात् जग. "ब्रह्म"—ब्रह्म, अर्थात् ब्रह्मरूपच. श्रुति पुनः जगाचेंच निरूपण करितात, कीं "तज्जलानिति"—"तज्ज" ह्मणजे त्या ब्रह्मरूपी कारणापासून हें कार्यरूपी जग होतें; "तल्ल" ह्मणजे त्यांतच त्या जगाचा लय होतो; व "तदानिति" ह्मणजे त्याच्या योगानेंच हें सर्व जग श्वासोच्छ्वास टाकतें, अर्थात् तें ब्रह्म या सर्व जगाचें चैतन्य होय. असें जें ब्रह्म त्याची, "शांतः"— ह्मणजे शमदमादिसाधनसंपन्न होऊन. "उपासीत"— उपासना करावी.

"तत्त्वमसि"—याचा अर्थ पाठीमागेंच केला आहे.

"यत्र"—जेथें. "हि"—निश्चयें करून. "तु"—पण. "अस्य"—या पुरुषास, अर्थात् ब्रह्मज्ञान्यास. "सर्वं"—हें सर्व जग. "आत्मैव"—आत्माच अर्थात् ब्रह्मरूपच. "अभूत्" होतें, अर्थात् भासतें. "तत्र"—तेथें, अर्थात् त्यावेळीं. "केन"—कशानें, अर्थात् कोणत्या इंद्रियानें. "कं"—कोणास, अर्थात् कोणत्या पदार्थास. "पश्येत्"—पहावें. जेव्हां हें सर्व ब्रह्मच अशी ज्ञान्याची खात्री होत्ये, तेव्हां द्रष्टा, दृश्य, व दृष्टि हीं सर्व ब्रह्ममय झाल्यामुळें ब्रह्मापासून भिन्न अशीं स्फुरत नाहींत.

नामक तैलंगज्ञातीय ब्राह्मणाचा दुसरा मुलगा. याच्या आईचें नांव एलमागार. याच्या वडील भावाचें नांव रामकृष्ण. लक्ष्मणभट्ट हा आपल्या कुटुंबासह यात्रा करिण्यास काशीस गेला होता. एकेदिवशीं ब्राह्मणांचा व मुसलमानांचा काशींत मोठा तंटा झाला; व मुसलमानांनीं बरेच ब्राह्मण घायाळ केले. तें पाहून अत्यंत भयभीत होऊन लक्ष्मणभट्ट यानें आपल्या कुटुंबासहवर्तमान तेथून पलायन केलें. त्या वेळेस एलमागार ही दुसऱ्या खेपेस गरोदर होती. पलायन करतां करतां चंपारण्य नांवाच्या एका जंगलांत लक्ष्मणभट्टाची स्वारी येऊन पोहोचली. तेथें विक्रम शक १५३५ वैशाख वद्य ११ रविवार या दिवशीं वल्लभाचा जन्म झाला. त्याच्या पाठीमागून केशव नांवाचा तिसरा मुलगा लक्ष्मणभट्टास झाला. उपनयनादिक संस्कार झाल्यानंतर वेदाध्ययन व्हावें या हेतूनें वल्लभास लक्ष्मणभट्टानें नारायण नामक एका महापंडिताच्या स्वाधीन केलें. वेदादिकांचें अध्ययन केल्यानंतर, आपल्या संकल्पित नव्या मताचा फैलाव करिण्याच्या हेतूनें वल्लभ दक्षिणहिंदुस्थानांत निघाला. तेथें एका गांवांत एका श्रीमंत शेटयाचा एक मुलगा होता, त्याचें नांव दामोदर. त्यास वल्लभानें पहिल्यानें आपल्या मताची[1] दीक्षा दिली. नंतर वल्लभ विजयनगरास गेला. त्यावेळेस कृष्णदेवराय नामक राजा तेथें राज्य करित होता. त्याच्या जवळ मोठमोठे पंडित येऊन राहिले होते. तेथें वल्लभानें वाद करून बऱ्याच पंडितांस वैष्णवी दीक्षा दिली. तेव्हां राजानें त्याचा चांगला मान करून त्यास बराच पैसा दिला. त्यांतील त्यानें थोडासा पैसा स्वतः स्थापन केलेल्या मूर्तीसाठीं अलंकार करण्यांत खर्चला; व शिलक राहिलेल्या पैशानें त्यानें आपलें ब्रह्मस्व फेडलें. याप्रमाणें परमहंसाच्या वृत्तीचा स्वीकार करून, कांहीं दिवस आपल्या नवीन मताची स्थापना करण्यांत घालवून, वल्लभ पुनः काशींत येऊन राहिला. तेथें महालक्ष्मी नामक एका कन्येबरोबर त्यानें लग्न केलें. काशींत रहात असतानां वल्लभानें व्याससूत्रभाष्यप्रभृति कित्येक नवे ग्रंथ रचले. यास दोन मुलगे होते. वडिलाचें नांव गोपीनाथ व धाकट्याचें नांव विट्ठलनाथ. अत्यंत परिश्रम करून या आपल्या दोघा मुलांस त्यानें आपल्या मतांत प्रवीण केलें. नंतर विक्रम संवत् १५८७शींत आपल्या वयाचा बावन्नाव्या वर्षीं वल्लभानें या क्षणिक जगाचा त्याग केला.

वल्लभाचें मत शुद्धाद्वैत या नांवानें प्रसिद्ध आहे. आतां शुद्धाद्वैत असें नांव ठेवण्याचें प्रयोजन काय? तर ह्मणतात शुद्धाद्वैतमार्तंडकार; कीं—

तन्निवृत्त्यर्थमाचार्यैः पदे शुद्धं विशेषितं
शुद्धाद्वैतपदे ज्ञेयः समासः कर्मधारयः
अद्वैतं शुद्धयोः प्राहुः षष्ठीतत्पुरुषं बुधाः
मायासंबंधरहितं शुद्धमित्युच्यते बुधैः
कार्यकारणरूपं हि शुद्धं ब्रह्म न मायिकम्

अर्थ—शंकराचार्यांचे अद्वैतमताची निवृत्ति व्हावी, यासाठीं वल्लभानें अद्वैतपदास शुद्ध हें विशेषण देऊन, शुद्धाद्वैत असें आपल्या मतास नांव दिलें. शुद्धाद्वैत हा (शुद्ध असें जें अद्वैत तें असा) कर्मधारय समास जाणावा. कित्येक शुद्धाद्वैत हा षष्ठीतत्पुरुष (शुद्ध जे जीवात्मपरमात्मे त्या दोघांचें अद्वैत असा)

१—"निजवार्ता" ह्मणून एक वल्लभीय मताचा ग्रंथ आहे, त्यावरून ही वल्लभाची हकीगत उतरून घेतली आहे.

आहे असें म्हणतात. ज्याचा व मायेचा मुळींच संबंध नाहीं, असें जें शुद्ध ब्रह्म तेंच या जगाचें कारण होय; व हें जग ब्रह्माचें कार्य होय; कारणच कार्यरूपानें परिणत झालें; असें हें कार्यकारणरूप ब्रह्म तें शुद्धच होय, मायिक नव्हे, अर्थात् माया म्हणून मुळींच नाहीं.

आतां या सर्व जगाचें कारण असें जें ब्रह्म तें साकार आहे. श्रुति व स्मृति हेंच स्पष्ट उपपादन करितात. उदाहरणार्थ—

विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात्
सं बाहुभ्यां धमति संपतत्रैर्द्यावाभूमी जनयन् देव एकः
सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपाद्—ऋग्वेद.

सर्वतः पाणिपादंतत् सर्वतोऽक्षिशिरोमुखं—भगवद्गीता.

आनंदमात्रकरपादमुखोदरादि—नारदपंचरात्र.

अथवा परमात्मानं परमानंदविग्रहं—याज्ञवल्क्यस्मृतिः

अरूपवदेव हि तत्प्रधानत्वात्
प्रकृतैतावत्त्वं हि प्रतिषेधति ततो ब्रवीति च भूयः
वेदांतसूत्रं

अर्थ—त्याचे (ब्रह्माचे) नेत्र सर्वत्र आहेत; त्याचीं मुखें ही सर्वत्र आहेत; त्याचे बाहु सर्वत्र आहेत; त्याप्रमाणें त्याचे पाय देखील सर्वत्र आहेत; तो परमात्मा एकच आहे; व आपल्या दोन बाहूंनीं त्या त्या शरीरांबरोबर त्या त्या जीवांचा संयोग करित होत्साता हें जमीनअस्मान निर्माण करितो.

त्या पुरुषास (ब्रह्मास) हजार मस्तकें आहेत; हजार डोळे आहेत; व पाय ही हजार आहेत.

त्याचे हात व पाय सर्वत्र आहेत; व त्याचे डोळे, त्याचीं मस्तकें, व त्याच्या शिरा हीं हि सर्व सर्वत्र आहेत.

त्याचे हात, त्याचे पाय, त्याचें तोंड, त्याचें पोट हें सर्व आनंदमय आहे.

अथवा परम असा जो आनंद तोच आहे शरीर ज्याचें असा जो परमात्मा (ब्रह्म).

ज्यांच्या योगानें "रूपण" म्हणजे आपले सर्व "व्यवहार" चालतात, तीं "रूपें," म्हणजे हस्तपादादि "इंद्रियें;" "रूपवत्" म्हणजे ज्याला "रूपें" असतात तो; म्हणजे मनुष्य; त्याचे जसे कर, चरण, इत्यादि अवयव भिन्न असतात त्याप्रमाणें ब्रह्माचे अवयव ब्रह्मापासून भिन्न नाहींत, तर रूपें हींच ब्रह्माचें रूप; अर्थात् तें "रूपरूप" आहे; पण "रूपवत्" नाहीं; तर "अरूपवत्"च आहे. आतां करादिक ब्रह्माहून अभिन्न आहे व ब्रह्म करादिकांहून अभिन्न आहे, अर्थात् तें साकार आहे यास प्रमाण काय? तर सूत्रकार म्हणतात, कीं "तत्प्रधानत्वात्". ज्यापक्षीं सर्व वेदांतवाक्यें ब्रह्माचेंच प्रतिपादन करितात, व ज्यापक्षीं त्याच वेदांतवाक्यांत करादिकांचेंही निरूपण केलें आहे, त्यापक्षीं करादिक ब्रह्माहून भिन्न नाहीं, अर्थात् ब्रह्म साकारच आहे असें झटलें पाहिजे; न म्हटल्यास वेदांतवाक्यें ब्रह्मपर आहेत, असा जो सूत्रकाराचा उद्घोष तो अन्यथा होतो. "हि" म्हणजे निश्चयेंकरून हें असेंच आहे; अर्थात् याची उपपत्ति "सर्वत्र प्रसिद्धोपदेशात्, आमनंति चैनमस्मिन्," इत्यादि अधिकरणांत स्पष्ट केली आहे.

ज्या निर्विशेष श्रुति आहेत त्या ब्रह्माचें निर्विशेषत्व उपपादन करितात असें नाहीं, तर "प्रकृत" म्हणजे लोकांमध्यें जें "एतावत्त्व" म्हणजे इतकेपणा, अर्थात् स्थूलत्व, ह्रस्वत्व, इत्यादि लौकिक गुण, त्यांचा मात्र निषेध करितात; सर्वेशितृत्वादिक जे श्रौत गुण त्यांचा निषेध करित नाहींत. कारण "ततो ब्रवीति च भूयः" म्हणजे लाग-

लच "[1]प्रत्यगात्मानमैक्षत्, एतस्यैवाक्षरस्य प्रशासने गार्गि द्यावापृथिवी विधृते तिष्ठतः" इत्यादि वचनांनीं श्रुतीच ब्रह्माचें सगुणत्व उपपादन करितात.

यावरून ब्रह्म साकार, सगुण, सर्वेश्वर, असें आहे हें वाचकाच्या ध्यानांत येईल.

आतां ब्रह्माचें स्वरूप झटलें झणजे श्रुतींवरूनच समजतें; झणून जसें श्रुति निरूपण करितात तसेंच आपणास ग्रहण केलें पाहिजे. आतां श्रुति झणतात कीं हा परमात्मा (ब्रह्म) "[2]सर्वकामः, सर्वरसः, रसो वै सः," असा आहे, व "रसं ह्येवायं [3]लब्ध्वाऽऽनंदी भवति." रसांत मुख्य रस झटला झणजे शृंगार रस. तेव्हां ब्रह्म हें शृंगाररसमय आहे, असेंच झटलें पाहिजे; अन्यथा श्रुतींच्या निर्दोषत्वास बाध येतो; यासाठीं प्रिय स्त्रियांचा वियोग व संगम हे दोनही परमात्म्यास (ब्रह्मास) झाले पाहिजेत. याप्रमाणें कधीं गोकुलांतील स्त्रियांबरोबर विलास व विनोद करणें व कधीं कधीं त्यांच्यापासून वियुक्त होऊन त्यांच्यासाठीं परमात्म्यानें शोक करणें यांत कांहीं आश्चर्य नाहीं; कारण तो शृंगाररसमयच आहे.

अथवा ब्रह्म म्हणजे सर्व परस्परविरुद्ध धर्मांचा आधारच आहे, असें झटलें पाहिजे. यास प्रमाण पाहिजे असल्यास निर्दोष व अपौरुषेय श्रुति व भक्तांचा साक्षात् अनुभव.

आतां कदाचित् कोणी दुराग्रही असें झणेल कीं आत्मारामत्वादिक धर्म मात्र ब्रह्मांत रहातात; तद्विरुद्ध दुसऱ्या धर्मांचा व ब्रह्माचा मुळींच संबंध नाहीं. तर आह्मीं त्यास असें सांगतों कीं आत्मारामत्वादिक हे ब्रह्माचे साधारण धर्म खरे. पण भक्तांवर परमात्म्याचा मोठाच अनुग्रह असतो, यासाठीं साधारण मर्यादेचें उल्लंघन करून त्यांचे इच्छानुरूप, लागतील तशा स्वच्छंदलीला करून, त्यांस संतुष्ट करितों. झटलें हीं आहे कीं.—

अहं भक्तपराधीनो ह्यस्वतंत्र इव द्विज
वशे कुर्वंति मां भक्त्या साध्वियः सत्पतिं यथा

अर्थ—हे ब्राह्मणा, भक्तांच्या स्वाधीन असल्यामुळें माझें स्वातंत्र्य लयास गेलें आहे. व ज्याप्रमाणें पतिव्रता स्त्रिया आपल्या सज्जन अशा नवऱ्यास आपल्या ताब्यांत ठेवितात, त्याचप्रमाणें माझे भक्त मला ही सर्वप्रकारें आपल्या ताब्यांत ठेवितात. यासाठीं भक्तांवर अनुग्रह करण्याच्या हेतूनें परमात्मा अनेक लीला करितो, हें झणणें रास्त दिसतें. योग्यच आहे जो परमेश्वर तोच आपले नियम मोडू शकेल जो खरोखर राजा आहे, तोच लागेल तसें धर्मविरुद्धही आचरण करून, आपल्या परिवारास संतुष्ट राखील. ज्यापक्षीं परमेश्वरानेंच शास्त्र केलें त्यापक्षीं जारत्वादिक अनेक कुकर्में करून जर भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं

१—"प्रत्यक्"—"प्रत्यक्ष.—"आत्मानं"—"आत्म्याला.—'-ऐक्षत्—पहातो.

"एतस्यैवाक्षरस्य"—"अक्षर" झणजे जें नाशवंत नव्हे तें; असें जें हें ब्रह्म आहे, त्याचेंच. "प्रशासने" राज्य अर्थात् सत्ता आहे झणूनच. "गार्गि"—हे गार्गि. "द्यावापृथिवी"—अंतरिक्ष व पृथ्वी हीं. "विधृते"—निश्चल, अर्थात् पडल्याशिवाय जशींच्या तशींच स्थिर. "तिष्ठतः"—रहातात. गार्गि झणून एक मोठी ब्रह्मवादिनी स्त्री होती, तिनें याज्ञवल्क्यास ब्रह्म झणजे काय असा प्रश्न केला. तेव्हां याज्ञवल्क्यानें "एतस्यैवाक्षरस्य" असें गार्गीस उत्तर दिलें. झणून या श्रुतींत "गार्गि" असें संबोधन आलें आहे.

२—"सर्वरसः"—सर्वरसांनीं भरलेला.

"सर्वकामः"—आपले सर्व प्रियासंगमादिक मनोरथ पूर्ण करिणारा.

"रसः"—रस. "वै"—निश्चयें करून. "सः"—तो परमात्मा. तो परमात्मा (ब्रह्म) रस (रसानें पूर्ण) आहे.

३—"रसं ह्येव"—निश्चयेंकरून परमात्म्यास (ब्रह्मास) रसच. "लब्ध्वा—मिळाला तर. "आनंदी" आनंदानेंयुक्त असा परमात्मा. "भवति—"होतो."

त्यानें धर्माची मर्यादा उल्लंघन केली तर त्यास विचारपूस करणारा कोण? यासाठींच "श्रांतो गजीभिरिभरादिव भिन्नसेतुः" या श्लोकांत "भिन्नसेतुः" (ज्यानें सेतु म्हणजे धर्माची मर्यादा सोडली व अनेक पापकर्मे केलीं) असें सार्थ विशेषण परमात्म्यास वेदव्यास देतात. यासाठीं वादी जसजशी अधिक शंका घेतो, तसतशी आमचीच इष्टसिद्धि अधिक होय. तर हे वादिन्, चिरं जीव.

यावरून परमात्मा हा विरुद्ध धर्मांचें अधिष्ठान आहे हें सुज्ञ वाचकाच्या नजरेंत लागलेंच येईल.

आतां हे जे गोपींबरोबर समागम वियोगाद्यनेकव्यापारकारक परस्पर विरुद्ध धर्म यांस लीला म्हणतात. या लीला अनादि व नित्य होत. ऋग्वेदांत ही म्हटलें आहे कीं.—

विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे
इंद्रस्य युज्यः सखा
तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यंति सूरयः
दिवीव चक्षुरा ततं

अर्थ—"विष्णोः"—विष्णु म्हणजे कृष्ण जो त्याचीं. "कर्माणि"—यशोदेचें स्तनपानप्रभृति कृत्यें. "पश्यत"—पहा. "यतः"—ज्या कृत्यांच्या योगानें. "व्रतानि"—लोकांनीं अत्यंत पवित्र व प्राग्भवीयपापनाशक मानलेल्या गोपींच्या पातिव्रत्यादिक व्रतांला; व आपल्या स्वतःच्याही आत्मारामत्वादिक व्रतांला. "पस्पशे"—बाधा करिता झाला. "इंद्रस्य"—इंद्राचा. "युज्यः"—अनुकूल. "सखा"—मित्र जरी इंद्रानें गोकुलांत जबरदस्त वृष्टि करून परमात्म्याचा द्रोह केला, तरी इंद्रास अधिकारावरून बरतर्फ न करितां त्याचा गर्व मात्र हरण केला; अर्थात् इतका इंद्र परमात्म्यास प्रिय होता. "तत्"—धर्मव्यतिक्रमादिक अनेक कृत्यें जेथें केलीं तें. "विष्णोः" कृष्णाचें, परमात्म्याचें. "परमं पदं"—उत्कृष्ट स्थान, अर्थात् गोकुल. "सदा"—नित्य. "पश्यंति"—पहातात. "सूरयः"—विद्वान्, शब्दब्रह्मपरब्रह्मस्वरूप जाणणारे, अर्थात् भक्त. "दिवीव"—ज्याप्रमाणें स्वर्गामध्यें. "चक्षुः"—देवांचीं नेत्रें. "आततं"—मोठीं. ज्याप्रमाणें देवांचे विस्तीर्ण डोळे मात्र स्वर्गांतील पदार्थ पहातात; इतर जन पाहूं शकत नाहींत; त्याप्रमाणें या परमात्म्याच्या लीला भक्त मात्र सदोदित पहातात; भक्तांहून इतर लोकांस त्या नित्य दृष्टीस पडत नाहींत.

आतां ज्याच्या लीला याप्रमाणें नित्य आहेत, असा जो परमात्मा त्यासच पुरुषोत्तम म्हणतात, या पुरुषोत्तमाचें रहाण्याचें जें गृह, त्यास ब्रह्म म्हणतात; हें सर्व शुद्धाद्वैतमार्तंडांत असें उघड केलें आहे कीं—

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिं
यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमं मम
इति वाक्येन भगवद्गृहं ब्रह्म प्रकीर्तितं
पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यत्वनन्यया
इत्यग्रिमेण वाक्येन गेहाभीशो निरूपितः
भक्त्या लाभो हि निर्दिष्टो भक्तिश्चाचार्यसंश्रयात्
श्रीमदाचार्यचरणभजनादेव नान्यथा

अर्थ— अव्यक्तासच अक्षर असें म्हणतात; व हें अक्षर ज्ञान्यांची परम गति होय. गीतेंत ही म्हटलें आहे, कीं "ज्याची प्राप्ति झाली असतां ज्ञानी संसाराच्या तडाक्यांत पुनः सांपडत नाहीं तें माझें गृह होय." या वाक्यावरून ब्रह्म हें भगवंताचें गृह असें स्पष्ट होतें. "परमपुरुष म्हणजे पुरुषोत्तम हा भक्तीनेंच वळतो, अन्यथा वळत नाहीं," या गीतावचनावरून, पुरुषोत्तम हा त्या गृहाचा स्वामी हें ही स्पष्ट होतें. भक्तीनें पुरुषोत्तम प्रसन्न होतो असें म्हटलें; आतां ही जी भक्ति ती आचार्यांचा अनुग्रह नसला

तर पुरुषावर आपला अंमल बसवीत नाहीं. आचार्य तरी भलतासलता कामाचा नाहीं; तर वल्लभाच्याच कुलांतला असला पाहिजे.

ज्ञानी व भक्त या दोहोंमध्यें अंतर किती असतें तें ही याप्रमाणें वर्णिलें आहे कीं—

ये तु ज्ञानैकसंनिष्ठास्तेषां तु लय एव हि
भक्तानामेव भवति लीलास्वादो अतिदुर्लभः

अर्थ—जे ज्ञानी आहेत, त्यांचा ब्रह्माख्य जें पुरुषोत्तमाचें शरीर त्यांत लय व्हावयाचा, अतिदुर्लभ जो लीलांचा आस्वाद तो भक्तांस मात्र मिळतो; ज्ञान्यांस मिळत नाहीं. सार ह्मणून हेंच कीं ज्याप्रमाणें पुरुषोत्तमानें गोकुलांत रासक्रीडा केली, त्याप्रमाणें त्या लीलांचा आस्वाद घेण्यासाठीं भक्तांनीं त्याप्रमाणें आपल्या बंगल्यांत क्रीडा केल्यास कांहीं हरकत नाहीं. सुवर्णसूत्रांत ही ह्मटलें आहे कीं—

साधनैः प्रतिबंधनिवृत्तौ लीलानुभव आधुनिकस्यापि

अर्थ— दुरितरूपी जो लीलास्वाद न करण्यास प्रतिबंध, त्याची निस्यादिकानुष्ठानानें निवृत्ति झाली ह्मणजे भक्तानें खुशाल भगवंताच्या लीलांचा आस्वाद करावा; कांहीं हरकत नाहीं. असे जे महान् महान् भक्त हे ही लीलाप्रमाणेंच नित्य होत; व त्यांनीं स्वच्छंद लीलानुभव घ्यावा या हेतूनेंच पुरुषोत्तम अनेक कालीं व अनेक स्थलीं या पृथ्वीलोकावर त्यांस अवतारवतो; व आपण त्यांच्या हृदयकमलांत वास करितो. अथवा वास करितो हें ही ह्मणणें बरोबर नाहीं; तर ते पुरुषोत्तमस्वरूपच असतात. याची सेवा केल्यास ती पुरुषोत्तमाचीच सेवा होत्ये. ही सेवा दोन प्रकारची आहे. ह्मटलें आहे, कीं—

चेतस्तत्प्रवणं सेवा फलरूपा तु मानसी
तत्सिध्यर्थं देहवित्तजनिः कार्या—

अर्थ— आपली चेतोवृत्ति पुरुषोत्तमावर दृढ ठेवणें ही मानसी सेवा, हीस फलरूपा ह्मणतात. ही सेवा आपणास चांगली करितां यावी, यासाठीं आपला देह व आपलें वित्त पुरुषोत्तमास समर्पण करणें, ह्या सेवेस साधनरूपा ह्मणतात. याप्रमाणें सेवा केल्यास, पुरुषास परम पद प्राप्त होतें. परम पद ह्मणजे काय? याविषयीं बृहद्वामनपुराणांत ह्मटलें आहे, कीं—

स्त्रियो वा पुरुषो वाऽपि भर्तृभावेन केशवं
हृदि कृत्वा गतिं यांति श्रुतीनां नात्र संशयः

अर्थ— ज्या स्त्रिया किंवा जे पुरुष याप्रमाणें पुरुषोत्तमावर भर्तृभाव ठेवितात, त्यांस श्रुतींची गति प्राप्त होत्ये, यांत कांहीं संशय नाहीं. आतां श्रुतींची गति कोणती? तर त्यांतच ह्मटलें आहे, कीं—

उक्तकालं समासाद्य गोप्यो भूत्वा हरिं गताः

अर्थ— पुरुषोत्तमानें सांगितलेला समय येतांच श्रुतींनीं गोपींचा जन्म घेतला; व नंतर श्रीकृष्णाबरोबर त्यांनीं अखंड रासोत्सव केला.

याप्रमाणें गोपी होऊन श्रीकृष्णाबरोबर अखंड रासोत्सव करणें हाच परम पुरुषार्थ, असें वल्लभ ह्मणतो.

(पुढें चालेल.)

पुराणग्रंथ.

—ooo—

(पुढें चालू.)

भविष्योत्तर ह्मणून एक ग्रंथ आढळतो त्यांतही भविष्य पुराणाप्रमाणेंच प्रथम व्रतें सांगून मग दानें कशीं करावीं हें सांगितलें आहे.

हें भविष्योत्तर पुराण भारती युद्ध आटपल्यावर युधिष्ठिरास राज्याभिषेक झाला तेसमयीं कृष्णानें त्यास सांगितलें आहे.

१० वें ब्रम्हवैवर्तपुराण:—
रथंतरस्य कल्पस्य वृत्तांतमधिकृत्य यत्।
सावर्णिना नारदाय कृष्णमाहात्म्यसंयुतम् ॥१॥
यत्र ब्रह्मवराहस्य चरितं वर्ण्यते मुहु:।
तदष्टादशसाहस्रं ब्रह्मवैवर्तमुच्यते ॥ २ ॥

भावार्थ— जें सावर्णीनें नारदास सांगितलें, ज्यांत कृष्ण माहात्म्य आहे, ज्यांत रथंतर कल्पांतील गोष्टी व ब्रह्मवराहाचें चरित हीं वर्णिलीं आहेत तें ब्रह्मवैवर्तपुराण. त्यांत १८००० श्लोक आहेत.

या पुराणांत राधाकृष्णाचे भक्तीचें माहात्म्य फार वर्णिलें आहे. यांतील वरींच आख्यानें दुसऱ्या कोणत्याही पुराणांत आढळत नाहींत. हें सौतीनें नैमिषारण्यांत शौनकादि ऋषींस सांगितलें आहे. यांत परब्रह्माच्या कृष्णावतारांचें वर्णन असल्यामुळें यांचें नांव ब्रह्मवैवर्तपुराण. ह्याचीं चार खंडें आहेत. पहिलें ब्रह्मखंड, दुसरें प्रकृतिखंड, तिसरें गणेशखंड, व चवथें कृष्णजन्मखंड.

पहिल्या खंडांत कृष्णापासून सर्व देवांची उत्पत्ति झाली असें सांगून पुढें कृष्ण रासमंडळांत जातांच त्याचे अंत:करणापासून राधेची उत्पत्ति झाली असें सांगितलें आहे. नंतर शिवाची कृष्णभक्ति वर्णन करून भक्ति व मुक्ति यांचे प्रकार सांगितले आहेत.

पुढें ब्रह्मदेव व त्याची स्त्री सावित्री यांचे पासून तर्कशास्त्र, गाण्यांतील राग, दिवस, वर्षें, युगें, संस्कार, रोग, काल, व मृत्यु यांची उत्पत्ति झाली असें सांगून ब्रह्मदेवाच्या निरनिराळ्या अवयवांपासून झालेल्या संततीचें ही वर्णन केलें आहे. पुढें एका अध्यायांत विश्वकर्मा व घृताची अप्सरा यांचे पासून नीच जाति व मिश्रजाति उत्पन्न झाल्याविषयीं एक प्रकरण आहे. हा अध्याय कोठें कोठें जातिनिर्णय या नांवानें एका लहानशा ग्रंथाऐवजीं आढळतो. त्याचें लोकांत वजन ही बरेंच आहे. नंतर वैद्यकावरील ग्रंथकार व ग्रंथ यांचीं नांवें सांगून कृष्ण, त्याचें स्थान गोलोक, व नारायणमुनी यांचें वर्णन आहे.

प्रकृतिखंडांत मूल प्रकृतीचे दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री, व राधा असे पांच भाग झाले असें सांगून पुढें गंगा, तुलसी, मनसा, षष्ठी, व काली ह्या मूल प्रकृतीच्या अंशरूपानें; स्वाहा, स्वधा, दक्षिणा, स्वस्ति, क्रियेक सद्गुण व दुर्गुण, आणि उपदेवांच्या स्त्रिया ह्या मूल प्रकृतीच्या कलारूपानें; आणि पृथ्वींतील सर्व स्त्रिया मूल प्रकृतीच्या अंशांश व कलांश रूपानें उत्पन्न झाल्या असें वर्णिलें आहे. नंतर मुख्य प्रकृतीविषयीं कांहीं गोष्टी सांगून शेवटीं गोलोक व नरक यांचें वर्णन व इतर कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत.

गणेशखंडांत पार्वतीनें शिवाचे आज्ञेवरून व्रत करून विष्णुभक्ति केल्यामुळें साक्षात् भगवान् कृष्ण गोलोक सोडून तिचा पुत्र झाला असें सांगितलें आहे. पुत्रोत्साहाचें वर्तमान ऐकून सर्व देवांबरोबर शनी शिवपार्वतीचे भेटीस आला त्याची दृष्टी मुलावर पडतांच त्याचें शिर धडापासून वेगळें झालें तें गोलोकीं निघून गेलें. तेव्हां पार्वतीचें दु:ख शांतवन करण्याकरितां विष्णूनें पुष्पभद्रा नदीवर एक हत्ती निजला होता त्याचें शिर आणून गणेशाचे धडास लाविलें. पार्वतीनें 'तूं पंगु होशील' असा शनीस शाप दिला. पुढें कार्तिकस्वामीच्या जन्माचें वृत्त सांगून गणेशाचें शिर जाण्याचें कारण असें सांगितलें आहे कीं शिवानें कश्यपाचा पुत्र आदित्य ह्म० सूर्य यास मारिलें तेव्हां "तुझ्या पु-

त्याचें शिर नष्ट होईल" असा कश्यपानें शिवास शाप दिला. नंतर गणेशास एकदंत नांव पडण्याचें कारण असें सांगितलें आहे कीं, शिवपार्वती निद्रित असतां शिवभक्त परशुराम शिव दर्शनास आला त्यास द्वारीं गणेश होता त्यानें अटकाव केला तेव्हां दोघांचें युद्ध झालें त्यांत गणेशाचा एक दांत परशुरामाचे परशूनें मोडला. पुढें गणेशाचीं नांवें सांगून त्याचा एक दांत जाण्याचें कारण त्यास तुलसीचा शाप होता असें सांगितलें आहे. हीं आख्यानें सांगण्यापूर्वी परशुरामाचें आख्यान फारच विस्तारानें सांगितलें आहे.

कृष्णजन्मखंड हें फार मोठें आहे. याचे १३२ अध्याय आहेत. कृष्णानें राधेच्या प्रीतीस्तव अवतार घेतला असें प्रथम सांगून पुढें कृष्णाविषयीं अनेक मोठमोठालीं व मनोरंजक आख्यानें सांगितलीं आहेत. शेवटीं १३१ वे अध्यायांत पुराणांतील विषयांची अनुक्रमणिका देऊन १३२त सर्व पुराणांची व उपपुराणांचीं नांवें सांगितलीं आहेत.

११वें लिंगपुराण:—

यत्राग्निर्लिंगमध्यस्थः प्राह देवो महेश्वरः।
धर्मार्थकाममोक्षार्थमाग्नेयमधिकृत्य च ॥१॥
कल्पांतं लैंगमित्युक्तं पुराणं ब्रह्मणा स्वयं।
तदेकादशसाहस्रं.....

भावार्थ—ज्यांत अग्निर्लिंगांत राहणाऱ्या महेश्वरानें अग्निकल्पाच्या अंतीं धर्मार्थकाममोक्षांचें वर्णन केलें आहे तें लिंगपुराण. त्यांत ११००० श्लोक आहेत.

सांप्रत जें लिंगपुराण उपलब्ध आहे त्यांतील विषय वरील वर्णनानुसारच आहेत. ईशान कल्पास उद्देशून तें लिहिलें आहे एवढाच काय तो भेद. आरंभीं सर्ग व प्रतिसर्ग आणि प्रजापतींचे वंश यांचें संक्षेपानें वर्णन केलें आहे. त्यांत सर्व वस्तुंचें कारण शिव असें म्हटलें आहे. पुढें शिवाचे अवतार व निरनिराळ्या कल्पांतील त्याचीं कृत्यें यांचें वर्णन केलें आहे. नंतर शिव व विष्णु यांचे प्रतिस्पर्धेच्या कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांत शिवाचें वर्चस्व दाखविलें आहे. पुढें विश्ववर्णन व वैवस्वत मन्वंतरांत कृष्णापर्यंत झालेल्या राजांचें वर्णन हीं आहेत. नंतर शिवाचे अवतारांचे पूजेचा विधि, स्तोत्रें इ० सांगून अनेक आख्यानांनीं त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे. या ग्रंथास पुराणापेक्षां शिवाराधनकल्प हें नांव विशेष शोभेल. यांत योगाभ्यासाचें महत्व विशेष वर्णिलें आहे यावरून योगाभ्यासाची प्रवृत्ति भरतखंडांत इ०स०च्या ८व्या किंवा ९व्या शतकांत झाली त्यानंतर हें लिहिलें असावें असें दिसतें.

१२वें वराहपुराण:—

महावराहस्य पुनर्माहात्म्यमधिकृत्य च।
विष्णुनाभिहितं क्षोण्यै तद्वाराहमितीर्यते॥१॥
मानवस्य प्रसंगेन कल्पस्य मुनिसत्तमाः।
चतुर्विंशत्सहस्राणि तत्पुराणमिहोच्यते ॥२॥

भावार्थ—ज्यांत मानवकल्पाचे संबंधानें विष्णुनें पृथ्वीस महावराहाचें माहात्म्य सांगितलें आहे व ज्यांत २४००० श्लोक आहेत तें वराहपुराण.

हल्लीं जें वराहपुराण उपलब्ध आहे तें विष्णुनें पृथ्वीस सांगितलें आहे खरें, परंतु त्यांत २४००० श्लोक नसून सरासरी दहा सवादहा हजार आहेत. यांत उत्पत्तिविषयीं व राजवंशांविषयीं वर्णन फारसें नसल्यामुळें यास पुराण हें नांव शोभत नाहीं. लिंगपुराण हा जसा शिवाराधन कल्पावर ग्रंथ आहे तद्वतच वराहपुराण हा विष्णूचें आराधन विधिप्रतिपादक ग्रंथ आहे. यांत स्तोत्रें, नियम,

व्रतें इ० आहेत. मधून मधून उदाहरणार्थ आख्यानें आहेत. त्यांपैकीं थोडींच इतर पुराणांत आढळतात. शिव व दुर्गा यांचें माहात्म्यप्रतिपादक कांहीं आहेत. वैष्णव पुराणांत हीं आख्यानें कांहींअंशीं अप्रासंगिकच होत. या पुराणाचा बराच भाग तीर्थवर्णनांत गेला आहे. त्यांत मथुरामाहात्म्य म्हणून एक मोठें प्रकरण आहे.

या पुराणांत रथयात्रा, जन्माष्टमी, इ० कृष्णपूजेचे विशेष प्रकार मुळींच नाहींत यावरून रामानुजाचार्यांनीं वैष्णवपंथ इ० स० च्या १२ वे शतकाचे आरंभीं नुक्ताच प्रवृत्त केला होता तेव्हां हें रचिलें असावें असें दिसतें.

१३ वें स्कंदपुराण:—

यत्र माहेश्वरान् धर्मानधिकृत्य च षण्मुखः।
कल्पे तत्पुरुषे वृत्तं चरितैरुपबृंहितम् ॥१॥
स्कांदं नाम पुराणं तदेकाशीतिर्निगद्यते।
सहस्राणि शतं चैकमिति मर्त्येषु गद्यते ॥२॥

भावार्थ—ज्यांत षडानन ह्मणजे कार्तिकस्वामी यानें माहेश्वरधर्म विषयक तत्पुरुष कल्पांतील अनेक गोष्टी सांगितल्या आहेत व ज्यांत ८११०० श्लोक आहेत तें स्कंदपुराण.

स्कंदपुराणाचा समग्र ग्रंथ कोठें उपलब्ध नाहीं असा सर्वांचा समज आहे. ज्या संहिता, खंडें, व माहात्म्यें स्कंदपुराणांतर्गत ह्मणून हल्लीस पडतात त्यांतील ग्रंथसंख्या ८११०० पेक्षां फारच मोठी भरेल. फक्त एका काशीखंडांत १५००० श्लोक आहेत. उत्तरहिंदुस्थानांत उत्कलखंड ह्मणून एक ग्रंथ प्रसिद्ध आहे तो स्कंदपुराणाचाच एक भाग असें मानितात. त्यांत उत्कलक्षेत्र ह्म० ओरिसा प्रांत व त्यांतील पुरुषोत्तम क्षेत्र यांचें माहात्म्य आहे. या दोहोंखेरीज ब्रह्मोत्तरखंड, रेवाखंड, शिवरहस्यखंड, हिमवत्खंड इ० खंडें या पुराणाचेच भाग असें मानितात. स्कंदपुराणांतील संहितांपैकीं सूतसंहिता, सनत्कुमारसंहिता, सौरसंहिता, व कपिलसंहिता ह्या मुख्य आहेत. माहात्म्यें तर फारच आहेत. सूतसंहितेत ह्मटलें आहे कीं स्कंदपुराणांत सहा संहिता, पांचशें खंडें, एकंदर ९०००० पांच लक्ष श्लोक आहेत. सर्व पुराणसंहिता जर चार लक्ष तर स्कंदपुराणांत पांच लक्ष ग्रंथ कोठून असणार? यावरून वरील सूतसंहितेचा लेख अतिशयोक्तीचा दिसतो.

(पूर्वी चालेल.)

भोजप्रबंध.

—०००—

पूर्वी धारानामक नगरींमध्यें सिंधुल नांवाचा राजा बहुत वर्षें प्रजेचें पालन करीत होता. त्याला वृद्धपणीं एक भोजनामक पुत्र झाला. तो जेव्हां पांच वर्षांचा झाला, तेव्हां सिंधुलराजानें आपला मृत्युकाळ समीप आला असें पाहून आपल्या जवळ मुख्य प्रधानास बोलावून आणिलें, आणि असा विचार केला कीं, आपला धाकटा बंधु मुंज हा बलवान आहे आणि आपला पुत्र तर लहान आहे. आतां कसें करावें? बरें जर कां राज्यभार धारण करण्यास समर्थ अशा बंधूस सोडून पुत्रास राज्य देईन तर लोकांच्या निंदेस पात्र होईन. किंवा मुंजच राज्याच्या लोभानें भोजास विष वगैरे घालून मारून टाकील; आणि तेव्हां तर दिलेलें राज्यही व्यर्थ जाईल, आणि उलटी पुत्रहानि होऊन वंश खुंटेल. कारण,

लोभप्रतिष्ठा पापस्य प्रसूतिर्लोभ एव च।
मास्तु ते संशयश्चित्ते लोभः पापस्य कारणम्॥

आरंभीं लोभापासून पाप उत्पन्न होतें, आणि पापापासून पुनः पाप उत्पन्न होत जातें

याकरितां लोभ हेंच पापाचें मूळकारण याविषयीं कांहीं संशय मनांत आणूं नको.

म्हणून पापाचें कारण निःसंशयें लोभच आहे. आणखी,

लोभात् क्रोधःप्रभवति क्रोधात् द्रोहः प्रवर्त्तते।
द्रोहेण नरकं याति शास्त्रज्ञोपि विचक्षणः ॥

लोभामुळें क्रोध उत्पन्न होतो, क्रोधामुळें द्रोह उत्पन्न होतो, आणि द्रोहामुळें शास्त्रज्ञ पंडितही नरकाप्रत जातो. आणखी,

मातरं पितरं पुत्रं भ्रातरं वा सहोदरम् ।
लोभाविष्टो नरो हन्ति स्वामिनं वा सुहृत्तमम् ॥

लोभी मनुष्य माता, पिता, पुत्र, सखा बंधु, धनी किंवा मित्र यांचाही जीव घेतो. याप्रमाणें विचार करून राज्य मुंजाच्या स्वाधीन केलें, आणि त्याच्या मांडीवर आपल्या पुत्रास बसविलें.

राजा मरण पावून कांहीं काळ गेल्यानंतर मुंजानें सर्व राज्य आपल्या स्वाधीन करून घेतलें, आणि बुद्धिसागर नांवाच्या मुख्य प्रधानास व्यापाराच्या निमित्तानें दूरदेशीं पाठवून त्याच्या जागीं दुसऱ्या प्रधानास नेमिलें; आणि राजपुत्रास शास्त्राध्ययन करण्याकरितां गुरूच्या स्वाधीन केलें.

एके दिवशीं ज्योतिःशास्त्रांत व सर्व विद्येंत निपुण असा कोणीएक ब्राम्हण राजसभेंत आला आणि राजास आशीर्वाद देऊन राजाज्ञेनें खालीं बसला. आणि म्हणूं लागला कीं, हे राजा, मला सर्व लोक सर्वज्ञ म्हणतात तर तूंहीं प्रश्न कर. कारण असें आहे कीं,

कण्ठस्था या भवेद्विद्या सा प्रकाश्या सदा बुधैः।
या गुरौ पुस्तके विद्या तया मूढः प्रतार्यते ॥

आपल्याला कोणतीही विद्या येत असली तर ती विद्वानांनीं सर्वकाळ प्रकट करावी; पण मूर्ख मनुष्य गुरु किंवा पुस्तक यांवर हवाला ठेविल्यानें फसतो. हें त्याचें भाषण ऐकून राजास मोठा विस्मय वाटला, आणि म्हणाला कीं हे ब्राम्हणा, आम्ही जन्मापासून हा काळपर्यंत जें जें आचरण केलें त्या सर्वांचा जर उलेख करशील तरच तुला सर्वज्ञ असें म्हणूं. तेव्हां त्या ब्राम्हणानें राजानें जें कांहीं केलें होतें तें सर्व सांगितलें; किंबहुना राजाचीं सर्व गुप्त कृत्येंही प्रगट केलीं. त्या सर्व खुणा जाणून राजा संतुष्ट झाला. आणि म्हणाला,

मातेव रक्षति पितेव हिते नियुंक्ते
कान्तेव चाभिरमयत्यपनीय दुःखम् ।
कीर्तिं च दिक्षु वितनोति तनोति लक्ष्मीं
किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ॥

विद्या ही मातेप्रमाणें रक्षण करिते; पित्याप्रमाणें हित करिते; कांतेप्रमाणें मनोरंजन करून सुख देते; सर्व पृथ्वीभर कीर्ति पसरिते आणि द्रव्य वाढविते; कल्पतरूप्रमाणें विद्येच्या योगानें सर्व कांहीं साध्य होतें. असें म्हणून त्यानें त्या ब्राम्हणास दहा सुंदर अश्व दिले.

तेव्हां त्या सभेंत बुद्धिसागर बसला होता; तो म्हणाला कीं, हे राजा, भोजाची जन्मपत्रिका नाहीं, तर ह्या ब्राम्हणापासून त्याचें जन्मवृत्त विचारावें. तें ऐकून राजा म्हणाला, हे ब्राम्हणा, भोजाचीही जन्मपत्रिका सांगावी. तेव्हां तो ब्राम्हण म्हणाला, कीं भोजास शाळेतून येथें आणावें. तें ऐकून मुंजानें लागलाच मनुष्य पाठवून गुरूच्या घरून भोजास आणविलें. तेव्हां भोज सभेंत येऊन पित्याप्रमाणें राजास नमस्कार करून नम्रतेनें उभा राहिला. त्यावेळेस तें त्याचें स्वरूप पाहून सर्व राजमंडळ दिपून गेलें, आणि तो जसा काय इंद्रच पृथ्वीवर उतरला, अथवा मदनानेंच अवतार घेतला, असा भासूं लागला. त्यास पाहून तो ज्योतिषी म्हणाला, हे

राजा, भोजाचा भाग्योदय वर्णायास ब्रम्हदेवही असमर्थ आहे. त्यापुढें मज गरीब पोटभरू ब्राम्हणाचा काय पाड ? तथापि यथामति सांगतों. परंतु भोजास एथून पाठवून द्यावें. तेव्हां राजानें भोजास तेथून परत शाळेंत पाठविल्यावर तो ब्राम्हण म्हणाला, राजा ऐक,

पञ्चाशत्पञ्चवर्षाणि सप्तमासदिनत्रयम् ।
भोजराजेन भोक्तव्यः सगौडो दक्षिणापथः ॥

भोजराजा पंचावन्न वर्ष, सात महिने आणि तीन दिवस पर्यंत गौडदेश व दक्षिणदेश यांवर राज्य करणार आहे.

हें ऐकून राजानें वरपंकी चातुर्यानें संतोष दाखविला; परंतु आंतून त्याच्या मुखावर भीतीची कळा उमटली. ब्राह्मण गेल्यानंतर राजा आपल्या मंदिरांत जाऊन बिछान्यावर पडला आणि विचार करता झाला, जर हें राज्य भोजाच्या हस्तगत झालें तर मी जीवंत असूनही मेल्याप्रमाणेंच आहें. कारण, असें आहे,

तान्येंद्रियाणि सकलानि तदेव नाम
सा बुद्धिरप्रतिहता वचनं तदेव ।
अर्थोष्मणा विरहितः पुरुषः क्षणेन
सोप्यन्य एव भवतीति विचित्रमेतत् ॥

काय चमत्कार पहा ! मनुष्याचा द्रव्योन्माद उतरून गेला ह्मणजे तीं त्याचीं सर्व इन्द्रियें, तें त्याचें नांव, ती त्याची विलक्षण बुद्धि, तें त्याचें भाषण, किंबहुना तो स्वतांही, हीं सर्व बदलून जातात! आणखी—

एकं हन्यान्न वा हन्यादिषुर्मुक्तो धनुष्मता ।
बुद्धिर्बुद्धिमता प्रोक्ता हन्याद्राष्ट्रं सराजकम् ॥

धनुर्धारी पुरुषानें बाण सोडला तर तो एकास मारील न मारील; परंतु, बुद्धिमान् पुरुषाच्या बुद्धीच्या योगानें राजासह सर्व राज्य नष्ट होतें. आणखी,

शरीरनिरपेक्षस्य दक्षस्य व्यवसायिनः ।
बुद्धिप्रारब्धकार्यस्य नास्ति किञ्चन दुष्करम् ॥

शरीराची काळजी न बाळगणारास, शहाण्या व उद्योगी पुरुषास, व बुद्धीच्या योगानें कार्यारंभ करणारास कोणतेंही कृत्य कठीण नाहीं.

असूयया हतेनैव पूर्वोपायोद्यमैरपि ।
शत्रूणां गृह्यते सम्पत्सुहृद्भिर्मन्त्रिभिस्तथा ॥

शत्रूंची संपदा, असूयेनें वधकरून पायाशुद्ध उद्योगानें, आणि चांगल्या अतःकरणाच्या प्रधानांपासून प्राप्त होते.

तर उद्योगांतीं काय दुःसाध्य आहे! ह्मटलें आहे कीं,

अतिदाक्षिण्ययुक्तानां शङ्कितानां पदे पदे ।
परापवादभीरूणां दूरतो यान्ति भूतयः ॥

अतिशय दयाळू, पावलोपावलीं संशयित होणारे, व दुसऱ्यानें लावलेल्या अपवादाला भिणारे, अशा पुरुषांपासून लक्ष्मी लांब राहते. आणखी,

आदानस्य प्रदानस्य कर्तव्यस्य च कर्मणः ।
क्षिप्रमक्रियमाणस्य कालः पिबति तद्रसम् ॥

घेणें, दान देणें, आणि कर्तव्यकर्म हीं जो कोणी शीघ्र करीत नाहीं, त्याचा काळ व्यर्थ जातो.

अपमानं पुरस्कृत्य मानं कृत्वा च पृष्ठतः ।
स्वार्थं समुद्धरेत्प्राज्ञः स्वार्थभ्रंशो हि मूर्खता ॥

आधीं अपमान आणि मग मान, ही गोष्ट लक्षांत देवून प्रज्ञानें आपला स्वार्थ साधावा; कारण स्वार्थ नाश झाल्यानें मूर्खत्व आंगीं लागतें.

न स्वल्पस्य कृते भूरि नाशयेन्मतिमान्नरः ।
एतदेवात्र पाण्डित्यं यत्स्वल्पाद्भूरिरक्षणम् ॥

शहाण्या पुरुषानें थोड्याकरितां पुष्कळाचा नाश करूं नये. थोड्याच्या योगानें पुष्कळाचें रक्षण करणें यांतच शहाणपणा आहे.

जातमात्रं नयः शत्रुं व्याधिं च प्रशमं नयेत् ।

अतिपुष्टांङ्गयुक्तोपि स पश्चात्तेन हन्यते ॥

शत्रु व रोग हीं उत्पन्न झाल्याबरोबरच त्यांचा जो कोणी मोड करीत नाहीं तो स्वतां बळकट असला तरी शेवटीं त्यांच्याच योगानें मारला जातो.

प्रज्ञागुप्तशरीरस्य कीं करिष्यन्ति संहताः।
हस्त्यस्तातपत्रस्य वारिधारा इवारयः ॥

जसें हातांत छत्र धरलेल्या पुरुषावर कितीही पर्जन्यवृष्टि झाली तरी त्याला कांहीं इजा पोंचत नाहीं, तद्वत् शत्रू जरी एकत्र जमून हला करण्यास आले तरी शहाणा मनुष्य स्वबुद्धीनें शरीर रक्षण करितो.

अफलानि दुरन्तानि समव्ययफलानि च।
अशक्यानि च कार्याणि नारभेत विचक्षणः॥

शहाण्यानें निष्फळ, ज्याचा शेवट वाईट होणार अशीं, फलाच्या मोलाइतका ज्याला खर्च व अशक्य अशीं कृत्यें करण्याचें आरंभूं नये.

याप्रमाणें विचार करून अन्नग्रहण न करितां दिवसाच्या तिसऱ्या प्रहरीं बंगालदेशाच्या महाप्रतापी वत्सराजास बोलावण्याकरितां आपल्या एका जवळच्या सेवकास पाठविलें. त्या राजसेवकानें वत्सराजाच्या वाड्यांत जाऊन राजानें आपणांस सत्वर बोलाविलें आहे असें सांगितलें. तें ऐकून वत्सराजा आपल्या रथावर आरूढ होऊन सपरिवार आला आणि रथावरून उतरून राजमंदिरांत गेल्यानंतर राजास नमस्कार करून त्याच्या आज्ञेनें बसला. राजा आजूबाजूस कोणी नाहीं असें पाहून वत्सराजास ह्मणाला, वत्सराज,

राजा तुष्टोपि भृत्यानां मानमात्रं प्रयच्छति।
ते तु संमानितास्तस्य प्राणैरप्युपकुर्वते ॥

राजा संतुष्ट झाला असतां सेवकांस सन्मान मात्र देतो, पण मान प्राप्त झाला असतां ते प्राण सुद्धां देण्यास तयार होतात. तर त्वां भोजास भुवनेश्वरीच्या अरण्यांत नेऊन मारून टाकावें, आणि त्याचें शिर रात्रीं प्रथम प्रहरीं अन्तःपुरांत घेऊन यावें. हें ऐकून तो उठला व राजास प्रणाम करून ह्मणाला, आपली आज्ञा प्रमाण; परंतु हे राजा, आपल्या कृपेनें आपल्या अन्नावर वाढलों आहें, त्यास माझी कांहीं बोलण्याची इच्छा आहे तर माझें भाषण सापराध जरी असलें तरी क्षमा करावी. हे राजा, भोजकुमाराजवळ द्रव्य नाहीं, बाहुबळ नाहीं, सैन्यबळ नाहीं, खबुतराप्रमाणें आपल्या पायांजवळ अन्न खाऊन पडला आहे तर त्यास मारण्यांत कांहीं मोठा अर्थ आहे असें मला वाटत नाहीं. तेव्हां राजानें प्रातःकाळीं सभेमध्यें जें कांहीं घडलें होतें तें सर्व निवेदन केलें. तें ऐकून तो हंसून बोलता झाला. राजा ऐक, श्रीरामचंद्र, त्रैलोक्याचा धनी, व वसिष्ठ, ब्रह्मदेवाचा पुत्र; याच महर्षीनें राज्याभिषेकास मुहूर्त सांगितला होता, असें असतां त्रिभुवनेश्वर रामास त्याच मुहूर्तावर वनवासांत जावें लागलें व तेथें सीतेस चोरून नेलें. तेव्हां भूतभविष्यवर्तमान जाणणाऱ्या वसिष्ठाचेंही वाक्य असत्य ठरलें. त्यापुढें या पोटभरू ओंगळ ब्राह्मणाचा काय पाड! कीं ज्याच्या वचनानें प्राणापेक्षांही प्रिय व मदनापेक्षांही सुंदर अशा श्रीभोजकुमाराचा वध करण्यास इच्छितां! आणखी असें आहे कीं,

किं नु मे स्यादिदं कृत्वा किं नु मे स्यादकुर्वतः।
इति संचिन्त्य मनसा प्राज्ञः कुर्वीत वा न वा ॥

हें कृत्य केल्यापासून आपणास काय प्राप्त होईल किंवा ह्यापासून आपणास काय तोटा होईल, याचा नीट विचार करून नंतर शहाण्यानें त्या कामास हात घालावा किंवा सोडून द्यावें.

उचितमनुचितं वा कुर्वता कार्यजातं
परिणतिरवधार्या यत्नतः पण्डितेन ।
अतिरभसकृतानां कर्मणामाविपत्तेर्
भवति हृदयदाही शल्यतुल्यो विपाकः ॥

योग्य किंवा अयोग्य कार्य उत्पन्न झालें असतां शहाण्यानें विचारानें त्याचा शेवट लक्षांत आणावा; उतावळीनें कार्य केलें असतां त्याचा शेवट हृदयास बाणासारखा टोंचतो. आणखी—

येन सहासितमशितं हसितं कथितं च रहसि विश्रब्धम् । तं प्रति कथमसतामपि निवर्तते चित्तमामरणात् ॥

ज्याच्या बरोबर बसलों, जेवलों, हंसलों, एकांतीं यथेष्ट गोष्टी केल्या, त्यापासून दुष्टाचेंही चित्त मरेपर्यंत वेगळें होत नाहीं. ह्यास मारिलें तर सिंधुल राजाचे अत्यंत प्रीतिपात्र योद्धे क्षोभलेल्या समुद्राप्रमाणें नगराचा विध्वंस करतील आणि तुला राज्य करून फार दिवस झाले असले तरी नगरवासी लोक भोजासच राज्यासनावर बसाविण्यास इच्छितील. फार तर काय, पण तुझेच सरदार तुझा नाश करण्यास प्रवृत्त होतील; कारण,

सत्यपि सुकृते कर्मणि दुर्नीतिरिवान्तरे श्रियं हरति । तैलैरुपयुक्तामपि दीपशिखां दलति वातालीं ॥

एखादें कृत्य चांगलें जरी असलें तरी दुर्नीतीच्या योगानें त्याचा पराभव होतो; वाऱ्याच्या जोरानें तेलानें युक्त असलेली दिव्याची जोत नाश पावते. ह्मणून हे राजा, पुत्रवधानें कधींही हित होत नाहीं.

या प्रमाणें वत्सराजाचें भाषण ऐकून राजा क्रोधाविष्ट होऊन ह्मणाला; वत्सराज, तूं आपणासच राजाचा मालक समजतोस काय? तूं सेवक नव्हेस? तुला माझें ऐकायाचें नसलें तर तुला पाहिजे तें कर. तें ऐकून वत्सराज वेळे प्रमाणे वागलें पाहिजे असें जाणून गपचूप राहिला.

(पुढें चालेल.)

तर्कसंग्रह.

—oooo—

(पुढें चालू.)

पद ह्मणजे शब्द, आणि अर्थ ह्मणजे वस्तु; पदार्थ ह्मणजे शब्दानें दाखविलेली वस्तु. शब्द हा आपण दाखविलेल्या वस्तुपासून भिन्न आहे. चौरंग ही वस्तु उच्चारित किंवा लिखित, चौरंग शब्दापासून भिन्न आहे. चौरंग वस्तु ह्मटली ह्मणजे चार पाय आणि त्यांवर एक फळी असणारा एक लांकडाचा पदार्थ होय; आणि चौरंग शब्द ह्मटला ह्मणजे चौ—रं—ग ह्या तीन वर्णांचा उच्चारित किंवा लिखित समुदाय होय. पद ह्मणजे चौरंग शब्द आणि अर्थ ह्मणजे चौरंग वस्तु. चौरंग पदार्थ ह्मणजे चौरंग ह्या शब्दानें दर्शविलेली चतुष्पदात्मक वस्तु. सामान्यतः पदार्थ ह्मटला ह्मणजे जगतांतील कोणतीही वस्तु; मग ती स्पर्श्य, दृश्य किंवा घ्राणविषयक, कशीही असो. उदाहरणार्थः— मन, आत्मा, काळेपणा, आकर्षण इत्यादि.* तिला नांव देतां येतें ह्मणून ती पदार्थ आहे. तें नांव पूर्वीच दिलेलें पाहिजे किंवा कधीं तरी तिला पृथक् नांव दिलें पाहिजे असें नाहीं. कधींही नांव दिलें नाहीं तरी ती

*आपले मराठी भाषेमध्यें पदार्थ शब्दाचा अर्थ फार निराळा झाला आहे. मराठीमध्यें पदार्थ ह्मटला ह्मणजे तो स्पर्श्य किंवा दृश्य असला पाहिजे. चौरंग हा पदार्थ आहे, पाट हा पदार्थ आहे, असें ह्मणणें मराठींत नीट दिसतें; परंतु मन हा पदार्थ आहे, औदार्य हा पदार्थ आहे हें ह्मणणें मराठींत नीट दिसत नाहीं.

पदार्थ आहे, ह्मणजे तिचें आंगीं नांव धारण करण्याची शक्ति आहे; ती ह्या वस्तुला पदार्थत्व देते आणि तीस पदार्थ ह्या नांवाखालीं आणिते. जर आफ्रिकेच्या ओसाड वाळवंटामध्यें किंवा हिमालयाचे अति उंच शिखरावर कांहींएक वस्तु आहे असें ह्मटलें, तर तीही पदार्थच होय. कारण जरी आजपर्यंत ती कोणास माहित नाहीं अशी कल्पना केली तरी ती जर कोणास माहित असती तर ह्यास तिला कांहीं एक नांव देतां आलें असतेंच.

जगतामध्यें ज्या ज्या वस्तुस नांव ह्मणून देतां येतें तीस पदार्थ असें ह्मणावें. पण कोणतीही वस्तु घेतली तरी तीस नांव देतां येतें, ह्मणून कोणतीही वस्तु (ह्मणजे प्रत्येक वस्तु) पदार्थ आहे; तसेंच सर्व वस्तु ह्या पदार्थ (बहुवचनीं) आहेत. पदार्थ ह्मणण्यास ती वस्तु सद्भावात्मकच (अस्तित्वरूप) असली पाहिजे असें नाहीं, अभावात्मकही असली तर चालेल. चौरंग हा पदार्थ आहे, तसाच चौरंगाचा अभाव* हाही पदार्थ आहे, वृषभ हा पदार्थ, तसाच अवृषभ हाही पदार्थच; आत्मा हा पदार्थ, तसाच अनात्मा हाही पदार्थच होय. ह्याचप्रमाणें घट, घटाभाव; मन, मनोऽभाव; हेही पदार्थच होत.

तर्कशास्त्रप्रमाणें **द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय** आणि **अभाव**, असे सात पदार्थ आहेत; ह्मणजे जगतांतील पदार्थत्व (पदार्थ जाती) सात प्रकारांनीं विभागितां येतें. कोणताही पदार्थ घेतला तरी तो ह्या सातांपैकीं कोणत्या तरी एका प्रकारचा असतो; ह्मणजे ह्या सात नांवापैकीं कोणतें तरी एक नांव ह्यास देतां येतें.

द्रव्य ह्मणजे ज्यापासून आपल्यास कांहीं बोध होतो असा एक पदार्थ. जेव्हां आपण एक सोन्याचा तुकडा हातांत घेऊन पहातों, तेव्हां आपणांस कठीणपणा, वजन आणि पिंवळा रंग ह्यांचा बोध होतो. आपणांस जें कांहीं प्रत्यक्ष ह्मणून वाटतें तें हा बोधच काय तो. परंतु आपल्या मनांत असा विचार येतो कीं, हा बोध आपल्या मनापासून अगदीं भिन्न, आणि आपलें मन आणि इंद्रियें ह्यांपासून बाह्य अशा कांहीं एका वस्तुपासून होतो. ह्या वस्तूस द्रव्य असें ह्मणतात.

ह्या ठिकाणीं असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं हा बोध बाह्य कारणापासून होतो असें आपण कां ह्मणतों? आणि असें ह्मणण्यास आपणास योग्य आधार आहे काय? आपल्यास माहित आहे कीं, कांहीं शास्त्रांमध्यें ह्या विषयावर शंका घेतल्या आहेत. तीं ह्मणतात कीं आपला बोध द्रव्य पदार्थापासून किंवा दुसऱ्या कोणत्या तरी बाह्य कारणापासून होतो असें ह्मणण्यास कांहीं कारण नाहीं. जरी ह्या गहन शास्त्रीय वादविवादाचा तर्कसंग्रहांत समावेश केला नाहीं तरी ह्या वादांतील दोन्ही पक्ष येथें संक्षेपानें सांगितले असतां द्रव्य हा काय पदार्थ आहे हें स्पष्टपणीं लक्षांत येईल.

ज्यास आपण द्रव्य असें ह्मणतों त्यापैकीं बहुतेक भागांत बोधाविषयीं सांगितलें असतें. उदाहरणार्थ एक चौरंग घ्या. ह्या विषयींचा आपणांस होणारा बोध पुढें सांगितलेल्या पृथक् पृथक् बोधांचा जमलेला आहे,— त्याचा दृश्य आकार आणि परिमाण, ह्मणजे नेत्रांनीं होणारा बोध; त्याचा स्पर्श्य आकार आणि परिमाण ह्मणजे स्पर्शेंद्रियानें आणि आपल्या स्नायूंनीं

* चौरंगाचा अभाव ह्मणजे चौरंग नसणें. मग दुसरी कोणतीही वस्तु असो किंवा नसो; तात्पर्य मिळून चौरंग नसणें येवढ्याच गोष्टीवर.

होणारा बोध; त्याचें वजन, हेंही स्पर्शेंद्रियानें आणि स्नायूनीं ग्रहण करतां येतें; त्याचा रंग, ह्याचें चक्षुरिंद्रियानें ग्रहण होतें; त्याचा कठीणपणा ह्याचें ग्रहण स्नायूनीं होतें.

आतां बौद्धादि कांहीं दर्शनकारांनीं ह्या विषयावर असें ह्मटलें आहे. जर आपण, उदाहरणार्थ, एक नारिंग घेतलें, आणि दुसरा कोणताही वर्ण न घेतां त्याचा हल्लीं असलेला वर्ण नाहींसा झाला; कठीण न होतां त्याचा हल्लीं असलेला मृदुपणा नाहींसा झाला; चौकोनी किंवा दुसरी कोणतीही नियमित किंवा अनियमित सरलरेखात्मक किंवा वक्ररेखात्मक आकृति धारण न करितां त्याचा गोलाकार नाहींसा झाला; त्याचा गंध, जडत्व, रुचि हींहि नाहींसीं झालीं; त्याचे सर्व अंतर्बाह्य गुणांचा नाश झाला आणि नवीन कोणतेही गुण त्यास प्राप्त झाले नाहींत; सारांश तें अदृश्य, अस्पर्श्य आणि अबोध्य झालें, अशा आणखी कित्येक कल्पना केल्या तर, हे दर्शनकार ह्मणतात, बाकी कांहीं देखील शिलक राहणार नाहीं. कारण ते असें विचारतात कीं जर कांहीं बाकी राहतें असें ह्मणावें तर तें कोणत्याप्रकारचें असेल? आणि तें कोणत्या लक्षणांनीं आपणांस व्यक्त होईल? बरें, जर द्रव्य खालीं शिलक राहत असेल तर अशी कल्पना करा कीं एक सगळें नारिंग आपल्या पुढें आहे आणि त्यांतील अदृश्य, अस्पर्श्य आणि अबोध्य असा जो द्रव्यभाग तो एकदम नाहींसा झाला, आणि दृश्य, स्पर्श्य आणि बोध्य असा भाग कायमच राहिला असें समजा, तर द्रव्यभाग ह्या नारिंगांत नाहीं असें तुह्मी कशावरून समजाल? त्याचें अस्तित्व नाहींसें झालें असें कोणत्या चिन्हांनीं तुह्मी ओळखाल? प्रकृत नष्ट स्थितीमध्यें तो भाग आहे असें ह्मणण्यास जितकीं कारणें आहेत तितकींच कारणें पूर्वीच्या स्वाभाविक स्थितींत तो द्रव्यभाग अजून आहे असे ह्मणण्यास उपयोगी पडणार नाहींत काय? आणि जर त्यावेळेस तो द्रव्यभाग आहे असें ह्मणतां येत नाहीं, तर हल्लीं तो आहे असें आपल्यास कसें ह्मणतां येईल? एकंदर, ह्या दर्शनकारांचे मताप्रमाणें द्रव्य हें, त्याचेपासून आपणास जो बोध होतो असें आपण ह्मणतों, त्या बोधापासून भिन्न नाहीं.

तर्कशास्त्र आणि न्यायशास्त्र ह्या वरील शंकांस असें उत्तर देतें कीं, हें द्रव्य आपल्या अज्ञानांध मानवी चक्षूंस दिसत नाहीं. अतींद्रियज्ञानी जे गौतम, कणाद इत्यादि महामुनि योगीश्वर त्यांत मात्र दिसतें. तुह्मां आह्मां सारख्या पापी लोकांस तें दिसावयाचें नाहीं.* तें आणखी असें ह्मणतें कीं द्रव्य हें गुणांचा आश्रय आहे ह्मणजे गुण द्रव्यांत राहतात. जसें; मनुष्याचें अंग त्याचे अंगरख्यास आश्रयभूत आहे ह्मणजे अंगरखा त्याचे अंगावर राहतो. द्रव्य हें आश्रय होय आणि गुण हे आश्रयी होत.

तर्कशास्त्राप्रमाणें द्रव्य नऊ प्रकारचें आहे. ते प्रकार येणेंप्रमाणें:—पृथिवी, आप्, तेज, वायु, आकाश, काल, दिक्, आत्मा आणि मन. यांचें विवरण पुढल्या खेपेस करूं.

(पुढें चालेल.)

* बिरबल आणि बादशाहा ह्यासंबंधी गोष्टींपैकीं "दोन बायांचे मनुष्यांस दिसायाचा नाहीं असें ह्मणून बिरबलानें बादशाहाचे कचेरींतील सर्व लोकांकडून, एका ठिकाणीं, तेथें कांहींएक नसतां एक सुंदर बंगला आहे असें ह्मणविलें." ह्या गोष्टींचें स्मरण झालें ह्मणजे ह्या तर्कशास्त्रांचे उत्तरांत किती तथ्यांश आहे हें सहज लक्षांत येईल.

ठगाची जबानी.

खण्ड ५वें.

(पुढें चालू.)

त्या वेळीं वारा फार गार सुटला होता; तेणेंकरून त्या सान्याजणी हिवानें कुडकुडत होत्या. कोनाड्यांत एक दिवा जळत होता; त्याचा प्रकाश वात सारलेली नसल्यामुळें अगदीं अंधुक झाला होता. माझ्या चित्तवृत्ति भ्रमिष्ट झालेल्या असल्यामुळें त्या प्रकाशांत कोणी लोक जमावानिशीं माझ्या अंगावर चाल करून येत आहेत—ही एक टोळी आली—ही दुसरी आली—ही तिसरी—ही चवथी—अशा एकदम जूट करून आल्या असा मला भास झाला; तो एथपर्यंत कीं शेवटीं लक्षावधि पिशाचें माझ्या बोकांडीस बसून छळ करण्याकरितां आलीं आहेत अशी भ्रांति होऊन मी अगदीं भेदरून गेलों.

त्या वेळीं पराकाष्टेची ग्लानी होऊन गेल्यामुळें मी आतां मरणार असें मला वाटलें. म्हणून मी माझ्या बहिणीस म्हटलें,'ताई, उठ; जा, आईला हांक मार. मी आतां खास वांचत नाहीं.'

"ती अगदीं कासावीस होऊन गहिंवरून म्हणाली, 'नाहीं रे भाऊ, भलतेंच बोलूं नको. तूं नको आणखी आम्हाला टाकून जाऊं. तुझी जखम लाहान आहे. आतां म्हावी येऊन गोळी बाहेर काढील. ते वैद्यबावा शेक तयार करीत आहेत. तूं लवकर बरा होशील.' ती ह्याप्रमाणें बोलत आहे तोंच एकदम बाहेर मशालींचा उजेड दिसला, आणि चार असामी माझ्या बापाचें प्रेत घेऊन आले. मी झटकन मोठ्या शिकस्तीनें उठून भिंतीशीं टेकून बसला राहिलों. त्यांनीं तें रक्तानें भरलेलें प्रेत आणून भुईवर ठेविलें—किंवा ठेविलें कशाचें! तें ठेवणार इतक्यांत ज्या कांबळ्याच्या झोळींत घालून तें आणिलें होतें त्याचें एक टोंक आपोआप सुटून आंतील प्रेत धाडकन भुईवर पडलें. तो नाद ऐकतांच आम्हा सर्वांच्या आंगाला शहारे येऊन कंप सुटला.

"क्षणभर सर्वजणें जागच्याजागीं स्तब्ध राहिलीं. पण जेव्हां तें रक्तानें भरलेलें शरीर दृष्टीस पडलें तेव्हां सारीं रडूं लागलीं. देवा, देवा; काय तो भयंकर प्रसंग! माझी आई आणि तिच्या मागून गांवातल्या दुसऱ्या म्हाताऱ्या बायका प्रेताजवळ गेल्या; आणि त्यांहीं जो आक्रोश करण्यास आरंभ केला तो ऐकून तर कोणाचाही जीव कळवळल्या वांचून राहीना. ज्यांनीं प्रेत आणिलें ते देखील तो प्रकार पाहून रडूं लागले. आंतील रडारड बाहेर ऐकूं जातांच तिकडेही मोठा आकांत झाला. त्या प्रसंगीं जो विलक्षण कल्लोळ झाला त्यानें जसें काय आकाश फाटून गेलें. दोन गोष्टी सांगून त्यांचें शांतवन करण्याचा म्या पुष्कळ यत्न केला, पण व्यर्थ. माझे कोणीच ऐकेना. परंतु इतक्यांत एकाएकीं सर्व गलबला मिटला. आमच्या गांवचे काजी साहेब आले त्यांहीं सर्वांस उभे राहण्याची आज्ञा केली. अगोदर प्रेताकडे पाहून नंतर ते मला हांक मारून म्हणाले, 'कायरे, हें कोणाचें कृत्य! तुला कोणाचा संशय येतो! तुला तुझ्या जीवाची शपत आहे; काय आहे तें लवकरच सांग. नाहींतर उशीर झाला म्हणजे कोण असतील ते हातांतून निघून जातील. मग त्यांस पकडायास नाहीं सांपडणार'.

"म्या झटलें 'इटेरकर महादू पाटील. पण त्या चांडाळांपाशीं घोडे आहेत. एव्हांना ते दूर निघून गेले असतील; त्यांच्या पाठीवर माणसें पाठविण्यांत कांहीं हंसल नाहीं.

"काजी साहेब झणाले, 'कोणापाशीं घोडे आहेत! कोण गेले तूं झणालास !अंमळ हुशार हो; आणि हा सर्व प्रकार कसा काय घडला तें नीट साग्र सांग पाहूं !'

"माझ्या आंगांत ताकद अगदीं नव्हती; तरी म्या 'थोडक्यांत सर्व हकीगत त्यांस सांगितली.

"तेथें जमलेल्या मंडळी पैकीं एकजण झणाला,'अल्लाच्यान, हें त्या महादू पाटलाचेंच कृत्य. काय चिंता आहे ? उद्यां दिवस उगवण्यापूर्वी आम्ही जाऊन त्याचा गांव जाळून फस्त करून येतों.'

"दुसरा एकजण झणाला, 'नाहीं; हें कृत्य खास त्या रहीमखानाचें आहे.' रहीमखान हा माझ्या बापाचा शालक; त्या उभयतांमध्यें मोठें हाडवैर असे.

"माझी आई मोठ्यानें ओरडून झणाली, 'कोण तें! रहीमखानाचें नांव कोण घेतें! आग लागो मेल्याच्या तोंडाला; गुलामाच्या जिभेला किडे पडोत; मेल्या तुझाही शेवट (माझ्या बापाच्या प्रेताकडे बोट दाखवून) असाच होईल" इतकें झणून ती पुनः पूर्ववत रडूं लागली.

"माझ्या जवळ एकजण बसला होता तो हळूच दुसऱ्यांस झणाला, 'बाईचे शब्द ऐकिलेत काय ! रहीमखानाचें ह्या कृत्यांत अगदीं आंग नसतें तर बाई अशा शिव्या न देत्या.'

"माझ्यांत सामर्थ्य होतें तितक्या मोठ्यानें ओरडून म्या झटलें 'चुप राहा. बोलूं नका. हें करणारा कोण तो मला ठाऊक आहे. निदान त्याजवर संशय घेण्यास मला बळकट आधार आहे. ह्या कामांत स्वतः महादू पाटलाचा बिलकुल हात नाहीं. तो बेटा गांडू; त्याची एवढी छाती काय होते ! रहीमखान जरी आमच्या ह्याताऱ्याचा दुष्मन होता तरी असलें घातक व दुष्ट कृत्य स्वतः करण्याला किंवा दुसऱ्याकडून करविण्याला प्रवृत्त होणारा तो नाहीं. छः त्या दोघांतून एकही नव्हे. ज्यानें हें कृत्य केलें आहे तो फार मोठा माणूस आहे. आपल्या सारिख्या गरीबांच्या हातून त्याचें बालाग्रही वांकडे होणार नाहीं. त्याला त्याच्या सांपत्तच्या उच्च स्थितींतून अशा निकृष्ट स्थितींत येण्यास ईश्वराचीच इच्छा तशी वळली पाहिजे. तो पुरुष कोण झणाल तर तो निर्दय चांडाळ ब्रिजलाल.' इतकें बोलल्यानें मी थकून अगदीं ग्लान झालों; झणून पुनः पूर्ववत् जमिनीवर पडलों.

"माझी आई मान वरती करून झणाली, 'आतां कोण बोलत होतें तें ! माझ्या मुलाचा शब्द ऐकिला असें मला वाटतें!'

"'म्यां झटलें होय, आई. हा मी एथें आहे.'

"असें झणतांच ती मजकडे वळून झणाली, 'काय ! तूं एथें आहेस काय ! अजून जिवंत राहिला आहेस ! मेल्या भित्र्या. घरांत आतां बापाचें प्रेत डोळ्यांनीं पाहायाला आलास काय! कोठें जीव द्यायाला गेला होतास! त्यांच्या बरोबरच कां नाहीं मेलास ! ते हट्टानें कोणाचें न ऐकतां रात्रीस काळोखांतून बाहेर हिंडतात फिरतात झणून त्यांजला तूं कधीं एकटें सोडून कोठें परता होऊं नकोस झणून म्या तुला सांगितलें होतें ना !'

"म्यां ह्मटलें 'आई, आतां माझ्यानें तुला उत्तर देववत नाहीं. पण मी त्यांच्याबरोबरच होतों हो. ह्या पाहा मला देखील जखमा झाल्या आहेत. त्यांच्या बरोबर मी देखील पडलों बरें. जरी त्यांजबरोबर माझाही प्राण तात्काळ गेला नाहीं तरी मला वाटतें कीं मी आतां फारवेळ काढीत नाहीं. फार तर घटके अर्ध घटकेचाच अवकाश आहे. असें ह्मणून म्या आंगावरचें पांघरूण काढिलें; आणि गोळीच्या योगानें जी खोल जखम झाली होती व जींतून असून असून नासक्या काळ्या रक्ताचे थेंब बाहेर येत होते, ती तिजला दाखविली. ती जखम न्याहाळून पाहून माझी आई धाडकन माझ्या पायांवर पडली. तिचा कंठ दाटून आला; आणि ती उसासा टाकून ह्मणाली 'नाहीं बाबा, तूं भित्रा नव्हेस बरें; आपल्या बापास वांचविण्यासाठीं खरेंच तूं आपल्या जिवावर देखील उदार झालास. आतां तुला काय ह्मणून बोल लावावा! ही देवाचीच इच्छा; त्यांचें नशीबच ओढवलें. ह्या खेरीज माझ्यानें दुसरें कांहीं ह्मणवत नाहीं. दैवगति कोणाला टळली आहे? पण आतां माझ्या कपाळीं हें काय दुसरें दुःख येणार! ते तर गेलेच; आणि आतां हा ही जाणार काय? देवादेवा! ह्या ह्मातारपणीं माझी कोण दशा ही! नवरा नाहीं! मुलगाही नाहीं! म्यां ह्मातारीनें आतां कोणाकडे पहावें? काय घोर संकट हें! केवढा दुर्धर प्रसंग मजवर येऊन कोसळला हा!

(पुढें चालेल.)

श्रीमंत मल्हारराव गायकवाड.

—oooo—

गेल्या महिन्यांत श्री० मल्हारराव महाराज गायकवाड यांविषयीं ब्रिटिश महाराणीसरकारचे व्हायस्रॉय् (प्रतिनिधि) गव्हर्नर जनरल लार्ड नार्थब्रुक यांणीं शेवटचा निकाल करून, त्यांस मद्रासेस रवाना करविलें, व त्यांच्या राज्यावर त्यांचा किंवा त्यांच्या संततीचा कांहीं अधिकार नाहीं असें ठरविलें. या दुःखकारक सार्वजनिक गोष्टीची थोडी तरी हकीकत एथें देणें अवश्य आहे.

मल्हारराव गायकवाड यांच्या राज्यांत अव्यवस्था फार होऊं लागल्याचें वर्तमान, ब्रिटिश सरकारचा बडोदें एथील रेसिडेंट (वकील) कर्नल फेर यांणें व्हायस्रॉय् गव्हर्नर जनरल यांस लिहिलें. तेव्हां चौकशीकरितां ह्मणून त्यांणीं कर्नल मीड वगैरे पंच नेमले. त्यांनीं गायकवाड यांस कांहीं खरेखोटें न पुसतां एकतर्फी गुप्त चौकशी करून हकीकत लिहून पाठविली. व्हायस्रॉय् यांणीं गायकवाड यांस सख्तीनें स्पष्ट कळविलें, कीं अठरा महिन्यांच्या मुदतींत ह्मणजे सन १८७५ इसवी अखेरीपर्यंत तुमच्या राज्याची व्यवस्था चांगली असल्याचें जर कर्नल फेर यांजकडून लिहून आलें तर फार उत्तम, न पेक्षां तुह्मांस राज्यावरून दूर केलें जाईल. तेव्हां तकरार व्यर्थ होय हें जाणून गायकवाड यांणीं आपणांकडून होईल तितका राज्य सुधारण्याचा यत्न चालविला. चांगले चांगले कारभारी नेमले. पण रेसिडेंट कर्नल फेर हा त्यांची सुधारणा तडीस जाऊं देईना, व अनेक प्रकारें त्यांच्या कामांत विघ्नें आणूं लागला. तेव्हां कर्नल फेरच्या विघ्नसंतोषी वर्तणुकेबद्दल गायकवाडांनी व्हायस्रॉय यांस लिहून दुसरा रेसिडेंट मागितला. पुढें पांच साहा दिवस गेले न गेले इतक्यांत, आपणास कोणी विष घातलें ह्मणून कर्नल फेर यांणीं लिहून पा-

ठविलें. त्याची गुप्त चौकशी मुंबईचे पोलीस कमिशनर यांणीं करून हें कृत्य खुद्द गायकवाड यांणींच करविलें असें व्हायस्रॉय् यांस कळविलें. त्यांणीं एकदम गायकवाड यांस कैद करवून त्यांची एकंदर दौलत जप्त केली. आणि जाहिरनामा प्रसिद्ध केला. कीं राणीसरकारच्या वकीलास विष घातल्याच्या संशयावरून त्यास कैद केलें आहे, व त्याची पक्की चौकशी होऊन तदनुसार काय तो निकाल होईल. पुढें सर रिचर्ड कौच वगैरे तीन इंग्लिश अमलदार, व महाराज शिंदे, महाराणे जयपूरकर, व राव राजे दिनकरराव हे पंच नेमून चौकशी सुरू झाली. व त्यांतच, रेसिडेंटाच्या चाकरांना लांच दिल्याचेंही प्रकरण चौकशीकरितां पुढें आणिलें. एकंदर सर्व मुख्य साक्षीदार फिर्यादी तर्फेनें कैद करून ठेविले होते. गायकवाड यांस वकील वगैरे करण्याच्या कामीं अनेक अडथळे आले. शेवटीं तीस पस्तीस साक्षी पैकीं दोन तीन साक्षी काय त्या गायकवाडाच्या विरुद्ध पडल्या. एक (रावजी) ह्मणाला कीं गायकवाडानें आपल्या हातानें विष माझ्या स्वाधीन केलें, व एक लक्ष रुपये बक्षीस देण्याचें वचन दिलें. परंतु त्याच्या ह्मणण्याला दुसरा पुरावा नाहीं, व बक्षीस मागण्यालाही तो नंतर कधींही गेला नाहीं. दुसरा साक्षीदार (नरसू) बक्षीसाची गोष्ट मुळींच कबूल करीत नाहीं. तिसरा साक्षीदार (क० फेरचा स्वयंपाकी पेद्रु,) याजपाशींही गायकवाडानें विष दिल्याची गोष्ट पहिल्यानें सरकारतर्फे बाहेर फुटली होती; पण ती अगदींच खोटी असें त्याणें निर्धास्तपणें सांगितलें; व तो अझूनपर्यंत आपल्या स्वयंपाकाच्याच कामावर आहे, असें समजतें; ह्यावरून त्याचें ह्मणणें अगदीं खरें अशाबद्दल क० फेरची ही पक्की खात्री उघड दिसते. पहिल्या दोन साक्षीदारांचें ह्मणणें खरें ठरण्याला ज्या दुसऱ्या साक्षीदारांचीं त्यांनीं नांवें सांगितलीं, ते कैदेंत असून सरकारानें चौकशीच्या वेळीं त्यांची साक्ष घेतली नाहीं, यावरून त्यांची साक्ष त्यांच्या विरुद्ध आहे असेंही उघड दिसतें. तिसरा साक्षीदार दामोदरपंत यानें गायकवाडाविरुद्ध साक्ष दिली, पण ती कोणत्याही प्रकारें खरी ठरली नाहीं. उलट, खेमचंद याच्या साक्षीवरून तो लबाड मनुष्य ठरतो. नूरुद्दिन बोहरी याचें गायकवाडाशीं पराकाष्ठेचें वैमनस्य असतांही तो गायकवाडाच्या तर्फेचीच साक्ष देतो व आपण, दामोदर ह्मणतो त्याप्रमाणें गायकवाडाला विष विकलें नाहीं, परंतु कर्नल फेर यांचा डाक्टर सिवार्ड यांस विष विकत दिलें असें ह्मणतो, ह्मणून त्याचीही साक्ष उघड चौकशींत घेतली नाहीं असें हल्लीं वर्तमानपत्रांवरून समजतें.

राजेलोकांच्या चालीप्रमाणें लग्नकार्यांमध्यें लहान लहान बक्षिसें वांटलीं खरीं, परंतु तो लांच नव्हे असेंही उघड झालें. याप्रमाणें फिर्यादीतर्फे सर्व खटला पहिल्यापासूनच अगदीं लंगडा दिसत असतां व क० फेरचा निर्मूल द्वेषभाव, व पोलीसाची जमवाजमवही उघड झाली असतां, तीन्ही युरोपियन पंचांनीं गायकवाडच्या विरुद्ध आपलें मत दिलें, आणि तिन्ही देशी पंचांनीं गायकवाडाला दोषमुक्त ठरविलें. गायकवाडानें आपले साक्षीदार पोलिसाच्या कबज्यांतून आणवून आपल्यावरचा दोष उडाविला नाहीं, अशा सबबीनें व्हायस्रॉय यांणीं गायकवाड यांस दोषी ठराविलें.

तथापि हल्लींच्या जाहीरनाम्यावरून स्पष्ट

होतें कीं, पंचाच्या चौकशीमध्यें, गायकवाडाने कर्नेल फेर यांस विष घातल्याचा पुरावा झाला असें महाराणी सरकार म्हणत नाहीं. यावरून तर मल्हारराव गायकवाड अगदीं निर्दोष ठरले; तथापि त्यांतच लिहिलें आहे कीं त्यांची मागची प्रसिद्ध वाईट वर्तणूक, राज्य चालविण्यास त्यांची असमर्थता, व त्यांपासून बडोद्याचें हित होणार नाहीं, या कारणांवरून गादीवरून त्यांस काढून टाकलें, व पुढें त्यांच्या संततीचाही राज्यावरील सर्व हक्क रद्द केला!—चौकशीच्या आरंभीं असें स्पष्ट ठरविलें होतें कीं, चौकशीमध्यें विषाच्या व लांचाच्या गोष्टीशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे लक्ष देऊं नये, व चौकशीच्या निकालाप्रमाणें इत्यर्थ ठरावयाचा. परंतु तें सर्व एकीकडेसच राहिलें, आणि भलतेंच निमित्त लावून गायकवाडांस व त्यांच्या संततीस राज्यभ्रष्ट केलें ही मोठी दुःखाची गोष्ट होय. ज्या कारणावरून त्यांस हल्लीं गादीवरून काढून टाकलें त्याचा, पूर्वीच एकतर्फी निकाल होऊन, या सर्व वाईट गोष्टी सुधारण्याकरितां त्यास अठरा महिन्यांची मुदत दिली होती, ती मुदत भरेतों पर्यंत तरी वाट पाहणें योग्य होतें. कर्नेल फेर याच्याजागीं आलेले सर लुइस पेलि यांणीं चौकशीच्या वेळीं अशी साक्ष दिली कीं, मल्हारराव गायकवाड हे आपल्या राज्याची सुधारणा करण्याची मनापासून फार कळकळ बाळगतात असें माझ्या नजरेस आलें. असें असतां सर्व साक्षीपुरावे गुंडाळून ठेवून, व आपलें वचनही मोडून, हिंदुस्थान सरकारानें ही फार वाईट गोष्ट केली, अशी सर्व देशभर व इंग्लंडामध्येंही हाकाहाक उडाली आहे, असें आलीकडच्या वर्तमानपत्रांवरून समजतें. सरकारचा न्यायीपणा उघड करून लोकांचीं मनें शांत करावीं हा सर्वांचा धर्म होय; परंतु या गोष्टीमध्यें, सर्व लोकांचें समाधान कसें करावें हें आम्हांसच समजत नाहीं. या बडोदे खटपटीमध्यें गायकवाडाचे लाखो रुपये धुळीस मिळाले, त्याची सर्व दौलत गेली, त्याला आपला देश दूर झाला, याप्रमाणें सर्व दुर्दशा झाली. या गोष्टीला आतां कांहीं उपाय राहिला आहे असेंही दिसत नाहीं. तेव्हां "गतं न शोच्यं" या म्हणीस अनुसरूनच राहणें प्राप्त आहे. तथापि जो अन्याय झाला, तो या धामधुमीच्या आवेशामुळें जरी सरकारच्या लक्षांत आला नाहीं, तरी हा आवेश कमी होतांच त्याकडे लक्ष लावून तो अन्याय दूर केल्यावांचून सरकार राहणार नाहीं, अशी आशा धरून पाहावें. अहाहा, दीडकोटीचें राज्य कोठें, आणि जन्माची कैद कोठें!

बडोद्याच्या गादीवर आतां, माजी खंडेराव गायकवाड यांच्या कुटुंबास दत्तपुत्र (अर्थात् अल्पवयस्क) देऊन तो स्थापणार असें समजतें. यांच्यावर तरी अशीच एकादी फिर्याद होऊन पुरता घोटाळा न होओ म्हणजे झालें.

या बडोदे अहवाला पासून सर्व राजेलोकांनां उपदेश मिळण्याजोगा आहे. तो हा कीं, जो स्वकीयांचें वैर संपादन करितो, प्रजेच्या कल्याणाकडे योग्य लक्ष देत नाहीं, पोटच्या पोराप्रमाणें बाळगावयाचें जें सैन्य, जें प्रसंगीं जिवाला जीव देणारें, त्याचा तिरस्कार करून, वेळच्यावेळीं त्यांचा पगारही न देतां वर्षांचीं वर्षें त्यांना तिष्ठत ठेवतो, जो सदा चैन आणि विलास यांत निमग्न, राज्य कारभारामध्यें ज्याचें मन मुळींच नाहीं, त्याचा परिणाम काय होतो, हें त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

BOMBAY:—"ASIATIC PRINTING PRESS" KALKADEVI ROAD,
By H. SHRAVAN.

विविधज्ञानविस्तार गृहांत असलेलीं विक्रीचीं पुस्तकें.

कायदे व आक्ट.

इंग्रजी

	मू. किं.	टपा.
	रु. आ.	रु. आ.
Broom's Selection of Legal Maxims	17—8	1-12
Steele's Law and Custom of Hindoo Castes	10—8	1—4
The Criminal Procedure Code (Act No. X. of 1872.)	2—8	0—6
The Indian Evidence Act (Act No. I. of 1872.)	1—8	0—1
Act No. XI. of 1874	0—4	0—3

मराठी.

न्यायसारसंग्रह	२५—०	३—०
अपकृत्यशास्त्र	९—०	१—८
टार्ट शास्त्रावरील टीका	१—८	०—२
करारसंबंधी नुकसानी परीमाण	१—४	०—१
प्रमाणशास्त्र	०—८	०—२
करारशास्त्र	०-१४	०—२
सन १८७१चा आक्ट ९	०-१४	०—२
सन १८७०चा ७	०—६	०—२
सन १८६०चा ४५	१—८	०—२
सन १८७१चा ८	०—६	०—१
सन १८६९चा १८	०—६	०—१
सन १८६४चा २०	०—२	०—१
सन १८६५चा १०	०—४	०—२
हायकोर्टाचे निवाडे	१—४	०—२
सन १८६५चा ११	१—८	०—३
सन १८७२चा १०	१—८	०—३
सन १८७४चा ११	०—३	०—१

वैद्यक ग्रंथ.

निघंटु रत्नाकर प्राकृत	२३—०	४—८
शार्ङ्गधर प्राकृत टीका	४—०	०-१४
माधवनिदान प्राकृत टीका	४—०	०-१३
वैद्यसार प्राकृत टीका	२—८	०—८
वैद्यजीवन प्राकृत टीका	०-१२	०—३
वैद्यामृत प्राकृत टीका	०-१०	०—३
त्र्यंबकी प्राकृत टीका	०—६	०—१
बोधदेव शतक प्राकृत टीका	०-१२	०—२
वैद्यावतंस प्राकृत टीका	०—६	०—१
बालरोग चिकित्सा, डा. पां. गो. कृत.	१—४	०—४
बालवैद्य	१—०	०—२

संकृत प्राकृत ग्रंथ वगैरे.

श्री भावार्थ रामायण	३५—०	३—०

	मूळ किं. रु. आ.	बं. पो. रु. आ.
यथार्थ दीपिका	१०—०	२—८
सर्वार्थ चिंतामणी	१—४	०—३
पंचरत्नगीता, रेशमी पुठ्ठा	०-१२	०—२
प्राकृत जैमिनि अश्वमेध	४—८	०-१४
हरिविजय	३-१२	०-१२
पांडवप्रताप	५—०	१—८
निर्णयसिंधु	४—४	०-१४
भागवत चूर्णिका	४—०	०-१४
देवी माहात्म्य	१—८	०—४
नासिकेतोपाख्यान	२—०	०—८
अगमनिगम	१—८	०—४
पदबोधिनी गीता	२—८	०—६
भगवद्गीता	०—६	०—२
स्वप्नचिंतामणी	०—८	०—२
सहजबोध	०—६	०—२

मनोरंजक गोष्टी वगैरे.

उपयुक्त चमत्कारसंग्रह भाग १ला	०—५	०—१
,, ,, भाग २ रा	०—५	०—१
,, ,, भाग ३ रा	०—५	०—१
,, ,, भाग ४था	०—५	०—१
,, ,, भाग ५वा	०—५	०—१
मराठी प्रचारांतील म्हणी	०—७	०—१
तंतुवाद्य	१—८	०—३
सुवर्णमालीनी	१—८	०—३
वागोविहार अथवा चार दरवेश भाग १ला	१—०	०—२
,, ,, ,, भाग २रा	१—०	०—२
,, ,, ,, भाग ३रा	१—४	०—२
,, ,, ,, भाग ४था	१—०	०—२
कादंबरीसार	०-१०	०—२
मराठी भाषेचा नवीन कोश	२—८	०—४
प्रेमबंधन (नाव्हल) (पूर्वार्ध)	१—८	०—४

ज्योतिष प्रकरणीं संस्कृत प्राकृत ग्रंथ.

जोतिषसार	१—१२	३
ग्रहलाघव	१— ०	२
पंचांगसाधनसार—(ग० दै० ल०)	१— ०	२
मुहूर्तमार्तंड	०—१२	२
लघुजातक	०— ७	१
स्फुटज्य ज्योतिष	०— ४	१
वास्तुप्रकरणीकोष्टकें	०—०।।।-	१
सर्वार्थचिंतामणी	१— ४	३

याशिवाय शाळाखात्यांत उपयोगी पडणारीं इंग्लिश व मराठी व गुजराथी पुस्तकें हीं पूर्वी पैसा पाठविल्यास जरूर रवाना करण्यांत येतील.

Registered No. 102
1875.

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिबादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची अगाऊ..... रुपये ३.
सहामाही अगाऊ..... रुपये २.
फुटकळ दर प्रतीस..... आणे ६.
टपालहशील वर्षाचे..... आणे ६.

वर्गणीदारांनीं अगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांच्या आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या, व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

A MONTHLY MAGAZINE

OF

पुस्तक ७. **MARATHI LITERATURE** अंक ६.

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. **अनुक्रमणिका.** पृष्ठ.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह १०१
ठगाची जबानी..... १०७
भोजप्रबंध. १०९
स्त्रियांचे अधिकार. ११९

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

वर्गणीदारांस विनंती:—वर्गणीदारांस जीं आमच्याकडून पत्रें जातात त्यांच्याकडे लक्ष पुरवून त्यांणीं वर्गणी पाठविण्याची त्वरा करावी.

पोंच व्यवस्थापक.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत.)	रु.	आ.
रा. रा. शंकर मोरो रानडे	३	०
रा. रा. शामराव पांडुरंग वकील	३	०
रा. रा. दिनानाथ सुंदरजी.	३	०
रा. रा. पिलाजी भगवंत	३	०
रा. रा. विष्णु घनश्याम वकील.	३	०
रा. रा. गणेश बाळकृष्ण शास्त्री बोडस.	३	०
रा. रा. शिताराम धाकजी.	३	०
रा. रा. बाळ मंगेश वागळे.....	३	०
रा. रा. हरीचंद विठोबा राघोबा	३	०
रा. सा. वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर ...	३	०
डाक्टर गोपाळ शिवराम	३	०

(डिसेंबर १८७५ पर्यंत.)	रु.	आ.
भुलेश्वर नेटिव लायब्ररी.....	३	०
श्री० रा. पंतसचीव संस्थान भोर	१३	२
,, ,, राजापुर नेटिव लायब्ररी	३	६
रा. रा. वासुदेव बाळकृष्ण लोटलीकर.	३	५
श्री० रा० दाजी साहेब बुटी.	३	६
रा. रा. रामचंद्र गोविंद ओक इंजीनीयर	३	६
रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान	४	१२
रा. रा. वासुदेव नारायण स्कुलमास्तर जुलई १८७५ पर्यंत	३	६
रा. रा. काशीनाथ रामकृष्ण सबनीस चुकती बाकी	१५	०

जाहिराती.

श्रीगुरुचरित्र.

(महाप्रासादिक ग्रंथ अ० ५३)

सर्वांस विनयपूर्वक कळवितों कीं सदरहू पुस्तक आह्मीं निर्णयसागर छापखान्यांत सुंदर ठशांनीं छापण्यास आरंभ केला आहे. याचे कागद चांगले जाड असून अक्षर सुवाच्य मोठें आहे. प्रत्येक अध्यायारंभीं सुशोभित चित्रें आहेत. ता० ३० जून १८७५ चे आंत किंमत देणारास रु० ३ व मागाहून रु० ६ पडतील. बाहेरगांवचे लोकांस शिवाय टपालखर्च १२ आणे पडेल. किंमतीचा पैका भरणें तो टपाल खर्चासह काळकादेवी समोर विविधज्ञानविस्तार आफीसांत भरावा. पुस्तक सुमारें जुलई अखेर तयार होऊन वर्गणीदारांच्या हातीं मिळेल.

जनार्दन महादेव गुर्जर.
गंगाधर गोपाळ पत्की. } मालक.

मुंबई ता० २९ एप्रिल सन १८७५.

ADVERTISEMENT.

बडोदें कमिशनची चित्रांसहित हकीकत.

TO BE HAD AT THE

Vividha-Jnana-Vistara Office

AN ALBUM

Containing the portraits of the Gaekwar, the commissioners, counsels, witnesses and all the other celebrities connected with

THE IMPORTANT TRIAL OF MALHARRAO, THE LATE GAEKWAR OF BARODA

TOGETHER WITH

ILLUSTRATIONS OF SCENES IN COURT,

THE GAEKWAR'S PALACE,

The Residency

and the other places of interest;

SKETCHED BY

"CARO"

The first Artist in India

AND PUBLISHED BY

THE MANAGING AGENTS OF

The Oriental Figaro, Calcutta.

Price Rs. 2 only.

Out-stations will have to pay 4 annas more for postage.

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ६.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.

वल्लभदर्शन. (पुढें चालू.)

वल्लभ, विठ्ठलनाथ, व त्याचे वंशज, हे सर्व खुद्द कृष्णाचे अवतार असें एतत्संप्रदायीय समजतात. हे असे अनेक अवतार धारण करण्याचें कारण **निजवार्तेंत** असें सांगितलें आहे कीं, "**गोलोक**[1] ही खुद्द **कृष्णाची** वसति. हा **गोलोक** सर्व **लोकांच्या** वर असून नित्य आहे. **गोलोकाच्या** मध्यभागीं **कृष्ण** रहातो. हा **कृष्ण** मेघाप्रमाणें श्यामवर्ण असून, नित्य यौवनावस्थेचाच अनुभव घेतो, व पीतवस्त्रे धारण करितो. याच्या देहावर अनेक रत्नें चकाकतात. याच्या हातांत मुरली[3] सदोदित वास करिते. हा नित्य आपल्या **राधाप्रभृति गोपींस** अनेक नर्मवचनांनीं आनंदित करून, त्यांच्या सहवर्तमान नाना विलास करीत होत्साता, अनंगरंगांत निमग्न असतो. एके दिवशीं **प्रिया** व **चंद्रावती** या दोन **कृष्णाच्या गोपी** आपआपसांत भांडल्या. तेव्हां सर्व रात्र आपल्यावरोबर आनंदांत घालवावी, असा **प्रियेनें** आपल्या दूतीद्वारा **कृष्णाला** निरोप पाठविला. नंतर **प्रियेच्या** घरीं जात असतां मार्गांतच **कृष्णास चंद्रावतीचें दर्शन** झालें. **कृष्ण** हा **प्रियेनें** निरोप पाठविल्यामुळें तिच्या घरीं जात आहे, ही बातमी **चंद्रावतीस** अगोदरच लागली होती. तेव्हां **प्रियेचा** हेतु तडीस न जावा अशी युक्ति करून **चंद्रावती कृष्णास** म्हणाली कीं, **प्रियेचा** बाप **वर्षभानु**[4] मी नुकताच **प्रियेच्या** घरीं जातांना पाहिला. हें ऐकून, **कृष्ण** भयभीत[4] होऊन

१–वल्लभाच्या मताप्रमाणें याच लोकांत (गोलोकांत) मोक्ष मिळतो; म्हणजे जे लोक मुक्त होतात ते या लोकांत (गोलोकांत) जातात. हा लोक विष्णूचें वैकुंठ व शिवाचा कैलास या दोनही लोकांपासून पांच कोटि योजनें दूर आहे.

२– हल्लीं आपआपल्या जन्मदिवसीं हे वल्लभपंथी महाराज पिवळाच पोशाक परिधान करितात. हा पोशाक, आपण कृष्णाचे अवतार असें समजूनच ते परिधान करीत असतील, असें वाटतें; पण कित्येक लोकांचें म्हणणें असें आहे कीं वल्लभ हा पहिल्यानें संन्यासी असून नंतर गृहस्थ झाला, म्हणून वल्लभाच्या पूर्वीच्या संन्यासाला अनुलक्षूनच महाराज असा पोशाक करितात.

३– ही सनईप्रमाणें तोंडांतील वाऱ्याच्या जोरानें वाजवण्याचें एक जातीचें वाद्य आहे. यावरून हा बालकृष्ण आहे हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

४– याप्रमाणें कृष्ण भयभीत झाला याचें कारण हेंच कीं सर्व गोपी विवाहित स्त्रिया होत्या; अर्थात् त्यांस नवरे होते; व आपल्या मुलगीच्या जारास पहातांच त्याचें कोणत्या तरी रीतीनें नुकसान करण्याची इच्छा मुलीच्या बापास साहजिक होत्ये. तेव्हां "चल,

परत गेला. हें सर्व **चंद्रावतीचें** कपट, कांहीं वेळानें **प्रियेस** समजलें. तेव्हां तिनें "तूं आपल्या अनेक सख्यांसह पृथ्वीवर मनुष्यजन्म पावशील" असा **चंद्रावतीस** शाप दिला. तें ऐकतांच **चंद्रावतीनेंही** डोळे लाल करून **प्रियेस** तसाच शाप दिला. हें सर्व वृत्त **कृष्णाच्या** कानीं आलें. तेव्हां **कृष्णानें** त्या दोघींसही असें वचन दिलें कीं मी खुद्द मनुष्यलोकीं अवतार घेऊन तुह्मां दोघींचाही उद्धार करीन. **प्रियेनें** पहिल्यानें **चंपारण्यांत** जन्म घेतला. तिच्या मागून **चरणाद्रीवर चंद्रावती** ही प्रकट झाली. **कृष्णानें** पहिल्यानें **चंपारण्यांत वल्लभाचा** अवतार घेऊन **प्रियेचा** उद्धार केला. त्यानंतर **विठ्ठलनाथाचा** अवतार घेऊन **चंद्रावतीचा**ही उद्धार केला. नंतर या दोन **गोपींच्या** शत झालेल्या सख्या बऱ्याच अवतरल्या व अजूनही अस्मत्संप्रदायीय स्त्रियांचा अवतार घेतच आहेत. अनेक वेळ **कृष्णानें**ही आपल्या वचनाप्रमाणें **वल्लभ**संततिरूपानें अवतीर्ण होऊन त्यांचा उद्धार केला; व हल्लींही त्याच रूपानें अवतीर्ण होऊन त्याच रूपानें अवतीर्ण झालेल्या अनेक सख्यांचा उद्धार करीतच आहे." **वल्लभ** या लोकांच्या ग्रंथांत **श्रीमदाचार्य** या नांवानें मोडतो.

वल्लभाच्या मताचा खरा उत्कर्ष त्याचा मुलगा **विठ्ठलनाथ** यानेंच केला. **वल्लभानें** आपल्या सगळ्या आयुष्यांत ८४ (चौऱ्यांशीं) मनुष्यांस मात्र आपल्या मताची दीक्षा दिली. पण **विठ्ठलनाथानें** थोडक्याच काळांत त्याच्या तिप्पट लोकांस ह्मणजे २५२ (दोनशें बावन्न) लोकांस आपल्या मतांत आणलें. या **दोनशें बावन्न** वैष्णवांची कथा, याच नांवाच्या पुस्तकांत **व्रजभाषेंत** लिहिली आहे. **विठ्ठलनाथ** यास कधीं कधीं **श्रीमत्प्रभु**[३]**वर** व कधीं कधीं **श्रीविठ्ठलेश** असेंही एतत्संप्रदायीय ग्रंथांत ह्मटलें आहे. **विठ्ठलनाथानें गोकुळाची** व **मथुरेची** यात्रा अनेक वेळ केली. नंतर **द्वारकेची** यात्रा करण्यास **विठ्ठलनाथ** निघाला. तेथून **कच्छ** येथें गेला. नंतर **माळवा** व **मेवाड** या दोन देशांत स्वारी करून, त्यानें अनेक लोकांस स्वमतदासत्वाच्या कचाट्यांत आणिलें. तेथून **पंढरपुराच्या विठोबाचें** दर्शन घेण्यासाठीं **वल्लभाचे विठोबा** निघाले. याप्रमाणें अनेक ठिकाणीं यात्रा करून, संवत् १६२१ सांत, आपलें शेष आयुष्य तेथेंच घालवण्याचा बेत करून **विठ्ठलनाथ गोकुळास** गेला. तेथें **गोवर्धनपर्वतावर** संवत् १६४९ सांत आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी **विठ्ठलनाथरूपधारिश्रीकृष्णांनीं** पृथ्वीवरील रूपांतरानें अ-

---

दुष्टा, हो दूर; तूं माझ्या पोरीस बिघडवलीस, दाखवतों तुला आतां." असें ह्मणून प्रियेचा बाप जर कृष्णाच्या आंगावर आला तर मोठीच पंचाईत व फजिती !

१–"श्रीमदाचार्यचरणैर्निबंध इदमीरितं" (श्रीमदाचार्यांनीं याप्रमाणें निबंधांत सांगितलें आहे). या शुद्धाद्वैतमार्तंडाच्या वचनावरून हें वाचकांच्या स्पष्ट ध्यानांत येईल.

२–"चौऱ्यायशीं वैष्णवांची कथा" या नांवाचा एक ग्रंथ व्रजभाषेंत आहे, त्यामध्यें या चौऱ्यायशीं बाह्यांच्या कथा सविस्तर सांगितल्या आहेत.

३ "श्रीमत्प्रभुवरैर्विद्वन्मंडनेपि निरूपितं" (विठ्ठलनाथानेंही विद्वन्मंडननामक ग्रंथांत हें निरूपण केलें आहे) हा शुद्धाद्वैतमार्तंडांतील श्लोक यास प्रमाण.

४"मायावादतमःप्रपाटनपटुं श्रीविठ्ठलेशं भजे" (मायावाद या नांवाचा जो अंधकार त्यास समूल नाहींसा करून टाकणारा जो श्रीविठ्ठलेश त्याचें मी भजन करितों) हें बालकृष्णचंपूंतील वचन यास आधार.

वतीर्ण झालेल्या स्वसंप्रदायीय लोकांच्या पत्नीरूप **गोपींचा** त्याग करून त्यांहून अत्यंत सुंदर अशा खऱ्या **गोपींबरोबर** अखंड रासोत्सव करण्यासाठीं **गोलोकास** प्रस्थान केलें.

विठ्ठलनाथाच्या दोन बायका होत्या. पहिलीचें नांव **रुक्मिणी** व दुसरीचें नांव **पद्मावती**. या दोघींपासून त्यास सात मुलगे व चार मुली अशीं एकंदर (अकरा) अपत्यें झालीं. **गिरिधर, गोविंदराय, बालकृष्ण, गोकुलनाथ, रघुनाथ, यदुनाथ, घनश्याम** हे सात मुलगे; व **शोभा, यमुना, कमला, देवकी** या चार मुली. हल्लीं याच्या संततीस **गुसांयजी** असें जें नांव कधीं कधीं तत्संप्रदायीय देतात तें नांव **विठ्ठलनाथानेंच** सुरू केलें. हा **गोकुलांत** पुष्कळ वर्षें राहिला, म्हणून हल्लींच्या **गुसांयजीपासून** वेगळे दाखविण्याकरितां यास **गोकुलगुसांयजी**[2] असेंही म्हणतात. वाणी, कुणबी, सुतार, लोहार, इत्यादि हीनजातीय अनेक लोक यानें आपले भक्त (सेवक) केले. यानें **विद्वन्मंडन**[3] म्हणून एक ग्रंथ केला आहे.

विठ्ठलनाथाच्या पाठीमागें त्याचा चवथा मुलगा **गोकुलनाथ** यानें या संप्रदायाचें नांव इतकें गाजविलें कीं, हल्लीं **गोकुलनाथाचे** वंशज आपण मात्र काय ते या संप्रदायाचे खरे धर्मगुरू असें समजतात. **गोकुलनाथानें सिद्धांतरहस्यावर** टीका केली आहे.

सुमारें याच वेळेस **वल्लभाचे** वंशज आपणास **महाराज**[4] म्हणवूं लागले. त्यांस हल्लीं **वल्लभकुल, अग्निकुल**[5], **अग्निस्वरूप, आचार्य, गुरु, महाप्रभु**, असेंही म्हणतात. पण त्यांस हल्लीं **गुसांयजी** हें नांव अत्यंत प्रिय आहे.

या संसाराचा त्याग करून अरण्यपरिग्रह करणें यांत हांसल नाहीं; तर सर्वांनीं कृष्णास व तदवताररूप वल्लभवंशीय यांस पक्कान्नादिकांचा मिष्ट मिष्ट नैवेद्य दाखवून आपलें द्रव्यादिक जें कांहीं असेल तें सर्व समर्पण करून, त्यांस पुष्ट करावें व आपणही त्याप्रमाणेंच करून पुष्ट व्हावें, म्हणजे परमपद प्राप्त होतें, असा यांचा सिद्धांत आहे, म्हणून या पंथास **पुष्टिमार्ग**[6] असेंही म्हणतात.. यास कधीं कधीं **गोपीरतिपतिमार्ग**[7]

१– हा शब्द "गोस्वामिजी" या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश. कृष्ण लहानपणीं गुरें राखीत असे. त्या गुराख्या श्रीकृष्णाचे हे आपणास अवतार समजतात म्हणून आपल्यास गोस्वामी म्हणजे गाईंचे स्वामी असें नांव लावून घेतात.

२– गोकुलांत पुष्कळ दिवस राहिलेले गोस्वामी गोकुलगोस्वामी येथें मध्यमपदलोपी समास जाणावा.

३– यांत आपल्या मुख्य मुख्य जीवाणुत्वप्रभृति सिद्धांतांचें थोडें थोडें निरूपण केलें आहे. या ग्रंथांत शंकराचार्यास शिव्याची लाखोली वाहिली आहे. सदानंद नामक एका परमहंसानें या ग्रंथाचें सविस्तर खंडन केलें आहे.

४– "महाराज" म्हणजे राजे. यांचा डौल व इतमाम राजाप्रमाणें असतो; किंबहुना कित्येक तर या कामांत राजासही पाठीमागें टाकतात.

५–वल्लभ हा अयोनिज होता. त्याच्या आईबापांनीं विस्तवांत एक मूल खेळतें आहे, असें पाहिलें. तें उचलून घेऊन त्यास वल्लभ हें नांव दिलें. यावरून यास व याच्या वंशजांस "अग्निकुल" व "अग्निस्वरूप" असेंही म्हणतात. ही विस्तवापासून वल्लभाची प्रादुर्भूति "निजवार्तेत" सांगितली आहे.

६– वल्लभानेंच हें नांव आपल्या मतास लावलेलें आढळतें, कारण यानें आपल्या एका ग्रंथाचें नांव "पुष्टिमार्गप्रवाहमर्यादा' असें ठेविलें आहे.

७–विठ्ठलनाथानेंच विद्वन्मंडनांत हरिरतिमार्गाबुजातमार्तण्डान् (हरिरतिमार्गरूपी कमलांस विकसित करणारा सूर्य) व गोपीरतिपतिमार्गप्रवर्तनाचार्यान् (गोपीरतिपतिमार्गाची प्रवृत्ति करणारे आचार्य) असीं आपल्या बापास विशेषणें दिलीं आहेत.

व **हरिरतिमार्ग** असेंही म्हटलेलें आढळतें. या संप्रदायांत **संस्कार** म्हणून कायते दोनच; पहिल्या संस्कारास **कंठीबंधन** म्हणतात. हा संस्कार मुलाच्या दुसऱ्या, तिसऱ्या, किंवा कधीं कधीं चवथ्या वर्षीं करितात. हा संस्कार करण्यासाठीं बाप आपल्या अपत्यास आपल्या **महाराजा**जवळ नेतो. नंतर महाराज त्या मुलास "श्रीकृष्णः शरणं[1] मम" या अष्टाक्षर मंत्राचा उच्चार करण्यास सांगतो. मुलानें मंत्राचा उच्चार केल्यानंतर **महाराज** मुलाच्या गळ्यांत तुलसीच्या मण्यांची कंठी बांधतो. दुसऱ्या संस्काराचें नांव **समर्पण**; मुलग्याचा **समर्पणाख्य** संस्कार त्याच्या अकराव्या किंवा बाराव्या वर्षीं व मुलीचा तिच्या विवाहसमयीं करितात. या संस्कारास **ब्रह्मसंबंध**[2] असेंही म्हणतात. या संस्कारांत श्रीकृष्णः शरणं मम [3]सहस्रपरिवत्सरपरिमितकालजातकृष्णवियोगजनिततापक्लेशाऽनंततिरोभावोहं भगवते कृष्णाय देहेंद्रियप्राणांतःकरणतद्धर्मांश्च दारागारपुत्राप्तवित्तेहापराण्यात्मना सह समर्पयामि दासोहं कृष्ण तवास्मि ।

या मंत्राचा उपदेश करितात. या दोनही **संस्कारांच्या** वेळेस हे लोक **महाराजांस** मोठमोठ्या दक्षिणा देतात. या लोकांस तिलक तांबडा असून उभा असतो. तिलकाच्या दोन रेघा भोंवयांच्या संधीजवळ वर्तुळाकार सांधलेल्या असतात. या वर्तुळाकार सांध्यामध्यें एक तांबडाच टिळा असतो. हे लोक परस्पर वंदन करतेवेळेस **जय श्रीकृष्ण**, किंवा **जय गोपाल** असें म्हणतात. प्रत्येक मनुष्यानें सगळ्या जन्मांत एकदा तरी **गोकुलाची** व **श्रीनाथद्वाराची** यात्रा केली पाहिजे असा यांचा समज आहे. या यात्रा केल्यानंतर धार्मिक म्हणवणारे लोक **मर्यादी** होतात. **मर्यादी मर्यादी**खेरीज दुसऱ्यानें शिजवलेलें अन्न खात नाहीं. फार तर काय? **मर्यादीचा** पांक्त ही **मर्यादीच**. बायको असो, मुलगा असो; ते देखील **मर्यादीचे** पांक्त नाहींत; व त्यांच्या हातचें **मर्यादी** खात नाहीं. **विष्णुस्वामीनें** प्रवर्तविलेला प्राचीन वैष्णव संप्रदाय लुप्त झाल्यामुळें अनेक लोक संसारसागरांत बुडून जात आहेत, असें पाहून **वल्लभानें** या पृथ्वीलोकीं जन्म घेऊन त्याच्याच संप्रदायाचा जीर्णोद्धार केला; अर्थात् आमचा संप्रदाय अनादि आहे असें **वल्लभीय** म्हणतात. **उज्जयिनींत शिप्रानदीच्या** किनाऱ्यावर एक **पिंपळाचें झाड** आहे त्यास **वल्लभाची बैठक** असें म्हणतात; त्याप्रमाणेंच **चुनारच्या** किल्ल्यापासून सुमारें कोसाच्याही आंत एक विहीर आहे, तीस **आचार्यकुवा** असें म्हणतात; व एतत्पंथीय लोक या दोहोंस विशेष मान देतात. एतत्संप्रदायीय प्रायः आपल्या घरांत एक एक **कृष्णाची** मूर्ति ठेवितात. त्याच्या जवळ **वल्लभाचें** व कित्येक **वल्लभवंशीयांचीं** अशीं बरींच चित्रें ठेवलेलीं असतात. सकाळीं स्नान झालें म्हणजे घांट वाजवून मूर्तीस वर उ-

१– "श्रीकृष्णः"–श्रीकृष्ण. "शरणं"–रक्षण करणारा. "मम"–माझें.

२– या संस्काराच्या योगानें सर्व मनुष्यांचा, वल्लभवंशांत जन्मलेल्या ब्रह्मरूपी महाराजांबरोबर, संबंध होतो; म्हणून यास हें नांव दिलें आहे.

३– हजारो वर्षें कृष्णाचा (कृष्णावतारूपी महाराजाचा) व माझा वियोग झाल्यामुळें मला तापादिक अनेक व्याधींनीं जर्जर केलें. तर आज घर, दार, पोरें, बायको, यांच्या ठिकाणीं अत्यंत आसक्त झालेलीं माझीं देहादिक करणें;घर, दार, पोर,बायको, यांसहवर्तमान मी कृष्णास (कृष्णावतारूपी महाराजांस) समर्पण करितों. हे कृष्णा (कृष्णावतारूपी महाराजा), मी तुझा दास आहें.

ठिवतात. नंतर तीस स्नान घालून तिच्यावर अलंकार चढवतात व नंतर फलादिकांचा नैवेद्य दाखवितात. नंतर आरती करून मंत्राचा १०८ वेळ जप करून भोजन उरकून आपल्या कामावर जातात. हे लोक जेव्हां आजारी पडून मरतात असें होतें, तेव्हां **महाराजांस** बोलावूं पाठवितात. महाराज येतां क्षणींच दुखणेकऱ्याच्या छातीवर लाथ मारून, त्यास पापापासून मुक्त करून, दक्षिणा उपटून, परत जातो. दर दिवशीं सकाळीं हे लोक महाराजांच्या दर्शनास जातात. तेथें **महाराजांच्या** धोत्राचें पाणी गळत असतें तें प्राशन करून आपण मुक्त झालों असें समजतात. महाराजाचें उष्टें मोठ्या प्रीतीनें मिटक्या मारीत खातात, व कधीं कधीं मोठी मेजवानी असल्यास उष्टें पाठवण्यासाठीं महाराजास अर्जी करून ती आपल्या चाकराबरोबर धाडून देऊन, महाराजाचें उष्टें मुद्दाम आणवितात. या उष्ट्यास **जतन** ह्मणतात. महाराजानें खाऊन थुकलेल्या पानसुपारीस **ओगार** ह्मणतात. हा **ओगार** एकत्र करून मोठ्या आनंदानें हे लोक चघळीत बसतात. हे लोक महाराजाचीच पूजा करितात असें नाहीं तर त्याच्या बायकोची, त्याच्या मुलाची, व त्याच्या मुलीचीही त्याचप्रमाणें पूजा करितात. महाराजाच्या बायकोस **बहूजी**, मुलास **लालजी**, व मुलीस **बेटीजी** ह्मणतात. हे लोक श्रावणाच्या महिन्यांत महाराजास झोंपाळ्यावर बसवून झोंपी काढितात. या लोकांत **रासमंडळी** या नांवाच्या अनेक मंडळ्या आहेत. या मंडळ्या प्रायः एकाद्या दिवशीं सायंकाळीं एकाद्या श्रीमंत एतत्संप्रदायीय शेऱ्यांच्या घरीं भरतात. या मंडळ्यांत परस्त्रियांचा परपुरुषांबरोबर संयोग झालाच पाहिजे, असा यांचा नियम आहे.

यांच्या देवळांत तीन निरनिराळे भाग (प्रदेश) असतात. मधला भाग सर्वांत विस्तीर्ण असतो. तेथें सांजसकाळ लोक दर्शन करण्यासाठीं जमतात. राहिलेल्या दोन भागांपैकीं एका भागांत महाराजाचा वास असतो. तिसऱ्या भागांत **कृष्णाची** मूर्ति असत्ये. सर्व देवळांत **मेवाडांत श्रीनाथद्वार** येथें जें एक देऊळ आहे, तें फारच भव्य आहे. ज्यावेळेस **औरंगजेबानें मथुरेंतील** देऊळ जमीनदोस्त करण्याचा हुकूम केला, तेव्हां तिकडील प्रतिमा आणून, तिची **श्रीनाथद्वार** येथें प्रतिष्ठा केली अशी आख्यायिका या लोकांत आहे. ही यांची मुख्य गादी. या गादीवर **विठ्ठलनाथाचा** चवथा मुलगा **गोकुलनाथ** याचा वंश अद्यापि हयात आहे. प्रतिमा **श्रीनाथ** ह्मणजे **गोवर्धनधारी** याची आहे. **श्रीनाथद्वारांतील नवनीतप्रिय, कोटा** येथील **मथुरेश, कनोज** येथील **विठ्ठलनाथ, कांकरोळीचा द्वारकानाथ, गोकुलांतला गोकुलनाथ,** आणि **जयपुरांतील गोकुलचंद्रमा** व **मदनमोहन;** या सात प्रतिमा खुद्द **वल्लभानें** आपल्या पुत्रांस दिल्या अशी आख्या आहे. यांच्या देवळांत आठ प्रकारची पूजा होत असत्ये. तीस **अष्टविध पूजा** ह्मणतात. ती येणेप्रमाणें:—

१ **मंगला**—या वेळेस **कृष्णास** बिछान्यावरून उठवून, न्हाऊं घालितात. नंतर त्यावर पोशाग चढवून, त्यास न्याहारीचा नैवेद्य दाखवितात. नंतर पानसुपारी देतात. हें सर्व समाप्त होईपर्यंत दिवे जळत असतात. ही पूजा हिंवाळ्यांत सूर्योदयाच्या पूर्वी

तीन तास व अन्य ऋतूंत सूर्योदयाच्यानंतर सुमारें अर्ध तासानें होत्ये.

२ **शृंगार**—चंदनादिकांची उटी लावून प्रतिमेस कचेरींत आणून बसवितात. या वेळेस लोक दर्शनासाठीं येतात. ही **मंगला** झाल्यानंतर सुमारें अर्धा तासानें होत्ये.

३ **ग्वाल**—गोपाळांबरोबर प्रतिमा गाई राखण्यास जात्ये. हें **शृंगारा**नंतर सुमारें पाऊण तासानें होतें.

४ **राजभोग**—हा बरोबर मध्यान्हीं होतो. या वेळेस **कृष्ण** वनांतून परत येतो व भोजन करतो. या वेळेचा नैवेद्य जवळ बसलेल्या **वैष्णवांत** वांटतात; व श्रीमंत लोकांच्या घरींही पाठवितात.

५ **उत्थापन**—कृष्ण वामकुक्षि करीत असतो त्यास उठवितात. हें सूर्यास्ताच्या पूर्वी सुमारें दोन किंवा तीन तास होतें.

६ **भोग**—दुपार गेल्यानंतरचें जेवण. हें **उत्थापना**नंतर अर्धा तासानें होतें.

७ **सांध्य**—प्रतिमेवर संध्याकाळचा पोशाग चढवून, रात्रीसाठीं उटी वगैरे पुनः लाविताते. हें जवळ जवळ सूर्यास्तसमयीं होतें.

८ **शयन**—पानसुपारी व पाण्याचें भांडें जवळ ठेवून, प्रतिमेस बिछान्यावर निजवितात. हें सुमारें रात्रीं सात वाजतां होतें.

हा सर्व प्रतिमेचा व तिच्या बरोबर आपलाही खर्च चालविण्यासाठीं महाराज सर्व खाण्यापिण्याच्या जिनसावर **लागा** या नांवाचा कर बसवितात. याकरामुळें महाराजांचाही लागेल तसा डामडौल चालण्यास हरकत पडत नाहीं. या कराचा मासला वाचकांस सादर करून हें वल्लभदर्शन पुरें करितों.

जिन्नस.	**महाराजांचा लागा.**
रेशीम, साकर, लवंगादिक मसाल्याचें सामान, अफू.	शंभर रूपयांस आणा.
सोनें व रूपें	हजार रूपयांस एक आणा.
जवाहीर, मोतीं, वगैरे.	१०० रूपयांस पाव आणा.
मलबाराहून वैष्णवाची फतेमारी आल्यास.	प्रत्येक फतेमारीस दिड रूपया.
राजापुराहून पडाव आल्यास-	प्रत्येक पडावास नऊ आणे.
चणे, वाटाणे, वगैरे.	खंडीस एक आणा.
तूप.	मणास अर्धा आणा.
तेल	मणास अर्धा आणा.
तांदूळ.	मुड्यास एक आणा.
लोखंड.	खंडीस एक आणा.

निंबार्कदर्शन.

या दर्शनाचा प्रसार **निंबादित्य** या नांवाचा एक वैष्णवपंथी वैरागी होता त्यानें केला. **निंबादित्यास** कधीं कधीं **भट्ट भास्कर** असेंही ह्मणतात. नास्तिकांचा पराभव करून श्रुतिसंमत धर्मास टेंका देण्यासाठीं **सूर्यानें निंबादित्याचा** अवतार घेतला, असें एतत्पंथीय समजतात. हे लोक गोपीचंदनाचा रेखाद्वयमय ऊर्ध्व तिलक करितात, व त्यांत मध्येंच काळा टिळा लाविताते. यांची गळ्यांतली कंठी व हातांतील जपमाला हीं दोनही तुळशीच्या काष्ठाचीं केलेलीं असतात. हे **राधाकृष्णाची** उपासना करितात. यांस अत्यंत प्रमाणभूत

ग्रंथ झटला झणजे **श्रीमद्भागवत.** हे हल्लीं लोकांमध्यें **नेमावत** या नांवानें मोडतात. यांचे संस्कृत ग्रंथ हल्लीं मुळींच उपलब्ध नाहींत. याचें कारण हे लोक असें सांगतात कीं, **औरंगजेबानें** जबरदस्तीनें **मथुरा** उद्ध्वस्त केली व **नेमावतपंथाचीं** सर्व संस्कृत पुस्तकें जाळून टाकलीं. हा संप्रदाय बराच प्राचीन आहे, असें वाटतें. **गुजराथेंत भावनगरप्रभृति** कित्येक शहरांत या पंथाचे बरेच लोक आहेत.

सत्संप्रदाय.

रामानुज, मध्व, निंबार्क, वल्लभ (विष्णुस्वामी), या चार आचार्यांनीं प्रवर्तविलेल्या **वैष्णवसंप्रदायांस सत्संप्रदाय** असें नांव दिलें आहे. आतां पुढच्या खेपेस शैवदर्शनांस आरंभ करूं.

ठगाची जबानी.

खण्ड ५ वें. (पुढें चालू)

"इतकें झणून ती पुनः उठून माझ्या बापाच्या प्रेताजवळ जाऊन बसली." नंतर तेथें जमलेली मंडळी एकामागून एक हळुहळू उठून जाऊं लागली. ब्रिजलालाचें नांव कानीं पडतांच सगळ्यांचीं तोंडें बंद झालीं. अखेरीस त्या ठिकाणीं प्रेताचें रक्षण करणारे होते ते, मी व माझी बहीण इतकींजणें मात्र उरलों. माझी बहीण वयानें झणाल तर अगदीं लहान होती; पण तुझाला काय सांगूं? तिनें कसें सगळावेळ माझ्या जवळ बसून ऊनपाण्यानें माझें आंग शेकलें आहे! माझा खांदा व पाय तिनें कढत पाण्यानें शेकल्यामुळें गोठलेलें रक्त वितळून मला अंमळ बरें वाटलें. त्यावेळीं तेथला दिवा मालवून टाकावा झणून म्यां किती विनवण्या केल्या बरें काय? पण नाहीं; माझें कोणी ऐकेच ना. त्यानंतर आजपर्यंत म्यां शेंकडो माणसें नानातऱ्हेनीं मरतांना पाहिलीं. पण त्या समयाची जी मला आठवण राहिली आहे तिच्यासीं ताडून पाहतां हा वेळपर्यंत तसा प्रसंग व तसा प्रकार माझ्या दृष्टीस कधींच पडला नाहीं. माझ्या बापाच्या प्रेतासारखा विद्रूपपणा म्यां पुनः कधींही डोळ्यानीं पाहिला नाहीं. त्याचे ते जागच्याजागींच जसे काय खिळलेले सर्व अवयव—त्याचे ते ताठलेले ओंठ, जणूं काय त्याचे ते भयंकर दांत बाहेर दाखविण्यासाठीं मुद्दामच कोणी खालीं वरतीं ताणून ओढून ठेविले होते,—त्याचे ते विक्राळ वटारलेले डोळे कांहींकेल्या मिटत ना. वाऱ्याच्या योगानें दिव्याची जोत हाले तेणेंकरून क्षणभर चांगला प्रकाश पडे आणि पुनः लागलाच अंधार पडे; ह्यामुळें त्या प्रेताच्या संपूर्ण अवयवांना जणूंकाय अकस्मात् चेतना प्राप्त होऊन ते त्या विद्रूप भयंकर स्थितींतच चलनवलन करूं लागल्याचा क्षणोक्षणीं भास होई. माझी दृष्टि जी त्या प्रेतावर जाऊन ठाम खिळून राहिली होती ती माझ्यानें तेथून काढवेचना. उजाडेपर्यंत मी तसाच एकसारखा टक लावून स्तब्ध पहात राहिलों होतों.

"आमच्या गांवचा न्हावी दुसऱ्या गांवीं गेला होता तो लवकरच येऊन पोंचला. त्यानें माझ्या जखमा नीट तपासून पाहिल्या. एक गोळी जी माझ्या खांद्यावर लागली होती ती बरीच खोल जाऊन मानेंत शिरली होती ती शोधून बाहेर काढण्याकरितां न्हाव्यानें कए चिमटा आंत घातला. त्या योगानें ती

१ वेदांतसूत्रांचें निंबार्क मतप्रवर्तक भाष्य मोठ्या प्रयत्नानें मिळवून हल्लीं काशीविद्यासुधानिधिः (पंडीत) पत्रामध्यें छापीत आहेत.

गोळी हातीं लागून बाहेर निघेपर्यंत मला ज्या वेधना झाल्या आहेत त्या खरोखर सांगतां पुरवत नाहींत. बराच वेळ शोधिल्यानंतर शेवटीं एकदांची ती गोळी चिमट्यांत सांपडली; तेव्हां ती न्हाव्यानें बाहेर ओढून काढिली. ती बाहेर निघतांच मला बरें वाटलें. गोळी बाहेर निघाल्यावर रक्ताचा स्राव पुष्कळच झाला. माझ्या मांडीला गोळी लागली होती ती फक्त मांसांतूनच निघून गेली होती. नंतर थोडीशी अफू खातांच मला गाढ झोंप लागली. पुनः जागा झालों तेव्हां माझ्या वेधना अगदीं नाहींशा झाल्या नव्हत्या; तरी पहिल्यापेक्षां मला पुष्कळ आरामसा वाटूं लागला. इकडे माझ्या बापाच्या प्रेताचा शेवटचा संस्कारही आटोपला होता. नंतर माझ्या मनाला एका गोष्टीची मात्र काळजी राहिली. आमच्या वैऱ्यानें माझ्या बापाचा तर प्राण घेतलाच; पण तेवढ्यानें त्याच्या क्रूर मनाचें समाधान होणार नाहीं; मजवरही तो आपलें वैर काढण्याला व सूड उगविण्याला मागेंपुढें पाहणार नाहीं असें माझ्या मनाला वाटलें.

"ह्याला आमचे वृद्ध काजीसाहेब कांहीं तरी युक्ति सांगतील अशी मला आशा होती तीही नष्ट झाली. खुनी माणसांचा पाठलाग करून त्यांस पकडण्याला, व त्यांचा अपराध त्यांच्या आंगीं लावून त्यांस शिक्षा होण्याची तजवीज करण्याला आमच्या काजी साहेबांस कांहीं मार्गच सुचेना. ह्मणून मग त्यांच्याच उपदेशास अनुसरून आह्मी शांततेचा गालिचा पसरून त्याजवर शोकरूप हुक्का ओढीत स्वस्थ बसलों. सारांश, आपल्या दुःखाची विस्मृति पडण्याकरितां आमच्यानें झाले ते उपाय आह्मी केले. पुढें सुमारें वर्षभर कोठें कांहीं गडबड न होतां सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणें निर्वेध चालली. माझ्या बापाच्या पाठीमागें पाटिलकीच्या वतनाचा अधिकारी मलाच सर्व जन मानूं लागले; व त्या संबंधानें माझ्या बापाच्या सर्व हक्कांचा उपभोग मीच घेऊं लागलों. पण ब्रिजलालानें माझ्या बापाविरुद्ध खरा पाटील ह्मणून जो एक माणूस उभा केला होता तो एका दिवसीं अकस्मात् पाटिलकी आपल्या स्वाधीन करावी असा दरबारांतून हुकूम घेऊन कांहीं हत्यारबंद लोकांनिशीं गांवांत आला. ह्या जुलुमाला आडवें येण्याचें गांवांतील लोकांच्या अंगीं सामर्थ्य कोठचें? ते बिचारे गरीब दुबळे, त्यांच्यानें कांहीं झालें नाहीं. अर्थातच मला झाडून सर्व सोडून द्यावें लागलें. माझे सर्व हक्क तो नवीन आलेला मनुष्य बळकावून बसला. माझी बहीण पूर्वीच आपल्या सासरीं निघून गेली होती. तेथेंच मी आपल्या आईलाही मागाहून पाठवून दिली. कारण मला तर आतां मुळींच बसण्याला सुद्धां ठाव राहिला नव्हता. मोठ्या दुःखानें मी गांव सोडिला; आणि माझ्या बापाचे स्नेही ते सावकार मजसाठीं दरबारांत कांहीं खटपट करतील तर जाऊन पहावें, असें मनांत आणून निघालों. पण व्यर्थ; तेही बदलले होते. मजसाठीं ते कांहीं एक करीनात. ही गोष्ट, ह्मटलें ह्मणजे पूर्वीच माझ्या ध्यानांत यावी; पण नाहीं आली.

"ते ह्मणाले, ब्रिजलाल पडला फार मोठा माणूस; त्याच्या वाटेस कसें जावें? तें उपयोगी नाहीं; कारण त्याचें कोणाच्यानें कांहीं एक होणार नाहीं. न्याय मिळण्याची आशा तूं आतां अगदीं सोडून दे, अशी ते माझी समजूत घालूं लागले. 'पुरावा असा

अगदीं निर्जीव असतांना ब्रिजलालावर खुनाचा आरोप आणण्यास प्रयत्न केला कीं, तुझा सर्वथैव सत्यानास झालाच समज,' असें त्यांहीं मला सांगितलें. बरें, माझें वतन व हक्क तरी मला परत मिळवून देण्याच्या कामीं त्यांहीं कांहीं तजवीज करावी, तर तेंही नाहीं. ते मिळून माझें नांव घेईनात. अशी माझी अवस्था झाली. मला कोणी मित्र नाहीं; कोणी साह्यकारी नाहीं. मी ह्या जगांत सर्वप्रकारें अगदीं अनाथ, दीन होऊन गेलों. नंतर काय तो एक मार्ग मात्र मला खुला राहिला. जरी पूर्वी मला ठगीचा संस्कार मुळींच झाला नव्हता तरी मी झटकन प्रथमच जी ठगांची टोळी भेटली तींत जाऊन मिळालों. तेव्हांपासून मी आपल्या कंटाळवाण्या आयुष्याचा काळ सरासरी कसा तरी घालवीत आहें. ह्या जगांत आतां माझी काळजी करणारें कोणी नाहींच राहिलें झटलें तरीं चालेल. माझी आई मरण पावल्यास पुष्कळ वर्षें गुजरलीं. माझी बहीण अजून आहे. तिला मुलें बाळेंही झालीं आहेत. ती चांगली सुखांत असून मागच्या सर्व गोष्टींची तिला आतां साहजिकच विस्मृति पडली आहे. वर्षांतून एकवार जाऊन मी तिला भेटतों. ती मोठ्या ममतेनें माझा आदर करिते. तिजखेरीज व हे तुझी माझे मित्र आहां ह्या तुझाखेरीज मी मेलों किंवा जिवंत आहें ह्याची विचारपूस करणारें देखील ह्या जगांत कोणी नाहीं. मी होळकरसरकारच्या पदरीं लष्करांत शिपाई आहें. अशी तिची समजूत आहे ती ठीक आहे. निराळा प्रकार तिच्या कानावर जातां कामा नये. असो आज अल्लाचे मजवर मोठे उपकार झाले; मी मनापासून त्याचे आभार मानतों कीं आज माझ्या दुष्मनाचा प्राण मला आपल्या हातानें घ्यावयास सांपडला. आतां माझ्या मनाचें पूर्ण समाधान झालें; कारण मनाप्रमाणें सूड उगवायास सांपडला. तुझी इतकेजण माझे मित्र आहांत त्यापेक्षां माझी वेळ येईल तेव्हां कोणी तरीं मला मूठमाती द्यालच द्याल. आणि तो प्रसंग येण्यालाही आतां अवधि झणजे फार राहिला आहे असें नाहीं. रात्रीं म्यां जें कृत्य उरकलें त्यासाठींच आजपर्यंत मुठींत जीव धरून राहिलों होतों. ह्यापुढें मला आतां कांहींएक कर्तव्य उरलें नाहीं. मी कृतकृत्य झालों; आणि वयातीत झालोंच आहें त्याअर्थीं आतां केव्हांही मेलों तरी सारखेंच. हा माझा वृत्तांत. आपल्याला व आपल्या चिरंजीवांना जर तो आवडला असला तर माझा हेतु सफळ झाला झणून मी संतोष मानीन."

(पुढें चालेल.)

भोजप्रबंध.

(पुढें चालू.)

सूर्यास्ताच्या वेळेस कृतांताप्रमाणें क्रोधायमान झालेल्या वत्सराजास त्या उंच प्रासादांतून उतरतानां पाहून तेथें जमलेले सर्व सभासद भीतियुक्त होत्साते नानातऱ्हेचीं ढोंगें सांगून आपापल्या घरीं जाते झाले. नंतर वत्सराजानें सेवकांस आपल्या मंदिराचें रक्षण करण्याकरितां पाठविलें, आणि भुवनेश्वरीच्या देवळाच्या मार्गानें रथ चालवून एका सरदारास भोजकुमाराच्या शिक्षकास बोलावण्यास सांगितलें. तो जाऊन त्या पंडितास झणाला, गुरूजी, आपणांस वत्सराज बोलावीत आहे. हें ऐकून वज्रानें ताडलेल्या किंवा

भूतानें झपाटलेल्या अथवा ग्रहदशा लागलेल्या मनुष्याप्रमाणें त्याची दशा झाली. नंतर त्या सरदारानें त्यास हातीं धरून वत्सराजाजवळ आणिलें. तो आल्यावर वत्सराजानें त्यास स्वागतपूर्वक प्रणाम केला आणि ह्मटलें, पंडित, बसावें; आणि राजपुत्र जयंतास शाळेंतून आणवावें. तें ऐकून पंडितानें त्यास आणविलें. राजपुत्र जयंत आल्यानंतर वत्सराजानें त्याची काव्यांत वगैरे परीक्षा घेऊन परत पाठविलें. नंतर पुनः पंडितास भोजकुमारास आणविण्यास सांगितलें. तेव्हां झालेली सर्व हकीगत समजून घेऊन अग्निप्रमाणें आरक्तनयन करून मोठ्या रागानें येऊन भोज ह्मणाला, अरे दुष्टा, राजाच्या वरिष्ठ पुत्रास मला एकट्यास राजमंदिरांतून बाहेर नेण्यास तुझी काय ताकद लागली आहे? असें ह्मणून डाव्या पायांतली पादुका काढून वत्सराजाच्या मस्तकावर मारिली. तेव्हां वत्सराज ह्मणाला, भोजा, आह्मांस राजाच्या आज्ञेप्रमाणें वागलें पाहिजे. असें ह्मणून भोजास रथावर घालून हातांत नागवी तरवार घेऊन महामायेच्या देवळाजवळ गेला. भोजास घेऊन गेल्यावर शहरांत लोकांनीं मोठा कल्होळ करून सोडला. आणि योद्धे—काय झालें, काय झालें असें ओरडत चोहोंकडून आले. भोजास वध करण्याकरितां नेलें असें जेव्हां त्यांस समजलें तेव्हां हत्तीशाळेंत घोडशाळेंत वगैरे शिरून हत्तीघोड्यांस मारूं लागले. आणि राजमंदिराच्या दरवाज्याजवळ जागोजागीं भेरी, दुंदुभि, मृदंग वगैरे मोठ्या जोरानें वाजवूं लागले. त्या नादानें सर्व आकाश व्यापून गेलें. नंतर ब्राह्मण, स्त्रिया, राजपुत्र, राजसेवक, नगरवासी लोक हे कोणी बाणानें, कोणी विषानें, कोणी अग्नीनें, कोणी पाण्यांत, कोणी फांस घेऊन; याप्रमाणें सर्व लोक धारानगरीच्या सभोवतीं आपले जीव देण्याचा विचार करूं लागले. ही आपल्या पुत्राची दशा दासीच्या मुखांतून ऐकून सावित्रीप्रमाणें पवित्र अशी भोजाची माता रडूं लागली. आणि हे पुत्रा, चुलत्यानें तुझी काय ही दशा केली? तुझ्याकरितां जे मी नियम उपवास वगैरे केले ते सर्व आज व्यर्थ गेले. दाही दिशा आज मला शून्य झाल्या. पुत्रा, दैवानें आमचा सर्वस्वीं नाश केला. ह्या दासीवर्गानें शस्त्रानें आपला जीव दिला असें पाहत असतांही मी अजून जीवंत राहिल्ये ह्मणून मला निर्दय समजून सोडून गेलास काय? असा पुष्कळ शोक करून भूमीवर पडली.

संध्याकाळीं प्रदीप्त केलेल्या अग्नीपासून निघालेल्या धुराच्या लोटानें सर्व आकाश मलिन करून टाकिलें आहे, व सूर्यमंडळ जसें काय पापाच्या भीतीनेंच पश्चिमसमुद्रांत बुडत आहे, अशा समयीं वत्सराज महामायेच्या देवळाजवळ येऊन भोजास ह्मणाला, कुमारा, आपल्या कुलदेवतेचें स्मरण कर; कारण, कोणीएका ज्योतिःशास्त्र जाणणाऱ्या ब्राह्मणानें भोजाला राजलक्ष्मी प्राप्त होणार आहे, असें मुंजास सांगितल्यावरून त्यानें तुझा वध करण्याची मला आज्ञा दिली आहे. तें ऐकून भोज ह्मणाला,

रामे प्रव्रजनं बलेर्नियमनं पाण्डोः सुतानां वनं ।
वृष्णीनां निधनं नलस्य नृपते राज्यात्परिभ्रंशनम् ॥
कारागारनिषेवणं च मरणं संचिन्त्य लङ्केश्वरे !
सर्वं कालवशादवाप्स्यति नरः कः कं परित्रायते ॥

विष्णूचा सातवा अवतार राम यास राज्याचा त्याग करून अरण्यांत जावें लागलें. बली सारखा मोठा प्रतापी राजा एकदम

एका पळांत पराभव पावला; पांडूच्या पराक्रमी मुलांस वनवास भोगावा लागला; यादवांसारख्यांचें कुल आपआपसांत कलह करून एका घटिकेंत स्मृतिशेष झालें; नलासारिख्या पवित्र राजास राज्यावरून हांकवून दिलें; रावणासारख्या प्रबळ राजास बंदींत रहावें लागलें इतकेंच नव्हे, तर वानरांसारिख्या क्षुद्र पशूंच्या हातून त्यास मरण आलें. हा सर्व इतिहास जेव्हां माझ्या मनांत येतो, तेव्हां कोणी कोणाचें रक्षण करणारा नाहीं, तर सर्व कालाच्या प्रभावानें नष्ट होणारच होणार, अशी माझी पक्की खात्री होत्ये.

लक्ष्मीकौस्तुभपारिजातसहजः सूनुः सुधाम्भोनिधेर् ।
देवेन प्रणयप्रसादविधिना मूर्ध्ना धृतः शम्भुना ॥
अद्याप्युज्झति नैव दैवविहितं क्षैण्यं क्षपावल्लभः ।
केनान्येन विलङ्घ्यते विधिगतिः पाषाणरेखासखी ॥

लक्ष्मी, कौस्तुभमणि, पारिजातक यांचा बंधु, क्षीरसमुद्राचा पुत्र, ज्यास महादेवानें प्रणयपूर्वक व प्रसादपूर्वक आपल्या मस्तकीं धारण केलें आहे, असा जो रात्रीचा पति चंद्र, तो अद्यापि आपल्या दैवयोगानें प्राप्त झालेल्या क्षयरोगापासून मुक्त होत नाहीं. तेव्हां काळ्या दगडावरच्या रेघेप्रमाणें कधींही अन्यथा न होणारी दैवगति टाळण्यास दुसरा कोण समर्थ आहे?

विकटाटव्यामटनं शैलारोहणमपांनिधेस्तरणम् ।
क्रियते गुहाप्रवेशो विहितादधिकं कुतस्तदपि ॥

ज्यामध्यें कंटकादिकांचें प्राचुर्य असल्यामुळें जीवजंतूचाही प्रवेश होत नाहीं, अशा अरण्यामध्यें संचार केला, मोठया दुरारोह पर्वताच्या शिखरावर चढलों, समुद्र तरून पार गेलों, विकट गुहेंतही प्रवेश करितां आला, तरी आपणास आपल्या कपाळीं लिहिलेलें असेल त्याच्यापेक्षां अधिक कधींही मिळणें नाहीं.

अम्भोधिः स्थलतां स्थलं जलधितां धूलीलवः शैलतां ।
मेरुर्मृत्कणतां तृणं कुलिशतां वज्रं तृणप्रायताम् ॥
वन्हिः शीतलतां हिमं दहनतामायाति यस्येच्छया ।
लीलादुर्ललिताद्भुतव्यसनिने दैवाय तस्मै नमः ॥

ज्याच्या इच्छामात्रेंकरून समुद्राची सुकी जमीन होते, जमिनीचा समुद्र होतो, मातीच्या कणाचा पर्वत होतो, मेरूपर्वतही मातीचा कण होतो, काडीचें वज्र होतें, वज्राचें गवत होतें, अग्नीचा स्पर्श शीत होतो, व बर्फ विस्तवाप्रमाणें ऊन लागतें, अशा अनेक अघटित व अद्भुत लीला करण्याचें व्यसन लावून घेणारें जें दैव त्यास नमस्कार असो.

असें ह्मणून त्यानें जवळच्या एका वटवृक्षाचीं दोन पानें तोडून घेतलीं आणि त्यांपैकीं एकाचा द्रोण केला. नंतर एका शस्त्रानें आपली मांडी थोडीशी कापून त्यांतील रक्त त्या द्रोणांत घरिलें. आणि एका गवताच्या काडीनें त्या दुसऱ्या पानावर कांहीं लिहिलें. इतकें झाल्यावर वत्सराजास ह्मणाला, हे भाग्यशील पुरुषा, हें पत्र त्वां राजास नेऊन द्यावेंस. आतां राजाच्या आज्ञेप्रमाणें कर. तेव्हां वत्सराजाचा धाकटा बंधु जवळ होता तो भोजाची मृत्युकाळींही तेजःपुंज मुखाची कांति अवलोकन करून ह्मणाला,—

एक एव सुहृद्धर्मो निधनेप्यनुयाति यः ।
शरीरेण समं नाशं सर्वमन्यच्च गच्छति ॥

मरणानंतरही बरोबर येणारा असा एक मित्र धर्म मात्र आहे. बाकीचें सर्व शरीराबरोबरच नाश पावणार.

न ततो हि सहायार्थे पिता माता च तिष्ठति।
न पुत्रदारा न ज्ञातिर्धर्मस्तिष्ठति केवलः॥

त्यापेक्षां पिता, माता, पुत्र, स्त्री, ज्ञाति

कोणीही सहाय करण्यास येत नाहींत. एक धर्म मात्र सहायार्थ उभा असतो.

बलवानप्यशक्तोसौ धनवानपि निर्धनः ।
श्रुतवानपि मूर्खश्च यो धर्मविमुखो नरः ॥

जो पुरुष धर्मापासून पराङ्मुख झाला आहे तो बलवान् असूनही अशक्त, श्रीमंत असूनही दरिद्री, विद्वान् असूनही मूर्ख समजला पाहिजे.

इहैव नरकव्याधेश्चिकित्सां न करोति यः।
गत्वा निरौषधं स्थानं स रोगी किं करिष्यति॥

येथें राहूनही नरक या रोगास जो कोणी उपाय करीत नाहीं तो जेथें उपाय मिळण्यास अशक्य अशा स्थानीं जाऊन काय करणार आहे ?

जरां मृत्युं तथा व्याधिं को विजानन्सचेतनः
स्वस्थस्तिष्ठेन्निषीदेद्वा स्वपेद्वा किं पुनर्हसेत्

आपणांस वृद्धपण, मृत्यु, अथवा व्याधि हीं येणार असें माहीत असूनही कोणता मनुष्य स्वस्थ राहील, स्वस्थ बसेल, स्वस्थ झोंप घेईल, किंवा हंसेल ?

तुल्यजातिवयोरूपान्हृतान्पश्यसि मृत्युना
नहि तत्रास्ति ते त्रासो वज्रवद्धृदयं तव ॥

समान कुलाचे, समान वयाचे, समान रूपाचे अशा लोकांस मृत्यूनें गिळलेले पाहात असतांही ज्यापेक्षां तुला भीति वाटत नाहीं त्यापेक्षां तुझें अंत:करण वज्राप्रमाणें कठोर होय.

तें ऐकून वत्सराजास वैराग्य प्राप्त झालें आणि त्यानें भोजाची क्षमा मागून त्यास प्रणाम केला. नंतर सर्वत्र दाट अंधकार पडल्यावर भोजास रथांत बसवून आपल्या घरीं आणिलें, आणि घराच्या आंतल्या बाजूला एक भुयार होतें त्यांत त्यास सुरक्षितपणें ठेविलें. नंतर तावडतोब एका शिल्प विद्या जाणणाऱ्याकडे जाऊन त्यास कुंडलांनीं युक्त, रक्तानें भिजलेलें आणि डोळे बंद केले आहेत असें एक भोजाचें शिर तयार करण्यास सांगितलें. तें झाल्यावर कनिष्ठ बंधु सहवर्तमान राजवाड्यांत जाऊन राजास प्रणाम करून ह्मणाला, स्वामीनीं आज्ञा केल्याप्रमाणें कार्य करून आलों. राजा तें खरेंच समजून ह्मणाला, वत्सराज, भोज प्राणत्यागाच्या वेळीं कांहीं ह्मणाला काय? वत्सराजानें उत्तर दिलें, राजा, भोजानें आपणास एक पत्र दिलें आहे तें हें घ्यावें. असें ह्मणून तें पत्र दिलें आणि तें शिर दाखविलें. राजा तें शिर पाहून गंहिवरून स्फुंदस्फुंदून रडूं लागला आणि ह्मणाला, वत्सराज, हें शिर कोठें तरी भूमींत पुरून टाक. तें ऐकून वत्सराज तें शिर घेऊन तेथून निघून गेला. राजानें आपल्या भार्येकडून दिवा आणविला आणि तें पत्र वाचूं लागला:—

मान्धाता स महीपतिः कृतयुगालङ्कारभूतो गतः ।
सेतुर्येन महोदधौ विरचितः कासौ दशास्यान्तकः ॥
अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते ।
नैकेनापि समं गता वसुमती मुञ्ज त्वया यास्यति ।

पूर्वी कृतयुगाला भूषणच असा जो मांधाता नामक राजा तो देखील मेला. ज्यानें महासागरांत सेतु बांधिला असा जो रावणाचा शत्रु राम तोही आतां राहिला नाहीं. दुसरेही पुष्कळ धर्मराजासारखे राजे स्वर्गवासी झाले. परंतु ही पृथ्वी त्यांतील एकाबरोबरही गेली नाहीं, ती, हे मुंजा, तुझ्याबरोबर जाईल काय ?

या श्लोकाचा अर्थ जाणून राजा पलंगावरून धाडकन भूमीवर पडला. तेव्हां राणीनें पंखा घेऊन वारा घातल्यावर राजा सावध

झाला, आणि म्हणाला, हे प्रिये, पुत्रवध करविणाऱ्यास मला स्पर्श करूं नकोस. असें म्हणून मोठ्यानें विलाप करूं लागला. नंतर कांहीं वेळानें द्वारपालास हाक मारिली आणि जलदी ब्राह्मणांस घेऊन येण्यास सांगितलें. त्याच्या आज्ञेनें ब्राह्मण आल्यावर त्यांस नमस्कार करून विचारलें कीं मी पुत्रवध करविला आहे त्यास मला प्रायश्चित्त काय तें लवकर सांगा. त्यांनीं उत्तर केलें, हे राजा, याला अग्निप्रवेशाशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं. तर सत्वर आंगावर वस्त्रें घालून अग्नींत उडी घे. तें ऐकून बुद्धिसागर जवळ येऊन म्हणाला, हे राजा, ज्याप्रमाणें तूं दुष्ट राजा आहेस त्याचप्रमाणें वत्सराजही अधम प्रधान आहे. तुला सिंधुल राजानें राज्य दिलें आणि तुझ्या मांडीवर भोजास बसविलें हें तूं विसरलास काय? त्वांही चुलत्याच्या नात्यानें हें कृत्य चांगलें केलेंस! कारण असें आहे कीं;

कतिपयदिवसस्थायिनि मदकारिणि यौवने दुरात्मानः।
विदधति तथापराधं जन्मैव यथा वृथा भवति ॥

थोडे दिवस राहणारें, मद उत्पन्न करणारें असें जें तारुण्य त्यांत दुष्ट लोक अशीं दुष्ट कर्में करतात कीं जेणेंकरून त्यांचें सर्व जन्म निष्फळ होतें.

सन्तस्तृणोत्सारणमुत्तमाङ्गात् सुवर्णकोट्यर्पणमामनन्ति।
प्राणव्ययेनापि कृतोपकाराः खलाः परे वैरमिवोद्वहन्ति ॥

शहाणे पुरुष एकाद्याच्या जिवापुढें लाखो रुपये तृणासमान मानितात. परंतु दुष्टांवर उपकार केले असतांही ते दुष्ट आपला जीव देऊनही परक्यायशीं वैर साधितात.

उपकारोपकारश्च यस्य व्रजति विस्मृतिम्।
पाषाणहृदयस्यास्य जिवतीत्यभिधा मुधा॥

उपकार किंवा अपकार यांचें स्मरण ज्यास नाहीं असा पाषाणहृदय पुरुष जीवंत राहातो असें म्हणणें व्यर्थ होय. सारांश तो मेल्याप्रमाणेंच आहे.

यथा बीजांकुरः सूक्ष्मः प्रयत्नेनाभिरक्षितः।
फलप्रदो भवेत्काले तथा लोकः सुरक्षितः॥

ज्याप्रमाणें एकादा लहान बीजाचा अंकुर मोठ्या यत्नानें संरक्षण करून ठेविला असतां योग्यसमयीं फलदायक होतो त्याप्रमाणेंच प्रजेचें चांगलें रक्षण केलें असतां योग्य समयीं ती उपयोगी पडते.

हिरण्यधान्यरत्नानि यानानि विविधानि च।
तथान्यदपि यत्किंचित् प्रजाभ्यस्यान्महीभुजाम्॥

सुवर्ण, धान्य, रत्नें, नानाप्रकारचीं वाहनें किंवा दुसऱ्या कोणत्याही वस्तु राजांस प्रजेपासूनच प्राप्त होतात.

राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठाः पापे पापपराः सदा।
राजानमनुकुर्वन्ति यथा राजा तथा प्रजाः॥

राजा जर धार्मिक असला तर प्रजा धार्मिक होते, राजा पापी तर प्रजा पापी, राजाच्या वर्तनक्रमाप्रमाणें प्रजा वागते; तेव्हां जसा राजा असतो तसी प्रजा होते.

तेव्हां रात्रीं अग्निप्रवेश करावा असा राजानें निश्चय केल्यावर सर्व मांडलिक राजे व नगरवासी लोक त्यास पहावयास आले. आणि पुत्राचा घात करून मोठें पाप जोडलें या भीतीनें राजा अग्निप्रवेश करणार अशी बातमी सर्व ठिकाणीं पसरली. तें पाहून बुद्धिसागरानें द्वारपालास बोलावून सांगितलें कीं, कोणत्याही राजास आंत जाऊं देऊं नये. नंतर आपण त्या राजास अन्तःपुरामध्यें तसाच विलाप करीत सोडून एकटा सभेंत येऊन बसला. तेव्हां वत्सराजा राजाच्या मरणाची बातमी ऐकून राजमंदिरांत आला आणि बुद्धिसागरास प्रणाम करून

हळूच ह्मणाला, प्रधानजी, म्यां भोजास मारिलें नाहीं. तेव्हां बुद्धिसागरानें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें आणि वत्सराज तेथून निघून गेला.

कांहीं काळ गेल्यावर हातामध्यें हस्तीच्या दंताचा दंड धारण केला आहे, मस्तकीं केशांचा जटाभार रचला आहे, कर्पूरयुक्त भस्माचा सर्वांगावर लेप केला आहे, कानांमध्यें स्फटिकाचीं कुंडलें घातल्यामुळें साक्षात् मदनाच्या पुतळ्याप्रमाणें शोभत आहे, रेशमाचें कौपीन धारण केल्यामुळें साक्षात् शिवच काय असा भास होत आहे, असा कोणीएक कापालिक सभेमध्यें आला. त्यास पाहून बुद्धिसागरानें प्रश्न केला, हे योगीराज, आपण कोणत्या स्थानाहून आलां ? आपलें वसतिस्थान कोठें ? आपणांजवळ एकादें सर्व लोकांस आश्चर्य उत्पन्न करणारें चमत्कारिक गारूड किंवा औषध आहे काय ? योग्यानें उत्तर दिलें,

देशे देशे भवनं भवने भवने तथैव भिक्षान्नम् ।
सरसि च नद्यां सलिलं शिवशिवतत्त्वार्थवेदिनां पुंसाम्॥

शिवशिव शब्दांचा खरा अर्थ जाणणारे जे पुरुष त्यांचीं सर्व देशांत घरें आहेत, यांला प्रत्येक घरांत भिक्षान्न खाण्यास मिळतें आणि पिण्यास सरोवरें किंवा नद्या यांमध्यें पाणी मिळतें.

प्रधानजी, आमचा एकच देश आहे असें नाहीं; आह्मी सर्व भूमंडळावर भ्रमण करीत असतों. आणि गुरूच्या उपदेशाप्रमाणें वर्तन चालवीत असतों आणि हाताच्या तळावर एकादा आंवळा घेऊन पाहावा त्याप्रमाणें सर्व पृथ्वी आह्मी पाहतों. सर्पदंश झालेला, विषानें व्याकुळ झालेला, रोगानें पीडित, शस्त्रानें विच्छिन्न केलेला, असा कोणताही प्राणी आह्मी तत्क्षणीं जीवंत करूं शकतों. हें सर्व त्याचें भाषण आंतून राजानें ऐकिलें आणि बाहेर येऊन योग्यास साष्टांग नमस्कार घालून ह्मणाला, हे योगींद्रा, हे रुद्रा, हे परोपकारीं रत होणाऱ्या पुरुषा, म्यां महापाप्यानें मारविलेल्या बाळास जीवदान देऊन त्याचें रक्षण कर. कापालिक ह्मणाला, राजा, भिऊं नको, गुरूच्या कृपेनें तुझा पुत्र जीवंत होईल. प्रातःकाळीं तुझा पुत्र स्वतांच तुझ्या घरीं येईल. परंतु श्मशानभूमीवर बुद्धिसागरप्रधानाबरोबर होमद्रव्यें पाठीव. कापालिकानें जें जें सांगितलें तें सर्व राजानें मान्य करून बुद्धिसागरास पाठविलें. त्यानें रात्रीं गुप्तरूपानें भोजास वत्सराजाच्या घरांतून नदीच्या तीरावर नेलें आणि योग्यानें त्यास जीवंत केलें अशी चोहोंकडे बातमी पुकारली.

प्रातःकाळीं हत्तीवर बसवून बंदिजन स्तुति गात आहेत, भेरी, मृदंग वगैरे वाद्यांच्या घोषानें सर्व दिशा भरून टाकिल्या आहेत, सर्व नगरवासी जन सभोवतीं मिळाले आहेत अशा थाटानें भोजास राजवाड्यांत आणिलें. राजानें त्यास पाहून त्याच्या गळ्यास मिठी मारिली, आणि रडूं लागला. भोजानें त्याचें निवारण केलें. तेव्हां मुंजराजानें संतुष्ट होऊन त्यास आपल्या सिंहासनावर बसविलें, आणि छत्र चामर वगैरे भूषणें देऊन त्यास राज्याचा अधिकारी केला. आपल्या पुत्रांस प्रत्येकास एकेक गांव दिला. आपण लज्जेनें अधोमुख होऊन आपल्या पट्टराणींस बरोबर घेऊन तपश्चरण करून पुण्य जोडण्यास अरण्यांत गेला, आणि भोजराजा देवब्राह्मणांच्या प्रसादानें राज्य करूं लागला.

याप्रमाणें भोजास राज्यप्राप्ति झाली.

(पुढें चालेल.)

स्त्रियांचे अधिकार*

दुसऱ्याचे अधिकार कमी करण्यास झटणें ह्मणजे कालांतरानें व परंपरया आपलेच अधिकार कमी करण्याचा पाया घालणें असें आहे. आणि हा सिद्धांत धर्म, व्यवहार, राज्य इत्यादि कोणतीही बाब घेतली असतां सारखाच लागू पडतो असें माझें मत आहे. दुसऱ्याचे अधिकार कमी करण्याच्या वेळेस, ते अधिकार ज्या स्वरूपाचे असतील त्या स्वरूपाप्रमाणें, ते कमी करूं इच्छिणाऱ्या मनुष्याच्या अंगीं विशेष शारीर अथवा मानसिक शक्ति, धूर्तता, ढोंग, प्रसंगीं जरूर लागेल तशी हरएक प्रकारची लबाडी करण्यास सिद्धता व ती करण्याचें चातुर्य, कोणत्याही एखाद्या गोष्टीची वास्तविक स्थिति आच्छादून आपल्या उद्देशास अनुकूल वाटेल तशी करून दाखविण्याची शक्ति, इत्यादि गुण अवश्य असले पाहिजेत. याच मानानें ज्याचे अधिकार कमी करावयाचे त्याच्या अंगीं त्याच्या उलट स्थिति असली पाहिजे. आजवर या सृष्टीमध्यें जेव्हां जेव्हां एकानें दुसऱ्याचे अधिकार कमी केले अगर मुळींच नाहींसे केले तेव्हां वरील गुणांपैकीं अनेक गुण ते अधिकार नाहींसे करणाऱ्यांच्या अंगीं होतेच असें त्या त्या गोष्टीच्या इतिहासाचा विचार करतां ध्यानांत आल्याविना राहणार नाहीं. आज येथें आपल्या स्त्रियांच्या अधिकारांविषयीं विचार आपणांपुढें आणावयाचा आहे. पण आपल्या सर्व साधारण लोकांच्या प्रस्तुतच्या निकृष्ट प्रतीच्या मानसिक स्थितीच्या मानानें पाहतां कोणीही मनुष्य कसाही विद्वान् अथवा प्रतिष्ठित असला तरी आजच्या व्याख्यानाच्या विषयांत त्याचेच विचार ह्मणून कधीं उपयोगीं पडावयाचे नाहींत. तर ज्या महर्षींविषयीं त्यांची पूज्य बुद्धि अद्यापि नष्ट झाली नाहीं, त्यांचे विचार त्या विषयावर काय आहेत हेंच मुख्यत्वें लिहून प्रसंगविशेषीं स्वाभिप्राय द्यावा हें बरें वाटल्यामुळें तशीच आज योजना केली आहे. आरंभीं सामान्यतः दुसऱ्या मनुष्याशीं वर्तन करण्याच्या बाबतींत एक साधारण नियम दक्ष ऋषीनें लिहिला आहे; त्याचा अर्थ जरी या मंडळींतील बहुतेकांस माहित आहे तरी तो स्मृतीसारख्या प्रमाणभूत ग्रंथांत नियमरूपानें लिहिलेला आहे हें थोड्यांसच माहीत असेल. यास्तव तो येथें आदीं लिहितों—

यथैवात्मा परस्तद्वद् द्रष्टव्यः सुखमिच्छता।
सुखदुःखानि तुल्यानि यथात्मनि तथा परे॥अ.३श्लो.२०
सुखं वा यदिवा दुःखं यत्किंचित्क्रियते परे।
तत्कृतंतु पुनः पश्चात्सर्वमात्मनितद्भवेत्॥अ.१श्लो.१११
भाऊ दाजीचें पुस्तक.

यांपैकीं प्रथम श्लोकांत असा बोध आहे कीं, सुख व दुःख हीं आपणास जशीं यथाकर्में इष्ट व अनिष्ट आहेत तशींच दुसऱ्यांसही तीं इष्ट व अनिष्ट आहेत, यास्तव आपणास सुख इच्छिणाऱ्या पुरुषानें दुसऱ्याविषयींही आपणाप्रमाणेंच विचार करावा. आणि दुसऱ्या श्लोकांतः—दुसऱ्यास सुख अथवा दुःख जें कांहीं द्यावें तेंच सर्व आप-

* उपयुक्त मराठी ज्ञानप्रसारक सभेमध्यें वेदशास्त्रसंपन्न रा०रा० विष्णु परशुराम शास्त्री पंडित, यांणीं ता० ५ मार्च सन १८७५ इसवी या दिवशीं वाचलेला निबंध.

णास पुनः तसें प्राप्त होतें, असा परिणाम दाखविला आहे. परंतु दोहों श्लोकांचें तात्पर्य एकच आहे कीं, दुसऱ्यास दुःख देऊं नये. या उपोद्घाताच्या आरंभीं चार वाक्यांत जो सिद्धांत सुचविला आहे तोच या उत्तरश्लोकानें एथें दाखविला आहे. आणि त्याचा प्रत्यय आपण आर्यलोक आपल्या सांसारिक, व्यावहारिक, व राजकीय स्थितींत पदोपदीं अनुभवीत आहों असें, विचार केला असतां मनांत आल्याविना कधीं राहणार नाहीं. आह्मीं आमच्याच केवळ नव्हे, तर या सर्व मानवसृष्टीचा उत्पादक जो मूळ पुरुष त्याच्याही अर्धांगभूत ज्या स्त्रिया त्यांचे, आणि त्या पुरुषाचेच अवयवभूत जे इतर वर्ण ज्यांस आपण द्विजबहिर्भूत अथवा कनिष्ठ वर्ण मानतों, त्यांचे अधिकार आपण सर्वस्वीं कमी केले त्या योगानें आपण आपलेच अधिकार कमी केले आणि तेणेंकरून आपण आपणासच साक्षात् अनंत दुःखांस आणि गैर सोईस पात्र केलें व आपल्या प्रिय देशास अगदीं निकृष्ट स्थितीस आणून पोंचविलें यांत कांहीं संशय नाहीं. तरी आज इतर वर्णांच्या अधिकारांविषयीं आपणांस विचार कर्तव्य नसून फक्त स्त्रियांच्या अधिकारांविषयीं विचार कर्तव्य आहे. यास्तव त्याविषयींच आतां बोलूं.

स्त्रिया या मानवसृष्टीच्या मूल उत्पादक पुरुषाच्या अर्धांगभूत आहेत असें मीं आतांच नुक्तें ह्मटलें त्याविषयीं ज्या मनु नांवाच्या पुरुषापासून मानव झाले असें सर्वांनीं मानलेलें आहे त्याच्याच ग्रंथांतून ह्मणजे मनुसंहितेंतून खालील वचन घेतों—

द्विधा कृत्वाऽऽत्मनो देहं अर्धेन पुरुषो भवेत् ।
अर्धेन नारी तस्यां स विराजमसृजत्प्रभुः ॥

भावार्थ—मनुष्यसृष्टीचा उत्पादक जो मूल पुरुष तो आपल्या देहाचे दोन भाग करून एका अर्धानें पुरुष झाला आणि एका अर्धानें स्त्री झाला. आणि मग त्या स्त्रीच्या ठायीं विराट्स्वरूप ह्मणजे ही सर्व दृश्य मानवसृष्टि त्यानें उत्पन्न केली.

या वाक्यावरून स्त्रियांची पुरुषांशीं बरोबरी सिद्धच आहे आणि ती बरोबरी आहे तर त्यांचे अधिकारही पुरुषांबरोबरच असले पाहिजेत असेंही साधारणबुद्धीच्या पुरुषांस देखील वाटल्याविना राहणार नाहीं. कारण एकाच वस्तूचीं बरोबर दोन अर्धें केलीं असतां त्या दोहोंचेही गुण, धर्म, प्रमाण, योग्यता इत्यादि सर्व सारखींच असलीं पाहिजेत याविषयीं संशय नाहीं. तेव्हां स्त्रियांच्या अधिकाराचें रक्षक जे दुर्ग त्यांत जरी अर्वाचीन काळीं दुष्टबुद्धि व स्वार्थी लोकांनीं चोरवाटेनें प्रवेश करून त्यांची बरीच नासाडी केली, त्यांजवरील तोफांच्या कान्यांत खिळे ठोकले, इनामकमिटीप्रमाणें त्यांच्या अधिकाराचे संरक्षक बहुत दस्तऐवज फाडून कुटून जाळून फस्त करून टाकिले, अथवा त्यांत फेरफार केल्यामुळें आतां ते जसेच्यातसेच अक्षत अव्रण हातीं न लागले तरी या वरील एकाच सनदेवरून उत्तम कुशाग्रबुद्धि न्यायाधीश स्त्रियांचे अधिकार स्त्रियांस परत देतीलच देतील. खेरीज या सृष्टीच्या एकंदर घडामोडीसंबंधी नोंदीची जी अतिविशाळ वही आहे तींतून ह्मणजे राष्ट्रांतरांतील स्त्रियांच्या अधिकारांच्या प्रत्यंतरावरून वगैरे आमच्या आर्यभगिनींच्या अधिकारांचे पाहिजे तितके दाखले सांपडतील यांतही कांहीं संशय नाहीं. आणि तसे दाखले हातीं लागल्यावर माजी मिस्तर मिल्लसारखे स्त्रियांचे वकील न्यायद्रष्ट्या जगापुढें ते ठेवून आकाशपाताळ

एक करून आमरणांत त्यांबद्दल लढण्यास कधीं कमी करणार नाहींत.

आतां आरंभीं सर्व अधिकारांमध्यें अत्यंत महत्त्वाचा जो ज्ञानप्राप्तीचा अधिकार तो स्त्रियांस आपल्या महर्षींनीं दिल्याचा दाखला आज कितपत उपलब्ध होतो तो पाहूं. आह्मां आर्य लोकांत पवित्र ज्ञानप्राप्तीच्या योग्यतेकरितां पूर्वी जे अनेक संस्कार करावे लागतात त्यांत उपनयन संस्कार हा मुख्य आहे. आणि ज्ञानप्राप्ति जी व्हावयाची ती वेदाध्ययनापासून मुख्यत्वें व्हावयाची असें गृहीत आहे. तर हे सर्व संस्कार आणि विशेषत: उपनयनसंस्कार जर स्त्रियांस सांगितला असेल तर त्यांस ज्ञानप्राप्तीचा अधिकार निर्विवाद सिद्ध होईल. आणि तोच मुळीं सांगितला नसेल तर त्या संस्कारानंतर ज्या ज्ञानाचा अधिकार त्यांस प्राप्त होणार तें ज्ञान त्यांस प्राप्त होणार नाहीं असें सरळ विचारानें दिसतें. तर स्त्रियांस उपनयनसंस्कार अनेक महर्षींनीं स्पष्ट सांगितला आहे. तो असाः—

यम.

पुराकल्पेतु नारीणां मौंजीबंधनमिष्यते ।
अध्यापनं च वेदानां सावित्रीवचनं तथा ।
पिता पितृव्यो भ्राता वा नैनामध्यापयेत्परः ॥
स्वगृहे चैव कन्याया भैक्ष्यचर्या विधीयते ।
वर्जयेदजिनं चीरं जटावल्कलमेव चेति ॥

भावार्थ—पूर्वीच्या कल्पांत स्त्रियांस मौंजीबंधन ह्मणजे उपनयनोत्तर ब्रह्मचर्यव्रतनिमित्तक मुंज (विशेषजातीची दोरी) बांधणें हें इष्ट होतें. त्यांहीं वेद शिकणें व गायत्रीजप करणें हेंही इष्ट होतें. स्त्रियांस पिता, चुलता अथवा भाऊ यांतून कोणीं तरी शिकवावें, दुसऱ्यानें शिकवूं नये. ब्रह्मचर्यव्रतांगभूत भिक्षा मागणें ती स्त्रियांनीं स्वगृहांतच मागावी. चर्मपरिधान, चीर, जटा आणि वल्कलें यांचें धारण हीं स्त्रियांनीं वर्ज्य करावीं.

आतां या वरील वाक्यांत "पूर्वीच्या कल्पांत" असें ह्मटलें आहे त्यावरून कदाचित् शंका येण्यास जागा आहे कीं हा पूर्वयुगांतला अथवा कल्पांतरांतला संस्कार आहे. तो या युगांत धर्मत्वेंकरून धरितां येत नाहीं. तर ही कल्पना बरोबर नाहीं; कारण दुसऱ्या स्मृतींत युग अथवा कल्प यांचा विशेष न सांगतां साधारणत:च स्त्रियांस मुंज वगैरे धर्म सांगितले आहेत. उदाहरण—

गद्य हारीत—

द्विविधा हि स्त्रियो ब्रह्मवादिन्यः सद्योवध्वश्च ।
तत्र ब्रह्मवादिनीनामुपनयनमग्नींधनं वेदाध्ययनं
स्वगृहे च भिक्षाचर्येति।सद्योवधूनामुपस्थिते विवाहे
कथंचिदुपनयनं कृत्वा विवाहः कार्य इति ॥

भावार्थ— स्त्रिया दोन प्रकारच्या, ब्रह्मवादिनी आणि सद्योवधू. ह्यांपैकीं ब्रह्मवादिनींस मुंज, अग्निकार्य, वेदाध्ययन, स्वगृहीं भिक्षा मागणें हे धर्म आहेत. आणि सद्योवधू स्त्रियांचा विवाहसमय आला ह्मणजे कसें तरी उपनयन करून विवाह करावा.

"कसें तरी उपनयन" ह्मणजे आपल्यीं जीं

१ ही साधारण गोष्ट स्त्रियांस परगृहीं वास अथवा परकी पुरुषांशीं सहवास घडल्यापासून जे वाईट परिणाम होण्याचा संभव आहे त्यांवर लक्ष ठेवून सांगितली आहे; पण त्या परिणामाची भीति अथवा शंका नसल्यास दुसऱ्यापाशींही अभ्यास करण्यास चिंता नाहीं. यावरूनच वाल्मीकिऋषीच्या आश्रमांत वासंतिका इ० स्त्रिया शिकत होत्या हें प्रसीद्ध आहे.

सर्वांचीं उपनयनें झालीं आहेत तीं व हल्लीं आपण जीं नेहमीं लोकांत होतांना पाहतों व स्वतः आपल्या मुलांचीं करतों तीं.—ह्मणजे गळ्यांत जानवें पडल्यावांचून लग्न होण्यास मार्ग नाहीं; ह्मणून कशी तरी एकदा मुंज लावून विवाह करावयाचा. याहून दुसरें कांहीं नाहीं.

ब्रह्मवादिनी ह्मणजे वेदविद्येंत पाठप्रवचन ह्मणजे अध्ययनाध्यापनादि कर्में करणाऱ्या. या मुख्यत्वें पारलौकिककर्मानुष्ठानामध्येंच आयुष्य वेचणाऱ्या अशा गार्गी, वडवा, सुलभा इत्यादि स्त्रिया प्राचीनकाळीं बहुत असत. यांस विवाह करण्याची आवश्यकता नाहीं. तर विवाहापासून प्राप्त होणारे जे गृह्याश्रमाचे धर्म ते आचरल्याविना ब्रह्मचर्याच्या धर्मानेंच त्या परलोकच्या सुखास पात्र होतात. यावरून सर्व स्त्रियांस विवाहसंस्कार आवश्यकच आहे व तो न झाल्यास स्त्रिया धर्मबाह्य होतात इत्यादिक जे साधारण लोकांचे ग्रह आहेत ते अगदीं निर्मूल आहेत हें स्पष्टच होत आहे. तेव्हां विवाह करणें अगर न करणें ही केवळ स्त्रियांच्याच इच्छेवर व त्यांच्याच अधिकारांतील गोष्ट असून त्यांजवर दुसऱ्याचा अधिकार चालणें शास्त्रसंमत नाहीं.

सद्योवधू ह्मणजे गृह्याश्रमाच्या धर्मानें चालणाऱ्या स्त्रिया. यांस अर्थात् दीर्घकालपर्यंत वेदाध्ययनाची आवश्यकता नसल्यामुळें विवाहसमय प्राप्त होतो तेव्हांच "कसा तरी" उपनयनसंस्कार करावा आणि मग विवाह करावा.

हा उपनयनसंस्कार ह्मटला ह्मणजे ब्राह्मणादि वर्णपरत्वेंकरून भिन्न भिन्न कालीं सांगितला आहे.

आश्वलायन—

अष्टमे वर्षे ब्राह्मणमुपनयेदेकादशे क्षत्रियं द्वादशे वैश्यं आषोडशाद्ब्राह्मणस्यानतीतः काल आद्वाविंशात्क्षत्रियस्याचतुर्विंशाद्वैश्यस्यातऊर्ध्वंपतितसावित्रीकाभवंति।

ब्राह्मणाची आठव्या, क्षत्रियाची अकराव्या आणि वैश्याची बाराव्या वर्षीं मुंज करावी. ब्राह्मणाचा सोळा वर्षांपर्यंत, क्षत्रियाचा बावीस वर्षांपर्यंत आणि वैश्याचा चोवीस वर्षांपर्यंत मुंजीचा काळ जात नाहीं, ह्मणजे सोळा, बावीस आणि चोवीस वर्षेंपर्यंत यथाक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या मुंजी केव्हांही केल्या तरी चिंता नाहीं. आणि वर यम व हारीत यांच्या स्मृतीप्रमाणें स्त्रियांस मुंजी आहे. तिचा काळही अर्थात् हाच ह्मणजे ब्राह्मणादि वर्णभेदानें आठ, अकरा, बारा वर्षांपासून सोळा, बावीस व चोवीस वर्षेंपर्यंतच धरला पाहिजे. यानंतर कांहीं काळ अध्ययनाकडे जाऊन नंतर मग विवाह व्हावा. ह्मणजे त्यांस विवाह ह्मणजे काय आणि तज्जन्य कार्य अथवा फळें तीं कोणतीं हें कळूं लागलें ह्मणजेच विवाह प्राचीनकाळीं होत होता व तो तसाच व्हावा असा स्त्रियांचा शास्त्राप्रमाणें हक्क आहे. आणि क्षत्रियादिकांच्या कुलांत वयाच्या संबंधानें तरी या हक्काचा भोगवटाही बराच घडलेला पुराणादिकांत दिसून येतो. यावरून स्त्रियांस मुंज व वेदाध्ययन आहे.

आतां स्त्रियांस मुंजीचा, वेदाध्ययनाचा वगैरे अधिकार असल्याबद्दल मागें लिहिलें आहे. त्याखेरीज व्यासस्मृतींत स्त्रियांची दिनचर्या सांगितली आहे तींतील एक गोष्ट येथें लिहिण्यासारखी आहे. व्यास—

भुक्त्वा नयेदहः शेषमायव्ययविचिंतया॥

भोजनोत्तर स्त्रियांनीं आपला काळ जमा-

खर्चाच्या विचारांत घालवावा. आपल्या संसाराच्या जमाखर्चाच्या विचारांत काळ घालविण्यास स्त्रियांस विद्या जरूर असलीच पाहिजे. येथें जे गृहस्थ जमले आहेत त्यांस आपल्या संसाराच्या जमाखर्चाचा विचार कसा करावा व त्याविषयीं विद्येची आवश्यकता आहे अथवा नाहीं हें सहज समजण्यासारखें आहे. हल्लीं जें आमच्या स्त्रियांस गणिताचें ज्ञान आहे तें फारच कमी आहे. यावरूनही स्त्रियांस गणितादि व्यवहारोपयोगी विद्या व कला अवश्य शिकविल्या पाहिजेत व त्या शिकण्याचा त्यांस हक्क आहे.

आलीकडे स्त्रियांस ब्रह्मवादिनी करावयाच्याच नाहींत असें झाल्यामुळें वेदाध्ययन व तदंग ब्रह्मचर्य हीं नाहींशीं झालीं. तेव्हां त्यासाठीं ह्मणून योजिलेलें मौंजीबंधनही नाहींसें झालें. तरी त्यांचा सद्योवधूत्वाचा तर हक्क गेला नाहीं. तेव्हां त्यांचा विवाह उपस्थित झाला असतां कसा तरी उपनयनविधि वर सांगितल्या वयांत करून मग त्यांचा विवाह केला पाहिजे. परंतु आलीकडे तोही अधिकार बंद पाडला. तरी आतां त्यांचा विवाह आहे तोच उपनयनस्थानापन्न आहे, असें प्रमाणत्वेंकरून आज अभिमत असलेले ग्रंथकर्ते ह्मणतात.

मिताक्षरा—

शौचाचाराश्च शिक्षयेदित्यनेन प्रागुपनयनात्कामचारो दर्शितः।वर्णधर्मान्वर्जयित्वास्त्रीणामप्येतत्समानं विवाहादर्वाक् । उपनयनस्थानीयत्वाद्विवाहस्य ॥

भावार्थ—उपनयनोत्तर मुलास स्वच्छता आणि आचार हे शिकवावे. या ह्मणण्यानें उपनयनापूर्वी मुलास यथेच्छ चालण्यास अधिकार अथवा मोकळीक आहे. वर्णधर्मांखेरीज स्त्रियांसही विवाहापूर्वी यथेच्छ चालण्यास मोकळीक आहे; कारण स्त्रियांस विवाह हा उपनयनाच्या ठिकाणीं आहे.

यावरून उपनयनाचाच कालनियम विवाहासही लागू झाला आणि तो ब्राह्मणांत १६, क्षत्रियांत २२ आणि वैश्यांत २४ वर्षांपर्यंत आहे असें वर सप्रमाण दाखविलें आहे. त्यांत सर्व मतें ऋतुदर्शनाचा अवधि धरला आहे, याविषयीं पुष्कळ प्रमाणें आहेत; पण त्यांतील एक महाभारतांतील मात्र येथें लिहितों.

त्रिंशद्वर्षः षोडशाब्दां भार्यां विंदेत नग्निकाम् ॥

अनुशासनपर्व, अध्याय ४४, श्लोक १३.

भावार्थ—तीस वर्षांच्या पुरुषानें १६ वर्षांची ऋतु न पावलेली मुलगी बायको करावी.

प्रसंगवशात् विवाहापूर्वीच ऋतुदर्शन झाल्यास त्या काळापासून पुढें तीन वर्षांपर्यंत बाप वगैरे यांनीं विवाह न केला तर तिनें स्वयंवर करावें असा सर्व ऋषींनीं तीस अधिकार दिला आहे. तो असा—

मनु—

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विंदेत सदृशं पतिम् ।
अदीयमाना भर्तारमधिगच्छेद्यदि स्वयं ।
नैनः किंचिदवाप्नोति स्वयं साधिगच्छति ॥

गौतम—

त्रीन्कुमार्यृतूनतीत्य स्वयं युज्येतानिर्दितेनोत्सृज्य पित्र्यानलंकारान् ॥

बौधायन.

वर्षाणि त्रीण्यृतुमती कांक्षेत पितृशासनं ।
ततश्चतुर्थे वर्षेतु विंदेत सदृशं पतिं ॥

या सर्वांचा **भावार्थ**—रजोदर्शन झाल्यानंतर तीन वर्षेपर्यंत मार्गप्रतीक्षा करून कन्येनें स्वयंवर करावें. तिनें बापाचे अलंकार द्रव्य वगैरे कांहीं न घेतां आपणच आपणास

योग्य असा वर पाहून त्याशीं विवाह करावा. असें करण्यांत स्वतः तिला व तिला वरणाऱ्या पतीला, तीस तीन वर्षांपूर्वी ऋतु प्राप्त झाला वगैरे या कारणांनीं यत्किंचित्ही दोष लागत नाहीं.

यावरून तिला विवाहाच्या बाबतींत अशा प्रसंगीं पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. आणि इतर प्रसंगींही विवाहाच्या बाबतींत मुख्य विचार व संमति कन्येचीच असली पाहिजे आणि तिच्या इच्छेनुरूपच तो झाला पाहिजे असा तिचा हक्क आहे.

महाभारत.

आत्माभिप्रेतमुत्सृज्य कन्याभिप्रेत एव यः ।
अभिप्रेताच या यस्मै तस्मै देया युधिष्ठिर ॥

अनुशासन पर्व, अध्याय ४४, श्लोक ५.

भावार्थ—आपणास पसंत वाटत असून कन्येस पसंत वाटत नसेल तर तो वर सोडून कन्येस जो पसंत वाटत असेल त्यासच कन्या पित्यानें द्यावी, आणि तसेंच आपणास आवडत असेल तीच कन्या मुलाच्या गळ्यांत न बांधतां त्यास जी आवडत असेल ती त्यास द्यावी. ह्मणजे विवाहाच्या बाबतींत वधूस वर पसंत व वरास वधू पसंत असेल तरच त्यांचा विवाह करावा; नाहीं तर कसा तरी एकदा विवाह करून दोन हातांचे चार हात (मुसक्या बांधण्याचें काम) करूं नयेत अशी या नियमाची आज्ञा आहे. तेव्हां आपणास आवडेल तसाच नवरा बाप वगैरेकडून करून घेण्याचा किंवा स्वतः करण्याचा स्त्रियांस पूर्ण हक्क आहे. कन्येस यथा योग्य वर न मिळेल तर ती जन्मभर अविवाहित ठेवावी, परंतु अयोग्य वरास कधींही देऊं नये असें मनूनें स्पष्ट सांगितलें आहे.

काममामरणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि ।
नचैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥

भावार्थ—कन्येस ऋतु प्राप्त झाला तरी तीस गुणवान् वर न मिळेल तर आमरणपर्यंत अविवाहितच ठेवावी, पण गुणहीन पुरुषास कधीं देऊं नये.

(पुढें चालेल.)

पुस्तकाची पोंच—बडोदा अलबम्, ह्मणजे, थोड्या दिवसांमागें बडोद्यामध्यें चौकशीकरितां 'बडोदा कमिशन्,' ह्मणून जी पंच मंडळी बसली होती, तिची चित्रयुक्त हकीकत.—हें पुस्तक, त्याचे कर्ते, कलकत्ता एथील ओरियंटल् फिग्यारो नामक नकली पत्रकार यांणीं आह्मास पाठविली आहे, हे त्यांचे मोठे आभार होत. यामध्यें बडोदाकमिशनांतील पंच, मल्हारराव गायकवाड, सौ० लक्ष्मीबाई, क. फेअर, सर लुइस पेली, सार्जंट बालंटैन, मि. स्कोबल्, रा. शांताराम नारायण, मि. दादाभाई नौरोजी, व यांशिवाय विषाच्या खटल्यामध्यें सामील मानलेले रावजी, नरसू, सालीम, यशवंतराव हे चारजण अमीनेच्या डोकीवर दिलेले काढले आहेत, व त्यांतून दामोदरपंत उलथून खालीं पडला असें दर्शविलें आहे. गायकवाडाच्या दोहों बाजूंस दोन मृत्युस्वरूप पाहरेकरी काढले आहेत. शिंदे, जयपुर, आणि सर दिनकरराव यांचीं चित्रें गंजीफेच्या एकेक पानावर काढून तीं तीन्ही कोणी वेगळ्या हातानें (इंग्रज सरकारानें ?) धरलीं आहेत. परंतु अशा चित्रांप्रमाणें त्या थोर मनुष्यांची वर्तणूक घडली नाहीं हें त्यांस भूषणास्पद होय. दुसरींही कित्येक नकली चित्रें देऊन शेवटीं सर्व हकीकत संक्षिप्त पण नकली तऱ्हेनें लिहून जोडली आहे.

BOMBAY:—"NIRNAYASAGAR PRESS" KALKADEVEE ROAD.

विविधज्ञानविस्तार गृहांत असलेलीं विक्रीचीं पुस्तकें.

कायदे व आवट.

इंग्रजी	मू. किं. रु. आ.	टपा. रु. आ.
Broom's Selection of Legal Maxims	17—8	1—12
Steele's Law and Custom of Hindoo Castes	10—8	1—4
The Criminal Procedure Code (Act No. X. of 1872)	2—8	0—6
The Indian Evidence Act (Act No. I. of 1872.)...	1—8	0—1
Act No. XL. of 1874.....	0—1	0—3

मराठी.

न्यायसारसंग्रह .....२५—०		३—०
अपकृत्यशास्त्र	९—०	१—८
टार्ट शास्त्रावरील टीका.....	१—८	०—२
करारसंबंधी नुकसानी परिमाण...	१—४	०—१
प्रमाणशास्त्र.....	०—८	०—२
करारशास्त्र.....	०—१४	०—२
सन १८७१चा आक्ट ९.....	०—१४	०—२
सन १८७०चा ७	०—६	०—२
सन १८६०चा ४५	१—८	०—२
सन १८७१चा ८	०—६	०—१
सन १८६९चा १८	०—६	०—१
सन १८६४चा २०	०—२	०—१
सन १८६५चा १०	०—४	०—२
हायकोर्टाचे निवाडे.....	१—४	०—२
सन १८६५चा ११	१—८	०—३
सन १८७२चा १०	१—८	०—३
सन १८७४चा ११	०—३	०—१

वैद्यक ग्रंथ.

निघंट रत्नाकर प्राकृत .....२३—०		४—८
सारंगधर प्राकृत टीका.....	४—०	०—१४
माधवनिदान प्राकृत टीका.....	४—०	०—१३
वैद्यसार प्राकृत टीका	२—८	०—८
वैद्यजीवन प्राकृत टीका	०—१२	०—३
वैद्यामृत प्राकृत टीका.....	०—१०	०—३
त्र्यंबकी प्राकृत टीका	६—०	०—१
बोधदेव शतक प्राकृत टीका ...	०—१२	०—२
वैद्यावतंस प्राकृत टीका.....	०—६	०—१
बालरोगांचिकित्सा, डा. पां. गो. कृत.	१—४	०—४
बालवैद्य.....	१—०	०—२

संस्कृत प्राकृत ग्रंथ वगैरे.

	मूळ किं. रु. आ.	बं. पो. रु. आ.
श्री भावार्थ रामायण .....३५—०		३—०
यथार्थदीपिका	१०—०	२—८
सर्वार्थचिंतामणि	१—४	०—३
पंचरत्नगीता, रेशमी पुष्ठा	०—१२	०—२
प्राकृत जैमिनि अश्वमेध	४—८	०—१४
हरिविजय	३—१२	०—१२
पांडवप्रताप	५—०	१—८
निर्णयसिंधु	४—४	०—१४
भागवत चूर्णिका	४—०	०—१४
देवीमाहात्म्य	१—८	०—४
नासिकेतोपाख्यान	२—०	०—८
आगमनिगम	१—८	०—४
पदबोधिनी गीता	२—८	०—६
भगवद्गीता	०—६	०—२
स्वप्नचिंतामणि	०—८	०—२
सहजबोध	०—६	०—२

मनोरंजक गोष्टी वगैरे.

उपयुक्त चमत्कारसंग्रह भाग १ला	०—५	०—१
,, ,, भाग २रा	०—५	०—१
,, ,, भाग ३रा	०—५	०—१
,, ,, भाग ४था	०—५	०—१
,, ,, भाग ५वा	०—५	०—१
मराठी प्रचारांतील म्हणी	०—७	०—१
तंतुवाद्य.....	१—८	०—३
सुवर्णमालिनी	१—८	०—३
बागोबहार अथवा चार दरवेश		
,, ,, ,, भाग १ ला	१—०	०—२
,, ,, ,, भाग २ रा	१—०	०—२
,, ,, ,, भाग ३ रा	१—४	०—२
,, ,, ,, भाग ४ था	१—०	०—२
कादंबरीसार	०—१०	०—२
मराठी भाषेचा नवीन कोश ...	२—८	०—४
प्रेमबंधन (नाव्हल) (पूर्वार्ध) ...	१—८	०—४

ज्योतिषप्रकरणीं संस्कृत प्राकृत ग्रंथ.

ज्योतिषसार	१—१२	३
ग्रहलाघव	१—०	२
पंचांगसाधनसार—(ग० दै० ल०)	१—०	२
मुहूर्तमार्तंड.....	०—१२	२
लघुजातक	०—७	१
स्फुटज्योतिष	०—४	१
वास्तप्रकरणीं कोष्टकें	०—८॥	१
सर्वार्थचिंतामणि	१—४	३

☞ यांशिवाय शाळाखात्यांत उपयोगीं पडणारी इंग्लिश व मराठी व गुजराती पुस्तकें हीं वेर्थे पैसा पाठविल्यास जरूर रवाना करण्यांत येतील.

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हे पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध; इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रूपये ३.
सहामाही आगाऊ.....रूपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचे .....आणे ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रूपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

A MONTHLY MAGAZINE

OF

MARATHI LITERATURE

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

पुस्तक ७. अंक ७.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.	१२१
अर्थशास्त्र.	१२५
देशी वैद्यशास्त्र.	१२७
आयुष्यवर्तनक्रमाविषयीं श्रुतिस्मृतींच्या आज्ञा.	१३४
प्राचीन भरतखंडस्थिति (कविता)	१३९

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पोंच.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत)	रु.	आ.
रा. रा. शांताराम नारायण वकील.	३	०
रा. सा. मुकुंदराव रामचंद्र अ० इन्जीनियर	३	०
रा. रा. शिवशंकर माणकोबा.	३	०
रा. रा. कल्याणराव शिताराम चित्रे	१३	२
रा. रा. नारायण लक्ष्मणजी	३	०
रा. रा. नारायण विश्राम दळवी.	३	०
रा. रा. नारायण केरोबा भेंडे.	३	०
रा. रा. नारायण महादेव परमानंद.	३	०
डाक्टर नारायण दाजी	३	०
रा. रा. विनायक बाळकृष्ण चिंतोबा	९	०

(डिसेंबर १८७५ पर्यंत.)	रु.	आ.
रा. रा. पांडुरंग बाबाजी हिंदळेकर.	१०	०
रा. रा. यशवंतराव भास्करजी.	३	०
रा. रा. दाजी हरी रेणावीकर.	२	८
रा. सा. अनंदराव कृष्णराव कोठारे स. जज्ज.	३	०
रा. रा. बाजीराव बापुजी.	३	०
रा. रा. राघोबा आनाजी भंडारी.	३	०
शेट हीरजी रतनसी	६	०
रा. रा. शामराव गणपतराव चुकती बाकी.	३	०
रा. रा. माधवराव बी. पितळे. ,,	२	०

जाहिराती.

हिमालयवर्णन.

सदरहू नांवाचें संस्कृत काव्य कैलासवासी विठ्ठल बापूजी करमरकर बि. ए. एल्फिन्स्टन कालेजांतील सीनियर दक्षणा फेलो यांणीं रचलें. त्याचें समश्लोकी प्राकृत भाषांतर करून मूळ प्रतीसह हल्लीं "निर्णयसागर" छापखान्यांत छापवीत आहों. वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं किमतीबद्दल ६ आणे व पोष्टखर्च १ आणा पाठविल्यास पुस्तकें पंधरा दिवसांच्या आंत त्यांच्या हातीं मिळतील. मुंबई ता० १० जुलई १८७५

गोविंद वासुदेव कानीटकर,

विद्यार्थी, एल्फिन्स्टन कालेज.

मारीसकृत हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास.

(प्रश्नोत्तररूपानें)

सदर्हु पुस्तक रा० कृष्णाजी प्रभाकर काळे रत्नागिरी जिल्ह्यांतील स्कूलमास्तर यांणीं रचिलें. त्याची चौथी आवृत्ति पुष्कळ सुधारून नुकतीच छापविली आहे. या पुस्तकाचा विद्यार्थ्यांस उपयोग किती आहे हें थोडक्याच काळांत याच्या एकामागून एक अशा चार आवृत्ति निघाल्या यावरून मास्तर लोक सहज अनुमान करितील. किं० दर प्रतीस ९ आणे व पोस्ट खर्च १ आणा. पुस्तकें कालिकादेवीसमोर आमच्या पुस्तकालयांत मिळतील.

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ७.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.

पाशुपतदर्शन.

ज्यापक्षीं विष्णु हा परमेश्वर, व जीव हा त्याचा दास, असा वैष्णवांचा सिद्धांत आहे, त्यापक्षीं वैष्णवांचा मोक्ष हा सर्व पुरुषांनीं अभिलषित असा परम पुरुषार्थ नव्हे, असें ह्मणणें आह्मांस भाग पडतें; कारण दासत्वाचें अवलंबन करून, आपल्या स्वातंत्र्याची हानि करून घेणें, हें कोणत्याही पुरुषास इष्ट असेल, असें आह्मांस वाटत नाहीं; यासाठीं परमेश्वराचें ऐश्वर्य जीवास मिळून, परमेश्वराप्रमाणेंच जीवानें विभवाचा उपभोग करणें, यासच **मोक्ष** ह्मणावें; असें **पाशुपतशास्त्राचा** आश्रय करणारे मोठे मोठे विद्वान् लोक, या संसारसागराच्या पलीकडेस जाऊन तेथेंच अज्ञजनांनीं यावच्चंद्रदिवाकर सुखवास्तव्य करावें या हेतूनें, या जगांत जाहीर करितात. योग्यच आहे; दुसऱ्यास दासत्वापासून मुक्त करून, त्यास स्वातंत्र्य व पारमेश्वर्य देणें, यापलीकडे दुसरें कांहीं पुण्य आहे असें आह्मांस वाटत नाहीं. यास प्रमाणभूत जें **पाशुपतशास्त्र** त्याचें—

१ या मताचा फैलाव, "नकुलीश" या नांवाच्या विद्वानानें सूत्रभाष्यादिक ग्रंथ रचून पुष्कळ केला, ह्मणून यास नकुलीशपाशुपतदर्शन असेंही अन्यत्र नांव दिलेलें आढळतें. "पशुपति" ह्मणजे शिव. हा वृषभावर बसतो, ह्मणून त्यास हें नांव मिळालें असावें असें वाटतें. हल्लीं तर "पशु" ह्मणजे "अज्ञ जीव" कारण परमेश्वराच्या अपेक्षेनें ते पशुच होत; व त्या जीवांचा "पति" ह्मणजे राजा; असा "पशुपति" याचा अर्थ करितात. हा अर्थ याच दर्शनांत पुढें स्पष्ट केला आहे, हें दर्शन चांगलें प्राचीन आहे. याचा उल्लेख जेथें तेथें वैष्णवदर्शनाबरोबर केलेला असतो. शांतिपर्वांतील मोक्षधर्माच्या शेवटीं "सांख्यं योगः पांचरात्रं वेदाः पाशुपतं तथा" असा लेख आहे. त्याप्रमाणें या शास्त्राच्या कर्त्याविषयीं हा "उमापतिर्भूतपतिः श्रीकंठो ब्रह्मणः सुतः। उक्तवानिदमव्यग्रं ज्ञानं पाशुपतं शिवः" असें तेथेंच वचन आहे. हे श्लोक कांहीं साक्षात् व्यासाच्या तोंडांतून निघाले आहेत असें आमचें ह्मणणें नाहीं. कारण खुद्द हल्लींच्या महाभारताच्या वैयासिकत्वाविषयीं आह्मांस बराच संदेह आहे; व तो सर्व आह्मी फुरसतीप्रमाणें वाचकांस सादर करूं. पण इतकें ह्मणणें पुष्कळ आहे, कीं "शैवदर्शनें" व त्यांतील मुख्य "पाशुपतदर्शन" हीं चांगलीं प्राचीन आहेत. आतां हीं दर्शनें वैष्णवांच्या सिद्धांतांचें खंडन करितात, त्यावरून तीं वैष्णवांच्या नंतर उद्भवलीं असावीं, असें ह्मणणें आह्मांस रास्त दिसत नाहीं; कारण संप्रदाय जसजसे वाढतात, तसतसे ते परस्परांचें खंडन करितातच. तशांत हें वैष्णवसिद्धांताचें खंडन पाशुपत सूत्रांत आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. अर्थ ह्मणून इतकाच कीं हें दर्शन व दुसरीं शैवदर्शनें देखील पुष्कळ प्राचीन दिसतात.

अथातः पशुपतेः पाशुपतयोगविधिं व्याख्यास्यामः हें पहिलें सूत्र.

पहिल्यानें शिष्यानें गुरूस प्रश्न केला. त्या प्रश्नाचें उत्तर "अथातः" हें सूत्र होय. गुरूचें स्वरूप **गणकारिकेंत** याप्रमाणें निरूपण केलें आहे कीं—

पंचकास्त्वष्ट विज्ञेया गणश्चैकत्रिकात्मकः
वेत्ता नवगणस्यास्य संस्कर्ता गुरूरूच्यते

अर्थ—आठ **पंचका** व एक **त्रिक** या नऊ पदार्थांस **गण** ह्मणतात. हे नऊ गण जाणणारा व लोकांचे धर्मसंबंधी संस्कार करणारा यास **गुरु** ह्मणतात.

आतां आठ **पंचका** व एक **त्रिक** कोणतें? तर तेथेंच ह्मटलें आहे कीं—

लाभा मला उपायाश्च देशावस्थाविशुद्धयः
दीक्षाकारिबलान्यष्टौ पंचकास्त्रीणि वृत्तयः

अर्थ—**लाभ, मल, उपाय, देश, अवस्था, विशुद्धि, दीक्षाकारि, बल,** या आठ **पंचका;** व **त्रिक** ह्मणजे तीन **वृत्ति.**

आपण ज्याचें नित्य अनुष्ठान करितों व ज्याची प्राप्ति आपणास **उपाया**पासून होत्ये त्यास **लाभ**[1] ह्मणतात. आत्म्याच्या आश्रयानें रहाणारा जो दुष्ट भाव त्यास **मल**[2] ह्मणतात. ज्याची प्राप्ति झाली असतां साधकास शुद्धि मिळत्ये त्यास **उपाय**[3] ह्मणतात. ज्याच्या योगानें **ज्ञाना**ची व **तपा**ची वृद्धि होत्ये त्यास **देश**[4] ह्मणतात. **लाभा**ची प्राप्ति होईपर्यंत एकाच्याच आश्रयानें अवस्थान करणें यास **अवस्था**[5] ह्मणतात. **मला**चा आत्यंतिक नाश होणें, यास **विशुद्धि**[6] ह्मणतात. जें दीक्षेस साधनभूत असतें, त्यास **दीक्षा**[7]**कारि** ह्मणतात. जें आत्म्याचें बल वाढवितें, त्यास **बल**[8] ह्मणतात. **मला**चा नाश व्हावा यासाठीं अन्नांचें अर्जन करण्याचे जे उपाय त्यांस **वृत्ति**[9] ह्मणतात.

लोकांच्या **दुःखा**चा कोणत्या तरी रीतीनें **अंत** व्हावा, हें मनांत आणून साक्षात् परमेश्वरानें या शास्त्राचा उपदेश केला. **सात्मक** आणि **अनात्मक** हे या **दुःखां**ताचे दोन भेद. **दृक्शक्तिलक्षण** व **क्रियाशक्तिलक्षण** हे **सात्मका**चे दोन भेद. **दर्शन, श्रवण, मनन, विज्ञान, सर्वज्ञत्व,** हे **दृक्शक्तिलक्षण-दुःखां**ताचे पांच भेद. सूक्ष्म, व्यवहित, विप्रकृष्ट, इत्यादि वस्तूंचें यथार्थ ज्ञान उत्पन्न

१ ज्ञान, तप, नित्यत्व, स्थिति, शुद्धि, हे "लाभाचे" पांच भेद. यास "ज्ञानं तपोऽथ नित्यत्वं स्थितिः शुद्धिश्च पंचमं" हें हरदत्ताचार्यांचें वचन प्रमाण.

२ मिथ्याज्ञान, अधर्म, सक्ति, हेतु, च्युति, हे "मलाचे" पांच भेद. "मिथ्याज्ञानमधर्मश्च सक्तिर्हेतुश्च्युतिस्तथा। पशुत्वमूलं पंचैते तंत्रे हेया विविक्तिताः" हें हरदत्ताचार्यांचें वचन यास प्रमाण.

३ वासचर्या, जप, ध्यान, रुद्रस्मृति, लाभप्रतिपत्ति, हे "उपायाचे" पांच भेद. "वासचर्या जपो ध्यानं सदा रुद्रस्मृतिस्तथा। प्रतिपत्तिश्च लाभानामुपायाः पंच कीर्तिताः" हें वचन यास आधार.

४ गुरु, जन, गुहादेश, श्मशान, रुद्र, हे "देशाचे" पांच भेद. "गुरूर्जनो गुहादेशः श्मशानं रुद्र एव च" हें वचन यास मूल.

५ व्यक्ता, अव्यक्ता, अजपा, दानं, निष्ठा, हे पांच "अवस्थेचे" भेद. "व्यक्ताव्यक्ताऽजपा दानं निष्ठा चैव हि पंचमं" या वचनावरून हें सहज ध्यानांत येईल.

६ "अज्ञानस्याप्यसंगस्य हानिः संगकरस्य च। च्युतिर्हानिः पशुत्वस्य शुद्धिः पंचविधा स्मृता" ही पांच प्रकारची "शुद्धि."

७ "द्रव्यं कालः क्रिया मूर्त्तिर्गुरुश्चैव हि पंचमः" हे "दीक्षाकारीचे" पांच भेद.

८ "गुरुभक्तिः प्रसादश्च मतेर्द्वेद्यजयस्तथा। धर्मश्चैवाऽप्रमादश्च बलं पंचविधं स्मृतं" हे पांच "बलाचे" भेद.

९ भैक्ष्य, उत्सृष्ट, यथालब्ध, हे "वृत्तीचे" तीन भेद.

होणें, यास **दर्शन** ह्मणतात. **श्रवण** ह्मणजे सर्व प्रकारें शब्दविषयक ज्ञान. सर्व प्रकारें चिंताविषयक ज्ञान होणें, हें **मनन**. सर्व शास्त्रांचें ग्रंथतः व अर्थतः ज्ञान होणें, यास **विज्ञान** ह्मणतात. उक्त असो, अनुक्त असो, सर्व वस्तूंचें समासपूर्वक, विस्तारपूर्वक, विभागपूर्वक, आणि विशेषपूर्वक जें यथार्थ अव्यभिचारि ज्ञान, त्यास **सर्वज्ञत्व** ह्मणतात. **मनोजवित्व, कामरूपित्व, विक्रमणधर्मित्व**, हे **क्रियाशक्तिलक्षणदुःखांताचे** तीन प्रकार. गमनादिकांचा वेग निरतिशय व शीघ्र असणें यास **मनोजावित्व** ह्मणतात. कर्मादिकांच्या अपेक्षा न करितां स्वेच्छेनें सलक्षण व विलक्षण अशा स्वरूपांचें धारण करणें, यास **कामरूपित्व** ह्मणतात. इंद्रियांचा अभाव असतांही निरतिशय ऐश्वर्याबरोबर संबंध असणें हें **विक्रमणधर्मित्व**. हें **सात्मकदुःखांताचें** सविस्तर निरूपण झालें. आतां **अनात्मकदुःखांताचें** निरूपण करितों. **अनात्मकदुःखांत** ह्मणजे सर्व दुःखांचा आत्यंतिक उच्छेद होणें. या **दुःखांताचे** प्रकार मुळींच नाहींत. आतां **अस्वतंत्र तत्वाचें** निरूपण करितों. **विद्या, कला, पशु**, हे **अस्वतंत्र** तत्वाचे तीन भेद; पैकीं **विद्या** हा **पशूंचा** गुण होय. **बोधस्वभावा** व **अबोधस्वभावा** हे या **विद्येचे** दोन भेद. **बोधस्वभावा** ही दोन प्रकारची आहे. त्यापैकीं एकापासून विवेकाची व दुसऱ्यापासून अविवेकाची प्रवृत्ति होत्ये; धर्म व अधर्म या दोहोंचें यथार्थ निरूपण करणारें जें **शास्त्र** त्यासच **अबोधस्वभावा विद्या** ह्मणतात. स्वतः अचेतन असतांही जी चेतनाच्या स्वाधीन असून, त्याचें कार्य करित्ये, तीस **कला** ह्मणतात. **कार्याख्य कला** व **कारणाख्य कला** हे **कलेचे** दोन भेद. पृथिवी, आप, तेज, वायु, आकाश, हीं पांच **तत्त्वें**; व गंध, रस, रूप, स्पर्श, शब्द, हे पांच तत्त्वांचे पांच **गुण**, मिळून दहा; हे **कार्याख्य कलेचे** भेद. पांच **ज्ञानेंद्रियें**, पांच **कर्मेंद्रियें**, आणि **बुद्धि, अहंकार, मन**, हीं तीन; मिळून तेरा; हे **कारणाख्य कलेचे** भेद होत. पशुत्वाचा व ज्याचा निकट संबंध असतो, त्यास **पशु** ह्मणतात. **सांजन** व **निरंजन** हे **पशूंचे** दोन भेद. शरीरेंद्रियांबरोबर ज्याचा संबंध असतो, त्यास **सांजन पशु** ह्मणतात; याच्या ह्मणजे **सांजन पशूच्या** उलट ज्याचे धर्म असतात, तो **निरंजन पशु**. या समस्त सृष्टीचा संहार करणारा व इच्यावर अनुग्रह करणारा जो कोणी या सर्व सृष्टीस कारणभूत असा एक पुरुष आहे, त्यास **पति** अथवा **पशुपति** असें ह्मणतात.

आतां असा जो **पशुपति** त्याच्या ज्या **योगाचें** व ज्या **विधीचें** निरूपण करूं, असें "अथातः पशुपतेः" या सूत्रांत प्रतिज्ञा केली आहे, तो **योग** व तो **विधि** कोणता? तर आह्मीं असें ह्मणतों, कीं चित्ताच्या द्वारानें आपला व ईश्वराचा संबंध सुरू करणें, यासच **योग** ह्मणतात. **क्रियालक्षण** व **क्रियोपरमलक्षण** हे **योगाचे** दोन भेद. जप, ध्यान, इत्यादिकांस **क्रियालक्षण योग** ह्मणतात. अभ्यास करतां करतां, ज्यामध्यें क्रियेची मुळींच गरज लागत नाहीं, अशी जी स्थिति होत्ये, तीस **क्रियोपरमलक्षण योग** ह्मणतात. यासच कधीं कधीं **संविद्, गति**, असेंही ह्मणतात. धर्माची व अर्थाची ज्याच्या योगानें प्राप्ति होत्ये, त्यास **विधि** ह्मणतात. **प्रधानभूत** व **गुणभूत** हे या **विधीचे** दोन भेद. साक्षात धर्माची जीच्यापासून प्राप्ति होत्ये,

अशी जी चर्या, तीस **प्रधानभूत विधि** ह्मणतात. **व्रत** आणि **द्वारें** हे या **प्रधानभूत विधीचे** दोन भेद. भस्मानें त्रिकाल स्नान करणें, भस्मावर निजणें, षडंग उपहार, जप, व प्रदक्षिणा, हें सर्व **व्रत** या नांवानें मोडतें. **हसित, गीत, नृत्य, हुडुक्कार, नमस्कार, जप** यांस **षडंग उपहार** ह्मणतात. हा, हा, हा, हा, याप्रमाणें मोठ्यानें विक्राळ हसणें, यास **हसित** ह्मणतात. गांधर्व शास्त्राच्या अनुसारानें शिवाच्या गुणग्रामाचें वर्णन करणें, हें **गीत**. नाट्य शास्त्राच्या अनुसारानें हस्तपादादिकांचें चलन वलन करणें यास **नृत्य** ह्मणतात. हुडुक्, हुडुक्, असा मोठ्यानें शब्द करणें यास **हुडुक्कार** ह्मणतात. **नमस्कार व जप्य** हें द्वय तर लोकप्रसिद्ध आहेच. **क्राथन, स्पंदन, मंदन, शृंगारण, अव्युत्करण,** व **अव्युद्भाषण** हीं **द्वारें**. जागें असतांही निजलेल्याप्रमाणें लोकांस भासवणें, यास **क्राथन** ह्मणतात. वायु अत्यंत कुपितच झाला कीं काय, अशा रीतीनें आपले हात पाय हालवणें, यास **स्पंदन** ह्मणतात. आपला पाय गळूनच पडला आहे कीं काय, याप्रमाणें अडखळत अडखळत चालणें, हें **मंदन**. तरुण व सुंदर अशा एकाद्या स्त्रीस पाहतांक्षणींच कामुकाप्रमाणें चेष्टा करणें, यास **शृंगारण** असें नांव दिलें आहे. कार्याकार्याचा जसा कांहीं विवेकच नाहीं, अशा रीतीनें लोकनिंदित कर्म आचरणें, हें **अव्युत्करण**. अर्थाशिवाय कांहीं तरी असंबद्ध प्रलाप करणें, यास **अव्युद्भाषण** ह्मणतात. ज्याच्या योगानें **प्रधानभूत विधीची** प्राप्ति होत्ये, असें जें भिक्षाप्रभृति, त्यास **गुणभूत विधि** ह्मणतात.

आतां याप्रमाणें सर्व पदार्थांचें निरूपण करणारा आमचा आगम, आगमांतराहून फारच विलक्षण आहे; अर्थात् तोच एक खरा आहे असें ह्मटलें पाहिजे. बाकीचे आगम दुःखाची निवृत्ति होणें यासच परम पुरुषार्थ ह्मणतात; आह्मीं तर दुःखाची निवृत्ति होऊन पारमेश्वर्याची प्राप्ति होणें यासच परम पुरुषार्थ ह्मणतों. अन्य शास्त्रें कार्य अनित्य समजतात; पण आह्मीं तर तें नित्य आहे, असें ह्मणतों. कित्येक शास्त्रें स्वर्गादिक लोकांची प्राप्ति होणें यासच मोक्ष ह्मणतात; आह्मीं तर पारमेश्वर्याची प्राप्ति होऊन, दुःखाचा अंत होणें, व पुनः जन्मास न येणें, हाच मोक्ष, असें समजतों. अन्य शास्त्रें कर्मादिसापेक्ष ईश्वर या जगताचें कारण असें ह्मणतात; आह्मीं तर कर्मादिनिरपेक्षच ईश्वर या जगताचें कारण समजतों. ह्मटलेंही आहे कीं——

कर्मादिनिरपेक्षस्तु स्वेच्छाचारी यतो ह्ययं
ततः कारणतः शास्त्रे सर्वकारणकारणं ॥

अर्थ—कर्मादिकांची अपेक्षा केल्याशिवाय ईश्वर स्वेच्छेनेंच आचरण करितो; व ह्मणूनच ईश्वर हा सर्व कारणांचें कारण असें शास्त्र आपणांस सांगतें. यासाठीं हें **पाशुपतशास्त्र** सर्व शास्त्रांत श्रेष्ठ होय, व ज्यास परमपदाची प्राप्ति करून घेण्याची इच्छा असेल, त्यानें या शास्त्राचाच अभ्यास करावा, असें **पाशुपत** ह्मणतात.

पुढच्या खेपेस **तांत्रिकशैवदर्शनाचें** यथाशक्ति विवरण करूं.

अर्थशास्त्र.

(पुढें चालू.)

७ देश उद्वस्त दशेपासून त्वरित स्वल्पकाळानें सांवरून पुनः पूर्व दशा कसी पावतात. (पुढें चालू.)

८ लोन्त ह्मणजे कर्जानें राजकीय खर्च भागल्यापासून परिणाम.

भांडवलाचा व्यय सदैव होतो व त्याची पुनरुत्पत्ति सदैव होत्ये हें वर सांगितल्याप्रमाणें लक्षांत आल्यावर, आजपर्यंत ज्या गोष्टीचा लोकांस नेहेमीं अचंबा वाटत आला आहे त्या गोष्टीचें निराकरण होतें. उद्वस्त झालेल्या देशापासून अनेक देश बहुत्वरेनें सांवरून पुनः पहिल्यासारखे होतात. भूकंप, जलप्रलय, चंडवात व युद्धोत्पात यांहींकरून झालेली नासाडी अतिस्वल्पकालेंकरून नाहींसी होऊन तिचा मागमूस देखील रहात नाहीं. तोफांचा भडिमार व तरवारींचे हात हीं चालवून शत्रु एकादा देश उद्वस्त करून सोडितो, त्यांत असलेल्या बहुधा सगळ्या जंगम मालाचा अथवा संपत्तीचा धुवा उडवून टाकितो किंवा लुटून घेऊन जातो व त्यांतील सर्व प्रजेस धुळीस मिळवितो. याप्रमाणें झालें तरी लागलींच थोड्या वर्षांत पूर्वीप्रमाणें सर्व जसेंचें तसें हुबेहुब बनून जातें. हा सृष्ट्युपक्रमशक्तीचा विषय असा आहे कीं तेणेंकरून फार चमत्कार वाटून मति गुंग होत्ये. किंवा वरल्यासारखीं जरब नुकसानें झालीं तरी तीं अगदीं थोड्या कालानें भरून येतात. असी विचित्र शक्ति, संग्रह किंवा संग्रह करणें या तत्त्वाची आहे हें दाखविण्याकरितां तो विषय उदाहरणार्थ घेत असतात. पण या गोष्टींत चमत्कारिक ह्मणून कांहीं एक नाहीं, असें कीं ज्या जंगम मालाचा शत्रूनें धुवा करून टाकिला तो जंगम माल, नाहीं तरी स्वतः देशांतील लोकांनीं थोड्याच वेळांत फस्त केला असतां; देश उद्वस्त झाल्यावर जी संपत्ति त्यांत बहुत्वरेनें उत्पन्न होते ती एरव्हींही उत्पन्न करावी लागली असती व कसाही प्रकार घडता तरी ती उत्पन्न झाली असती व बहुतांशीं तितक्या त्वरेनें अथवा तितक्या थोड्या वेळांत उत्पन्न झाली असती. संपत्युत्पत्तीच्या संबंधानें पहातां पूर्वापूर्व स्थितींत कांहीं अंतर पडलें नाहीं; इतकेंच कीं, नवीन संपत्ति उत्पन्न होत आहे तोंपर्यंत; पूर्वी उत्पन्न केलेल्या जुन्या संपत्तीच्या भोगवट्याचा लाभ मात्र लोकांना मिळत नाहीं. त्यांच्या नाशाची त्वरित भरून येण्याची शक्यता, देशांतील प्रजेचा उच्छेद झाला असेल नसेल त्यावर मुख्यत्वेंकरून अवलंबून रहात्ये. संपत्ति उत्पन्न करणारे मेहनती लोक नाशसमयीं निर्मूल झाले नाहींत किंवा नाशसमयानंतर त्यांनां भुकें मरावें लागलें नाहीं तर मग त्यांची पूर्वीची अक्कल व पूर्वीचें ज्ञान, तसेंच त्यांची जमीन व तींत केलेली शाश्वतीची सुधारणा, तसेंच कारखान्याच्या मजबूत इमारती शाबूत किंवा थोड्या नुकसान झालेल्या, हीं असलीं ह्मणजे पूर्वीच्या इतकी संपत्ति उत्पन्न करण्याचीं बहुतेक सर्व साधनें आहेतच. जितका ह्मणून सुखोपभोग लोप करतां येईल अथवा अन्नवस्त्राचे जितके हाल ह्मणून सोसतां येतील तितके सोसूनही जिवंत राहून काम करीत असतां येईल अशा स्थितींत रहातां येण्यापुरता अन्नाचा पुरवठा असला, किंवा अन्न विकत घेतां येईल इतक्या मोलाची कांहीं

संपत्ति असली ह्मणजे आपल्या कामधंद्यामध्यें ज्या साधारण मानानें कष्ट करण्याचा त्यांना सरावा पडला आहे तितक्याच मानानें पुढें कष्ट करण्याचें चालवून ते लोक थोड्याच वेळांत पूर्वीइतका माल तयार करतील व एकखटी करून पहातां पूर्वीइतकी संपत्ति व पूर्वीइतकें भांडवल करतील. संग्रह या शब्दाचा लौकिकार्थ अनुलक्षून पाहिलें तर संग्रह करणें या तत्त्वाची शक्ति वरील प्रकारांत दिसून येत नाहीं; कारण त्यांतील उपभोगाचा लोप हेतुपुरस्सर करून घेतलेला नसून स्वसंतोषाभावाचा होय.

ही या वरील सिद्धांताची साधी व थोडी समजूत डाक्टर चामर्स या अर्थशास्त्रयापूर्वी होऊन गेलेल्या अर्थशास्त्रयांनीं दिलेली नाहीं. डाक्टर चामर्स यापासून ही समजूत प्रथमतः मिळाली. कोणचीही गोष्ट कितीही सोपी असली तरी एकदा मन घोटाळलें किंवा तिची गोम लक्षांत आली नाहीं तर ती सोपीसी न वाटतां गहनच वाटते, नाहीं तर एकदम अतिशय सोपी नव्हे; पण क्षुल्लकही वाटूं लागत्ये. खरोखर पहातां ज्या कशापासून संपत्ति उत्पन्न होत्ये तें सर्व ह्मणजे उत्पादक साधनें हीं शाबूत राहून फक्त कांहीं वेळपर्यंत लागणारे किंवा पुरणारे उपभोगाचे पदार्थच मात्र शत्रु आल्यानें किंवा कालचक्र फिरल्यानें लुटून नेले गेले किंवा नष्ट झाले तर थोड्या वेळांतच देश सांवरून पूर्वदशा प्राप्त होईल यांत नवल नाहीं. सर्व अगदीं उघड आहे. पण संपत्त्युत्पत्तिसाधनांचा विसर पडला तर मात्र घोटाळा; येऱ्हवीं नाहीं.

८. हाच विचारक्रम पुढें चालवून यासीं अतिनिकट संबंधाचा जो दुसरा एक विषय आहे त्याविषयीं कांहीं उपयुक्त तर्क वर सांगितलेल्या ग्रंथकारानें बांधले अहेत. तो विषय युद्धकामाकरितां किंवा आणखी कांहीं अनुत्पादक व्ययाकरितां सरकार 'लोन' ह्मणून जो पैसा उसना घेतें तो पैसा—हा होय. जर हीं 'लोनें' कराच्या पैशाप्रमाणें दिलीं जातीं तर तीं प्रार्शींतून दिलीं जातीं व खर्चाकडे अधिकाधिक काटकसर होऊन सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं तरी भरून आलीं असतीं. परंतु करांच्या बदलीं 'लोनें' घेतात व तीं भांडवलांतून दिलीं जातात ह्मणून, जे सिद्धांत आपण स्थापित केले अहेत त्या सिद्धांतांप्रमाणें या 'लोनांनीं' देश भिकारी खचितच व्हावयाचा. असें जरी आपण ह्मणतों तरी ज्या ज्या कालीं अशा प्रकारचा अनुत्पादक व्यय पराकाष्ठेचा मोठा झालेला आहे तो तो काल दिसण्यांत फार भरभराटीचा होता असें सदैव पहाण्यांत आलें आहे. देशांतील संपत्ति व तिच्या उत्पत्तीचीं साधनें हीं कमीं होण्याच्या बदलीं तीं तो अनुत्पादक व्यय चाललेला असतो त्या कालांत मोठ्या झपाट्यानें वाढतात व तो व्यय होऊन गेल्यावर त्यांचा विस्तार बहुतच पसरतो, याचीं सर्व चिन्हें देशांत दिसण्यांत येतात. नुकतीच युरोपखंडावर जी बहुत दिवस लढाई चाललेली होती ती चालत असतांना ग्रेट ब्रिटन देशाची निखालस असीच स्थिति झाली होती व तेणेंकरून निघालेले व कांहीं कालपर्यंत खरे वाटलेले आधार ना विधार असे अर्थशास्त्रयांचे एकंदर तर्क येथें सांगण्यास स्थलविस्तार बराच पाहिजे. उत्पादक व्ययास खालीं पाडून अनुत्पादक व्ययाची प्रतिष्ठा वाढवावी हाच त्या सर्व तर्कांचा

झोंक. आपण असें समजूं या कीं जेवढी रकम सरकारानें उसनी घेऊन खर्चून टाकिली ती सर्व रकम उसनी देणारानें प्रथमतः उत्पादक कामांत घातलेली असून त्या कामांतून काढून दिली. असें झाल्यानें त्या रकमेइतकेंच देशाचें भांडवल सालमजकुरीं कमी होईल; परंतु ती कामांतून काढलेली रकम अतिशय मोठी नसेल तर पेस्तर सालीं नेहमींइतकें देशभांडवल मोठें न होण्याचें कारण या कल्पिलेल्या प्रकाराचे स्वरूपावरून दिसत नाहीं. हत्यारें, यंत्र, साहित्यें व कारखान्यांचीं घरें हीं देशभांडवलाचा भाग होत; पण यांतून 'लोन' घेतलें जाण्याची शक्यता नाहीं. ह्मणून भांडवलाचा जो अंश श्रमकर्त्यांना ह्मणजे मजुरांना मजुरी देण्याकडे लावलेला असेल त्यांतूनच सर्व 'लोन' दिलें जाईल. व येणेंकरून मजुरांनां नुकसान सोसावें लागणार. परंतु येथेंही जर कोणा एकाही मजुरास भुकें मरावें लागणार नाहीं तर किंवा दिलेल्या 'लोनाच्या' मानानें त्यांच्या मजुरींत कमतरपणा होऊनही त्यांचें चालेल तर किंवा ते मजूर वत्यांची अनिवार्य विपत्ति, या दोघांमध्यें जर धर्मदेवता मध्यस्थीस आली तर गत सालापेक्षां पेस्तर सालीं त्यांच्या श्रमानें कमी संपत्ति उत्पन्न होण्यास कारण नाहीं. नेहमीं उत्पन्न करितात तितकेंच उत्पन्न जर त्या मजुरांनीं केलें तर लोनाच्या कारणानें एकंदर मजुरांनां जितके लक्ष कमती पोंहचले असतील तितके लक्ष त्यांच्या कारखानदारांना मिळायाचे. असें झाल्यानें, 'लोनाच्या' योगें मोडलेलें, देशभांडवल बोलतां बोलतां भरून येतें, पण तें कामकरी लोकांच्या अन्नवस्त्रांचे हाल होऊन व हमेष त्यांची विपत्ति होऊनच भरून येतें. येथें असे अनुत्पादक व्ययाचे समय हे जरी इतर सर्व गोष्टी अत्यंत प्रतिकूल असल्या तरीही, लोकसमजाप्रमाणें ज्या लोकांची भरभराट झाली ह्मणजे तीच देशाची भरभराट होय, त्या लोकांच्या सहज फायद्याचे समय होतात याचें प्रशस्त कारण सांपडतें.

(पुढें चालेल)

देशी वैद्यशास्त्र.

सांप्रतकाळीं आपलें वैद्यशास्त्र फारच निकृष्टावस्थेस पोंचलें आहे, याचें मुख्य कारण पाहूं जातां असें दृष्टीस पडतें कीं, त्याचा नीट यथाशास्त्र अभ्यास प्रायः कोणीच करीत नाहीं. साधारणतः सुंठ, गोखरू, गुळवेल इत्यादि कित्येक औषधी सरासरी संग्रहीं ठेवून वैद्यकीची प्रतिष्ठा मिळविणारेच फार. तेव्हां अशा स्थितीनें वैद्यकाची सुधारणा ती काय होणार? सांप्रत फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका इत्यादि देशांमध्यें वैद्यकाची सुधारणा करण्याची राज्यकर्त्यांना इतकी आस्था असते, कीं कोट्यावधि रूपयांचा व्यय करून त्यांणीं मोठमोठ्या वैद्यशाळा स्थापून, त्यांमध्यें मोठमोठे शोधक वैद्य व रसायनज्ञ पंडित उत्तम आश्रय देऊन ठेविले आहेत, व त्यांजकडून शेकडो नवीन वैद्य प्रतिवर्षीं तयार करवीत आहेत. आपल्या देशीं मुंबई, कलकत्ता, मद्रास, इत्यादि स्थळीं मुख्यत्वें राजाश्रयामुळेंच ग्रांट मेडिकल कालेजासारख्या कित्येक वैद्यशाळा आजकाल चालू असून, तेथें कित्येक आमचे देशी लोक युरोपियन वैद्यकामध्यें बरेच प्रवीण होत आहेत. युरोप आणि अमेरिका एथें वैद्यशास्त्राचा शोध करण्याकरितां कि-

ऐक स्वतंत्र मंडळ्या असून, जे जे नवीन नवीन शोध त्यांना लागतील ते ते पुस्तकद्वारा त्या नित्य प्रसिद्ध करीत असतात. एथें मुंबईमध्येंही या प्रकारचें एक वार्षिक पुस्तक निघत असतें, व त्यामध्यें पुष्कळ उपयोगी गोष्टींची माहिती दिलेली असते. परंतु देशी वैद्यकाच्या प्रारब्धीं या गोष्टी कधीं पुढें येतील तर कोण जाणें, तूर्त तर अशा प्रकारचा कांहीं संभव दिसत नाहीं. आधीं राजाश्रय नाहीं, आणि त्यांत आणखीं जे कोणी वैद्य म्हणून म्हणवितात, ते आपापलीं औषधें, आपापल्या मतीप्रमाणें मात्र कामीं लावितात; त्यामध्यें दुसऱ्याची संमति घेणें, किंवा आपले विचार दुसऱ्यास कळविणें या गोष्टींचा त्यांचा मुळींच प्रघात नाहीं, तेव्हां अशानें वैद्यकाची सुधारणा न झाली म्हणून आश्चर्य नाहीं. यामुळें वैद्यक म्हणजे आहे काय? त्याचा अभ्यास करण्यास काय काय लागतें, किती काळ लागतो, व त्याविषयीं कांहीं ग्रंथ आहेत किंवा नाहींत, हें सुद्धां आपल्या वैद्य म्हणविणाऱ्या बहुतेक लोकांना मुळींच ठाऊक नसतें. कित्येक फक्त नाडीपरीक्षेवरूनच रोग दूर करण्याची प्रतिष्ठा सांगतात. कित्येक फक्त मूत्रपरीक्षेवरूनच रोग दूर करण्याची प्रतिज्ञा सांगतात. परंतु त्यांचीं तीं कृत्यें बहुशः अटकळीचीं असतात, इतकाच त्यांमध्यें अर्थ, दुसरें कांहीं विशेष नाहीं. कित्येकांपाशीं अशा कांहीं चमत्कारिक औषधी आहेत हें खरें कीं एवढ्याशा एकाद्या मुळीपासून ते मोठे मोठे रोग बरे करितात, परंतु त्या मुळीमध्यें तो गुण कोणच्या प्रकारें आला, तिचे धर्म काय, तिचे घटकावयव काय, व तिचीं दुसरीं प्रतिनिधि औषधें कोणचीं; हें कांहीं त्यांच्यानें सांगवत नाहीं. तेव्हां हे तरी कांहीं खऱ्या वैद्याचें लक्षण नव्हे, आणि तशांत अशीं रामबाण औषधें जाणणारे तरी पुष्कळ वैद्य आहेत असेंही नाहीं, कोठें हजारांमध्यें एकादा, व तोही आपलें औषध दुसऱ्याला कळविणार नाहीं, तेव्हां त्याचा उपयोग काय? आपलीं औषधें ते लोक दुसऱ्यास कळवीत नाहींत याविषयीं त्यांस मोठासा दोष देववत नाहीं, कारण कित्येक औषधी अगदी क्षुद्र दिसत असून त्यांपासून मोठमोठीं कामें होत असल्यामुळें जर तीं बाहेर फोडलीं तर आपल्या पोटावर पाय येतील असें त्यांना वाटत असतें. आणि दुसरें कारण असें कीं औषधीचें नांव समजल्यानें त्याचा गुण उणा होतो असें त्यांना परंपरागत समजलें असतें. वास्तविक दृष्ट्या हें त्यांचें मत जरी सर्वांशीं खरें नाहीं तथापि इतकी गोष्ट खचित आहे कीं क्षुद्र दिसणाऱ्या औषधांवर बहुधा मनुष्याची श्रद्धा बसत नाहीं; आणि श्रद्धा असल्यानें जसा त्याचा लवकर गुण येईल तसा नसल्यानें येणार नाहीं, ही गोष्टही वैद्यशास्त्रसंमत आहे. वर जीं एक दोन दूषणें आमच्या देशी वैद्यांस लाविलीं त्यांपासून युरोपियन वैद्यही मुक्त नाहींत. नवीन कांहीं औषधी कोणी सिद्ध केल्यास ती दुसऱ्यास करतां येऊं नये म्हणून तिचे घटकावयव गुप्त ठेवणें, व कदाचित् ते समजल्यास त्याप्रमाणें दुसऱ्यानें करूं नये म्हणून त्याची सरकारांत नोंदणी करणें या जशा गोष्टी, तशाच त्या होत. भेद इतकाच कीं, जरी हे लोक आपलें औषध प्रसिद्ध करीत नाहींत, तरी पाहिजे त्याला त्यांकडून पाहिजेल तितकें तें विकत मिळतें व आपल्या घरीं तरी त्यानें त्याची कृति वगैरे लिहून ठेविली असते. तसा

प्रकार देशी वैद्यांचा नाहीं. कदाचित् कोणी कांहीं लिहून ठेविलें असल्यास छापण्याच्या वगैरे युक्ति नसल्यामुळें जेथच्या तेथें ते लेख नष्ट होऊन जात असत. कोणतेंही कारण असो, आपल्या देशांतील हरएक विद्या ज्या कारणानें नष्ट झाल्या, त्याच कारणानें वैद्यकही मोडलें, यांत संशय नाहीं. आलिकडे कित्येकांनीं आपलें देशी वैद्यक उदयास आणावें ह्मणून कांहीं कांहीं प्रयत्न चालविले आहेत. परंतु त्या लोकांमध्यें निःस्पृहता आणि उत्साह जितका असावा, तितका नसल्यामुळें त्यांचा उद्योग कितपत सिद्धीस जाईल हें एकाएकीं सांगतां येत नाहीं. तथापि त्यांचा उद्योग स्तुत्य आहे, तो सिद्धीस जाईल तर फार चांगलें होईल. या कामीं युरोपियन वैद्यक जाणणाऱ्या देशी वैद्यांनींही होईल तितकी मदत केली पाहिजे. पण हीच गोष्ट मात्र असंभाव्य दिसते. युरोपियन वैद्य हे देशी वैद्यांना "क्वाक्" ह्मणजे केवळ नांवाचे अर्थात् अडाणी वैद्य असें नांव देतात. देशी वैद्यांना पुसलें तर ते ह्मणतात कीं, आह्मीं कसेही असलों तरी जी कांहीं हरडा अवळकाठी आह्मीं देतों ती आमच्या परीक्षेनें झाडाची काढून आणून आह्मी स्वतः तयार करून देऊं शकतों, पण मोठ्या विद्वत्तेची बढाई मिरविणारे जे डाक्टर (युरोपियन वैद्य) त्यांना 'क्विनेन' किंवा 'नैट्रिक आसिड्' थोडेसें तयार करून द्या ह्मटलें तर, त्यामध्यें अमुक अमुक तत्वांचे अमुक "सममूल्यांश" आहेत. ह्मणून ते पुस्तकी उत्तर देतील, पण पदार्थ तयार करून देतां कांहीं येत नाहीं. तेव्हां दुसऱ्यांना 'क्वाक्' हें विशेषण लावणें सोपें, पण स्वतः आपणही त्यांमध्येंच, याचें त्यांना भान नाहीं.— विचारानें पाहतां या बोलण्यामध्यें पुष्कळ खरेपणा आहे! कारण येवढा समृद्ध आपला देश असतां, किती दिवसपर्यंत असें परदेशीय औषधींकरितां अडून राहायाचें? यावरून सांगायाचें तात्पर्य इतकेंच कीं देशी वैद्य आणि युरोपियन वैद्य यांमध्यें जो हा वेवनाव आहे तो कांहीं चांगला नाहीं. परस्परानीं एकमेकांचीं उणीं काढीत न बसतां जें कांहीं चांगलें आढळेल त्याचा उभयतांहीं प्रांजल अंतःकरणानें स्वीकार केला पाहिजे, आणि जें कांहीं अशुद्ध असेल तें शुद्ध केलें पाहिजे, तरच सर्व गोष्टी सोईनें तडीस जातील.

याकरितां पहिल्यानें उभयतांनीं परस्परांचीं स्वरूपें नीट जाणलीं पाहिजेत.

इंग्रजी भाषेमध्यें वैद्यकाचे ग्रंथ पुष्कळ आहेत, आणि त्यांतून कांहीं ग्रंथांचें महाराष्ट्र भाषांतरही प्रसिद्ध झालें आहे; परंतु त्यांतील भाषा वगैरे इंग्रजीच्या धरतीची असून दुर्बोध, यामुळें त्यांचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. तथापि किंचित् ज्यास्त लक्ष्य देऊन वाचणारांस, त्यांपासून त्या त्या विषयांचें पुष्कळ ज्ञान होण्याचा चांगला संभव आहे. परंतु देशी वैद्यकाचे जे ग्रंथ आहेत ते बहुतेक संस्कृत भाषेचे असून त्यांत आणखी पुस्तकें मिळण्याची अडचण. ईश्वरकृपेनें मुद्रायंत्रें आपल्या देशीं सुरू झाल्यापासून आलिकडे त्यांतील कांहीं मुख्य मुख्य ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत. वैद्यशास्त्राचे ग्रंथ सुमारें साडेतीनशें आहेत, असें ऐकण्यांत येतें. तथापि त्यांतील सर्वच ह्मणजे उपलब्ध आणि उपयोगी असतील असें वाटत नाहीं. फार प्राचीन ग्रंथ ह्मटले ह्मणजे आत्रेय, भारद्वाज, चरक, सुश्रुत, आणि वाग्भट हे होत. यांमध्यें त्या त्या वेळचीं

जीं वैद्यांचीं मतें होतीं त्यांचाच समावेश असायाचा हें उघड आहे. ह्मणून सांप्रतच्या काळीं तीं सर्वच खरीं ठरतील असेंही नाहीं. तथापि कोठें कोठें भेद पडतो व तीं कोठें कोठें जमतात हें पाहणें फार उपयोगी आहे. त्या सर्व ग्रंथांचीं भाषांतरें होतील तर फार चांगलें होईल; तथापि त्यांच्या अभावीं त्यांविषयीं जितक्यास तितकी थोडथोडी माहिती मिळेल, तरी फार चांगलें. भाषांतरें वाचण्यासही यापासून पुष्कळ साह्य होईल. ह्मणून प्रथमतः सुश्रुताविषयीं कांहीं थोडी माहिती देण्याचा यत्न करूं. सुश्रुतापेक्षांही पुरातन ग्रंथ नाहींत असें नाहीं; तथापि मुख्यत्वें शारीरज्ञानाच्या दृष्टीनें सुश्रुताचेंच प्राधान्य धरलें असल्यामुळें त्याची योग्यता तितकी विशेष, ह्मणून पहिल्यानें यानकडेसच लक्ष देऊं.

याचें नांव जरी 'सुश्रुत' आहे तथापि हा ग्रंथ सुश्रुतानें स्वतः केला असें नाहीं. 'धन्वंतरि' ह्मणून एक मोठा वैद्य होता, त्यानें सांगितल्यावरून त्याचा शिष्य 'सुश्रुत' यानें हा लिहिला आहे. याविषयीं धन्वंतरि स्वतः ह्मणतो—'प्रथमतः ब्रह्मदेवानें दक्षप्रजापतीस आयुर्वेद शिकविला, दक्षानें अश्विनीकुमारांस, त्यांणीं इंद्रास, इंद्रानें मला, आणि मी आतां प्रजेच्या हिताकरितां तुह्मास शिकवितों'.

समुद्रमंथनापासून जीं चौदा रत्नें निघालीं त्यांमध्यें धन्वंतरि हा अमृतकुंभ हातांत घेऊन आला. त्याच धन्वंतरीचा हा अवतार मानिला होता, असें

येनामृतमपांमध्यादुद्धृतं पूर्वजन्मनि ।
यतोऽमरत्वं संप्राप्तास्त्रिदशास्त्रिदिवेश्वरात्॥

इत्यादि सुश्रुतलेखांवरून समजतें. धन्वंतरीचें दुसरें नांव दिवोदास. हा काशीपुरीचा राजा असून ऋषि असल्यामुळें याला राजर्षि हें विशेषण होतें. याला अमरवरही ह्मणत. याचे शिष्य पुष्कळ होते. त्यांत सुश्रुतप्रमुख आठ पट्टशिष्य. सुश्रुत हा विश्वामित्र नामक ऋषीचा पुत्र. भगवान् धन्वंतरि आश्रमामध्यें ऋषिगणपरिवृत बसला असतां, सुश्रुतादि शिष्य त्याची प्रार्थना करून ह्मणाले—"भगवन्! शारीर, मानस, आगंतु आणि स्वाभाविक, हे जे चार प्रकारचे व्याधि, त्यांहीं नाना प्रकारें पीडलेले, शक्ति असून अनाथवत् वागणारे, आणि आक्रोश करणारे मानव पाहून आमच्या अंतःकरणास मोठें दुःख होतें. याकरितां येथें आपल्या आश्रमांमध्यें जो आयुर्वेदाचा उपदेश होत आहे तो सुखप्राप्तीची इच्छा धरणाऱ्या त्या जनांच्या रोगोपशमनार्थ, आणि आमची प्राणयात्रा ही नीट चालावी एतदर्थ ऐकण्याची आमची इच्छा आहे."

हें ऐकून धन्वंतरीनें त्यांस उपदेश केला. तो ह्मणाला कीं, पहिल्यानें ब्रह्मयानें आयुर्वेद रचिला त्याचे अध्याय एक सहस्र आणि त्यांत श्लोक एक लक्ष होते. परंतु मनुष्याचें अल्पायुष आणि अल्पबुद्धित्व जाणून पुनः त्याचे आठ भाग केले. शल्य, शालाक्य, कायचिकित्सा, भूतविद्या, कौमारभृत्य, अगदतंत्र, रसायनतंत्र आणि वाजीकरणतंत्र, हे आठ भाग. नंतर सर्व शिष्यांनीं विनंती केली कीं आह्मां सर्वांचें एकमत ऐकून सुश्रुत आपणांस प्रश्न करील आणि आपण त्यास सांगावें, ह्मणजे गोंधळ न होतां आह्मां सर्वांस समजण्यास बरें पडेल. तें ह्मणणें मान्य करून धन्वंतरीनें ह्मटलें, "वत्सा सुश्रुता, आयुर्वेदाचें प्रयोजन दोन

प्रकारचें आहे; ह्मणजे ज्यांना व्याधि झाला असेल त्यांना त्या व्याधीपासून मुक्त करावें, आणि व्याधि नसेल त्याला व्याधि न होऊं द्यावा.'' असो; जो धन्वंतरीनें आयुर्वेद सांगितला त्याचे एकशेशायशी अध्याय आहेत. सर्व ग्रंथाचे—सूत्रस्थान, निदान, शारीर, चिकित्सित, कल्प, आणि उत्तर तन्त्र असे सहा भाग केले आहेत. त्यांकडे चांगलें लक्ष देण्यापूर्वी वैद्यशास्त्राविषयीं आणि वैद्यांविषयीं धन्वंतरीचे विचार कसकसे होते, हें पाहूं.

स्वयंभुवा प्रोक्तमिदं सनातनं
पठेद्धि यः काशिपतिप्रकाशितम् ।
स पुण्यकर्मा भुवि पूजितो नृपै-
रसुक्षये शक्रसलोकतां व्रजेत् ॥

'ब्रह्म्यानें सांगितलेलें आणि काशिपतीनें प्रकाशित केलेलें हें सनातन शास्त्र जो पठण करील, तो पुण्यकर्मा पृथ्वीवर असतां राजांना पूज्य होईल, आणि प्राणक्षयानंतर शक्रसलोकतेप्रत पावेल.'

यावरून वैद्यशास्त्राची योग्यता केवढी आहे हें उघड दिसेल. वैद्यशास्त्राचा उपदेश ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या सर्व जातींस होण्यास धन्वंतरीनें कांहीं अडचण ठेविली नाहीं. वैद्यशास्त्राचा उपदेश होण्यास धर्मशास्त्राच्या उपदेशाप्रमाणें उपनयन करण्याचे विधि, अग्निपूजन इत्यादि संस्कार, उपदेश, पठण करण्याच्या रीति, अनध्याय इत्यादि प्रकार स्पष्ट सांगितले असल्यामुळें वैद्यशास्त्राचें महत्व सहज लक्षांत येतें. गुरूनें शिष्याला अग्निसाक्षिक जो उपदेश करावयाचा तो कसा उत्कृष्ट आहे. पहा—

कामक्रोधलोभमोहमानाहंकारेर्ष्यापारुष्यपैशून्यानृतालस्ययशस्यानि हित्वा नीचनखरोम्णा शुचिना काषायवाससा सत्यव्रतब्रह्मचर्याभिवादनतत्परेणावश्यं भवितव्यं । मदनुमतस्थानगमनशयनासनभोजनाध्ययनपरेण भूत्वा मत्प्रियहितेषु वर्तितव्यं । अतोऽन्यथा ते वर्तमानस्याधर्मो भवत्यफलाच विद्या न च प्राकाश्यं प्राप्नोति ॥

अर्थ—काम, क्रोध, लोभ, मोह, मान, अहंकार, ईर्ष्या, कठोरता, चाहडी, आळस हीं सर्व अयशस्कर आहेत, याकरितां त्यांचा त्याग करावा. नखें आणि श्मश्रु लांब वाढवूं नयेत. अंगावर स्वच्छ काषाय वस्त्र धारण करावें. सत्यव्रत असावें. ब्रह्मचर्यानें रहावें. अभिवंदन (नमस्कार रामराम इ०) करण्यामध्यें तत्पर असावें. या सर्व गोष्टी अवश्य कराव्या. मी ज्या ज्या प्रकारें ज्या ज्या स्थळीं राहण्याला, जाण्याला, निजण्याला, बसण्याला, जेवण्याला, अध्ययन करण्याला सांगेन त्या त्या प्रमाणें वर्तून, मला जें जें आवडेल तें तें करावें. परंतु याशिवाय अन्यथा वर्तन केल्यास तुला अधर्म घडेल, विद्या निष्फळ होईल, व ती उदयास येणार नाहीं.

शिष्यालाच केवळ उपदेश करून स्ववर्तनास पाहिजे तसा मोकळेपणा ठेविला असेही नाहीं. स्वतः गुरूनें घेण्याची शपथ—

अहं वा त्वयि सम्यग्वर्तमाने यद्यन्यथादर्शी स्यामेनोभाग्भवेयमफलविद्यश्च ।

'तूं चांगल्या रीतीनें वर्तन करीत असतां जर मी तुझ्याशीं अयोग्य वर्तणूक करीन, तर त्या पापाचा मी अधिकारी, आणि माझी सर्व विद्या निष्फळ होऊन जाईल.'

द्विज, गुरु, दरिद्र, मित्र, संन्यासी, शरण आलेला, साधु, अनाथ, पाहुणा, यांतून कोणीही आल्यास त्याला पदरचें औषध देऊन त्याचा रोग दूर करावा; ह्मणजे विद्या प्रकाश पावते, आणि मित्र, यश, धर्म, अर्थ

आणि काम हे प्राप्त होतात. यांजकडे आलीकडचे वैद्य लक्ष देतील तर चांगलें होईल. अरण्यांतील फासेपारधी, भ्रष्ट, आणि पापी, यांना मात्र औषध देऊं नये, असें ह्मटलें आहे, याचें कारण दुष्टांशीं कोणत्याही प्रकारें संपर्क ठेवूं नये हें असावें, असें दिसतें.

शास्त्र आणि कर्म यांच्या अभ्यासाविषयीं धन्वंतरि ह्मणतो.

एतदवश्यमध्येयमधीत्य च कर्माप्यवश्यमुपासितव्यमुभयज्ञो हि भिषग्राजार्हो भवति ॥

'हें जें मी शास्त्र सांगितलें आहे याचें अवश्य अध्ययन केलेंच पाहिजे. अध्ययन करून त्या त्या कृतिहि अवश्य केल्याच पाहिजेत. कारण शास्त्र आणि कर्म या दोहोंमध्येंही प्रवीण जो वैद्य तोच राजाला मान्य होतो.

यस्तु केवलशास्त्रज्ञः कर्मस्वपरिनिष्ठितः ।
स मुह्यत्यातुरं प्राप्य प्राप्य भीरुरिवाहवं ॥
यस्तु कर्मसु निष्णातो धाट्यर्च्छास्त्रबहिष्कृतः ।
स सत्सु पूजां नाप्नोति वधं चार्हति राजतः ॥
उभावेतावनिपुणावसमर्थौ स्वकर्मणि ।
अर्धवैद्यरावेतावेकपक्षाविव द्विजौ ॥
ओषध्यो ऽमृतकल्पास्तु शस्त्राशनिविषोपमाः ।
भवन्त्यज्ञैरुपहतास्तस्मादेतौ विवर्जयेत् ॥
छेद्यादिष्वनभिज्ञो यः स्नेहादिषुच कर्मसु ।
स निहन्ति जनं लोभात् कुवैद्यो नृपदोषतः ॥
यस्तूभयज्ञो मतिमान् स समर्थो ऽर्थसाधने ।
आहवे कर्मनिर्वोढुं द्विचक्रः स्यद्रथोयथा ॥

'जो केवळ शास्त्र मात्र जाणतो, पण (शस्त्र) क्रिया ज्याला येत नाहीं, तो रोग्यापाशीं गेला ह्मणजे, जसा एकादा भित्रा मनुष्य लढाईला गेल्यास मोह पावतो तसाच मोह पावतो. तसेंच जो मनुष्य शास्त्रज्ञानशून्य असून धिटाईनें कर्म करूं लागतो, तो सज्जनांपासून मान पावत नाहीं. अशा धीट मनुष्याचा राजानें वधच करणें योग्य! केवळ शास्त्रज्ञ आणि केवळ कर्मज्ञ हे दोघेही अनिपुण, आणि आपल्या कामामध्यें असमर्थ होत. हे दोघेही अर्धज्ञानी, आणि एका पंखाच्या पांखराप्रमाणें होत. अमृतासारख्याही औषधी अज्ञजनाच्या हातीं गेल्या असतां, शस्त्र, अशनि, आणि विष यांप्रमाणें दुःसह होतात. याकरितां हे दोघेही अर्धवट वैद्य अगदीं वर्ज्य करावे. शस्त्रकर्म, आणि स्नेहादि (तैलादि) कर्म यांमध्यें जो अनभिज्ञ कुवैद्य, तो द्रव्यलोभानें जनांचे प्राणघात करितो. याकरितां त्याला कर्म करूं देणें हा राजाचा अपराध आहे. जो शास्त्र आणि कर्म या दोहोंमध्येंही निष्णात असून मतिमान् तोच अर्थसाधनाला समर्थ होय. जसा दोन चक्रांचा रथ युद्धामध्यें काम चालविण्यास समर्थ होतो.

बरें, शास्त्र पढलें परंतु अर्थ समजत नाहीं तर तें गाढवाच्या पाठीवर जसा चंदनाचा भार त्याप्रमाणें परिश्रमकारक होतें.

यथा खरश्चन्दनभारवाही भारस्य वेत्ता न तु चन्दनस्य
एवं हि शास्त्राणि बहून्यधीत्य चार्थेषु मूढाः खरवद्वहंति।

'गाढवाच्या पाठीवर चंदनाचें ओझें लादलें असतां त्याला तें ओझें मात्र समजलें, परंतु चंदनाचें कांहीं ज्ञान झालें नाहीं; तद्वतच शास्त्रें पुष्कळ ह्मटलीं परंतु अर्थ समजत नाहीं, तर त्याच्या पाठीवर गाढवाच्या ओझ्याप्रमाणेंच ओझें आहे, दुसरें कांहीं नाहीं. दुसरें, चांगल्या ज्ञात्याच्या हातूनही लहानशी चूक झाली, तर ती त्याला सुधरणें कठीण पडतें, मग अज्ञानाचा पाड तो काय? याकरितां यांतील प्रत्येक शब्द, चरण, श्लोकार्ध, श्लोक, यांचा स्पष्ट अर्थ सांगावा, आणि शिष्यानें नीट ध्यानांत घ्यावा.

अन्य शास्त्राचा जेथें यांत संबंध येईल, तेथें आपल्याच गर्वांत न राहतां, त्या त्या विषयामध्यें ज्याची चांगली प्रवीणता असेल, त्यांजकडूनच तो समजावून घ्यावा; कारण एकाच शास्त्रामध्यें सर्व शास्त्रांचा अवरोध करूं ह्मटल्यास चालणार नाहीं.

एकं शास्त्रमधीयानो न विद्याच्छास्त्रनिश्चयं ।
तस्माद्बहुश्रुतः शास्त्रं विजानीयाच्चिकित्सकः ॥

'एकच शास्त्राचा अभ्यास करणारास त्यांतील सिद्धांत फार चांगले समजणार नाहींत याकरितां वैद्य बहुश्रुत असावा, ह्मणजे त्यास शास्त्रज्ञान चांगलें होईल.' यावरून पाहतां आलिकडे वैय्याकरण नैय्यायिकाचा तिरस्कार करितो, आणि नैय्यायिक वेदांत्याचा तिरस्कार करितो, अशी जी निंद्य वर्तणूक दृष्टीस पडते, तिजपासून धन्वंतरीचें मत किती वेगळें होतें हें सहज लक्षांत येईल. सारांश—

शास्त्रं गुरुमुखोद्गीर्णमादायोपास्य चासकृत् ।
यः कर्म कुरुते वैद्यः स वैद्योऽन्ये तु तस्कराः ॥

'गुरुमुखापासून शास्त्र ऐकून, त्याची पुनः पुनः उजळणी करून जो वैद्य क्रिया करितो, तोंच खरा वैद्य, इतर वैद्य हे तस्कर ह्मणजे चोर आहेत.'

आपल्या देशी वैद्यकामध्यें शस्त्रकर्म नाहीं असें बहुतेक समजतात; परंतु धन्वंतरीनें तर शस्त्रकर्माचेंच प्राधान्य मानिलें आहे, आणि त्याकरितां शस्त्रकर्मच त्याणें सर्वांच्या पूर्वी सांगितलें आहे. शस्त्रक्रियेच्या संबंधानें निरनिराळीं आठ प्रकारचीं शस्त्रकर्में, त्यांचीं उपकरणें, शस्त्रव्रण, शस्त्रवैद्यलक्षण, शस्त्रें, यंत्रें इत्यादि अनेक गोष्टींचें वर्णन केलें आहे तें संपूर्ण केवळ पुस्तकावरूनच समजणें कठीण, तथापि त्यांचें थोडेसें दिक्प्रदर्शन येथें करूं.—

शस्त्रकर्में आठ, तीं येणेंप्रमाणें— छेद्य, भेद्य, लेख्य, वेध्य, एष्य, आहार्य, विस्राव्य; आणि सीव्य. यांचें वर्णनही सांगितलें आहे, परंतु तें एथें घेतां येत नाहीं.

आयत, विशाल, सम आणि सुविभक्त असे चार व्रणभेद सांगितले आहेत.

शस्त्रवैद्याचें लक्षण—

शौर्यमाशुक्रिया शस्त्रतैक्ष्ण्यमस्वेदवेपथू ।
असंमोहश्च वैद्यस्य शस्त्रकर्मणि शस्यते ॥

'शस्त्रकर्म करीत असतां वैद्य निर्भय असावा, त्याला घर्म किंवा कंप सुटूं नये, आणि त्यानें गोंधळांत पडूं नये, त्याचीं शस्त्रें चांगल्या धारेचीं असावीं.'

शस्त्रें वीस सांगितलीं आहेत, व त्यांचे त्यांचे आकार आणि उपयोगही विस्तारानें सांगितले आहेत. शस्त्रांचीं नांवें मात्र येथें सांगतों—मंडलाग्र, करपत्र, वृद्धिपत्र, नखशस्त्र, मुद्रिका, उत्पलपत्र, अर्धधार, सूची, कुशपत्र, अटीमुख, शरारिमुख, अंतर्मुख, त्रिकूर्चक, कुठारिका, व्रीहिमुख, आरा, वेतसपत्र, बडिश, दंतशंकु, आणि एषण्य.

यंत्रें ह्मणजे चिमटे किंवा तशासारखीं दुसरीं आवतें, एकशें एक सांगितलीं आहेत. त्यांमध्यें स्वस्तिक यंत्रें २४, संदंशयंत्रें २, तालयंत्रें २, नाडीयंत्रें २०, शलाकायंत्रें २८, आणि उपयंत्रें २५. यासर्वांचे आकार आणि उपयोगही सांगितले आहेत.

याशिवाय यंत्रकर्में ह्मणजे तीं कसकशीं धरावीं यांचे प्रकार २४, यंत्रदोष १२, शस्त्रदोष ८ सांगितले आहेत. शस्त्रांच्या धारा कशा असाव्या, कोणकोणत्या शस्त्रास कोणकोणत्या रीतीनें पाणी द्यावें, त्यांना धार कशी द्यावी आणि ती स्थिर कशी करावी, शस्त्राच्या अभावीं कोणकोणते प-

दार्थ योजावे, हें सर्व विस्तारानें सांगितलें आहे.

शस्त्रगुण सांगितले आहेत ते असे—तीं धरण्यास चांगलीं, चांगल्या तिख्याचीं, चांगल्या धारेचीं, दिसण्याला सुबक, त्यांचीं अग्रें चांगलीं, याप्रमाणें असून तीं दिसण्याला भयंकर नसावीं. तीं चांगल्या जाणत्या लोहाराकडून सिद्ध करवावीं. अशा प्रकारचीं शस्त्रें घेऊन आरंभापासूनच शस्त्रक्रिया करण्याचा परिचय ठेवावा, ह्मणजे आपल्या उद्योगामध्यें वैद्यास चांगली सिद्धि प्राप्त होईल.

कित्येक ह्मणतात कीं प्रेतें कापण्याची प्राचीनकाळीं चाल नव्हती, परंतु हें ह्मणणें अगदीं निराधार होय; कारण शिष्यास शस्त्रक्रिया शिकवितांना निरनिराळ्या प्रसंगीं मनुष्याचें आणि पशूचें मांस, शिरा, अंगें, प्रत्यंगें, हे अवयव, तसेच निरनिराळे दुसरे कित्येक पदार्थ घेऊन त्यांवर क्रिया करून दाखवावी, असें धन्वंतरीनें स्पष्ट सांगितलें आहे. शारीरज्ञानाच्या वेळीं मात्र, चांगल्या मनुष्याचें प्रेत घेऊन तें दर्भ, लव्हाळे, गवत, इत्यादि पदार्थांत घट्ट बांधून करंड्यांत घालून अल्प ओघाच्या पाण्यामध्यें सात दिवस ठेवून नंतर, केसाच्या किंवा दुसऱ्या कशाच्याही चांगल्या कुंच्यानें चोळून त्याच्या त्वचा, शिरा, धमन्या, मांस अस्थि इत्यादि अवयव नीट समजून घ्यावे, असें सांगितलें आहे. तथापि यामध्येंही पहिल्यानें पोट चिरून त्यांतील आंतडीं काढून टाकावीं असा स्पष्ट उल्लेख आहे. शारीरज्ञानाच्या वेळीं कापण्यापेक्षां अशा रीतीनेंच सर्व अवयव पहावे, हें चांगलें नाहीं असें कोण ह्मणेल? अनुशस्त्रें ह्मणून आणखी सांगितलीं आहेत, त्यांत त्वक्सार, स्फाटिक, काच, कुरुविंद, जलौका, अग्नि, क्षार इत्यादि कित्येक पदार्थांचा समावेश होतो.

असो, शारीरज्ञानाविषयीं आणि शस्त्रक्रियेविषयीं धन्वंतरीनें आणखी पुष्कळ सांगितलें आहे, तसेच रोगपरीक्षा, त्यांचीं औषधें यांणीं तर सर्व पुस्तक भरलें आहे त्याचा विचार पुढें करूं. तूर्त धन्वंतरीनें वैद्याच्या आचरणाचा एक नियम सांगितला आहे तेवढा सांगून हा विषय पुढील खेपेस ठेवितों.

स्त्रीभिः सहास्यां संवादं परिहासं च वर्जयेत् ।
दत्तंच ताभ्यो नादेयमन्नादन्यद्विषग्वरैः ॥

'वैद्यांनीं बायकांच्या संगतीं बसणें, त्यांशीं पुष्कळ बोलणें, त्यांच्याशीं थट्टा मस्करी करणें, या गोष्टी वर्ज्य कराव्या. त्यांणीं अन्न दिल्यास मात्र त्या अन्नाचा स्वीकार करावा; परंतु दुसरी कोणती वस्तु त्यांपासून घेऊं नये.'

आयुष्यवर्त्तनक्रमाविषयीं श्रुतिस्मृतींच्या आज्ञा.*

या विषयास आरंभ करण्यापूर्वी उपोद्घातरूपानें कांहीं गोष्टी सांगणें जरूर आहे. ज्या सृष्टींत हा आपला आयुर्वर्तनक्रम चालावयाचा आहे तिच्या उत्पत्तीविषयीं श्रुतीचा अभिप्राय संक्षेपतः दिसतो. तो असाः—सर्वांत आद्य जो ऋग्वेद त्याच्या अष्टमाष्टकाच्या सातव्या अध्यायाच्या सतराव्या वर्गांत सृष्टयुत्पत्तीचा "तपसस्तन्महिमा जायतैकम्"

* उपयुक्त मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढें ता. १२ मार्च १८७४ रोजीं वे० शा० सं० रा. रा. विष्णु परशराम शास्त्री यांनीं दिलेलें व्याख्यान.

(तपाच्या महिम्यानें हें विश्व झालें) इत्यादि साधारण प्रकार सांगितला आहे. आणि त्याच अष्टकाच्या चौथ्या अध्यायाच्या सतरा, अठरा व एकोणीस या तीन वर्गांत या सर्व ब्रह्मांडाचें समष्टिरूपानें पुरुषस्वरूप कल्पून वर्णन केलें आहे. त्या पुरुषास विराट् ह्मणतात व त्या वर्णनपर मंत्रसमुदायास पुरुषसूक्त ह्मणतात. त्या सूक्ताच्या अकराव्या व बाराव्या मंत्रांत प्रश्नोत्तररूपानें मानवसृष्टीचा विभाग सांगितला आहे. ते मंत्र:-

यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् ।
मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ॥ ४-११
ब्राह्मणोस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥ ४-१२

अर्थ.-प्र०. पुरुषस्वरूपाचे विभाग कल्पिले ते किती व कोणत्या प्रकारें कल्पिले? त्याचें मुख कोणतें, बाहु कोणते, मांड्या कोणत्या व पाय कोणते?

उ० ब्राह्मण हें त्या पुरुषाचें मुख असतें झालें. क्षत्रिय हे त्याचे बाहु केले; वैश्य हे त्याच्या मांड्या व शूद्र हे त्याचे पाय असते झाले.

यावरून रूपकालंकारानें चतुर्वर्णात्मक एकंदर मानवसृष्टीची त्या विराट्स्वरूपाच्या चार अवयवांच्या ठिकाणीं योजना केली हें स्पष्टच दिसत आहे. तरी पुढच्या ह्मणजे यजुरादि वेदांत, स्मृतींत व पुराणांत बहुतस्थळीं विराट्स्वरूपाच्या पूर्वोक्त चार अवयवांपासून चार वर्णांची उत्पत्ति झाल्याचें लिहिलें आहे. परंतु या ठिकाणच्या शब्दार्थवास्तवाचा व प्रश्नोत्तराच्या मर्माचा व अलंकाराचा विचार करतां तें समंजस दिसत नाहीं. बृहदारण्यकादि उपनिषदांतही पूर्वोक्त सस्वरस अर्थाचींच उपबृंहक अशीं वाक्यें बहुत आहेत असें तीं पाहिलीं असतां लक्षांत येईल. येथें ब्राह्मणादि वर्ण सिद्ध घेऊन त्यांची निरनिराळ्या अवयवांच्या ठिकाणीं योजना केली. परंतु हे चार वर्ण उत्पन्न कसे झाले व कोणत्या कारणानें झाले यांविषयींही विचार बहुत ठिकाणीं आढळतात. त्या सर्वांचें तात्पर्य पाहतां साधारण सृष्टिनियमाप्रमाणेंच मनुष्यांपासून यांची उत्पत्ति झालेली असून संसारांतील अथवा व्यवहारांतील निरनिराळीं कामें सुरळीतपणें व्हावीं याकरितां पृथक् पृथक् चार वर्ग अथवा वर्ण केले इतकेंच दिसतें. यावांचून जे दुसरे प्रकार आढळतात ते केवळ अलंकाराचे अथवा मतलबाचे आहेत असें श्रुत्यादि प्रमाणांनींच सिद्ध होतें.

पूर्वी कृतयुगांत वर्ण अथवा जाति एकच असल्याविषयीं श्रीमद्भागवतीं एकादशस्कंधाच्या सातव्या अध्यायांत उद्धवाच्या प्रश्नाचें श्रीकृष्णानें उत्तर दिलें आहे त्यांत तो असें ह्मणतो कीं,

आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति स्मृतः ।
कृतकृत्याः प्रजा जात्या तस्मात्कृतयुगं विदुः ॥ ९ ॥
वेदः प्रणव एवाग्रे धर्मोहं वृषरूपधृक् ।
उपासते तपोनिष्ठा हंसं मां मुक्तकिल्बिषाः ॥ १० ॥
त्रेतामुखे महाभाग प्राणान्मे हृदयात्त्रयी ।
विद्या प्रादुरभूत्तस्या अहमासं त्रिवृन्मखः ॥ ११ ॥
विप्रक्षत्रियविट्शूद्रा मुखबाहूरुपादजाः ।
वैराजात्पुरुषाज्जाता य आत्माचारलक्षणाः ॥ १२ ॥

भावार्थ-पूर्वी कृतयुगांत मनुष्यांचा "हंस" या नांवानें एकच वर्ण अथवा जाति होती असें ह्मटलें आहे. जन्मतःच मनुष्य कृतकृत्य असत ह्मणजे त्यांचा वर्तनक्रम अगदीं साधा असून खटाटोपाचीं कामें मुळींच नव्हतीं-ह्मणून त्या युगास कृतयुग असें नांव होतें, अशी "कृत" याची व्युत्पत्ति

दिली आहे. वेद केवळ प्रणव ह्मणजे ॐकाररूपच होता. धर्म वृषभरूपानें मीच होतों. लोक निष्पाप व तपोनिष्ठ होत्साते मी जो हंस त्या माझी उपासना करीत असत. त्रेतायुगाच्या प्रारंभीं माझ्या हृदयापासून ऋग्यजुःसाम हें वेदत्रय उत्पन्न झालें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे विराट्पुरुषाच्या मुख, बाहु, ऊरू व पाद या स्थानीं झालेले आणि आचरण हेंच केवळ ज्यांचें लक्षण ह्मणजे जाणण्याचें साधन होतें अशा प्रकारचे उत्पन्न होते झाले.

यावरून कृतयुगांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असा जातिविभाग किंवा वर्णविभाग मुळींच नव्हता,कर्मउपासनाज्ञानरूप कांडत्रयात्मक वेद नव्हता,अर्थात् दक्षिणाग्नि, गार्हपत्य, व आहवनीय एतदग्नित्रयसाध्य यज्ञयागादि नानाविध श्रौतकर्में आणि स्मार्ताग्निसाध्य अन्वष्टकादि स्मार्तकर्मेंही नव्हतीं हेंही उघडच होतें. आयुष्यक्रम अगदींच साधा होता. त्याप्रमाणेंच मनुष्यस्वभावही अत्यंत साधा भोळा होता. याविषयीं श्रीमद्भागवतीं एकादशस्कंधांत पांचव्या अध्यायांत ऋषभदेवाचा पुत्र जो करभाजन त्यानें जनकास कृतयुगाची स्थिति सांगितली आहे तींत तो मनुष्यस्वभावाविषयीं असें ह्मणतोः—

मनुष्यास्तु तदा शांता निर्वैराः सुहृदः समाः।
यजंति तपसा देवं शमेन च दमेन च ॥ २२ ॥

भावार्थ—त्या काळीं (कृतयुगांत) मनुष्य शांतस्वभावाचे, द्वेषरहित, प्रेमयुक्त व सर्वत्र समभाव असे असते झाले.

अत्यंत प्राचीन काळीं ह्मणजे सृष्टीमध्यें मनुष्यांची वसति फार वाढली नव्हती आणि त्यांचे व्यापारही अतिशयित मर्यादित ह्मणजे आहार, निद्रादिकांशिवाय दुसरे ह्मणण्यासारखे नव्हते. त्यावेळीं अशी स्थिति असणें हें सयुक्तिकच आहे.

आर्य लोकांत पूर्वी एकच वर्ण अथवा एकच जाति होती ही गोष्ट फारशी प्रसिद्ध नाहीं; परंतु पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारच जाति होत्या हें बहुतांस माहीत आहे. या चार जातिही मूलभूत नसून केवळ गुण व कर्में यांच्या भेदानेंच झाल्या आहेत हें "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" इत्यादि गीतादिग्रंथांतील वाक्यांवरून स्पष्टच आहे. पूर्वी केवळ चारच जाति असून त्यांच्याच प्रस्तुत कालीं हजारों कशा बनल्या याविषयीं विचार केला ह्मणजे पूर्वी एकच जाति असून तिच्या चार कशा बनल्या हें मनांत येण्यास कठीण पडणार नाहीं. ह्मणजे एकएका धंद्याच्या संबंधानेंच एक एक जाति उत्पन्न झाली यांत कांहीं संशय नाहीं. यास उघड प्रमाण कांसार (कांस्यकार), सोनार (सुवर्णकार), लोहार (लोहकार), तेली (तेल काढणारा), तांबोळी (तांबूली), इत्यादिक निरनिराळ्या जातींचीं जीं अन्वर्थक नांवें हल्लीं प्रसिद्ध आहेत तीं होत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हींही नांवें अन्वर्थक असून तींही वर लिहिल्याप्रमाणें धंद्यांच्याच संबंधानें पडलीं आहेत असें पुरातन ग्रंथ वाचले असतां पक्कें मनांत येतें. पूर्वीच्या काळापेक्षांही पुढें उत्तरोत्तर अज्ञान फार वाढत गेल्यामुळें धंद्यांच्या संबंधानें ज्या अनेक भिन्न जाति झाल्या त्यांत परस्पर जलव्यवहारही होत नाहीं हें सर्वांस माहीतच आहे. मग अन्नव्यवहार अथवा कन्याव्यवहार कोठून होणार? पूर्वीच्या काळीं असा प्रतिबंध नव्हता हें चारी वर्णांचा परस्परांशीं अन्नव्य-

वहार होत होता व अनुलोम[1] वर्णांशीं कन्याव्यवहार होत होता यावरून स्पष्टच आहे.

असो. ज्यांच्या आयुष्याच्या वर्त्तनक्रमाविषयीं श्रुतिस्मृतींच्या आज्ञा आज आपणांपुढें आणावयाच्या आहेत त्या ब्राह्मणादिवर्णांच्या उत्पत्तीविषयीं ही स्वल्प सूचना करून आतां मुख्य विषयास आरंभ करतों.

आर्यलोकांनीं आयुष्याचे एकंदर चार विभाग केले आहेत ते—ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ्य व संन्यास हे होत. या प्रत्येकास "आश्रम" अशी संज्ञा दिली आहे. यांत दुसरा व चौथा ह्मणजे "गार्हस्थ्य" व "संन्यास" हे मुख्य असून "ब्रह्मचर्य" व "वानप्रस्थ्य" हे यथाक्रम गार्हस्थ्य व संन्यास यांची शारीर, मानसिक इत्यादि हरएक प्रकारची साधनसंपत्ति करण्याचे ह्मणजे तयारीचे आश्रम आहेत. त्यांतील संन्यासाश्रम हा उत्तरोत्तर अगदींच कमी कमी होत असल्यामुळें व त्याच्या तयारीचा जो वानप्रस्थाश्रम तो अर्थात् अगदींच नाहींसा झाल्यामुळें त्या दोहोंविषयीं येथें कांहीं न सांगतां फक्त गृहस्थाश्रम व त्याच्या तयारीचा ब्रह्मचर्याश्रम ह्या दोहोंविषयींच येथें क्रमशः विचार करूं.

ब्रह्मचर्य हा चार आश्रमांपैकीं प्रथमाश्रम होय. "ब्रह्म" याचा अर्थ वेद अथवा ज्ञान असा आहे. आणि तें ज्ञानसंपादन करण्याच्या कालाची दीक्षा ह्मणजे व्रत त्यासही "ब्रह्म" हें नांव दिलें आहे. आणि त्या दीक्षेचें जें आचरण त्याचें नांव ब्रह्मचर्य असें आहे. ह्या ब्रह्मचर्याचा काल प्रत्येक वेदास बारा वर्षें याप्रमाणें चार वेद असल्यामुळें बारा, चोवीस, छत्तीस अथवा अठ्ठेचाळीस ह्मणजे जितके वेद शिकावयाचे असतील तितक्या वर्षांचा असावा असा नियम सांगितला आहे. त्यांत निदान बारा वर्षें अथवा एका वेदाचें ग्रहण करतां येईपर्यंत तरी ब्रह्मचर्य आचरलेंच पाहिजे असा सर्व श्रुतिस्मृतींचा मोठा कटाक्ष आहे; व तो सर्व सांसारिक सुखांस अत्यंत उपयोगी व आवश्यक आहे हें तो आश्रम केवळ विद्यासंपादन करण्याकरितांच आहे इतकेंच मनांत आलें असतांही समजण्यासारखें आहे. ब्रह्मचर्याचा आरंभ व्रतबंध अथवा मुंज होते त्या दिवशींच होतो. द्विज ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिघांच्या व्रतबंधाच्या कालांत यत्किंचित् फरक आहे तरी त्यांच्या ब्रह्मचर्याच्या अवधीमध्यें फरक नाहीं.

हा ब्रह्मचर्याश्रम ह्मणजे विद्याध्ययनाचा काल गुरूच्या घरीं राहून घालवावा लागत असे. त्या कालीं कुलगुरूंचे अथवा महर्षींचे आश्रम हीं मोठमोठीं विद्यापीठें होतीं. ते महर्षि विद्वान्, तपस्वी, शांत, दांत, दयालु, वयोवृद्ध, अध्ययन व अध्यापन यांविषयीं तत्पर असे असत. मोठमोठ्या सार्वभौम राजांचे प्रियपुत्रही अध्ययनाकरितां गुरुगृहींच वास करीत असत असें रामलक्ष्मण, रामकृष्ण, द्रुपद इत्यादिकांच्या अध्ययनाचा इतिहास पाहतां कळतें. पूर्वोक्त महर्षि केवळ निरपेक्षबुध्या अध्यापन ह्मणजे आपला एक मुख्य धर्मच आहे असें समजून तें करीत असत, यामुळें त्यांच्या येथें एकसमयावच्छेदेंकरून शेकडो विद्यार्थी पढत असत. हे ऋषि नगराच्या वस्तीपासून दूर राहत असत व त्यांच्या आसमंतात् त्यांजप्रमाणेंच अनेक ऋष्याश्रम असत यामुळें विद्यार्थ्यांस

१ प्रतिलोमकन्याविवाहांचीही, ययातिदेवयानी वगैरेचीं क्वचित् उदाहरणें आहेत.

नगरांत राहिल्यापासून अल्पवयांत ज्या दुःसंगति इत्यादि लागण्याचे संभव असतात ते विद्येस अंतराय आणणारे अशा प्रकारचें आईबाप इत्यादि संबंधिजनांनीं केलेलें लालन, घरांतल्या माणसांत राहिल्याच्या योगानें सहजच उत्पन्न होणारे आलस्यादि दोष, सर्व दिवसभर दृष्टीपुढें येणाऱ्या अनेकविध गोष्टींच्या योगानें सहज घडणारें चित्ताचें आकर्षण व वृत्तींचें चांचल्य, रोगोत्पादक हवा पाणी इत्यादि गोष्टी सहजच टळत.

विद्यार्थ्यास उपजीविकेकरितां सकाळ संध्याकाळ ओली भिक्षा अथवा मधुकरी मागावी लागत असे. या महर्षींस मोठाले राजे रजवाडे फार मोठा मान देत असत व त्यांची कोणत्याही रीतीची अडचण अशी ठेवीत नसत. यामुळें विद्यार्थ्यांस भिक्षावृत्ति फार कठिण जात नसेल असें वाटतें.

विद्यार्थ्यांस गुरूच्या घरीं कार्याकारण सेवा करावी लागे ती बहुतकरून समिधा, दर्भ इत्यादि होमसामग्री आणण्याखेरीज क्वचित् असे. गुरुकुलांत राहण्याचे व अध्ययन करण्याचे नियम बरेच कडक असून ते तसेच अमलांत आणले जात. गुरु, गुरुपत्नी व कुटुंबांतील इतर संबंधि जन यांची ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार मर्यादा राखणें व त्यांशीं नम्रपणें, वेळच्यावेळीं सर्व स्नानसंध्यादि नित्यकर्में करून अवशी पाहटेस अध्ययनास तयार राहणें याविषयीं त्यांस फार जपावें लागत असे. याविषयीं आश्वलायन गृह्यसूत्राच्या प्रथमाध्यायांत २२ व्या खंडांत असें ह्मणतो:-

मेखलामाबध्य दंडं प्रदाय ब्रह्मचर्यमादिशेत्। ब्रह्मचार्यस्यापोशनकर्म कुरु। दिवा मा स्वाप्सीः आचार्याधीनो वेदमधीष्व। द्वादशवर्षाणि वेदब्रह्मचर्यं ग्रहणांतं वा। सायं प्रातर्भिक्षेत। सायं प्रातः समिधमादध्यात्॥

भावार्थ.-उपनयनोत्तर मुलाच्या कमरेस मौंजी बांधून त्याच्या हातांत दंड देऊन त्यास ब्रह्मचर्यव्रताचा उपदेश करावा. तो असा-तूं ब्रह्मचारी आहेस, मलमूत्रविसर्जनानंतर जलानें शुद्धी करून आचमन करीत जा, संध्योपासनादि कर्म करीत जा, दिवसा निजत जाऊं नको, नेहमीं आचार्याच्या स्वाधीन रहा, वेदाचें अध्ययन करीत जा, एका वेदाच्या अध्ययनास बारा वर्षें अथवा वेद येण्यास जितकीं कमी अथवा ज्यास्त वर्षें लागतील तितकीं वर्षें ब्रह्मचर्यव्रतानें रहा, सकाळ संध्याकाळ भिक्षा मागत जा, आणि सकाळ संध्याकाळ अग्निकार्य करीत जा.

विष्णुस्मृति-

यो यस्य विहितो दंडो मेखलाजिनधारणम्
सूत्रं वस्त्रं च गृह्णीयाद्ब्रह्मचर्येण यंत्रितः॥ १. १६
ब्राह्मे मुहूर्त्ते उत्थाय चोपस्पृश्य पयस्तथा॥
विराचम्य ततः प्राणांस्तिष्ठेन्मौनी समाहितः १. १७
अब्दैवतैः पवित्रैस्तु कृत्वात्मपरिमार्जनम्।
सावित्रीं च जपंस्तिष्ठेदासूर्योदयनात्पुरा १. १८॥
अग्निकार्यं ततः कृत्वा प्रातरेव व्रतं चरेत्।
गुरवे तु ततः कुर्यात्पादयोरभिवंदनम्॥ १. १९॥
समित्कुशाश्वोदकुंभमाहृत्य गुरवे व्रती।
प्राञ्जलिः सम्यगासीन उपस्थाय यतः सदा १.२०॥
द्विजातिषु चरेद्भैक्ष्यं भिक्षाकाले समागते।
निवेद्य गुरवेश्नीयात्संमतो गुरुणा व्रती॥ १. २२॥

यामध्यें विशेष असें आहे कीं, ब्रह्मचाऱ्यानें प्रातःकालीं उठून दिग्विधि, मुखमार्जनादिविधि, स्नानसंध्या हीं सूर्योदयाबरोबर आटोपून, होम करून समिधा, दर्भ, पाणी इत्यादि गुरूस लागल्यास तें देऊन त्यास वंदन करून हात जोडून त्याच्या पुढें अध्ययनाकरितां सिद्ध होऊन उभें राहावें.

हारीतस्मृति—

उपनीतो माणवको वसेद्गुरुकुलेषु च ।
गुरोः कुले प्रियं कुर्यात्कर्मणा मनसा गिरा ॥३.१॥
शौचाचारमशेषं तु शिक्षयेद्गुरुसन्निधौ ॥ ३. ५ ॥
सायं प्रातश्चरेद्भैक्षं भोज्यार्थं संयतेन्द्रियः ।
आचम्य प्रयतो नित्यं न कुर्याद्दंतधावनम् ॥३.७॥
छत्रं चोपानहं चैव गंधमाल्यादि वर्जयेत् ।
नृत्यगीतमथालापं मैथुनं च विवर्जयेत् ॥ ३. ८ ॥
हस्त्यश्वारोहणं चैव संत्यजेत्संयतेन्द्रियः ।

\+ \+ \+

अभिवाद्य गुरोः पादौ संध्याकर्मावसानतः ।
तथा योगं प्रकुर्वीत मातापित्रोश्च भक्तितः ॥३.१०॥

यामध्यें विशेष इतकाच आहे कीं, ब्रह्मचाऱ्यानें साधारण चैनीचे व सुखाचे पदार्थ भोगूं नयेत; कारण तशा भोगापासून त्याची प्रवृत्ति ऐषारामाकडे विशेष होऊन अध्ययनास अंतराय येईल.

इतर स्मृतिकर्त्यांचींही मतें कांहीं थोड्या फेरफारानें याप्रमाणेंच आहेत. विद्यार्थ्यांच्या अध्ययनास विघ्न येण्यासारख्या ज्या ज्या गोष्टी स्मृतिकर्त्यांस वाटल्या त्या त्या सर्व त्यांनीं निक्षून निषिद्ध केल्या. यावरून विद्यासंपादनाची आवश्यकता त्यांस किती वाटत असे हें अगदीं स्पष्ट आहे. त्यांनीं ऐहिक उपभोग्य वस्तूंचा निषेध केला हें तर काय; परंतु विद्यासंपादनास विघ्न करणारीं जीं जननाशौच व मरणाशौच तींही ब्रह्मचाऱ्यास मुळींच नाहींत असें स्मृतिकर्त्यांनीं सांगितलें आहे. प्रत्यक्ष आईबापांच्या सूतकांतही ब्रह्मचारी अस्पृश्य होत नाहीं असें स्मृतिकर्त्यांचें मत आहे. याचें कारण अध्ययनकालांतील वेळ अत्यंत मौल्यवान्. त्यांतील लहान लहान अंश अशा अवरोधादिकांच्या अडचणींत गेले असतां इतर सहाध्यायी मंडळी पुढें जाऊन त्याचें अतिशय नुकसान होईल व वेळेस तें सर्व जन्मामध्येंही भरून येणार नाहीं असें त्यांस वाटत असावें. हल्लीं विद्यादानाच्या कामांत जे आमचे विद्वान् बांधव गुंतले असतील त्यांस या आज्ञेची योग्यता जशी कळून येईल तशी दुसऱ्यांस येणें कठिण आहे.

हल्लीं इंग्रजीवगैरे शाळांतून जाणारे विद्यार्थी सूतकाचा विटाळ मानीत नाहींत आणि त्यांचे गुरु त्या गोष्टीकडे कानाडोळा करतात यांतलें बीज हेंच आहे. स्मृतीच्या आज्ञा न जाणणारे लोक त्या विद्यार्थ्यांस व त्यांच्या गुरूंस "सुधारलेपणाचा" दोष देतात, त्यांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें. ज्या गोष्टी स्वभावतः जशा घडावयाच्या तशा न घडाव्या ह्मणून केलेले प्रयत्न व्यर्थ होऊन त्या गोष्टी तशा घडतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

आतां ब्रह्मचाऱ्यास मातापितरादिकांचेंही सूतक त्यांची क्रिया करणें त्याजकडे नसेल तर येत नाहीं असें वर सांगितलें. परंतु आलीकडे वेदाध्ययन मुळींच नाहींसें झालें व तें क्वचित् कोठें चालत असलें तरी तदंग ब्रह्मचर्यव्रत सुतरां लुप्तच झालें तेव्हां त्या संबंधाची व्यवस्था ठाऊक असणें कठीण, यास्तव त्याबद्दलच्या एक दोन आज्ञा पुढें लिहूं. (पुढें चालेल.)

प्राचीन भरतखंडस्थिति.

कविता.

ज्याच्या स्थावर आणि जंगम जगद् विस्तारलें शोभतें
लीलेनें करुणार्द्र दृष्टिकरुनी संज्ञातही जृंभतें
सद्हृत्पंकजकाननीं यदुदयें कोंभे घनानंद तो
त्या सच्चिद्घन अस्तहीन रविला साष्टांग मी वंदितों १

श्रीसद्गुरू प्रभव जो स्थिरजंगमासीं
दृग्ज्योतिनें सम मनुष्यभुजंगमासीं
लक्षी प्रबोधित करी हृदयांबुजातें
त्या नित्यशुद्धविमला नमितों अजातें २
वल्मिकप्रभव बादरायण
जे मुनी नयकथापरायण
काव्यकंजरस पाजणार जे
पायिचीं नमिं तदीय मी रजें ३
भरतकुलयशोब्धिक्षात्रधर्मकतूस
करूनि सकल ज्यानें भूमिचा भार तूस
शरमथनसमुत्थीं होमिला वन्हिमाजी
प्रणति सितहया तत्सारथ्या त्याहि माजी ४
वाग्विलासिनि अतां वरदे गे
हो प्रसन्न मज हा वर दे गे
काव्यरूपतरुरोप फळावें
तद्रसें सुजनकर्णि गळावें ५
कसें वसविलें तिहीं भरतखंड हें आपलें
यशःसित पराक्रमें करून शिष्ट केलें बलें
कसें मधुरतत्कथाश्रवणपानसौत्सुक्य हे
खुले करूनि कर्ण हे बहुत वैसले तूं कहें ६
हो सुशोभ जगती वसतीनें
कल्पिलें जइं विरिंचिमतीनें
निर्मिलें क्षितित या मनुसंज्ञा
यत्प्रजा श्रुतिपरा बहु विज्ञा ७
केली त्यांहीं मानवी बा प्रजा ती
सारी सद्धर्माश्रया विप्रजातो
नाहीं होता तेधवां वर्णभेद
आहे मान "ब्रह्म वा" हाहि वेद ८
कृत तया समया ह्मणती युग
सकल एकमती नव्हतें युग
उपजुनी करिती निजकृत्य जें
ह्मणुनि होत सदा कृतकृत्य जे ९
अहाहा तया काळिंच्या त्या सुखातें
स्मरोनी सुटे पाणि बापा मुखातें
नव्हे भूमि ती भारती नाकलोका-
हुनी सौख्यदात्री गमे सत्य लोकां १०
शाखा स्वस्तरूची अधीं फलभरीं कीं काय ओथंबली
पृथ्वी पात्र करांत घेउन फळें वेंचावया थांबली
पक्कें ती सरसें तयांत पडतां त्या खादिहूनी फळें
स्वर्लोकाधिकशुद्धनिर्मलसुखा उर्वी न कां ही फळे ११
न्याय नीति वर आणि नवोढा
पुण्यरूप दिसतां क्षिति ओढा
शुद्ध तेथ करण्या जलकेली
आलिं आणि वसती तिहिं केली १२
तयांच्या सदा आश्रयें राहिली ती
प्रजा बाप हा न्याय माताहि नीति
असें मानिती वर्तती ही तशाची
नसे वाण तात्कालिकी त्यां कशाची १३
स्वेच्छाविहार करिती फलमूल खाती
द्वैतांधकार जइं नाहिं सदा उखा ती
प्रज्ञा स्वयें बहु वसे हृदयीं जयांच्या
मूर्त्या च त्या भजति तुल्य सुखा नयाच्या १४
ज्ञानें मानें सारखे सर्व होते
त्या काळींचे मानव प्राणि हो ते
रूपें भिन्नें ओळखायास मात्र
केलीं ज्यांचीं सारखे जे पवित्र १५
न निंदा दुराशा निघे मानसांत
तदा होत ईशप्रतीति क्षणांत
निशीं मानसोपासना त्या प्रभूची
करीती सुसेवा हि ते विप्र भूची १६
मायशी सुखद त्यां वसतीला
होय यास्तव निशीदिस तीला
मान सर्व अनपेक्षित देती
जीस त्यांस हि बहू सुख दे ती १७
मान देति बहु ते उदकाला
जें करी वनसमृद्धि सुकाला
सर्वदा करूनियां सुफलांच्या
शांतवीत हि तृषा सकलांच्या १८
अग्नि वायु नभ ही निजमित्र
मानिती शशि तसाच हि मित्र
त्यांचिया सलगिनें सुख होतें
विघ्नहास ह्मणुनीच अहो ते १९
ईश एक ह्मणुनी न दुजास
ध्याति विश्वविभवेश अजास
जो चराचर सृजी निजमाया-
रूपखेळ निजवृत्ति रमाया २०

(पुढें चालेल.)

BOMBAY:—"NIRNAYSAGAR PRESS" KALKADEVEE ROAD.

विज्ञापनम् ।

निम्नलिखितसंस्कृतपुस्तकानि विविधज्ञानविस्तारगृहे लभ्यानि ।

पुस्तकनामानि ।		मूल्यम् ।
काव्यशास्त्रम् ।		
रामायण, बालकाण्ड त्रयोदशसर्गावधि	सटीक.	१–११
शिशुपालवध.	,, ...	६—८
किरातार्जुनीय.	,, ...	२–१४
रघुवंश.	,, ...	१–१४
कुमारसंभव.	,, ...	१–१४
मेघदूत.	,, ...	०–१४
ऋतुसंहार.	,, ...	०—८
नलोदय.	,, ...	०–१३
भामिनीविलास.	,, ...	१—२
भट्टीकाव्य.	,, ...	४–१२
पुष्पबाणविलास.	,, ...	०–१०
काव्यसंग्रह.	.....	५—८
महिषशतक, पादारविंदशतक, स्तुतिशतक, मन्दस्मितशतक, कटाक्षिशतक.	.....	१—२
विद्वन्मोदतरंगिणी चम्पूकाव्य.	.....	०–१०
माधवचम्पू.	,, ...	०—८
चन्द्रशेखर.	,, ...	३—६
वेहुलानखिन्दर.	,, ...	१—३
कादम्बरी.	सटीक.	४—८
दशकुमारचरित.	,, ...	१–१२
वासवदत्ता.	,, ...	२—३
हितोपदेश.	,, ...	१—२
पञ्चतन्त्र.	.....	२–१२
भोजप्रबन्ध.	.....	०–१५
वेतालपञ्चविंशति.	.....	०–१५
नाट्यशास्त्रम् ।		
वेणीसंहार.	सटीक.	१—४
मुद्राराक्षस.	,, ...	१–१३
रत्नावली.	,, ...	०–१४
मालविकाग्निमित्र.	,, ...	१–१२
धनञ्जयविजय.	,, ...	०—५
विक्रमोर्वशी.	,, ...	१–११
महानाटक.	,, ...	१–१२
चण्डकौशिक.	,, ...	१–१०
उत्तररामचरित.	,, ...	१—८
प्रियदर्शिका.	,, ...	०–१०
विद्धशालभञ्जिका.	,, ...	१—२
मृच्छकटिक.	,, ...	२—६
शाकुन्तल.	,, ...	१—०
मालतीमाधव.	,, ...	२—०
प्रबोधचन्द्रोदय.	,, ...	२—३
चैतन्यचन्द्रोदय.	.....	२—४
नागानन्द.	.....	१—२

पुस्तकनामानि ।		मूल्यम् ।
प्रसन्नराघव.	.....	१—३
महावीरचरित.	.....	१–१२
वसन्ततिलकभाण.	.....	०—८
अलंकारशास्त्रम् ।		
कुवलयानन्द.	सटीक	३—५
काव्यप्रकाश.	,, ...	४—८
काव्यादर्श.	,, ...	३–१२
काव्यदीपिका.	.....	०–१४
दशरूप.	.....	२—४
साहित्यदर्पण.	.....	१–१२
चन्द्रालोक.	.....	०–१०
वैद्यशास्त्रम् ।		
भावप्रकाश.	.....१०–१२	
चक्रदत्त.	.....	१–१४
सुश्रुत.	.....	४–१०
शार्ङ्गधर.	.....	१—४
मदनपालनिघण्टु.	.....	१—३
गणितशास्त्रम् ।		
लीलावती.	.....	०–१४
बीजगणित.	.....	१—४
क्षेत्रतत्त्वदीपिका	.....	१—४
छन्दःशास्त्रम् ।		
छन्दोमञ्जरी तथा वृत्तरत्नाकर	सटीक.....	०–१२
पिङ्गलछन्दःसूत्र.	,, ...	२—४
स्मृतिशास्त्रम् ।		
वीरमित्रोदय.	.....	१०—८
मनुसंहिता.	सटीक.	५—८
इतिहासशास्त्रम् ।		
राजतरङ्गिणी.	.....	६—०
सर्वदर्शनसंग्रह.	.....	१—४
कारण्डव्यूह.	.....	२—३
शङ्करविजय.	.....	२—४
ललितविस्तर.	.....	३–१३
नानाविधग्रंथाः ।		
तर्कसंग्रह.	.....	०–१०
धातुरूपादर्श. (व्याकरण)	.....	२—५
मेदिनी. (कोष)	.....	१—४
नारदपञ्चरात्र.	.....	३—०
नीतिमाला.	.....	०–१४
संस्कृत शिक्षामञ्जरी	१ भाग.	०—२
संस्कृतशिक्षा	२ भाग.	०—५

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रुपये ३.
सहामाही आगाऊ..... ....रुपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचें .....आणे ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.



A MONTHLY MAGAZINE

OF

पुस्तक ७. MARATHI LITERATURE अंक ८.

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह. १४१
ठगाची जबानी १४५
भोजप्रबंध. १४८
अर्थशास्त्र. १५१
आयुष्यवर्त्तनक्रमाविषयीं श्रुतिस्मृतींच्या आज्ञा. १५४

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पोंच.

पुस्तकें.

१ हिमालय वर्णनम् ।

२ स्नेहाविषयीं निबंध.

वर्गणी.

दिसेंबर १८७९	रु.	आ.
रा० रा० विश्वनाथ नारायण वागळे.....	३	०
,, सदाशिव मोरोबा पितळे	३	०
,, रामचंद्र पांडुरंग हळदणकर. ...	३	०
,, माऊ कृष्णराव	३	०
,, सदाशिव गणोबा	३	०
,, चिंतामण सखाराम करंदीकर ...	३	०
,, विठ्ठल रामचंद्र महात्मे.....	३	०
,, सूर्याजी सदाशिव महात्मे	३	०
,, नानाभाई सदानंद	३	०
,, पुतळाजी सोकाजी त्रैलोक्यकर	३	०
,, कृष्णराव दिनानाथ	३	०
,, श्रीनिवासराव कारकुन.....	३	६

दिसेंबर १८७९	रु.	आ.
रा० रा० पांडुरंग बाळकृष्णजी	१०	२
श्री० पंतप्रतिनिधि संस्थान औंध	८	४
रा० रा० शंकर तुकाराम शाळिग्राम.....	८	०
,, माधवराव बी. पितळे	१	०
,, विनायकराव चिंतामण देशमुख मे १८७६ पर्यंत.	३	६
,, गोविंदराव आपाराव, जुलई १८७६ अखेर.....	३	६
,, अनंत महादेव गांवसकर बाकी पैकीं.....	३	०
,, राजाराम परशुराम प्रधान, बाकी-पैकीं.....	३	०

☞ आमचे मुम्बईतील व बाहेर गांवचे वर्गणीदार यांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, त्यांणीं मागील सालच्या बाकीसुद्धां चालू साला-वद्दल वर्गणीचा पैसा मागण्याची वाट न पाहतां पाठविण्याची मेहेर-बानी करावी.

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ८.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.

तांत्रिकशैवदर्शन.

कर्मादिकांची अपेक्षा केल्याशिवाय परमेश्वर या जगास निर्माण करितो, असा जो **पाशुपतांचा** सिद्धांत तो न्यायसिद्ध होत नाहीं; कारण तसें असल्यास, परमेश्वरानें स्वेच्छेनेंच हें जग उत्पन्न केलें ह्मणून परमेश्वरावर वैषम्य व नैर्घृण्य हे दोन मोठे दोष येतात; तर कर्मादिकांची अपेक्षा करूनच, परमेश्वर हें जग निर्माण करितो, असें ह्मणणें रास्त दिसतें, असें कित्येक **माहेश्वर** उपपादन करितात. यांचें ह्मणणें असें आहे कीं **पति, पशु, पाश,** हे तीनच काय ते खरे **पदार्थ.** तंत्रतत्त्वज्ञांचें वचनही आहे कीं—

त्रिपदार्थं चतुष्पादं महातंत्रं जगद्गुरुः ।
सूत्रेणैकेन संक्षिप्य प्राह विस्तरतः पुनः

अर्थ—ज्यांत **तीन पदार्थांचें** निरूपण केलें आहे व ज्याचे **पाद** चार आहेत, असें जें **महातंत्र,** त्याचा एकाच सूत्रानें संक्षेप करून, **जगद्गुरूने** पुनः अन्यत्र विस्तारही केला आहे. तीन **पदार्थांचा** उद्देश तर झाला. आतां चार **पाद** कोणते? तर **विद्या, क्रिया, योग, चर्या,** हे त्या **महातंत्राचे** चार **पाद. पशूंस** तर स्वातंत्र्य मुळींच नाहीं; व **पाश** तर सर्वथा जड; यासाठीं त्या दोघांस सोडून तद्विलक्षण जो **पति** त्याचें पहिल्याने निरूपण केलें आहे; नंतर **पतिप्रमाणें पशूंस** चैतन्य आहे, ह्मणून **पशूंचें** निरूपण लागलेंच केलें आहे; सरते शेवट **पाश** ह्मणजे काय हें सांग कथन केलें आहे; नंतर परम पदाची प्राप्ति आपणास **दीक्षेपासून** होये; व पतिपशुपाशांच्या स्वरूपांचा यथार्थ अवबोध होण्यास कारणभूत असून, मंत्र, मंत्रेश्वर, इत्यादिकांच्या माहात्म्याचें खरें प्रतिबिंब आपल्या मनांत उठवणारें जें ज्ञान त्याखेरीज ती **दीक्षा** सिद्ध होत नाहीं, ह्मणून **विद्यापादाचें** सर्वांच्या आरंभींच निरूपण केलें आहे. नंतर त्या सांग दीक्षाविधीची फोड करणारा **क्रियापाद** प्रकट होतो. जें कांहीं आपणास अभिमत असतें त्याची प्राप्ति करून घेण्यास **योगासारखें** दुसरें साधन नाहीं, ह्मणून नंतर **योगपादाची** योजना केली आहे. विहिताचें आचरण करणें व निषिद्धाचें वर्जन करणें ही **चर्या** होय; या **चर्येशिवाय योगाची** प्राप्ति होत नाहीं, ह्मणून **योगपादानंतर** लागलाच **चर्यापादास जगद्गुरूनें** आरंभ केला आहे. याप्रमाणें चार **पादांचें** संक्षिप्त स्वरूप निरूपित झालें.

परम प्रभु जो **शिव** त्यासच आह्मीं **पति**

ह्मणतो. मोक्षास गेलेले व विद्येश्वर हे उभयतां जरी शिवस्वरूप असतात तरी ते पति नव्हत; कारण ते सर्वांशीं परमेश्वरावर अवलंबून असल्यामुळें, त्यांस स्वातंत्र्य मुळींच नसतें. परमेश्वरानें हें सर्व जग उत्पन्न केलें आहे, ह्मणून परमेश्वर कारण, व हें जग त्याचें कार्य होय. ज्यापक्षीं या जगास संनिवेश आहे, त्यापक्षीं हें जग कार्यच असलें पाहिजे. आतां कर्ता आपणास प्रत्यक्ष दिसत नाहीं, इतक्यावरूनच तो नाहीं असें ह्मणणें बरोबर नाहीं; कारण अनुमानानें त्याची सिद्धि होयेच. देहादिक हेंही घटादिकांप्रमाणेंच कार्य आहे असें ह्मटलें पाहिजे; कारण त्यास संनिवेश आहे, व विनश्वरत्वही आहे. हें ज्यापक्षीं घटादिकांप्रमाणें कार्य आहे, त्यापक्षीं घटादिकांप्रमाणेंच यासही कर्ता असला पाहिजे; व जसा घटादिकांचा कर्ता घटादिक स्वतंत्र उत्पन्न करितो, त्याप्रमाणें देहादिकभुवनादिकांचा कर्ताही देहादिक व भुवनादिक हें सर्व स्वतंत्रच उत्पन्न करितो असें ह्मटलें पाहिजे. आतां परमेश्वर जर कर्मसापेक्ष असून, हें जग निर्माण करितो, तर त्यांत स्वातंत्र्य तें काय? असें ह्मणणें आह्मांस पोकळ वाटतें; कारण करणाची अपेक्षा केल्यामुळें कर्त्याच्या स्वतंत्र्याची हानि झाली, असें आह्मीं कधीं पाहिलें नाहीं व ऐकिलेंही नाहीं. जरी स्वयंपाक्यास लांकडांची अपेक्षा असत्ये, तरी लांकडें स्वयंपाक करीत आहेत असें कोणी ह्मणत नाहीं; व दान देते समयीं राजा जरी भिक्षुकास दानाध्यक्षाजवळ जाण्यास सांगतो, तरी राजाच तें दान करितो, व त्या दानाचें फल ह्मणून राजासच मिळतें हें जगजाहीर आहे. यावरून हें जग कार्य असून त्यास कर्ता आहे, व तो कर्ता स्वतंत्र आहे, हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. ह्मटलेंही आहे कीं—

विवादाध्यासितं सर्वं बुद्धिमत्पूर्वकर्तृकम्
कार्यत्वादाययोः सिद्धं कार्यं कुंभादिकं यथा

अर्थ— न्यायरीतीनें पाहिलें असतां, या जगास कर्ता असून, तो कर्ता स्वतंत्र आहे असें ह्मटलें पाहिजे; कारण ज्याप्रमाणें कुंभादिक कार्य होय, त्याप्रमाणें आपणही कार्य आहों; ह्मणून ज्याप्रमाणें कुंभादिकांचा कर्ता स्वतंत्र असतो त्याप्रमाणें आपलाही कर्ता स्वतंत्रच आहे असें ह्मटलें पाहिजे. आतां हा कर्ता ज्यापक्षीं सर्वात्मक व सर्वकर्ता आहे त्यापक्षीं सर्वज्ञही होय, असें ह्मटलें पाहिजे; कारण जर असर्वज्ञ असता तर हें सर्व त्यास निर्माण करितां आलें नसतें. **श्रीमन्मृगेंद्रानें** ह्मटलेंही आहे कीं—

सर्वज्ञः सर्वकर्तृत्वात् साधनांगफलैः सह
यो यज्जानाति कुरुते स तदेवेति सुस्थितम्

अर्थ—परमेश्वर सर्वज्ञ असलाच पहिजे; कारण तो या सर्व चराचराचा कर्ता होय. ज्यास ज्या पदार्थाचें घटकावयवादिक माहीत असतें, तोच तो पदार्थ बनवूं शकतो; अन्य शकत नाहीं. अर्थात् सर्वज्ञ अशाच परमेश्वराचें सर्वकर्तृत्व सयुक्तिक दिसतें. आतां परमेश्वर सशरीर आहे कीं अशरीर आहे याचा विचार करूं या. कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं ज्याप्रमाणें कुंभादिकांचा कर्ता कुलालादि सशरीर असतो त्याप्रमाणें या जगताचा कर्ता परमेश्वरही सशरीर असला पाहिजे, व तो जर सशरीर आहे असें सिद्ध झालें, तर तो कुलालादिकांप्रमाणें अनेक क्लेशांनीं युक्त आहे असेंही सिद्ध होईल. तर आह्मीं असें ह्मणतों कीं परमेश्वराचें शरीर अस्मदा-

दिकांप्रमाणें प्राकृत असतें, तर हे सर्व दोष आलेच असते; पण ज्यापक्षीं परमेश्वराचें शरीर शाक्त आहे, त्यापक्षीं त्यांत या दोषांचें दर्शन सुद्धां होणें कठिन. **ईशानमंत्र** परमेश्वराचें मस्तक होय; **तत्पुरुष** हें त्याचें तोंड; **घोर** हें त्याचें हृदय; **वामदेव** हें त्याचें गुह्य; **सद्योजात** त्याचे पाय; हें परमेश्वराचें शाक्त शरीर **कृत्यपंचकाचें** कारण होय; व हें तो स्वेच्छेनें निर्माण करितो, यासाठीं या शरीराचें आमच्या शरीरावरोबर मुळींच सादृश्य नाहीं, हें उघड आहे. **श्रीमन्मृगेंद्रानें**ही ह्मटलें आहे कीं—

मलाद्यसंभवाच्छाक्तं वपुर्नैतादृशं प्रभोः

अर्थ—परमेश्वसच्या ठिकाणीं ज्यापक्षीं मलादिकांचा संभव मुळींच नाहीं, त्यापक्षीं त्याचें शरीर अस्मदादिकांप्रमाणें नाहीं; तर शाक्त आहे, असेंच ह्मणणें सयुक्तिक दिसतें. अन्यत्रही लिहिलें आहे कीं,

तद्वपुः पंचभिर्मंत्रैः पंचकृत्योपयोगिभिः
ईशतत्पुरुषाघोरवामाद्यैर्मस्तकादिमत्

अर्थ—पांच **कृत्यांत** उपयोगी पडणारे **ईशप्रभृति** पांच मंत्र हेच परमेश्वराच्या शरीराचे मस्तकादिक अवयव होत. आतां "पंचवक्त्रस्त्रिनेत्रदृक्" इत्यादि वचनांवरून तर परमेश्वराचें शरीर अस्मदादिकांप्रमाणें आहे असें स्पष्ट होतें; असें असतां तुह्मीं त्याचें शरीर शाक्त ह्मणतां हें कसें? तर आह्मीं असें ह्मणतों कीं निराकाराचें ध्यानादिक होऊं शकत नाहीं, ह्मणून भक्तांवर अनुग्रह करण्याच्या हेतूनें परमेश्वरच अनेक आकार धारण करितो. ह्मटलेंही आहे कीं—

आकारवांस्त्वं नियमादुपास्यो
न वस्त्वनाकारमुपैति बुद्धिः

अर्थ—आपली बुद्धि आकाररहित पदार्थाचें आकलन करूं शकत नाहीं; ह्मणून कांहीं तरी आकार धारण करणाऱ्या परमेश्वराचीच आपण उपासना करावी हें बरें. आतां **कृत्यपंचक** कोणतें? तर **भोजराजानें** असें ह्मटलें आहे कीं—

पंचविधं तत्कृत्यं सृष्टिस्थितिसंहारतिरोभावाः
तद्वदनुग्रहकरणं प्रोक्तं सततोदितस्यास्य

अर्थ—**सृष्टि, स्थिति, संहार, तिरोभाव, अनुग्रह**, हीं पांच परमेश्वराचीं **कृत्यें** होत. या पांच **कृत्यांस कृत्यपंचक** ह्मणतात. हीं पांच **कृत्यें, परमेश्वर शिव** खुद्द आपण होऊन करितो, असें **शुद्धमार्गानें** चालणाऱ्यांचें ह्मणणें आहे. एतद्विरुद्ध मार्गानें चालणारे तर, **अनंतादिकांजवळून शिव** हीं कृत्यें करवितो; अर्थात् शिवाच्याठायीं कर्तृशब्दाचा प्रयोग औपचारिक आहे, असें ह्मणतात. **श्रीमत्करणांत** स्पष्ट लिहिलें आहे कीं—

शुद्धेऽध्वनि शिवः कर्ता प्रोक्तोऽनंतोऽहिते प्रभोः

अर्थ—**शुद्ध मार्गांत शिव**च कर्ता होय; तद्विरुद्ध मार्गांत तर कर्तृत्व **अनंताचें** असें ह्मणतात. याप्रमाणें **पतिपदार्थाचें** तर निरूपण झालें. आतां **पशुपदार्थाविषयीं** विचार करूं या. ज्याचें ग्रंथांतरीं **क्षेत्रज्ञादिक** पदांनीं निरूपण केलें आहे असा जो **जीवात्मा**, त्यासच आह्मी **पशु** ह्मणतों. देह हाच **आत्मा** असा जो **चार्वाकांचा** वाद तो युक्त नाहीं; कारण तसें असल्यास, ज्यानें दिवाळीच्या दिवशीं सांगलीकरांचें नाटक पाहिलें, तोच मी आज दाहा महिन्यांनीं माझ्या नवीन झालेल्या मुलाचें चुंबन घेत आहें, असें प्रतिसंधान उत्पन्न होऊं शकत नाहीं. **नैयायिकांप्रमाणें** हा **आत्मा** प्रमेय, असेंही ह्मणणें आह्मांस बरोबर दिसत नाहीं; कारण तसें

ह्मटल्यास त्या प्रमेयाचा प्रमाता त्याहून भिन्न आहे, असें ह्मटलें पाहिजे, व असें ह्मटल्यास त्याहून भिन्न जो प्रमाता तो आत्मा, हें ह्मणणें किती विरुद्ध आहे, हें विवरण करण्याची फारशी जरूर आहे असें आह्मांस वाटत नाहीं, कारण हें अगदीं उघड आहे. **आर्हतां**प्रमाणें तो अव्यापक आहे असें व **बौद्धां**प्रमाणें तो क्षणिक आहे असेंही आमच्यानें ह्मणवत नाहीं; कारण देश व काल या दोहोंनीही तो अनवच्छिन्न आहे; अर्थात् तो विभु व नित्य आहे. **वेदांत्यां**प्रमाणें तो एकच आहे, असेंही ह्मणणें सयुक्तिक नाहीं; कारण सुखदुःखांचा जो या जगांत विभाग केलेला आहे त्यावरूनच आत्मे अनेक असले पाहिजेत, असें स्पष्ट होतें. **सांख्यां**प्रमाणें तो अकर्ता आहे असेंही ह्मणणें आह्मांस पुळपुळीत दिसतें. कारण **पाशा**च्या जालांतून मुक्त होतांच, त्याचें सर्वज्ञत्व व सर्वकर्तृत्व सुरू होतें. आतां असा जो हा **पाशांतून** मुक्त झालेला **पशु** तो, व त्याचा **पति** या दोहोंत भेद काय? तर **तत्त्वप्रकाशांत** असें उपपादन केलें आहे कीं—

मुक्तात्मानोऽपि शिवाः किंचैते तत्प्रसादतो मुक्ताः
सोऽनादिमुक्त एको विज्ञेयः पंचमंत्रतनुः

अर्थ—मोक्षास गेलेले मनुष्य **शिव**च होतात. भेद ह्मणून इतकाच कीं ते **शिवा**च्या प्रसादानें मोक्षास जातात; व पांच मंत्र हेंच ज्याचें शरीर असा जो शिव तो तर अनादि मुक्त आहे. असो. असा जो हा **क्षेत्रज्ञादि** पदवेदनीय **जीवात्मा** याचे **विज्ञानाकल, प्रलयाकल,** व **सकल** असे तीन भेद आहेत. **तत्त्वप्रकाशांत** यांचें असें निरूपण केलें आहे कीं—

पशवस्त्रिविधाः प्रोक्ता विज्ञानप्रलयकेवली सकलः
मलयुक्तस्तत्राद्यो मलकर्मयुतो द्वितीयः स्यात्
मलमायाकर्मयुतः सकलस्तेषुः द्विधा भवेदाद्यः
आद्यः समाप्तकलुषोऽसमाप्तकलुषो द्वितीयः स्यात्
आद्यानुगृह्य शिवो विद्येशत्वे नियोजयत्यष्टौ
मंत्रांश्च करोत्यपरास्ते चोक्ताः कोटयः सप्त

अर्थ—**विज्ञानाकल, प्रलयाकल, सकल** हे **पशूंचे** तीन भेद. पैकीं **विज्ञानाकल मलानें** मात्र युक्त असतो. **मल** व **कर्म** हीं दोन मात्र ज्याचीं शेष राहिलीं असतात त्यास **प्रलयाकल** ह्मणतात. **मल, माया, कर्म** या तिहींनींही जो बद्ध, तो **सकल**. त्यांत **समाप्तकलुष** व **असमाप्तकलुष** हे **विज्ञानाकलाचे** दोन भेद. **समाप्तकलुषांस** आठ **विद्येश्वरां**पैकीं कोणत्या तरी **विद्येश्वराचें** पद **शिवाच्या** कृपेनें मिळतें. **असमाप्तकलुष** तर सात कोटि **मंत्रां**पैकीं कोणतें तरी **मंत्रत्व** पावतात. **विद्येश्वर** कोणते? तर **बहुदैवत्यांत** असें लिहिलें आहे कीं—

अनंतश्चैव सूक्ष्मश्च तथैव च शिवोत्तमः
एकनेत्रस्तथैवैकरुद्रश्चापि त्रिमूर्तिकः
श्रीकंठश्च शिखंडीच प्रोक्ता विद्येश्वरा इमे

अर्थ—**अनंत, सूक्ष्म, शिवोत्तम, एकनेत्र, एकरुद्र, त्रिमूर्तिक, श्रीकंठ, शिखंडी,** हे आठ **विद्येश्वर** होत. **प्रलयाकल**ही दोन प्रकारचे आहेत. यांविषयींही **तत्त्वप्रकाश** असें ह्मणतो कीं—

प्रलयाकलेषु येषामपक्वमलकर्मणी व्रजंत्येते
पुर्यष्टकदेहयुता योनिषु निखिलासु कर्मवशात्

अर्थ—**प्रलयाकलांत** ज्यांचा **मल** व **कर्म** हीं पक्व झालीं नसतात, ते **पुर्यष्टकानें** युक्त होत्साते अनेक वार या संसारसागरांत पतन पावतात. आतां **पुर्यष्टक** कोणतें, तर तेथेंच ह्मटलें आहे कीं—

स्यात् पुर्यष्टकमंतःकरण धीः कर्म करणानि

अर्थ—अंतःकरण, बुद्धि, कर्म, पांच इंद्रियें, मिळून आठ; या अष्टकास **पुर्यष्टक** ह्मणतात. ही **अपक्वपाशद्वय** या नांवाचा जो **प्रलयाकलांचा** भेद त्याची गति सांगितली. दुसऱ्या भेदास **पक्वपाशद्वय** ह्मणतात. हे मोक्षाचे अधिकारी होत. **अपक्वपाशद्वयां**पैकीं जे कित्येक पुण्यशाली असतात, त्यांस **महेश्वर अनंत, भुवनपति** करितो. ह्मटलेंही आहे कीं—

कांश्चिदनुगृह्य वितरति भुवनपतित्वं महेश्वरस्तेषाम्

अर्थ—**अपक्वपाशद्वयां**पैकीं जे कित्येक पुण्यशाली असतात, त्यांच्यावर मोठी मेहेरबानीकरून **महेश्वर** त्यांस **भुवनपतित्व** देतो. **सकल** पशूंचेही दोनच भेद आहेत. पैकीं पहिल्यास **पक्वकलुष** ह्मणतात. दुसऱ्याचें नांव **अपक्वकलुष. पक्वकलुषांस** उपदेश करून मोक्षपदाप्रत नेण्यासाठीं **परमेश्वर** आपण होऊन आचार्याचा अवतार घेतो; व त्यांस **दीक्षा** देऊन मुक्त करितो. **अपक्वकलुषांस** अनेक जन्म घेऊन केलेल्या कर्माचें फल दस्तुर खुद्द भोगावें लागतें. याप्रमाणें **पशूचें** सांग निरूपण झालें. आतां **पाश**स्वरूपास आरंभ करूं या. ज्याच्या योगानें बद्ध झाल्यामुळें पुरुषास पारमेश्वर्याची प्राप्ति होत नाहीं त्यास **पाश** ह्मणतात. **मल, बल, कर्म, माया**; याप्रमाणें **पाश** चार प्रकारचा आहे; पैकीं **मलाचें** व्याख्यान असें केलें आहे कीं—

एको ह्यनेकशक्तिर्ह्येकक्रिययोच्छादको मलः पुंसः
तुषतंडुलवज्ज्ञेयस्तास्त्राश्रितकालिकावद्वा

अर्थ—मल हा खुद्द जरी एकच आहे ह्मणजे याचे प्रकार जरी मुळींच नाहींत, तथापि याच्या शक्ति अनेक असून अचाट आहेत. पहा, हा पुरुषाच्या दृष्टीस व क्रियेस सर्वथैव आच्छादून टाकितो. ज्याप्रमाणें तुष तांदुळांच्या आश्रयानें असतो, अथवा ज्याप्रमाणें तांबें हें कळंकास आश्रय देतें, त्याचप्रमाणें पुरुष हा **मलाचें** मोठें माहेर होय. **बल** ह्मणजे रोधशक्ति ही **शिवशक्ति पाशाचें** अधिष्ठान असून, पुरुषाचें तिरोधान मात्र करित्ये, ह्मणून हिचें **पाशत्व** औपचारिक होय. फलाची कामना धरून पुरुष जें कांहीं धर्माधर्मात्मक करितात, त्यास **कर्म** ह्मणतात. हें बीजांकुरन्यायानें अनादि होय. जीमध्यें शक्तिरूपाने प्रलयकालीं हें सर्व जग मावतें व जी सृष्टिसमयीं व्यक्त होय ती **माया.** तर **पदार्थ** ह्मणून **पति, पशु, पाश,** हे तीनच व या तीन **पदार्थां**चें यथार्थ आकलन करून पारमेश्वर्याची प्राप्ति करून घेणें हाच परमपुरुषार्थ असें या दर्शनाचें अवलंबन करणारे ह्मणतात.

पुढच्या खेपेस **प्रत्यभिज्ञादर्शनास** आरंभ करूं.

ठगाची जबानी.

खण्ड ५ वें. (पुढें चालू.)

तेथें बसलेल्या सर्व मंडळीला त्या ह्याताऱ्याची गोष्ट ऐकून मोठा अचंबा वाटला; व त्याची मोठी काकळूत आली. सर्वांहीं त्याचें समाधान केलें. इतरांपेक्षां त्या गोष्टींत माझें मन तर फारच विशेष रमलें; कारण माझ्या बापाच्या चरित्रापेक्षांही त्या गोष्टीनें, आपल्या सर्व कृती अल्लाच्या इच्छेनें चालतात अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री झाली. दोन्हीही लक्ष्यांत ठेवण्यासारखीं उदाहरणें खचीत; तरी त्या ठगाची गोष्ट विशेष ह्यांत संशय नाहीं. देवानेंच खुद्द ब्रिजलालाला आमच्या स्वाधीन केलें इतकेंच

नव्हे तर ज्या माणसावर त्यानें जुलमाची पराकाष्ठा करून त्याचा अतिशय छळ केला त्याच माणसाच्या हातीं—मरणानंतर जाहन्नमच्या अग्नींत पडण्यापूर्वी ह्या लोकींच शिक्षा भोगण्यासाठीं—जसें काय मुद्दाम आणून दिलें असें मला वाटूं लागलें. 'स्वत: पुढें होऊन अमुक एक कृत्य आंगावर घेऊन करण्याचा प्रसंग असतां ह्यानें हातपाय गाळिले' असें ह्या अमीरअल्लीविषयीं मी कधीं कोणास ह्मणूं देणार नाहीं असा म्यां आपल्या मनाशीं निश्चय केला. म्यां आपल्याशींच ह्मटलें, आजपासून मी आपल्या बापाची बराबरी करण्यास झटेन. आपल्या दुष्टपणाबद्दल व पापाचरणाबद्दल आपल्यास शासन करणारा हा कृतांतच अवतरला आहे असें देशांतील सर्व लोकांस आतां स्वानुभवानें भासूं लागेल. इतःपर माझ्या हातून कोणी सुटेल ही तर गोष्ट घडणेंच नाहीं. शपत घेतल्याप्रमाणें अक्षरशः मी वागणार. नांव माणूस ह्मटलें कीं मी त्याचा घातक वैरी बनलेलाच. ईश्वर करील तर हा अमीर अल्ली मोठ्या टोळीचा नाईक बनून आपल्या लोकांकडून हल्लींच्या काळांत कोणाच्याही हातून न घडणारीं, जशीं पुरातन दंतकथांतून साहस कामें ऐकतों तशीं, प्रत्यक्ष करून दाखवील.

त्या दिवसापासून आमच्या मंडळीचा गुरू होता त्याचा मी शिष्य झालों. तो अगदीं वृद्ध ठग होता; पण मोठा निष्णात. जे थोडे बहुत मोठे नामांकित होऊन गेले होते त्यांच्याच मालेंतील हाही होय अशी त्याची कीर्ति सर्वत्र गाजत असे. तो हिंदु असून जातीचा रजपूत होता. ह्यातारपणामुळें जरी तो अगदीं कृश झाला होता व त्याच्या आंगावर सुरकुत्या पडल्या होत्या तरी तो त्याचा उंच बांधा—ती त्याची भव्य छाती—त्या त्याच्या ठुसठुशीत वर आलेल्या शिरा ज्या, वरतीं मांसाचें आच्छादन नसल्यामुळें अगदीं स्वच्छ दिसत होत्या— पाहतांच हा मोठा अलौकिक सामर्थ्यवान् असावा असें सर्वांच्या सहज मनांत यावें. शिवाय त्याचें रूमाल चालविण्याचें अद्वितीय कसब मनांत आणिलें कीं त्याजविषयीं लोक ज्या विलक्षण व असंभाव्य गोष्टी सांगत त्या सर्व खऱ्या असाव्या असा सहज मनाचा ग्रह होऊन जाई. तो वेळपावेतों माझें फारसें त्याच्याशीं संघटण नव्हतें. साहजिक कधीं गांठ पडल्यास उगाच परस्परांनीं सलाम मात्र करावे; ह्याहून जास्त आमची ओळखही नव्हती ह्मटलें तरीं चालेल. ह्मणून म्यां आपल्या बापास ह्मटलें, 'तुह्मी मला त्यांच्या स्वाधीन करा. भटोटीच्या कसबांत मला अगदीं पुरोपूर हुशार करण्याविषयीं त्यांजला सांगा.' मी होऊनच अशी विनंति केल्यामुळें माझ्या बापास पराकाष्ठेचा आनंद झाला; आणि त्यानें माझ्या ह्मणण्याला तात्काळ रूकार दिला; व लागलेंच मला, रूपसिंग म्या वरतीं सांगितलेला ठग हुसेनाच्या टोळींतील असल्यामुळें हुसेनाच्या व रूपसिंगाच्या स्वाधीन केलें.

माझा बाप मला ह्मणाला, 'आतां कांहीं काळपर्यंत तुझी माझी भेट होणार नाहीं. तूं आतां ह्याजपाशींच राहा. फिरून मजपाशीं परत येशील तेव्हां प्रसंगीं कोणतीही गोष्ट करण्यास 'हूं' ह्मणतांच सिद्ध होण्यासारखी तुझ्या आंगीं हुशारी आलेली माझ्या दृष्टीस पडूंदे मात्र.'

नंतर दुसऱ्या दिवसींच म्यां विधिपूर्वक

आपल्या अध्ययनाला आरंभ केला. रूपसिंगानें कांहीं मंत्र वगैरे ह्मणून जे संस्कार करणें ते केले. चार दिवसपावेतों मी मांसाला मुळींच शिवलों नाहीं; किंवहुना दुधाशिवाय म्यां कांहींच सेवन केलें नाहीं कां ह्मणाना ? आमच्या त्या कुठार देवतेची अनेक उपचारयुक्त विधिपूर्वक आराधना करून होमहवन नैवेद्य वगैरे सर्व यथासांग केलें. नेमानें शकुन वगैरे पाहाण्यांतही कोठें कांहीं अंतर पडलें नाहीं. रोजची मजल करून संध्याकाळीं मुक्कामावर उतरल्यानंतर मी कोठें झाडाखालीं बसलों ह्मणजे त्या झाडावर नांव पांखरूं येऊन बसलें कीं त्यांतून कांहीं तरी अर्थ काढीत. त्याप्रमाणेंच सकाळीं पुढें चालूं लागलों कीं प्रथम पक्षी श्वापद जें कांहीं आढळेल त्याजकडे सर्वांचें लक्ष्य असे; व त्याचा कांहीं तरी ते अर्थ करीत. ह्याप्रमाणें माझ्या निमित्त जे जे विधि करीत व मजकडून करवीत त्या सर्वांचा अर्थ समजवून घेण्याविषयीं स्वभावतः मी अतिशय उत्सुक होतों; परंतु माझे वृद्ध गुरुजी माझी जिज्ञासा तृप्त करीनात.

त्यांहीं मला ह्मणावें, 'बेटा, मी तुझ्या एवढा होतों कीं नाहीं त्यावेळीं, माझी भीति जावी, माझें हृदय पाषाणाप्रमाणें कठोर व्हावें, माझ्या आंगीं चांचल्य यावें, जें माणूस भेटेल त्याला आपल्या मायावी पाशांत गुरफटतां येण्यासारखी, व कदाकाळीं आपल्या शत्रूंच्या सपाट्यांत न सांपडण्यासारखी व कदाचित् सांपडलें असतांही अनेक युक्तिप्रयुक्ति लढवून आपला पाय काढून घेण्यासारखी धूर्तता माझ्या आंगीं यावी; माझें नशिब सर्वदा मला अनुकूळ राहावें; व सर्वत्र मला यश आणि कीर्ति प्राप्त व्हावी, ह्मणून असेच नानाप्रकारचे संस्कार मलाही केले होते; व अनेक नेम व व्रतें मजकडून करविलीं होतीं, व तीं सर्व सफलही झालीं. कोणतीही गोष्ट मला प्रतिकूळ झाली नाहीं. तसेंच म्यां दोघांजणांस अनुग्रह दिला आहे त्यांची दिवसेंदिवस अशी चढती कळा आहे कीं ते लवकरच जमादारीच्या हुद्याला येऊन पोंचतील. त्यांची हुशारी तशीच वाखाणण्यासारखी आहे. तूंही तसाच होशील. पण माझें ऐक, उगाच पाखंड्याप्रमाणें नाहीं नाहीं त्या शंका काढून मला विचारायास लागूं नको. झाडून सर्व गोष्टी नीट अगदीं माझ्या मनाप्रमाणें होत आहेत हें समजून समाधान मान आणि स्वस्थ ऐस. हा वेळपावेतों आपल्यास एकही अपशकुन झाला नाहीं.

ह्याप्रमाणें चार दिवस गेल्यावर पांचव्या दिवसीं माझ्या हातांत रुमाल दिला. प्रथम मला सुगंधतैलाभ्यंग करून आंघोळ घातली. भवानीच्या भक्तांचें दर्शक चिन्ह ह्मणून माझ्या कपाळीं हिंगुळाचा टिळा लावला. आणि नंतर मला भटोटी अशी संज्ञा दिली.

माझ्या हातीं रुमाल देत्यावेळीं तो ह्मातारा हंसत ह्मणाला, 'खरेंच, मी एक गोष्ट विसरलों; आणि ती तर सर्वांत प्रधान. ह्या रुमालानें काम कसें करावें तें तर म्यां तुला मुळींच सांगितलें नाहीं. त्या कामांत माझी शैली व खुबी कांहीं निराळीच आहे; तरी ती साधण्याला कांहीं अवघड नाहीं. तूं झटकन् शिकशील.'

त्यानें तो रुमाल घेतला; त्याच्या एका टोंकास एक रुप्याचा तुकडा बांधून घट्ट गांठ मारली; आणि तें टोंक डाव्या हातांत धरून दुसरें टोंक उजव्या हातांत धरलें.

दोन्ही हातांच्या दरम्यान सरासरी माणसाच्या मानेला एक वळसा पडे इतकें अंतर राहूं दिलें; आणि दोन्ही हातांच्या मुठी मिटून त्यांचीं तोंडें वरतीं केलीं.

नंतर तो ह्मणाला, 'पाहा, हें नीट ध्यानांत ठेव. पाठीमागून मानेवर रुमाल टाकल्यावर रुमालाचा विळखा मानेला घट्ट बसतांच झट्कन् बोटें पुढें आणून जिकडून सोईवार पडेल तिकडून गळा दाबावा. ह्याप्रमाणें जर नीट कसबानें काम केलें तर प्राण ह्मणजे काय क्षणांत जातो.

मग म्यां त्याच्या हातांतून रुमाल घेतला आणि त्यानें दाखविल्याप्रमाणें धरला, पण त्याच्या मनास येईना. तो ह्मणाला, 'दे हिकडे, मी पुनः नीट धरून तुझ्या गळ्यावर टाकून तुला नीट दाखवितों.'

म्यां हंसत ह्मटलें, 'छः, तेवढें नका करूं, तुमच्या मनांत मला मारावें असें नाहीं खरें; पण रुमाल टाकतेवेळीं हा कोणी वाटसरूच आहे असा तुमच्या मनाला कदाचित् भास झाला तर तात्काळ माझा प्राण मात्र जाईल. पण आतां तुमची खुबी मी नीट समजलों.' पाहा, मी तुमच्या मनाप्रमाणें करून दाखवितों. तो ह्मणाला, 'बरें तर; अमीरअल्ली, चल, घे; दाखव पाहूं; तूं माझ्याच गळ्यावर टाकून दाखव. तुला कसा काय हात साधतो तें मला पाहूंदे.'

म्यां त्याप्रमाणें केलें, पण तो हंसला आणि डोकें हालवून ह्मणाला, 'छः, अशानें कांहीं नाहीं व्हायाचें. अशानें तर लहान पोराचा सुद्धां जीव नाहीं जाणार. बरें, पहा तर मी आतां तुला दाखवतों. माझा हात तुझ्या गळ्यावर येऊन बसला कीं तूं समज बरें.'

मग म्यां सरासरी वरवर हंसून 'बरें' ह्मटलें; पण मनापासून मला खरोखर ती गोष्ट आवडली नाहीं. त्याचे ते थंडगार आणि रांठ हात गळ्याला येऊन लागतांच माझ्या आंगाला कांप सुटून हींव भरलें व मी अगदीं घामाघूम झालों. पण त्यानें मला किंचित्ही दुखविलें नाहीं. त्याची ती कृति पाहून माझ्या करण्यांत काय चुकत होतें तें माझ्या लक्षांत आलें. नंतर त्यानें मला करून दाखविल्याप्रमाणें म्यां त्याच्या मानेवर हात टाकून दाखविला. शेवटीं एकदांचें माझें करणें त्याच्या पसंतीस पडलें; आणि त्यानें मान डोलवून 'उत्तम' ह्मटलें.

तो ह्मणाला, 'अमीरअल्ली, खुबी तर तुला साधली; आतां हात चांगला घटण्याला पुष्कळ व्यासंग झाला पाहिजे. आतां तेवढेंच शेवटचें काम राहिलें आहे.'

म्यां ह्मटलें, 'इनषाल्ला! रूपसिंगजी दया करतील तर आतां हवी तेवढी संधी येईल. एकदां मला आरंभ मात्र करूं द्या; मग नाहीं मी भीत. जसें वाघानें एकवार माणसाचें रक्त चाखलें कीं मग त्याला दुसरें कांहीं आवडेनासें होतें; व तो माणसासाठीं प्राण देतो व कशालाही भीत नाहीं; त्याप्रमाणेंच माझी अवस्था होईल, असें मला वाटतें.' साहेब, आणि खरेंच आपल्यास सांगतों कीं पुढें तसेंच झालें; मी बोललों त्यांत एक भाषणही मिथ्या झालें नाहीं.

(पुढें चालेल.)

भोजप्रबंध.

(पुढें चालू.)

मुंज तपोवनांत गेल्यानंतर भोजराजानें बुद्धिसागरास मुख्य प्रधानाची जागा दिली

आणि आपण राज्यसुख भोगूं लागला. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर कोणे एके समयीं क्रीडोद्यानांत जात असतां राजानें धारा नगरांत राहणारा एक विद्वान् ब्राह्मण पाहिला. राजा येत आहे असें पाहून तो ब्राह्मण डोळे मिटून चालूं लागला. तें पाहून राजानें त्यास विचारलें, हे विप्रा, मला पाहून तूं स्वस्तिवचनही बोलत नाहींस, परंतु उलटें डोळे मिटून चालतोस, याचें कारण काय बरें? ब्राह्मणानें उत्तर दिलें, राजा, तूं वैष्णव आहेस, ह्मणून ब्राह्मणांस उपद्रव देत नाहींस; तेव्हां तुझ्यापासून मला भीति नाहीं. कोणास कांहीं देत नाहींस, ह्मणून तुझ्यांत दाक्षिण्यही नाहीं; तेव्हां तुला आशीर्वाद देऊन तरी काय फळ? आणखी प्रातःकाळींच कृपणाचें मुखावलोकन झालें तर उलटी हानिच आहे असें लोक ह्मणतात, ह्मणून डोळे मिटले. असें ह्मटलें आहे,

प्रसादो निष्फलो यस्य क्रोधश्चापि निरर्थकः ।
न तं राजानमिच्छन्ति पतिं षण्ढमिव स्त्रियः ॥

जशा स्त्रिया क्लीब पतींची इच्छा करीत नाहींत, तद्वत् जो प्रसन्न झाला असतां बक्षीस देत नाहीं व क्रोधाविष्ट झाला असतां शासन करीत नाहीं असा राजा प्रजेस आवडत नाहीं.

अप्रगल्भस्य या विद्या कृपणस्य च यद्धनम् ।
यच्च बाहुबलं भीरोर्व्यर्थमेतत्त्रयं भुवि ॥

या जगांत अप्रगल्भ पुरुषाची विद्या, कृपणाचें धन व भित्र्याचें बाहुबल, हीं सर्व व्यर्थ होत. राजा, माझा वृद्ध पिता काशीयात्रेस जाण्यास निघाला असतां मी याउपर काय करावें असें त्यास विचारलें. पित्यानें उत्तर दिलें,

यदि तव हृदयं सुनयं विद्वन्स्वप्नेपि मास्म सेविष्ठाः ।
सचिवजितं युवतिजितं खलविजितं गर्वितं च राजानम् ॥

हे विद्वन्, जर तुझ्या अंतःकरणांत कांहीं नीतीचा लेश असेल तर मंत्री, स्त्रिया व दुर्जन यांच्या आज्ञेंत राहणारा आणि गर्विष्ठ अशा राजाची सेवा स्वप्नांतही करूं नको.

पातकानां समस्तानां द्वे परे पातके मते ।
एकं दुःसचिवो राजा द्वितीयं च तदाश्रयः ॥

सर्व पातकांत दोन पातकें मोठीं मानलीं आहेत; एक, दुष्ट प्रधान जवळ बाळगणारा राजा; आणि दुसरें, असल्या राजाचा आश्रय.

अविवेकमतिर्नृपतिर्मन्त्रिषु गुणवत्सु वक्रितग्रीवः ।
यत्र खलाश्च प्रबलास्तत्र कथं सज्जनावसरः ॥

मूर्खबुद्धीचा, गुणवान् प्रधानास पाहून मान फिरविणारा, दुष्टांस प्राबल्य देणारा अशा राजाजवळ सज्जनांचा रीग कसा लागेल?

राजा सम्पत्तिहीनोपि सेव्यः सेव्यगुणान्वितः ।
भवत्याजीवनं तस्मात्फलं कालान्तरादपि ॥

राजा संपत्तिहीन जरी असला तरी सेवा करण्यास योग्य अशा गुणांनीं युक्त जर असेल तर त्याची सेवा करावी; त्याच्या पासून लाभ ह्मणून जरी आपणास लागलाच झाला नाहीं (तो कांहीं काळानंतर होईलच) तरी आपली जीविका तरी चालण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं.

राजा, कृपण पुरुषाचें दाक्षिण्य कोणी मनांतही आणीत नाहीं. पूर्वी दधीची, कर्ण, शिबी, विक्रम प्रभृति भूपति परलोकीं गेले असतांही आपल्या दानसामर्थ्यानें पृथ्वीवरच राहात आहेत कीं काय असें वाटतें; त्यांची योग्यता दुसऱ्या कोटयावधि राजांपैकीं, कोणास येते काय? राजा,

देहे पतिनि का रक्षा यशो रक्ष्यमपाति यत् ।
नरः पतितकायोपि यशःकायेन जीवति ॥

देहाचा केव्हां तरी पात होणारच होणार, तेव्हां त्याचें रक्षण तें आपण काय करणार?

यासाठीं चिरकालस्थायि असें जें यश याचेंच रक्षण करणें रास्त दिसतें. हा जड मनुष्याचा देह जरी पडला तरी तो यशोरूपी देहानें सर्वदा जीवंत आहेच.

पण्डिते चैव मूर्खे च बलवत्यतिदुर्बले ।
ईश्वरे च दरिद्रे च मृत्योः सर्वत्र तुल्यता ॥

विद्वान् आणि मूर्ख, बलवान् आणि अतिशय दुर्बल, धनाढय आणि दरिद्री या सर्वांस मृत्यु सारखेंच लेखतो.

निमेषमात्रमपि ते वयो गच्छन्न तिष्ठति ।
तस्माद्देहेष्वनित्येषु कीर्तिमेकामुपार्जय ॥

तुझें आयुष्य चाललें आहे तें क्षणमात्रही राहत नाहीं म्हणून या क्षणभंगुर जीवितांत एक कीर्ति मात्र जोड.

जीवितं तदपि जीवितमध्ये
गण्यते सुकृतिभिः किमु पुंसाम् ।
ज्ञानविक्रमकलाकुललज्जा-
त्यागभोगरहितं विफलं यत् ॥

ज्ञान, पराक्रम, कला, कुल, लज्जा, दान, भोग इत्यादिकांनीं रहित असें जें पुरुषाचें निष्फळ जीवित त्यास शहाणे जन जीवितामध्यें लेखतात काय? सारांश त्याला जीवित म्हणणें योग्य नाहीं.

हा उपदेश ऐकून जसें काय एखाद्यानें अमृताच्या समुद्रांत स्नान करावें, किंवा परब्रह्माच्या पदीं लीन व्हावें तद्वत् राजाची अवस्था होऊन तो नेत्रांतून आनंदाश्रु गाळूं लागला आणि त्या ब्राह्मणास म्हणाला, हे विप्रश्रेष्ठा,

सुलभाः पुरुषा लोके सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥

या जगांत सतत गोड भाषण करणारे पुरुष पाहिजे तितके सांपडतील पण अप्रिय असतांही हितकार असें सांगणारा व ऐकणारा मिळण्यास कठीण. असें म्हणून त्या ब्राह्मणास एक लक्ष रूपये देता झाला, व तुझें नांव काय, असें विचारलें. त्यानें आपलें नांव भूमीवर लिहिलें. "गोविंद" असें नांव वाचल्यावर राजा त्यास म्हणाला, गोविंदपंडित, आपण प्रत्यहीं राजसभेंत येत जावें; आपणास कोणी निषेध करणार नाहीं. विद्वानांस दुःख होऊं नये म्हणून दुसरेही विद्वान् कवि सभेंत आणीत जावें. हें काम आपण सदोदित करीत असावें.

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यानंतर राजा विद्वानांस चाहतो, आणि पुष्कळ धन देतो, अशी लोकांत त्याची ख्याति झाली. ती ऐकून आठही दिशांकडून सहस्रावधि विद्वान् लोक राजाकडे आले. याप्रमाणें धनाचा व्यय करीत असतां कोणेएके समयीं मुख्य प्रधान राजास म्हणाला, राजा, राजांजवळ द्रव्य जर असेल तरच त्यांचा जय होतो, येरव्हीं होत नाहीं. द्रव्यामुळें हत्ती घोडे पदाति इत्यादि सैन्य मिळतें. सैन्य असेल तर राजा शत्रूंस जिंकला जात नाहीं. द्रव्यानेंच दुर्ग प्राप्त होतात, म्हणून हे राजा, आपला विजय व्हावा अशी ज्यांस इच्छा आहे त्यांनीं धनाचा व्यय करूं नये. म्हटलें आहे,—

स जयी यस्य मातङ्गा यस्याश्वास्तस्य मेदिनी ।
कोशो यस्य स दुर्धर्षो दुर्ग यस्य स दुर्जयः ॥

ज्याच्या जवळ हत्ती असतात त्याचा जय होतो; ज्याच्या जवळ अश्व, त्याला भूमि प्राप्त होते; द्रव्य जवळ राखणारा दुर्धर्ष असतो आणि दुर्ग बाळगणाराचा पराजय कधींही होत नाहीं. राजा, तूं चतुरच आहेस, तेव्हां तुझ्यापुढें भाषण करण्याची माझी काय प्राज्ञा? राजानें उत्तर दिलें,

दानोपभोगवन्ध्या या सुहृद्भिर्या न भुज्यते ।
पुंसां हि यदि सा लक्ष्मीरलक्ष्मीः कतमा भवेत् ॥

जिचें दान किंवा उपभोग होत नाहीं व जिचा आपल्या मित्रांसही उपभोग मिळत नाहीं, अशीस जर लक्ष्मी ह्मणावें तर अलक्ष्मी ती तरी कोणती ? असें ह्मणून राजानें त्यास प्रधानाच्या अधिकारावरून काढून त्याच्या जागीं दुसऱ्यास नेमिलें व त्यास ह्मणाला,

लक्षं महाकवेर्देयं तदर्धं विबुधस्य च ।
देयं ग्रामकवेर्वत्स तस्याप्यर्धं त्वयान्वहम् ॥

प्रधानजी, महाकवीला एक लक्ष रूपये द्यावे, विद्वानास अर्धालक्ष, व साधारण कवीस पावलक्ष याप्रमाणें प्रत्यहीं दान करावें; आणि जो कोणी प्रधान मला दान करण्यास निषेध करील त्यास मारून टाकावें.

प्रियः प्रजानां दातैव न पुनर्द्रविणेश्वरः ।
आगच्छन्कांक्ष्यते लोकैर्वारिदो न तु वारिधिः ॥

प्रजेला दाताच प्रिय असतो, धनवान् प्रिय नसतो; लोक वर्षाकालीं पाणी देणाऱ्या असा जो मेघ त्याची इच्छा करितात, पण पाण्याचा मोठा संचय आहे तरी समुद्राला कोणी विचारीत नाहीं.

(पुढें चालेल.)

अर्थशास्त्र.

(पुढें चालू)

८ लोन्स ह्मणजे कर्ज काढून राजकीय खर्च भागल्यापासून परिणाम. (पुढेंचालू.)

येथें आणखीं एक गोष्ट लक्षांत बाळगली पाहिजे. ती ही कीं, युद्धप्रसंगीं युद्धाच्या कामाकडे लावण्याकरितां उत्पादक कामांतून नुसतें भांडवलच काढून घेतलें जातें असें नाहीं, उत्पादक श्रमकर्तेही काढून घेतले जातात; व उत्पादक श्रमकर्त्यांनां मजूरी देण्याच्या भांडवलांतून ज्या रकमा काढल्या जाऊन युद्धकामाकडे दिल्या जातात त्या रकमांचा कांहीं अंश त्याच उत्पादक श्रमकर्त्यांनां अन्य किंवा श्रमकर्त्यांना युद्धाच्या अनुत्पादक श्रमाची मजूरी देण्याकडे योजिला जातो व ह्या इतक्या योजनेनें वरल्या लेखनखंडांत डाक्तर चामर्सांच्या मतानुसार सांगितलेल्या प्रकाराच्या उलट प्रकार घडून येतात. संपत्त्युत्पत्तीच्या कामांतून काढून लष्कर किंवा आरमार हीं बनवण्याकरितां कामकऱ्यांना तिकडे घातलें तर त्यांचें नुकसान नाहीं, भांडवलवाल्यांचा फायदा नाहीं व देशांतील संपत्त्युत्पत्तीचें मान युद्धाकडील खर्चाइतकें कमतरणार. ह्मणून डाक्तर चामर्सांचें मत हें जरी ब्रिटिश देशाच्या संबंधानें खरें आहे तरी तें अन्य स्थितीच्या देशांनां सर्वोपरी लागू होणें नाहीं. नेपोलियन यांचीं युद्धें चाललीं होतीं त्यावेळच्या फ्रान्स देशाच्या स्थितीस तें मत लागतें किंवा नाहीं हें पाहूं या. त्या वेळीं एकसारखीं अनेक वर्षेपर्यंत फ्रान्स देशांतील कामकरी लोकांची धार लष्करांत फारच झपाट्यानें वाहत होती, व ज्या पैशानें लढाई चालू होती तो पैसा फ्रेंच सैन्यानें काबीज केलेल्या देशांतून वर्गणी करून जमविलेला असून खुद्द फ्रेंच भांडवलांतून उगीच थोडासा घेतलेला होता. ह्मणून फ्रान्स देशांत कामकऱ्याची मजूरी उतरली नाहीं, उलटी चढली; कामकऱ्यांनां काम देणाऱ्या भांडवलवाल्यांस कांहीं फायदा न होतां नुकसानें आलीं व इतका मोठा उत्पादक कामकरी लोक मह-

कुबीमुळें किंवा अगदीं नष्ट झाल्यामुळें देशसंपत्तीची अगदीं हानि झाली. परंतु हा सर्व प्रकार इंग्लंड देशांत उलटा झाला. पडोसा पहातां, पूर्वी होते त्यांहून अधिक शिपाई व खलाशी इंग्लिशांनीं फार थोडे ठेविले; परंतु युरोपखंडांत चाललेल्या लढाईंतील आपले तर्फेच्या पक्षकाराकरितां सैन्य राखण्यासाठीं व त्यांनां लढाईचें सामान पुरविण्यासाठीं, उत्पादक कामीं लागलेल्या भांडवलांतून त्यांणीं लक्षावधि रूपया काढला. येणेंकरून या वरच्या लेखनखंडांत समजाविल्याप्रमाणें, इंग्लंड देशांतील कामकऱ्याचें नुकसान झालें, तेथील भांडवलवाले अधिक सधन झाले; व संपत्त्युत्पत्तीचीं तेथील शाश्वत साधनें हीं नष्ट न होतां जशींचीं तशीं राहिलीं.

येथें आपण एका वादग्रस्त विषयाप्रत पावलों. त्या विषयाकडे डाक्तर चामर्स याणें विशेष लक्ष पोंहचविलें आहे. तो विषय हा कीं विलक्षण प्रसंगीं अनुत्पादक व्यय करण्याकरितां सरकारास पैसा लागतो तो 'लोन्स' काढून ह्मणजे कर्ज काढून जमा करून मग कर बसवून 'लोन्स' देणारांनां फक्त व्याज देत जावें, किंवा एकदम अनेक कर बसवून लागणारा सर्व पैसा पहिल्या एकाच वर्षात जमा करावा. या दोहोंपैकीं कोणती तजवीज चांगली? दुसरीच तजवीज करावी असें डाक्तर चामर्स मोठ्या दुराग्रहानें ह्मणतो, तो ह्मणतो कीं,—सर्व रकम पहिल्याच वर्षीं सरकारानें मागितली तर लोकांचे हातून जें होणें अशक्य किंवा फार गैरसोईचें तेंच मागणें होय, तसेंच आपल्या वार्षिक उत्पन्नांतून सर्व रकम एकदम देणें ती अतिशय हाल भोगल्यावांचून लोकांच्यानीं देववणार नाहीं व आह्मांपासून एकदम इतकी मोठी आहुति न घेतां व्याजाच्या रूपानें प्रतिवर्षीं थोडी थोडी रकम देण्यास आह्मास सांगितलें तर अधिक सोईचें होईल, असा लोकसमज आहे.— याला डाक्टर चामर्स हें उत्तर देतो कीं दोहोंतून कोणचेंही केलें तरी आहुति एकसारखीच दिली जाते. सरकाराची रक्कम भरण्याकरितां जें देणें द्यायाचें तें फक्त एका वार्षिक उत्पन्नांतून काढतां येतें. देशांत उत्पन्न झालेली एकंदर संपत्ति व तिचे हरएक अंश हीं कोणाचीं तरी वार्षिक उत्पन्न असतातच. ह्मणून एकंदर सर्व रकम अनेक कर घेऊन लोकांपासून एकदम जमा केली तर त्यापासून, लोकसमजाप्रमाणें, होणारे हाल, तीच रकम 'लोन्स' रूपानें घेतल्यानें, टळत नाहींत. ते हाल तर न टळतां उलटे, ते काढण्यास जे लोक अगदीं असमर्थ व ज्यांणीं ते किंचित्ही भोगूं नयेत अशा त्या कामकऱ्यांवर मात्र टाळले जातात, व इतकें होऊनही या 'लोना' करितां सदैव व्याज भरण्यासाठीं जे कर द्यावे लागतात त्यांपासून लोकांना शारीरिक व व्यावहारिक आणि राज्यास होणाऱ्या गैरसोई ह्या निवळ नुकसान अशा सोसल्या पाहिजेत. अनुत्पादक व्ययार्थ सरकारास उसणा देण्याकरितां उत्पादक कामांतून किंवा उत्पादक कामाकडे योजलेल्या भांडवलांतून जेव्हां जेव्हां पैसा काढला जातो तेव्हां तेव्हां तो तितका सर्व पैसा कामकऱ्यांच्या हातीं जाण्याचा बंद होतो. ह्मणून खरोखर पहिल्याच वर्षीं लोन देऊन टाकलें जातें व तें देऊन टाकण्याकरितां जितकी घस खावी लागत्ये तितकी सर्व खाली जाणारच. पण तें भलत्याला दिलें जातें

एवढेंच होतें ह्मणून मागणें संपत नाहीं व सर्व प्रकारच्या करांमध्यें अतिदुष्ट कर जो नुसता कामकऱ्यांवरच पडतो त्या करानें तें दिलें जातें. याप्रमाणें अवलपासून अखेरपर्यंत पराकाष्ठेच्या कष्टदायक व भलत्याच तऱ्हेनें प्रयत्न करून देणें काढून टाकिलें तरीही त्या देण्याचें व त्याला सदैव व्याज भरण्याचें ओझें देशावर राहातेंच राहतें.

लोनामध्यें जितका पैसा गुंतला जातो तितका सर्व पैसा एऱ्हवींही देशांतल्या देशांतच उत्पादक कामाकडे लागला जाईल असें असेल तर इतक्यापुरतें मात्र हे डाक्टर चामर्सांचे वरील विचार आह्माला अगदीं वाजवी दिसतात. तथापि या कल्पिलेल्या प्रकारांशीं हुबेहुब जमणारा प्रकार व्यवहारांत क्वचित् घडून येतो. हलक्या श्रीमंतीच्या देशाचीं 'लोनें' परमुलखाच्या भांडवलानें भरून येतात, व सरकारच्याहून कमतर जिम्यावर हें भांडवल कदाचित् दिलें जाणार नाहीं. तसेंच श्रीमंत व भरभराटीच्या देशांचीं 'लोनें' उत्पादक कामांतून भांडवल काढून भरलीं जात नाहींत, तर नव्या प्राप्तींतून सतत नवा संग्रह होत असतो त्यांतून भरलीं जातात; व हमेष असें घडतें कीं, त्या संग्रहाच्या थोड्याच अंशानें भरलीं जातात. हा संग्रह अशा रीतीनें न घेतला तर तो अन्यत्र वसाहत केलेल्या ठिकाणीं पाठविला जाईल, अथवा बाहेर देशांत अन्य कामीं लाविला जाईल. सारांश, या दोनही देशांस लागणारा पैसा 'लोन' घेऊन उभा केल्यास कांहीं हरकत नाहीं; कारण असें केल्यानें कामकऱ्यांचें कांहीं अनहित व्हावयाचें नाहीं किंवा देशांतील संपत्युत्पादक कामांनां कांहीं धक्का यावयाचा नाहीं, पण दोहोंसही हितावह होईल. व हें ती रकम कर बसवून एकदम उभी केली तर होणें नाहीं. कारण कर हे विशेषतः जेव्हां जबर असतात तेव्हां बहुतकरून हमेष अंशतः जी संपत्ति एऱ्हवीं मागें टाकिली जाऊन भांडवलास मिळविली जाणार ती देऊन वारिले जातात. आणखीं हें कीं एखाद्या देशांतलें भांडवल,—त्याला सालोसाल अधिकाधिक भर पडून तें इतकें फुगेल कीं, त्याला कमती न होऊं देतां किंवा सपाट्यानें होणाऱ्या त्याच्या वाढेला फारसा धोकाही न येऊं देतां, त्यांतून थोडासा अंश बाहेर काढतां येऊन तो अनुत्पादक व्ययीं घालतां येईल;—असें असेल तर, एऱ्हवीं जरी तो सारा अंश उत्पादक भांडवल बनून उत्पादक कामींही लागला जाईल असी गोष्ट असली तरीही, तो अंश अनुत्पादक कामीं लागल्यानें आपल्या पहिल्या कल्पित प्रकारांतल्याहून त्या देशांतील मजूर लोकांचें फार कमी नुकसान होईल व लोन घेऊन, ह्मणजे कर्ज काढून, खर्च भागण्याच्या शिस्तीस फारच कमी बाध येईल. या विषयाची ह्मणजे देशभांडवलांतून कांहीं अंश वर कल्पिलेल्या प्रमाणें एकीकडे काढून घेतल्यानें देशाचें नुकसान अवश्यमेव व्हावेंच असें नाहीं. याविषयाची वाटाघाट पुढें अन्यत्र योग्य स्थलीं होणारच आहे, ह्मणून पूर्वी सांगितलेल्या सिद्धांतावरून खोटेखोटे तर्क निघतील ते न निघूं देण्याची आवश्यकता पाहून या विषयाची येथें आगाऊ सूचना मात्र देऊन सोडिली.

आयुष्यवर्त्तनक्रमाविषयीं श्रुति-स्मृतींच्या आज्ञा.

(पुढें चालू.)

देवल स्मृति.

नैष्ठिकानां वनस्थानां यतीनां ब्रह्मचारिणाम् ।
नाशौचं कीर्तितं सद्भिः शावे चापि तथैव च ॥

हारीत.–

आचार्यः स्वमुपाध्यायं पितरं मातरं गुरूम् ।
निर्हृत्य तु व्रती प्रेतं न व्रतेन वियुज्यते ॥
मातापित्रोस्तु यत्प्रोक्तं व्रतचारी तु पुत्रकः ।
व्रतस्थोपि हि कुर्वीत पिण्डदानोदकक्रियाम् ।
भवत्यशौचं नैवास्य न वाग्निस्तस्य लुप्यते ।
स्वाध्यायं च प्रकुर्वीत पूर्ववद्विधिदर्शितम् ॥

तात्पर्य–ब्रह्मचाऱ्यास अशौच नाहीं. कदाचित् आईबापांचा तो एकटाच पुत्र असल्यामुळें वगैरे कारणांनीं त्यासच त्यांचें और्ध्वदेहिक करावें लागलें तरी तें और्ध्वदेहिक करण्याची जी घटका दोन घटकांची वेळ तितक्या वेळेसच त्यास अशौच असतें; स्नानोत्तर पुनः त्यास आपलीं सर्व कर्में व अध्ययन करण्यास मोकळीक आहे अशी वरच्या स्मृतीची आज्ञा आहे. परंतु या अस्पृश्यत्वाविषयीं यत्किंचित् मतभेद आहे.

असो, याप्रमाणें अध्ययनाच्या काळची ही विद्यार्थ्याची साधारण स्थिति झाली. आतां त्याच्या अध्ययनाचे विषय संक्षेपतः सांगतों.–चौदा विद्या व चौसष्ट कला यांत सर्व अध्ययनाचा समावेश होत असे, असें स्मृति व पुराणें यांवरून दिसतें. त्या चौदा विद्या खालीं लिहिल्याप्रमाणें:–

४ वेद–ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद.

६ अंगें–छंद, सूत्र, ज्योतिष, निरुक्त, शिक्षा व व्याकरण.

१ पुराणें अष्टादश.–१ ब्राह्म. २ पाद्म. ३ वैष्णव. ४ शैव. ५ लैंग. ६ गारुड. ७ नारदीय. ८ भागवत. ९ आग्नेय. १० स्कांद. ११ भविष्य. १२ ब्रह्मवैवर्त. १३ मार्कंडेय. १४ वामन. १५ वाराह. १६ मात्स्य. १७ कौर्म. १८ ब्रह्मांड.

१ न्यायशास्त्र.

१ पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा.

१ धर्मशास्त्र (गृह्यसूत्रें व मन्वादिस्मृति.)

चौसष्टकलांची याद मी सन १८७२च्या मेच्या ६ व्या व जुलैच्या १ ल्या तारखेच्या इंदुप्रकाशांत दिली आहे. ती अशी:–

१ अभिधानकोश. २ अक्षरमुष्टिकाकथन. ३ आकारज्ञान. ४ आकर्षकक्रीडा. ५ आलेख्य. ६ उत्साहन. ७ उदकघात. ८ उदकवाद्य. ९ ऐंद्रजाल. १० काव्यसमस्यापूरण. ११ कर्णपत्रभंग. १२ केशमार्जनकौशल. १३ क्रियाविकल्प. १४ कौंचमारणयोग. १५ गंधयुक्ति. १६ गीत. १७ चित्रयोग. १८ चित्रशाकापूपभक्तविकारक्रिया. १९ छंदोज्ञान. २० छलितयोग. २१ तंदुलकुसुमबलिप्रकार. २२ तर्ककर्म. २३ तक्षण. २४ दशनवसनांगराग. २५ दुर्वचकयोग. २६ देशभाषाज्ञान. २७ द्यूतविशेष. २८ धातुवाद. २९ नाटकाख्यायि-

१ ऋक्, यजुष् व साम हे तीनच वेद प्रथम होते, अथर्वण वेद मागून झाला, "तस्माद्यज्ञात्सर्वहुतः ऋचः सामानि जज्ञिरे" इत्यादिमंत्रांवरून असेंच होतें. "वेदत्रयी" म्हणून जो लेख जागोजाग आढळतो त्याचेंही कारण हेंच.

कादर्शन. ३० नाटय. ३१ नृत्य. ३२ नेपथ्ययोग. ३३ पट्टिकावेत्रबाणविकल्प. ३४ पानकरसरागासवयोजन. ३५ पुष्पवाटिकानिमित्तज्ञान. ३६ पुष्पास्तरण. ३७ पुस्तकवाचन. ३८ प्रतिमाला. ३९ प्रहेलिकाकूटवाणीज्ञान. ४० बालक्रीडन. ४१ भूषणयोग. ४२ मणिभूमिकाकर्म. ४३ मणिरागज्ञान. ४४ मानसीकाव्यक्रिया. ४५ लक्ष्यग्रथनविकल्प. ४६ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि. ४७ म्लेच्छितकविकल्प. ४८ यंत्रमातृकाधारणमातृकासंवाच्य. ४९ रौप्यरत्नपरीक्षा. ५० वस्त्रगोपन. ५१ वाद्य. ५२ वास्तु. ५३ विशेषकच्छेद्य. ५४ वीणाडमरूकवाद्य. ५५ वृक्षायुर्वेदयोग. ५६ वैजयिकविद्याज्ञान. ५७ वैतालिकविद्याज्ञान. ५८ वैनायिकविद्याज्ञान. ५९ शयनरचन. ६० शुकसारिकाप्रलापन. ६१ शेखरापीडयोजन. ६२ सूचीवानकर्म. ६३ सूत्रक्रीडा. ६४ हस्तलाघव.

हे विषय बहुतच आहेत व एका मनुष्याच्या आयुष्यमर्यादेंत कधींही समाप्त होणारे नाहींत. तरी एकंदर सर्व विषय इतके होते हें समजण्याकरतां यांचा उल्लेख येथें केला आहे. ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार व अवकाशानुसार विद्याध्ययन समाप्त झालें ह्मणजे आचार्याची आज्ञा घेऊन विद्यार्थी स्वगृहास जाण्याकरितां निघे. त्यावेळीं आचार्यानें त्यास भाविसंसारांतील वर्त्तनाविषयीं उपदेश अथवा आज्ञा करावी आणि त्यापाशीं गुरुदक्षिणा मागावी, असा संप्रदाय होता हा उपदेश तैत्तिरीयोपनिषदामध्यें उत्तम प्रकारचा केला आहे तो येथें खालीं उतरून घेऊन त्याचें तात्पर्य देतों:—

अकरावा अनुवाक.

वेदमनूच्याचार्योंन्तेवासिनमनुशास्ति । १ सत्यंवद। २ धर्मंचर । ३ स्वाध्यायान्मा प्रमदः । ४ आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । ५ सत्यान्न प्रमदितव्यम् । ६ धर्मान्न प्रमदितव्यम् । ७ कुशलान्न प्रमदितव्यम् । ८ भूत्यै न प्रमदितव्यम् । ९ स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ॥ १ ॥ १० देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । ११ मातृदेवो भव । १२ पितृदेवो भव । १३ आचार्यदेवो भव । १४ अतिथिदेवो भव । १५ यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि । १६ यान्यस्माक ꣳ सुचरितानि तानि त्वयोपास्यानि ॥ २ ॥ नो इतराणि । १७ एके चास्मच्छ्रेयाँसो ब्राह्मणाः तेषां त्वयासनेन प्रश्वसितव्यम् । १८ श्रद्धया देयम् । १९ अश्रद्धया ऽ देयम् । २० श्रिया देयम् । २१ ह्रिया देयम् । २२ भिया देयम् । २३ संविदा देयम् । २४ अथ यदि कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ॥ ३ ॥ ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः युक्ता आयुक्ताः अलूक्षा धर्मकामाः स्युः यथा ते तत्र वर्तेरन् तथा तत्र वर्तेथाः। २५ अथाभ्याख्यातेषु ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः युक्ता आयुक्ताः अलूक्षा धर्मकामाः स्युः यथा ते तत्र वर्तेरन् तथा तत्र वर्तेथाः । २६ एष आदेशः ।-२७ एष उपदेशः । २८ एषा वेदोपनिषत् । २९ एतदनुशासनम् । ३० एवमुपासितव्यम् । एवमुचैतदुपास्यम् ॥ ४ ॥

विद्येचें अध्ययन केल्यानंतर गुरू शिष्यास उपदेश करितो. १ सत्य बोल. २ धर्माचें आचरण कर. ३ अध्ययन करण्यास चुकूं नको. ४ आचार्यास जी वस्तु प्रिय असेल ती त्यास आणून देऊन संततीचा उच्छेद करूं नको; (ह्मणजे विवाह करून वंशवृद्धि कर.) ५ सत्याविषयीं कधीं चुकूं नको. ६ धर्माचरणाविषयीं कधीं चुकूं नको. ७ आत्मसंरक्षणाविषयीं कधीं चुकूं नको. ८ ऐश्वर्यवृद्धि करण्याविषयीं कधीं चुकूं नको.९ अध्ययन व अध्यापन (ह्मणजे पढणें व पढविणें) यांविषयीं कधीं चुकूं नको. १० देवकार्य व पितृकार्य ह्मणजे देवांच्या उद्देशानें करावयाचीं कार्यें व पितरांच्या उद्दे-

शानें करावयाचीं कार्यें यांच्याविषयीं चुकूं नको. ११ आईस देवाप्रमाणें मान. १२ बापास देवाप्रमाणें मान. १३ आचार्यास देवाप्रमाणें मान. १४ अतिथीस देवाप्रमाणें मान. (ह्मणजे देवाप्रमाणें यांची उपासना कर.) १५ याशिवाय जीं कर्में अनिंद्य असतील तींच करावीं; निंद्यकर्में (शिष्टांनीं केलीं तरीं तीं) करूं नयेत. १६ आह्मां गुरूजनांचीं जीं उत्तम कर्में असतील तींच त्वां करावीं; आमचीं सदोषकर्में त्वां करूं नयेत. १७ जे कोणी ब्राह्मण आह्मांहून श्रेष्ठ असे असतील ते आले असतां त्यांस आसन देऊन त्यांचा आदरसन्मान करावा. १८ जें दान देणें तें श्रद्धेनें द्यावें. १९ अश्रद्धेनें (ह्मणजे नास्तिक्य बुद्धीनें) देऊं नये. २० गौरवानें व सन्मानानें द्यावें. २१ लज्जेनें व मर्यादेनें द्यावें. २२ भयानें द्यावें. २३ मित्रादिकांच्या कार्यास्तव द्यावें. २४ याप्रमाणें चालत असतां जर कदाचित् तुला श्रौतस्मार्तकर्मांच्या आचरणांत किंवा सद्वर्तनांत कांहीं संशय उत्पन्न होईल तर त्या काळीं किंवा त्या देशीं जे ब्राह्मण विचार करण्याच्या कामीं दक्ष, कर्माचरणाच्या व सद्वर्तनाच्या कामांत तत्पर, दुसऱ्याच्या चेतवणीनें प्रवृत्त झालेले नव्हेत, निर्दय अंतःकरणाचे नव्हेत, केवळ धर्म ह्मणूनच त्या गोष्टी आचरणारे आणि लोभानें प्रवृत्त झालेले नव्हेत असे (ब्राह्मण) ज्याप्रमाणें त्या कर्माच्या आचरणांत व वर्तनांत चालत असतील त्याप्रमाणें तूं चाल. २५ जीं कर्मादिक उक्त आहेत त्यांतही कांहीं संदेह आल्यास त्याकाळीं किंवा त्या देशीं जे ब्राह्मण विचार करण्याच्या कामीं दक्ष, कर्माचरणाच्या व सद्वर्तनाच्या कामीं तत्पर, दुसऱ्याच्या चेतवणीनें प्रवृत्त झालेले नव्हेत, निर्दय अंतःकरणाचे नव्हेत, केवळ धर्म ह्मणूनच त्या गोष्टी आचरणारे आणि लोभानें प्रवृत्त झालेले नव्हेत असे (ब्राह्मण) ज्याप्रमाणें कर्माच्या आचरणांत व वर्तनांत चालत असतील त्याप्रमाणें तूं चाल. २६ ही आज्ञा आहे. २७ हाच पुत्रादिकांस उपदेश आहे. २८ हेंच वेदांचें रहस्य (ह्मणजे) केवळ मथितार्थ आहे. २९ हेंच धर्माचें अनुशासन (ह्मणजे आज्ञा) होय. ३० याप्रमाणें अवश्य अवश्य आचरण करावें.

हा जो वरील संक्षिप्त उपदेश आहे त्याचा ऊहापोहपूर्वक विचार करून पाहणारास महत्त्वाचीं अनेक अनुमानें करतां येतील आणि संसारांत अत्यंत उपयोगी अशा प्रकारच्या सूचना प्राप्त होतील आणि ज्या पुराणपुरुषांपासून अशा प्रकारचे विचार आपणांस सुदैवानें प्राप्त झाले ते या जगांत कशा अंतःकरणानें वर्तत होते याविषयीं सहजच कल्पना करतां येईल.

प्राचीनकाळीं पुस्तकादिक फार उपलब्ध नसून वेद बहुत करून, हल्लीं द्राविडांत व तैलंगांत संप्रदाय आहे त्याप्रमाणेंच, तोंडपाठ करावे लागत. गुरू तोंडानें सांगत असून शिष्यही शेवटीं पाठ होईपर्यंत तोंडानेंच संथा ह्मणत असत. यामुळें आरंभीं एकदां पाठ करण्याचें कृत्य आटोपलें ह्मणजे मग अर्थज्ञान करून देण्याचें काम सुरू होई. आणि अर्थज्ञान झाल्यावांचून अध्ययनाची समाप्तिच होत नाहीं असें श्रुतिस्मृतींचें खरें मत आहे. तें असें.—

"अधीतवेदस्य धर्मजिज्ञासामकृत्वा गुरुकुलान्न समावर्तितव्यम्" तैत्ति. उप. शंकरभाष्य.

भावार्थ—अध्ययन केलेल्या वेदापासून

धर्मज्ञान करून घेतल्यावांचून गुरुकुल सोडून निघून जाऊं नये.

बुध्वा कर्माणि चारभेत् । तैत्तिरी. उप. शंकरभा.

भावार्थ—अर्थ जाणूनच कर्माचा आरंभ केला पाहिजे. ही अर्थज्ञान करून घेण्याविषयींची आज्ञा अशी अगदीं स्पष्ट असतां ती अगदीं अलीक होऊन गेली यामुळें प्रस्तुत आपली स्थिति मूळच्या स्थितीपेक्षां अगदीं भिन्न होऊन गेली आहे व यामुळें आपण या जगांत मोठाले धक्के खात आहों हें बोलून दाखविलें पाहिजे असें नाहीं. असो, या आज्ञेस अनुसरून गुरु वेदग्रहणोत्तर शिष्यास अर्थाचा उपदेश करतो असें वर लिहिलें आहे. आणि शंकराचार्यांनीं "वेदमनूच्याचार्योंतेवासिनमनुशास्ति" या वाक्याचा अर्थ पढविलेल्या वेदांचा अर्थ त्यास सांगतो असाच केला आहे. आतां "सत्यं वद, धर्मं चर" इत्यादिक ज्या आज्ञा त्या ह्मणजे संक्षेपेंकरून पूर्वपठित वेदाचा अगदीं रहस्यभूत जो अर्थ तो सांगितला आहे.

या सर्व रहस्यांमध्यें "सत्य बोल" ही प्रथम आज्ञा आहे. यावरून या उपदेश करणाऱ्या आचार्याचा सर्व रहस्यांचें रहस्य जें सत्य त्याविषयीं केवढा व कसा कटाक्ष आहे हें सहज ध्यानांत येतें. कोणी कांहीं विचारलें असतां प्रमाणसिद्ध असें जें तूं जाणत असशील तेंच सांग. प्रतिष्ठेकरितां किंवा स्वकीय अज्ञानाच्या गोपनास्तव संशयित अथवा असत्य गोष्टी सांगूं नको. या आज्ञेची योजना सर्व साधारण गोष्टींकडे आहेच, तरी विशेष कटाक्ष विद्येच्या संबंधानें जें बोलणें त्याजकडे आहे असें त्याजवरील व्याख्यांवरून दिसतें.

दुसरी आज्ञा—"धर्माचें आचरण कर" ह्मणजे वेदप्रतिपाद्य जो धर्म त्याचें आचरण कर. ह्मणजे ऐहिक व पारत्रिक हितास व सुखास कारणीभूत जें त्याच्या आचरणाचें महत्व तें विद्यार्थ्यांस दाखविलें. या आज्ञेमध्यें प्रथम आज्ञेचा (सत्य भाषणाचा) व दुसऱ्याही कांहीं आज्ञांचा समावेश होतो तरी महत्वास्तव व दृढीकरणास्तव त्याचा पार्थक्येंकरून येथें उपदेश केला आहे. लोकांस धर्मसंबंधी शिक्षणाची अत्यंत अवश्यकता आहे हें उघडच आहे. परंतु विद्याभ्यासाचें काम केवळ राजाच्याच हातांत राहील आणि तो राजा व प्रजा हीं उभयतां एकधर्माचीं नसतील तेव्हां धर्मसंबंधी शिक्षणाची न्यूनता अथवा हयगय होऊन लोकांत धर्माविषयीं अज्ञान होऊन ते धर्मरहित अथवा परधर्माश्रित असे होतात हें हल्लींच्या स्थितीवरून सहज लक्षांत येत आहे.

तिसरी आज्ञा—"अध्ययन करण्यास चुकूं नको" ही आहे. विद्यार्थी गुरूपाशीं अभ्यास करून निघाला ह्मणजे त्यास आपण विद्वान् व मोठे कृतकृत्य झालों, आतां कांहीं शिकणें उरलें नाहीं, तेव्हां आतां अभ्यासाचीही आवश्यकता नाहीं असें वाटतें तें न वाटावें आणि त्यानें आपणास सर्वदा विद्यार्थिदशेतच गणावें ह्मणून ही गुरूची आज्ञा आहे. वस्तुतः विद्यार्थी गुरूपाशीं अध्ययन संपवून निराळा होतो तेव्हां त्याच्या

१ अर्थज्ञान न करून घेतां केवळ पाठ करूनच राहाणाराची निंदा वेदांतच किती केली आहे हें "आर्यलोकांच्या प्राचीन व अर्वाचीन रीति" या पुस्तकांत मी सविस्तर लिहिलें आहे.—(पृष्ठ ६—९ पाहा.)

अध्ययनाची समाप्ति न होतां त्या वेळेपासून अध्ययनास आरंभ होतो असेंच समजलें पाहिजे. ह्मणूनच हल्लींचे विद्यामंदिराचे अध्यक्ष विद्यार्थ्यांस पदवीपट्ट देतांना हाच उपदेश विशेषतः करीत असतात. देशाचा भरभराट हा लोकांच्या ज्ञानावर अवलंबून असतो आणि तें ज्ञान अध्ययनाधीन असतें यास्तव ही आज्ञा गुरूनें विद्यार्थ्यास महत्वाची समजून केली आहे. विशेषतः ज्या कालीं पुस्तकादिकांची उपलब्धि नव्हती त्यावेळीं तर ही आज्ञा फारच आवश्य होती, व तिजपासून जें आमच्या देशाचें मोठमोठ्या ग्रंथादिकांच्या रचनांच्या द्वारानें हित झालें तें थोडक्यांत सांगतां येणें कठीण आहे.

चवथी आज्ञा—"आचार्यास जी वस्तु प्रिय असेल ती त्यास आणून देऊन संततीचा विच्छेद करूं नको." "गुरुदक्षिणा" ही सर्वांच्या ऐकण्यांत आहेच. तीच ही गुरुदक्षिणा होय. दहा वीस वर्षें मोठ्या प्रीतीनें व काळजीनें सर्व प्रकारें विद्यार्थ्याचें संरक्षण करून आबडधोबड दगडाचा उत्तम पुतळा बनविला त्याबद्दल उतराई होण्याचा हाच उपाय होय. ही गुरुदक्षिणा मागण्यामध्येंही गुरूंनीं विद्यार्थ्याच्या शिरावर जबर भार ठेविल्याचीं उदाहरणें फारच विरळा आढळतील. कारण ज्या अर्थी मोठाले राजेही त्या निरपेक्ष महर्षींस पाहिजे त्या वस्तु पुरविण्यास अगदीं सिद्ध होते त्या अर्थी आपल्या आज्ञा घेऊन जाऊन नूतन संसारांत शिरणाऱ्या विद्यार्थ्याच्या शिरावर मोठा भार ठेवण्याचें त्यांस अगत्यच नव्हतें. ह्मणून कितीएक आचार्यांनीं आपल्या विद्यार्थ्यांपाशीं केवळ लोकहिताच्याच दक्षिणा मागितल्या. ह्मणजे "तूं विद्याप्रदान करण्यास कधीं नकार काढूं नको" "तूं अमुक ऋषीच्या अथवा राजाच्या कार्यास साह्य कर." "तूं अमुक मताची अथवा अमुक सिद्धांताची प्रसिद्धि कर," इत्यादि. ही मागितलेली दक्षिणा संपादन करून देण्यांत विद्यार्थ्याच्या कृतज्ञतेची, बुद्धिकौशल्याची, निर्भयपणाची, उद्योगाची वगैरे परीक्षा होत असे आणि अशा परीक्षेकरितांच आचार्यांनीं कधीं कधीं चमत्कारिक गुरुदक्षिणा मागितल्याचें आढळतें. आणि तीही ज्या विद्यार्थ्यास ज्या प्रकारचा आयुष्यक्रम प्राप्त होण्याचा संभव त्यांस दिसत असेल त्या आयुष्यक्रमांत ज्या गुणाची आवश्यकता असेल तेच गुण दक्षिणासंपादन करण्यांत दृष्टीस पडून यावे अशाच प्रकारची मागितल्याचें आढळतें. यावरून त्यांची स्वकीयनिरपेक्षता व विद्यार्थ्याच्या हिताविषयीं तत्परता हीं स्पष्ट दिसून येतात. प्रस्तुतच्या विद्यार्थ्यांविषयीं, गुरूंविषयीं आणि त्यांच्या शिकण्याच्या व शिकविण्याच्या हेतूंविषयीं विचार करतां सर्वत्र द्रव्याकांक्षेचा अंशच विशेष दिसतो हें प्राचीन काळच्या स्थितीस अगदीं विरुद्ध आहे. एकच काम निरपेक्षबुद्धीनें परंतु कळकळीनें केलें व तेंच केवळ द्रव्याकांक्षेनें केलें तर त्यांत किती अंतर पडतें याचें हें एक उदाहरण आहे. याप्रमाणें शिष्यास विद्यासंपन्न करून नंतर त्यास दारपरिग्रहाविषयीं गुरु आज्ञा देतो. या वेळीं अर्थात त्या विद्यार्थ्याचें वय निदान वीस वर्षांखालीं असण्याचा प्रायः संभव नाहीं; कारण उपनयनाच्या कालीं ब्राह्मणाचें वय सर्व द्विजांच्या मुलांत ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांच्या मुलांत

कमी असतें तें सुमारें आठ वर्षांपेक्षां कमी नसतें. आणि तेथून निदान बारा वर्षें ब्रह्मचर्य ह्मणजे सहजच वीस वर्षें होऊन जात होतीं. आणि असें होत होतें तेव्हां त्या वेळची प्रजा हल्लींच्या प्रजेच्या तुलनेनें पाहतां मोठी दीर्घायुषी व सदृढ होती असें जें आपण वाचतों त्याविषयीं अश्रद्धा होण्यास अथवा त्यांस "पुराणांतील गोष्टी" ह्मणजे रामायणांतल्या वांदरांच्या वाचेप्रमाणें, मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

यापुढें पुनः "सत्याविषयीं कधीं चुकूं नको व धर्माविषयीं कधीं चुकूं नको" हें सांगण्याचें कारण असें कीं, विद्यार्थ्यानें केवळ जाणून बुजून असत्य भाषण न केलें आणि धर्मविरुद्ध आचरण न केलें ह्मणजे तो कृतकृत्य झाला असें होत नाहीं. तर त्यानें विस्मरणानेंही खोटें काम करूं नये व धर्म ह्मणून करावयाचीं जीं कांहीं कृत्यें आहेत त्यांतील कृत्य त्यानें वगळूं नये अथवा सोडून देऊं नये.

"आत्मसंरक्षणाविषयीं कधीं चुकूं नको," या आज्ञेचा रोख स्वकीय शरीरसंरक्षणाकडे आहे आणि "ऐश्वर्यवृद्धि करण्याविषयीं चुकूं नको" याचा रोख जनकल्याणाकडे आहे असें दिसतें.

यापुढें "अध्ययन व अध्यापन यांविषयीं चुकूं नको," अशी आज्ञा आहे. आपणापाशीं अध्ययन समाप्त करून जाणाऱ्या, प्रत्येक विद्यार्थ्यास अशा प्रकारची धर्मसंबंधानें आज्ञा असणें हीच देशहिताच्या संबंधानें पाहतां केवढी महत्त्वाची गोष्ट आहे, हें विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.

"देवकार्य व पितृकार्य" या दाहाव्या आज्ञेपासून तों "अतिथींस देवाप्रमाणें मान" या चौदाव्या आज्ञेपावेतों ज्या आज्ञा आहेत त्यांवरून आस्तिक्य, कृतज्ञता व कारुण्य हे सद्गुण अंगीं धारण करण्याविषयीं गुरूचा शिष्यास उपदेश आहे. १५ व्या आज्ञेनें अनिंद्य असलेलींच कामें करावीं, निंद्य कामें करूं नयेत असें साधारणतः सांगून १६ व्या आज्ञेनें गुरूनें निरभिमानपणानें शिष्यास स्पष्ट सांगितलें आहे कीं, बाबा रे, आह्मीं तुझे गुरु ह्मणून तुला १३ व्या आज्ञेप्रमाणें देवासमान आहों; तरी आमचीं नीं कांहीं उत्तम कर्में असतील तींच तूं कर. आमचीं जीं सदोष कर्में असतील तीं आह्मी तुझे गुरु करतों या दुरभिमानानें तूं करूं नको. गुरूनें आपल्या शिष्यास असें प्रांजलपणें सांगण्याचें कारण, ते सत्यवक्ते व पापभीरु असल्याकारणानें, "आह्मी कांहीं सर्वज्ञ नाहीं, तेव्हां अर्थात् आमच्या अज्ञानामुळें आमच्या हातून अनेक सदोष कर्में घडण्याचा संभव आहे, आणि आमच्या शिष्यांस आह्मीं पूज्य असल्याकारणानें अर्थात ते आमचीं बरीं वाईट सर्वच कर्में बरीं अशीं मानून आचरतील व तेणेंकरून आपण त्या पापास परंपरया कारणभूत झालेंसें होईल तें न व्हावें" असें त्यांस वाटत होतें हेंच होय. नाहीं तर "मखीसो मखीं, और मेरे बापने लिखी" या न्यायानें मागून अलेला पेंड पुढें पोंचावयाचा, बऱ्यावाइटाचा विचार ह्मणून कसा तो करावयाचाच नाहीं, असा जो हल्लीं सर्व जनांच्या मनास बलवत्तर संस्कार आहे तसाच पूर्वी झाला असता, आणि तो आलीकडच्या अज्ञान व भोंदू गुरूंप्रमाणें त्या काळच्या पापभीरु गुरूंनीं दृढ केला असता तर आपल्या

प्रिय भरतवर्षांत प्राचीनकाळीं ज्या सुधारणा होत गेल्या त्या कधींही न होतां आपण आज ज्या स्थितींत आहों तिजपेक्षां फारच वाईट स्थितींत असतों यांत कांहीं संशय नाहीं. हल्लींच्या काळचे साधारण दहावीस अभंग अथवा ओव्या पाठ असलेले गुरू अथवा शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य व वल्लभाचार्य या मतस्थापकांच्या गाद्यांवर बसणारे गुरु, जींत यत्किंचित् तरी न्यूनता शिष्याच्या दृष्टीस पडण्याचा संभव आहे ती गोष्ट शिष्यास कधीं तरी सांगतील काय? असो, पुढच्या १७ व्या आज्ञेतही दुसऱ्या विद्वानांविषयीं स्वतांस पूज्यबुद्धि असून तींच शिष्याच्या मनांत भरविण्याविषयीं गुरूची इच्छा दृष्टीस पडते. यापुढें २४ व्या आज्ञेपर्यंत दान देण्याच्या कांहीं रीति व हेतु सांगितले. याप्रमाणें आयुष्यांतील वर्तनक्रम चालला असतां कोणत्याही धर्मकर्माच्या आचरणाविषयीं मनांत संशय उत्पन्न झाला असतां त्याच्या निर्णयाचा मार्ग, बळकटीकरितां दोनवेळ, स्पष्टपणें असा सांगितला कीं, ज्या काळीं व ज्या देशीं संशय येईल "त्या काळीं किंवा त्या देशीं जे ब्राह्मण विचार करण्याच्या कामीं दक्ष, कर्माचरणाच्या व सद्वर्तनाच्या कामांत तत्पर, दुसऱ्याच्या चेतवणीनें प्रवृत्त झालेले नव्हेत, निर्दय अंतःकरणाचे नव्हेत, केवळ धर्म म्हणूनच त्या गोष्टी आचरणारे आणि लोभानें प्रवृत्त झालेले नव्हेत असे (ब्राह्मण) ज्याप्रमाणें त्या कर्माच्या आचरणांत व वर्तनांत चालत असतील त्याप्रमाणें तूं चाल." विद्वान् श्रोतेहो, असे विचारदक्ष, निश्चयाचे, धर्मतत्पर, स्वतंत्र, सदय व निर्लोभ ब्राह्मण आतां किती सांपडतील बरें? एकही सांपडणें मुष्कील आहे. पण मला वाटतें गांवोगांव व किंबहुना घरोघर वर सांगितलेल्या गुणांच्या अगदीं विरुद्ध गुणांनीं परिपूर्ण असे मात्र ग्रामण्यपटु व बहुभाष पाहिजे तितके सांपडतात व तेच आमचे धर्मनिर्णायक महर्षि होऊन बसले आहेत. अशा प्रकारचें दुर्भाग्य या अनादि आर्यधर्माचें उदेलें आहे! दोन पक्ष असल्यास जिकडची दक्षिणा मोठी तिकडे अनुकूल असा शास्त्रार्थ मिळायाचा, आणि एकच पक्ष असल्यास तो जितका पैसा जास्त खरचील तितका शास्त्रार्थ त्याच्या मनासारखा मिळायाचा, असा निर्णयच ठरून राहिला आहे! हे विद्वान् श्रोतेहो, ज्या दिवशीं हा निंद्य प्रकार या देशांतील शास्त्री, वैदिक अथवा साधारणतः भिक्षुक लोक यांजमधून नाहींसा होईल तोच दिवस या सर्वथा दीन झालेल्या प्रिय आर्यावर्ताच्या ऊर्जिताचा आद्यदिवस गणला जाईल, आणि तसा दिवस फार लौकर आपणांस आणण्यासाठीं अखिलचित्तचालक परमेश्वरास विनवून व वर जें सद्वर्तन सांगितलें कीं, २८ "हेंच वेदाचें रहस्य आहे" आणि २९ "हेंच धर्माचें अनुशासन आहे," आणि ३० "याप्रमाणेंच अवश्य आचरणकरावें" त्या अखेरच्या तीन आज्ञांचें आपणांस पुनः एकवार स्मरण देऊन मी आपली रजा घेतों.

लिंबू व दूध यांचें सरबत करण्याची रीति.

एकशेर पाणी व पाउणशेर साखर एकत्र करून त्यांत तीन लिंबांचा रस पिळावा, नंतर अर्धाशेर दूध घालावें व गाळावें, म्हणजे उत्तम सरबत होईल. हें उन्हाळ्याच्या दिवसांत शरीरास फार हितावह आहे.

एक गुजराथी

BOMBAY:—"NIRNAYSAGAR PRESS" KALKADEVEE ROAD.

जाहिराती.

न्यायसारसंग्रह.

कमी किंमतीवर मिळणारें पुस्तक.

किंमत रु० २५ व टपालहंशील रु० ३.

मराठींतील न्यायाधीश व वकील व न्यायखात्यांत वागणारे इतर लोक यांकरितां यांतील न्यायसंबंधी ७ प्रकरणें येणेंप्रमाणें.—

१. हिंदुधर्मशास्त्र; २. मुसलमानी धर्मशास्त्र; ३. करारशास्त्र; ४. अपकृत्यशास्त्र; ५. प्रमाणशास्त्र; ६. दिवाणी सर्वसंग्रह—म्हणजे सन १८२७ पासून १८७२ चे अखेर दिवाणी कामासंबंधी कायदे व आक्ट यांचा संग्रह; ७. फौजदारी सर्वसंग्रह—म्हणजे सन १८२७ पासून १८७२ अखेर फौजदारी प्रकरणी कायदे व आक्ट यांचा संग्रह. या प्रत्येक प्रकरणांत मुंबई व मद्रास, कलकत्ता व प्रिव्हीकौन्सिल आदिकरून सर्व वरिष्ठ कोर्टांचे ठराव त्या त्या विषयाखालीं अनुसंधानानुरूप दाखविले आहेत. असे ठराव या ग्रंथांत एकंदर सुमारे ६००० आहेत. शिवाय दिवाणी व फौजदारी या दोन बाबदींतील मुख्य कायद्यांवर वाचकांच्या सोईकरितां सटीक विवेचन केलें आहे. या ग्रंथाचीं पृष्ठें सुमारें २४०० आहेत.

आजपर्यंत याची किंमत रु० ३९ व टपाल खर्च रु० ३ ठेविली होती, ती आतां बहुत लोकांच्या सूचनेवरून आणि पुष्कळ लोकांस या ग्रंथाचा लाभ व्हावा व राहिलेले ग्रंथ लौकर विकण्यांत यावे म्हणून हल्लीं किंमत रु० २५ व टपाल खर्च ३ एकंदर रु० २८ ठरविली आहे.

सदहू ग्रंथापैकीं निरनिराळीं प्रकरणें हवीं असल्यास किंमती पडतील त्या:—

	किम्मत रुपये.	टपालखर्च.
१ हिंदुधर्मशास्त्र.....	१८	८६
२ मुसलमानी धर्मशास्त्र.	१८	८६
३ करारशास्त्र.....	२	८६
४ अपकृत्यशास्त्र	१८	८४
५ प्रमाणशास्त्र.....	२८४	८४
सदर पांच एकत्र बांधलेलीं.	७	१
६ दिवाणी सर्वसंग्रह....	१०	१८
७ फौजदारी सर्वसंग्रह..	१०	१८

पुस्तकें मुंबईंत काळकादेवीसमोर विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत मिळतील.

रावजी पांडुरंग भापकर, मालक.

मल्हारराव गायकवाड नाटक.

श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांवर आलेल्या साबंत प्रकरणाची हकीकत व त्याबद्दल झालेला जगजाहीर परिणाम यांस अनुलक्षून आहीं एक नाटक रचून तें छापण्यास दिलें आहे. पुस्तकें सप्टेंबर अखेर वर्गणीदारांस मिळतील. नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. वर्गणी खालील ठिकाणीं भरावी.—

इंदुप्रकाश आफिस व विविधज्ञानविस्तार आफिस—मुंबई.

बेळगांव समाचार आफिस—बेळगांव.

बोधसुधाकर आफिस—सातारा.

ज्ञानप्रकाश आफिस—पुणें.

रा. रा. नारायण बापूजी साठे, आदितवार पेंठ, सुरसुभे यांचा वाडा—नाशिक.

रा. रा. महादेव रामचंद्र केळकर, क्लार्क, निसबत सार्वजनिक सभा—पुणें.

रा. रा. हरि महादेव पंडित, हेडमास्तर, सिटि स्कूल—नागपूर.

सूचना—सप्टेंबर महिन्याचे १५ तारखेपर्यंत वर्गणी भरणारास दर प्रतीस बारा आणे व पोष्ट खर्च २ आणे पडतील. पुढें पोष्ट खर्चा हुद्दा एक रूपया दोन आणे किंमत पडेल, कळावें—तारीख ८ आगस्ट १८७५.

ग्रंथकर्ता.

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रुपये ३.
सहामाही आगाऊ.....रुपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचे .....आणे ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

A MONTHLY MAGAZINE

OF

MARATHI LITERATURE

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

पुस्तक ७. अंक ९.

विषय. **अनुक्रमणिका.** पृष्ठ.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह. १६१
हर्षचरित. १६३
भोजप्रबंध. १६८
मुद्राराक्षसनाटकप्रयोग. १७२
धौम महाबळेश्वरवर्णन. १७६

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पोंच.

१ श्रीमत्कमलनयनाचार्य विरचित मूर्तिमंडन ग्रंथ.

स्वदेशी माल वगैरे.

१ उत्तम मेणबत्त्या व साबण, रा. रा. मोरो विष्णु तळवलकर यांनीं पुणें येथें आपल्या कारखान्यांत तयार करून आह्मांकडे मेहरबानीनें नमुन्यादाखल पाठविल्या आहेत. यांविषयीं आमचा अभिप्राय पुढील अंकांत येईल. ज्या कोणांस सदरहु मेणबत्त्या व साबण पाहाण्याची इच्छा असेल त्यांस आमच्या पुस्तकालयांत पाहण्यास मिळतील.

वर्गणी.

	रु०	आ०
(दिसेंबर १८७९ पर्यंत)		
रा. रा. यशवंतराव वासुदेव आटल्ये एम्. ए.....	१	३–६
रा. सा. निळकंठ भगवंत मुळे मामलेदार.		८–४
,, एन्. कृष्णराव मंजुनाथ मामलेदार		६–१०
रा. रा. जगन्नाथ श्रीप्रसाद स. ई. पोष्टमास्तर.	१	९–०
,, लक्ष्मणराव यशवंत शिरगांवकर.....		८–४
,, दिनानाथ रघुनाथ खोटे.....		३–०
,, सदाशिव विश्वनाथ धुरंधर बी. ए. एल् एल् बी.		३–०
,, हरिशंकर बाळकृष्ण वकील		३–०
,, भास्कर हरि भागवत.....		३–०
,, खंडेराव जनार्दनजी		३–०
,, सोकाजी बाळाजी.		३–०
,, केशव विनायक धैर्यवान		३–०
,, बाबा लक्ष्मणजी		३–३
मिरज नेटिव लायब्ररी.		१–६
,, सोमनाथ भोईभात (जुलै १८७६ पर्यंत)		३–६
अज्जम डानियल बेंजामिन हा. अ. बाकीपैकीं		६–०
रा. रा. शिवराम नारायण केळकर. बाकीपैकीं		३–०

सकोश ज्ञानेश्वरी.

सदहु पुस्तक हाल्लींच गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत जाड्या टाइपांनीं कोशासह छापून तयार झालें आहे. किंमत रु० ८ व पोस्टखर्च रु० १–८ आणे पडेल.

अमरकोश (टिप्पणसहित.)

जाड्या कागदांवर शिळाछापानें छापलेला. किंमत रु० १। व टपालखर्च आणे २.

(विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत मिळतात.)

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ९.

संक्षिप्त भारतवर्षीयदर्शनसंग्रह.

प्रत्यभिज्ञादर्शन.

अपेक्षा ह्मणून मुळींच नसतां, पृथिव्यादिक जडांनीं उगीच शरीरादिकांचें कारणत्व स्वीकारावें, हें बरोबर दिसत नाहीं, अर्थात् **तांत्रिक शैवदर्शन** युक्तिसिद्ध नाहीं; परमेश्वराच्या केवळ इच्छेनेंच हें जग उत्पन्न होतें; **योग, चर्या, प्राणायाम,** वगैरे क्लेशांनीं शरीरास कृशत्व आणणें हें शुद्ध अज्ञान होय; नानाविधमानमेयादिभेदाभेदशाली परमेश्वर स्वतंत्र आहे, अर्थात् त्यास हें जग निर्माण करते समयीं कोणाचें तिळमात्रही साह्य लागत नाहीं; हा प्रत्यगात्मा तर परमेश्वरस्वरूप आहे; व "तूं परमेश्वरस्वरूप आहेस," असा गुरूनें किल्ली फिरवून उपदेश करणें, हाच परम पुरुषार्थ व परापरसिद्धीचा उपाय; असें **प्रत्यभिज्ञादर्शनाचें** अवलंबन करणारे मोठमोठे पंडित उपपादन करितात. त्या **प्रत्यभिज्ञादर्शनाचें**—

कथंचिदासाद्य महेश्वरस्य
दास्यं जनस्याप्युपकारमिच्छन्
समस्तसंपत्समवाप्तिहेतुं
तत्प्रत्यभिज्ञामुपपादयामि

हें पहिलें सूत्र. याचा अर्थ—

कथंचित्— मोठ्या प्रयासानें; अर्थात् परमेश्वराच्या कृपेनें जेव्हां परमेश्वराहून अभिन्न असा जो गुरु त्याच्या चरणारविंदाचें आराधन आपल्या हातून होतें तेव्हां. **आसाद्य**[२]— "आ" ह्मणजे समंतात्, अर्थात्, सर्वप्रकारें, "सादयित्वा" ह्मणजे प्राप्त करून घेऊन, अर्थात् त्याचा यथेच्छ साक्षात् अनुभव घेऊन; यावरून, ज्यापक्षीं आपण, ज्याचें ज्ञान झालें असतां परम पद प्राप्त होतें, तें यथार्थ समजलों, अर्थात् कृतकृत्य झालों, त्यापक्षीं दुसऱ्यांनीं देखील याचा लाभ करून घ्यावा यासाठींच, अर्थात् परार्थच, मी या शास्त्रास आरंभ करितों, व याप्रमाणें आरंभ करण्याचा मला अधिकारही आहे, असा सूत्रकाराचा अभिप्राय स्पष्ट होतो. आपणास अधिकार आहे हें दाखविण्याचा हेतु ह्मणून

१.—"प्रत्यभिज्ञा" ह्मणजे ओळख. तुझ्यामध्यें परमेश्वराचे चेतनत्वप्रभृति बरेच गुण वास करीत आहेत तेव्हां तूं परमेश्वरस्वरूपच आहेस, अर्थात् ज्याच्यामध्यें तुझ्यासारखे गुण अत्यंत व पूर्ण वास करितात, तो परमेश्वर अशी एतत्संप्रदायीय लोक आत्म्यास परमेश्वराची ओळख पटवून देतात, त्यावरून या दर्शनास हें नांव पडलें आहे.

२.— आ+सादयित्वा=आसाद्य. "आ" हा उपसर्ग असल्यामुळें, "सादयित्वा," यांतील "क्त्वा" प्रत्ययास "ल्यप्" आदेश होऊन, "आसाद्य" हें रूप सिद्ध होतें.

इतकाच कीं, आपण कांहीं तरी लिहून दुसऱ्यांस फसवून त्यांच्यापासून पैसे उपटावे, त्यांच्या बायका पातिव्रत्यापासून चलित कराव्या, किंवा घोडे, पालखी, वगैरे सर सरंजाम राखून त्यांच्यापासून आपल्या सुखासाठीं ह्मणा, डौलासाठीं ह्मणा, हरएक रीतीनें पैसा काढावा, असा किंवा या प्रकारचा ह्मणून माझा हेतु मुळींच नाहीं; तर हें जें मी लिहीत आहें तें शुद्ध परार्थच लिहीत आहें. **महेश्वरस्य**— **विष्णुविरंचि**प्रभृति मोठमोठे देव ज्याच्या ऐश्वर्याचा लेश मिळतांच ईश्वर बनून गेले आहेत, असा जो अत्यंत स्वतंत्र **महेश्वर** ह्मणजे **शिव**, त्याचें. **दास्यं–परमेश्वर** प्रसन्न होऊन ज्याच्या सर्व कामना पूर्ण करितो, तो "दास," अर्थात् त्यावर **परमेश्वराची** मर्जी पुष्कळ असत्ये; "दासाचा" भाव ह्मणजे धर्म यास दास्य ह्मणतात; दास्य ह्मणजे गुलामगिरी; या पदाचा संबंध **आसाद्य** या पदाशीं आहे. **जनस्य**– लोकांवर; यावरून अधिकारी अमुकच जातीचा किंवा अमक्याच कुळांतला असला पाहिजे असा कांहीं निर्बंध नाहीं, तर ज्या कोणास परम पदाची प्राप्ति करून घेणें असेल, तो ब्राह्मण असो, शूद्र असो, अतिशूद्र असो, तरीं त्यास हें शास्त्र अध्ययन करण्याचा अधिकार आहे, असें स्पष्ट होतें. **अपि**– या शब्दानें, आत्मा परमेश्वरापासून अभिन्न आहे हें एक, व आपण हें शास्त्र परार्थच करितों हें एक, अशीं जीं दोन कलमें, त्या दोनही कलमांचा सूत्रकार उपन्यास करितो. यावरून हीं सूत्रें रचण्याचें प्रयोजन आपल्या ध्यानांत येतें. **उपकारं**— "उप" या उपसर्गाचा अर्थ समीप असा होतो; अर्थात् सर्वांस **परमेश्वराचें** सामीप्य ह्मणजे तसेंच ऐश्वर्य मिळावें अशी. **इच्छन्**– इच्छा धरून. **समस्तसंपत्समवाप्तिहेतुं**—समस्त संपत्तीच्या समवाप्तीचें जी कारण, ह्मणजे जिच्यापासून सर्वसंपत्ति आपल्यास मिळतात; अर्थ ह्मणून हाच कीं ज्याप्रमाणें **रोहणाचलाचा**[1] लाभ झाला ह्मणजे आपणास सर्व रत्नें मिळतातच त्याप्रमाणें आपणास **प्रत्यभिज्ञेचा** लाभ झाला, ह्मणजे सर्व संपत्ति आपल्या घरांत पाणी भरितात, मग दुसरें तें आपणास काय पाहिजे; असा अर्थ षष्ठीसमास करणें असल्यास करावा; बहुव्रीहि करणें असल्यास, **समस्त** ह्मणजे बाह्याभ्यंतर सुखाची जी **संपत्** ह्मणजे सिद्धि, तिची **समवाप्ति** ह्मणजे प्राप्ति, तीं आहे **हेतु** ह्मणजे कारण जीचें, असा अर्थ करावा. **तत्प्रत्यभिज्ञां**– त्याची जी **प्रत्यभिज्ञा** तिचें; "मी **परमेश्वराचीच** प्रतिमा," असें जें ज्ञान त्यास **प्रत्यभिज्ञा** ह्मणतात; त्या **प्रत्यभिज्ञेचें. उपपादयामि**– मी उपपादन करितों; लोकांवर अनुग्रह करावा, या हेतूनें सविस्तर निरूपण करितों.

(पुढें चालेल.)

१—हा पर्वत सिंहलद्वीपांत आहे. यास हल्लीं "आडाम्स पीक" ह्मणजे "आडामचें शिखर" असें ह्मणतात. प्राचीनकाळीं या पर्वतावर रत्नें पुष्कळ सांपडत असत असें दिसतें. बालरामायणांत दहाव्या अंकांत राजशेखर कवीनें लंकेकडून परत येत असतां रामाच्या तोंडांत घातलेंही आहे कीं–

जनश्च वाक्सुधासूतिर्मणिसूतिश्च रोहणः
नान्यत्र सिंहलद्वीपान्मुक्तासूतिश्च सागरः

अर्थ—ज्यांची वाणी अमृतासारखी मधुर, असे लोक; ज्याच्यावर रत्नें पुष्कळ सांपडतात, असा रोहण या नांवाचा पर्वत; व ज्यांत मोत्यें अतोनात सांपडतात, असा समुद्र; हे तीन सिंहलद्वीपांतच आहेत; अन्यत्र नाहींत.

हर्षचरित*.

त्रैलोक्यपुरारंभीं मूलस्तंभायमान जो, त्याच्या
चरणीं नति, चामरवत् तुंगशिरीं शोभतो
शशी ज्याच्या. १

जी नीलकंठपरिरंभणमीलिताक्षी
भासे, विषें करुनि काय तदीयवक्षीं
झाली विलीन अतिमूर्च्छित, तीस भावें
श्रीमन्महीध्रतनयेस अतां भजावें. २

हा वर्ष काय अतिदिव्य सरस्वतीचा
साक्षात् पवित्र पतिच्याचि सरस्वतीच्या;
ऐसें विलोकुनि यदीयकृतीस, भास
होतो, तयास नति सत्यवतीसुतासि. ३

रागाधिष्ठित नयनें ज्यांचीं, असती सदैव
वाचाळ
कोकिलवत् जे, इह कवि ते बहु, सुष्ठु न
यदीयवाग्जाळ. ४

कुळीं कवींच्या अमुचाच जन्म
असा जयां डौल, कवित्वकर्म
नसे जरी, ते असती अनेक;
श्वानांपरी ज्यां न मती सुरेख. ५

स्वकपोलकल्पित सुरम्य जे कथा
रचुनी सदा पुरविती मनोरथा;
शरभांपरी न बहु ते तसे कवी;
मति ती यदीय भवसिंधु शोषवी. ६

फिरविती किति सर्वहि अक्षरें,
जरि सुकल्पितता न कधीं फिरे;
वदतसे अशियांस मलिल्लुंच
सुजनसंघ, असत्य असे न च. ७

---

* या ग्रंथाविषयीं व या ग्रंथाच्या कर्त्याविषयीं जें कांहीं लिहावयाचें आहे तें आह्मीं सरतेशेवट लिहूं.

१.—"त्रैलोक्य" ह्मणजे स्वर्ग, पृथिवी, पाताल, हे तीन लोक; हेंच एक 'पुर' ह्मणजे नगर; या नगराच्या "आरंभीं" ह्मणजे जेव्हां भगवान् ही सृष्टि करण्यास आरंभ करितो तेव्हां.

२.—"मूलस्तंभायमान" ह्मणजे मूलस्तंभाप्रमाणें शोभणारा. ज्याप्रमाणें पहिल्यानें एक स्तंभ जमिनींत पुरला ह्मणजे त्याच्या समंतात् भागीं त्याच्या आधारें नवें नगर वसूं लागतें, व जरी नगराचा नाश झाला तरी तो मूलस्तंभ कायमचा कायम रहातो, त्याप्रमाणें शिव हा कोणी एक मूलस्तंभ होय; त्याच्या आधारानें त्याच्या सभोवतीं ही सृष्टि उत्पन्न होत्ये; व या सृष्टीचा नाश झाला तरी शिव ह्मणून कायमच असतो. हा या आर्येचा सारांश.

३.— नमस्कार.

४.—"शिर" या शब्दाची द्वयर्थी योजना केली आहे. उंच मस्तकावर अथवा उंच अग्रभागावर, असा अर्थ करावा.

५.—चंद्र.

६.—"नीलकंठ" ह्मणजे शिव; त्याचें "परिरंभण" ह्मणजे आलिंगन; त्या आलिंगनानें खरोखर फार हर्षित झाली ह्मणून "मीलित" ह्मणजे मिटले आहेत, "अक्षि" ह्मणजे डोळे जिनें; "ती नीलकंठपरिरंभणमीलिताक्षी."

७.—"तदीय" ह्मणजे त्याच्या; "वक्षीं" ह्मणजे वक्षःस्थलावर, अर्थात् छातीवर.

८.—"श्रीमत्" ह्मणजे लक्ष्मीनें युक्त अशी जी "महीध्रतनया" ह्मणजे हिमालयाख्य पर्वताची मुलगी, अर्थात् पार्वती, तीस.

९.—पाऊस.

१०.—ब्रह्मदेवाच्या.

११.— व्यासाला. व्यास हा सत्यवतीचा मुलगा.

१२.—तांबडेपणानें; पक्षीं क्रोधानें.

१३.—चांगलें, मनोहर.

१४.—हा एक पशु आहे. हा सिंहासही मारितो असा कवींचा समज आहे. हा आढळण्यांत फारसा येत नाहीं; ह्मणून याचा दाखला सत्कवींस दिला आहे.

१५.—चोर.

श्लेषाची बहु रुचि औत्तरीह लोकां;
पाश्चात्यां प्रियतर अर्थमात्र देखा;
उत्प्रेक्षा मधुरुचि वीत दाक्षिणात्यां;
वर्णाडंबर सुख देत गौडजां त्यां. ८
ऐसें काव्य स्वादु होणें न सोपें;
वर्णांचें न ज्यांत वैकल्य लोपे;
ज्यांत श्लेषाऽक्लिष्टयही, अर्थ नूतन,
शृंगारादि स्पष्ट, वृत्तें न दीन. ९
ज्याची कीर्ति न हें करि भुवनत्रय उज्ज्वल स्ववर्णानें,
त्या कविची काय कथा; ऐके तन्नाम कोण कर्णानें. १०
आख्यायिका रचुनियां मन रंजवीती;
ज्यांच्या न खिन्न कधिं होय सरस्वती ती
उच्छ्वास[२] पूर्ण करुनीहि मुखीं; तयांला
बा कोण वंदन करी न कवीश्वरांला. ११
वासवदत्ता[३], विपुला दर्पा नासुनि टाकी, कर्णगता[४]ऽल्पा,
शक्ति जशी ती पांडुसुतांच्या फोडुनि वक्षा, ही सुकवींच्या. १२
पदबंधोज्ज्वल[५] ज्याचा गद्यग्रंथ कृतवर्णविस्तार[६]
हारी नृपवद्, ऐसा एकचि भट्टारहरिचंद्र. १३
कोशांतें ज्या प्रचुर हर्षद सूक्तिरत्नें,
संशुद्धजाति[७], रचिलीं असती प्रयत्नें,
प्रौढिप्रसिद्ध[८], अविनोशि; कृती अशाची
श्रीशालिवाहनचि[९] जाणतसे विरंची. १४
वरप्रसेनयशस्तति[१०] जाहली
जलधिपारग[११], जी बहु भागली,
कपिचमू जशि सेतुकृताऽमला[१२],
सुरुचिरा दिसत्ये कुमुदोज्ज्वला[१३]. १५
बहुभूमिकें[१४], रचुनि नाटकें, वदी-
वदसूत्रधारकृतमंगलें मुदा,

१.—उत्तर दिशेस राहणाऱ्या.

२.—ग्रंथाचा पूर्ण अवयव; पक्षीं श्वासोच्छ्वास.

३.—या नांवाची सुबंधु नामक कवीनें रचलेली आख्यायिका; पक्षीं इंद्रानें दिलेली.

४.—कानांत गेली असतां, अर्थात् ऐकिली असतां, अथवा वाचली असतां; पक्षीं कर्णनामक जो दुर्योधनाचा मित्र त्याच्याजवळ गेलेली ह्मणजे त्यास प्राप्त झालेली.

५.—"पदें" ह्मणजे सुप्तिङंत अक्षरांचा समूह; पक्षीं पाय.

६.—"वर्ण" ह्मणजे अक्षरें; पक्षीं ब्राह्मणक्षत्रियादिक.

७.—मनोहर; पक्षीं मोत्यांच्या हारांनीं युक्त.

८.—या नांवाचा कवि.

९.—ग्रंथविशेषांत; पक्षीं खजिन्यांत.

१०.—"जाति" ह्मणजे मात्राछंद; पक्षीं चांगल्या जन्मांचीं ह्मणजे फार उंचीं, फार किंमतीचीं.

११.—"प्रौढि" ह्मणजे प्रौढता; पक्षीं रत्नाचें पाणी.

१२.—यावच्चंद्रदिवाकर या जगांत असणारीं; पक्षीं खराब न होणारीं अथवा न फुटणारीं.

१३.—कविविशेष.

१४.—"प्रवरसेन" या नांवाच्या कवीच्या यशाची "तति" ह्मणजे समूह.

१५.—समुद्राच्या पार गेली ह्मणजे दिगंतीं गेली; पक्षीं समुद्र उलंडून लंकेंत गेली.

१६.—"सेतु" या नांवाच्या काव्यानें केलेली, ह्मणजे तें काव्य रचल्यामुळें जगांत पसरलेली; पक्षीं केला आहे सेतुबंधरामेश्वर जिनें ती.

१७.—कुमुदाप्रमाणें पांढरी, अर्थात् मनोहर; पक्षीं "कुमुद" या नांवाचा वानर जींत शोभतो आहे ती.

१८.—प्रस्तावना; पक्षीं मजले (माळे).

१९.—"वदावद" ह्मणजे मोठे वक्ते जे, "सूत्रधार" ह्मणजे नाटकांचे मूळस्तंभ त्यांनी, "कृत" ह्मणजे केलीं आहेत, "मंगल" ह्मणजे मंगलाचरणें ज्यांत तीं; पक्षीं मोठा वक्ता जो वास्तुविद्या जाणणारा त्यानें केलीं आहेत, निर्विघ्न मंदिराची समाप्ति व्हावी ह्मणून, यागविशेषादिक मंगलकार्यें ज्यामध्यें.

सपताकिकें[1], मिळवितो कसा, पहा,
कविशिल्पिभास[2] सुयशोधनास हा. १६
श्रीकालिदासकविच्या[3] मधुमधुरा सूक्तिमंजरी बोला
निर्गमसमयीं अपुल्या सुप्रीत करिति अहो न कोणाला. १७
कंदर्पदीपन[4] करी, कलुषा[5] निवारी,
गौरीप्रसाधन[6] रची, श्रुतिला[7] न दारी,
लीलाच काय, न च वत्सकृती[8] न साहे,
शैवी, दिसे अशि कुणा, न बृहत्कथा[9] हे. १८
श्रीआढ्यराजकविच्या[10] हृदयीं काव्यास सांपडे वास;
तत्कृष्टा कृतिमंदा जिव्हा संकोच पावली खास. १९
ऐसें असे जरि, तसेंच, कृती मदीया
होईल ही कशि पुरी, भय हेंहि हो, या,
श्रीमन्नृपानुनयनोचित मी स्वभावें,
आख्यायिकाध्वित सजिव्ह अतां बुडावें. २०
मधुररसवती जी, बोधयुक्ताहि आहे,
श्रवणरुचिरवर्णाऽलंकृतिप्राज्य पाहें,
ललितपदविलासाकृष्टलोकैव गाजे,
रुचिरयुवतितुल्याऽऽख्यायिका ती विराजे. २१
भासे ज्याचा ज्वलनच जसा प्रौढ तो सुप्रताप,
प्राकाराभा स्वजगदवनीं ज्या, स्वकीयां न ताप
दे जो, नित्य प्रणयिजनसद्वांच्छितश्रीशिलेशी[11],
त्या हर्षाला[12] कधिहि नच हो, देवहो, दैन्यलेश २२

युगांतरीं एकदा असें घडून आलें कीं, फुललेल्या[13] कमळावर बसून आपल्या सभोवतीं बसलेल्या **इंद्रादिक** देवांबरोबर **ब्रह्मदेव** वेदांविषयीं कांहीं बोलत बसला आहे, व मध्यें मध्यें **चतुर्दश[14] विद्यांच्या**ही गोष्टी काढीत आहे; **मनु, दक्ष, चाक्षुष,** वगैरे **प्रजापति[15]** व

१.—"पताका" ह्मणजे नाटकाचा अवयवविशेष; पक्षीं बावटा.

२.—या नांवाचा कवि.

३.—रघुवंशादिकांचा कर्ता.

४.—जी वाचली असतां कंदर्पाचें दीपन होतें; पक्षीं जिनें कंदर्पास जाळलें. "कंदर्प" ह्मणजे मदन.

५.—पापाला.

६.—"गौरी" या नांवाच्या देवतेचें अथवा राजकन्येचें अथवा अप्सरेचें जींत माहात्म्य वर्णिलें आहे; पक्षीं पार्वतीची वेणी फणी करून तिच्या सौंदर्याची वृद्धि करणारी.

७.—कानाला; पक्षीं वेदाला.

८.—"वत्स"[1] या नांवाच्या राजाचीं, अथवा या नांवाच्या देशाच्या राजाचीं, कृत्यें जींत सविस्तर वर्णन केलीं आहेत; पक्षीं कार्तिकस्वामी, गणपति, ह्या मुलांचे अपराध जी पोटांत घालत्ये.

९.—हें एका ग्रंथाचें नांव होय.

१०.—इतर कवींच्या हृदयांत; किंवा माझ्याच हृदयांत.

११.—"श्रीशैल" या नांवाचा पर्वत; आपणास सिद्धि मिळावी अशी ज्यांस इच्छा असेल, त्यांनीं या पर्वतावर साधन केलें असतां, ती त्यांस लवकर मिळत्ये, असा पुष्कळ लोकांचा समज आहे. त्या समजास उद्देशून ही उक्ति लिहिली आहे.

१२.—या नांवाचा राजा. बाणकवीस याच राजाचा मोठा आश्रय होता.

१३ कमळ हें ब्रह्मदेवाचें आसन असें अनेक पुराणांत लिहिलें आहे; त्या लेखास अनुसरून ही उक्ति आहे; "कमलासन" असें जें कधीं कधीं ब्रह्मदेवास नांव देतात त्याचेंही मूळ हेंच.

१४ ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद, हे चार वेद; "आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, शिल्पशास्त्र," हे चार "उपवेद;" "शिक्षा, कल्प, निरुक्त, व्याकरण, छंद, ज्योतिष," हीं "सहा अंगें." मिळून १४ विद्या. शिल्पशास्त्राच्या ठिकाणीं कोणी "धर्मशास्त्र" समजतात.

१५ लोकांचे मूळपुरुष. हे युगाच्या आरंभीं असतात यांच्या विषयीं सविस्तर माहिती पाहिजे असल्यास, "हरिवंशाच्या" आरंभींच पहावी.

सप्तर्षी[1]सहवर्तमान दुसरे मोठे मोठे ऋषिही जगतास पूज्य अशा त्या देवदेवाची सेवा करीत आहेत; स्तुति करण्यांत मोठे कुशल असे कित्येक ब्राह्मण, त्याच्या समोर **ऋग्वेदाचें** पारायण करीत आहेत; सर्व लोकांस पूज्य अशा **यजुर्वेदा**चेही तेथें कित्येक पठन करीत आहेत; कित्येक तर अनेक रीतीनीं देवांचीं स्तवनें करणारीं **सामें** गात आहेत; एका बाजूस यज्ञविधीची सांग फोड करणाऱ्या मंत्रांची व्याख्या चालली आहे; दुसऱ्या बाजूस भिन्न भिन्न पक्षांचा परिग्रह करून कित्येक विद्वानांनीं तर मोठ्या झपाट्यानें वादास सुरवात केली आहे; इतक्यांत जन्मापासूनच फार रागीट अशी ज्याची प्रसिद्धि, जो **अत्रि**[2]**ऋषी**[3]**चा** मुलगा, जो **चंद्रा**[3]**चा** भाऊ, त्या **दुर्वासाचा, उपमन्यु** नांवाच्या एका ऋषीबरोबर कलह लागला; व त्या कलहांत डोळे लाल करून **साम** गात असतां **दुर्वास** फटकन स्वर चुकला. ती चुकी जरी सर्वांच्या लक्षांत आली, तरी **दुर्वासा**चा कुत्र्यासारिखा स्वभाव सर्वांस चांगला माहित असल्यामुळें, ती त्याची त्यास दाखविण्यास कोणी धजत नाहीं; व **ब्रह्मदेव** तर दुसऱ्या एका ऋषीबरोबर भाषणास सुरवात करून, तिकडेस आपलें लक्षच नाहीं असें दाखवीत आहे; असें पाहून, बालत्वास हळुहळू हांकवून देऊन आपल्या शरीराची सर्व वहिवाट तारुण्यावस्थेच्याच हातीं देण्याचा हेतु बाळगणारी; **ब्रह्मदेवावर** मोठ्या डौलानें चंवरी ढाळीत असल्यामुळें थोडीशी कंपित झालेली भुजलता जीस अत्यंत शोभवीत आहे; मी तुमची इतकी जोपासना करित्यें तरी कांहीं तुमचा कोमलपणा रहात नाहीं हें चांगलें नाहीं, असा धिक्कार केल्यामुळेंच लाल झाले कीं काय, असे जिचे जन्मापासून रक्त कमलाप्रमाणें सुकुमार असणारे पाय भासत आहेत; हे दोन शिष्यच विद्या मिळविण्यासाठीं लीन झाले कीं काय, असे जिच्या पायांजवळ पदक्रमानें[4] मुखर झालेले पैंजण शोभत आहेत; अलक्तकपिंडाचा लव देखील नसतां जिचे स्वभावानेंच अरुण असे पार्ष्णिप्रदेश फार मनोरम दिसत आहेत; धर्मनगराच्या तोरणाचे स्तंभच कीं काय, असा, जिचें जंघायुग पाहिलें असतां, कोणाच्याही मनांत भ्रम उत्पन्न होईल; सोन्याच्या दिव्य फरसावरही फारच सुकुमार असल्यामुळें चालवत नाहीं, म्हणून पाउलें टाकण्यास हीं मऊ किसलयेंच पुढें टाकलीं आहेत कीं काय, अशी जिच्या चरणनखांची कांति शंका उत्पन्न करिते; जिचें डावें करकमल कमरपट्ट्यावर विश्रांति घेत आहे; अनेक दिवस विद्वानांच्या हृदयांत वास केल्यामुळें तेथील निर्मळ गुणांचा हा कलापच लग्न झाला आहे कीं काय, असें भासणारें यज्ञोपवीत जिच्या देहास पवित्र करीत आहे; ज्याच्या मधला मणि (तन्मणि) सूर्याप्रमाणें प्रकाश पाडीत आहे, असा जो मोत्यांचा हार, त्याच्या योगानें जिची कांति उज्ज्वळ दिसत आहे; वदनांत प्रविष्ट झालेल्या **विद्यांच्या** चरणालक्तकानेंच लाल झाले कीं काय, असे जिचे

१ विश्वामित्र, जमदग्नि, भरद्वाज, गौतम, अत्रि, वसिष्ठ, कश्यप, हे "सप्तऋषि."

२ ही कथा पुराणप्रसिद्ध आहे.

३ ही देखील कथा पुराणप्रसिद्ध आहे.

४ "पद" म्हणजे पाय, त्यांच्या "क्रमानें" म्हणजे चालण्यानें; पक्षीं "पद" म्हणजे वेदाचीं पदें; व "क्रम" म्हणजे वेदाचा अन्वय.

५ वाजणारे; पक्षीं बोलणारे.

स्वभावतःच पोवळ्यांचा धिक्कार करणारे ओंठ विराजमान होत आहेत; हिच्या मधुर गायनास लुब्ध होऊन चंद्रांतील हरिणानेंच आंत उतरून वास केला कीं काय, अशी, **ब्रह्मदेवाच्या** कृष्णाजिनाच्या प्रतिबिंबानें युक्त झाल्यामुळें, जिची कपोलस्थली मनोहर दिसत आहे; **पितामहाची** सेवा करण्यासाठीं मंद मंद वहाणाऱ्या वाऱ्याच्या योगानें कपाळावर येणारे केश बांधण्यासाठीं जी आपल्या एका हातानें यत्न करीत आहे; अवज्ञापूर्वक जिनें आपली एक भोंवई वर चढविली आहे; विस्वर सामाच्या श्रवणानें कलुष झाल्यामुळें, एका कानाचें प्रक्षालन करण्यासाठींच हे निर्मळ उदकाचे प्रवाह चालले आहेत कीं काय, असे जिचे अपांग शोभत आहेत; वर घातलेल्या निर्गुंडीच्या फुलांच्या योगानें जिचे कान हंसतच आहेत कीं काय, असा भास होत आहे; श्रुतींचा[1] प्रणय करणारे हे प्रणवच[2] कीं काय, असे, जिच्या कर्णावतंसावरील भ्रमर, रमणीय दिसत आहेत; बारीक व उंच्या सफेत वस्त्रानें जिची शरीरलतिका सगळी आच्छादून टाकिली आहे; ती **सरस्वती** मात्र आपल्या दंतकलिकांच्या शोभेनें सभेस विस्मित करीत होत्साती, **दुर्वासाच्या** तोंडाकडेस पाहून हसूं लागली. तेव्हां "दुष्टे, तूं चार पांच अक्षरें पढून, तितक्यानेंच मोठ्या विद्वानाचा आव घालून, माझ्यापुढें आपली विद्वत्ता दाखवून, माझी हेळणा करूं पहाण्येस काय? तर, थांब आतां"; असें मोठ्या रागानें बोलून, आपल्या जटांची **दुर्वासानें** गांठ सोडली; त्या जटा इतक्या पिंगट होत्या, कीं त्यांच्या त्या पिंगट रंगानें, **दुर्वासाच्या** कोपानलानेंच आपलें दिव्य आवरण घालून आच्छादून टाकिल्या कीं काय, अशा दाही दिशा भासूं लागल्या; त्याची भ्रुकुटि इतकी वक्र होऊन वर चढली कीं हा **यमाचा** त्रिशूळच कीं काय, अशी लोकांस शंका उत्पन्न झाली; क्रोधरूपी देवतेच्या उद्देशानें यानें हा आपल्या रक्ताचाच बळी देण्यास आरंभ केला कीं काय, असे त्याचे तांबडे लाल झालेले डोळे भासूं लागले. वाणी देखील भयानें दूर पळूं लागली, तीस पकडून आणून शापावर तिची प्रवृत्ति व्हावी एतदर्थच हा निःसंशय दांत ओंठ चावीत आहे, व बाहूवरून जें कृष्णाजिन खालीं लोंबूं लागलें त्यास शापशासनपट समजूनच पुनः वर सांवरून घेण्यासाठीं यत्न करीत आहे, असा त्या वेळेस **दुर्वासाविषयीं** लोकांच्या मनांत ग्रह होऊं लागला. त्याच्या आंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या; रागाच्या झपाट्यानें त्याचा सर्व देह थरथर कांपूं लागला; व आपल्या हातांतील रुद्राक्षांची माळ फेकून देऊन आपल्या कमंडलूंतील पाणी त्यानें हातावर घेतलें. इतक्यांत **ब्रह्मदेवाच्या** जवळच बसलेली, अमृताच्या फेनाप्रमाणें स्वच्छ असें कल्पद्रुमाचें उंचे वल्कल नेसलेली, ललाटपट्टावर भस्माचा त्रिपुंड्र शोभत आहे, एका हातांत शुभ्र कमळाच्या कळ्याप्रमाणें शोभणारा स्फटिकाचा कमंडलु धारण केला आहे, अशी **देवी**, शंखाच्या अनेक आंगठ्या घातल्यामुळें फारच सुंदर दिसणारा असा, आपला हात वर करून **दुर्वासाचा** प्रतिषेध करूं लागली. नंतर "सखि, तूं याच्या बरोबर कशास लागत्येस; हा **रुद्राचा** अंश; जन्मापासूनच याची प्रकृति तामसी; याचें सांत्वन करण्याच्या खटपटीस तूं कां

१ कानांचा; पक्षीं वेदांचा.
२ ओंकार.

ह्मणून पडत्येस;" असें **सरस्वती** बोलत असतांही तिकडेस दुर्लक्ष करून, "दुष्टा, धिक्कार असो तुझ्या तपाला! असल्या तुझ्या स्वभावास तरी काय बोलावें! ब्राह्मणाच्या कुळांत जन्म घेऊन आपल्या हृदयांत क्रोधास एकच्छत्री राज्य करूं द्यावें, व कार्याकार्याचा विवेक करूं नये हें काय! चूक केली ह्मणून आपणच, खरोखर पाहिलें असतां, लहान तोंड करून, दूर जाऊन, शरमेनें गुपचूप बसावें, तें तर दूर; पण हिनें तुझी चुकी काढून दिली ह्मणून हिचे आभार न मानतां, उलट देवादिकांस अत्यंत मान्य व त्रिभुवनाची आई अशी जी ही **देवी सरस्वती** हीसच शाप देण्यास तयार झालास हा कोठला गुरूपदेश!" इत्यादि अनेकरीतीनीं **दुर्वासाचा** धिक्कार करण्यास आरंभ करणाऱ्या ऋषींसहवर्तमान मूर्तिमंत चारही **वेदांस** बरोबर घेऊन **देवी सावित्री** देखील आपलें आसन सोडून वर उठली. नंतर "भगवन्, ही शापाची भूमि नव्हे बरें" अशी देव प्रार्थना करूं लागले; "गुरो, हा इतका **सरस्वतीचा** अपराध क्षमा करा," असें ह्मणून, शिष्यांनीं हात जोडले. "मुला, तूं या रीतीनें आपल्या चिरसंचित तपाचा नाश करितोस हें काय?" याप्रमाणें **अत्रिऋषि** निवारण करूं लागला, तरी कोणासही न जुमानतां, रागाच्या आवेशानें "दुर्विनीते, आपल्या विद्येचा गर्व धरून माझी हेळणा तूंच केलीस नव्हे, तर जा, खालीं घे पृथ्वी लोकांत जन्म," असें ह्मणून **दुर्वासानें** शापोदक सोडलें. हा शाप ऐकून, प्रतिशाप देण्यास सिद्ध झाली असें पाहून, "सखि, इतका कोप यावर कशास करितेस? याची बुद्धि कितीही हलकट असली तरी हा जातीनें ब्राह्मण तर खरा ना, तेव्हां याचा मान राखावा हेंच आपणास योग्य," असें बोलून **सरस्वतीनें सावित्रीचा** राग शांत केला.

(पुढें चालेल.)

भोजप्रबंध.

(पुढें चालू)

याप्रमाणें रोज दान करणाऱ्या भोजराजाची कीर्ति ऐकून कोणी एक तैलंग देशांतील कवि धारानगरींत येऊन एक महिनापर्यंत राहिला; परंतु त्यास राजाचें दर्शन झालें नाहीं; व जवळ खाण्यासही कांहीं राहिलें नाहीं. कोणे एके दिवशीं राजा मृगया करण्याच्या हेतूनें बाहेर निघाला, त्यावेळीं तो कवि राजास पाहून ह्मणाला,

दृष्टे श्रीभोजराजेस्मिन्गलन्ति त्रीणि तत्क्षणात् ।
शत्रोः शस्त्रं कवेः कष्टं नीवीबन्धो मृगीदृशाम् ॥

श्रीभोजराजा दृष्टीस पडला ह्मणजे शत्रूचें शस्त्र; कवीचे कष्ट व स्त्रियांची वसनग्रंथि हीं तिन्हीं एकदम गळून पडतात. हें ऐकून राजानें त्यास एक लक्ष रुपये दिले. नंतर तो राजा मृगयेंत रत झाला असतां कोणी एका यवनानें त्याजवळ गाणें गाइलें; तें गीतमाधुर्य ऐकून राजा संतुष्ट झाला व त्यास पांच लक्ष रुपये देता झाला. तेव्हां कोणीएक उन्मत्त कवि त्या यवनाकडे व राजानें दिलेल्या त्या सुंदर बक्षीसाकडे पाहून राजहस्तांतल्या कमळाच्या मिषानें राजास ह्मणाला,

एते हि गुणाः पंकज सन्तोपि न ते प्रकाशमायान्ति ।
यल्लक्ष्मीवसतेस्तव मधुपैरुपभुज्यते कोशः ॥

हे कमला, ज्याचें लक्ष्मीअर्थीं केवळ वसतिस्थान अशा तुझ्या कोशाचा उपभोग

१ (राजपक्षीं) द्रव्य; (कमलपक्षीं) शोभा. २(राजपक्षीं) जामदारखाना; (कमलपक्षीं) पंकजकोश.

मधुप करितात त्या पक्षी तुझ्यांत असे गुण असूनही ते प्रसिद्धीस येत नाहींत. भोजराजानें हा त्याचा अभिप्राय जाणून त्यास एक लक्ष रुपये दिले, आणि ह्मणाला,

पूज्यते प्रभुभिर्विप्र कलैव न कुलीनता ।
कलावान्धार्यते मूर्ध्नि सत्सु देवेषु शम्भुना ॥

हे विप्रा, समर्थ जन कलेसच मान देतात, कुलीनतेस देत नाहींत. इतर देव असतांही शंकर चंद्रासच मस्तकीं धारण करितो; कारण तो कलायुक्त आहे. याप्रमाणें भोजराजा बोलत आहे, इतक्यांत देशांतराहून पांच कवि आले; त्यांस पाहून राजा चकित झाला आणि ह्मणाला, मी नुकतेंच इतकें वित्तदान केलें, आणि पुनः हे कवि तयारच ! राजाचा अभिप्राय जाणून तो कवि पुनःकमलाच्या मिषानें ह्मणाला.

किं कुप्यसि कस्मैचन सौरभसाराय कुप्य निजमधुने।
यस्य कृते शतपत्र प्रतिपत्रं मृग्यते भ्रमरैः ॥

हे कमला, दुसऱ्यांवर उगेंच कां रागावतेस? ज्याच्यासाठीं भ्रमर तुझ्या प्रत्येक पानावर बसण्यास झटतात, अशा आपल्या गोड मधावर रागें भर! हें ऐकून राजा प्रसन्नमुख झालासें पाहून तो कवि पुनः उघड रीतीनें ह्मणाला.

न दातुं नोपभोक्तुंच शक्नोति कृपणः श्रियम् ।
किन्तु स्पृशति हस्तेन नपुंसक इव स्त्रियम् ॥

कृपण मनुष्य आपल्या द्रव्याचें दान करण्यास किंवा उपभोग घेण्यास समर्थ नाहीं, परंतु जसा एकादा तृतीयप्रकृति पुरुष स्त्रीस फक्त हातानेंच स्पर्श करितो, त्याप्रमाणेंच त्याची दशा ! राजा, विष्णूचा अंश असल्याशिवाय त्याची स्त्री जी लक्ष्मी तिचा उपभोग घेण्यास दुसरा कोण समर्थ आहे ?

चंद्र १६ कलांनीं युक्त आहे हें प्रसिद्धच आहे.

याचितो यः प्रहृष्येत दत्त्वा च प्रियवाग्भवेत् ।
तं दृष्ट्वाप्यथवा स्पृष्ट्वा नरः स्वर्गमवाप्नुयात् ॥

मागितलें असतां जो आनंद पावतो व दान दिल्यावरही जो गोड भाषणें करतो, अशा पुरुषाच्या दर्शनानें किंवा संसर्गानें मनुष्यास स्वर्गति प्राप्त होते.

हें ऐकून राजा संतुष्ट झाला आणि त्या कवीस लक्ष रुपये देता झाला. तेव्हां तो पूर्वीचा कवि पुढें उभे राहिलेल्या सहा कवींस पाहून ह्मणाला, हे कवींनो, राजा ह्या वेळीं त्या महासरोवराच्या कांठीं बसला आहे, तर तुह्मांस त्यास भेटण्याची जर इच्छा असेल तर ती ह्या वेळेस जशी पूर्ण होईल तशी तो अंतःपुरांत गेल्यावर मग होणार नाहीं. तेव्हां त्यापाशीं जाऊन कांहीं ह्मणा. तें ऐकून ते सर्व महाकवि राजाचें पूर्वीचें सर्व कृत्य समजून घेऊन राजापाशीं गेले आणि त्यांपैकीं एकजण सरोवराचें मिष करून अन्योक्तीनें राजास ह्मणाला,

आगतानामपूर्णानां पूर्णानामथ गच्छताम् ।
यदध्वानि न संघट्टो घटानां तद्वृथा सरः ॥

सरोवरावर रिकामे येतांना व परत पाण्यानें भरून जात असतां मार्गांत घड्यांचा संगम जर झाला नाहीं तर तें सरोवर असून नसून सारखेंच ! तें ऐकून राजानें त्यास एक लक्ष रुपये दिले. तें पाहून गोविंद पंडितास राग आला. त्याच्या त्या रागाचें कारण जाणून दुसरा कवि अन्योक्तीनें ह्मणाला.

कस्य तृष्णां न क्षपसि हि पिबति न कस्तव पयःप्रविश्यान्तः
यदि सन्मार्गसरोवर नक्रो न क्रोडमधिवसति॥

हे सन्मार्गसरोवरा, तुझ्या पाण्यांत जर सुसरांची वस्ती नसती, तर तूं कोणाची तृषा

भागविली नसतीस ? किंवा तुझ्या अंतर्भागीं शिरून कोणी तुझें प्राशन केलें नसतें ?

राजानें संतुष्ट होऊन त्यास दोन लक्ष रुपये दिले व त्या गोविंदपंडितास आपल्या कामावरून दूर करून त्यास सांगितलें कीं, तुम्हीं सर्भेत येत जावें, परंतु कोणाचा द्वेष करूं नये. नंतर राजानें त्या सर्व कवींस एकेक लक्ष रुपये देऊन घरीं जाण्यास आज्ञा दिली व आपण मंदिरांत परत येऊन मुख्य प्रधानास आज्ञा केली कीं,

विप्रोपि यो भवेन्मूर्खः स पुराद्बहिरस्तु मे ।
कुम्भकारोपि यो विद्वान्स तिष्ठतु पुरे मम ॥

मूर्ख मनुष्य ब्राह्मण जरी असला तरी त्यास माझ्या नगरींतून बाहेर घालवून द्यावें, व विद्वानास मात्र ह्या नगरींत राहूं द्यावें, मग तो कुंभार कां असेना ! तेव्हांपासून धारा नगरींत कोणी मूर्ख राहिला नाहीं. असो, कांहीं दिवस लोटल्यावर भोजराजाच्या सर्भेत वररुचि, बाण, मयूर, वामदेव, हरिशंकर, कलिंग, कर्पूर, विनायक, मदन, विद्याविनोद, कोकिल तारेंद्रप्रभृति सर्वशास्त्रपारंगत सुमारें ५०० विद्वज्जनांचा समुदाय विराजमान झाला.

याप्रमाणें चाललें असतां कोणे एके दिवशीं कवितापिय, कविशिरोमणि व विद्वानांचा प्रियबंधु असा भोजराजा सर्भेत सिंहासन वर बसला आहे, सर्भोवती विद्वान् कवींचा थाट विनोद करीत आहे, इतक्यांत द्वारपाळानें येऊन प्रणाम करून वर्दी दिली कीं कोणीएक कवि सभाद्वारीं आला असून राजदर्शन घेण्यास इच्छितो. राजानें आंत पाठविण्याची आज्ञा दिल्यावर तो विप्र येऊन उजवा हात वर करून आशीर्वाद देता झाला.

राजन्नभ्युदयोस्तु

शङ्करकवे किंपत्रिकायामिदं

पद्यं

कस्य

तवैव भोजनृपते

तत्पश्यतां

पठ्यते ।

एतासामरविंदसुंदरदृशां द्राक्चामरान्दोलनाद्
उद्वेल्लद्भुजवल्लिकंकणझणत्कारः क्षणं वार्यताम् ॥

ब्राह्मण ह्मणाला, राजा, तुझा जयजयकार असो. राजानें प्रश्न केला हे शंकर कवे त्या कागदांत काय आहे ?

ब्रा०—पद्य.

रा०—कोणाचें?

ब्रा०—हे भोजराजा, तुझेंच.

रा०—तर तें ह्मणावें.

ब्राह्मण—ह्मणतों; परंतु ह्या कमलनयना स्त्रिया चामरें लवकर ढाळतात; त्यांच्या हातांतल्या कंकणांचा झणत्कार होतो, तो क्षणभर बंद कर. राजानें चामरें ढाळण्याचें बंद करविल्यावर कवि वाचूं लागला.

यथा यथा भोजयशो विवर्धते
सितां त्रिलोकीमिव कर्तुमुद्यतम् ।
तथा तथा मे हृदयं विदूयते
प्रियालकालीधवलत्वशङ्कया ॥

त्रैलोक्य शुभ्रवर्ण करण्यासच कीं काय, जसजसें भोजराजाचें यश[1] पसरतें, तसतसें प्रियस्त्रियांच्या मस्तकावरील कुरळ केशही पांढरे होतील या भीतीनें माझ्या अंतःकरणाला दुःख वाटतें.

हें ऐकून राजा संतुष्ट झाला व जामदारखान्यावरच्या अधिकाऱ्याला बोलावून शंकरकवीस बारा लक्ष रुपये देण्याची आज्ञा केली. त्या अधिकाऱ्यानें शंकरकवीस वि-

१ यश शुभ्रवर्ण आहे असें कवि ह्मणतात.

चारलें कीं आपण सभेंत काय भाषण बोललीं? कोणत्या वचनानें राजा संतुष्ट झाला? ह्या धर्मपत्रांत कोणत्या संबंधानें दान लिहूं? कवि ह्मणाला, हे महापुरुषा मी बोलण्यास संधि मागितली. कविता रचून वेळ मागितली ह्मणून राजा संतुष्ट झाला. तें ऐकून त्या धर्माधिकाऱ्यानें धर्मपत्रांत लिहिलें कीं,

ददौ द्वादशलक्षाणि मुद्राणां याचितः क्षणम् ।
शङ्कराय कवीन्द्राय श्रीभोजः क्षोणिमण्डलः ॥

सार्वभौम श्रीभोजराजा, शंकरकवीला, वेळ मागितली ह्मणून बारा लक्ष रुपये देता झाला.

तेव्हां राजानें एक लक्ष रुपये देण्याचा नियम केला असतांना शंकरकवीस एकदम बारा लक्ष दिले हें पाहून सर्व विद्वान् कवि रागावले व सर्वांनीं माना खालीं घातल्या. परंतु राजाच्या भयामुळें कोणाच्यानें कांहीं बोलवेना. कांहीं वेळानें कांहीं कामाकरितां राजा घरांत गेला. राजा सभेंतून गेला असें पाहून ते सर्व पंडित राजाची निंदा करूं लागले. ते ह्मणाले, अहो, दानास पात्र कोण, अपात्र कोण, याचा विचार न करणाऱ्या ह्या राजाची सेवा करून काय फळ? सर्व वेदविद्या जाणणारे व सर्व महाशास्त्रांत निष्णात असे जे त्याचे सेवक आह्मी, त्या आह्मांस हा संतुष्ट झाला असतांही एक लक्ष रुपये देतो, व हा शंकर साधारण कवि असतांना त्यास बारा लक्ष? याप्रमाणें एकच गलबला चालला असतां, कोणीएक महापुरुष, सुवर्णाचीं व रत्नांचीं कुंडलें घातलीं आहेत, राजपुत्राप्रमाणें दिव्यवस्त्रें परिधान केलीं आहेत, सर्व आंगावर कस्तुरी लाविली आहे, मस्तकावर नवीन पुष्पें धारण केलीं आहेत, चंदनाच्या उट्यांच्या सुवासानें भ्रमरांचे थवे लोभवीत आहे, साक्षात् शृंगारक्रीडाच कीं काय, किंवा महेंद्रच भूमंडळावर उतरला कीं काय, अशा थाटानें सभेंत आला. त्याला पाहून तो विद्वज्जनसमूह भयचकित झाला. त्या पुरुषानें सर्वांस प्रणिपात केला व त्यांत भोजराजा कोठें आहे, असें विचारलें. त्यांनीं उत्तर दिलें, कीं तो नुकताच अंतर्गृहांत गेला. तें ऐकून त्यानें सर्वांस तांबूल दिलें आणि हत्तीच्या थव्यांत एकाद्या सिंहाप्रमाणें त्या सभेंत तो बसला.

कांहीं काळ गेल्यावर शंकरकवीस दान दिल्यामुळें रागावलेल्या त्या पंडितांस पाहून तो महापुरुष ह्मणाला, राजा इतर कवींस एकेक लक्ष रुपये देतो परंतु शंकरकवीस बारा लक्ष रुपये दिले ह्मणून तुह्मी त्याची निंदा करूं नका. भोजराजा अवतारी पुरुष आहे, त्याच्याकडून चुकी घडेल असें कदापि मानूं नये. त्या भोजराजास जितकें ज्ञान आहे तितकें तुह्मांस नाहीं. तें ऐकतांच त्यांस राग आला. ती त्यांची रागावलेली मुद्रा पाहून तो पुरुष ह्मणाला, मजवर रागें भरूं नका, मी सांगतों तें ऐका; राजानें शिवपूजनाच्या वेळीं शंकरास एकच लक्ष रुपये दक्षिणा दिली; परंतु त्याच्या पंक्तीस बसणाऱ्या त्याच्या आणखी अकरा मूर्ति[1] गुप्त रूपें धरून आहेत असें मानून त्यांच्याबद्दल त्या प्रत्यक्ष मूर्तीसच आणखी अकरा लक्ष रुपये दिले. त्या शंकराचा अवतार हा शंकरकवि असें राजा मानतो; ह्मणून ह्यासच ते बारा लक्ष रुपये राजानें दिले. याप्रमाणें राजाचा अभिप्राय जाणून त्यांस मोठा चमत्कार वाटला. इतक्यांत हें सर्व वर्तमान कोणी राजसेवकानें जाऊन राजास सांगितलें. राजा आपला

[1] शिवाच्या अकरा मूर्ति 'एकादश रुद्र' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

अभिप्राय जाणणाऱ्या ह्या महापुरुषास महेशाचा अवतारच मानून सभेंत आला. राजा आल्यावर तो पुरुष त्यास स्वस्तिवचन बोलता झाला. राजानें त्यास आलिंगन देऊन नमस्कार केला आणि हातांत धरून मंदिरांत जाऊन वरच्या मजल्याच्या खिडकीशीं नेऊन बसविलें आणि ह्मणाला, विप्रा, आपल्या नांवानें कोणत्या अक्षरांस सौभाग्य आणिलें आहे? आपल्या विरहानें कोणत्या देशांतील लोकांस दुःख भोगावें लागत आहे? तें ऐकून कवीनें राजाच्या हातावर "कालिदास" अशीं अक्षरें लिहिलीं. राजानें वाचल्यावर कालिदासाच्या पायांवर मस्तक ठेविला. याप्रमाणें ते भोजकालिदास तेथें बसले असतां संध्याकाळ झाला. तेव्हां राजा ह्मणाला, मित्रा, ह्या संध्याकाळाचें वर्णन कर. कालिदास ह्मणाला,

व्यसनिन इव विद्या क्षीयते पङ्कजश्रीर्
गुणिन इव विदेशे दैन्यमायान्ति भृङ्गाः ।
कुनृपतिरिव लोकं पीडयत्यन्धकारो
धनमिव कृपणस्य व्यर्थतामेति चक्षुः ॥

संकटांत पडलेल्या पुरुषाच्या विद्येप्रमाणें कमलांची शोभा क्षीण होत चालली आहे; गुणिजनांस परदेशांत जसें दैन्य येतें त्याप्रमाणें भ्रमरांची दशा होत चालली आहे; अंधकार वाईट राजाप्रमाणें लोकांस पीडा देत आहे; आणि कृपणाच्या धनाप्रमाणें नेत्रदृष्टि व्यर्थ होत चालली आहे.

पुनः राजाची स्तुति करूं लागला,

उपचारः कर्तव्यो यावदनुत्पन्नसौहृदाः पुरुषाः
उत्पन्नसौहृदानामुपचारः कैतवं भवति ॥

जोंपर्यंत एकाद्या मनुष्याची प्रीति जडली नाहीं तोंपर्यंत सेवा करावी; एकदां प्रीति जडल्यावर मग सेवा करण्यास लागलें तर तें ढोंग ह्मणून समजतात.

दत्ता तेन कविभ्यः पृथिवी सकलापि कनकसम्पूर्णा
दिव्यार्थकाव्यरचनाश्रममेषां यो विजानाति ॥

सरस अर्थाचें काव्य रचण्यास कवींना किती श्रम लागतात हें जो समजतो, त्यानें सुवर्णमय सर्व पृथ्वी कवींस दान दिली.

सुकवेः शब्दसौभाग्यं सत्कविर्वेत्ति नापरः।
कलादवन्न जानाति परः कङ्कणचित्रताम् ॥

चांगल्या कवीचें शब्दलालित्य सुकवीच जाणतो, दुसऱ्याची प्राज्ञा नाहीं. चंद्राच्या कंकणाचें वैचित्र्य राहूप्रमाणेंच शत्रूंसही समजत नाहीं.

याप्रमाणें क्रमानें भोजराजा व कालिदास यांची एकमेकांवर प्रीति जडली.

कांहींदिवस गेल्यावर कालिदास वेश्यालंपट आहे असें जेव्हां त्या पंडितांस समजलें, तेव्हां ते त्या महाकवीशीं वैर करूं लागले. सभेंत त्याला कोणी स्पर्श करीना, किंवा त्याशीं कोणीं संभाषण करीना, याप्रमाणें चाललें.

(पुढें चालेल.)

मुद्राराक्षसनाटकप्रयोग.

एकच वस्तु दोन रूपांनीं दृष्टीस पडली असतां, तेथें कांहींना कांहीं तारतम्य लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं, हें साहजिकच आहे. थोड्या दिवसांमागें एथील 'ग्रांटरोड' नामक प्रसिद्ध नाटकगृहामध्यें विशाखदत्तप्रणीत **मुद्राराक्षस** नाटकाचा प्रयोग निरनिराळ्या दोन विद्वज्जनसमुदायांनीं करून दाखविला. पहिल्यानें पुणेकर दक्षिणविद्यालयस्थ विद्वज्जनांनीं; आणि पुढें कांहीं

दिवसांनंतर मुंबईकर एल्फिन्स्टन् विद्यालयस्थ विद्वज्जनांनीं. उक्त उभय प्रयोगांमध्यें आमच्या मतें जें साम्य किंवा तारतम्य दिसून आलें, त्याविषयीं चार शब्द लिहिणें अप्रयोजक होणार नाहीं, ह्मणून तसें करण्याचा यत्न करूं.

मुद्राराक्षसामध्यें मुख्य पात्रें चाणक्य, राक्षस, चंद्रगुप्त, आणि मलयकेतु, हीं होत; आणि विषय ह्मटला ह्मणजे, **चाणक्यानें** आपल्या अपमानाचा सूड घेण्याकरितां **नंद**राजांचा उच्छेद करून, त्यांच्या राजपदीं त्याचा शूद्रपुत्र **चंद्रगुप्त** हा बसविला असतां, सर्वांना आवडता आणि स्वामिभक्तिपरायण असा जो नंदांचा अमात्य **राक्षस**, तो शत्रूंस मिळाला; हें पाहून मोठ्या धूर्ततेनें, परंतु आपल्या महात्मतेविषयीं त्याच्या अंतःकरणामध्यें मोठी पूज्यबुद्धि उत्पन्न होईल अशा युक्तीनें, त्यास आपल्या पकडींत धरून त्याजकडून चंद्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारविलें आणि आपली प्रतिज्ञा सिद्धीस नेली; हा होय. यांत चाणक्य हा आरंभापासून मोठा अभिमानी, पक्का कारस्थानी, शाहणा, आणि पुरा धूर्त्त असा होता, तथापि तो सद्गुणांला आणि योग्य मनुष्यांना चाहणारा, आणि मूळचा कडकडीत ब्राह्मण; ह्मणून त्याच्या ज्या पात्रामध्यें हीं सर्व लक्षणें जेथच्या तेथें पूर्णपणें आविर्भूत झालीं, त्याच पात्रानें आपलें काम उत्तम रीतीनें बजाविलें असें समजायाचें, असें आमचें मत आहे. पुणेंकर चाणक्यानें आपलें काम फार चांगलें केलें. त्याची वाणी फार शुद्ध होती. उंच नीच स्वर चांगले साधले होते. हावभाव करण्याची हातोटी समयोचित होती. पहिल्यानें त्याचा आवाज जरा पडता होता, तरी पुढें चांगला सुधरला यांत अगदीं संशय नाहीं.

मुंबईकरांचा जेव्हां आह्मी चाणक्य पाहिला, तेव्हां तो पुणेंकरांच्यापेक्षां पुष्कळ चांगला उतरला, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवलें नाहीं. पुणेंकर चाणक्य शरीरानें मध्यम जाड असून त्याला दाढी आणि जटा होत्या. मुंबईकर चाणक्याला दाढी किंवा जटा नव्हत्या, तरी शरीरानें कृश असून योग्य प्रसंगीं कडकपणा दाखविण्याचें त्यांच्या अंगीं जास्त सामर्थ्य होतें, त्यामुळें तोही वयानें उतार दिसे. दोघांचेही केंस असावे तसे काळे पांढरे मिश्रित होते. वस्तुतः दाढी आणि जटा यांचें कांहीं कारण दिसत नाहीं; आणि कवीनें तर—

"**शिखां** मोक्तुं बद्धामपि पुनरयं धावति करः"
"पूर्णप्रतिज्ञेन मया केवलं बध्यते **शिखा**"

असा **शिखे**चाच वारंवार उल्लेख केला आहे. तथापि दाढी असणें नसणें यांत वस्तुतः कांहीं मोठासा गुण किंवा दोष आहे असें नाहीं. असो, मुंबईकर चाणक्याचा आवाज खणखणित होता. शार्ङ्गरवाला हाक मारतांना पहिल्या हाकेमध्यें सामान्यस्वर, आणि दुसऱ्या हाकेमध्यें स्वरभेद करून मनाचा कडकपणा किंवा तैक्ष्ण्य दाखविण्याची त्याच्या अंगीं वर्णनीय खुबी होती. चंद्रगुप्ताशीं जो त्याणें मिथ्याकलह केला, त्या वेळीं तर, 'खऱ्यापेक्षां खोट्याचा नोक फार' या ह्मणीप्रमाणें रागाच्या आवेशांत तें तोंड फिरवून बसणें, तो हूंकार, किंवा याहूनही स्पष्ट शब्द ह्मटल्यास त्याचा तो हेंकार, तें पत्र फेंकून देणें, तें धाडकन पाय आणि तरवार आपटून तेथून निघून जाणें, आणि ती धमकावणी, हें सर्व तर सर्वोत्कृष्ट जमलें होतें, यांत कांहीं संशय नाहीं. पुणेंकर चाणक्याचा हा

भाग, आणि अगदीं सरतेशेवटीं राक्षसास तरवार देण्याचा भाग, तितका मनांत बिंबण्याजोगा जमला नाहीं, असें आह्मांस वाटतें. चंदनदासाशीं झालेलें मुंबईकर चाणक्याचें भाषण हेंही असावें तसें प्रसंगीं सौम्य, आणि प्रसंगीं खरमरित असल्यामुळें अधिक खुललें. सारांश मुंबईकर चाणक्य हा, चाणक्य अथवा **चाणक्ष** या नांवाला अधिक योग्य होता. मुंबईकर चाणक्यामध्यें स्फुरण आणि अभिनय जास्त, आणि पुणेंकर चाणक्यामध्यें गांभीर्य जास्त होतें. आतां यांतून योग्य कोणचें, ह्याविषयीं मतभेद पडेलच. पक्ष प्रतिपक्ष असल्यामुळें एकाला पोरकटपणा आणि दुसऱ्याला धिमें काम असें परस्परांनीं ह्मटलें ह्मणून आश्चर्य नाहीं. तथापि एकंदरीनें मुंबईकर चाणक्य विशेष चांगला उतरला असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं. असें जरी खरें, तरी त्याच्यामध्यें या पात्राला अगदीं अयोग्य असा एक दांडगा दोष होता. तो कोणचा तर, आरंभापासून शेवटपर्यंत जेथें जेथें ह्मणून **ष**काराचा उच्चार व्हायाचा, तेथें तेथें बहुधा त्याच्या मुखांतून **श** निघत असे. '**विशेषतः**' याच्या जागीं '**विशेशतः**' तसेंच '**पश्य पश्य**' याच्या जागीं '**पश्श पश्श**' असा उच्चार निघत असे. केव्हां केव्हां याच्या उलट, ह्मणजे **स**च्या जागीं **श** होत असे. एवढा हा द्वाड दोष जर त्याच्यामध्यें नसता, तर त्या पात्राची किंमत होती ना. असो.

दुसरें पात्र **राक्षसाचें**. याविषयीं मत देणें फार अवघड नाहीं. पुणेंकर राक्षसाचा बांधा, त्याची मुखचर्या, त्याचा सभ्य पोषाख, त्याचे हावभाव, त्याचा स्वर हें सर्व फार उत्तम जमलें होतें. तथापि शेवटीं शेवटीं या पात्रानें अमळ थंडें काम चालविलें; तरी एकंदरींत हें पात्र फार चांगलें जमलें होतें असें ह्मणण्यास बाध नाहीं. मुंबईकर राक्षसाची पोशाख वगैरेची ऐट तितकी उतरली नाहीं. याचा आवाज करुणरसाला प्रसंगीं चांगला जमे, तथापि बहुधा असावा त्यापेक्षां अधिक करुणरसाचा त्यापासून आविर्भाव होई. एवढा मोठा नंदाचा अमात्य **राक्षस**, एवढा राजकारणी पुरुष, तो शोकग्रस्त जरी असला, तरी त्यानें 'हो हो' करून पोराप्रमाणें रोदन करणें योग्य नाहीं. त्याच्या बोलण्यामध्यें आणि विशेषतः कवितेमध्यें, प्रथमाक्षर हकारयुक्त होत असे. केव्हां केव्हां शोकग्रस्त मनुष्याच्या भाषणाला हा प्रकार शोभतो परंतु वारंवार तो प्रकार होणें हें बरें नाहीं, असें आह्मांस वाटतें. तरी एकंदरीमध्यें यानेंही आपलें काम चांगलें बजाविलें.

तिसरें पात्र **चंद्रगुप्त**. पुणेंकर चंद्रगुप्ताचा स्वर फार मधुर होता, यामुळें तो श्लोक ह्मणत असतां श्रोत्यांप्रेक्षकांचें मन तल्लीन होऊन जाई. तथापि राजलक्ष्मीचें तेज जसें मुंबईकर चंद्रगुप्ताच्या अंगीं विराजत होतें, तसें त्यामध्यें दिसलें नाहीं. राजपुत्राचें सौंदर्य, वस्त्रालंकार, छत्र चामरें, यांची खुबी जशी जमावी, तशीच मुंबईकरांची फारच सुंदर जमली होती. राजलक्ष्मीला योग्य अशी भाषणाची आणि वागण्याची प्रौढी याच्या अंगीं होती. कंठ जरी पुणेंकराइतका मधुर नव्हता, तरी याला गाण्याचें अंग चांगलें असल्यामुळें कविता ह्मणण्यामध्येंही याणें खूब बहार केली. संविधानकाच्याच दृष्टीनें जरी हें मुख्य पात्र नव्हे, तरी राजलक्ष्म्यादि कारणांनीं, दोन्ही मंडळ्यांमध्यें मुंबईकर चंद्र-

गुप्ताचें पात्र नेत्राला आणि अंतःकरणाला जितकें आल्हादकारक झालें, तितकें दुसरें कोणतेंही पात्र आल्हादकारक झालें नाहीं.

चवथें पात्र **मलयकेतु**. पराभव पावलेल्या राजपुत्राला योग्य असा पोशाख मुंबईकर मलयकेतूचा होता. ह्मणजे पोशाख तर चांगला श्रीमंती, परंतु त्याला तितकी नव्या पोषाखासारखी छानछोकी नव्हती. पुणेंकर मलयकेतूचा पोषाख नीट जमला नव्हता. भाषणामध्येंही मुंबईकरांचें पात्र चांगलें जमलें असें ह्मणण्यास बाध नाहीं. हीं मुख्य पात्रें झालीं. यांशिवाय **भागुरायणाचें** पात्र दोहोंकडचेंही सरासरीचेंच होतें. त्यांत पुणेंकर भागुरायण मुंबईकरांपेक्षां कांहीं बरा ह्मणतां येईल. इतर पात्रें आहितुंडिक, क्षपणक, सिद्धार्थक, मांग इत्यादिकांविषयीं कांहीं विशेष लिहिण्याजोगें नाहीं. दोहोंकडचीं साधारणतः सारखींच होतीं.

साहव्या अंकामध्यें पुणेंकरांतील जिष्णुदासाचा मित्र जीव देण्याकरितां ह्मणून फांस लावून घेत असतां त्यानें मारवाडयाप्रमाणें, मुद्दाम **स**च्या स्थानीं **ष**, **ष**च्या स्थानीं **स**, **च** चा उच्चार दंततालव्य, करून रसभंग केला. हें कृत्य थट्टेच्या स्थानीं फार शोभलें असतें, परंतु करुणरसामध्यें हें फार अयोग्य झालें असें आह्मांस वाटतें. मुंबईकरांनीं असा कांहीं प्रकार केला नाहीं हें चांगलें झालें.

सातव्या अंकाच्या शेवटीं चंदनदासाला सुळीं देण्याची तयारी, व त्याच्या स्त्रीचा आणि पुत्राचा योग्य विलाप, मुंबईकरांमध्यें चांगला जमला, आणि प्रेक्षकांना गहिंवर येऊन नेत्रांतून टिपें पडलीं. पुणेंकरांचा हा प्रकार बराच झाला; परंतु इतका खुबीदार उतरला नाहीं.

पुणेंकरांच्या नाटकाचा शेवटचा भाग फार थंडाईनें झाला, त्यांत कांहीं उल्लास दिसला नाहीं. मुंबईकरांमध्यें आरंभापासून शेवटपर्यंत एकसारखें ओघानें काम चाललें होतें. चित्रपट ह्मणजे अरण्यादिकांचे देखावे मुंबईकरांनीं चांगले सजविले होते. आणि त्यांत विशेषतः कौमुदीमहोत्सवाच्या वेळीं तर फारच मजा केली होती. नगरांतील मोठमोठे प्रासाद शरत्पौर्णिमेच्या पूर्ण चांदण्यामध्यें शोभायमान होत्साते, त्यांचीं प्रतिबिंबें खालीं नदीच्या पात्रामध्यें जणूं तरंगताहेत असा भास झाला, आणि तशा स्थळीं गच्चीवर चंद्रगुप्ताची स्वारी थाटानें मिरवत आहे, हा सर्व प्रकार फारच रमणीय झाला. तसा पुणेंकरांमध्यें झाला नाहीं. कदाचित् त्यांना चित्रपट मिळाला नसेल हें एक कारण, आणि दुसरें असें, कीं त्यांच्या वेळीं राजाची बैठक पुष्कळ उंच केली असल्यामुळें ती रंगभूमीच्या वरच्या वरच्या मजल्यांमध्यें बसलेल्या लोकांस मुळींच दिसली नाहीं. यामुळें चाणक्याचा आणि त्याचा कलह लागलेलाही त्यांच्या दृष्टीस पडला नाहीं.

याप्रमाणें दोन्ही खेळ पाहून आह्मांला जें वाटलें तें आह्मी लिहिलें आहे. याशिवाय दुसऱ्या कांहीं क्षुद्र गोष्टी आहेत, ह्मणजे केव्हां केव्हां बोलण्यामध्यें, तसेंच कवितेमध्येंही संचार ह्मणजे शब्द मागें पुढें झाले. उदाहरणार्थ पुणेंकरांच्या चाणक्यानें—

'कोपस्य नंदकुलकाननधूमकेतोः' याच्या स्थानीं

'नंदस्य कोपकुलकाननधूमकेतोः'

असें झटलें; तसेंच त्यांच्याच राक्षसानें साहाव्या अंकामध्यें दुसऱ्या अंकांतील एक श्लोक झटला. परंतु अशा चुकांकडे फारसें लक्ष देणें नीट नाहीं. सर्व नाटकांमध्यें अशा चुका होण्याचा वारंवार संभव असतो, झणूनच पडद्याच्या बाजूस उभा राहून प्रतिपात्राचें भाषण, आपल्या पुस्तकामध्यें ताडून पाहून अडेल तेथें सुचविण्याकरितां एक सूचक सिद्ध असतो.

पुणेकरांच्या नाटकाच्या अंतीं चंद्रगुप्तानें थोडीशी इंग्रजी कविता झटली, तिणेंकरून सर्व बेरंग होऊन गेला. असा प्रकार प्रथमतः अप्रासंगिक, आणि तशांत अवाज बरोबर जमला नाहीं. मुखोद्गत नसल्यामुळें कागदावर पाहून अडत अडत झणावें लागलें; व त्या कवितेमध्यें गर्वोक्तिही पुष्कळ होती. यापेक्षां मुंबईकरांप्रमाणें एकदम पडदा टाकला असता तर असा बेरंग झाला नसता.

दुसरी एक गोष्ट—पुणेकरांचा प्रयोग प्रथमतः झाल्यामुळें त्यांतील गुणदोष पाहून त्यांपासून आपल्या प्रयोगामध्यें सुधारणा करण्यास मुंबईकरांना पंधरा वीस दिवसांचा अवधि मिळाला, झणून त्यांचें नाटक चांगलें जमल्यास कांहीं आश्चर्य नाहीं, असें कोणी झणतील, तर अंशतः त्यांचें झणणें खरें आहे. तरी एकदा पाहिलेला खेळ पुनः पाहण्याला प्रेक्षकांच्या मनामध्यें जें औदासीन्य उत्पन्न होतें तें लक्षांत आणिलें असतां, एकंदरीनें नफातोटा सारखाच आहे, असें झणण्यास कांहीं बाध नाहीं.

मुंबईकरांच्या प्रयोगाच्यावेळीं एल. विद्यालयांतील, परलोकवासी **विठ्ठल बापूजी करमरकर**, जे मागच्या दोन संस्कृत नाटकांमध्यें सर्व लोकांना अत्यानंददायक ठरले होते, त्यांची फार फार आठवण पडली; ते जर या वेळीं असते, तर त्यांनीं राक्षसाचें पात्र खरोखरीं चाणक्याच्या बरोबरीचें किंवा कदाचित् सरसही करून दाखविलें असतें. असो.

एकंदरीनें पाहतां दोन्ही प्रयोग चांगलेच झाले; पण त्यांमध्यें आणखी जर प्रतिलावायाच्या तर, पात्रें, पोषाख, भाषणें, देखाव्यांचे पडदे, ठाकठीकपणा, उल्लसितपणा, संगीत या सर्व गोष्टी लक्षांत आणितां, मुंबईकरांना प्रथमस्थान देणें योग्य आहे, असें आमचें मत पडतें. यावरून झणजे पुणेकरांचा अपमान झाला असें नाहीं, व जर कोणी त्यांचा अपमान झाला असें समजत असतील तर ती त्यांची साफ चूक आहे. या खेपेस यांचें नाटक पहिल्या प्रतीचें लागलें, झणून दुसऱ्या खेपेस त्यांचें लागणार नाहीं, असें नाहीं. सारांश, एकमेकांपासून उभयतांनीं हित करून घ्यावें, व परस्परांचा द्वेष न धरितां ऐक्यानें वागून, अशा प्रयोगांपासून आपलें व सर्वांचें जें हित त्यांनीं योजिलें आहे तें सिद्धीस न्यावें, हें आमच्या सर्व विद्वज्जनांस फारच योग्य होय.

धौम महाबळेश्वरवर्णन.

महाबळेश्वर हें स्थळ पुण्याचे नैर्ऋत्येस ७४ मैल सातारजिल्ह्यांत सह्याद्रिपर्वताचे माथ्यावर आहे. या स्थळीं मुख्य ठिकाणें दोन आहेत, एक जुनें महाबळेश्वर व दुसरें नवीन महाबळेश्वर. आपले लोक महाबळेश्वर हें नांव सदोदित जुन्या महाबळेश्वरास देतात. झणजे धौम महाबळेश्वर या नांवानें जी पुण्यभूमि प्रसिद्ध आहे तिलाच आपले लोक महाबळेश्वर झणतात, व नवीन महाबळेश्वरा-

स ह्मणजे हल्लीं जेथें हवा खाण्याकरितां लोक जातात त्या ठिकाणास आमचे लोक नहर ह्मणतात, व विचाराअंतीं नहर हें नांव ठीक आहे असें दिसून येईल. कारण नहर हा शब्द केवळ स्थलविशेषाचा वाचक नव्हे; तर, डोंगरी प्रदेशांत ज्या खोऱ्यांतून नद्या वाहतात त्यांच्या थडीवरच्या प्रदेशास नहर ही संज्ञा आहे, व या अर्थानें आपल्या लोकांचें ह्मणणें यथार्थ दिसतें. परंतु प्रस्तुत सरकारच्या कागदोपत्रीं महाबळेश्वर हें नांव फक्त नवीन महाबळेश्वरास, किंवा हवा खायाचे ठिकाणासच लागतें, आणि जुन्या महाबळेश्वरास महाबळेश्वरचें खेडें किंवा क्षेत्र महाबळेश्वर असें लिहीत असतात. याप्रमाणें सरकारानें भेद ठेविला आहे. क्षेत्र महाबळेश्वर हा गांव सातारजिल्ह्यांत जावळी तालुक्यांत आहे, व नहर हाही सातारजिल्ह्यांत आहे. तथापि, कोणत्याही तालुक्यांत नसून केवळ स्वतंत्र भाग आहे. तेथील बंदोबस्त आणि सरकारी कामाकाजांची व्यवस्थाही निराळे प्रकारेंच होत असत्ये. याकरितां सरकारी ठरावाप्रमाणें पाहिलें असतां महाबळेश्वर या नांवांत क्षेत्र महाबळेश्वरचा समावेश होत नाहीं; परंतु या केवळ सांकेतिक अर्थासचन अनुसरतां, येथें क्षेत्र महाबळेश्वराचेंही वर्णन दिलें आहे, व हें करणें यथार्थ आहे. कारण, मूळ महाबळेश्वर ह्मटलें ह्मणजे क्षेत्र महाबळेश्वरच होय; व पुराणांतरीं आणि आपल्या लोकांमध्यें प्रसिद्ध तेंच स्थळ आहे. नवीन महाबळेश्वर स्थापन होऊन अद्यापि ९० वर्षेंहा पुरतीं झालीं नाहींत. परंतु याशिवाय वास्तविक विचार केला असतां महाबळेश्वर हें नांव आपल्या रूढीप्रमाणें किंवा सरकारी संकेतानुरूप संकोचित नसून त्याचा विस्तृत व पूर्ण अर्थ किंचित् निराळा आहे. ह्मणजे या ठिकाणीं जे अद्भुत सृष्टिजन्य चमत्कार आहेत त्यांच्या सर्व समुदायास वस्तुतः लोक महाबळेश्वर ह्मणत असतात. या समुदायामध्यें क्षेत्रमहाबळेश्वर व नहर या दोहोंचा समावेश होऊन अवांतर सन्निध जीं चमत्कारिक स्थानें आहेत तींही येतात; व मुख्यत्वेंकरून इतिहासप्रसिद्ध जो प्रतापगडचा किल्ला तो तर आलाच पाहिजे. या कारणास्तव या विषयाचे एकंदर चार भाग करून पहिले तीन भागांत स्थलवर्णन, क्षेत्रमाहात्म्य, व इतिहासप्रकरण, यांचें अनुक्रमानें वर्णन दिलें आहे, व चौथ्या भागांत हें वर्णन लिहिण्याचा उद्देश व महाबळेश्वर पाहिल्यापासून काय फायदे होतात व काय फायदे आपण करून घेतले पाहिजेत, याविषयीं विचार केला आहे.

भाग १ स्थलवर्णन.

महाबळेश्वर हें स्थळ सह्याद्रि पर्वताचे ऐन शिखरावर आहे; कारण, ह्या पर्वताची या ठिकाणीं जितकी उंची आहे तितकी इतर ठिकाणीं नाहीं. उत्तरेस हिमालय आणि दक्षिणेस निळगिरी यांचे दरम्यान देखील महाबळेश्वराइतका उंच प्रदेश दुसरा नाहीं. समुद्रसपाटीपासून ह्या डोंगराची साधारण उंची पंचेचाळीसशें फूट आहे व सिंदोला टेकडी ह्मणून महाबळेश्वरीं सर्वांत उंच टोंक आहे तें समुद्रसपाटीपासून ४,७०० फुटांवर आहे. या पाहाडाच्या पायथ्याशीं तीन बाजूनीं पूर्वेस, दक्षिणेस व उत्तरेस घाटावरील प्रदेश ह्मणजे जावळी तालुका आहे. आणि पश्चिमेस रडतोंडीचा घाट व कोयना नदीचा खोरा उतरून गेलें ह्मणजे लागलेंच तळकोंकण सुरू होतें. या पश्चिमेचे बाजूस

डोंगराला चढाव अगदीं नीट असून पायथ्याची जमीन बहुतेक समुद्रसपाटीबरोबर आहे. त्यामुळें एकंदर उतार ४,००० फुटांहून ज्यास्त आहे. रडतोंडीच्या वाटेनें घाटमाथ्यावर येण्यास मनुष्यास व जनावरांस किती श्रम पडतात हें दाखविण्याकरितां रडतोंडीचा घाट हें नांव पडलें असावें.

नहर हें ठिकाण पर्वतावर असल्यानें तेथील भूमीचा आकार उंच सखल व वेडावांकडा आहे. या ठिकाणीं मुख्य वस्तीची जागा मालकमपेठ येथें आहे व तेथून नहरचा विस्तार पाहिला असतां पूर्वेस वांईकडे १५ मैल आहे, आग्नेयेस साताऱ्याकडेस ७॥ मैल, पश्चिमेस कोंकणघाट माथ्याकडे दोन मैल आहे व उत्तरेस आणि वायव्येस एलफिन्स्तन पॉइंटापावेतों ६ मैलांची लांबण आहे.

नहरास जाण्याला देशांतून व कोंकणांतून रस्ते पुष्कळ आहेत व कित्येक उत्तम सडकेचे आहेत. देशावरचे लोक व कित्येक मुंबईचे लोक देखील सध्यां पुण्यावरून जातात. या मार्गानें कात्रजेस कात्रजचा घाट व पुढें वांईच्या अलीकडेस खांबटकीचा घाट आणि नंतर वांई येथें कृष्णानदी उतरल्यावर पसरणीचा घाट याप्रमाणें तीन घाट लागतात. तथापि, रस्त्यानें कोठें त्रास अगर अडचण बिलकुल होत नाहीं. डोंगर चढण्यास वास्तविक प्रारंभ पसरणीचे घाटापासून होतो. या घाटावर गेल्यावर पुढें कृष्णा व वेण्या या दोहों नद्यांचें खोरें दोन्ही बाजूंस असून रस्ता अगदीं मधून जात आहे व या ठिकाणापासून क्रमाक्रमानें महाबळेश्वरचे चमत्कार दृष्टीस पडण्यास प्रारंभ होतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुण्याहून महाबळेश्वरास जाण्यास आणखीही दोन मार्ग आहेत. परंतु ते हल्लीं बंद पडल्यासारखे झाले आहेत. नहराहून सातारा आग्नेयीस १५ कोस आहे, व पूर्वेस वांई दहा कोस आहे. कोंकणांतून वर येण्यास दोन रस्ते आहेत. एक महाडाहून व दुसरा नागोठण्याहून. मुंबईहून येणारे लोक प्रथमतः जळमार्गानें बाणकोटास येतात, व तेथून खाडींतून महाडास येऊन पुढें १५ कोस सुषकीच्या मार्गानें नहरास जातात. या रस्त्यानें हल्लीं नवीन सडक होऊन ती याच वर्षीं चालू झाली आहे. जुना रस्ता ह्मटला ह्मणजे उत्तर कोंकणांतून येणारे लोक नागोठण्याच्या तरीवर अगर धरमतरीवर उतरून तेथून खुषकीच्या मार्गानें इंदापूर, महाड, पोलादपूर, अंबेल नाला, या रस्त्यानें महाबळेश्वरीं येत असत.

या ठिकाणीं जमीन चोहोंकडे तांबडी आहे. याचें मुख्य कारण हेंच आहे कीं मातीमध्यें खनिज लोह पुष्कळ मिश्रित असतें. शिवाय वनस्पतींचा अंशही बराच असतो. घरें वगैरे बांधणें तीं बहुधा तांबड्या मातीचींच बांधतात. चुन्याचीं बांधणारे फार थोडे; परंतु या योगानें महाबळेश्वरीं रहाणारांचे कपडे बाहेरच्या धुळीनें व घरांतल्या वापरण्यानें देखील नेहमीं भगवे होत असतात.

येथील दगड फुसका असून बाहेरून जांभळ्या रंगाचा असतो; ह्मणून त्यास आपले लोक फक्त जांभळा असें ह्मणतात. त्यांत लोखंडाचा अंश फार आहे, व लोखंडाचें शोधन करण्यास अतिशय कमी श्रम पडतात. घिसाडी लोकांचे या ठिकाणीं बरेच कारखाने असतात; अगदीं आवडधोबड साधनानें व अल्प मेहनतीनें लोखंड काढून हे गरीब लोक पोट भरीत असतात. घिसाडी

लोकांच्या हातून लोखंडाची कमाई चांगली होत नाहीं. यामुळें उत्तम लोखंडी पदार्थ तयार न होतां फक्त खोलगट व जाडी तवे मात्र ते करितात. हे तवे मराठे कुणब्यांमध्यें विकत घेण्याचा फार प्रचार आहे. घिसाडी लोकांनां यंत्रांचें वगैरे सहाय नसल्यामुळें त्यांचे हातून हें काम अधिक चांगलें होणें नाहीं. ह्याविषयीं पुष्कळ लोकांनीं मनांत खटपटी केल्या आहेत. परंतु हातानें कोणी कांहीं करीत नाहींत. यंत्र वगैरेचे साधनानें या कामास उत्तेजन देणें किती इष्ट आहे हें सांगणें नको.

एकंदरीनें या डोंगरावरची जमीन फार सुपीक आहे. धान्यांपैकीं तांदूळ व नाचणी हीं पिकतात. गहूंही थोडेबहुत होतात.

भाज्यांपैकीं बटाटे फार उत्तम प्रकारचे होतात; तशींच रताळीं, नवल कोल, कोबी, बीटरूट, विलायती वाटाणे ह्या विलायती तऱ्हेच्या भाज्या स्वस्त व हव्या तितक्या मिळतात. याशिवाय देशावरच्या बहुतेक भाज्या मिळण्यासही अडचण पडत नाहीं.

येथील बटाट्यांची आख्या फारच आहे. त्यांचा रंग तांबडा असतो. असे उत्तम बटाटे निळगिरी शिवाय करून हिंदुस्थानांत दुसरे कोठेंही मिळत नाहींत असें ह्मणतात. बटाटा फार मोठा ह्मणजे अर्धशेर वजनाचा देखील एक एक असतो. आणि शिजविल्यावर अगदीं नरम होऊन फार रूचकर लागतो. पूर्वी बटाटे जसे चांगले व मोठे होत असत त्याप्रमाणें हल्लीं होत नाहींत. याचें कारण असें सांगतात कीं काळ्यापाण्याच्या शिक्षेचे चिनी लोक १५ वर्षांमागें महाबळेश्वरीं ठेविलेले असत; त्यानीं प्रथम बटाट्याची लागवड सुरू केली; व ते लोक फार उद्योगी आणि बागाइतामध्यें चतुर असल्याकारणानें या ठिकाणीं त्यानीं बटाटे उत्तम प्रकारें कमावून प्रसिद्धीस आणिले. परंतु सध्यां चिनी लोक महाबळेश्वरीं बिलकुल नाहींत. आपले माळी आहेत त्यांच्या हातून चिनी लोकांप्रमाणें बागाइताची कमाई होत नाहीं. याशिवाय तांबडे बटाटे हल्लीं फार न लावितां माळी लोक देशांवरचे पांढरे बटाटे लावूं लागले आहेत. या पांढऱ्या बटाट्यांचें बीज प्रथमतः ढमढेऱ्यांच्या तळेगांवाहून महाबळेश्वरास नेलें होतें असें सांगतात.

महाबळेश्वरीं फळें थोडींबहुत मिळतात. स्ट्रॉबरी, रॉसबरी व पीच या तीन फळांचें पीक चांगलें होतें. हीं सर्व फळें विलायती आहेत, ह्मणजे त्यांची उत्पत्ति मुख्यत्वें थंड देशांत होते, व याच कारणास्तव तीं येथें पुष्कळ मिळतात. स्ट्रॉबरी हें फळ बोराएवढें असतें व त्याचा रंग शेंदरी असून चव अंबूस खुबीदार व कांहींशी बोरासारखी असते. हें फळ मनस्वी थंड असतें. त्याचा मुरंबा करितात आणि नुसतीं हीं फळें खातात. रॉसबरी हें फळ अगदीं लहान सुपारीएवढें असतें व वरून रंग काळा असतो. चवेमध्यें स्ट्रॉबरी फळाप्रमाणेंच कांहींसें असतें. हीं दोन्हीं फळें पैशाचीं चारपासून सहांपावेतों मिळतात. पीच फळ हें मुंबईस, पुण्यास व इतर ठिकाणीं पहाण्यांत येतें, त्याचप्रमाणें असतें. आपलीं स्वदेशी फळें महाबळेश्वरीं पुष्कळ मिळतात; परंतु तीं वाई, सातारा या ठिकाणांहून विकावयास येतात. या डोंगरावर पर्जन्य फार असल्यानें फळझाडें चांगलीं येत नाहींत; व आलीं असतां टिकतही नाहींत.

या पर्वतावर औषधाच्या अमोलिक वनस्पति तर शेंकडो आहेत असें सांगतात.

त्यांचीं नांवें व गुण अनुभविक विद्वान् वैद्यांनां मात्र ठाऊक असतात. याशिवाय नांवें बिलकुल माहित नाहींत, अशा वनस्पतिही पुष्कळ आहेत असें ह्मणतात. या ठिकाणीं चोहोंकडे जंगल व निबिड झाडी बारमाहा असते. मोठ्या वृक्षांपैकीं जांभुळ, उंबर, गेळा, रामाठा व पिसा, हे होत. सर्वांत जांभळीचीं झाडें अतिशयच आढळतात व उन्हाळ्यांत त्यांवर पानें कमी, इतकीं जांभळें येतात. या ठिकाणच्या हवेचा गुण असा कांहीं विलक्षण आहे कीं वृक्ष फार ठेंगणे होतात. साधारण मोठें झाड ह्मणजे दोन पुरुषांहून अधिक उंच नसतें. अस्सल बिलायती झाडांपैकीं ओक झाड या ठिकाणीं आढळतें. सारांश, उष्ण देशांतलीं झाडें येथें होत नाहींत.

९ फुलझाडांपैकीं नेवाळीच्या झाडांचे थव्यांचे थवे या डोंगरावर सांपडतात. यांस येथें पुसरीचीं झाडें असें ह्मणतात. नेवाळीच्या झाडाचा इतका सुकाळ पाहून नवीन मनुष्यास फार चमत्कार वाटतो. तसेंच लिंगमळा या नांवाचा एक सरकारी बाग आहे तेथें अस्सल बिलायती फुलझाडेंही कित्येक आहेत. या मळ्याच्या जवळ सरकाराने साठ पांसष्ट हजार रूपये खर्च करून सिंकोना ह्मणजे, ज्यापासून क्वायनाइन उत्पन्न होतें तीं झाडें लाविलीं आहेत. परंतु सर्व पैसा पाण्यांत जाऊन आतां हा नाद सोडून देण्याचा बेत सरकारानें केला आहे. या झाडांखेरीज नदी, नाले व पाणथळ जमिनी यांच्या किनाऱ्यानें नेच्या ह्मणून एक लहान सुशोभित व सुरेख झाड असतें. बिलायतेंत उइलो ह्मणून जें प्रसिद्ध झाड आहे त्याची व नेच्याची जात एकच आहे असें ह्मणतात.

१० जंगली मालपैकीं सावरीचा कापूस, हिरडे, सिकेकाई, बांबूच्या तऱ्हेतऱ्हेच्या हातीं धरण्याच्या काठ्या मिळतात.

११ या ठिकाणीं अतिशय उत्कृष्ट मध मिळतो. येथल्या मधामध्यें मुख्य दोन प्रकार आहेत. एक तांबडा व दुसरा शुभ्र. तांबडा मध मुख्यत्वेंकरून जांभळीच्या फुलापासून होतो, व तो उष्ण असतो. उन्हाळ्यामध्यें हा मध काढल्यावर त्यांत कांहींसा कडवटपणा असतो. परंतु पावसाळा लोटल्यावर कडवटपणा जाऊन मधास फारच स्वाद, गोडी व तेजस्वीपणा येतो. दुसऱ्या प्रकारचा शुभ्र मध असतो, तो अखरा या नांवाची कांटेरी वनस्पति आहे तिच्या पासून निघतो. या कांटेरी वनस्पतीच्या वेलांनीं महाबळेश्वराचा डोंगर बहुतेक आच्छादिला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अख्याचीं फलें अगदीं लहान पांढरीं असतात व त्यांस बहुधा एक वर्षाआड बार येतो. तो आला ह्मणजे शुभ्र मध निघतो. या मधाचा स्वाद तांबड्या मधापेक्षांही जास्त आहे यांत संशय नाहीं, व तो अंमळ थंड असतो, यामुळें औषधांस फार प्रशस्त समजतात. हे दोन्ही प्रकारचे मध फारच स्वस्त मिळतात. मोठ्या शिशीस चार आणे पडतात. फार महागाई झाली तर सहा आण्यांवर किंमत जात नाहीं. मधमाशांचीं मोहोळें या डोंगरावर किती लागतात यांचा सुमार नाहीं. येथील बहुतेक बंगले उन्हाळा खेरीज करून आठ महिने बंद असतात. त्या वेळीं प्रत्येक बंगल्यामध्यें पुष्कळ मोहोळें लागलीं असतात व उन्हाळ्यांत राहण्याकरितां बंगले साफ करणें ह्मणजे पहिला उद्योग घरांतील मोहोळें काढण्याचा असतो.

(पुढें चालेल.)

BOMBAY:—"NIRNAYASAGAR PRESS" KALKADEVEE ROAD.

संतविजय.

सदर्हू पुस्तक कविराज शिरोमणि महीपति बाबा यांणीं रचिलें त्याची एका श्रीमान् गृहस्थानें मूळप्रत मिळवून विद्वानाकडून शुद्ध करवून गणपतकृष्णाजच्या छापखान्यांत जाड्या टाइपांनीं छापून तयार केली आहे. किंमत रु० ५ व टपालखर्च १२ बारा आणे.

ज्योतिःशास्त्रविच्छिरोमणि केशवाचार्यविरचित.

जातकपद्धति.

(दिवाकरकृत प्रौढ मनोरमाख्य टीकासहित.)

हा ग्रंथ **श्रीक्षेत्र काशी** येथें चांगल्या जाड्या कागदांवर छापिला आहे. यामध्यें **जातकाचें** सविस्तर निरूपण केलें आहे. किंमत रुपया १॥ (दीड). टपालखर्च आणे २; मिळून रु० १ व आणे १०.

मराठी रंगित नकाशांचें पुस्तक (विलायतेंत छापलेलें.)

यांत खालीं लिहिलेले ८ नकाशे आहेत.

पूर्व गोलार्ध.	आशिआ.	पश्चिम गोलार्ध.	हिंदुस्थान.
यूरोप.	आफ्रिका.	ब्रितिश बेटें.	अमेरिका.

याची किंमत रु० २॥ टपाल खर्च ४ आणे, मिळून पावणे तीन रुपये पाठविल्यास पुस्तक रवाना होईल. व्यवस्थापक वि. ज्ञा. विस्तार.

तुकाराम बावाचें चरित्र. छापून तयार आहे. किंमत रु० ३ टपालखर्च ८ आणे.

सन १८७६ सालाकरितां रोजनिशी.

ह्या नांवाची स्मरणवही उत्तम डेमी कागदावर १६ पेजी सांच्याची ह्मणजे पाकेट डिक्शनरीसारखी येत्या नोव्हेंबरचे २५ वे तारिखेस छापून तयार होईल. हींत सरसालचे दिनचर्येसंबंधी मराठी तिथि, वार, महिने व इंग्रजी तारखा, सूर्योदय व सूर्यास्ताची माहिती दिली जाईल. शिवाय सरसालांत येणारीं ग्रहणें, सण व त्या संबंधानें सरकारी हपिसांस असणाऱ्या सुट्या इत्यादिकांचीही माहिती दिली जाईल. हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें मौंजी व विवाहास असणारे मुहूर्त, मुसलमान लोकांचे सण वगैरेचा समावेशही या स्मरणवहींत होईल. याखेरीज रेलवे, स्टांप, तारायंत्र, मनिआरडर, पोस्ट इत्यादि अनेक नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची कार्याकारण माहिती दिली जाईल. या रोजनिशीची किंमत अक्टोबर अखेरपर्यंत अगाऊ आह्माकडे भरणारांस दर प्रतीस ८५ आणे पडतील. दहा प्रती घेणारांस डांक हंशील पडणार नाहीं. किरकोळ घेणारांस डांक हंशीलाबद्दल किंमती खेरीज दर प्रतीस एक आणाप्रमाणें जास्त पाठवावा लागेल.

भाऊ गोविंद सापकर.

ज्ञानचक्षूचे मालक.

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रूपये ३.
सहामाही आगाऊ.....रूपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचें .....आणे ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रूपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.



A MONTHLY MAGAZINE

OF

पुस्तक ७. MARATHI LITERATURE अंक १०.

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

धौम महाबळेश्वरवर्णन. १८१
हर्षचरित. १८५
दशकुमारचरित. १८९
ठगाची जबानी. १९४
नवीन पुस्तक वगैरे. १९९

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पाँच.

पुस्तकें.

१ श्रीमल्हाररावमहाराज नाटक.

२ बडोदें कमिशनावर कटाव; याबद्दल आमचें मत पुढील खेपेस येईल.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत)	रु० आ०
रा. रा. नारायण रामचंद्र.	३–०
,, ,, व्यंकटेश अनंत.	३–०
,, ,, रामचंद्र विठ्ठल शास्त्री.	३–०
शेट मथुरादास गोकुळदास.	३–०
,, ,, शामजी चांपसी.	३–०
रा. रा. रायसिंह नारायण.	४– ८
,, ,, हरी महादेव पंडित.	६–१२
रा. सा. मंगेशराव बळवंत पोतनीस.	६–१२
रा. रा. नारायण तात्याजी स्कूलमास्तर.	३– ६
नेटीव जनरल लायब्ररी नागपूर.	१०– २

(डिसेंबर १८७५ पर्यंत)	रु० आ०
रा. रा. केशवराव बाळकृष्ण पटवर्धन.	१०–२
,, ,, विनायकराव व्यंकटेश.	८–०
,, ,, दामोदर अनंत भिडे वकील.	८–४
,, ,, धर्मा रावसाहेब जमेदार आगष्ट १८७६ पर्यंत	३–६
नेटिव लायब्ररी खानापूर. ,,	१–१४
रा. रा. विष्णु भालचंद्र नामजोशी जुलै १८७५ पर्यंत	३–६
,, ,, त्रिंबक गणेश सुळे. जून १८७६ पर्यंत.	३–६

जाहिरखबर.

मनुस्मृति अथवा मानवधर्मशास्त्र.

(मनूचे कायदे) याचें प्राकृत भाषांतर मासिक पुस्तकरूपानें सुंदर ठशांनीं बुकाच्या सांच्याप्रमाणें छापण्यास आरंभ केला आहे. आगाऊ वर्षाची किंमत नवेंबरच्या आंत देणारांनीं ट० सह रू० ५ काळबादेवी रोड रामवाडी घर नंबर ९० येथें आमचे पुस्तकांचे दुकानीं पाठवावी. त्याबद्दल पावती मिळेल. पुस्तक सुमारें एक वर्षांत पुरें होईल.

जनार्दन महादेव गुर्जर.

मुंबई, ता० ११ अक्टोबर १८७५.

विक्रीस तयार—बडोदा कमीशनावर कटाव. किंमत चार आणे. टपाल खर्च एकआणा. विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत मिळेल.

जाहिरात.

सुज्ञानामृत.—हें मासिक पुस्तक महिन्यांतून एकदां निघतें. यामध्यें रसायनशास्त्र; पाकशास्त्र; वैद्यशास्त्र; ज्योतिषशास्त्र; शेतकीसंबंधी माहिती; करवीर क्षेत्राचें वर्णन; मनोरंजक पौराणिक कथा, (चित्रांसहित); नाटकें; उपयुक्त विषयांवरील निबंध; अत्युपयोगी, अनुभवशीर आणि चमत्कारिक संग्रह; पंचतंत्राचें भाषांतर; कविता; रूपकें इ० विषय येत असतात. सालीना आगाऊ किंमत २ रूपये ठेविली आहे. शिवाय टपालखर्च पडेल. सुज्ञ लोकांनीं सदरीं लिहिलेल्या उपयुक्त विषयांची माहिती करून घेण्याकरितां या पुस्तकाची एकेक प्रत जवळ बाळगिण्याची संधी दवडूं नये.

नारायण रघुनाथ मंत्री.

सुज्ञानामृत मासिक पुस्तकाचे व्यवस्थापक.

कोल्हापूर.

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक १०.

धौम महाबळेश्वरवर्णन.

१२ येथील अरण्यांत रानटी जनावरें पुष्कळ आहेत. शिकार करणारे लोक, हरिण, सांबर, रानडुकर हीं नेहमीं मारून आणतात. यांशिवाय वाघ, आस्वल, चिते, तरस, हेही आढळतात. सांबर असल्यामुळें सांबराच्या कातडयाचे जोडे व बूट या ठिकाणीं चांगले तयार होतात.

१३ या ठिकाणीं पक्षी फार कमी आहेत. कावळे क्वचित् थोडे दृष्टीस पडतात. परंतु चिमण्या तर बिलकुल आढळत नाहींत. पक्षी कमी असण्याचें कारण या डोंगरावर धुकें व पाऊस फार हें होय. पावसाळ्यांत येथें फुरशांचा मोठा प्रळय असतो व त्यांना फार जपावें लागतें.

१४ नहरास आपल्या लोकांची वस्ती माल्कम पेठ येथें असतें. मालकम पेठ हें नांव नामांकित सर जान मालकम साहेब याजवरून पडलें आहे. बाजार येथेंच असतो. बाजारांत दाहा बारा विलायती सामानाचीं दुकानें आहेत, व बाकीचीं दुकानें आपल्या देशी वाण्याउदम्यांचीं आहेत. येथील वस्ती सुमारें लहान लहान तीनशें घरांची असावी. याशिवाय आसपासच्या खोऱ्यांमध्यें धनगर लोकांच्याही कांहीं झोपडया आहेत. साहेब लोकांचे बंगले अजमासें १०० असावेत. एकंदर नेहमीं राहणाऱ्या लोकांची संख्या पांचशेपेक्षां ज्यास्त नसावी, व उन्हाळ्यांत हवा खाण्याकरितां लोक येतात, त्या वेळीं दोन हजारपावेतों संख्या वाढत असावी असें अनुमान आहे. मालकम पेठेची वस्ती पूर्वपश्चिम सातारच्या रस्त्यावर आहे. मुख्य बाजार, व विलायती सामानाचीं दुकानें ज्या रस्त्यावर आहेत त्यास मालकम पेठ ह्मणतात व त्या रस्त्याच्या पाठीमागें दक्षिणेस रस्ता आहे त्यास मेरपेठ ह्मणतात. ही मेरपेठ डाकतर मेर साहेब नांवाच्या इंग्रजानें वसविली आहे.

१५ येथें बंदोबस्ताकरितां एक सुपरिंटेंडंट असतो व त्याजकडेसच सिव्हिल सरजन व मुख्य माजिस्त्रेट म्युनिसिपालिटी वगैरे अष्टाधिकार असतात. फक्त दिवाणी काम वाईच्या मुनसफाकडे असतें. सुपरिंटेंडंटास पहिल्या वर्गाच्या माजिस्त्रेटाचा अधिकार असतो. याशिवाय कोतवाल ह्मणून एक अंमलदार असतो, त्यास दुसऱ्या वर्गाच्या माजिस्त्रेटाचा अधिकार असून खजिन्याचें काम व पोलिसाचा बंदोबस्तही तो करितो.

१६ या ठिकाणीं म्युनिसिपालिटीचें उत्पन्न दरसाल १५,००० रूपयेपर्यंत आहे. यापैकीं साडेसाहा हजार रूपये सरकारांतून

प्रतिवर्षी बंदोबस्ताकरितां मिळत असतात. सुमारें २७०० रुपये बंगल्याच्या जमिनीचा सारा येतो. हा सारा दर एकरास सरासरी अडीच रुपयेप्रमाणें घेतात. चार पांच बंगले सरकारी आहेत. त्यांचें भाडें सुमारें २५०० रुपये येतें. तीन एक हजार रुपये जकात, गाड्या, व घोडीं यांवर कर बसवून उत्पन्न होतात. खर्चाची मुख्य रक्कम झटली झणजे रस्त्याच्या दुरुस्तीबद्दल होय. ह्या कामीं बराच पैसा खर्च होतो. एकंदर रस्त्याची लांबी घेतली तर ४० मैलांहून देखील अधिक भरेल. यापैकीं निमे रस्ता गाड्या जाण्यासारखा आहे व निमे पायरस्ता आहे. सरकार पैसा देत असतें त्याचा मुख्य हेतु हाच कीं झाडी तुटूं नये व रस्ते दुरुस्त राहून भोंवतालचे चमत्कार पाहण्यांत यावे, आणि हवा स्वच्छ राहून तिजपासून होणारे फायदे पूर्णपणें व्हावेत.

१७ या ठिकाणीं कचेऱ्या व इतर सार्वजनिक स्थळें झटलीं झणजे सुपरिंटेंडंटची कचेरी, डाकघर, तारबंगला, इस्पिताल, सानिटेरिअम, कोतवाल चावडी, शाळा, एक लहानसें देशी पुस्तकालय, व क्रियर हाल याप्रमाणें आहेत. क्रियरहाल येथें युरोपिअन लोकांकरितां पुस्तकालय आहे व इंग्रज लोकांचीं नाटकें, नृत्यें वगैरे होणें तीं या ठिकाणींच होतात. सारांश, हा महाबळेश्वर येथील युरोपिअन लोकांचा टाउनहाल आहे असें झणण्यास हरकत नाहीं. आपले लोकांस सार्वजनिक कामांकरितां जमणें झाल्यास देशी पुस्तकालयांत जमतात. हें पुस्तकालय आपले लोकांनीं वर्गणी करून बांधिलें आहे व उन्हाळ्यांत बाहेरचे लोक येतात ते देणगीच्या रूपानें आणि दरमाहा आठ आणे, रुपयाप्रमाणें वर्गणी झणून यथाशक्ति देतात; तेणेंकरून प्रतिवर्षी नवीन पुस्तकें विकत घेतलीं जाऊन वर्तमानपत्रेंही इंग्रजी व मराठी साधारण असावीं तितकीं वाचण्यास मिळतात. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचा आश्रय या पुस्तकालयास मोठा आहे. उन्हाळ्यांत प्रति रविवारीं तिसऱ्या प्रहरीं हवा खाण्यास येणाऱ्या देशी लोकांची सभा भरून निबंध व व्याख्यानेंही होत असतात. महाबळेश्वरीं आपल्या लोकांस अशा गृहाची आवश्यकता फारच आहे. कारण या ठिकाणीं विश्रामाकरितां लोक येतात त्यांना नियमित उद्योग झणून कांहीं नसतो, यास्तव पुस्तकालयासारखी मनोरंजक जागा असल्यापासून फायदे फार आहेत ह्यांत संशय नाहीं.

१८ येथील हवेमध्यें साधारण गुण असा आहे कीं प्रकृति पुष्ट व सतेज राहून सदोदित अंगांत हुषारी असते. असें होण्याचीं कारणें हीं आहेत कीं:—

(१) हवेमध्यें थंडी फार, व थंडी फार असण्याचें कारण उघडच आहे. अगोदर ऐन पर्वताचे शिखरावर वस्ती आहे. दुसरें वृक्ष वनस्पति हीं सदोदित दाट, सच्छाय व हिरवीं असल्यामुळें सूर्याची प्रखरता बिलकुल नाहींशी होते. तसेंच कृष्णा आदिकरून नद्यांची उत्पत्ति या डोंगरांतून असल्यामुळें त्यांच्या उगमाचें पाणी चहुंकडे पहाडांत खेळत आहे व निरंतर आकाशांत मेघपटलांचें आच्छादन असतें. या ठिकाणीं दिवसास किंचित् झोंप घेतली तर सरदी होऊन प्रकृति तत्काळ बिघडते. श्रीमंत लोकांच्या बंगल्यांतून नेहमीं शेगड्या पेटलेल्या असतात. ह्या शेगड्या साधारण

शेगड्यांप्रमाणें नसतात. विलायतेंत चाल आहे त्याप्रमाणें भिंतींत दगडाच्या वगैरे पेवासारख्या शेगड्या बांधून, धूर जाण्यास वर आरपार द्वार केलेलें असतें. या योगानें साक्षात् अंगास शेक न झोंबतां हवेंतील जलांश नाहींसा होऊन पाहिजे तेवढीच थंडी हवेंत राहते. उन्हाळ्यामध्यें उष्णतेपासून बाहेरगांवीं विकार होतात ते तेथें होत नाहींत. तसेंच उष्णता शमन होण्याकरितां अत्यंबुपान, कृत्रिमवायु, कृत्रिम शीतोपचार यांपासून पुढें वाईट परिणाम होतात, ते येथें राहिल्यापासून होत नाहींत; कारण या साधनांची अवश्यकताच नसते.

(२) हवा सुखावह असण्याचें दुसरें कारण हें आहे कीं हवा इतकी थंड आहे तथापि तिच्यांत स्निग्धता विशेष असते; ह्मणजे अर्थ हा कीं, बहुधा अतिशय थंडीमध्यें अन्यत्र जशी अतिरूक्षता असते, अंगावरचें कातडें तडकतें, तळहात, तळपाय, ओंठ फुटतात, व उष्णाच्या दाहानें जितकी संतप्तता शरीरांत असते, तितक्याच प्रकारचा विपरीत परिणाम थंडीपासून होत असतो, आणि निरुत्साह व शिथिलता उत्पन्न होते, —तसा प्रकार एथें बिलकूल नाहीं. साधारण थकवा येण्यास देखील व्यायाम फार करावा लागतो व तो थकवाही केवळ क्षणिक असतो. त्यापासून हातांपायांची आग, मस्तकाची उद्विग्नता, तोंडास शोष वगैरे होत नाहींत. महाबळेश्वरीं प्रत्येक दिवशीं किमानपक्ष चार मैलांचा तरी व्यायाम झाला पाहिजे.

(३) तिसरें कारण असें आहे कीं देश व कोंकण या दोहोंच्या हवेचें या ठिकाणीं संमीलन होऊन दोहींचे दोष जाऊन गुण मात्र राहिले आहेत. मावळांतील सरदी, कोंकणची अंतरंग उष्णता, खानदेश व बऱ्हाड येथील रूक्ष वात हे गुण येथील हवेंत मुळींच नाहींत.

(४) चौथें कारण असें आहे कीं सर्व ऋतूंमध्यें येथील हवेच्या उष्णतेचें मान बहुतेक सारखें असतें. साधारण वार्षिकमान ६९ अंश आहे. यामध्यें व कोंकण आणि घाट येथील हवेंत सरासरी २० अंशांचा फरक आहे. मागील दाहा वर्षांची सरासरी घेऊन खालील प्रमाणें काढलीं आहेत त्यांवरून ऋतुपरत्वें हवेच्या मानांत बदल अतिशय कमी होतो हें लक्षांत येईल.

साधारण वार्षिक मान .... पारा	६६.२
सूर्योदयापासून सूर्योदयापर्यंत उष्णतेंत दररोज फेरफार होतो तो	९.२
सर्वांत अधिक मान	७१.२
सर्वांत कमी मान	६१.३
हिंवाळ्याचें मान	६५.१
उन्हाळ्याचें मान	७०.७
पावसाळ्याचें मान	६३.८
हिंवाळ्यांत मध्यान्हास	९१.१
उन्हाळ्यांत मध्यान्हास	१०४.५

उन्हाळ्याच्या व हिंवाळ्याच्या मानांत फक्त ५ अंशांचा फरक आहे, व पावसाळा आणि उन्हाळ्याच्या मानांत ७ अंशांचा फरक आहे. याप्रमाणें हवेची स्थिति फारच थोडे ठिकाणीं आढळते. वरील प्रमाणें महाराष्ट्रदेशांतील अति उष्ण हवेचें ठिकाण जें नागपूर तेथील हवेशीं लावून पाहिलें असतां तिचें वैगुण्य तत्काळ दिसून येतें.

	महाबळेश्वर	नागपूर
साधारण वार्षिक मान....	६६.२	७८.३
दररोजचा फरक	९.२	२४.५
सर्वांत अधिक मान	७१.२	९२.२
सर्वांत कमी मान.....	६१.३	६७.७

हिंवाळ्याचें मान	६५.१	७२.२
उन्हाळ्याचें मान.....	७०.७	८९.३
पावसाळ्याचें मान.....	६३.८	८२.२

आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती अशी कीं महाबळेश्वरचें व इंग्लंडचें अतिशय उष्ण मान अगदीं सारखें आहे. तसेंच वातावरणवेत्त्यांनीं पृथ्वीवरील ठिकठिकाणचीं उष्णतेचीं मानें एकत्र करून सरासरी काढली आहे तिच्याशीं महाबळेश्वरचें साधारण मान बहुतेक मिळतें. परंतु या ठिकाणीं हितावह हवा काय ती उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत असते, ह्मणजे मार्च, एप्रिल, मे, नवंबर, दिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी या दिवसांत मात्र चांगली हवा असते, अक्टोंबरचा कांहीं भाग खेरीज करून बाकी पावसाळा असतो. या दिवसांची हवा फार खराब असते. उन्हाळ्यांत पश्चिमेकडून व उत्तरेकडून समुद्राचा वारा येत असतो. एप्रिल महिन्याच्या शेवटीं शेवटीं ढग, मेघगर्जना, व किंचित् पर्जन्यही पडूं लागतो. मे महिन्यांत हा सर्व प्रकार असून आणखी धुकें मनस्वी येत असतें.

(९) येथील हवा निरोगी असण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं "मलेरिया" ह्मणून हवेंत जो विकार असतो तो या ठिकाणीं अगदीं नाहीं. सांचलेलें पाणी, पाणथळ जमीन, कुजलेला झाडांचा पाला व गवत वगैरे यांच्या ओलाव्यानें जी दमट हवा निघते ती येथें बिलकुल नाहीं. याचें कारण असें सांगतात कीं पावसाचें विकारी पाणी डोंगरावर न राहतां खालीं वाहून जातें व नद्या वगैरे यांनां उतार असल्यामुळें पावसाचें पाणी जमीनींत न मुरतां प्रवाहरूपानें देशावर निघून जातें. डोंगराच्या सभोंवतील प्रदेशांची हवा स्वभावतः उत्तम असल्यामुळें खालील विकार वर जात नाहीं. यास्तव पावसाळा गेल्यावर हिंवताप वगैरे या ठिकाणीं येत नाहींत. कारण हिंवतापाचें मूळ जी मलेरियायुक्त हवा ती तेथें नसते. मलेरियाचा नाश होण्यास कारण येथील हवेंत किंचित् अंतरंगशोषकता आहे व ही शोषकता, येथील हवा वजनांत फार हलकी असल्यामुळें उत्पन्न होऊन सरदीचे विकार नष्ट करीत असते. येथील हवेमध्यें नेहमीं हुषारी राहते याचें कारण असें सांगतात कीं या प्रदेशाची उंची समुद्रसपाटीपासून साडेचार हजार फुटी असल्याच्या योगानें शरीरावर हवेचा दाब पुष्कळ कमी बसून रुधिरवाहिन्यांतून रक्ताची गति किंचित् तीव्र होते. तेणेंकरून सदा उत्साहवृत्ति राहते; व याच कारणास्तव अशक्तता, वीर्यक्षय, मस्तकाचा हलकेपणा, वायूची शुष्कता, व रक्तशोध इत्यादिकांच्या योगानें शिथिलता, निरुत्साह, उद्विग्नता, व व्याकुलता इत्यादि प्रकार या ठिकाणीं फार कमी होतात.

तसेंच हवा तलम व किंचित् अंतर्यामीं शोषक असल्यामुळें या ठिकाणीं सदैव पित्त जागृत असतें, व अग्निमांद्य मोडून पचनादि व्यापार जोरानें चालतात व अन्नाचा रस यथाक्रम होऊन रक्तशुद्धि व वीर्यवृद्धि हळूहळू होत असते.

येथील हवा पुरुषापेक्षां स्त्रियांस व विशेषेंकरून लहान मुलांस फारच हितावह आहे, ही गोष्ट हल्लीं अनुभवसिद्ध आहे. इंग्रज लोक एकवेळ स्वतः महाबळेश्वरीं जाणार नाहींत, परंतु मुलांनां उन्हाळ्यांत अवश्य तिकडेस पाठवितात. येणेंकरून पोरांना लहानपणीं रोगराई होते ती होत नाहीं. दांत येते वे-

ळेस क्लेश कमी होतात, व एकंदरीनें शरीर सुदृढ व पुष्ट होतें आणि उत्तर वयांत, निरोगी व निक्षोप राहतें.

(पुढें चालेल.)

हर्षचरित.

नंतर कमळांतून उत्पन्न झाल्यामुळें त्यांतील मृणालच हें धारण केलें आहे कीं काय, असें ज्याचें स्वच्छ धवल यज्ञोपवीत शोभत आहे, तो भगवान् पितामह,—त्रिभुवनाच्या उपसर्गांचें प्रशमन करण्यासाठीं हे कोंवळे हिरवे दर्भच ग्रहण केले आहेत कीं काय, अशी, ज्या हातांतिल पाचेच्या आंगठीचा कांतिप्रवाह सर्व हातभर फांकत असल्यामुळें लोकांच्या मनांत शंका उत्पन्न होत आहे, अशा त्या आपल्या उजव्या हातानें सर्व ऋषींस मौन धरण्यास खूण करून, थोडा हसला, व लागलाच गंभीर स्वरानें बोलला कीं— " हे ब्रह्मन् ! आज ज्या मार्गानें तूं पाऊल टाकलेस, त्या मार्गाचा परिचय करण्याची इच्छा सज्जनास मुळींच नसत्ये; कां तर, त्या मार्गानें जाऊन ज्यानें खाड्यांत गोते न खाल्ले असा मला तर आढळला नाहीं. हा मार्ग नजरेस पडतां क्षणींच इंद्रियरूपी घोड्यांचा वेग इतका वाढतो, कीं आपल्याच डोळ्यांत धूळ उडूं लागत्ये, व त्यामुळें आपली नजर अगदीं खराब होऊन जात्ये. इंद्रियांवर ज्याचा मुळींच अधिकार चालत नाहीं, त्याची दृष्टि दूर ती किती पाहणार! महापुरुषांची बुद्धि निर्मळ असत्ये, ह्मणूनच ती चांगलें व वाईट हीं दोनहीं नीट निरेखून पहात्ये; ज्याप्रमाणें पाणी आणि विस्तव हीं दोन परस्पर विरुद्धवृत्ति असल्यामुळें एकत्र राहूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें **धर्म** व **क्रोध** या दोहींचा सहवास होणें फार कठिण; कारण हे दोनहीं एकमेकांस शत्रूप्रमाणें पाहतात. ज्ञानरूपी सूर्याचा आश्रय सोडून देऊन, अज्ञानाच्या अफाट काळोखांत बुडून जाऊं पाहतोस हें काय चांगलें दिसतें! बाबा, सर्व तपाचें मूळ ह्मटलें ह्मणजे क्षमा. बुद्धि हा एक आपला डोळाच होय. आपल्या डोळ्यांत अवगुण असतांही, आपणास दिसत नाहीं एवढ्यानेंच आपण दुसऱ्याच्या डोळ्यांतील अवगुण काढूं लागतों, आणि तेणेंकरून आपला उपहास मात्र होतो; तद्वत्च एकदा आपली बुद्धि क्रोधाच्या स्वाधीन झाली ह्मणजे अविचारानें तिच्या हातीं आपली लगाम देऊन दुसऱ्याचें मात्र उणें आपण काढण्यास प्रवृत्त होतों आणि त्यामुळें लोकांत आपलें हसें मात्र होतें. आज याप्रमाणें तूं उगीच दुसऱ्याचे दोष काढण्यास प्रवृत्त झालास, हें तुझ्या जन्मापासून संचित केलेल्या तपाच्या राशीस किती शोभतें याचा विचार कर बरें. ज्याचा स्वभाव जन्मापासून तामसी तो कितीही डोळस असला तरी त्यास डोळस ह्मणतां येत नाहीं; तर तो आंधळाच होय; कां तर, कोपानें त्याची नजर जड होतांच त्यास कर्तव्य कोणतें, अकर्तव्य कोणतें, याचें विवेचन मुळींच होत नाहीं. हर हर ! कुपित झालेल्या पुरुषाची काय ही अवस्था! त्याच्या विद्येवरच पहिल्यानें आंधारी येत्ये, मग ती हळू हळू डोळ्यांवरही आपला अंमल बसवूं लागत्ये; आरंभीं त्याच्या मनासच क्रोध व्यापून टाकितो, तेव्हां मग डोळेही त्याच्या योगानें धुंद होतात; तप गळण्यास आरंभ होतो व लागल्याच घामाच्या धारा वाहूं लागतात;

पहिल्यानें अपकीर्तीचा कलंक दर्शन देतो, मग अधरोष्ठासही आपला प्रताप दाखविण्याची साहजिक इच्छा उत्पन्न होत्ये. बाबा, एकाद्या विषवृक्षाप्रमाणें तुझ्या जटा व तुझीं वल्कलें हीं दुसऱ्याच्या नाशास मात्र कारण झालीं हें काय ! जरी तामसी वृत्ति ही ऐकांतिक वाईट असें ह्मणण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं, तरी ती तुझ्या ह्या वेषास तिळभर शोभा न आणतां उलट सर्वथैव उणेपणाच आणत्ये, असें ह्मणणें मला भाग पडतें. तुझी चित्तवृत्ति सर्वत्र सम नाहीं, त्या पक्षीं हें तपस्व्याचें सोंग एकाद्या नटव्याप्रमाणें लोकांस बाहेरून दाखवण्यासाठीं मात्र धारण करितोस, असें स्पष्ट होतें. हा तुझा स्वभाव तुझें तिळभर तरी चांगलें करील असें मला तर वाटत नाहीं. हें आज जें लघुत्व दाखविलेंस त्यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं तूं अजूनपर्यंत ज्ञानसागराच्या वरच्यावरच पोहत आहेस; आंत बुडी मारण्याचें तुला सामर्थ्य नाहीं. लोकप्रसिद्धिही आहे कीं "उथळ पाण्यास खळखळाट फार." हे जे येथें मोठमोठे ऋषि बसले आहेत हे काय सर्वच जड व मूढ व अल्पमति? क्रोधानें व्यापून टाकल्यामुळें खरोखर पाहिलें असतां त्वां आपल्याच हृदयाचा निग्रह पहिल्यानें करावा, तें सोडून देऊन या निरपराधी सरस्वतीस उगीच शाप दिलास हा काय समजून ? अल्पमति लोकांचा जो अनेक स्थलीं व अनेक कालीं उपहास होतो, त्याचें तरी कारण हेंच कीं ते अशा ह्या पाउलोपाउलीं चुका करितात." नंतर सरस्वतीस ह्मणाला, "मुली, हा तुला असा शाप दुर्वासानें दिला ह्मणून तूं कांहीं दुःखी होऊं नको; ही सावित्री तुझ्या बरोबरच पृथ्वीवर अवतार घेईल; व असें चांगलें वर्तन करील कीं तेणेकरून तुला आमचा विसर पडूं लागेल; व एकदा पुत्राचें मुखकमल तुझ्या दृष्टीस पडलें ह्मणजे तुझ्या या शापाचा अंत होईल". असें बोलून सुरासुरमुनिप्रभृति मंडळीची रजा घेऊन, मोठ्या लगबगीनें जवळ आलेल्या नारदाच्या खांद्यावर डावा हात टाकून, ब्रह्मदेव सायंसंध्योपासना करण्यासाठीं उठला. लागलीच, शाप झाल्यामुळें अत्यंत दुःखित झालेली, श्वासोच्छ्वासाच्या सुवासानें अनेक भ्रमरांस मत्त करणारी, व बाळगलेले कलहंसक जिच्या पैंजणांचा आवाज ऐकतांच पाठीमागून मंद मंद चालत आहेत, अशी सरस्वतीही, नासाग्रावर दृष्टि निश्चल करून, अधोवदन होत्साती सावित्रीच्या बरोबर घरीं गेली.

नंतर थोड्याच वेळानें, हा सर्व सरस्वतीचा खटला मध्यम लोकांत जाहीर करण्यासच चालला कीं काय, असा अस्तास जाणारा सूर्य भासूं लागला. हळू हळू कमळें मिटूं लागल्यामुळें सरोवरें शोभाहीन दिसूं लागलीं, आणि यामुळेंच अत्यंत दुःखी होऊन दिवसही लयास चालला आहे, असे लोकांचे तर्क चालूं लागले. सुरापानानें मत्त होऊन मदनातुर स्त्रियांनीं जे कोपकुटिल कटाक्ष मारले, त्यांपासून भयभीत होऊन मोठ्या उतावळीनें सूर्यानें दूर अस्ताचलावरील अरण्यांत गडप होऊन जाण्याचा बेत केला. रानांतून घाईनें धांवत येत असतां, गाईंच्या सडांतून दूध वाहूं लागल्यामुळें, चंद्राचा उदय होणार ह्मणून हळू हळू वाढणारा जो क्षीरसागर त्याच्या लाटांनींच हे धवल झाले कीं काय, असे मुनींच्या आश्रमांचे प्रांतभाग

शोभूं लागले. **मेरुपर्वताचे** सुवर्णमय कडे फोडल्यामुळें फार थकून, **मंदाकिनीच्या** मऊ किनाऱ्यावर **ऐरावतानें** प्रस्थान केलें. प्रियांच्या घरीं संकेतानें जाणाऱ्या ज्या **विद्याधरांच्या** कन्या, त्यांचा चरणालक्तकरस गळल्यामुळेंच लाल झालें कीं काय, असें संध्यादेवीने व्याप्त केल्यामुळें आकाश शोभूं लागलें. **शिवास** वंदन केल्यामुळें जो हर्ष झाला, तेणेंकरून हें **संध्येचें** स्वेदसलिलच गळलें कीं काय, अशी, अनेक **सिद्धांनीं** दिलेल्या अर्घ्यांतील रक्तचंदनाचें पाणी, लोकांच्या मनांत शंका उत्पन्न करूं लागलें. ज्या कमलांतून **ब्रह्मदेव** उत्पन्न झाला त्याची सेवा करण्यास हा त्रिभुवनांतील कमलांचा समूह आला कीं काय, अशीं सर्व **ब्रह्मलोकवासी ऋषींचीं संध्येस** प्रणाम करितेसमयीं अंजलिपुटें शोभूं लागलीं. **ब्रह्मदेवानें** तृतीय सवनाच्या व्रतास आरंभ केला. **सप्तर्षींच्या** मंदिरांतील वैतानाग्नीच्या ज्वाळा आकाशास रंगवूं लागल्या. अघमर्षणाच्या योगानें पापापासून मुक्त होऊन यतींचे आत्मे पवित्र झाले. संध्योपासन करण्यासाठीं ऋषींच्या रांगाच्या रांगा लागल्यामुळें **मंदाकिनीचीं** पुलिनें, व हंसांनीं पोहण्यास सुरवात केल्यामुळें मंदाकिनीचीं जलें, हीं दोनही अत्यंत मनोहर दिसूं लागलीं. जलदेवतांचीं आतपत्रें व अनेक जलचारिपक्षिणींचीं अंतःपुरें अशीं कुमुदवनें, भ्रमरांस आपल्या सुवासानें आनंदित करीत होत्सातीं, विकास पावूं लागलीं. अस्ताच्यापूर्वी कमलांच्या मधूचें अत्यंत प्राशन केल्यानुळें निद्रासुखानें राजहंस पक्षी डुलक्या मारूं लागले. वृक्ष फुलल्यामुळें आसपास नदीचें तीर सर्व सुवासमय होऊन गेलें. **सिद्धस्त्रियांच्या** बुचड्यांतील मोगरीच्या वेण्या थोड्या थोड्या कंपित करून त्यांतील ग्रहण केलेल्या सुवासाच्या योगानें त्रिभुवनास संतर्पित करणारा असा मंद मंद वाहणारा सायंकाळचा वायु, हा निशेचा निश्वासच कीं काय, असा लोकांस वाटूं लागला. मिटूं लागलेल्या कमळांच्या केसराच्या मऊ गर्भागारांत भ्रमरांनीं निःशंक व निर्भय विलास करण्याचा बेत केला. प्रदोषकालीं तांडव करतेसमयीं **शिवाच्या** जटाजूटरूपी अरण्यांतील हीं कुड्याचीं शुभ्र पुष्पें नभस्तलावर पडलीं कीं काय, अशीं नक्षत्रें चकाकूं लागलीं. हळू हळू पिकलेल्या ताडफळाहूनही काळा असा अंधकार सर्व कांहीं आवृत करून टाकीत आहे, इतक्यांत, यामिनीच्या कानांतील चंपकफुलांचें अवतंसच कीं काय, अशा या अंधकाराचें विदारण होण्यासाठीं, लोकांनीं लावलेल्या दिव्यांच्या प्रभेनें त्रिभुवन उज्वळ केलें. थोड्याच वेळानें अंधकाररूपी केशकलापास पाठीवर टाकून, चंद्ररूपी मुखाचें दर्शन देऊन, आपल्या कुवलयरूपी नयनांच्या हळू हळू होणाऱ्या विकासानें पूर्वदिशा लोकांचीं अंतःकरणें विद्ध करूं लागली. उदयगिरीवरील सिंहांनीं आपल्या नखांनीं विदारण केल्यामुळें, अंकस्थ हरिणाच्या पाझरणाऱ्या लोहितानेंच रंगवले गेले कीं काय, असे नुकत्याच उदय पावलेल्या चंद्राच्या प्रभेचे प्रवाह सर्वत्र पसरूं लागले. अशा प्रदोषसमयीं, चिंतासागरांत बुडून अत्यंत ग्लान झाली आहे व डोळ्यांतून आसवें ढाळीत आहे असें पाहून, **सावित्री सरस्वतीस** ह्मणाली—"हे सखि, त्रिभुवनास सदुपदेश करून सन्मार्गास लावणारी तूंच; तेव्हां तुझ्यापुढें ती माझी जिव्हा ह्मणून किती जल्पना करणार! दुर्जनच दुर्दैवाच्या कचाट्यांत सांपडतो असा कांहीं

सृष्टीचा नियम नाहीं. जन कितीही गुणशाली असो; तरी देखील दैवाची लीला त्यास चौऱ्यांशीचा फेरा एकदां तरी थोडा वेळ तरी दाखविल्यावांचून सोडीत नाहीं; व तो फेरा त्यानें कितीही केले तरी त्यास सुटणें म्हणून नाहीं. आपल्या बरोबरीचा नव्हे अशा जनानें अपकीर्तीचा जरी थोडासाच कलंक लावण्यास यत्न केला, तरीं त्यापासून मनस्वी पुरुषास म्हणून फारच खेद होतो. अश्रुजलाचें पाणी संतत मिळालें म्हणजे एकाद्या लहानशा झाडाप्रमाणेंच शोकास पालवी फुटत्ये, व तेणेंकरून त्याचा मोठा विस्तार होत जातो. ऊन फारसें कडक न पडलें तरी त्यापासून मालतीचें फूल कोमूं लागतें; त्याप्रमाणेंच लोकापवाद फारसा पसरला नसला तरी त्यापासून सुकुमार मतीच्या पुरुषास खेद झाल्यावांचून राहत नाहीं. लहानसा अंकुश मोठ्या गजपतीचेंही नियमन करितो; तेव्हां अपयश थोडेसेंच जगांत जाहीर झालें एवढ्यावरून सज्जनास अन्नपाणी गोड लागेनासें झालें तर त्यांत काय आश्चर्य ? हजारों स्नेहपाशांनीं मन गुंतून गेल्यामुळें जन्मभूमि एक बांधवच असत्ये, व त्यामुळेंच तिचा त्याग करणें भाग पडल्यास आकाशच आपणावर आज कोसळतें असें, पुरुष कितीही क्षुद्र असला तरी त्यास वाटल्यावांचून राहत नाहीं. इष्टमित्र व त्यांबराबर जे दुसरे परिचयांतील असतात त्यांचा जो वियोग तो कर्वताप्रमाणें फारच तिखट असतो; त्यामुळें तो साहजिकच त्यांपासून दूर होणाऱ्या पुरुषाचें हृदय विदारण करून टाकतो. तर माझे आई, नको तूं परती आतां फारसा शोक करूं. नको आतां फारसी या दुःखरूपी विषवृक्षाच्या अंकुरास पाणी घालूं तूं. पहा बरें सखि, जन्मांतरीं संचित केलेलें शुभ किंवा अशुभ कर्म कर्त्यास कसें बरें सोडील; व तें जोंपर्यंत जागृत आहे असें माहीत आहे, तोंपर्यंत व्यर्थ शोक करून दिवस घालवावे हें तुझ्यासारख्या जाणत्या स्त्रीस चांगलें दिसतें बरें ? आज तुझें हें मुखकमळ झटलें म्हणजे त्रिभुवनाचें मंगल; त्या अशा मुखकमलास अश्रुरूपी हिमाचा वर्षाव करून म्लान करून टाकित्येस हें काय बरें ? तर माझे आई, माझ्याकडे तरी पाहून शोक करूं नको; आणि पृथ्वीवरील कोणता प्रदेश धन्य करण्याची तुझी इच्छा आहे ? असा कोणता गांव कीं जो तुझीं पवित्र पदकमलें आपणास मिळण्यासाठीं अजून तपश्चर्या करीत आहे ? कोणत्या तीर्थास अधिक पावन करण्याचा तूं अभिलाष धरित्येस? असे कोणते पुण्यशाली तपस्व्यांचे आश्रम कीं ज्यांत तूं आपलें सर्व आयुष्य तप तपून नेण्याचा हेतु बाळगत्येस ? हें एकदा तरी सर्व स्पष्ट करून सांग. तुझ्याबरोबरच लहानपणीं देखील धुळींत खेळलेला असा हा तुझा अत्यंत प्रिय सखीजन; हा हल्लीं तुझ्याबरोबर, पृथ्वीलोकामध्यें देखील अवतरण्यास व तेथें तुझी हातून होईल तितकी परिचर्या करण्यास सिद्ध आहेच. तर सखि, आतां अनन्यशरण होत्साती मनानें, क्रियेनें, वाचेनें कर **शिवाचा** आश्रय. आज सर्व भुवनांचा कर्ता हा; हाच सर्वज्ञ; याच्या चरणरजानें सुरांसच नव्हे तर असुरांसही अनेकवार पावन केलें आहे; चंद्राच्या कलेस जो स्थिर आश्रय मिळाला आहे तो याच्याच मस्तकावर; असा हा भगवान् **शिव** त्रिभुवनाचा गुरु व त्रिभुवनास वंद्य आहे; तर यास तूं अगदीं विसरूं नको. याच्या कृपेनें शापाचा अंत लवकरच

होईल." हें **सावित्रीचें** संभाषण ऐकून, पुनः एकदा **सरस्वतीनें** मुक्ताफळांप्रमाणें स्थूल व सुंदर असे अश्रुबिंदु जमिनीवर सोडले; व लागलीच बोलली कीं, " सखि, तूं माझ्याबरोबर पृथ्वीवर येणारच, तेव्हां मी खात्रीनें तुला सांगत्यें कीं, **ब्रह्मलोकाचा** व त्याबरोबर तेथेंच झालेल्या शापाचाही तुझ्यायोगानें मला अगदीं विसर पडेल. तेथें **ब्रह्मदेवाची** सेवा करण्यास मिळणार नाहीं ह्मणून मात्र मला फार वाईट वाटतें. आतां धर्माचें साधन करण्यास चांगलीं स्थानें कोणतीं, व समाधि लावण्यास योग्य आश्रम कोणते; हें सर्व तुला कांहीं अविदित आहे असें नाहीं." इतकेंच बोलून **सरस्वती** थांबली. नंतर रात्रभर शापानें दुःखित झाल्यामुळें तिचा डोळा ह्मणून मुळींच लागला नाहीं. (पुढें चालेल.)

दशकुमार चरित.

शिवकारि तुह्मां होवो त्रैविक्रम[1] जो सदंघ्रि विष्णूचा ॥
ब्रह्मांडच्छत्राचा दंडाचि जो धूमकेतु[2] असुरांचा ॥ १ ॥
ब्रह्मोत्पत्ति जयातुनि त्या कमलाचाचि जो असे नाल॥
पृथ्वीनौचा मानिति वृद्ध जया कूपदंड[3] आबाल ॥२॥
केतूपम मंदाकिनि तीचा जो दंड, सूर्यमालेचा ॥
अक्षहि[4] जो त्रिभुवनजयप्रगटकरस्तंभ जो मुकुंदाचा॥३

मगध देशाला भूषणभूत, पृथ्वीवरील समस्त नगरींची परीक्षा पाहणारी, बाजारांत मांडलेल्या अशेष रत्नांच्या योगानें समुद्राचें माहात्म्य प्रकट करणारी, **पुष्पपुरी** ह्मणून नगरी होती. त्या नगरींत **राजहंस** नामक राजा राज्य करीत होता. या राजाचे गुण वर्णन करावे तर अनंत होते. ते असे कीं समुद्राचें मथन करणारा जसा मंदर पर्वत त्याप्रमाणें याचा भुजदंड परसैन्यरूप सागराचा मथन करणारा होता. या राजाची विमल कीर्ति इंद्राच्या नंदनवनांत विहार करणाऱ्या ज्या वेश्या त्या गात वर्ती सर्व दिशा उपदिशा भरून राहिली होती. ज्या राजाचा प्रताप सूर्याच्या प्रतापाशीं बरोबरी करीत असे व ज्या राजानें सर्व पृथ्वीचें राज्य करीत असतां अनेक यज्ञांच्या योगानें विद्वेनें दीप्तिमान् अशा लक्षावधि ब्राह्मणांस संतुष्ट केलें होतें. असो. याप्रमाणें राजाला शोभा देणाऱ्या अशा गुणांनीं युक्त जो हा राजा त्याच्या कुलाला शोभा आणणारी, महाबुद्धिमती **वसुमती** ह्मणून स्त्री होती. त्या **वसुमतीचें** स्वरूप ह्मणाल तर, ज्यावेळेस शंकरानें मदनाला जाळिलें त्यावेळेस स्त्रीचा आश्रय केला असतां कांहीं भीति नाहीं असा विचार करून, त्याचीं (मदनाचीं) सर्व आयुधें व उपकरणेंच हिचे अवयव झाले काय अशी शंका उत्पन्न होते. तें कसें तर त्या मदनाच्या धनुष्याच्या दोरीसंबंधीं जे भ्रमर तेच हिचे केश झाले, साहाय्य करणारा जो चंद्र तोच मुख झाला, जयध्वजाच्या ठिकाणीं असणारा जो मीन तो आपल्या स्त्रीसहवर्तमान डोळे झाला, सगळ्या सैन्यामध्यें मुख्य असा जो मलयाचलसंबंधीं दक्षिणवायु तो श्वास झाला, वाटसरांचे अंतःकरणाला विदीर्ण करणारी जी वृक्षांकुररूप तलवार तीच ओंठ झाली, सुंदर जयशंख हा मान झाला, जलानें पूर्ण असे जे मंगलाकरितां ठेवलेले सोन्याचे कुंभ हे चक्रवाक पक्ष्याला लाजविणारे जिचे स्तन झाले, धनुष्यसंबंधीं ज्या बिसलता ह्याच बाहु झाल्या, खेळावयाचें जें कल्हार कमल तें गंगेच्या भोंवऱ्याचें अनुक-

१ स्वर्ग मृत्यु पाताल तीन्ही लोकांना व्यापणारा.
२ अनिष्टकारी, कालरूपी. ३ डोलकाठी. ४ आंस.

रण करणारी जी नाभि ती झालें, योगिजनांचे मनोरथ ज्यानें दूर केलेले आहेत असा जो जयरथ तोच जिचें जघन झाला, यतिजनाच्या कर्मांला विघ्न करणाऱ्या अशा ज्या केळी त्याच जिच्या मांड्या झाल्या, छत्ररूप जें कमल तें पाऊल झालें व आणखी इतर अस्त्रें दुसरे अवयव झालीं. अशी जी ही **वसुमती** तिच्याशीं राजा रममाण असता झाला. या राजाचे वंशपरंपरागत मोठे आज्ञाधारक एकमताचे सगळ्या देवांचा गुरु जो बृहस्पति याला देखील सल्यामध्यें मदत करणारे प्रौढबुद्धीचे **धर्मपाल, पद्मोद्भव, सितवर्मा** या नांवांचे तीन मंत्री होते. यांपैकीं **सितवर्मा** याला **सुमती** आणि **सत्यवर्मा, धर्मपाल** याला **सुमंत्र, सुमित्र** आणि **कामपाल, पद्मोद्भव** याला **सुश्रुत** व **रत्नोद्भव**, असे मुलगे झाले. या पुत्रांपैकीं **सत्यवर्मा** धर्मशील होऊन संसाराची असारता कळून तीर्थयात्रा करण्याकरतां देशांतरीं गेला. थट्टेबाज लोक, तमाशेवाले, वारस्त्रिया यांचा नाद ज्याला लागला असा शिक्षाबाह्य **कामपाल** आपल्या बापाची व भावाची आज्ञा उल्लंघन करून पृथ्वीवर फिरावयास गेला. **रत्नोद्भव** याचें व्यापार उदीम करण्याकडे मन लागल्यामुळें जलमार्गानें तोहि गेला. बाकीचे मंत्र्यांचे मुलगे आपले वडील स्वर्गस्थ झाल्यावर त्यांचाच उद्योग पतकरून राहिले. एकदां असा प्रसंग झाला कीं मोठ्या रोषानें लढाईची तयारी करून, मालव देशच्या **मानसार** नांवाच्या दर्पयुक्त राजावर, अनेक प्रकारच्या आयुधांमध्यें निपुण व अनेक लढायांमध्यें शत्रूंच्या शिरांवर ज्यानें आपले तीक्ष्ण बाण रोंविले आहेत असा मगध देशचा राजा पूर्वोक्त **राजहंस** तो गेला; जो चालला असतां ज्याच्या सैन्याच्या घोषानें सर्व दिशांच्या हत्तींना देखील भय उत्पन्न झालें व ज्याच्या चतुरंग सैन्याच्या भारानें पृथ्वी कांपून शेषाचीं मस्तकें शीर्ण झालीं. इकडे तो आला असें पाहून मालव देशचा राजा **मानसार**ही पुष्कळ हत्तींसह सैन्यासह मूर्तिमान् विग्रहच कीं काय असा आग्रहानें चाल करून आला. या दोघांचा ह्मणजे मगधेश्वर व मालवेश्वर यांचा घोर संग्राम झाला. ज्या संग्रामांत बाहुयुद्ध झालें, शस्त्रयुद्ध झालें, व परस्परांच्या सैन्यांतील असंख्य वीर मारले गेले. ज्या युद्धाच्या घोषानें स्वर्गांत देखील सर्व आवाज बंद झाले व ज्यामध्यें इतकी धूळ उडाली कीं ती धूळ नव्हे, तर नवीन पति वरण्याकरितां आलेल्या अप्सरांनीं हा अंतरपटच सोडला आहे काय असा भास सर्वांनां झाला. शेवटीं युद्धाच्याअंतीं सगळें सैन्य ज्याचें क्षीण झालें आहे असा जो मालवेश्वर **मानसार** यास **राजहंसानें** जीवंत धरिलें आणि कृपाळूपणानें पुनः राज्यावर बसविलें. नंतर समुद्रवलयांकित धरित्रीचें कोणाचाही उपसर्ग नसतां राज्य करीत असतां अपत्य नाहीं यामुळें सकळ जगाचें आदिकारण जो भगवान् नारायण याची तो अर्चा करूं लागला. असें चाललें असतां एके दिवशीं प्रातःकाळच्या वेळेस त्याची पट्टराणी जी वसुमती तिनें "हे देवि, हें कल्पवल्लीफळ घे, असें पति सांगतो आहे" असें सुस्वप्न पाहिलें आणि त्याच रात्रीं आपल्या पतीच्या मनोरथरूप फलाचें पुष्प जो गर्भ त्याप्रत धारण करिती झाली. आपल्या संपत्तीच्यायोगानें इंद्रालाही मागें टाकणारा असा जो राजहंस, यानें इष्ट आप्त राजांनां बोलावून आपल्या संपत्तीला, उत्साहाला अनुरूप

असा राणीचा सीमंत नांवाचा महोत्सव केला. एकदां इष्टमित्र, मंत्री पुरोहित यांसह राजा सिंहासनावर बसला असतां द्वारपाळानें नम्रपणानें येऊन मुजरा करून विनंती केली, राजाधिराज महाराज आपल्या दर्शनाची इच्छा मनांत धरून, महाराजांनीं पूजा करण्याला योग्य असा एक यति द्वाराशीं आला आहे. राजाची परवानगी मिळाल्यावर तो यति त्यानें राजसभेंत आणला. राजानें तो येतो आहे असें पाहून आपला गुप्तपणानें फिरणारा हा हेर आहे असें ओळखून सर्व मंडळी विसर्जन करून फक्त मंत्र्यासह एकांतांत त्याशीं कांहींसें हास्य करून भाषण करण्यास आरंभ केला. अरे तापसा, या वेषानें पृथ्वीवर फिरून ठिकठिकाणीं काय पाहिलें आहे तें कथन कर. तो नम्रपणें मुजरा करून बोलूं लागला. महाराज, आपली आज्ञा शिरीं घेऊन ज्या वेषाला धास्ती नाहीं असा हा यतिवेष स्वीकारून मालवेश्वराच्या नगरांत प्रवेश करून तेथें गुप्त रीतीनें राहून सर्व त्याची बातमी काढून आलों. तो अभिमानी **मानसार** आपल्या फौजेतील लोकांच्या आयुष्याला विघ्नभूत असें जें आपल्याशीं युद्ध झालें त्यांत पराजित होऊन निर्दय होत्साता अंतःकरणांत उद्विग्न होऊन महाकालनिवासी जो भवानीपति शंकर त्याची आराधना करून त्याजपासून संतुष्ट झाल्यावर उत्कट शत्रूला मारणारी अशी भयंकर गदा त्यानें प्राप्त करून घेतली आहे. आणि त्यामुळें, मजबरोबर आतां लढाई करण्याला कोणीहि समर्थ नाहीं अशी घमंडी बाळगून मोठ्या गर्वानें आपल्याशीं युद्धाची तयारी करीत आहे. याउपर महाराज काय करतील तें खरें. त्याचें अशा रीतीनें भाषण संपल्यावर अमात्यांनीं त्या मालवेश्वराची पुढील कृति सर्व मनांत आणून राजास विनंति केली—महाराज, शत्रु आतां युद्धाला येणार हा देवतासाहाय्यानें येतो आहे; त्याच्या पुढें आपला उपाय चालणें कठीण, म्हणून सांप्रतकाळीं युद्ध करणें अगदीं अयोग्य होय. तेव्हां किल्याचा आश्रय करणें हा या प्रसंगीं उत्तम मार्ग आहे. त्यांनीं नाना प्रकारें जरी राजाला समजाविलें तरी मोठ्या उद्धटपणानें तो त्यांच्या वाक्याचा अनादर करून पुढें लढाईला सरसावला. इकडे मानसारहि महादेवानें दिलेली शक्ति किंवा गदा बरोबर घेऊन मोठ्या सरंजामानिशीं योद्ध्यांचा पुढारी होऊन मगधदेशीं आला. तेव्हां तें ऐकून प्रधानांनीं राजाचें मोठ्या कष्टाने सांत्वन करून कांहीं सैन्य बरोबर देऊन शत्रूला असाध्य अशी जी विंध्याटवी तिजमध्यें स्त्रियांना पोंचविलें. आपल्या उत्साहवान् अशा सैन्यासह **राजहंस** यानें अधिक शक्तिमान् जो आपला शत्रु याजवर चाल केली. परस्पर वैर करणाऱ्या दोघां शूरांचा, गगनांत विमानांत बसून जे पाहाण्याकरितां आलेले देव यांनां देखील आश्चर्य उत्पन्न करणारा, तुमुल संग्राम चालला असतां जयेच्छा बाळगणारा जो मालवेश्वर यानें, नानाविध आयुधांचा प्रयोग उपसंहार इत्यादि युद्धकलांत इंद्रालाही मागें टाकणाऱ्या अशा **राजहंसा**वर ती शंकरदत्त गदा फेकली. तीक्ष्ण बाणांनीं इकडे **राजहंसाने** तिचे तुकडे तुकडे जरी केले तथापि शंकराची गदा फुकट जावयाची नाहीं म्हणून सारथ्याला मारून तिनें राजाला रथांतल्या रथांत मूर्छित केलें. तदनंतर घोड्यांच्या शरीराला फारसे बाण न लागल्यामुळें, त्यांचे लगाम सईल पडल्यामुळें, त्यानीं रणभूमींतून

रथासकट पळ काढला. ते दैवगतीनें रथ घेऊन ज्या अरण्यांत अंत:पुरांतील स्त्रिया ठेवल्या होत्या त्याच अरण्यांत आले. इकडे राजा नाहींसा झाल्यावर जयलक्ष्मीनें माळ घातलेला **मानसार राजहंसाचें** राज्य बळकावून **पुष्पपुरींत** राहिला. युद्धभूमीवर शस्त्रांचे वार लागून मूर्छित झालेले परंतु दैवगतीनें जीवंत राहिलेले प्रधान सकाळच्या मंजूळ वाऱ्यानें शुद्धीवर येऊन इकडे तिकडे पाहतात तों राजा नाहीं; ह्मणून परम खेदानें व्याप्त होत्साते राणीकडे आले. **वसुमती** सर्व सैन्याचा नाश व राजाचें नाहींसें होणें त्यांजपासून ऐकून घेऊन शोकसागरांत बुडाली व पतीच्या मागून आपणहि मरावें असा तिनें निश्चय केला. तो पाहून अमात्यांनीं तिला सांगितलें, बाई साहेब, महाराज खरोखर युद्धांत पडले अगर दुसऱ्या कोणत्या रीतीनें त्यांचें देहावसान झालें असा अजून निश्चय नाहीं, पुन: ज्योतिषी वर्गानीं सांगितलेला सगळ्या रिपुकुळाचा विध्वंस करणारा सुलक्षण मुलगा आपल्या उदरांत आहे तेव्हां सांप्रतचा आपला विचार अगदीं गैर आहे. अशा रीतीनें मंत्री यांनीं तिचें सांत्वन केलें त्यामुळें कांहीं वेळपर्यंत ती उगीच बसली; परंतु तिचें चित्त स्वस्थ नव्हतें. नंतर मध्यरात्र उलटल्यावर सगळे सेवक निद्रिस्त असतां शोकसागराच्या पार जाण्याला असमर्थ होत्साती ज्यांत शब्द किंवा हालचाल कांहीं होत नाहीं अशा आपल्या डेऱ्यांतून पलीकडे जाऊन ज्या झाडाखालीं भयाने रथ घेऊन पळालेले घोडे दमून उभे होते, त्याच वडाच्या झाडाच्या एका खांदीला आपल्या उत्तरीयाचा फांस करून मरण्याकरतां टांगून घेण्याच्या इच्छेनें, **माधुर्यांत** कोकिल पक्ष्यालाही मागें टाकणाऱ्या अशा कोमलस्वराने, ती वसुमती विलाप करूं लागली. हे राजाधिराज, आपल्या लावण्यानें कामाची बरोबरी करणारा असा जो तूं तोच पुढील जन्मीं मला पति होवो. हीं गोड वचनें ऐकून चंद्राच्या शीतल किरणांनीं पूर्वीच शुद्धीवर आलेला, शरीरांतून पुष्कळ रुधिर वाहल्यामुळें बराच वेळ बेशुद्ध पडलेला, राजा **राजहंस** यानें हे राणीचेच शब्द आहेत असा निश्चय करून प्रिय भाषणपूर्वक तिला हांक मारली. हाक ऐकतांच मोठ्या लगबगीनें जवळ येऊन अत्यानंदाच्या योगानें जिची मुखश्री प्रसन्न झाली आहे अशी ती वसुमती फार वेळ दर्शन न सल्यामुळें उपोषितच कीं काय अशा नेत्रांनीं त्याला पोटभर पाहून कोकिलतुल्य स्वरानें आपल्या पुरोहितांना अमात्यांना हांक मारून त्यांस राजा दाखविती झाली. राजाची व प्रधानांची भेट झाल्यावर राजाला नमन करून काय दैव जबरदस्त आहे असें ह्मणून प्रधानांनीं बोलायास आरंभ केला. महाराज, सारथी ज्या वेळेस मारला गेला त्यावेळेस घोड्यांनीं आपला रथ इकडे अरण्यांत आणला असावा. राजा ह्मणाला, तिकडे संग्रामांत पुष्कळ सैन्य पडल्यावर **मानसारानें**, शंकराने दिलेल्या गदेनें मला प्रहार केल्यामुळें मला मूर्छा प्राप्त झाली व रात्रीच्या शीतळ वाऱ्यानें मी पुन: सावध झालों. नंतर मंत्रिलोकांनीं राजाची पूजा करून राजास डेऱ्यांत आणून त्याच्या बाणांच्या व शस्त्रांच्या जखमांतून शल्य काढून टाकून त्याच्या जखमा वगैरे बऱ्या केल्या. इतकें झाल्यावर राजाच्या तोंडावर टवटवी आली. आपल्या दैवानें उलट खाल्यामुळें आपला पराक्रम सर्व रद्द झाला असें पाहून राजाला दैन्य प्राप्त झालें आहे असें पाहून

ती बुद्धिमती अशी वसुमती कोमल शब्दांनीं राजास ह्मणाली, महाराज, सगळ्या राजांच्या मंडळामध्यें वरिष्ठ असून आज विंध्याटवी-मध्यें राहण्याचा प्रसंग यावा काय. हर हर! ही संपत्ति पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें किंवा विजेच्या लकलकाटाप्रमाणें चकूकन दिसते, पुनः लागलीच नाहींशी होते. तर यावरून सर्व गोष्टी दैवाच्या स्वाधीन आहेत. आणखी पूर्वी ज्यांचें इंद्रासारखें ऐश्वर्य असे हरिश्चंद्र रामचंद्र इत्यादि राजांनीं दैवाच्याच स्वाधीन अशा दुःखतंत्राचा अनुभव पूर्ण घेऊन पुढें पुष्कळ दिवसपर्यंत राज्य केलें. तर आपण कष्टी होऊं नये, आपलेंही तसेंच होणार नाहीं कशावरून? तर कांहीं दिवस मनांतील दुःख सर्व सांडून दैव प्रसन्न होईल असा यत्न करावा.

तदनंतर सगळ्या शेषसैन्यासह आपल्या उग्र तपेंकरून शोभणाऱ्या **वामदेव** नामक मुनीकडे इष्टफलाची सिद्धि व्हावी ह्मणून राजा **राजहंस** गेला. तेथें गेल्यावर राजानें प्रणाम केला. ऋषीनेंही राजाचें आतिथ्य केलें. नंतर राजानें आपलें वर्तमान सांगून ज्यांत श्रम मुळींच नाहींत अशा त्या आश्रमांत कांहीं दिवस राहून सोमकुलाचें भूषण असा जो तो राजहंस, पोटांत राज्याची इच्छा बाळगून मित भाषणांनीं मुनीला ह्मणाला, भगवन्, मानसार राजानें प्रबल अशा दैवसाहाय्यानें मला जिंकून माझें राज्य बळकावलें. याकरितां त्याप्रमाणें कांहीं तप वगैरे करून त्याला हांकून द्यावें असें मी इच्छितों. आपली दया सर्व भूतमात्राला शरण येण्याला जागा आहे ह्मणून आपल्या चरणापाशीं आलों आहें. हें ऐकून तो भूत भविष्य वर्तमान जाणणारा मुनि राजाला ह्मणतो, राजा, शरीराला कृशता आणणाऱ्या तपाची इच्छा पुरे. वसुमतीच्या गर्भांत जो तुझा पुत्र आहे तो सकल रिपुकुलाचा उच्छेद करणारा होईल. कांहीं दिवस धीर धरून राहा. इतक्यांत याच अभिप्रायाची आकाशवाणीही झाली. राजा या मुनिवाक्याचा अंगीकार करून स्वस्थ बसला. पुढें कांहीं दिवसांनीं गर्भदिवस पूर्ण होतांच वसुमतीला मंगल-मुहूर्तावर सकल शुभ लक्षणांनीं युक्त असा पुत्र झाला. ब्राह्मण्यानें किंवा ब्रह्मतेजानें साक्षात् ब्रह्मदेवाची बरोबरी करणाऱ्या आपल्या पुरोहिताला पुढें करून कार्यज्ञ राजानें संस्कारांच्या योगानें व बाळलेण्यांच्या योगानें शोभायमान अशा आपल्या मुलाचें **राजवाहन** असें नांव ठेविलें. त्याच काळीं **सुमति, सुमंत्र सुमित्र आणि सुश्रुत** नांवांच्या राजाच्या प्रधानांनाही **प्रमति, मित्रगुप्त, मंत्रगुप्त** आणि **विश्रुत** असे मोठे सुंदर दीर्घायुषी, नवीन उगवणाऱ्या चंद्राप्रमाणें ज्यांची कांति, असे पुत्र झाले. दिवसेंदिवस आपले मित्र समवयी जे हे प्रधानांचे पुत्र त्यांसह अनेक प्रकारच्या क्रीडा करीत लहानाचा मोठा झाला.

एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं मुनीच्या शिष्य वर्गापैकीं एक तपस्वी, राजलक्षणांनीं अंकित, व नेत्रांला आनंद देणारा असा एक मुलगा मोठ्या आनंदानें राजापुढें आणून ठेवून ह्मणाला; राजा, कुश समिधा इत्यादि आणण्याकरितां मी वनांत गेलों असतां दीनमुखी अनाथ अश्रु ढाळणारी एक बाई मी पाहिली. कां बाई, या निर्जन अरण्यांत तूं कां रडतेस असें मी विचारलें. तेव्हां तिनें डोळे पुसून गद्गद स्वरानें भाषणास आरंभ केला. मुनिवर्या, केवळ म-

दनतुल्य ज्याचें रूप व ज्याची कीर्ति देवसभेपर्यंत गेलेली असा **मिथिलेचा** राजा आपल्या मित्राच्या **राजहंसा**च्या स्त्रीच्या सीमन्तमहोत्सवाकरितां बायकापोरांसह **पुष्पपुरीं** येऊन कांहीं दिवस राहिला असतां, शंकराला सुप्रसन्न करून मालवदेशचा **मानसार** राजा मगधराजावर युद्धाकरितां चालून आला. नंतर तेथें या दोघां प्रख्यात राजांचें दारूण युद्ध होऊन आपल्या मित्राचें साहाय्य त्या युद्धांत विदेहाधिपति करीत असतां जयी जो मालवेश्वर; त्यास धरिलें याने आणि भाग्यानें त्याला सोडिल्यावर, आपल्या विध्वस्त झालेल्या सैन्यापैकीं शेष जें कांहीं राहिलें तें घेऊन त्यानें आपल्या नगराची वाट धरली. नंतर मार्गानें जातां जातां कठीण डोंगराळ धोक्याच्या वाटेंत शबरांनीं (भिल्लांनीं) त्याला गांठिलें. त्यांची संख्या त्याच्या सैन्यापेक्षां अधिक होती तरी जेम तेम आपलें व आपल्या स्त्रियांचें रक्षण करून वेगाने त्यानें पळ काढिला. त्याच्या आवळ्या जावळ्या मुलांच्या, मी व माझी मुलगी या दोघी दासा होतों व राजा वेगानें जात असतां त्याच्या बरोबर चालण्याला आह्मी समर्थ झालों नाहीं. अशा विवंचनेंत असतां कोणी एक व्याघ्र मूर्तिमान् कोपच कीं काय असा तोंड उघडून मला धरण्याकरितां आला. मी भ्यालें आणि एक दगडावर ठेंच लागून पडलें. माझ्या हातांतून तें बाळक निसटलें, तें तेथें एक गाईचें शव पडलें होतें त्यांत कोठें अकस्मात् दडून राहिलें. तो वाघ तें शव ओढीत असतां कोणी एकानें बाण मारला, तो त्यास लागून मरण पावला. तो नाजूक मुलगा शबरांनीं उचलून कोठें नेला. दुसरा मुलगा माझ्या मुलीजवळ होता; ती कोणीकडे गेली तिचें काय झालें हें कळत नाहीं. मी तेथें मूर्छित पडलें असतां मला एका कनवाळू धनगरानें आपल्या घरीं नेऊन माझ्या जखमा बऱ्या केल्या. आतां मी बरी झालें आणि आपल्या स्वामीकडे जावयास निघालें तेव्हां कोणी सहाय नाहीं, मुलीचें काय झालें, हें कळत नाहीं ह्मणून मी कष्टी आहें. बरें आतां एकटीच जाईन इतकें बोलून ती चालती झाली. (पुढें चालेल.)

ठगाची जबानी.

खंड ६.

पुढें आह्मी नागपुरास जाऊन पोहोंचेपर्यंत मार्गांत सांगण्यासारख्या कांहीं गोष्टी घडल्या नाहींत. आह्मांपैकीं कांहीं असामींची एक टोळी दुसऱ्या एका रस्त्यानें गेली होती. तिच्या हातून कोठें किरकोळ एकटे दुकटे सांपडलेले वाटसरू मेले तेवढेच मात्र. आणि त्याविषयींही मला सांगण्यासारखें कचें वर्तमान समजलें नाहीं. याजकरितां साहेब, आतां मीं नागपूर मुक्कामीं आह्मीं तळ दिला होता, त्या स्थळीं आपल्यास नेतों. शहराबाहेर एक मोठा तलाव आहे, त्याच्या पाळीवर आह्मांपैकीं बहुतेक मंडळी उतरली. पूर्वी हातीं लागलेल्या लुटींतील माल विकून वगैरे पैका उभा करण्याकरितां माझा बाप आणखी कांहींजणांसहवर्तमान मात्र शहरांत जाऊन उतरला. मालाचा पैका उभा राहण्याला कांहीं एक अडचण पडली नाहीं. कारण ब्रिजलाल याचा सर्व माल सहज विकण्यासारखा होता. त्याला शहरांतील सोनार व इतर सावकार लोकांमध्यें पुष्कळ गिऱ्हाइकें भेटलीं. माल विकण्याच्या संबंधानें एका साव-

कारापाशीं माझ्या बापाचा व्यवहार चालू असतां माझा बाप सहज बोलतां बोलतां त्या सावकारास ह्मणाला, "मला पुढें हैदराबादेस जाणें आहे. माझ्या गांवची कांहीं मंडळीही माझ्याबराबर आहे; हाल्लीं गादीवर शिर्कंदर जाहा आहे त्याजपाशीं माझा भाऊ नौकरीस आहे त्याच्या हाताखालीं ह्या मंडळीची कांहीं रोजगाराची सोई होण्याचा लाग आहे; ह्मणून त्यांजला तिकडे घेऊन जात आहें; 'माझ्या बापाचें हें भाषण ऐकतांच तो सावकार ह्मणाला. तर मग मींही तुह्मांबरोबर चालतों. वाटेनें आपण मला संभाळून नेल्यास तुह्मांला व तुमच्या मंडळीला मी चांगल्या प्रकारें बक्षीस देऊन प्रसन्न करीन. आज पुष्कळ दिवस असा कोणी संभावित गृहस्थ पांच पंचवीस माणसांनिशीं तिकडे जाणारा भेटेल त्याच्या सोबतीनें जावें असें मनांत आणून मीं त्या शोधांतच होतों."

" साहेब, ते दिवस कांहीं निराळे होते. देशांत जिकडे तिकडे अस्वस्थता असून चोहोंकडे सर्वांच्या तोंडीं लढाया चालू असल्याविषयीं बातम्या. ह्यामुळें त्या काळीं कोणाही प्रतिष्ठित गृहस्थाला घरीं कांहीं उद्योग नसला व हाताखालीं चार माणसें गोळा करितां आलीं तर हिंदुस्थानांत ह्मणा किंवा दक्षिणेंत ह्मणा भलत्या एकाद्या संस्थानांत गेलें असतां लष्करी खात्यांत सहज रोजगार लागे. सिंदे, होळकर, पेशवे आदिकरून बहुधा झाडून सर्व संस्थानिकांच्या पदरीं मोठमोठालीं सैन्यें असत, व सैन्यांतून शिपायी लोकांना वेतनेंही चांगलीं मिळत. यामुळें इतर उद्योग करण्यापेक्षां त्या काळीं अशा राजे रजवाड्यांपाशीं नौकरीस राह-ण्यांत फायदा असे. ह्या कारणामुळें आह्मांला नागपुरच्या वाटेवर असे नौकरीनिमित्त जाणाऱ्या लोकांचे समुदाय पुष्कळ भेटत. आमच्या मंडळीचा जमाव पाहून त्या वेळीं कोणास कांहीं विशेष चमत्कार वाटत नसे किंवा कोणत्याही प्रकारें कोणाच्या मनांत कांहीं संशय येत नसे, ह्याचें तरी कारण तेंच. आणि त्यांतही आमच्या मंडळीचा प्रमुख माझा बाप असल्यामुळें तर सर्व प्रकारें फारच साजरा दिसे; कारण माझा बाप मोठा छानदार देखणा पुरुष असून त्याच्या चर्येवरूनच तो मोठा बहादर शिपायी दिसे. तो नेहमीं उत्तम पोषाग करी व हत्यारबंद असे. त्याप्रमाणेंच तो हमेष उत्कृष्ट घोड्यावर स्वारी करी. व कोठें मोठया शहरांतून जाऊं लागला कीं आमच्या मंडळींतील कांहीं ठग त्याच्या पुढें पाठीमागे धांवत. तो अशा शहरांत मुकामास राही तेव्हां ते त्याच्या तैनातीस राहात. त्या सावकाराला माझ्या बापानें जसें सांगितलें त्याप्रमाणें त्याचा सर्व थाटमाट होता खराच. माझ्याबापानें त्या सावकाराचें ह्मणणें कबुल केलें " एक दोन दिवसांत सर्व मंडळीसह आपल्या सेवेंत तत्पर होतों, व हैदराबादेपर्यंत आपल्यास सुखरूप नेऊन पोहोंचवितो," असा माझ्या बापानें त्या सावकारापाशीं करार केला. माझ्या बापाचा व त्या सावकाराचा त्यासंबंधें निश्चय करण्याकरितां एकांत झाला त्या वेळीं सावकार माझ्या बापाला ह्मणाला कीं " मी आपल्याबराबर बरीच रोकड घेत आहें व शिवाय जवाहीर व इतर व्यापाराचा किमती मालही पुष्कळ आहे. हैदराबादेस ह्या व्यापारांत बरीच कमाई होण्याची मला पुष्कळ आशा आहे. ही गोष्ट माझ्या बापानें मला सांगितली. तो

सावकार ह्याप्रमाणें माझ्या बापास तोंडानें सांगूनच राहिला नाहीं. जेवढा एकंदर माल तो बराबर घेगार होता, तेवढा सारा त्यानें माझ्या बापास प्रत्यक्ष दाखविलाही. अशी आपरिमित व अमूल्य लूट निश्चयानें आतां लवकरच आपल्या हातीं लागणार हें मनांत येऊन आमच्या मंडळींत एकूण एकास जो कांहीं आल्हाद झाला आहे त्याची साहेब, तुह्माला कल्पना देखील करतां येणार नाहीं.

आमच्या मंडळींत झाडून सारे शिपाई आहेत असें लोकांत दिसावें ह्मणून ज्यांना ज्यांना हत्यारें नव्हतीं त्यांना त्यांना माझ्या बापानें बंदुका; तलवारी व ढाला घेऊन दिल्या आणि सर्वांनां जेव्हां हत्यारबंद करून पाहण्याकरितां रांगेनें उभें केलें तेव्हां सारेच मोठे शानदार शिपायी दिसूं लागले; कारण त्या सालीं आमची स्वारी मोठ्या साहसाची होईल व अनेक घोर प्रसंग येऊन गुजरतील असा पूर्वीपासून अजमास असल्यामुळें बराबर जी मंडळी घेतली होती, तींत सर्वजण भरज्वानींत आलेले व शरीरानीं बळकट असेच निवडून घेतलेले होते. माझ्या बापानें त्या सावकारापाशीं केलेला करार सर्व मंडळीस कळविला. व सर्व प्रकारें त्यांस नीट बजावून सांगितला. तो ह्मणाला, सर्वजण एव्हांपासून बोलण्याचालण्यांत वगैरे लष्करी लोकांप्रमाणें खूप भपका करून साधेल तितकी शिपाईगिरीची फुशारकी आणि ऐट दाखवा. सारांश, जोंपर्यंत रस्त्यांत तुह्मास त्या सावकाराबरोबरील संरक्षण करण्याचे लोक ह्मणून चालावें लागेल तोंपर्यंत सारेजण समशेर बहादुरी बाण्याचें सोंग हुबेहुब उतरा.''

हा प्रकार संध्याकाळीं घडला. मग काय सारी रात्र आनंदच आनंद. आतां खूप मोठीं लूट हातीं लागणार किंबहुना लागल्यासारखीच आहे ह्या विचारानें सर्वांच्या मनांत विलक्षण उत्साह करून दिला. शहरांतून लागलीच कलावंतिणींचा ताफा बोलावून आणून नाच उभा केला. आणि बहुतेक रात्र सर्व मंडळींनीं गाणें ऐकण्यांतच घालविली. दुसऱ्या दिवशीं सावकार आतां येईल घटकेनें येईल ह्मणून सारा दिवसभर आह्मीं मोठ्या काळजीनें त्याच्या वाटेकडे एकसारखें डोळे लावून बसलों होतों. शेवटीं अगदी तीनसांजा एकदांचा तो एका लहानशा गाडींत बसून आमच्या गोटांत येऊन पोहोंचला. त्याच्या बराबर त्याचे एक दोन चाकर व दोन तीन लहान लहान तट्टें होतीं. त्यांजवर त्यांचा डेरा व दुसरें ओझेंपाझें लादलेलें होतें. ह्याखेरिज आणखी दाहा बैल त्याजबराबरील हाकणाऱ्या माणसांसुद्धां होते. येकून त्याच्या सुद्धां सारीं आठ माणसें होतीं. तेथून निघूनं उमरावतीस जाऊन पोहोंचे तोंपावेतों आह्मांस तो फारसा पाहण्यास सांपडला नाहीं. माझा बाप, व हुसेन, हे कधीं कधीं संध्याकाळच्या प्रहरीं त्याच्या डेऱ्यांत जाऊन त्याजपाशीं बसत. माझीही त्याच्याशीं ओळख करून दिली होती. तो आंगानें मोठा स्थूल पुरुष होता. त्याचें त्याला शरीर पेलत नसे.'' पहिला हात चालून आरंभ करण्यास आणण्याला हा पुरुष सोईवार पडेल किंवा नाहीं हा विचार त्याला प्रथम पाहिल्या वेळापासून माझ्या मनांत घोळूं लागला. म्या आपल्या मनांतील गोष्ट बापाच्या कानांवर घातली; ती ऐकून त्याला फार संतोष झाला.

तो ह्मणाला, '' ह्याचा भटोटी तुलाच करावा, असें म्यां मनांत आणिलें होतेंच. ह्याचें

शरीर फार अवजड असल्यामुळें ह्याच्या हातून तुला कांहीं प्रतिबंध होऊं शकणार नाहींच. अद्यापपर्यंत आपल्या हातांत दम किती आहे ह्याचा तुजला अनुभव नाहीं त्यापेक्षां हें काम बरें तुझ्याजोगतेंच अगदीं सोपें आहे.

तेव्हांपासून "ही आपल्या हातून पहिली आहुती पडायाची," असा त्या सावकाराविषयीं माझ्या मनाचा सिद्धांत झाला; व हा आपला पहिला बळी असें मी त्याला समजूं लागलों. तें कसब आपल्या आंगीं पूर्णपणें भिनून जावें ह्मणून मी तेव्हांपासून नित्यशः आपल्या गुरूपाशीं शिक्षण घेण्यास जावें, आणि तो रूमाल चालविण्याच्या ज्या ज्या निरनिराळ्या युक्ति व पद्धति दाखवी त्या त्या आपल्या हातानें करून पाहाव्या असा व्यासंग आरंभिला. एका दिवशीं माझा गुरू मला ह्मणाला, "कोणी एकादा वाटसरू मी फसवून आपल्या गोटांत घेऊन येतों आणि तूं त्याजवर पहिल्यानें हात चालवून पाहा." म्यां त्या गोष्टीला रुकार दिला नाहीं; कारण एकतर मला कसब चांगलें साधलें असा माझ्या मनाला भरंवसा येऊन चुकला होता व दुसरें, ज्यापेक्षां मी होऊन आपल्यासाठीं त्या सावकाराची निवड केली होती त्यापेक्षां त्याचाच जीव मीं आपल्या हातानें पहिल्यानें घेईन असा माझ्या मनाचा दृढ निश्चय होऊन राहिला होता.

ह्याप्रमाणें आह्मीं मार्ग क्रमीत एका शहरीं जाऊन पोहोंचलों. तेथपर्यंत रस्त्यांत दुसरी कांहीं सांगण्यासारखी गोष्ट घडली नाहीं. त्या शहरांत आह्मीं भर बाजारांत मुक्कामास उतरलों. त्या शहराचा तो भरभराट आणि ती संपत्ति पाहून माझ्या मनाला मोठा चमत्कार वाटला. पण त्यांत कांहीं नवल नव्हतें, कारण हिंदुस्थानांतून जो कांहीं व्यापाराचा माल येई तो सारा तेथें उतरून तेथून दक्षिणेंत जिकडे तिकडे रवाना होई. व त्याप्रमाणेंच खालून दक्षणेकडून नाना प्रकारचे वगैरे मसल्याचे पदार्थ व इतर जिन्नस वरतीं हिंदुस्थानांत जाण्याकरितां येत ते प्रथम तेथें उतरून नंतर तेथून पुढें रवाना होत. ह्याप्रमाणें ती पेठ सर्व व्यापाराच्या घडामोडीचें मुख्य ठिकाण होतें. शहरांत पाहिलें तों जिकडे तिकडे सावकार लोकांचीं मोठमोठीं घरें व दुकानें पुष्कळच होतीं. मी ज्या ज्या पदार्थांचें ह्मणून नांव ऐकिलें होतें, ते सर्व त्या बाजारांत मांडिलेले माझ्या दृष्टीस पडले. व त्यांखेरीज आणखी मुंबईहून विलायती जिन्नस आलेले पाहिले ते निराळेच. तसे तर पूर्वी कधींही माझ्या दृष्टीस पडले नव्हते. म्यां रोज बापाबरोबर फिरण्यास जावें, व तेथें नजरेस पडणारे पदार्थ पाहून माझ्या मनाला कांहीं विलक्षण चमत्कार व कौतुक वाटावें. त्या शहरांत त्या सावकाराचें कांहीं काम होतें ह्मणून त्याची तेथें कांहीं दिवस खोटी झाली. तें त्याचें काम आटोपल्यानंतर पुनः आह्मीं मार्गस्थ झालों. त्या शहरांतून आमच्या सावकाराबरोबर आणखी तीन माणसें व कांहीं बैल आले. त्या बैलांवर कापडाचे गठ्ठे लादलेले होते. कापड सगळें बनारसी असून फारच किमतीचें होतें. बनारस पेठ कापडा विषयीं मोठी प्रख्याति आहे. तेथें अति उत्तम फार किमती व सुंदर कापड पुष्कळ निघतें असा लौकिक आहे. हीं तीन माणसें सावकाराबराबर जास्त आल्यानें आमच्या पूर्वी ठरलेल्या बेतांत कांहीं व्यत्यय आला असें नाहीं; कारण तो सावकार आह्मा बरोबर येण्यास निघाल्यामुळें

हुसेन ह्याची टोळी नागपुरापासून निराळ्या मार्गानें जाणार ती न जातां मुद्दाम सर्वजण बराबरच राहिलों होतों. शिवाय जरी कदाचित् हुसेन आपल्या टोळींसह निघूनही गेला असता तरी कांहीं पंचाईत पडतीना. त्या सावकाराच्या सगळ्या परिवाराला विन हरकत व विन बोभाट हस्तगत करून घेण्याला माझ्या बापाची मंडळी पुरून उरण्यासारखी होती. माझा बाप ह्मणाला, " उमरावतीहून मंगळूर तीन मजला आहे. ह्या प्रकरणाचा निकाल करून टाकण्यासाठीं तेथें सोईवार जागेची मीं योजना करीन. त्या ठिकाणीं बऱ्याच लहान लहान टेंकड्या असून त्यांच्या पलीकडे जवळच दऱ्याही आहेत असें मला आठवतें. व माझी स्मृति खरी असल्यास प्रेतांचा मागमूस नाहींसा करण्यास त्या स्थळीं सोई उत्तम आहे. हुसेन तुझ्या मंडळींत कोणास त्या जागेची माहिती असल्यास तपास कर कारण लघे बरावर देऊन कोणास तरी पुढें पाठविलें पाहिजे.

तेथून आह्मीं निघाल्यावर पहिला मुक्काम बाला ह्मणून एक लहानसा गांव आहे तेथें केला. त्याठिकाणीं माझ्या बापानें सांगितल्याप्रमाणें योजिल्या स्थळांची माहिती कोणकोणांस आहे ह्मणून तपास करितां तेथील अगदीं खड्यानखडा ठाऊक असणारे असे तीन जण निघाले. त्या जाग्यांत एक ठिकाण तर फारच सोईवार आहे तेथेंच कृत्य उरकावें अशीही शिफारस करण्याच्या ते अगदीं बेतांत होते. माझ्या बापानें आणि हुसेनानें त्यांजला त्या सर्व प्रदेशांची अगदीं बारीक बारीक माहिती पुष्कळ विचारली. व त्यांनींही संपूर्ण यथातथ्य वर्णन केलें त्यांत आमचें काम साधण्याला एक स्थळ तर फारच सोईवार असें सर्वांस वाटलें. व, त्याच ठिकाणीं संकल्पित विधि उरकून टाकण्याचा लागलाच निश्चयही ठरला. "तुह्मीं ह्या प्रसंगीं मनापासून मेहनत कराल तर तुह्मांस साधारण वांटणीपेक्षां कांहीं विशेष बक्षीस मिळेल, " असें त्या तिघां माणसांस सर्वांहीं अभिवचनही दिलें.

त्या घटकेपासून, आपल्या प्रसंगाची वेळ आतां अगदीं येऊन ठेपली असें मला वाटूं लागलें. आणखी थोड्या काळांतच इतरांची साम्यता करण्याचा माझा हक्क आहे असें, आपल्या हातानें सिद्ध करून दाखवून मीं त्यांच्या पंक्तींत येऊन बसण्यास, साहेब, तेव्हांपासून त्या सावकाराची दृष्टि मी साधेल तितकी चुकवूं लागलों. कां तें कळेना. कदाचित् प्रसंग आलेला नसल्यानें मनाला भीति वाटली असावी. काय असेलतें असो. रस्त्यांत एक दोनवार त्याला म्यां पाहिलें; पण तो माझ्या दृष्टीस पडतांच कसें होई कोण जाणें. माझ्या आंगाला आपोआप कंप सुटावा. हा सर्व नाद सोडून पुनः आपआपल्या गांवीं परत जावें, अशी एखाद्या वेड्याप्रमाणें त्या प्रसंगीं माझ्या मनाला इच्छा उत्पन्न झाली, पण मागें पाऊल घेण्याचा वेळ तेव्हां राहिला नव्हता. मजला नांव मिळवायाचें होतें. माझा बाप जो मजवर अत्यंत ममता करी त्याच्या तोंडून वाहवा मिळवायाची होती. त्याजकडून "शाबास" ह्मणून घ्यावयाचें होतें. आतां परत जाणें सर्वथैव दुर्घट. येथपर्यंत मजल येऊन जर अखेरीस ऐन प्रसंगाच्यावेळीं मी धैर्य सोडतों व भेकडपणा दाखवितों, तर माझ्या अप्रतिष्ठेचा अगदीं कळस होता. ह्या समयास माझ्या नांवाला डाग लागता तर तो कालत्रयीं धुतला जाताना. अशा प्रसंगीं

आपल्याकडून होईल तितकी शिकस्त करण्याखेरीज मला दुसरा इलाजच नव्हता. आणि खरेंच पुसाल तर तो सावकार माझ्या नजरेसमोर नसला ह्मणजे संकल्पाप्रमाणें आपलें काम उरकण्याविषयीं माझ्या मनाला कोणत्याही प्रकारें वाईट वाटत नसे इतकेंच नव्हे तर उलट पूर्वीप्रमाणें प्रसिद्धीस येण्याची इच्छा मनांत प्रज्वलित होईल. (पु. चा.)

नवीन पुस्तक वगैरे.

मल्हारराव महाराज नाटक. या नांवाचें एक नवीन मराठी पुस्तक रा० रा० नारायण बापूजी कानिटकर यांणीं रचून प्रसिद्ध केलें आहे. यांत विषय काय आहे हें सांगण्याची विशेष गरज नाहीं, कारण थोड्या दिवसांमागें जें बडोदें प्रकरण घडून आलें, तें सर्वांच्या डोळ्यांसमोर टळटळित आहेच. तेथें घडलेल्या एकंदर हकीकतीचें नाटकरूपानें यांत वर्णन आहे. यामध्यें कित्येक क्षुल्लक गोष्टी नाटक जमण्याकरितां पदरच्या घातल्या आहेत, तथापि एकंदरीनें पाहतां घडलेल्या प्रकाराला येथें लिहिलेल्या सर्व गोष्टी बरोबर जमतात. सर्व प्रसंग राजप्रकरणी असून अझून ताजा असल्यामुळें व त्यांतील सर्व पात्रें समक्ष असल्यामुळें, अशा विषयावर कांहीं लिहिणें, आणि तशांत नाटक रचणें ह्मणजे, राखेनें झाकलेल्या आगींतून चालण्यासारखें होय, ही गोष्ट लक्षांत आणतां, हें नाटक बरेंच चांगलें उतरलें आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. यामध्यें हलकट आणि लुच्चे लोकांच्या संगतीनें मोठमोठ्यांचीही कशी दुर्दशा होते हें स्पष्ट दाखविलें आहे. यामध्यें वीररसाचें अंग असावें तितकें नाहीं असें दिसतें, तथापि तसें होण्यालाही प्रस्तुत कालमान हेंच कारण झालें असावें, ह्मणून याबद्दल ग्रंथकाराला तितकें दूषण लावतां येत नाहीं. जेथें ग्रंथकाराला आपल्या मनाप्रमाणें लिहिण्याचें स्वातंत्र्य नाहीं, तेथें त्या ग्रंथावरून त्याच्या त्या कर्त्याची योग्यता किंवा विद्वत्ता ताडतां येत नाहीं, हें सर्वांस माहित आहेच. हें पुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वी तें सरकारी कायदे कानू जाणणाऱ्या कित्येक विद्वान् लोकांकडे जाऊन आलें, व त्यांत प्रथमतः लिहिलेला बराच अंश कालमानावर दृष्टि देऊन फिरविणें प्राप्त झालें, असें आमच्या ऐकण्यांत आहे. कायदे जाणणारांनीं जें सांगितलें तें त्यांहीं योग्यच सांगितलें असेल, आणि या नाटकामध्यें प्रसंगोपात्त कडकपणा असावा तितका नाहीं याचेंही कारण तेंच असेल; तथापि आमच्या मतें आह्मांला असें वाटतें कीं सरकारी कायद्यांच्या पेचांत न येतांही कांहीं कडकपणा प्रसंगोपात्त आणतां आला असता. असो. दुसऱ्या आवृत्तीच्यावेळीं हें प्रकरणही तितकें थंडावेल, आणि तशावेळीं ग्रंथकाराला कांहीं जास्त मोकळेपणानें लिहितां येईल यांत संशय नाहीं. एकंदर प्रसंगाप्रमाणेंच आरंभापासून नाटकाचा झोंक आणि विशेषतः शेवट उदास, ह्मणजे करुणारसाला अनुकूल असा आणला आहे. मधून मधून शृंगारही आहे. एकंदरीनें संग्रहाला हें पुस्तक योग्य आहे, यांत संदेह नाहीं.

देशी मेणबत्या आणि साबण:— रा० रा० मोरोविष्णु तळवळकर यांणीं केलेल्या मेणबत्या आणि साबण यांचे नमुने त्यांनी आह्मांकडे पाठविल्याचें आह्मी मागें कळविलेंच आहे. पूर्वोक्त पदार्थांच्या रासायनिक घटनेविषयीं बरोबर रीतीनें सांगणें ह्मणजे

शास्त्रीय विषय पडला! परंतु त्या पदार्थांचा उपयोग कसा काय होतो, इतकें सांगणें कांहीं कठीण नाहीं. मेणबत्या आणि साबण हे दोन्ही पदार्थ दिसण्यांत सुरेख, हुबेहुब विलायतीप्रमाणें, दुसऱ्यानें सांगितल्यावांचून किंवा छापलेलें नांव वाचल्यावांचून देशी पदार्थ असें वाटत नाहीं. हे दोन्ही पदार्थ विलायतेहून येथें जे येतात, ते ताजे नसतात, यामुळें जसजसे ते जुने होतात, तसतसे त्यांचे गुण वाढतात. परंतु आह्माकडे आलेले दोन्ही पदार्थ अगदीं नवे असून फार चांगले आहेत. विलायती मालापेक्षांही ते चांगले, असें आमचें ह्मणणें नाहीं; तथापि दोन्हीं जागच्या नव्या जिनसा परस्परांशीं लावून पाहिल्या असतां या देशी जिनसा विलायतीच्या मागें पडतील असें ह्मणवत नाहीं. मेणबत्ती वाहत नाहीं. किंचित् मंद मात्र जळते व त्या मानानें तितकी जास्त वेळ टिकते. मंद जळण्याचें कारण वात. मेणबत्तीची चांगली वात तुर्कस्थानांत होते. विलायती मेणबत्त्यांमध्येंही त्याच वाती घालतात. विलायती वाती चांगल्या होत नाहींत. तेव्हां इकडच्या नव्याच मेणबत्तीमध्यें घातलेली इकडची नवी वात तितकी चांगली न उतरली ह्मणून आश्चर्य नाहीं. साबूही नवाच असल्यामुळें वडो अमळ लवकरच झिजते. परंतु फेत उत्तम निघून, तो धुऊन टाकल्यावर तेलकटपणा किंवा चिकटपणा अंगावर अगदीं राहत नाहीं, व कडकपणाही येत नाहीं. कित्येक जातींच्या विलायती साबूंमध्यें हा गुण बराच कमी असतो. यावरून पाहतां हा साबू चांगला उतरला आहे. वडी, विलायती "उइंडसर सोप" ह्मणून ती चौरस घन वडी असते त्या आकाराची हुबेहुब असून वर 'तळवळकर' यांचें नांव इंग्रजी छापानें उठविलें आहे.

हे दोन्ही जिन्नस आपल्या देशीं हल्लीं खंडोगणती खपतात; ह्मणून अशा वेळीं आपल्या लोकांनी परदेशी मालावर अडून न राहावें, याकरितां मशारनिल्हे तळवळकर यांणीं सदुद्योग चालवून हे जिन्नस तयार केले आहेत. हा त्यांचा देशावर मोठा उपकार आहे यांत कांहीं संशय नाहीं. परंतु यांत आपल्याकडून जितकें होण्याजोगें होतें तितकें त्यांहीं केलें, व पुढेंही ते करतील. तरी हीं कामें अशीं आहेत कीं त्यांचा मोठा कारखाना चालविला तरच तीं सुफळ होऊन अल्प द्रव्यानें त्याचें फळ सर्वांस प्राप्त करून घेतां येईल. एक दोन दहापांच माणसें ठेवून हें काम चांगलें होईल असें नाहीं. कारण विलायती माल यंत्रांच्या साह्यानें निघतो व त्याचे मोठमोठे कारखाने आहेत ह्मणून तो अल्पमोली होऊन पाहिजे तितका मिळतो; त्याच्याशीं हातच्या कामाच्यानें टिकाव धरवणार नाहीं. याकरितां आपल्या या मुंबई शहरामध्यें सांप्रत जे मोठमोठे उद्योगशाली द्रव्यवान् लोक आहेत त्यांहीं जर या कृत्याकडे लक्ष दिलें, तर त्यांचा धंदा सहज वाढून लोकांचेंही त्यापासून काम होईल. अशा जिनसांचे कारखाने उभारून त्यांमध्यें तळवळकरांसारख्यांची मदत घेतली ह्मणजे त्यांची भागी ठेविली, किंवा त्याना द्रव्यद्वारें लागेल तशी मदत केली, तर ते या दोन्ही जिनसांचें काम पत्करण्यास तयार आहेत असें समजतें. तशांत त्या कामाला ह्मणजे लाखो रुपये खर्चले पाहिजेत असें नाहीं. याकरितां ही वेळ आमच्या शहरांतील व्यापारी लोकांनीं व इतरांनीं जाऊं देऊं नये अशी त्यांस आमची सूचना आहे.

BOMBAY:—"NIRNAYASAGAR PRESS" KALKADEVEE ROAD.

चित्रकला.

(DRAWING.)

स्त्रियांस योग्य शिक्षण.

रा० रा० विविधज्ञानविस्तारकर्ते यांस—

वि०वि०. आलिकडे चित्रकला या विषयाची बरीच वृद्धि होत चालली आहे. परंतु अद्यापपावेतों हिंदुस्थानांत ही विद्या स्त्रियांस शिकवीत नाहींत. फिमेल नार्मल स्कुलांत स्त्रियांस निरनिराळ्या प्रकारचे—गणित, वाचन, व्याकरण इत्यादि विषय शिकवितात, व तेथील अधिकारीही हिकडे चांगलें लक्ष पुरवतात. तेणेंकरून अज्ञ आणि अशिक्षित अशा स्त्रियांची सुधारणूकही चांगली होते. याचें वास्तविक कारण तेथील अधिकाऱ्यांची धूर्तता व हुशारी हें होय. स्त्रियांची बुद्धि पुरुषांपेक्षां तीव्र असते. तसेंच फिमेल नार्मल स्कुलांत नकशाचें व छायायुक्त शिवणकाम ह्याचेंही शिक्षण उत्तम रीतीनें देतात. तसेंच हिंदुस्थानांतील अशिक्षित स्त्रिया घरांत भिंतीवर, तसेंच जमीनीवरही सुंदर सुंदर चित्रविचित्र रंगांचीं फुलें व बुट्टे काढितात. ते पहाण्यांत आल्यावरून माझी तर खात्रीच झाली कीं, चित्रकला हा विषय त्यांना शिकविला असतां तो त्यांजकरवीं उत्तम रीतीनें होईल. तर ह्या स्कुलाचे अधिकारी ह्याकडे पूर्णपणें लक्ष देतील अशी मी आशा करितों. त्याचप्रमाणें निरनिराळ्या काशिद्याच्या कामाचे चित्ररूपानें काढलेले नमूने येथील इंग्लिश व इतर शिक्षित स्त्रिया मुद्दाम विलायतेहून आणवितात. तर चित्रकला हा विषय स्त्रियांस शिकवण्याची येथेंच योजना केली असतां वर सांगितल्या प्रकारचे नमूने येथेंच तयार होतील, व त्यापासून फायदाही होणार आहे, यांत संशय नाहीं. तसेंच स्त्रियांस हा विषय शिकविल्यानें त्यांच्या पासून होणारीं मुलेंही आपल्या अल्प वयांत ह्या विषयाचा स्वीकार करूं लागतील व त्याविषयींचा त्यांचा अज्ञपणा दूर होईल. आणि फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड इ० देशांप्रमाणें येथें अमूल्य आणि नाजूक अशीं चित्रकलेचीं कामें थोडक्या काळांत होऊं लागतील, व तिकडून नमूने येतात ते फक्त तिकडील पद्धतीचेच असतात; परंतु त्यांना इकडील पशु, जनावरें, राजे रजवाडे आदि करून यांच्या देखाव्याची माहिती नसते, ह्यामुळें हिकडल्या पद्धतीच्या तसबिरा ह्यांजकडून होत नाहींत. तर हिकडे हा विषय चालू असल्यानें सदर्हु अडचण दूर होऊन तिकडील लोकांस ह्या प्रकारचे नमूने धाडतां येतील, व त्यापासून विद्यावृद्धिही बरीच होईल.

एक चित्रकलेची वृद्धि इच्छिणारा.

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रुपये ३.
सहामाही आगाऊ.... ....रुपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचें .....आणें ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रूपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांत अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खेतरओळींत नंबर १३ च्या घरांत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.



A MONTHLY MAGAZINE

OF

पुस्तक ७. MARATHI LITERATURE अंक ११.

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

धोम महाबळेश्वरवर्णन. २०१
कृत्रिमपणाचा आणि सरळपणाचा परिणाम. २०६
हर्षचरित..... ..... २१४
ठगाची जबानी. २१७
पतिविरहशोक. (कविता) २२०

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पोंच.

पुस्तकें.

सन १८७६ सालची रोजनिसी पुणे "ज्ञानचक्षूचे" मालक यांजकडून.

ना० प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या आगमनानिमित्त रा. रा. गोविंद वासुदेव कानिटकर यांणीं केलेली इंग्रजी कविता; आणि त्याच विषयावर पुणे दक्षिणाविद्यालयांतील विद्यार्थी यांजकडून "स्वागत" या नांवाची संस्कृत कविता अशीं दोन पुस्तकें आलीं त्यांबद्दल आह्मीं पाठविणारांचे उपकार मानितों.

वर्गणी.

	रु० आ०
(दिसेंबर १८७५ पर्यंत)	६० आ०
रा. रा. प्रल्हाद नरहर जोशी.	१३– ०
रा. रा. गोविंद अनंत गोखले ओव्हरसियर	१–१२
रा. रा. माधवराव वासुदेव बर्वे.	९– १
श्रीमंत छत्रपति महाराज, कोल्हापूर	४–१२
श्री. रा. बाबासाहेब भोंसले, सावंतवाडी.	४–१४
श्री. रा. रघुनाथराव विठ्ठल विंचूरकर	४–१४
रा. रा. सावंतवाडी येथील मुलींचे शाळेचे चिटणीस.	४–१४
रा. सा. रावजी वासुदेव टुल्लू, एम. ए.	९–१२
श्री. रा. वंटमुरीकर देसाई.	८– ८
रा. रा. केशवराव महादेव वकील.	३– ६
श्री. रा. आपासाहेब जमखिंडीकर.	९–१२
रा. रा. ट्रेनिंगकालेज रीडिंगरूमचे चिटणीस.	३– ६
रा. रा. विठोबा रामचंद्र परब.	९–१२
रा. रा. बाळकृष्ण मोरोबा शेट.	३– ०
रा. रा. कृष्णाजी विष्णु फाटक (जून १८७६ पर्यंत).	३– ६

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक ११.

धौम महाबळेश्वरवर्णन.

(पुढें चालू.)

मागें सांगितलेले हे येथील हवेचे गुण झाले. परंतु कांहीं दोषही आहेत, व त्यांचें मूळ अतिपर्जन्य होय. प्रतिवर्षीं २५० इंचांहून अधिक पाऊस पडतो. मागील पांच वर्षांत साधारण मान येणेंप्रमाणें होतें.—

सन १८७०	इंच	२५६
१८७१	"	२००
१८७२	"	२६८
१८७३	"	२७१
१८७४	"	२९७

हगवण, संधिवायु, व आकृतिविशिष्ट रोग ह्मणजे गुल्म, प्लीहा, यकृत्, उदर, इत्यादिकांस येथील हवा फार वाईट आहे. परंतु धातुक्षय, रक्तशोष, ज्वर इत्यादिकांपासून होणारे विकारांस फार चांगली आहे.

या ठिकाणचें पाणीं फारच गोड, सतेज, व निर्मळ असतें. याच्या गोडीचें तर खरोखर वर्णन करतां येत नाहीं. एकाच कृष्णा नदीचें पाणीं; परंतु महाबळेश्वरचें व लागलेंच पुढें दहा कोशांवर वाईचें पाणीं या दोहोंमध्यें जमीनअस्मानचा फरक असतो व तो फरक समजण्यास दोन्ही ठिकाणचें पाणीं साक्षात् प्यालें पाहिजे; शब्दानें वर्णन करणें व्यर्थ आहे. पाण्यामध्यें स्वच्छता इतकी असते कीं पंचपात्रींत किंवा पेल्यांत घातलें ह्मणजे भांड्याचे अतिसूक्ष्म डाग नुसते एकाएकीं दृष्टीस पडत नाहींत ते चांगले उमगूं लागतात. असें पाणीं असून दुःख इतकेंच वाटतें कीं येथें तृषेचा अभाव असल्यामुळें तें पिववत नाहीं.

उन्हाळ्यांत पाणी कमी असतें असें नाहीं. साहेब लोकांच्या बंगल्याहून दहा पांच बंगल्यांआड एकेक विहीर आहे, व मालकमपेठचे उत्तरेस वेण्या तलाव आहे. याशिवाय डोंगरांतून ठिकठिकाणीं झरे वाहत असतात. बहुतकरून उंबराचा वृक्ष दृष्टीस पडला ह्मणजे मुळाशीं झुळझुळ वाहणारा लहानसा झरा तरी हटकून सांपडतो, तथापि ही गोष्ट खरी आहे कीं उन्हाळ्यामध्यें पाणीं विपुळ असावें तसें नसतें. कित्येक ठिकाणीं दूर अंतरावरून, व दरडी चढून आणावें लागतें. कृष्णा आदिकरून नद्यांचे उगम महाबळेश्वरीं आहेत तथापि वाहतें पाणीं या ठिकाणीं मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. वेण्या तलावांतून एक लहानसा प्रवाह निघून वेण्येचे खोऱ्यांत जाऊन पडतो हें खरें आहे परंतु तो कांहीं विशेष जमेस धरण्यासारखा नाहीं.

या ठिकाणीं हवा खाण्याकरितां लोक येतात ते मुख्यत्वेंकरून उन्हाळ्यांतच येतात. कारण, येणारे लोक बहुतकरून सरकारी नौकर असल्यामुळें त्यांनां इतर संधि मिळत नाहीं. हिंवाळ्यांतही येथील हवा चांगली असते. परंतु महाबळेश्वर सातार जिल्ह्यांत असल्यानें तेथील साहेबलोक मात्र मधून मधून येऊं शकतात. ज्यांना नौकरीचा धोशा पाठीमागें नाहीं असे लोकही येतात. परंतु त्यांची संख्या फार थोडी असते; कारण, तेथें कांहीं फुकाचें नाहीं. पैसा अद्वातद्वा खर्च करावा लागतो, व उन्हाळ्यांत दोन अगर तीन महिने राहणें हें मोठ्या श्रीमंत लोकांनां देखील जड पडतें. पैसा खर्च केल्याचें पूर्ण फळ मिळतें इतकेंच नाहीं तर द्विगुणितही मिळतें, या कारणास्तव ईश्वरानें ज्यांना ऐपत दिली आहे व जे येथें राहण्याचे फायदे समजतात ते मात्र पैसा खर्च करून येतात. अशी स्थिति वास्तविक पाहतां साहेब लोकांचीच आहे. ईश्वरकृपेनें त्यांनां राजसत्ता आली आहे, मोठमोठे पगार मिळतात, व राजविलासांची सवय व राजविलासांची गोडीही त्यांनां आहे. परंतु आपल्या लोकांमध्यें हे सर्व प्रकार उलटे आहेत. अगोदर भीक, त्यांतून रोजगार मिळाला तर बायका पोरें व इतर नातलग पोसावयाचे असल्यामुळें, सदोदित हातातोंडाशीं गांठ असते, शिवाय परतंत्रता. या कारणास्तव महाबळेश्वरीं जाण्याचें मनांत आलें तरी जन्मांतून एकवार गेलें तर कृतकृत्य झालें असें समजावें. जे लोक व्याजबट्टा करून दोन पैसे मिळवितात व संचय करितात त्यांनां ऐपत असते; परंतु जाण्यापासूनचे फायदे कळत नाहींत. सारांश, महाबळेश्वर आपलें असून तेथील सुख आपले दैवीं नाहीं. असो.

हा जो प्रकार वर लिहिला आहे त्यावरून एवढें स्पष्ट आहे कीं हवा खाण्यास येणारे साहेब लोकच असतात. त्यांची संख्या बायका पोरें मिळून पांचशांत कमी नसेल असें वाटतें. शिवाय इतकीच संख्या, किंबहुना याच्या दीडपट, नौकर लोकांची व आश्रितांची असते. केवळ उदीमाच्या उद्देशानें पन्नास पाऊणशें व्यापारी लोकही येतात. परंतु हे सर्व नौकर, आश्रित, व उदमी लोक इसपनीतींतले पक्कान्न नेणारे उंटाप्रमाणें केवळ भारवाहक समजले पाहिजेत. साहेब लोकांचीं बायकामुळें होईल तितकें करून उन्हाळ्याचे अवलपासून अखेरीपर्यंत राहतात. परंतु पुरुष लोकांस तसें करण्यास सांपडलें नाहीं तरी साधेल त्याप्रमाणें महिना पंधरा दिवस, निदान आठ रोज तरी येऊन राहतात, व इतके दिवसांत खर्च किती करतात म्हणाल तर मनुष्याप्रत अगदीं नाहीं म्हटलें तरी तीनशें रुपये दरमहा खर्च होत असेल असें वाटतें. वाटतें असें भीत भीत म्हटलें याचें कारण असें कीं वास्तविक पाहतां तीनशें रुपयांच्या दीडपट, किंवा दुप्पट देखील खर्च होत असेल. परंतु माहिती नाहीं व अजमास करण्यास जावें तर "राजा दररोज वेलच्या खात असेल कीं काय" या गोष्टीप्रमाणें व्हावयाचें.

खर्चाची मुख्य रक्कम म्हटली म्हणजे घरभाडें होय. साहेब लोकांचे बंगले मालकम पेठेचे वस्तीपासून दूर असतात. एकेका बंगल्याचें भाडें सर्व उन्हाळ्याकरितां तीनशें, पांचशें, व हजारपर्यंत देखील असतें. या ठिकाणीं भाडें म्हटलें म्हणजे वर्षभर राहिलें

व आठ दिवस राहिलें तरी सारखेंच पडतें. कारण, घरवाल्यांनां वर्षाचें भाडें उन्हाळ्यांत बसूल करून घ्यावें लागतें. कदाचित् कोणांस वाटेल कीं इतकालें भाडें घेतात त्या अर्थीं घरवाल्यांची चैन असेल परंतु ही समजूतही खोटी आहे. कारण, साधारण बंगला बांधण्यांस देखील पैसा व श्रम फार लागतात. कारागीर व बहुतेक सामान पाहाडावर चढवावें लागतें. या दुःखासही घरवाले इतके भीत नाहींत; परंतु पावसाळ्यामध्यें घराची जतन होणें फार कठीण काम असतें. कारण, पाऊस फार अवकाळ्या असतो व वादळें भयंकर होतात. यामुळें घरांचा खुळखुळा होऊन जातो, व बांधण्याच्या खर्चापेक्षां डागडुगींतच पुष्कळ पैशाचें नुकसान होतें. इतकेंही असून हे बंगले महालासारखे मोठे विस्तीर्ण किंवा सोईचे असतात असें नाहीं. त्यांना बहुधा "हट" अगर "काटेज" अशी संज्ञा असते व त्याचप्रमाणें त्यांचें स्वरूप असतें. मुख्य सुख इतकेंच कीं हरएक बंगल्यासभोंवती सुखप्रद, रमणीय आणि गर्द झाडी असते तेणेंकरून "स्निग्धच्छायातरुषु वसतिः" याची आठवण होते. नामदार फिटजेरल्ड साहेब व दाऊद सासून यांचे बंगले राजकीय आहेत; परंतु अशा घरांची संख्या मोजण्यास हातांचीं बोटें देखील फार आहेत. आपल्या लोकांकरितां मालकमपेठेंत वाण्या-उदम्यांचीं रिकामीं घरें व दुकानें राहण्यास मिळतात. कित्येक झोंपड्या मोकळ्या जाग्यावरही आहेत; परंतु मध्यमप्रतीची जागा झटली झटजे दरमहा पंचवीस अगर तीस रूपये दिले पाहिजेत. या ठिकाणीं साहेब लोकांनां व आपल्या लोकांना मुख्य अडचण ही आहे कीं राहण्यास जागा मिळत नाहीं. उन्हाळ्याचे पूर्वीपासून तजवीज राखून जागा अटकवून ठेवाव्या लागतात. असें न केलें तर बहुधा येणेंच होत नाहीं. जर धनंतर पाण्यासारखा पैसा खर्च करणारास जाग्याचें हें दुःख सोसावें लागतें तर गरीबागुरिबांची काय दुर्दशा असेल याचें अनुमान सहज करतां येईल.

शरीरसमृद्धीस मुख्य कारणें येथील हवा व रमणीय ठिकाणीं फिरणें हीं होत. याकरितां पहांटेस मोठ्या झुंझुरका सूर्योदयापूर्वी उठण्याचा पाठ येथें आहे व कोंबळें ऊन पडतें तोंच व्यायाम करून घरीं परत यावें हा विहित मार्ग आहे. परंतु या नियमास उल्लंघणारे पुष्कळ असतात. कारण प्रातःकाळीं पांच वाजतां साखरझोंप मोडून थंडीच्या तडाख्यांत उठण्याचा निश्चय सर्वांचे हातून चालत नाहीं. याकरितां उशीरानें उठून व उशीरानें व्यायाम करून परत येणारे फार असतात. आणि मुख्यत्वेंकरून आपल्या लोकांमध्यें अशा प्रकारचा आळस पुष्कळ आढळतो. साहेब लोकांच्या नियमांत मात्र अंतर होत नाहीं. ते घोड्यावर जातात. परंतु पायीं फिरण्याचा प्रघात फार आहे. सायंकाळीं फिरतेवेळीं मात्र गाड्या घेतात. नंतर दिवसास उत्तमान्नभोजन किंवा मित्रमंडळीकडे मेजवान्या होत असतात. पुढें साडेचार किंवा पांच वाजेपावेतों गंजिफा, बुद्धिबळें वगैरे घरांतील खेळ चालले असतात. मग उन्हें जात चाललीं झणजे, बग्या, फैटणी, शिग्राम, टांगे, वगैरे यांत बसून थव्यांचेथवे पुनः बाहेर फिरण्यास निघतात. व कोठें तरी सुंदर व रमणीय ठिकाणीं बसून सुस्वर, मनोरम आणि वीरश्रीजनक किंवा आनंदकारक वाद्यसंगीत ऐकतात. या ठि-

कांणीं हजारों रुपये खर्च करून विहाराच्या जागा तयार केल्या आहेत. तेथें क्रिकेट व बाडमिंटन हे खेळ मोठ्या झपाट्यानें चालले असतात. यांपैकीं क्रिकेट ह्मणजे काय व त्यापासून हितावह परिणाम काय होतात हें सांगणें नको. परंतु साहेबलोकांमध्यें हा खेळ आलीकडेस किंचित् मागें पडत चालला आहे. व बाडमिंटनचा नाद साहेब लोकांस चोहोंकडे अतिशय लागला आहे. हा खेळ थोडे दिवसांपूर्वी शोधून काढला असें ह्मणतात; व क्रिकेटपेक्षां हरएक प्रकारें याजपासून फायदे फार आहेत. स्त्रियांचे कोमळ जातीस तर हा खेळ फारच प्रशस्त आहे. सुमारें दहा हातांचे अंतरावर, दीड पुरुष उंचीचे दोन खांब रोविले असतात व त्यांच्या वरच्या भागास, अडीच तीन हात रुंदीचा जाळीदार तारांचा एक पत्रा बांधतात, आणि दोन्ही बाजूनें खेळणारे लोक उभे राहून या पत्र्यावरून व खालून एकमेकांचे अंगावर चेंडू टाकितात. या खेळाचें वेड साहेब लोकांस व विशेषेंकरून त्यांच्या स्त्रियांस इतकें असतें कीं महाबळेश्वरीं दुसरा कांहीं नियमित उद्योग नसल्यामुळें प्रत्येकदिवशीं निमे अधिक काळ बाडमिंटन खेळण्यामध्यें गुजरतो. हा खेळ खेळतांनां सहजावृत्त्या इतका चलनव्यापार व अंगवैचित्र्य होत असतें कीं अबलाजनांच्या नाजुक गात्रांस अतिपरिश्रमाचा भास होत नाहीं. शारीरिक श्रमानें रांठपणा न येतां त्यांच्या सुकुमार अंगवेलीचें मार्दव कमी होत नाहीं. त्वचेची स्निग्धता जात नाहीं, आणि लावण्याचें तेज व मुखचंद्रमा उत्तरोत्तर प्रफुल्लित होऊन वृद्धिंगत होत जातो. या खेळानें स्वाभाविक ईर्षा तर पुष्कळच उत्पन्न होते. परंतु त्यांतून ही हृद्य वाद्यसंगीत होत असलें ह्मणजे कांहींएक प्रकारचें अवर्णनीय व विलक्षण स्फुरण येऊन चित्तोल्लास मुखकमळावर साक्षात् दिसूं लागतो. मग हास्यविनोदादि प्रकार सुरू होतो. विश्रामाची अपेक्षा झाल्यास जवळ वृक्षांतर्गतकुंजांप्रमाणें रमणीय एकांतस्थळें सिद्ध असतात. अस्तमानपर्यंत हा क्रम झाल्यावर पुनरपि रात्रौ तद्धेतद्धेच्या राजविलासी मेजवान्या, कधीं गवरनर साहेबांकडे, कधीं सेनाधिपतीकडे, कधीं इतर श्रीमंत लोकांकडे होतच असतात. अशा प्रसंगीं नृत्य व गायन सदोदित असतें. या खेरीज आठ दाहा दिवसांनीं फ्रिअर हालमध्यें नाच्यनाटकें होत असतात. कधीं मधीं वेण्या सरोवरावर जलक्रीडेकरितां पुष्कळ लोक जातात व इतर रमणीय ठिकाणीं वनभोजनेंही वारंवार होत असतात. धर्मार्थादि सत्कृत्यें मुळींच होत नाहींत असें नाहीं, आईबापविरहित गरीब ख्रिश्चियन मुलींनीं केलेलीं शिवणकामें, कशिदे, खेळणीं, व इतर वस्तूंचें प्रदर्शन करून त्या कामीं केवळ परोपकारबुद्धीनें मोठमोठ्या सरदार लोकांच्या स्त्रिया जातीनें झटत असतात. या योगानें प्रदर्शन पाहण्यास येणाऱ्या लोकांच्या मनांतही धर्मबुद्धि उत्पन्न होऊन सर्व आपआपल्या शक्त्यनुरूप द्रव्यद्वारा ह्या सत्कृत्यास साह्य करितात. सारांश, या ठिकाणीं ऐहिक अर्थास अनुलक्षून तनु, मन, धन खर्च करून साहेब लोक शरीरसुखाच्या पाठीमागें लागलेले असतात. व्यग्रता किंवा चिंता उत्पन्न करणारी हरएक गोष्ट, ह्मणजे कचेरींचीं कामें व गहनविचारादि करून मानसिक श्रम बिलकूल करीत नाहींत. केवळ

शरीराची समृद्धि व चित्ताची प्रसन्नवृत्ति ठेवीत असतात.

आणखी एक महत्वाची गोष्ट सांगणें राहिली आहे ती अशी कीं साहेब लोकांत विवाह होतात ते स्वयंवर विधीनें होत असतात. आपल्या प्राचीन स्वयंवरामध्यें व या अर्वाचीन प्रकारामध्यें भेद इतकाच कीं, आर्य लोकांत वधू ही विवाहापूर्वी वराचे गुणानुवाद कर्णानें श्रवण करून व सभेंत दूतीजनांच्या मुखानें ऐकून एकदम स्वयंवर करीत असे. उभयतांची पूर्वी गांठही पडत नसे, परंतु तांत्रिक कधीं एकमेकांची ओझरती नजरानजर झाली झणजे फार झालें. तेवढ्यावरून व चित्रें वगैरे पाहिल्यावरून गुणसाम्य झालें झणजे प्रेमानुबंध होत असे. पूर्वी आपल्या लोकांत गाढपरिचय व परस्परांचें सूक्ष्म परीक्षण होत नसे. साहेब लोकांमध्यें प्रकार किंचित् भिन्न आहे. प्रथमतः पूर्णपणें परिचय होऊन एकमेकांची गुणपरीक्षा करीत असतात. या कामास्तव प्रणयी जनांनां भेटीचे प्रसंग येणें जरूर असतें. हे प्रसंग महाबळेश्वरीं फिरते वेळीं, खेळामध्यें, नृत्य गायनाचे समयीं, भोजनें व वनोपहार यांच्या निमित्तानें अनायासें येतात. तेणेंकरून परस्पर संघट्टन व मैत्री होऊन वाग्निश्चय होऊन जातात, व महाबळेश्वराहून खालीं गेले झणजे लग्नांची एकदम गर्दी उडते. सारांश, या ठिकाणीं अहोरात्र स्त्रियांचा पुरुषांत व पुरुषांचा स्त्रियांत प्रवेश असतो. वामनपंडितांनीं रुक्मिणीस्वयंवरांत लिहिलें आहे कीं:—

ऐश्वर्यवंत वय आकृतिही समान
स्वार्थार्थ होतिल परस्पर त्यां समान
मैत्री विवाह न घडे अधमोत्तमातें
तूं भाळलीस नृपनंदिनि काय मातें

या श्लोकाचा अखेरचरण अर्थांतच प्रस्तुत विषयास लागू नाहीं. पहिल्या तीन चरणांवरून पाहिलें असतां दिसून येतें कीं आपल्या लोकांमध्यें ऐश्वर्यांत, वयांत व आकृतींत साम्यता नसली झणजे विवाह होत नसे. परंतु साहेबलोकांत केवळ या बाह्य चिन्हांकडे न पाहतां गुणसानुरूप्य कीं जेणेंकरून ऐहिक व पारलौकिक अर्थ पुढें साध्य होतील याकडे लक्ष देतात. अधिक उणें वय, कमज्यास्त संपत्ति, लहानमोठी आकृति असली तथापि चिंता करीत नाहींत. याप्रमाणें शुष्क अडचणी नसल्यावर शुद्ध, निर्मळ व निष्कपट प्रेमाच्या वृद्धीस सर्वांशीं अनुकूळ असें जें महाबळेश्वरचें स्थळ तेथें मुग्ध जनांचा पुरुषांत विशेष तर प्रवेश होण्यानें चैतन्यचंद्रोदयांत लिहिल्याप्रमाणें परिणाम स्वाभाविकपणें होतो यांत नवल काय, झणजे

यत्र यत्र हरिणीदृशां क्रम-
स्तत्र तत्र मदनस्य विक्रमः

याचा भावार्थ असा आहे कीं चकित हरिणीनेत्रा सुंदर स्त्रिया यांचा प्रवेश होतो त्या ठिकाणीं मदनाचा विक्रम झणजे निश्चयेंकरून जय होतोच.

याप्रमाणें राजविलास होत असतात. तथापि आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं वेश्यादि जनांचा गंध देखील नसतो. तेच आपल्या राजेरजवाड्यांपैकीं दोन चार गृहस्थ येत असतात त्यांचा प्रकार अगदीं उलट असतो. हा भेद अवश्य लक्ष्यांत ठेविला पाहिजे. राजविलासानें आपले राजे लोक क्षयी होऊन सरकारानें दत्तक घेण्याची मोकळीक दिली आहे, तथापि एकामागें

एक घराणीं निर्वंश होत चाललीं आहेत. परंतु आपले प्रस्तुतचे राज्यकर्ते राजविलास करून संतति, संपत्ति व विद्या यांच्यामध्ये लोकमतें विरोध आहे, तो मोडून मैत्रीभाव उत्पन्न करतात.

(पुढें चालेल.)

कृत्रिमपणाचा आणि सरळपणाचा परिणाम.

पूर्वी **विजयनगरचा** राजा **जयपाळ** यास चौघे पुत्र होते. मोठ्याचें नांव **धनपाळ**, दुसऱ्याचें **भूमिपाळ**, तिसऱ्याचें **शंखपाळ**, आणि सर्वांत धाकट्याचें **रणपाळ**. त्या चौघांच्याही वयांत दोन दोन वर्षांचेच अंतर होतें. **जयपाळानें** चौघांसही लहानपणापासून अश्वशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, धनुर्वेद, हीं चांगलीं पढविलीं होतीं. कांहीं वर्षांनीं वयांत आले असें पाहून, **धनपाळास** द्रव्यकोशाची व्यवस्था पहाण्यास **जयपाळानें** सांगितलें; **भूमिपाळाच्या** हातीं सगळी जमाबंदी दिली; **शंखपाळास** घोडशाळा, शिकारखाना, वगैरेचा बंदोबस्त तूंच कर ह्मणून सांगितलें; आणि **रणपाळास** सेनापति करून सर्व फौजेचा अधिकार दिला. याप्रमाणें राज्याची व्यवस्था केल्यामुळें जरी राज्य एकाद्या लहानशा संस्थानाइतकेंच होतें, तरी आपण सार्वभौमत्वाचाच उपभोग घेत आहों, असें **जयपाळास** भासे. ह्मटलेंही आहे कीं, काया निरोगी, द्रव्य अनुकूळ, बायको पतिव्रता व मधुर भाषण करणारी, पुत्र आज्ञांकित, द्रव्य देणारी विद्या, हें सर्व ज्यास मिळेल तोच खरोखर सुखी होय. कांहीं दिवसांनीं राजाचा धाकटा पुत्र **रणपाळ** यानें लश्कराची चांगली तयारी ठेवून, परराज्यावर स्वाऱ्या करून जे अनीतीनें वर्तणारे राजे आढळले त्यांस पदच्युत करून, बापाचें राज्य वाढविलें; व कित्येकांपासून खंडण्या व करभारही घेऊं लागला. तेव्हां **जयपाळ** राजाचा भरभराट इतका खूप चालला कीं त्याचे राज्यांत चोर, दगेबाज, जुगारी, तर्कटी, हे मुळींच राहिले नाहींत. रणपाळाचें नांव ऐकूनच शत्रूंनीं थरथरां कांपावें, असें झालें. सर्व रयत आनंदानें आणि निर्भयपणानें आपआपले धंदे करूं लागली, तेणेंकरून राज्यांत सर्व आबादानी झाली व राज्याची जमाबंदी वाढली. दुसरे संस्थानी धाकानेंच करभार आणून पोहोंचवूं लागले. या सर्व गोष्टींनीं राजाचे जामदारखान्यांत द्रव्यही पुष्कळ जमा झालें. तेव्हां **रणपाळानें** विचार केला कीं आपण देश जिंकून जें द्रव्य संपादन केलें त्याचें सार्थक हेंच आहे कीं भोग आणि दान या दोहोंपैकीं भोग तर आपण बांधवांसहवर्तमान यथेच्छ करीत आहोंच, पण दान हा संपत्तीचा मुख्य भाग असतां त्याच्याकडेस आपण लक्ष दिलें नाहीं, हें संपत्ति लयास जाण्याचें एक कारण होय. असा विचार करून, दररोज प्रातःकालीं पांचशें रुपये धर्म करून जी कांहीं राज्यव्यवस्था पहाण्याची असेल ती पहायाची असा त्यानें नियम केला, व लागलीच "उद्यांपासून सकाळींच धर्म करण्याकरितां देहुडीवर पांचशें रुपये आणून ठेवीत जा" अशी जामदारास आज्ञा केली. नंतर दुसऱ्या दिवसापासून जामदारानें नित्य सकाळींच पांचशें रुपये देहुडीवर आणावे, व **रणपाळानें** स्नान करून जे कोणी आंधळे,

लंगडे, वगैरे दरवाज्यावर आले असतील त्यांस यथायोग्य धर्म करून भोजन करावें व कृतकृत्य झालों असें मानावें, याप्रमाणें कित्येक दिवस लोटले. **रणपाळाचे** जे तिघे वडील बंधु होते त्यांनीं आपआपलीं कामें बजावीत असतां खानगी खजिना बराच जमविला होता; पण **रणपाळानें** तसें कांहींच केलें नाहीं. त्याचें लक्ष सर्वदा लोकप्रीति व सत्कीर्ति संपादन करण्याकडेस असे. तेणेंकरून वडील बंधूचें आचरण त्याचे कानांत पडून मित्रांनीं त्याच्याप्रमाणें खानगी खजिना जमा करण्याचा उपदेश केला, तरी त्या उपदेशाचा अनादर करून, तो आपले मित्रांची अशी समजूत करी कीं "मित्रहो, या जगांत सत्यानें आणि सरळपणानें पराक्रम करून द्रव्य व कीर्ति मिळवावी; आपले बांधव, सुहृत्, संबंधी, यांस संतोषवावें आणि संपादन केलेल्या द्रव्यांतून निदान सोळावा भाग तरी धर्माकडेस लावावा. जो कोणी प्राणी असा असेल, त्यास ईश्वर सर्वदा साह्य होईल. परंतु जे कोणी स्वतः अपराक्रमी असून घरखर्चाचे द्रव्यांतून, सेवकांचे तैनातींतून, धर्मद्रव्यांतून, किंवा अधिकाराच्या बलानें रयतेस हरएक प्रकारें गांजून द्रव्यसंचय करितात, ते काळेंकरून सर्वस्व हारवून अन्नास मोताद होतात. यासाठीं हा माझा धोपटमार्ग सोडून आडवाटेस जाणून मी कधींहि पाऊल टाकणार नाहीं. जोंपर्यंत मी या मार्गानें जात आहें तोंपर्यंत सर्वसाक्षी सर्वेश्वर माझा साह्यकारी आहे असें खचित समजतों."

लागलेंच दुसऱ्या वर्षीं प्रांतांत अवर्षण झाल्यामुळें शेतें नापीक झालीं तेणेंकरून सरकारजमाबंदी फारच कमी झाली, आणि सालावादप्रमाणें खर्च पुरा करण्यास जामदारखान्यांतून बरेंच द्रव्य काढावें लागणार असा सुमार पाहून **धनपाळानें** राजास विनंती केली आणि म्हटलें, कीं "महाराज, या वर्षीं अवर्षणामुळें जमाबंदी फारच कमी होणार, याकरितां आपला खर्च कमी केला पाहिजे. **भूमिपाळ** आणि **शंखपाळ** या दोहोंचेंही म्हणणें असेंच आहे. **रणपाळ** प्रत्यहीं पांचशें रुपये धर्म करितो हें एक मोठें ओझेंच आहे तें अगदीं उतरून टाकिलें पाहिजे. आपल्या राज्यांत जिकडे तिकडे स्वस्थता आहे तेव्हां फौजेपैकींही कांहीं भागास फांटा दिल्यास हरकत नाहीं. असें केलें असतां खजिन्यांतून पैका काढण्याची गरज पडेल असें आम्हांस वाटत नाहीं; तर सालमजकूरचे जमाबंदींतूनच सुखानें खर्च वटावतां येईल." हा विचार राजास पसंत पडला. नंतर **रणपाळास** बोलावून आणून राजानें त्याच्या वडील भावाच्या समक्षच आपला निश्चय त्यास कळविला. तेव्हां **रणपाळ** असें म्हणाला कीं "सर्व राज्यास श्रेयस्कर, आणि इहलोकीं व परलोकींही सुखकारक, असा जो नित्यधर्म तो केल्याशिवाय मी अन्नपाणी मुळींच घेणार नाहीं असा माझा निश्चय आहे. जिनें आपल्या जिवावर उदार होऊन, अनेक लढाया मारून, परराज्यें पदाक्रांत करून आणि खंडण्या मिळवून, राज्यभांडार भरपूर केलें, अशा फौजेस असल्या दुर्भिक्षसमयीं रजा देणें हें तर मला अगदीं गैर वाटतें. तिच्याच पराक्रमानें संपादिलेलें जें द्रव्य आपण खजिन्यांत सांठवून ठेविलें आहे तेंच या प्रसंगीं काढून तिच्याच पोषणाकरितां देणें, यापेक्षां त्याचा चांगला उपयोग दुसरा कोणताच मला दिसत नाहीं." हें त्याचें भाषण

जरी फारच रास्त होतें तरी ते तिघे बंधु त्याऱ्यावर खरकन उतरले आणि एकत्र होऊन ह्मणाले कीं "जर तुला श्रेयस्कर असें समजून नित्य धर्म करणेंच असेल तर तूं आपल्या खानगी खजिन्यांतून हवा तितका कर, कोणी तुला मना करणार नाहीं. सरकारी खजिन्यांतून एक फुटकी कवडीही तुला मिळणार नाहीं. फौज तुला हवी असल्यास खानगी खजिन्यांतून पोसावी लागेल." हें त्रिवर्ग बंधूंचें निक्षून भाषण तोंडावाटे बाहेर पडतांच **रणपाळानें** मनांत विचार केला कीं, आपला काळ हल्लीं थोडा विपरीत दिसतो आहे. तेव्हां गुरुजनांस वंदन करून देशांतरीं आपण प्रस्थान करावें हें बरें. तेथें परमात्मा आपलें यथायोग्य योगक्षेम चालवीलच. असा विचार करून, हातांत धनुष्य बाण घेऊन, मातापितरांस वंदन करून, **रणपाळ** एकटाच बाहेर पडला तो त्या रात्रीं शहराबाहेरच धर्मशाळेंत वस्तीस राहून, पूर्व रात्र लोटतांच, आपणास कोणी ओळखूं नये ह्मणून रानवाटेनें चालता झाला. सूर्योदयापावेतों सुमारें बारा पंधरा कोस चालून सवई नसल्यामुळें अगदीं थकला, व जवळच एक मोठा तलाव दिसत होता, त्याचे कांठीं वटवृक्षाचे छायेत विश्रांति घेण्यासाठीं बसला.

इतक्यांत **चिनापट्टणाहून** कोणी सौदागीर कांहीं जवाहीर बरोबर घेऊन त्याच मार्गानें आपले देशास जात होता, तो पूर्व दिवशीं त्याच वटवृक्षाखालीं निद्रिस्त असतां सर्पदंश होऊन गतप्राण झाला होता, त्याचें जवळच पडलेलें प्रेत **रणपाळाचे** दृष्टीस पडलें. तें पाहून **रणपाळानें** असा विचार केला कीं नित्य धर्म केल्याखेरीज अन्नपाणीं घ्यावयाचें नाहीं असा माझा नियम असून आज धर्म करण्यास मजजवळ एक फुटकी कवडी देखील नाहीं. त्यापक्षीं आपणास उदकपान सुद्धां करणें नाहीं तरी या अनाथ प्रेताचा संस्कार तर आपणांस केला पाहिजे. कारण अग्निसंस्कार केला असतां अनेक कोटी यज्ञांचें फळ प्राप्त होतें असें शास्त्रांत आहे. तस्मात् या प्रेतास दहन करावें हें विहित. असें ह्मणून, खिशांतून चकमक काढून, **रणपाळानें** अग्नि तयार केला, आणि जवळच रानांतील सुकलेलीं काष्ठें आणून एक चिता तयार केली. नंतर प्रेतास स्नान घालण्याकरितां तळ्याजवळ उचलून नेत असतां, प्रेताचे कंबरेस मोलवान रत्नांनीं भरलेला खिसा बांधलेला त्यास सांपडला; तो सोडून घेऊन, प्रेतास स्नान घालून, चितेवर ठेवून, **रणपाळानें** यथाविधि अग्निसंस्कार दिला. नंतर स्नान करून परमेश्वराची अशी प्रार्थना केली कीं "हे दीनबंधो, जो कोणी तुजवर भरंवसा ठेवून नीतीनें वागतो, त्यास तूं क्षणभर देखील विसंबत नाहींस. जो मी या अघोर अरण्यांत माता, पिता, बंधु, यांनीं उपेक्षिलेला, सारी रात्र चालण्यानें थकलेला, नित्य धर्म केल्याशिवाय अन्नोदक सेवन करावयाचें नाहीं असा दृढ निश्चय असून हातांत एक फुटकी कवडी देखील नाहीं, त्या मला त्वां या अनाथ प्रेतसंस्काराचा अमोल्य पुण्यलाभ देऊन, माझे नित्यदानधर्मास अंतर न पडून मी सुखानें अन्नोदक सेवावें आणि तुझ्या भक्तीचीं अनुभवकौतुकें पहावीं ह्मणून रत्नाची पिशवी दिलीस. त्या तुझ्या ठायीं कायावाचामनानें माझी निर्मळ भक्ति राहो." याप्रमाणें स्तवन करून तेथून तसाच चालता झाला. तो सायंकाळीं **सौदापुर** ह्मणून एक लहानशी उतारपेंठ होती,

तेथें पोंचला. त्याच पेठेंत **पारीस** देशाहून कांहीं सौदागीर राजाकरितां जवाहीर खरेदी करण्याकरितां आलेले वस्तीस उतरले होते, त्यांची आणि **रणपाळाची** भेट सहजांत झाली. तेव्हां **रणपाळानें** आपल्या मिळालेल्या जवाहिरांतून कांहीं मोलवान् जवाहीर त्या सौदागरांस विकत देऊन त्यांपासून मोहरा घेतल्या; व एक चांगला घोडाही घेतला. नंतर स्नान करून जे तेथें भणंग भिकारी होते त्यांस आपल्या नियमाप्रमाणें पांचशें रूपये वांटून स्वयंपाक करून भोजन उरकलें आणि तेथेंच निद्रा केली.

मध्यान्ह रात्र लोटल्यावर, घोड्यावर स्वार होऊन, ढाल तरवार कमरेस बांधून, **रणपाळ** मार्गक्रमण करूं लागला. तो दुसरे दिवशीं प्रातःकालीं **पुण्यग्राम** म्हणून एक लहानसें गांवढें होतें तेथें पोंचला. त्या गांवीं एक शिवालय होतें. त्याचे यात्रेकरितां नानादेशींचे बैरागी वगैरे आले होते. त्यांस, आपण पुष्करणींत स्नान करून, **रणपाळानें** पांचशें रूपये धर्म केले; व सर्वांस भोजन देऊन आपणही भोजन केलें. याप्रमाणें मजल दर मजल प्रत्यहीं करून नित्य पांचशें रूपये धर्म करीत करीत कांहीं दिवसांनीं **रणपाळ मद्रावती नामक** एका समृद्ध राजधानीस पोंचला. तेथील राजाचें नांव **मद्रेश्वर**. तो मोठा नीतिमान् आणि दयाळू आहे, असें लोकांच्या तोंडांतून श्रवण करून राजवाड्याचेच पिछाडीस एक लहानसें घर घेऊन तेथें **रणपाळ** राहिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच संध्यादि कर्में सारून, समोरच्या चवाठ्यावर बसून, **रणपाळ** आलेल्या याचकांस द्रव्य वांटूं लागला. पण या घरीं कामना पूर्ण होतात हें जाहीर नसल्यामुळें याचकांची फारशी गर्दी जमली नाहीं म्हणून **रणपाळास** बराच वेळ खोळंबावें लागलें. सुमारें दोनप्रहर दिवस होतांच पहिल्यानें आलेल्या याचकांपासून वर्दी मिळाल्यामुळें अन्य याचकांच्या झुंड्यांच्या झुंड्या आल्या. त्यांस नित्याप्रमाणें दान करून, जवळ जवळ सायंकाळच्या सुमारास भोजन करून, सायंकाळीं गांवची थोडीशी रोषनाई पाहून, कांहीं रस्त्यांची **रणपाळानें** माहिती करून घेतली. आपले घरीं जें जें सामान पाहिजे होतें तें तें विकत घेऊन राजपसंत असा एक पोशाकही विकत घेतला, व घरकामास जरूरीचे असे कांहीं चाकर ठेविले.

तिसरे दिवशीं उजडतांच **रणपाळाचे** दरवाज्यावर याचकांची अगदीं गर्दी होऊन गेली. त्या सर्वांची त्यानें दक्षिणा देऊन बिदागी केली. नंतर भोजन करून, पोशाक करून, राजसभेस गमन केलें. तेथें याचा पूर्वपरिचित कोणीच नसल्यामुळें आपण आलां कोठून व जातां कोठें हें कोणी कांहीं यास विचारलें नाहीं. पण शरीरानें देखणा व राजबिंडा असल्यामुळें राजाची मात्र एकदा दोनदा दृष्टि **रणपाळावर** गेली. तें **रणपाळाच्या** लक्षांत लागलेंच आलें; व ज्या वेळेस कचेरी बरखास्त करून राजा आपल्या मंदिरांत जाऊं लागला त्यावेळेस पुढें होऊन **रणपाळानें** संमानपूर्वक त्यास रामराम केला. तो स्वीकारून राजानें मान डोलविली. नंतर प्रातःकाळीं प्रत्यहीं स्नान करून नियमाप्रमाणें पांचशें रूपये गोरगरीबांस वांटावे, मग भोजन उरकून राजसभेस जावें, व संध्याकाळीं घोड्यावर बसून फेरफटका करावा असा क्रम **रणपाळानें** चालविला. जेव्हां हा राजसभेस जाई तेव्हां राजास रामराम करी, तो राजा सत्कारपूर्वक स्वीकारी; इतक्यावर

रून राजाचे कित्येक सभासदही यास मानवूं लागले.

राजाचा मुख्य प्रधान थोड्या महिन्यांपूर्वी वारला होता; व दरबारीं त्याचें काम चालविण्यासारिखा दुसरा कोणी नसल्यामुळें सर्व पोरांडें झालें होतें. राज्यांत पेंढार, रामोशी, वगैरे अनेक जातीचे लुटारू लोक जिकडे तिकडे लोकांस उपद्रव करूं लागले, तेणेंकरून राजास मोठी चिंता प्राप्त झाली. तशांत राजा वयातीत झाला असून त्यास पुत्रसंतान नव्हतें. एक कन्या मात्र होती. ती उपवर झाल्यामुळें तिला वरयोजना करावयाची. या सर्व अडचणी जेव्हां राजाच्या मनांत एकदम उभ्या रहात, तेव्हां अक्कल गुंग होऊन राजास निद्रा ह्मणून मुळींच लागत नसे. कधीं कधीं तो मोठ्यानें ईश्वराचें स्मरण करून ह्मणे, "हे देवा, मी पुत्रहीन, व तशांत वृद्ध झालों; इतकेंच नाहीं तर माझा विश्वासू व हुशार मुख्य प्रधानही वारला. प्रजा पालन करणें हा जो राजाचा मुख्य धर्म तो माझ्या हातून कांहींच होत नाहीं. तर अशा समयीं सर्वशक्तिमान् जो तूं त्या तुझ्याशिवाय हीं सर्व संकटें निवारण कोण करील." याप्रमाणें चिंताग्रस्त असतां एके रात्रीं पहाटेस त्यास असें स्वप्न पडलें कीं आपण नदीचे डोहांत बुडत असतां एक नावाडी नांव घेऊन आला आणि त्यानें आपणास वर काढून वाड्यापर्यंत पोंचविलें. जागृत होतांच बाहेरच्या गच्चीवर स्वप्नाचे शुभाशुभफलाचा विचार करीत बसला आहे, इतक्यांत सुप्रभात झालें; व खालीं प्रातःसंध्यादि कर्में करण्यास उठणार, इतक्यांत एका घराजवळ याचकांची अगदीं दाटी होऊन गेली आहे व त्यांस मोठ्या हर्षानें रुप्याच्या ताटांतून चवल्यापावल्या **रणपाळ** वांटीत आहे, असें गच्चीवरूनच त्याच्या नजरेंत आलें. तेव्हां राजानें मनांत झटलें कीं "**रणपाळ** हा क्षत्रिय किंवा वैश्य असावा. हा रोज कचेरींत विनयपूर्वक आपणास रामराम करितो, तेव्हां अशा विनयी व उदार पुरुषाचा समाचार आपणास कांहीं तरी घेतला पाहिजे. आजपर्यंत घेतला नाहीं हीच आपली मोठी चूक. तर आपण आतांच त्यास बोलावणें पाठवून येथें आणावें व त्याची भेट घ्यावी." असा विचार करून आपली भेटीची इच्छा प्रदर्शित करण्याकरितां **रणपाळाकडेस** राजानें एक हुजऱ्या पाठविला. **रणपाळ** नित्य धर्मकृत्य आटोपून येत होता त्याची व हुजऱ्याची रस्त्यांत गांठ पडली. राजाचा निरोप ऐकून **रणपाळास** फार हर्ष झाला, व मोठ्या घाईनें राजवाड्यांत आला. आगतस्वागत झाल्यानंतर **मद्रेश्वराच्या** प्रश्नाचें "मी जातीचा क्षत्रिय, रोजगाराच्या उद्देशानें मी येथें थोड्या दिवसांपूर्वी आलों; व प्रतिदिवशीं पांचशें रुपये धर्म केल्यावांचून अन्नपाणी घ्यावयाचें नाहीं असा माझा नियम आहे," असें **रणपाळा**नें समर्पक उत्तर दिलें. नंतर राजा ह्मणाला, "तुझ्या आगमनानें माझें राज्य खचीत सुखी होणार असें मला वाटतें, तर आजपासून तूं मुख्य प्रधानाचें काम पहात जा. तुझा सर्व खर्च सरकारी खजिन्यांतून चालेल. त्वां माझ्या राज्यास स्तंभ व्हावें अशी माझी इच्छा आहे. राज्यांत बंडावा पुष्कळ झाला आहे, त्याचा बंदोबस्त मी तुझ्यावरच टाकितों." **रणपाळाचा** रुकार मिळतांच राजानें आपले मानकरी वगैरे बोलाविले; व त्यांच्या अनुमतें **रणपाळास** दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं.

दुसऱ्या दिवशीं रोजच्या प्रमाणें पांचशें रुपये धर्म करून, **रणपाळानें** आणखीही मोठा देकार वांटला; व साधुसंतर्पण करून ईश्वरास वंदन करून प्रधानकीचें काम पहावयास बसला. पहिल्यानें खजिन्याची आणि जमाबंदीची चौकशी करून, फौजेची चौकशी आरंभिली. तेव्हां त्यास असें आढळलें कीं राज्यांत वसूल येणें बराच असून, फौजेचा रोजमुराही बराच चढलेला आहे; हें ध्यानांत येतांच गांवोगांवीं तहसीलदारांवर वराती पाठवून, एक महिन्याचे आंत दरोबस्त ऐवजाचा भरणा करण्यास त्यांस सक्त ताकिदी पाठविल्या; व सरकारी खजिन्यांतून लश्करी लोकांची बाकी चुकती करून फौज बरोबर घेऊन शहराचे बंदोबस्ताकरितां कोतवाल यास बलावून, शहराचे मुख्य दहा भाग करून, त्यांवर एकेक मुख्य नाईक नेमून ज्याचे भागांत चोरी होईल त्यानें तिचा पत्ता न लाविल्यास सरकार त्या नाइकासच गुन्हेगार समजेल असा कायदा अंमलांत आणण्याविषयीं कोतवालास सक्त हुकूम फरमावून, मुलखांतील पेंढाऱ्यांचीं बंडें मोडण्याकरितां आपण खुद्द निघाला. कांहीं दिवसांनीं बंडवाल्यांचे बरेच मुख्य धरून कैद केले. कित्येक खुनी वगैरे होते त्यांस फांशीं दिलें. कांहीं दगेबाज होते त्यांस देशपार केलें. याप्रमाणें सर्व देशभर स्वस्थता करून **रणपाळ** राजधानीस परत येत असतां त्याचा इतका कडकडीत अंमल बसला कीं जे कांहीं तहसीलदार कित्येक महिने वसूल खाऊन बसले होते, ते आपण होऊन पैका देऊन, आणखी नजराणाही आणून, **रणपाळास** भेटून क्षमा मागूं लागले. याप्रमाणें दरोबस्त बाकी वसूल करून **रणपाळानें** खजिना भरपूर केला; व शिपायांस पगाराबरोबर लहान लहान बक्षिसें देऊन संतुष्ट केलें; देश निरुपद्रव केला; व विजयी होत्साता **मद्रावती** नगरीस परत आला.

अशा समयीं **मद्रेश्वराचा** आनंद पोटांत मावेना. त्याच रात्रीं **मद्रेश्वर** राणीस एकांतीं ह्मणाला कीं "आपल्या **सुंदरीचा** विवाह **रणपाळाशीं** करावा असें मला वाटतें. यास तूं काय ह्मणत्येस?" राणी ह्मणाली, "हें मज एकटीसच मान्य आहे असें नाहीं तर **सुंदरी** जी झुरणीस लागली आहे ती त्याच्याच साठीं; असें मी तिच्या सखींच्या तोंडून ऐकिलें आहे. तेव्हां विलंब न लावितां विवाहसिद्धता करावी." हें ऐकून राजास फार हर्ष झाला, व लागलेंच जोश्यास बोलावणें पाठविलें. नंतर सुमुहूर्तीं सुलग्नीं **रणपाळाचा** व **सुंदरीचा** विवाह लागला. राजानें रणपाळास मोठी जहागीर करून दिली. चार दिवस मोठा उत्सव झाला. नंतर तीं उभयतां सांसारिक सुखाचा अनुभव घेऊं लागलीं. **रणपाळानें** राज्यांत इतका चांगला बंदोबस्त ठेविला कीं कोणी खांद्यावर रुपयांचा तोडा घेऊन शेकडो कोस मार्गानें चालला तरी त्याजकडे कोणी डाव्या डोळ्यानें सुद्धां ढोकावून पहात नसे; व शहरांत दरवाजे रात्रीं उघडे टाकिले तरी कोणाचे केसास देखील धक्का लागत नसे. याप्रमाणें सर्वत्र स्वस्थता पाहून, **मद्रेश्वर** राजाचा जांवयावर फारच लोभ जडला, व आपल्या पाठीमागें राज्याचा मालक यासच करावा असा त्यानें निश्चय केला.

इकडे **रणपाळाचा** बाप **जयपाळ** व त्याचे तिघे पुत्र यांनीं खर्च कमी करण्याकरितां कांहीं लश्कर कमी करून प्रजेवर नाना प्र-

कारचे कर बसविले, व बराच पैसा जमा केला. तेणेंकरून प्रजा बेदील झाली. लश्करी लोकांचा पगार बरोबर पोंचेना, तेव्हां जुने जुने शूर शिपाई नाउमेद होऊन, राजास सोडून देशांतरीं जाऊं लागले. अशी सर्व अव्यवस्था चाराच्या तोंडानें श्रवण करून, व **रणपाळ** द्वीपांतरास गेल्यामुळें त्याची धास्ती बिलकुल नाहीं असा विचार करून, **धारानगरचा** राजा सोमदत्त, यानें प्रतिवर्षाप्रमाणें खंडणी न देतां, मोठें लश्कर जमा केलें व **विजयनगरास** वेढा घातला. त्याबेळीं **जयपाळानें** आपल्या **धनपाळादिक** तीन पुत्रांस शत्रूवर चाल करून जाण्यास आज्ञा केली. पण तें अशा प्रसंगीं उपयोगास पडणारें युद्धकौशल त्या तिघांपैकीं एकासही नव्हतें. तेव्हां अर्थात् शत्रूनें शहर उद्वस्त करून टाकलें व एका मध्यरात्रीस घाला घालून राजवाडाही काबीज केला. त्याविळेस शत्रूंपासून होणारी पुढची विटंबना टाळण्यासाठीं ही अंधेर रात्र फार चांगला समय होय, असा विचार करून त्या चौघांनीं बायकांसहवर्तमान राजवाड्यांतून गुपचूप पलायन केलें; व पुढें आपणास कोणीही ओळखूं नये, या उद्देशानें काबाड्याचा वेष घेऊन ते रानमार्गानें चालते झाले. दिवसास अरण्यांत छपून राहून रात्रीं मार्गक्रमण करावें अशा रीतीनें कांहीं दिवसांनीं तीं सर्व आपल्या राज्याच्या हद्दीच्या बाहेर आलीं इतक्यांत भिल्लानीं त्यांस गांठून स्त्रियांच्या आंगावरील अलंकार व पुरुषांच्या हातांतील आंगठ्या वगैरे सर्वस्व लुटून नेलें. एक पैसाही निर्वाहास जवळ राहिला नाहीं तेव्हां त्यांनीं असा विचार केला कीं हें परराज्य आहे त्यापक्षीं आपणास कोणी ओळखून काढील, अशी विनाकारण धास्ती बाळगण्याचें कांहीं काम नाहीं. यासाठीं आपण रानांतून मोळ्या आणून विकाव्या व उदरपोषण करून प्राण वांचवावे. दुसरा मार्ग प्रस्तुत दिसत नाहीं. हर हर! काय ही प्राक्तनाची गति ! ज्या राजाचे जवळ हजारों लोक जी जी म्हणत उभे रहात असत त्याच राजानें आपलें वीतभर पोट भरण्यासाठीं लांकडाची मोळी आतां आपल्या माथ्यावर वहावी काय? पण दैवाच्या लीलेपुढें तो कोणाचा इलाज चालणार? राजाचा रंक व रंकाचा राजा हेंच करितें; अर्थात् दैवाची गति गहन होय. असो. उगीच भित्र्याप्रमाणें प्राणत्यागाचा व्यवसाय न करितां, त्यांनीं जी स्थिति प्राप्त झाली तींत यथाशक्ति राहण्याचा बेत केला त्यावरून त्यांचें लोकोत्तर धैर्य आपल्या ध्यानांत येतें.

नंतर आपल्या निश्चयानुरूप रात्रीं अरण्यांत जाऊन लांकडें तोडून आणावीं; त्यांच्या मोळ्या बांधून त्या सकाळीं विकाव्या व जे पैसे येतील त्यांजवर दिनचर्या चालवून भोजनोत्तर दुसऱ्या गांवीं प्रयाण करावें, याप्रमाणें करीत करीत कांहीं दिवसांनीं तें कुटुंब मद्रावतीस येऊन पोंचलें. तेथें शहराबाहेर एक कुंभाराची शाळा होती तेथें रात्रीं तीं सर्व वसतीस रहात व दिवसास शहरांत काबाड वाहून आपला निर्वाह करीत. असें असतां, एके दिवशीं **रणपाळ** भोजन करून वाड्याच्या गच्चीवर आंचवायास बसला आहे व **सुंदरी** हातावर पाणी घालीत आहे, इतक्यांत त्याची दृष्टि अकस्मात् वाड्यावरील चवाठ्यावर गेली. तेथें आपले मायबाप व भाऊ भावजया हीं सर्व कंगाल वेषानें काबाड विकीत बसलीं आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां

अकस्मात् त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. तसाच रंगमहालांत गेला व अश्रु पुसून **सुंदरी** रोजच्याप्रमाणें येण्याच्या अगोदरच कचेरीस चालता झाला. हें सर्व **रणपाळाचें** आचरण पाहून **सुंदरी** मनांत फार खिन्न झाली व पुढें काय करावें हें तिला कांहीं समजेना. तों इतक्यांत तिला अशी एक युक्ति सुचली कीं जेथें आपल्या प्रिय पतीच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें तेथेंच जाऊन नीट निरेखून तर एकदा पहावें; मग कांहीं ध्यानांत आलें तर बरेंच झालें. असा विचार करून जेथें **रणपाळ** आंचवीत होता तेथें जाऊन उभी राहिली व समोरती नीट निरेखून पाहूं लागली. त्या वेळीं चार बायका व चार पुरुष मिळून काबाड कष्टीत बसलीं आहेत असें मात्र तिच्या दृष्टीस पडलें. तेव्हां यांचा व आपल्या प्राणप्रिय पतीचा कांहीं तरी संबंध असावा असें तिनें लागलेंच ताडलें, व दासीस "त्या आठांस येथें बोलावून आण" असें **सुंदरीनें** सांगितलें. तिनें तीं सर्व बसलीं होतीं तेथें जाऊन त्यांस "तुह्मांस **सुंदरी** बाईसाहेब बोलावीत आहेत" असें सांगितलें. तें ऐकून तीं आठजणें **सुंदरीच्या** महालांत आलीं. **सुंदरीनें** त्यांस बसावयास देऊन नांव गांव विचारिलें. तेव्हां **जयपाळ** ह्मणाला कीं, "सांप्रत आह्मीं दुर्दैवाच्या कचाट्यांत सांपडलों आहों, याजकरितां नांव गांव सांगून फळ काय ! सध्या काबाडी आहों, हें खरें." **सुंदरी** ह्मणाली, "बाबानो, क्षमा करा, आणि आपलें सगळें वृत्त ऐकण्याची माझी इच्छा आहे, ती मेहेरबानी करून आपण पूर्ण करा. माझ्या हातानें आपले क्लेश होतील तितके दूर करण्यास मी प्रयत्न करीन." हें ऐकून **जयपाळ** उच्छ्वास टाकून रडूं लागला आणि ह्मणाला, "बाई, माझा **रणपाळ** या नांवाचा मोठा शूर व धर्मात्मा पुत्र होता तो प्रत्यहीं पांचशें रुपये धर्म केल्याशिवाय भोजन करीत नसे. त्याचें व त्याच्या तिघां बंधूंचें वांकडें पडल्यामुळें त्यानें देशत्याग केला. त्या दिवसापासून आह्मीं हे असे क्लेश भोगीत आहों. तो कोठें आहे तें परमेश्वरास ठाऊक." हें ऐकून, **जयपाळाची** व त्याच्या बायकोची **रणपाळासारखी** ठेवण तिच्या ध्यानांत आली आणि लागलीच ह्मणाली कीं "आज आपण सर्वांनीं कृपाकरून येथें भोजन करावें. ईश्वरकृपेनें लौकरच आपण क्लेशमुक्त व्हाल." हें तिचें सत्कार आणि आश्वासन या दोहोंनीं भरलेलें भाषण ऐकून **जयपाळानें** रुकार दिला. नंतर **सुंदरीनें** स्वयंपाक्यास सांगून जेवणाची तयारी करविली; व वाड्याचे एक्या सोप्यांत त्यांस जेवायास घालवून, थकलेलीं असल्यामुळें तेथेंच थोडावेळ पडण्यास सांगितलें.

रात्रीं **रणपाळ** कचेरींतील सर्व राज्यकारभार आटोपून महालांत आला; व भोजन करून नित्याप्रमाणें झोपाळ्यावर बसला आहे, व **सुंदरीनें** पुढें केलेला विडा घेत घेत कांहीं विनोदाचें भाषण करीत आहे, इतक्यांत **सुंदरी** ह्मणाली कीं आपलें पूर्व वृत्त आपण मला सांगावें. तें ऐकण्याची मला फार उत्कंठा आहे. **रणपाळ** आपल्या भाषणाकडेस दुर्लक्ष करून, दुसरें कांहीं बोलूं पहात आहे, असें पाहून तिनें फारच आग्रह केला. तेव्हां **रणपाळाच्यानें** ना ह्मणवेना. नंतर आपलें वृत्त मुळापासून सांगण्यास आरंभ केला. जो जो मजकूर तो सांगे तो तो सर्व **जयपाळानें** सांगितलेल्या मजकुराशीं अगदीं मिळे. सरते शेवट **रणपाळ** ह्मणाला कीं तीं

माझीं दुर्दैवी आईबापें व भाऊ भावजया चवाठ्यावर काबाड वहात आहेत असें पाहून आज सकाळीं माझ्या डोळ्यांतून बरेंच पाणी आलें. याप्रमाणें सांगतो आहे, इतक्यांत **सुंदरीनें दासी** पाठवून तें सर्व कुटुंब आणविलें. **रणपाळाची** व त्यांची नजरानजर होतांच परस्परांचे कंठ सद्गदित होऊन गेले. **रणपाळानें** सर्वांचे पायांवर डोकी ठेविली. नंतर वृत्त पुसल्यामुळें, त्यांनीं **सोमदत्तानें** आपलें राज्य हरण करून आपणास कसें परागंदा केलें तें सर्व सविस्तर सांगितलें. तें श्रवण करितांच, **रणपाळानें** आपल्या सासऱ्याचें अनुमत घेऊन, मोठें सैन्य तयार करून बाप व बंधु यांस बरोबर घेऊन, **विजयनगरावर** स्वारी केली. **रणपाळानें** तंबू नगराबाहेर ठोकिले हें ऐकतांच भयाभीत होऊन मोठी खंडणी देण्यास कबूल होऊन, विनहत्यार **सोमदत्त रणपाळाचे** भेटीस आला, व **विजयनगराचें राज्य जयपाळाच्या** स्वाधीन करून, क्षमा मागून **सोमदत्त धारानगरास** परत गेला. नंतर पाठीमागचें कांहीं एक मनांत न आणतां आपल्या भावांचेही त्यानें सर्व अधिकार कायम केले व नीतीनें चालण्याविषयीं सदुपदेश करून, आपण **मद्रावतीस** परत आला. तेथें आपण वयोवृद्ध झालों असें पाहून **मद्रेश्वरानें रणपाळास** राज्याभिषेक केला, व आपण अरण्यांत तप तपून राहिलेलें आयुष्य योगानें घालविण्यासाठीं गमन केलें.

हर्षचरित.

(पुढें चालू.)

सकाळींच वृद्ध झालेल्या कोंबड्याच्या शिखेप्रमाणें लाल असा उदयाचलाचा चूडामणि आपला प्रकाश पृथ्वीवर पाडूं लागला न लागला इतक्यांत **पितामहाच्या** वाहनभूत हंसांमध्यें सर्वांत वडील हंस जवळच-मौजेनें फिरत होता त्यानें मोठ्यानें खालीं लिहिलेलें अपरवक्त्र[२] झटलें.

तरलयसि दृशं किमुत्सुका-
मकलुषमानसवासलालिते
अवतर कलहंसि वापिकां
पुनरपि यास्यसि पंकजालयम्[३]

हें अपरवक्त्र कानीं पडतांच **सरस्वती** असा विचार करूं लागली कीं, जणूं काय हा वृद्ध हंस मलाच लावून बोलला. तर चला आपण याच्या वचनाचा मान करूं." असा विचार करून लागलीच उठली व पृथ्वीतलावर अवतार घ्णून खास घ्यावयाचाच असा संकल्प करून, प्रवासाचें श्रवण होतांच आतुर झालेल्या बंधुजनांचें यथाशक्ति सरस्वतीनें सांत्वन केलें, व **ब्रह्मदेवास** तीन प्रदक्षिणा घातल्या; व आग्रहानें बरोबर येणाऱ्या परिजनांस विनयपूर्वक तिनें परत जाण्यास सां-

१—हंस हे ब्रह्मदेवाचें वाहन. ही कथा पुराणांत प्रसिद्ध आहे.

२—हें एका जातीचें वृत्त आहे. याचें लक्षण पहिल्या व तिसऱ्या चरणांत दोन "न" गण, एक "र" गण, एक लघु, व एक गुरु. दुसऱ्या व चवथ्या चरणांत एक "न" गण, दोन "ज" गण, एक "र" गण.

३—"तरलयसि"—चंचल करितेस. "दृशं" दृष्टीस. "किं"—कां. "उत्सुकां"—उत्सुक अशा. "अकलुषमानसवासलालिते"—हे निर्मल मानस सरोवरामध्यें वास करणाऱ्ये. "अवतर"—उतर. "कलहंसि"—हे कलहंसि. "वापिकां"—वापिकेंत. "पुनरपि"—पुनः. "यास्यसि"—जाशील. "पंकजालयं"—चांगल्या कमलांच्या स्थानास, अर्थात मानस सरोवरास.

गितलें. नंतर **सावित्रीस** बरोबर घेऊन **ब्रह्मलोकांतून** बाहेर पडली. ती हळूहळू खालून मंद मंद जाणाऱ्या सफेत ढगांच्या योगानें मनांचें आकर्षण करणारी; **सदाशिवाच्या** मस्तकावर मालतीच्या फुलांच्या माळेप्रमाणें मनोरम दिसणारी; किनाऱ्यावर **वालखिल्यांची** अगदीं गर्दी होऊन गेली आहे; **अरुंधती** एके बाजूस वल्कलें धूत आहे; उचंबळणाऱ्या मोठ्या लाटांच्या योगानें नक्षत्रांस कंपित करून टाकणारी; अनेक तापसांनीं दिलेल्या तिलोदकानें पुलिनें पुलकित झालीं आहेत; जिचें पैल तीर, स्नान करून, शुचिर्भूत होऊन, ब्रह्मदेवानें दिलेल्या पितृपिंडानें धवल झालें आहे; स्नानासाठीं आलेल्या अनेक देवांगनांच्या कुचकलशांनीं रुद्ध केल्यामुळें पाणी खळखळ वाजत आहे; ग्रहरूपी दगड मध्यें येऊन गतीस अडथळा करूं लागल्यामुळें त्यांच्यावर मोठ्या निकरानें स्वारी करून गर्जनेनें दाही दिशा भरून टाकिल्या आहेत; अशी जी **आकाशगंगा** तिच्या तीरावरून पृथ्वीलोकावर उतरली. आकाशांत स्थित असतांच निर्मळ, गार, व गोड अशा पाण्यानें अगदीं भरून गेलेला **हिरण्यबाहु** या नांवाचा एक नद[1] तिच्या दृष्टीस पडला. त्यासच लोक **शोण**[2] असें ह्मणतात. त्या नदाची ती तशी अप्रतिम शोभा पाहून, त्याच्याच तीरावर वास करण्याचा तिनें निश्चय केला; व **सावित्रीस** ह्मणाली कीं, "सखि, हे पहा मयूर, मदमत्त होऊन कसा मधुर शब्द येथें करिताहेत; हीं पहा अनेक सुंदर व सुवासिक फुलें, येथें तीरावर पुष्कळच पडलीं आहेत; ते पहा भ्रमर, पुष्पासवानें मत्त होऊन घों घों नाद करिताहेत. या सर्व शोभेपुढें **आकाशगंगेची** शोभा अगदींच तुच्छ असें मला वाटतें. यासाठीं येथेंच आपण वास करावा हें बरें." तें **सावित्रीनेंही सरस्वतीचें** ह्मणणें कबूल केलें.

नंतर **सरस्वती** पश्चिमेकडील किनाऱ्यावर उतरली. अनेक शिलातलांनीं सुशोभित व हवाशीर अशी एक वृक्षांची राई तेथें दिसली तेथेंच तिनें रहाण्याचा बेत केला. थोडावेळ विसांवा घेऊन लागलीच उठली; व **सावित्रीस** बरोबर घेऊन देवतार्चनासाठीं फुलें तोडण्यास निघाली. फुलें आणून **सरस्वतीनें** लागलेंच स्नान केलें. नंतर पुलिनावर बाळूचें लिंग करून ध्यानपुरःसर त्याची षोडशोपचारांनीं पूजा केली; व तत्प्रीत्यर्थ थोडेसें गायन केलें. मग फळें व मुळें भक्षण करून, अमृताहूनही मधुर असें **शोणनदाचें** पाणी प्राशन केलें. दिवसाचा अस्त होतांच संध्यादिक कर्में करून त्याच राईमध्यें एका शिलातलावर शयन केलें. याप्रमाणें तिनें तेथें बरेच दिवस घालविले.

एकेदिवशीं सूर्य सुमारें दोन अडीच हात वर आला आहे, अशासमयीं उत्तर दिशेकडून घोड्यांचें खिंकाळणें **सरस्वतीच्या** कानीं पडलें; व मोठ्या कौतुकानें आपल्या राईच्या बाहेर पडून आसमंतात् पाहूं लागली तेव्हां केतकीच्या धुळीप्रमाणें धवल अशी धूळ सुमारें चार पांच हांकेच्या अंतरावर

१—आकाशात रात्रीं एक मोठा पांढरा लांब पट्टा दिसतो तो. ती नदी आहे, अशी पुराणांत प्रसिद्धि आहे. तीस मंदाकिनी ह्मणतात. तीच पृथ्वीवर भागीरथीरूपानें आली आहे. पाताळांत तीसच भोगावती ह्मणतात. सारांश मंदाकिनी, भागीरथी, भोगावती, ह्या मिळून एक नदी अशी पौराणिक प्रसिद्धि आहे.

२—हिंदुस्थानाच्या नकाशांत "सोननदी" ह्मणून जो लहान फाटा गंगा नदीस दक्षिणेकडून मिळतो तो हाच.

उडत आहे असें तिच्या दृष्टोत्पत्तीस आलें. थोड्याच पळांनीं ती सर्व धूळ अगदीं जवळ जवळ येऊं लागली. ती जसजशी जवळ येऊं लागली तसतशी, लोंबणाऱ्या लांब केसांचा कपाळावर जटाजूट बांधला आहे, कानांत हस्तिदंताचे बारीक नकशीदार अलंकार घातले आहेत, तांबडा पोशाक कृष्णागराच्या लेपाचे डाग पडल्यामुळें क्वचित् काळा दिसत आहे, आंगवस्त्रें डोक्यावरून घट्ट बांधून घेतलीं आहेत, डाव्या हातांत सोन्याचीं कडीं शोभत आहेत, कच्चारी पट्ट्यामध्यें अगदीं गाढ खोवून टाकिल्या आहेत, सतत व्यायामामुळें शरीर अगदीं दगडासारिखें दृढ होऊन गेलें आहे, तशा डोंगराळ प्रदेशांतही हरिणाप्रमाणें मोठ्या वेगानें अस्खलित गतीनें चालत आहेत, एक्या हातांत नागव्या तरवारी धारण केल्या आहेत, नजर करण्यासाठीं दुसऱ्या हातांत कांहीं फळेंही घेतलेलीं दिसत आहेत, दूर व्हा, दूर व्हा, रस्ता सोडा, असें मोठ्यानें ओरडत आहेत, अशा थाटानें पुढें चालणारे एक हजार लश्करी शिपाई व त्यांच्या पाठीमागून दोडणारे असंख्यात घोडे, **सरस्वतीस** व्यक्त करून देऊं लागलीं. या अशा राजोचित परिवाराच्या मध्यभागीं, अनेक रत्नखंडांनीं खचित, बाजूस लोंबणाऱ्या मुक्ताफळांच्या घोसांनीं सुशोभित, दुधाच्या फेसाच्या पिंडाप्रमाणें अगदीं श्वेत, असें छत्र ज्याचेवर धारण केलें आहे; ज्याचे अलंकार सूर्याचे किरण वर पडल्यामुळें दुप्पट चकाकत आहेत; ज्याची पायांपर्यंत लोंबणारी मालती पुष्पांची माळा, भुवनाच्या विजयानें मिळविलेली पताकाच कीं काय अशी शोभत आहे; मार्गांतील लागलेल्या धूळीचें मार्जन करण्यासाठीं अदृश्य वनदेवतांनीं हे पल्लवच धारण केले आहेत कीं काय, असे ज्याच्या केशकलापांतील चूडामणीभूत पद्मरागमणीचे कपोलावर पसरणारे किरणांकुर भासत आहेत; केसांवर बकुळीच्या फुलांच्या माळांचें राज्य असल्यामुळें ज्याच्या सभोवतीं भ्रमरांनीं वेढा घातला आहे. मनःशिलाचा टिळा लावल्यामुळें ज्याचें अष्टमीच्या चंद्राप्रमाणें सुंदर असें ललाटपट्ट अत्यंत मनोरम दिसत आहे; भरज्वानींत असल्यामुळें सकल त्रिभुवनाचा तिरस्कारच करिये कीं काय, अशी ज्याची प्रगल्भ दृष्टि भासत आहे; ललाटपट्टावरील लावण्याचा हा कांतिप्रवाहच चालला आहे कीं काय, असा ज्याचा नासावंश शोभत आहे; कापूर, कंकोळ, कस्तूरी, केशर, लवंग, इत्यादि सुवासिक द्रव्यांनीं युक्त असें तांबूल चघळीत असल्यामुळें ज्याच्या मुखपरिमलानें दाही दिशा सुवासित करून टाकिल्या आहेत; मित्रांबरोबर विनोद करीत असल्यामुळें ज्याच्या हास्यानें, हा ज्योत्स्नेचाच प्रकाश पडला कीं काय, असा इतर सैनिकांच्या मनांत भ्रम उत्पन्न केला आहे; पाचेवर चढविलेल्या मोत्यांच्या जोडीनें ज्याचें कर्णयुगल दूर्वांनी व कुंदानींच सनाथ झालें कीं काय, असें शोभत आहे; कस्तूरीच्या पंकानें दोन मकर काढल्यामुळें हें मदनाचें केतुद्वयच कीं काय, असें ज्याचें बाहुयुगल भासत आहे; गंगेच्या प्रवाहाप्रमाणें धवल अशा ब्रह्मसूत्रानें ज्याचा देह अलंकृत केला आहे; कापराची बुक्की लावल्यामुळें भावि कांतेच्या स्तनरूपी चक्रवाकयुगलाचें हें पुलिनच कीं काय, असें ज्याचें वक्षःस्थल शोभत आहे; असा एक तरुण पुरुष जवळ जवळ अठरा वर्षांचा एका सुंदर काळ्या घोड्यावर बसलेला तिच्या

दृष्टीस पडला. त्याचे दोन परिचारक त्याच्या बरोबरच आपले घोडे चालवून त्याच्यावर चामरें ढाळीत होते; व हा तरुण पुरुष तर अग्रभागीं गाणाऱ्या बंदिजनांचे स्तुतिपाठ ऐकण्यांत अगदीं मग्न होऊन गेला होता. त्याच्या बाजूस तापलेल्या सोन्याप्रमाणें गौरवर्ण; केस पिकून पांढरे झाले असतांही नित्य व्यायाम असल्यामुळें लोखंडासारिखें दृढ शरीर धारण करणारा; उंच बांध्याचा, नखें कापून टाकलेलीं, डोक्यावर टकल पडलेलें, पोट थोडें थोडें सुटत चाललें आहे, वक्षःस्थलावर केसांचा सुकाळ, साधा पोशाक केलेला, सफेत फेटा बांधलेला, असा एक प्रशांत व गंभीर गृहस्थ आपला घोडा चालवीत होता. पुढें जाऊन विस्मित होऊन परत आलेल्या लोकांच्या तोंडून दोन दिव्य कन्यका उभ्या आहेत असें ऐकून, त्यांनीं दाखविलेल्या दिशेसच त्या तरुण पुरुषानें आपला घोडा पिटाळिला. दिव्य कन्यकांस पहातांच घोड्यावरून उतरला; व आपल्या बाजूनें असणाऱ्या वर वर्णिलेल्या वृद्ध पुरुषास मात्र बरोबर घेऊन, आपल्या परिजनांस बरोबर न येण्याविषयीं सक्त ताकिदी देऊन पायानींच त्यांच्या जवळ गेला.

(पुढें चालेल.)

ठगाची जवानी.

खंड ६. (पुढें चालू.)

आह्मीं मंगळूरास जाऊन पोहोंचलों. तें शहर मोठें आहे. तेथें मुसलमान लोकांची वस्ती पुष्कळ. मिरहयात कालंदर ह्मणून फार पुरातन पीर आहे; त्याचा तेथें दर्गा असल्यामुळें त्या शहराची मोठी प्रसिद्धि आहे. त्या पिरावर विशेषेंकरून पुष्कळ लोकांचा मोठा भाव असल्यामुळें आमचे हेतु सफळ होऊन हातीं घेतलेल्या कामांत यश प्राप्त व्हावें एतन्निमित्त आह्मीं तेथें जाऊन प्रार्थना करावी, हें उचित, असें मंडळींत सर्वानुमतें ठरलें. त्याप्रमाणें माझा बाप, मी, हुसेन व दुसरे किलेकजण मुसलमान मिळून दर्ग्यापाशीं गेलों. तेथें जे मुल्ला होते त्यांहीं सांगितल्याप्रमाणें सर्व विधि यथासांग करून नंतर त्यांजपैकीं दोघांबरोबर आह्मीं गोष्टी सांगत बसलों. इतक्यांत माझ्या बापानें हुसेनास कांहीं इशारा केला, तो त्या दोघांनीं ओळखला. त्यावरून तेही ठग होते असें आह्मांस समजलें. म्यां ह्मटलें, "हा काय विलक्षण चमत्कार. अहो हे आमच्या धर्माचे मोठे पवित्र आचार्य ना! आणि हेही आह्मांप्रमाणेंच ठग! फारच आश्चर्य खचीत!" पण आणखी कांहीं वेळ त्यांच्या बरोबर भाषण केल्यानंतर ते कोणी यःकश्चित् मनुष्य असल्याबद्दल माझ्या बापाचा ग्रह झाला असें माझ्या लक्षांत आलें.

तेथून उठून पायऱ्या उतरून आह्मीं पुढल्या अंगणांत आमची मंडळी होती तेथें येऊं लागलों. तेव्हां माझा बाप हुसेनास ह्मणाला, "हे गुलाम ठग असतीलसें वाटत नाहीं. पण न जाणों. ह्यांनां ओळख देऊं नका ह्मणून आपल्या मंडळीस सूचना करून ठेवावी हें बरें. अजूनपर्यंत आपल्याविषयीं त्यांच्या मनांत कांहीं आलें असेलसें वाटत नाहीं; पण आपल्यावरोबर कोण लोक आहेत तें त्यांस समजलें तर कदाचित् ते कांहीं अधिक उण्या कल्पना बांधतील."

हुसेन ह्मणाला, "आपण ह्मणतां तें खरें.

आपल्या बरोबर कोण कोण आहेत त्यांचा ह्यांला पत्ता लागूं देऊं नका. ह्मणून आपल्या मंडळीस सांगून ठेविलें असतां बरें पडेल." त्याप्रमाणें सर्वांस सूचना करून ठेविली. तशी सूचना वेळींच केली हें नीट झालें; कारण परिणामीं आह्मांस असें समजून आलें कीं ते दोघे मुलना आह्मांविषयीं मोठ्या बारकाईनें सुराख लावीत होते. आह्मीं कांहीं हेतुशिवाय इतक्या लांबीच्या पल्यावरून येऊन पुढें आणखी प्रवास करीत फिरणार, हें ऐकून तर त्यांजला मोठाच अचंबा वाटला होता. आह्मीं आपला उद्देश जर त्यांस कळविला असता, अगर त्यांजपाशीं कोणत्याही प्रकारची मदत मागितली असती तर निःसंशय त्यांहीं गांवच्या अधिकाऱ्यापाशीं जाऊन खबर दिली असती, आणि आह्मांस पकडविलें असतें. किंवा जर तसें न करिते तर निदान आमच्या लुटीपैकीं ते खास भारी अंश मागते व तो नाहीं ह्मणण्याचा आमचा मुळींच उपाय चालताना, आणि तेणेंकरून आह्माला बहुतेक मुळींच टाळा बसता.

नमाज आटोपल्यानंतर पुनः आह्मीं आपल्या बिऱ्हाडीं गेलों; तों तेथें त्या सावकाराचा एक माणूस आमची वाट पहात बसला होता. तो ह्मणाला, "एव्हांशींच शेटजीचा गांवाबाहेर आपल्या गोठांत येण्याचा विचार नाहीं. ज्या मित्राकडे ते उतरले आहेत त्याच्या घरीं आज सायंकाळपर्यंत ते राहणार आहेत. पण त्यांनीं एक पहारा आपल्या बराबर राहण्याकरितां पाठविण्यास सांगितलें आहे. कारण रात्रीं लवकरच जेवण खाण उरकून निघण्याचा त्यांचा बेत आहे. मार्गांत वासीम ह्मणून एक मोठा गांव आहे, तेथें शेटजींचा दुसरा एक स्नेही राहतो त्याजला जातां जातां भेटण्याचा त्यांहीं निश्चय केला आहे. आणि तो पल्ला बराच लांबीचा आहे, याजकरितां अमळ लवकरच निघालें पाहिजे; ह्मणजे अर्ध्या वाटेवर एक गांव आहे तेथें क्षणभर उतरून फराळ विराळ करून पुढें जाण्यास ठीक पडेल." आमच्यांतून कोणी गांवांत गेल्यास कदाचित् गांवांत कोणी ठग असेल तर त्यास ओळखतील अशी शंका मनांत आल्यामुळें कोणास गांवांत पाठविण्याचा विचार माझ्या बापाच्या मनांत येईना. परंतु नाहीं ह्मणून इलाज नाहीं; ह्मणून त्या सावकाराची आज्ञा मान्य करणें भाग पडलें. पण माझ्या बापानें एक युक्ति काढली. ज्यास पाठवावयाचें होतें त्यास चांगला काळोख पडल्यावर पाठविलें ह्मणजे त्याजला कोणीं सहसा ओळखण्याची भीति नाहीं, असें मनांत आणून बरीच रात्र झाल्यानंतर त्यांस रवाना केलें. त्याच संधीस पुढें खडें आणून ठेवण्याकरितां जाणाऱ्या मंडळीनें झटकन् आपली निघण्याची तयारी करून चवदा असामी व मार्गे सांगितलेले त्या ठिकाणाची माहिती सांगणारे दोघेजण मिळून पुढें चालू झाले. त्या संपूर्ण प्रदेशाची दोघांसही पुरापुरी माहिती असून तें कृत्य उरकण्याला सर्वोत्कृष्ट स्थळ तेथें असल्याविषयीं ते खात्रीनें सांगत; त्यांच्या सांगण्यांत ज्या टेकड्या ह्मणून होत्या त्या शुद्ध जमिनींतून उतर चढ होऊन मधून मधून दरी पडलेल्या असल्यानें तशा दिसत होत्या. ते ह्मणाले, "आमच्या आठवणींत फरक पडला नसल्यास आह्मांस पक्कें स्मरतें कीं ह्या प्रदेशांत सर्व रस्ता खड्याळ असून वाटेंत लहान लहान नाले पुष्कळच आहेत व बहुतेक

नद्यांच्या किनाऱ्यांवरून खुरटीं झाडें एकसारखीं फार दाट लागलेलीं आहेत. त्यांतून ज्या एकाद्या ओढ्यांत पाणीं नसेल त्यांत भील बनवावी" त्यांस जातेवेळीं भील तयार होतांच खबर देण्याकरितां कांहीं माणसें पाठवून द्यावीं ह्मणजे ज्याची तो आपापली जागा धरून इशारा होतांच झटदिशीं उडून पडेल असेंही सांगून ठेविलें होतें.

तो सावकार खुद्द माझा बळी असल्याबद्दल मंडळींत सर्वांस ठाऊक झालें होतें; ह्यामुळें त्या माझ्या पहिल्या प्रसंगाविषयीं माझ्या मनांत काय काय विचार घोळत होते ते पाहण्याकरितां माझ्या भोंवतालीं नेहमीं पुष्कळ गर्दी होई; माझ्या मनांत उत्साह जागृत व्हावा ह्मणून सारेजण मला हुशारीच्या गोष्टी सांगत व तेणेंकरून माझ्या जिवाला पुष्कळ भरंवसा आला. खचीत हें मला कबूल केलें पाहिजे, कीं जसजसा वेळ जवळ जवळ येऊं लागला तसतशी अधिकाधिक माझ्या जिवाची तळमळ होऊं लागली. जसा एकादा ज्वान शिपाई लढण्याचा प्रथम प्रसंग आला असतां समरंगणांत आपली तलवार उपसण्यास अत्यंत उतावीळ होऊन जातो त्याप्रमाणें माझी अवस्था झाली पहा. माझी ती मुद्रा पाहून माझ्या बापाच्या जिवाला अंतर्यामीं मोठें समाधान झालें. तो तोंडानें कांहींएक बोलला नाहीं; पण जेव्हां त्यानें मोठ्या प्रीतीनें मजकडे पाहिलें तेव्हां तो अंतर्गत आनंद त्याच्या मुखचर्येवर स्पष्ट दिसत होता. तें पाहून आतां आपण ह्याची निराशा करूं नये असें माझें मलाच वाटूं लागलें. हा प्रसंग कांहीं विशेष महत्वाचा आहे असें सर्व मंडळीस वाटलें होतें, असें त्यांच्या कृतीवरून भासूं लागलें; कारण जरीं कोणाची योजना कोणत्या कामीं आहे हें एकूण एकास पक्कें माहीत होतें तरी ते सर्व एकत्र जमून पुष्कळ रात्रपर्यंत विचार व मसलती करीत बसले होते. तथापि ही शेवटीं हातघाईचा समय येऊन बेतण्यापूर्वी थोडीबहुत विश्रांति घ्यावी ह्मणून एकामागून एक उठून गेले. माझा बाप, हुसेन, वगैरे सर्व जाऊन निजले. मी एकटा मात्र गेलों नाहीं. आमचा लहानसा डेरा होता त्याच्या बाहेरच्या बाजूस मीं बसून राहिलों होतों. इतक्यांत रूपासिंग मजपाशीं आला.

तो जवळ येऊन बसला आणि ह्मणाला, "बाबा, कसें काय ? तुझें चित्त स्वस्थ आहे ना ? तुझ्या मनाला भय तर नाहीं ना वाटूं लागलें? नाडी थंड वाहत आहे ना ?"

म्यां उत्तर दिलें, "कांहीं नाहीं, सर्व यथास्थित आहे. आतां माझ्या मनाचा कधींही बदल होणार नाहीं. पाहिजे तर पहा माझी नाडी काय तीव्र चालते ती."

ह्मातारा माझा हात पाहून ह्मणाला, "नाडी ठीक आहे. चांगली थंड चालली आहे. चंचलता किंचित्ही नाहीं. असेंच पाहिजे. पहिल्या प्रसंगासाठीं तयारी करतानां आजपर्यंत म्यां पुष्कळांनां पाहिलें, परंतु तुझ्यासारखी शांत वृत्ति हा वेळपर्यंत कोणाचीच माझ्या दृष्टीस पडली नाहीं. परंतु हें कशाचें फळ ? विधिपूर्वक जे तुझे म्यां अनेक संस्कार केले त्यांचा, व माझ्या मंत्रांचा हा सारा प्रभाव होय, समजलास?"

म्यां ह्मटलें, "असेल, पण त्या मंत्रतंत्रांखेरीज देखील माझी स्थिति अशीच असती."

(पुढें चालेल.)

पतिविरहशोक.

" संसारविषवृक्षस्य द्वे एव रसवत्फले ।
काव्यामृतरसास्वादः संगमः सुजनैः सह ॥ "

(शिखरिणी)

असे अद्रिप्रांतीं उपवन अहो ! एक बरवें
सदा जेथें वाटे, रुचिर हृदया, रान हिरवें ! ।
सदा पक्ष्यांच्या त्या अति मधुरशा सुंदर रवें
घडे, तो चित्ताला रुचिर, नच आनंद वदवे ॥ १ ॥

नसे पर्जन्याची गरज तरुला काय गमतें !
विणें त्याच्या येती सुभग फुलपुष्पादि भरते ।
समस्त प्राणी त्या गिरिविरिल आल्हादित सदा
कशाची कोणाला जणुं न दिसली आपद कदा ! ॥ २॥

कुठें ते जाईचे सुखद अवघे वेल चढती
कुठें तीं मोग्यांचीं मधुन कुसुमें काय उठती ! ।
गुलाबाचीं पुष्पें बहुतविध सानंद हंसती !
तशीं कोठें हर्षें मृदु गुलछबूचींहि डुलती ॥ ३ ॥

पहा हे अंब्याचे सुतरु अति विस्तारित कसे
अरण्याच्या स्थानीं सुदृढ दिसती वीरच जसे ।
स्वबाहूंतें तेथें पसरुनि सुखें रक्षिति वना !
जणों शत्रू येतां उठुनि करिती ते तदवना ॥ ४ ॥

रवी होतां भारी प्रखर मनुजा ताप करितो
समस्त प्राण्यांतें मग जइं महात्रास घडतो ।
तदा ते फांद्यांनीं जणुं सकल जीवांस ह्मणती
" अहो ! छायेखालीं त्वरित अवघे या ! सुख
किती ! ॥ ५ ॥ "

अशीं मोठीं झाडें बहुत उपकारी असुनि तीं
हजारों वर्षांचीं परजनहितासाठिं झटती ।
वयानें जे मोठे, कृतिमधिं न खोटे नियम हा
मिळे वृद्धांतें या भुवनिं बहुधा सत्कृति महा ॥ ६ ॥

जुने होते कांहीं क्षितिस भिडले पादप दुजे
तयांचें हो वाटे नवल मज ऐका बहुत जें ।
तयाच्या देहांतें अतितरुण वल्ली कवळिती
प्रपंचीं या जैशा युवतिललना वृद्ध वरिती ॥ ७ ॥

तसे नाना पक्षी बहुत रमणीयाकृति पहा
तयांच्या रंगांनीं मन खुलुन जाई किति अहा ! ।
पिसारा डौलानें पसरुनि उभा दावि सकळां
कला नाचाच्या तो, भुवनिं असला मोर विरळा ॥ ८ ॥

तसा हा अंब्याच्या तरुवर सुखें कोकिल वसे
भरे आनंदानें अति मधुर पुष्पामृतरसें ।
तदा काढी वाचेमधुनि बहु, तो सुस्वर रवा
जणों त्या काळीं हा नच करि जगाचीहि परवा ॥ ९॥

कुठें राघू झाडीमधुनि हिरवे गार फिरती
तयांचेही कानीं सुखद अवघे शब्द पडती ।
न पर्णांच्या गर्दीतुनि कधिं मनुष्यांस दिसती
फळें कीं त्या चोंची रुचिर सगळ्या ताम्र गमती ॥ १० ॥

असो ऐसें रम्य स्थल बघुनि त्या सुंदर वनीं
सुखी दोघे प्राणी मनुज वसती हर्म्य करुनी ।
सदा आनंदें स्त्रीपुरुष तइं काला दवडिती
जगत्कर्त्याला ते विविध गुण गाऊन भजती ॥ ११ ॥

असे त्या दोघांचें हृदय अगुरागेंच भरलें
कधीं अन्योन्याच्या वर मन न रागेंच भरलें ।
अहा एकामेकांवर सुदृढ तच्चित्त बसलें
नसे देवें लोकीं द्वय बनविलें योग्य असलें ॥ १२ ॥

मुळीं चिंता ठावी कधिंहि नव्हती त्यांस सदनीं
उगें कांहीं तेथें कधिं न गमलें त्यां निजमनीं ।
फळें या जोड्यातें तरुजन जणो दान करिती
स्वशाखांनीं जेव्हां लवुनि फलभारें प्रणमती ॥ १३ ॥

असावें यक्षाचें द्वय गिरिवरी, तेंवि युग तें
अरण्याच्या ठायीं अनुभवित सत्सौख्य वसतें ।
स्वचातुर्यें केलें रुचिर गृह त्या सुंदर नरें
जयामाजीं सोई बहुतविध केल्या निजकरें ॥ १४ ॥

स्वभर्त्यालागीं ती मदत करुनी रम्य ललना
सदा पातिव्रत्या धरुनि करि संतुष्ट रमणा ।
अहा ! तीं सृष्टयांचीं प्रथम घडलेलीं वधुवरें
असें कर्णीं तुझ्ही परिसुनि सुखी व्हा बहु बरे ! ॥ १५ ॥

वसे त्या साध्वीला नर, पतिविणे अन्य विदित
असे चित्तवृत्ती सतत ह्मणुनी फार मुदित ।
जगाचा वाराही सतिवर न तो दुष्ट पडला
न या लोकींचा वा मळिण तिजला स्पर्श घडला ॥ १६ ॥

(पुढें चालेल.)

BOMBAY:—" NIRNAYASAGAR PRESS" KALKADEVEE ROAD.

जाहिरात.

एतद्देशीय कागद करणारास १०० रु० बक्षीस.

कोल्हापूर कलोपेजक मंडळीकडून,—रानडेच्याप्रमाणें बाळ गोविंद लोहार नागपूरकर यांणें उत्कृष्ट चाकू केला व त्यास मंडळीनीं ९० रु० बक्षीस दिलें. त्याचे दुपाती व एकपाती चाकू १२ व ६ आण्यांस विकतात. या चाकूंचा खप वाढवून त्यास उत्तेजन द्यावें अशी देशहितेच्छूंस मंडळीची विनंती आहे.

या सालीं उत्कृष्ट फुलिस्केप कागद करणारास १०० रु० चें बक्षीस देण्याचें योजिलें आहे. कागद चिंध्यांचे केलेले असून त्यांवर ज्या स्थळीं ते निर्माण होतील त्याचें नांव व वर्ष या खुणा, इंग्रजी कागदांवरच्या खुणांसारख्या दिसाव्या. एक रीम करण्यास सरासरीनें ९ मनुष्यांस २ या प्रमाणाहून ज्यास्त दिवस लागूं नयेत.

मंडळीकडे एक दस्ता पाठवून सोबत पत्र पाठवावें. त्यांत चिंध्यांचा बलख हातानें किंवा दुसऱ्या रीतीनें चालणाऱ्या यंत्रानें केला आहे, कागद गुळगुळीत कसे केले व याप्रमाणें प्रेची वगैरे दुसऱ्या तऱ्हेचे कागद करितां येतील कीं नाहीं, किती मनुष्यें, किती दिवसांत, किती रिमें करितात व दर रिमास काय किंमत बसते वगैरे माहिती लिहावी. याप्रमाणें मंडळी नेमतील त्यांसमक्ष एक दोन दस्ते करून दाखवावे लागतील, व लिहिलेल्या शर्तीप्रमाणें निदान २५ रिमें मंडळीस विकत देण्यास तयार असलें पाहिजे. सफाई, शुभ्रपणा, किंमत, टिकाऊपणा वगैरे गुणांत इंग्रजी कागदांशीं ज्यांचें साम्य ज्यास्त होईल व एकेक रीम करण्यास कमी दिवस लागून ज्यांची किंमत कमी बसेल ते कागद पसंत ठरून त्यांच्या कर्त्यास बक्षीस दिलें जाईल. परंतु बाजारांत इंग्रजी फुलिस्केप कागद मिळतात, त्यांहून गुणानें फार कमी व किंमतीस फार महाग असे कागद येतील, तर मंडळी ते बक्षिसाकरितां पसंत करणार नाहीं. पसंत झालेल्या कागदांचा खप पुष्कळ होईल, अशाविषयीं यत्न करण्यास मंडळी सिद्ध आहे. कागद खालीं सही करणाराकडे ता० १ जून सन १८७६ चे आंत यावे.

बाळाजी प्रभाकर मोडक.

सेक्रेटरी.

ता० २१ सप्टेंबर १८७५.

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रुपये ३.
सहामाही आगाऊ.....रुपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचें .....आणे ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत **पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी** व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाठपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

A MONTHLY MAGAZINE

OF

MARATHI LITERATURE

FOR

Ladies and Gentlemen.

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.

पुस्तक ७. अंक १२.

अनुक्रमणिका.

विषय.		पृष्ठ.
मनोरंजन—स्वयंवर.	.....	२२१
धौम महाबळेश्वरवर्णन.	.....	२२८
पुराण ग्रंथ.....	.....	२३७
पतिविरहशोक. (कविता)	.....	२३९

मुंबई.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

आणि

पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांणीं प्रसिद्ध केला.

पांच.

पुस्तक वगैरे.

शोधक.— या नांवाचें मासिक पुस्तक कानडी भाषेंत या महिन्यापासून धारवाड येथें शिलायंत्रावर छापून निघूं लागलें आहे. कर्त्यानें या पुस्तकाचा पहिला अंक आमच्याकडेस पाठविल्याबद्दल त्याचे फार आभारी आहों. यामध्यें शिलालेख, प्राचीन इतिहास, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, ज्योतिष, वैद्यक, कलाकौशल्य, कायदे वगैरे विषय छापण्याचा, पुस्तककर्त्यानें कर्तव्य पत्रकामध्यें आपला उद्देश प्रसिद्ध केला आहे. याचा सांचा आमच्या विविधज्ञानविस्ताराएवढा असून पृष्ठें ३२ आहेत. या पुस्तकास कर्नाटक भाषाभिमानी जनांनीं साह्याय्य करणें योग्य आहे. हें पुस्तक सुरळीतपणानें चालून याचा लोकांस सदुपयोग होत जावा अशी आमची इच्छा आहे.

मनुस्मृति प्राकृत भाषांतरसहित.—या ग्रंथाचें भाषांतर मासिक पुस्तकाच्या रूपानें छापून प्रसिद्ध करण्याच्या सदुद्योगास रा० जनार्दन महादेव गुर्जर, यांणीं आरंभ केला आहे. वाचकांस पुस्तक वाचण्यास एकदम दीर्घ काल न लागतां प्रतिमासास थोडथोडें वाचून पाहण्यास सुलभ पडावें, व विद्वानांकडून यथार्थ भाषांतरही मिळावें ह्मणून गुर्जर यांणीं ही योजना केल्याचें दर्शवितात. पुस्तकाचा पहिला अंक आमच्याकडे आला त्यावरून पहातां भाषांतराची शैली बरीच आहे असें वाटतें. या पुस्तकास लोकाश्रय मिळून भाषांतर करविणारांचा हेतु सफळ व्हावा असें आह्मीं इच्छितों.

ईगल् छापखान्यांतील इंग्रजी पंचांग सन १८७६ साला बाबद.— यांत सर्व माहिती मागील वर्षाप्रमाणें असून नवीन, प्रसिद्ध टारिफ आक्टाची विशेष माहिती दिली आहे. किंमत १ रुपया आहे. प्रसिद्ध करणारानीं आमच्याकडे एक प्रत पाठविल्याबद्दल त्यांचे उपकार आहेत.

वर्गणी.

(डिसेंबर १८७५ पर्यंत)	रु० आ०
रा. सा. गोपाळराव सुबरावजी पो. इन्स्पेक्टर	१३—०
रा. सा. काशीनाथ बाळकृष्ण मराठे स. जज्ज	३—६
रा. रा. मार्तंड बापुजी जोशी	३—०
रा. रा. रामचंद्र नारायण	३—०
रा. रा. गणपत श्रीकृष्णजी	३—०
रा. रा. सुंदर मदन	३—०
रा. रा. वासुदेव पांडुरंग अ. सेक्रटरी	७—८
रा. रा. केरोबा दामोदर घुमे	३—०
रा. रा. काशीनाथ धाकजी	३—०
रा. रा. खंडेराव मोरोजी	३—०

(डिसेंबर १८७५ पर्यंत)	रु० आ०
रा. रा. नारायण त्र्यंबक वैद्य	३—०
रा. रा. त्र्यंबक गजानन दाणे आगष्ट १८७६ पर्यंत	३—६
श्री. रा. पंतप्रातिनिधि साहेब सं. औंध डिसेंबर १८७६ पर्यंत	३—६
रा. रा. भंडारा नेटिव लायब्ररीचे चिटणीस डिसेंबर १८७६ पर्यंत	३—६
रा. रा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते. डिसेंबर १८७६ पर्यंत	८—०
रा. रा. रामदास अण्णा शास्त्री. डिसेंबर १८७६ पर्यंत	३—६

श्री.



विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ७. अंक १२.

स्वयंवर.

—ooo—

उच्छ्वास पहिला.

मुंबईहून दक्षिण दिशेस गलबतांत बसून प्रवास केला असतां पुरणगडाच्या पुढें "लांबता कडा" या नांवाची एक डोंगराची ओळ दृष्टीस पडते. हे डोंगर इतके बिकट आहेत व दुरून देखील इतके तुटलेले दिसतात कीं खलाशी लोक यांच्या आसपास वरवा करण्यास अगदीं धजत नाहींत. तशांत हे समुद्रांत बरेच लांब गेलेले आहेत, यावरून यास खलाशी लोकांनीं हें नांव दिलें आहे. या डोंगराजवळून गलबत जात असतां जर लहानसें वादळ झालें तर मोठाच आकांत होतो. तत्रांतीय लोकही असें म्हणतात कीं, दर वर्षीं ह्या कडादेवतेस लहानसान तरी मचवा बळी जायाचाच. तरी हा तुटलेला लांबता कडा कांहीं फारसा उंच आहे असें नाहीं, आणि उंच ठिकाणीं ह्यटला म्हणजे पांच सहा माडांहून उंच होईल असें वाटत नाहीं. या अशा डोंगराच्या ओळीवर "नारीगल" म्हणून एक स्थान आहे. हें सर्वांत उंच असावेंसें वाटतें. येथें एका लहानशा मराठ्या सरदाराच्या "नारीनें" यवनस्पर्शरूपी कलंक आपल्या पातिव्रत्यास मुळींच जडूं नये अशा इराद्यानें आपल्या "गळ्यास" फांस लावून घेतला व आत्महत्या केली यावरून यास "नारीगल" हें नांव पडलें आहे. हें स्थान पाहिलें असतां त्या स्त्रीनें फांस लावून आपले हाल व्यर्थ करून घेतले असें वाटतें. कारण हा कडा या ठिकाणीं इतका उंच आहे कीं वरून पाहणाराची नजर खालीं मुळींच ठरत नाहीं. तेव्हां तिनें जर खालीं उडी टाकली असती तर पडतां पडतांच तिचे पैशाएवढे तुकडे झाले असते, व तिच्या पातिव्रत्याचा नाश करूं इच्छिणारा जो यवन त्याच्या हातीं भगीरथ प्रयत्नानें लागलाच असता तर एकादा त्यांतील तुकडा; कारण हल्लीं देखील कित्येक महार लोक जीवावर उदार होऊन वीतभर पोट भरण्याच्या हेतूनें पावसाळ्यांत खालीं वाढलेलें दोन पैशाचें गवत कापण्यासाठीं अशा बिकट ठिकाणीं ही जातात व परत येत असतां बहुतकरून रस्ता चुकून अथवा पाय घसरून यमाजी भास्कराकडेस हजिरी देण्यास चालते होतात. असो. हें स्थान इतकें जरी भयंकर आहे तरी संध्याकाळीं सूर्यानें द्वीपांतरीं प्रभात करण्यास आरंभ केला म्हणजे ते कोंवळे कोंवळे किरण थोडेसेच कधीं कधीं तळास थोड्याशाच सफेत वाळूवर खेळणाऱ्या समुद्राच्या पाण्यावर पडतात,

व तेणेंकरून देखावा फारच मनोरम दिसतो; व तशा समयीं मंद मंद वाहणारा वारा मनास फारच आल्हाद देतो. अशा या दुर्भेद्य ठिकाणीं पुरातनकाळीं एक लहानसा पण मजबूत किल्ला होता. त्या किल्ल्यास देखील आह्मीं ज्या कालाविषयीं लिहीत आहों त्या कालीं नारीगल असेंच ह्मणत. देवगडचा रामदेवराव याचा एक दूरचा संबंधी रामराव ह्मणून होता तो त्या किल्ल्यांत राहत असे. त्याच्या पूर्वजांस तो किल्ला व किल्ल्याची पंचक्रोशी रामदेवरावाच्या पूर्वजांनीं जहागीर करून दिली होती. रामरावाच्या पूर्वजांनीं रामदेवरावाच्या पूर्वजांच्या लश्करांत असतां मोठीं मोठीं कामें बजाविलीं होतीं; व खुद्द रामरावानेंही रामदेवरावास देवलदेवीप्रकरणांत पुष्कळ मदत केली होती. या कारणानें रामदेवराव देखील रामरावाचा पुष्कळ मान ठेवीत असे. रामदेवराव मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा गादीवर बसला तो सुद्धां रामरावाची पूर्ण मदत होती ह्मणूनच बसला. कारण सयाजीराव ह्मणून एक हलक्या घराण्यांतला मराठा अल्लाउद्दीनाचा सेनापति काफूर याचें प्रीतिपात्र असल्यामुळें देवगडास राहून काफूराच्या वतीनें पुष्कळ धांदल करीत असे; त्याचा बेत सर्व कारभार आपल्या हातांत घेण्याचा असल्यामुळें रामदेवरावाच्या मुलास त्यानें बराच त्रास दिला; पण अखेर फारसें वळलें नाहीं. तेव्हांपासून रामराव सयाजीरावाच्या डोळ्यांत खुपत असे; व रामराव ही, हा हिंदु ह्मणवून गोवध करणाऱ्या मुसलमानाचा साथी व रामदेवरावास काफूराकडून अनेक रीतीनीं त्रास देवविणारा, असें पक्कें समजून सयाजीरावास अगदीं पाण्यांत पाहत असे. पण रामरावाचें दैव फिरलें होतें. ज्याप्रमाणें जलालुद्दीनाचा विश्वासघात करणाऱ्या अल्लाउद्दीनाचा मोठा भरभराट व्हावा असा दैवी संकेत होता; त्याप्रमाणेंच रामरावास अगदीं दे माय धरणीठाव असें करून त्याचाच नव्हे तर त्याच्या देशाचाही शत्रु जो सयाजीराव त्याचा उत्कर्ष करावयाचा असा दैवाचाच संकेत दिसतो. रामदेवरावाच्या मुलाकडून खंडणी न पोंचण्यास व सयाजीरावानें अनेक कागाळ्या सांगून त्याच्याविषयीं त्या दुष्ट मुसलमानांच्या व त्यांच्या अधिपतींच्या मनांत संशय उत्पन्न करण्यास एक गांठ पडली. काफूर मोठें सैन्य घेऊन चाल करून दक्षिणेंत आला व त्यानें देवगडास वेढा घालून रामदेवरावाच्या मुलास अगदीं जर्जर करून टाकिलें. रामरावानें अशासमयीं मोठें शौर्य दाखविलें, पण दैवाचा लाडका दुसराच पडला. तेव्हां त्या गरीब रामरावाचें चालणार तें काय! रामदेवरावाचा मुलगा मुसलमानांच्या हातून प्राणास मुकला; व रामरावास आपल्या पंचक्रोशीचा व नारीगलाचा आश्रय करणें भाग पडलें. काफूर यानें बराच मुलुख काबीज करून सयाजीरावास जमाबंदी वगैरे सर्व कारभार पहाण्यास सांगितलें; व कांहीं फौज राहिलेला मुलुख काबीज करण्यासाठीं त्याच्याजवळ ठेऊन काफूर आपण खुद्द दिल्लीस बादशहाजवळ निघून गेला.

सयाजीराव ही व्यक्ति कांहीं सामान्य नव्हती. अंतील खटपटी पहिल्या प्रतीचा होता. हलक्या घराण्यांतला असून इतक्या उंच पदवीस चढला यावरून त्याच्या अंगीं कांहीं कांहीं गुण वसत होते अशी वाचकाची कल्पना त्यास सहज सांगेल, व कांहीं अंशीं होतें ही तसेंच. त्याची बुद्धि मोठी चलाख असे. कांहीं थोडेंसें कानीं पडलें कीं लागलाच

तो उत्तर भागाविषयीं अनुमान करी. व दैवाचा रंगेल असल्यामुळें तें त्याचें अनुमान साहाजिक खरें होई. इतकेंच फार वाईट वाटतें कीं त्यानें ही आपली अशी बुद्धि वाईट कामीं ह्मणजे आपल्या देशाच्या विरुद्ध व राजाच्या विरुद्ध लावून देशद्रोह व राजद्रोह या दोन मोठ्या पापांचा घडा आपल्या मस्तकावर फोडिला. तशांत रामदेवरावानें अथवा त्याच्या मुलानें याचें कोणत्याही रीतीनें तिळभर तरी वाईट केलें होतें असें नाहीं. तर पापपुण्याचा विचार न करितां, परलोकाचें भय न बाळगतां, फार तर काय, इहलोकीं आपले संबंधी, बांधव अथवा देशबांधव यांच्या ह्मणण्याची चाड कांहींच न ठेवितां, शुद्ध पैशाचा व त्याच्या बरोबर मोठेपणाचा अभिलाष धरून, कोणत्या तरी रीतीनें—वाईट ह्मणा, चांगली ह्मणा—आपला ह्मणून कावा साधून घ्यावाच असें मत धारण करणारे जे कित्येक पुरुष असतात, त्यामध्यें सयाजीराव हा एक अग्रगण्य असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आजपर्यंत या भरतखंडाचीं जीं अनेक रीतीनीं नुकसानें झालीं व हल्लींही होत आहेत त्यांचें तरी एक वास्तविक कारण हें कीं विधाता असल्या पुरुषांस निर्माण करून त्यांस गर्भाशयांतच अथवा जन्मतांच न मारितां, उलट त्यांस दीर्घायुषी करितो. असो. सयाजीरावाचा मोठा गुण काय तो वर लिहिलेला—ह्मणजे बुद्धि मोठी प्रांजळ व विशद—हाच होता. एरवीं ह्मटलें ह्मणजे तें सर्व कुत्सित गुणांचें माहेरच होतें. त्याचा स्वभाव इतका दुष्ट होता कीं दुसऱ्या कोणाचा वरचढपणा त्यास मुळींच सहन होत नसे. नित्य ह्मटलें ह्मणजे काय तें आपलें वर्णन. मी अशा लढाया मारिल्या, मी अशी संपत्ति मिळविली, इत्यादि रीतीनीं त्यास हें सर्व जग भगदीं आत्ममय होऊन गेलें होतें. हा मोठा धूर्त व मोठा कारस्थानी जरी होता तरी फारसा शूर होता असें नाहीं. याची सर्व फुशारकी त्या काफूरावर व काफूराच्या लश्करावर. काफूर यास यानें देवगड संबंधीं व इतर दक्षिणेंतील राज्यासंबंधी बरीच माहिती दिली होती; व काफूरानें जी सर्व दक्षिण उद्वस्त करून टाकिली ती त्याच माहितीचा उपयोग करून. सूड घेण्याचें व्यसन यास फार असे. जेव्हां देवगडचा संपूर्ण कारभार याच्या हातांत आला तेव्हां यानें बरींच जुनी घराणीं आपली निंदा करीत ह्मणून धुळीस मिळविलीं; व इतरांस ह्मणजे फार महत्त्वाचे नव्हेत अशा लोकांस देशपार केलें. न्यायासनाचीं, सेनापतीचीं, व असलींच दुसरीं मोठीं जबाबदारीचीं कामें आपल्या खुशमस्कऱ्यांवर यानें सोंपून दिलीं; व ते जें करितील तीं पूर्व दिशा अशी याच्या कारकीर्दींत देवगडाची स्थिति झाली. यांनीं लांच खाऊन, नजराणे खाऊन कामें करण्याचा जो रिवाज घातला तो अद्याप या आर्यभूमींतून स्वदेशीय राज्यांतून तिळभर देखील नाहींसा न होतां उलट आपल्या दिवसोदिवस वृद्धिंगत होणाऱ्या दुष्ट प्रभावानें अनेक लहान लहान राज्यें बुडवीत चालला आहे. याच्या बायकोचें नांव दुर्गादेवी. ती जाधवांच्या घराण्यांतली होती. तिचे आईबाप लहानपणींच वारले होते. नंतर तिच्या भावानें तिचें सर्व लालन पालन केलें. तिच्या भावाची व रामरावाची फार मैत्री होती. तो मोठा शूर शिपायी होता. त्यानें आपल्या बहिणीस त्या काळच्या रिवाजा प्रमाणें लिहिणें, वाचणें, गाणें, बजावणें वगैरे बरेंच शि-

कविले होते. दुर्गादेवीही रामरावास फार मानीत असे. जेव्हां देवलदेवी प्रकरणांत दैवानें मोड करून मराठ्यांस संग्रामांतून पळवून लाविलें त्या झपाट्यांत दुर्गादेवीच्या भावानें समरभूमीवर दीर्घ शयन केलें. दुर्गादेवी व तिच्या भावाची एकुलती एक मुलगी कृष्णादेवी अशा दोघीजणी शत्रूंच्या हातीं झणजे काफूर व अलपखान यांच्या व सयाजीराव याच्या हातीं सांपडल्या. सयाजीराव दुर्गादेवीचें रूप पाहून मोहित झाला; व त्यामुळें त्या दोघींसही काफूर व अलपखान यांच्या दृष्टीच्या बाहेर ठेवून काफूर व अलपखान परत जातांच सयाजीरावानें दुर्गादेवी बरोबर लग्न लाविलें. दुर्गादेवी स्त्रियांस अलंकारभूत अशा अनेक गुणांनीं अलंकृत होती. तिचा स्वभाव फार नम्र असे. दयेचा तर ती केवळ सागर होती. आपल्या नवऱ्याचीं कृत्यें जसजशीं तीस उमगूं लागलीं, तसतसें तीस फार वाईट वाटूं लागलें. कधीं कधीं नवऱ्याच्या व तिच्या लहानसान झटपटी होत, तरी ती त्याच्याशीं फार नम्रपणानें वागत असे. नवऱ्यास थोडेसे बाहेरचें व्यसन होतें. तरी ती अगदीं कांहीं तोंडांतून ब्र देखील काढीत नसे. हें बाहेरचें व्यसन लागण्यास मुख्य कारण झटलें झणजे असल्या लोकांचा मर्दपणाविषयीं समज. एक बायको करून तिच्या योगानें तृप्त राहणें हें केवळ नपुंसकाचें काम. हा समज आमच्या लोकांत मुसलमानांचें प्राबल्य झाल्यापासून दर्शन देऊं लागला; व तो हल्लीं तरी समूळ नाहींसा झाला असें नाहीं. तेव्हां सयाजीरावास हें जें व्यसन होतें तें केवळ या समजामुळेंच होतें. तो कांहीं फार रतिलंपट होता असें नाहीं. खरोखर पाहिलें असतां दुर्गादेवीच्या अलौकिक सौंदर्यानें तो तिचा अगदीं दास बनून गेला होता. दुर्गादेवीचा स्वभाव थोडा तिखट असता तर सयाजीराव ताळ्यावर आला असता कीं नाहीं असा प्रश्न उत्पन्न झाल्यास तो आला नसता असें झणणें भाग पडतें; जरी तो ती फार सुंदर होती झणून कधीं कधीं तिच्या झणण्याप्रमाणें करी, तरी जेथें दोहोंचा अत्यंत विरोध येई तेथें बायका झणजे केवळ भोगासाठीं; त्यांची बुद्धि किती खोल असणार, असें झणून आपलेंच झणणें कायम ठेवी. तेव्हां दुर्गादेवीचा स्वभाव थोडा तिखट असता तर तिचा घटस्फोट करूनही हात धुवून तिच्या पिच्छेस लागल्याशिवाय हा कधींही राहता ना. जेव्हां कधीं कधीं असे प्रसंग येत, तेव्हां दुर्गादेवी मौन धरी, व आपण अगदीं आग्रह सोडला असें दाखवी. पण तें सर्व तिच्या मनांत राहे; व दुर्दैवानें असा हट्टी व स्वच्छंदी पति मिळाल्यामुळें तिला फार वाईट वाटे. आणि खरोखर असल्या पतीबरोबर असल्या दिव्य व सौम्य स्त्रीची गांठ घालून देणें हें दैवास मोठें लांछन होय. सयाजीरावापासून दुर्गादेवीस दोन मुलगे झाले होते. त्यांपैकीं पहिला मुलगा सुमारें सहा वर्षांचा होता. तो बहुतकरून सयाजीराव घरीं असे तेव्हां त्याच्या आसपास उड्या मारीत असे. त्याच्या पाठीवर दोन वर्षांनीं एक मुलगा झाला होता, पण त्याच्या मुखकमलाचें दर्शन दुर्गादेवीस सहा महिन्यांपेक्षां अधिक दिवस घेण्यास सांपडलें नाहीं; कारण तितक्यांतच मृत्युनें त्या अर्भकावर झांप घातली. कृष्णादेवीचें वय सुमारें सतरा वर्षांचें होतें. ती नुकतीच उपवर झाली होती. तीस सयाजीराव आपल्या मुलीप्रमाणेंच समजत असे. तरी मुसलमानांच्या घेतलेल्या रिवाजाप्रमाणें प्रायः ती दुर्गादेवीजवळच असे. सयाजीरावाचें दर्शन

प्रतिपदेच्या [illegible]च्या दर्शनाप्रमाणें कधीं झालें न झालें.

इकडे रामरावानें आपल्या किल्ल्यांत येऊन पराभूत झालेल्या लष्करापैकीं कांहीं थलकें एकत्र करून रामदेवरावाचा जांवई हरपाळ हा दूर होता तरी तेथून मोठ्या मेहेनतीनें त्याचें अनुसंधान आणवून त्याच्या तर्फेनें आपली सर्व बुद्धि खर्चण्याचा बेत केला; व जर देवानें [illegible]च्या आडदांडपणाची बात थोडी तरी पुढें सारली असती व थोडेसें तरी आपलें सुदृष्टिरूप तेल घातलें असतें तर या अमोल्य दिव्यानें आपला प्रकाश सर्व हिंदुस्थानभर पाडून यवनरूपी अगदीं दाट अंधकाराचा केवळ तिरस्कार केला असता यांत कांहीं संशय नाहीं. पण तसें होणार कोठून! दैवरूपी कामवर्षी मेघ दुसऱ्यावर रत्नाच्या व सोन्याच्या वृष्ट्यांच्या वृष्ट्या वर्षवीत असतां खाऱ्या पाण्याचा एक थेंब देखील चुकून माकून रामरावरूपी चातकाच्या तोंडांत पडूं नये असा कांहीं अदृष्ट संकेत दिसून येतो. हरपाळाची त्यानें एक विश्वासू चाकर पाठवून अनुमति आणिवली; व दुसऱ्याच दिवशीं रामरावास धनुर्धातानें आपल्या तडाक्यांत आणलें. तेव्हां त्याचा एकुलता एक मुलगा चंद्रराय जवळच होता. त्याचें वयसुमारें अठरा वर्षांचें होतें. जेव्हां आपला अंतकाळ अगदीं समीप आला व घटिका दोन घटिकांनीं मृत्यु आपल्यावर खास झडप घालणार असें रामरावानें पाहिलें तेव्हां चंद्ररायास आपल्या अगदीं बिछान्याजवळ बोलावून आणवून मोठ्या धैर्यानें रामराव म्हणाला, "मुला, तुझ्या बापाची पुष्कळ संपत्ति लयास गेली याविषयीं तूं कांहीं खेद बाळगूं नको. ज्याची विश्वासानें चाकरी करून ती मिळविली त्याच्याचसाठीं तिचा व्यय करण्याची परमेश्वरानें मला सद्बुद्धि दिली इतक्यावरून ती व तिच्याबरोबर मीही कृतकृत्य झालों आहें अशी माझी पक्की खात्री आहे. मी तुला एक निक्षून सांगतों हें ध्यानांत ठेव कीं आपणास कितीही आपल्या शत्रूंनीं त्रास दिला तरी आपला धर्म व आपलें कर्तव्य म्हणून सोडूं नये. गोब्राह्मणांचें संरक्षण करणें व त्यांचा घात करणारे जे दुष्ट ते आपले अकारण वैरी; तेव्हां त्यांचा विध्वंस करणें हा आपला क्षत्रियांचा धर्म. याच्यासाठीं विष्णूनें देखील अनेक अवतार घेऊन अगणित क्लेश सहन केले; तेव्हां आपल्यासारख्या क्षुद्र मनुष्यांस याच्यासाठीं विशेष क्लेश व श्रम झाले तर त्यांत काय आश्चर्य! तर माझ्या मुला, तूं हें नीट ध्यानांत ठेव; व या उपदेशास अनुलक्षून वाग. कदाचित तुला अशा सत्कृत्यांत मरण आलें तरी कांहीं हरकत नाहीं. तुला तेणेंकरून सद्गतिच प्राप्त होईल. ही जी कांहीं तुझ्या [illegible] नव्हे तर तुझ्या धन्याची व तुझ्या देशाचीही वाईट अवस्था झाली आहे ती अगदीं नाहींशी केल्याशिवाय जर तूं ऐहिक सुखाचा अभिलाष केलास तर धिःकार असो तुला! तेणेंकरून तूं आपल्या परलोकस्थ झालेल्या आईच्या पातिव्रत्यचंद्रास संपूर्ण ग्रासून टाकशील. आणि हा माझा परिजन सर्व तुझ्या नांवावर काय पण तुझ्या देहावरही थुंकेल; आणि तुला अग्निसंस्कार आपल्या हिंदूचा न मिळाल्यामुळें अनंत युगें नरकयातना सोसाव्या लागतील, समजलास. सयाजीराव कांहीं तुला असा तसा सोडणार नाहीं. आजपर्यंत त्यानें माझा निग्रह करण्यास यत्न केला नाहीं याचेंच मला आश्चर्य वाटतें. पण त्याचा यांत कांहीं

तरी मोठा हेतु असेल. अथवा वेळ सांपडला नसेल तर कोण जाणे. पण मुला, इतकें तूं पक्कें ध्यानांत ठेव. तुझ्या बापाच्या अग्निसंस्कारास जर कांहीं विघ्न आलेंच तर त्याचें निराकरण करून आपल्या बापाचा यथाविधि और्ध्वदैहिक विधि करणें हें सर्वांशीं तुझ्यावर अवलंबून आहे. तूं नीट आपल्या धर्मानें चालत जा. ईश्वर तुझें कल्याण करील. मुला, आतां माझ्यानें फार बोलवत नाहीं. पाठीमागचा इतिहास तूं माझ्या तोंडून ऐकिला आहेसच. तर जा आतां जगांत. नको कांहीं यापमाणें दुःखी होऊन अश्रु गाळूं. मरण तर सर्वांच्या पाठीं लागलेंच आहे. माझ्यावर मृत्यूनें थोडा अकालीं कहर केला म्हणून मात्र मला फार वाईट वाटतें. तर जा आतां बाहेर. माझी पुढची सर्व तयारी कर. आणि हरपाळाच्या पक्षास सोडूं नको. तो तुझा धनी आहे." असें म्हणून, "सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ! अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि [illegible]" या गीतेंतील श्लोकाचा उच्चार करून, रामरावानें, या क्षणिक जगाचा त्याग करून, परलोकीं गमन केलें.

हा असा दुर्दैवाचा घाला पडल्यामुळें चंद्ररायास जरी फार वाईट वाटलें तरी तो अगदीं डगमगला नाहीं. आपले डोळे आंगवस्त्रानें पुसले; आणि लागलीच स्मशानांत जाण्याची तयारी केली. हरपाळास मदत करण्यासाठीं जें कांहीं थोडेसें लष्कर रामरावानें जमविलें होतें तें हातांत नागव्या तरवारी घेऊन बरोबर जाण्यास तयार झालें; गांवातील लोकही लहानथोर सर्व जमा झाले; आणि मग मोठ्या थाटानें रामरावाचें प्रेत बाहेर पडलें. स्मशान जवळच होतें. तेथें पोंचतांच प्रेतसंस्कार करण्यासाठीं खालीं काढलें. इतक्यांत दुरून [illegible] एक हत्यारबंद लोक येत आहेत असें पाहून, आपल्या बापाचें भविष्य निःसंशय खरें होणार असा तर्क करून, चंद्ररायानें आपली कमर बांधिली; व कित्येक लोकांस प्रेताचें रक्षण करण्यास सांगून बाकीच्या लोकांस प्रसंग पडल्यास मुळींच मागें पाऊल न टाकण्यास सक्त ताकीद केली. नारीगलच्या गोमेवरच रामराव मेल्याची बातमी श्रवण करून सयाजीरावानें रामरावास धरण्यासाठीं पाठविलेले ते सुमारें पांचशें पायदळ स्मशानाकडे धांवत होते. ते हांकेच्या अंतरावर आले न आले इतक्यांत एक पुरुष धांवत धांवत चंद्ररायाजवळ येऊन, "रामरावाच्या प्रेतास सध्यां अग्निसंस्कार मिळणें नाहीं, रामरावास धरून आणण्यासाठीं हे पांचशें पायदळ पाठविले आहेत, तर चल हो एकीकडेस," असल्या रीतीनें धमकी देऊं लागला, तोंच चंद्ररायानें त्याचे तरवारीनें दोन तुकडे केले; व लागलीच आपल्या लोकांस पुढें चाल करण्यास आज्ञा केली. दोनही लष्करांचें मोठें तुमुल युद्ध झालें. मुरुड नाईक लढाईंत पडल्यामुळें सयाजीरावाच्या लोकांनीं पळ काढला. चंद्ररायाचे लोक कित्येकांच्या पाठीं लागले; व "सर्व शत्रूंचें योग्य शासन केल्याशिवाय तुम्ही परत याल तर खबरदार" अशी चंद्ररायानें त्यांस सक्त ताकीद दिली. नंतर तरवारी रक्तानें माखलेल्या, पोशाकावर रक्ताचा छाटा उडालेला, चेहरे रक्तानें रंगलेले, दीर्घ श्वासोच्छ्वास टाकीत आहेत, यामुळें यमाचे दूतच कीं काय इतके भयंकर दिसणारे आपले कांहीं लोक बरोबर घेऊन चंद्रराय परत स्मशानभूमीवर आला. तेथें प्रेताचे सर्व शास्त्रोक्त संस्कार केले. जेव्हां चितेस अग्नि लाविला तेव्हां लोक

मोठ्यानें शोक करूं लागले; व "प्रेहि प्रेहि" या ऋचांनीं प्रेतास आमंत्रण करितेवेळेस पुरोहिताचाही कंठ सद्गदित झाला. एक चंद्रराय मात्र म्लान होऊन जसा काय मोठ्या मसलतींत गुंतला आहे असा दिसत होता. एकादे वेळेस जर एकादा अश्रु आलाच तर अंमळ तोंड एकीकडेस फिरवून आंतल्या आंत निरवीत असे. बाहेर म्हणून पाडीना. पुढें होणारे अडथळे सर्व ध्यानांत आणून चंद्ररायानें पित्याचें अस्थिसंचयन त्याच दिवशीं केलें. कांहीं वेळानें शत्रूचा पाठलाग करण्याकरितां गेलेले लोक परत आल्यावर मोठ्या धीर गंभीर स्वरानें चंद्रराय म्हणाला कीं, "लोक हो, आज तुम्हीं लष्करी शिपाई व गांवकरी लहानथोर सर्व जमा होऊन जो हा माझ्या बापाच्या प्रेतासही मान दिलात तेणेंकरून मला आज असें वाटतें कीं आज तरी माझ्यासारिखा भाग्यशाली पुरुष कोणी नाहीं. जो संस्कार आपल्या हिंदूच्या प्रेतास म्हणून झालाच पाहिजे व जो न झाला असतां प्रेतास सद्गति होत नाहीं असें शास्त्र म्हणतें तो संस्कार आज माझ्या बापाच्या प्रेतास मिळाला तो तुमच्यासारिखे मोठे शूर पुरुष होते म्हणूनच. आज जर तुम्हीं जवळ नसतां तर इतक्या मोठ्या कुळांत जन्म पावून, आपला धनी व स्वामी जो रामदेवराव व त्याचा मुलगा या दोहोंचीं हीं अनेक कार्यें मोठ्या शौर्यानें बजावून, व तुमच्यासाठीं रात्रंदिवस झटून, जें कांहीं श्रेय माझ्या बापानें मिळविलें व जें कांहीं तुमचें सर्वांचें कल्याण केलें तें सर्व पाण्यांत गेलें असतें. कारण संस्कार त्यास न मिळाल्यामुळें सद्गति होतीना, व तुह्मास व तुमच्या मुलाबाळांस तरवारीच्या तोंडीं देऊन तुमच्या बायकांवर त्या दुष्ट यवनरूपी काळाच्या साध्यांनीं जुलूम करून त्यांच्या निर्मळ पातिव्रत्यास कलंक लाविल्यावांचून त्यांस सोडलें नसतें. जो संस्कार केवळ प्रशांत व गंभीर असा खरोखर आहे तो आज या दुष्टांच्या करणीनें आपणांस कृतांताच्या रूपाप्रमाणें विक्राळ व भयंकर झाला. आज जो आपला वेळ मोक्षप्रतिपादक कथांनीं जावयाचा; तोंच लढाई करून रक्तानें पृथ्वी लाल करून टाकण्यांत गेला. पण कांहीं हरकत नाहीं. आज हें सर्व दुष्टकृत्य कोणाचें, या अपयशाचा भागी कोण, हें सर्व महापाप कोणाच्या मस्तकावर, इतकें दौर्जन्य दाखविण्याची छाती कोणाची, आज रामराव सेनापतीवर इतका अनर्थापात करण्याचें धाडस कोणाचें, आज असें हें साहस करून यमाजीभास्कराच्या घरीं जाण्यास इतका उत्सुक झालेला कोण, असें हें दुष्टकृत्य करण्याचा हेतु काय, असा यास सहायकारी तरी कोण मिळाला, हें कांहीं आपणास ठाऊक नाहीं असें नाहीं. घेऊं पाहून. रामदेवरावांचे जांवई हरपाळराव तर अजून आहेत कीं नाहीं. मग काय आणखी हवें." हें सर्व श्रवण करितांच पुष्कळ लष्करी लोकांनीं "शाबास चंद्रराय, शाबास; मुलगा असावा तर असाच शूर असावा; नाहीं तर तो डुबव्या सयाजी. कोणाच्या पोटचा असेल कोण जाणे." हे स्तुतीचे चार शब्द ऐकतांच चंद्ररायाचा चेहेरा अगदीं खुलून गेला. पण जमलेल्या लष्करी लोकांमध्यें व गांवकऱ्यांमध्यें कित्येक विचारी लोक होते त्यांस हा सर्व चंद्ररायाचा मोठाच अविचार व पोरकटपणा असें वाटलें. जरी चंद्ररायाचें वाईट व्हावें असें त्या जमलेल्यांपैकीं एकाच्याही मनांत नव्हतें तरी हें सर्व बोलून दाखवून रिकामा द्वेष वाढविणें हें कांहीं बरोबर नाहीं

हें त्यांच्या लागलेंच ध्यानांत आलें. कारण चंद्ररायाजवळ सामग्री फारशी नव्हती, थोडासा पैशाच्या अडचणींत होता, व बरेच शिपाई समरांगणावर लोळत होते; जे मे दोनशें शिपाई राहिले होते ते "दर्यामें खसखस" या म्हणीप्रमाणें सयाजीरावाच्या लष्करापुढें होते. तशांत हरपाळ तर दूरच होता. त्याची स्थीति तेथें कशी काय आहे हें समजल्याशिवाय उगीच कांहीं तरी बडबड करणें हें प्रशस्त नाहीं. हें सर्व तर खरें. पण चंद्रराय जाम्याच मोठा शूर व मोठ्या संकटांतही न डगमगणारा असा होता. त्याच्या आंगीं बापाचे सर्व गुण पूर्णपणें वसत होते. वयही फार झालें नव्हतें. सयाजीरावाचे सहायकारी काफूर व अलाउद्दीन यांच्या शक्तिची ही फारशी माहिती नव्हती. तशांत हल्लीं जें त्यानें डोळ्यापुढें पाहिलें त्यापासून साधारण मनुष्यासही त्वेष चढला असता; तेव्हां चंद्ररायासारिख्या स्वभावानेंच शूर, वीर व धीट अशा पुरुषास त्वेष चढला तर काय आश्चर्य! असो. चंद्ररायानें व लोकांनीं नंतर स्मशानभूमि सोडली. गांवकरी तर आपापल्या ठिकाणीं गेले. चंद्ररायाचा स्वभाव फारच उदार असल्यामुळें दोन तीन दिवस सर्व शिपायांस चांगल्या रीतीनें खाऊं पिऊं घातलें; व पैशाची थोडी ताणाताण आहे हें मुळींच मनांत आणिलें नाहीं. हरिणाच्या वगैरे मांसाची चंगळ उडवून दिली. आपण जरी मद्यास स्पर्श केला नाहीं तरी शिपायांस—ताडी माडी नव्हे बरें—तर राजे लोक जीं उंचीं उंचीं मद्यें आपल्यासाठीं पैशाचा व्यय न गणितां तयार करवितात व ज्यांत अनेक प्रकारच्या सजीव व निर्जीव दुर्मिळ चिजाही पडतात तसलीं मद्यें आकंठ पाजलीं; व ज्या रामरावानें शिश्या भरून ठेविल्या होत्या त्या बहुतकरून खालसा केल्या. याप्रमाणें सुख दोन तीन दिवसच भोगण्यास सांपडलें. सयाजीराव पांच हजार शिपाई बरोबर घेऊन आला. चंद्ररायाच्या लोकांनीं व खुद्द चंद्ररायानेंही बरीच तलवार गाजवली. पण पांच हजार लोकांपुढें दोनशें तीनशें लोक ते काय करणार. चंद्ररायाच्या लोकांची चटणी उडाली. किल्ला सयाजीरावानें आपल्या हस्तगत करून घेतला. दुर्गादेवीस, कृष्णादेवीस, व आपल्या मुलास आंत राहण्यास सोय करून दिली. चंद्ररायाचा कांहीं पत्ता लागत नाहीं असें पाहून पांचशें लोकांस हत्यारबंद किल्ल्यावर ठेवून, चंद्ररायास जो जिवंत धरून देईल त्यास पांच हजार रूपयांचा मोठा इनाम मिळेल अशी दंवडी पिटवून, आपल्या वडील भावास सकुटुंब दुर्गादेवीसाठीं कृष्णादेवीसाठीं व आपल्या मुलासाठीं किल्ल्यांत ठेवून, सयाजीराव देवगडास परत गेला.

(पुढें चालेल.)

धौम महाबळेश्वरवर्णन.

(पुढें चालू.)

आपल्या लोकांस भागें लिहिलेल्या गोष्टी तर अनुकूळ नसतातच. परंतु साधारण हवा पाण्याचें सुख देखील नीट मिळत नाहीं. याचें कारण असें आहे कीं जे थोडे लोक हवेकरितां येथें येतात, ते सर्व नवीन पद्धतीचे अलीकडचे विद्वान असतात. हे लोक प्रथमतः शरीराची काळजी न घेतां अतिअभ्यासांत सर्व शक्ति घालवून, मग कोणी क्षयाच्या भावनेनें, कोणी मस्तकशुळानें, कोणी यकृत् उदरादि रोगानें ग्रस्त असतात. या व्याधींचें निवा-

रणार्थ औषधपाण्याचे उपाय सर्वदा करावे, तें चाललेंच असतें. त्याचप्रमाणें महाबलेश्वरीं हवा खाण्यास जाणें ह्मणजे औषधाचा एक प्रकार असतो. या लोकांना सुखोपभोग कोठला ? रोगाची गति वाढवून यमसदन लौकर दृष्टीस न पडो येवढ्याचीच काळजी करितां करितां मारामार असते. ज्यांना दोन तीनशें रुपये दरमाहा मिळतात त्यांचा हा प्रकार झाला. आतां ज्यांना असे रोग वगैरे नसतात त्यांना इच्छा झाली तथापि ऐपत नसते. मिळून दुर्दशाच. महाबलेश्वरीं मध्यम प्रतीनें राहाणें ह्मणजे आपल्या लोकांस मनुष्यामत किमानपक्ष ७५ रुपये खर्च केला पाहिजे, व शिवाय जाण्यायेण्याचा खर्च लागतो. समाजानें गेल्यास अर्थातच कमी पैसा लागेल. परंतु कित्येक लोक जातात त्यांस खर्चाचा अजमास न कळल्यामुळें हाल सोसावे लागतात. राहण्याची व खाण्यापिण्याची यथास्थित तजवीज राहत नाहीं. या योगानें उलट प्रकृति खराब करून घेऊन परत यावें लागतें. सारांश, आपल्या लोकांमध्यें जे केवळ उत्पन्नभक्षी व परतंत्र असतात, त्यांना महाबळेश्वरीं मिळावें तसें सुख मिळत नाहीं. त्यांची दशा "गुंजभर सोन्यांत गाढव मढविणें" या ह्मणीप्रमाणें होते. मोठी उडी मारली तर शें दीडशें रुपये खर्चावयाचें आपण आश्चर्य करतों. परंतु यांतील निमेशिमे पैसा आगगाडी व भाडें खाऊन जातें. त्यामुळें महाबळेश्वरीं गेल्यावर बहुतेक पैशाचा अभाव होतो. आपल्या लोकांमध्यें वकील मंडळीस व मोठमोठ्या व्यापाऱ्यांस जास्त कमी पैसा खर्च करण्याचें सामर्थ्य असल्यानें महाबलेश्वरचें सुख बरें मिळतें. बाकी सर्वत्रांची यातनाच असते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

परंतु एक सुख मात्र साहेबलोकांस आणि आपल्यास, गरिबांना आणि श्रीमंतांना एकसारखें मिळतें, व तें सुख अनुपम आहे यांत संशय नाहीं. तें कोणतें ह्मणाल तर अद्भुत सृष्टिजन्य चमत्कार या ठिकाणीं दृष्टीस पडतात तें होय. महाबलेश्वरच्या हवापाण्यापेक्षां देखील एका अर्थी या चमत्कारांची मातब्बरी जास्त आहे यांत संदेह नाहीं. असे चमत्कार जेथें दृष्टीस पडतात त्या ठिकाणास पॉइंट असें ह्मणतात. पॉइंट ह्मणजे टोंक हें बहुतेकांस माहित आहेच, व महाबलेश्वराच्या भूमीसभोंवतालच्या खोऱ्यामध्यें गेलेलीं जीं टोकें आहेत त्यांस पॉइंट ही संज्ञा आहे. हे पाइंट येणेप्रमाणें आहेत. मुंबई पॉइंट, कार्न्याक पाइंट, फाकूलंड पाइंट, व लाडविक अथवा सिड्नी पाइंट, हे मालकम पेठेच्या पश्चिमेस कोयनानदीच्या खोऱ्यानें आहेत. एलफिन्स्तन पाइंट, अर्थरसीट, मलेट पाइंट हे क्षेत्र महाबलेश्वराच्या पश्चिमेस सावित्रीच्या खोऱ्यानें आहेत. बाबिंटन पाइंट कोयना नदीच्याच खोऱ्यानें आहे, परंतु येट दक्षिणेस आहे. मालकम पेठेच्या पूर्वेस केट पाइंट व वेण्येचा धबधबा आहे. यापैकीं कित्येक पाइंटांचें वर्णन येथें लिहितों.

मुंबई पाइंट मालकम पेठेपासून दोन मैलांवर रडतोंडीचे घांटाचे ऐन माथ्यावर आहे; मुंबईहून व कोंकणाहून घाटमाथ्यावर येतांनां रडतोंडीच्या घाटानें चढून प्रथमतः मनुष्य मुंबई टोंकावर येतें ह्मणून त्यास मुंबई पाइंट असें नांव दिलें आहे. या टोंकावर उभें राहिलें ह्मणजे खालीं कोयना नदीचा खोरा ३,०००फुट खोल आहे, तो

पाहून डोळे फिरूं लागतात. तसेंच थेट समोर इतिहासप्रसिद्ध व आपल्या शिवराजाच्या चरित्रानें परिपूत झालेला प्रतापगडचा किल्ला, जमिनीवरून नीट सुळयासारखा जात आहे तो नजरेस येतो. किल्ल्याच्या उजव्या बाजूस गर्द झाडीमध्यें लहानसें टुमदार पारगांव व पुढें पारघाट दिसतो. नंतर पारघाटाच्या माथ्यावरून नवीन बांधलेली महाडची सडक नागिणीप्रमाणें नागमोडीनें उतरत येऊन कोयनेच्या खोऱ्यांत प्रवेश करिते असा भास होतो व तेथें अल्प काळपर्यंत गडप झाल्याप्रमाणें होऊन नंतर ती मोठया डौलानें घाटमाथा चढत चढत महाबलेश्वरीं श्री शंकराच्या गळ्यांत माळेप्रमाणें वेष्टन घालण्यास जात आहे कीं काय असें वाटतें. आपल्या डाव्या अंगास लहानमोठया पर्वतांची अस्ताव्यस्त गर्दी पसरलेली असते. हें पर्वतमंडळ, व तसेंच आपण उभें राहतों त्या बाजूस, व उजवे बाजूस पर्वतराज आहेत, ते डोकीं उंच करून वीरश्रीनें लढण्यास अर्धरथी, एकरथी, महारथी असे उभे ठाकलेले असतात. परंतु सर्वांत ठेंगणा, तथापि पुराणविख्यात अभिमन्यूप्रमाणें वक्राकृति, दुर्धर, अतिरथी जो प्रतापगडचा शैल, तो सगळ्या गिरिवीरांस आपल्यापुढें अर्धचंद्राकार व्यूहरचनेनें उभे ठेवून त्यांच्यावर पहारा करीत आहे कीं काय असा भास होतो. आणि प्राकाररूप वीरभूषणें मस्तकीं परिधान करून, व सुळ्याचे खड्ग हातीं घेऊन, प्रतापगड या नांवानुरूप साक्षात् कृति करण्यास आवेशानें सिद्ध आहे कीं काय असें वाटतें. परंतु महावीरांचीं मनें जितकीं कठोर तितकींच मृदु असतात; "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि" असें कविराज भवभूतीचें वचन आहे. त्या वचनाप्रमाणें प्रातःकाळीं प्रतापगडचा किल्ला पहाण्यास गेलें ह्मणजे त्या गिरिवीराची शोकावस्था दृष्टीस पडूं लागते; व जसें कांहीं पूर्वीचे दिवस आठवून ज्या छत्रपतीच्या आश्रयानें आपलें संगोपन झालें, ज्या विख्यात राजपुरुषाचे कारकिर्दींत आपल्या हातून महान् महान् पराक्रम होऊन स्वदेशबांधवांचें रक्षण व परदेशनिवास्यांचें खंडन होत असे, ज्या स्वदेशाभिमानी, व आर्यधर्मप्रतिपालक राजानें आर्यमातेच्या उद्धारार्थ यवनांचें पारिपत्य करीत असतां आपल्या हातून यथाशक्ति सेवा घेतली, व ज्या गुणग्राही वीरानें या आपल्या अल्पसेवेस देखील मोठा प्रताप समजून उदारपणानें प्रतापगड ही पदवी दिली व प्राकारादि भूषणें व अलंकार बक्षीस दिले, व ज्या पुण्यश्लोक, ईश्वरपरायण आणि गोब्राह्मणप्रतिपालकाच्या निवासानें श्री जगदंबेचे पाय आपल्या मस्तकीं लागून, राजगुरु व साधुश्रेष्ठ रामदास स्वामी यांच्या आगमनाचा लाभ होत होता, तो छत्रपति, तो वीरश्रेष्ठ, तो स्वदेशाभिमानी, तो आर्यधर्मप्रतिपालक, तो गुणग्राही, उदार, पुण्यश्लोक, शिवराजा आतां नाहीं त्या अर्थी आपलें जिणें व्यर्थ आहे अशा दुःखांत निमग्न होऊन "सूर्याच्यापोटीं शनैश्चर" याप्रमाणें निर्वीर्य, स्वदेशाभिमानशून्य, आर्यमातेस भाररूप, असे जे शिवराजाचे वंशज त्यांचें मुखावलोकनही नको; या हेतूनें हा वृद्ध प्रतापवान् शैलवीर मेघपटलरूप वस्त्रानें आपलें तोंड झांकून, किंवा प्रातःकाळीं आमच्या सारख्यांचें तोंड पहाणें दुश्चिन्ह समजून, दिनमणीचा प्रकाश पडेपर्यंत आपलें मुख दाख-

बीत नाहीं. सारांश प्रतापगड पाहून विचारी पुरुषाच्या मनांत ह्या सर्व कल्पना आल्यावांचून राहात नाहींत.

नहरच्या पश्चिमेस तीन मैल लाडविक किंवा सिड्नी पाइंट आहे. गतवर्षापर्यंत या टोंकास फक्त सिड्नी पाइंट ह्मणत असत. हें नांव मुंबईचे माजी गवरनर सर सिड्नी बेकूविथ यांजवरून पडलें आहे. हे साहेब सन १८३१ सालीं महाबलेश्वरीं असतां मरण पावले. येथें त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या सत्पत्नीनें व प्रियमित्रांनीं एक सुंदर चबुत्रा मालकम पेठेच्या उत्तरेस वेण्या सरोवराजवळ बांधला आहे. ही गोष्ट ह्या ठिकाणीं लिहिण्याचा मुख्य हेतु असा आहे कीं आपल्या लोकांचा देवभोळेपणा कांहीं विचित्र आहे. बेकूविथ साहेबांच्या थडग्यापुढें दररोज ऊद जळून एकदोन नारळ फुटून नवस होत असतात. असो. ह्या सिडनी पाइंटावर सन १८२४ सालीं सातारचे रेसिडेंट कर्नल लाडविक साहेब हे प्रथमतः आले. यांच्यापूर्वी महाबलेश्वरीं गोरे लोकांचा पाय मुळींच लागला नव्हता. या कारणास्तव या टोंकास लाडविक पाइंट ह्मणणें हें उचित होतें. तथापि गतवर्षापर्यंत ही गोष्ट घडून आली नाहीं. अखेरीस लाडविक साहेबांचे चिरंजीव हल्लीं मद्रासेस अकौंटन्ट जनरल आहेत त्यांनीं या बाबतींत मुंबई सरकारास लिहिल्यावरून सरकारानें त्यांचें ह्मणणें मान्य केलें, व लाडविक पाइंट हें नांव कायम केलें आहे. अलीकडेस कर्नल लाडविक साहेब यांच्या चिरंजीवानें या टोंकावर जाण्यायेण्याच्या रस्त्याला वडिलाच्या नांवानें एक चबुत्रा बांधला आहे.

या पाइंटकडे जातांनां रस्त्यानें तीन मैलपर्यंत दुतर्फा झाडी आहे. कित्येक ठिकाणीं इतकी वृक्षांची गर्दी आहे कीं सूर्यकिरणांचा प्रवेश बिलकूल होत नाहीं, व भरदोनप्रहरीं सायंकाळ झाल्याचा भास होतो. मार्गानें सपाटी ह्मणून फारशी नाहीं. दीड कोशपर्यंत जातांना एकसारखी खोल खोल व कित्येक ठिकाणीं अगदीं घसरती उतरण लागते. उतरण उतरून कोयनेच्या खोऱ्याच्या किनाऱ्यावर गेलें ह्मणजे ज्याप्रमाणें लीलेनें हत्ती शुंडा समोर करतो त्याप्रमाणें पर्वताची एक लांब, बारीक, टोंकदार भूशलाका एकदम खोऱ्यामध्यें घुसते. या शुंडेवरून जातांना मार्ग कांहींसा नागमोडीसारखा चिंचोळा असून दोन्ही बाजूनें सुमारें तीन तीन हजार फुट खोऱ्यांची खोली आहे. यास्तव जाणारा आपल्या जिवाला भीत भीत व चक्कर येण्याच्या धास्तीनें, बाजूंला न पाहतां कित्येक ठिकाणीं काठी टेंकीत टेंकीत या सोंडेच्या अग्रभागीं गेला ह्मणजे तेथें फक्त बारा फुट रुंदीचे टोंकावर येऊन पोंचतो. या टोंकास आपले लोक डोमेश्वर ह्मणतात. या ठिकाणाहून जो कांहीं अद्भुत चमत्कार दृष्टीस पडतो त्याचें वर्णन देतां येत नाहीं. पहाणाराच्या मनासच विचारिलें पाहिजे. वृक्षवनस्पतींचा हिरवागार अफाट समुद्र पुढें पसरलेला असतो. त्यांत शपतेला बोटभर जागा देखील हिरव्या रंगाखेरीज दिसत नाहीं, व हें हिरवें मैदान सभोवतील पर्वतांच्या कोंडमाऱ्यांतून निघून मोठें होत होत अखेरीस क्षितिजास जाऊन भिडतें. या चमत्कारानें क्षुद्रजंतुवत् पाहणारे जे आपण त्यांची दृष्टि अगदीं फांकून जाते. पायाखालीं ३,००० फुटींची भिंत उभी पाहून नजर ठरत नाहीं, झोंक गेला तर रसातळास

जाण्याची भीति असते. डावे बाजूस मुंबई पाइंट व प्रतापगडाचा सुळा उघडा बोडका उभा असतो, व पुढें कांहीं अंतरावर एकमेकांवरोवर युद्ध करण्यास महान् राक्षस उठल्याप्रमाणें कोणी वाकडा तिकडा, कोणी नीट, कोणी दुसऱ्याच्या अंगावर रेळला आहे, कोणी झोंबी खेळण्यास जात आहेत असे डोंगर दृष्टीस पडतात. उजवे बाजूस एलफिन्स्तन पाइंट व खालीं सावित्रीचा खोरा आपल्याकडे डोकावून पहात असतो.

या चमत्कारातिशयांत निमग्न होऊन कांहींवेळ उभें राहिलें तर आकाशांत व भूमीवर मेघांच्या क्रीडा व विहार चालले असतात ते दृष्टीस पडतात. मे महिन्यामध्यें ढग येण्याचें सुरू झालें म्हणजे प्रातःकाळीं आकाशांत ढगांची इतकी गर्दी होते कीं कांहीं एक मोठें भयंकर बंड चालले आहे असा भास होतो. कित्येक ढग निवळ काळे, व कित्येक अर्धवट काळे व पांढरे असतात. कित्येकांचा रंग काय आहे हें सांगवत नाहीं. कारण, क्षणोक्षणीं रंग पालटून बारीक पिंजलेल्या कापसाचा निर्मळ शुभ्रपणा व काजळाचा सतेज काळेपणा या दोहींचें मिश्रण होऊन चित्रविचित्र प्रकार होत असतात. कित्येक ढग गजाकृति, कित्येक अजगरासारखे, व कित्येक तुकडे केलेल्या सर्पासारखे, अगणित रूपें व अगणित वेष धारण करून, अनेकप्रकारच्या क्रीडा व युद्धें स्वेच्छेनें करीत असतात. कित्येक मेघ पर्वतांच्या डोक्यावर जाऊन स्वस्थ बसल्याप्रमाणें किंवा हात पाय ताणून निजल्याप्रमाणें दृष्टीस पडतात, व असें एक एक तासपर्यंत डोंगरास वेष्टन घालून समूळ आच्छादून टाकितात. कित्येक ढग डोंगराच्या तटावर हत्तीप्रमाणें उभे राहून हिरव्या गार झाडीवर चरत आहेत असें वाटतें. लहान लहान मेघबालकें दऱ्यांखोऱ्यांतून चैनेनें फिरत असतात. हा बंडावा सूर्य वर येऊन किरणें पडूं लागतपर्यंत चालतो. नंतर कांहीं अतिविलक्षण तऱ्हा होऊं लागते. सूर्याचीं कोंवळीं कोंवळीं किरणें व रमणीय रक्तवर्ण तेज हीं कृष्ण व शुभ्र मेघांमध्यें मिश्रित होऊन जो कांहीं चमत्कार दृष्टीस पडतो तो कोणाच्यानें वर्णन करवेल? पुढें सूर्याचीं किरणें प्रखर होत चाललीं म्हणजे मेघमंडळामध्यें एकदम पळापळ सुटते, व ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे तो जातो. कित्येक तर सूर्याला न भीतां हठवादानें पर्वतासारखे निश्चल उभे राहतात. शेवटीं रवीचा सप्ताश्वरथ मेघपर्वतांना भेदून बोगद्यांतून आगगाडी प्रमाणें बाहेर येतांच एंजिनाच्या धुराचा लोट आकाशांत वेगानें जातो, त्याप्रमाणें मेघांच्या चिंध्या चिंध्या होऊन आभाळांत मिसळून जातात. वनस्पतीनें आच्छादित पर्वतांच्या हिरव्यागार तटांवर मेघ फिरत असतात, त्यांची विलक्षण गंमत दिसूं लागते. वृक्षांच्या हिरव्या मैदानावर चोहींकडे ऊन पडलें असून, मध्येंच ढगाच्या छायेचे काळे डाग दिसूं लागतात, व ढग लोंबत राहून जिकडे जिकडे फिरतात तिकडे तिकडे त्यांची छायाही जात असते. आणि रविकिरणांचा अंतःप्रवेश होऊन ढग फुटून वितळूं लागले म्हणजे त्यांची छाया इतक्यांत वर्तुळाकार, इतक्यांत चाळणीसारखी, अशी होऊन बोलतां बोलतां नाहींशी होते. यासमयीं किंचित् वारा सुटला म्हणजे पर्वतांच्या शिखरांवरचे मेघ, कविरत्न जो **कालिदास** यानें मेघसंदेशांत वर्णन केल्याप्रमाणें शैलांचे

अग्रभाग घेऊन पळून जात आहेत असें वाटतें. व कोणी स्त्रीजन हा चमत्कार अवलोकन करीत असल्या तर कालिदासाच्या श्लोकांची आठवण होऊन कविवचन किती रसभरित आहे, याचा तत्काळ अनुभव येतोः—

अद्रेः शृङ्गं हरति पवनः
किं स्विदित्युन्मुखीभिः
दृष्टोत्साहश्चकितचकितं
मुग्धसिद्धांगनाभिः
स्थानादस्मात् सरसनिचुला—
दुत्पतोदङ्मुखः खम्
दिङ्नागानां पथि परिहरन्
स्थूलहस्तावलेपान् ॥

या श्लोकाच्या अखेर चरणांत दिग्गजांची उपमा मेघास दिली आहे, तिचें सार्थत्व घडोघडीं महाबळेश्वरीं अनुभवास येतें. मेघदूताचे प्रारंभीं यक्षानें मेघास पाहिलें आहे त्याविषयीं कवीची उक्ति अशी आहे कीं:—

आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥

याचा भावार्थ असा आहे कीं, आषाढाच्या प्रथमदिवशीं यक्षानें एक मेघ पाहिला तो जसा कांहीं हत्ती वप्रक्रीडा ह्मणजे सरोवरांतून बाहेर आल्यावर सरोवराच्या तटास मंडस्थळाचा टेंका देऊन वर माती फेंकीत आहे असा दिसला. महाबळेश्वरीं हा चमत्कार दृष्टीस पडण्यास आषाढमहिन्याची जरूरी लागत नाहीं. सारांश, दीड प्रहर दिवसाचे सुमारास ऊन चांगलें पडलें ह्मणजे ढग वितळून नाहींसे होतात, तेव्हां कालिदासानें दिलेलें मेघाचें लक्षण हुबेहुब जुळतें; आणिः—

"धूमज्योतिः सलिलमरुतां
सन्निपातः क्व मेघः"

असे जे ढग त्यांची उत्तरोत्तर कशी दशा होत जाते हें पुसाल तरः—

खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं
न्यस्य गंतासि यत्र
क्षीणः क्षीणः परिलघु पयः
स्रोतसां चोपभुज्य ॥

तसेंच सायंकाळीं पाऊस येण्याचा सुमार असला तर आकाशतळावर कवीनें लिहिल्याप्रमाणें "स्निग्धभिन्नांजनाभि" अशा मेघांची सतेज काळी पैठणी पसरल्यासारखी दिसते. सारांश,

"जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोनः" या चरणांत कामरूप ह्मणजे इच्छारूप धारण करणार असें जें यक्षानें मेघदूतास विशेषण दिलें आहे तें अक्षरशः सत्य आहे.

मे महिन्याचे शेवटीं शेवटीं धुकें येऊं लागतें त्यावेळीं जो चमत्कार दृष्टीस पडतो तो फार विलक्षण असतो. धुकें येऊं लागलें ह्मणजे पंधरा मिनिटांच्या आंत आकाशांतून बारीक पिंजलेल्या शुभ्र कापसाप्रमाणें चहूंकडून वृष्टि होऊं लागते, व त्या योगानें भररस्त्यांत एक हाताच्या अंतरावरचें मनुष्य देखील दिसत नाहीं; व पर्वत, खोरें, वृक्ष, पाषाण वगैरे सर्व आच्छादले जाऊन जळप्रलयांत जग बुडतें ह्मणून ह्मणतात, त्याप्रमाणें धुक्याच्या प्रळयांत महाबलेश्वर अल्पकाळपर्यंत बुडलेलें असतें.

एलफिन्स्तन पाइंट हें टोंक मालकम पेठेहून सहा मैल व क्षेत्र महाबलेश्वराहून एक किंवा दीड मैल आहे. या टोंकाचें नांव

नामदार मौंटस्तुअर्त एलफिन्स्तन साहेब यांच्यावरून पडलें आहे. सानिटेरियमकरितां जागा प्रथमतः येथें करण्याचा बेत होता. परंतु पाण्याची कमताई असल्याकारणानें मालकम पेठ येथें पुढें बंगला बांधला. हा पाइंट एका अजस्र कड्याचे टोकावर असून खालीं भयंकर कोयनेच्या खोऱ्याची एक ३,००० फुट खोल घळ आहे. या टोकावरून डोकावणें फार धैर्याचें काम आहे. कारण खालीं जो भव्य व भयानक प्रकार दृष्टीस पडतो त्याला उपमा नाहीं. या घळीचे समोर प्रतापगडचा किल्ला उभा आहे. तसेंच सावित्रीनें महाबळेश्वराच्या मस्तकांतून निघून ज्या चिंचोळ्या खोऱ्यामध्यें धाडकन ४,००० फुटींचे उंचीवरून उडी टाकिली आहे, त्या खोऱ्याचा प्रांत भाग एलफिन्स्तन पाइंटाचे उत्तरेस आला आहे, व पश्चिमेस समुद्रसुशोभित कोंकणपट्टी सरधोपट पसरली आहे. आणि तिजवरील लहान लहान डोंगर व टेंकड्या अस्ताव्यस्त फेंकल्यासारख्या दिसतात. ह्या टेंकड्या कित्येक काळ्या, बहुतेक भुऱ्या, व मधून मधून हिरव्या दिसतात; व हा किंचित् उंच सखल प्रदेश उत्तरोत्तर अफाट पसरत जाऊन क्षितिजाशीं मिळाला ह्मणजे आकाशाचें भिंतीला अपरंपार गलथा मारल्याप्रमाणें दिसतो. नभस्तलापासून ह्या गलथ्याचा फुगीरभाग किंचित् पुढें येऊन त्याचा रंग नीळवर्ण, पांडुर व कोठें कोठें गुलाबी झांकींचा असतो. हा गलथा समुद्राच्या पाण्याचा होय. समुद्र व घाटमाथा यांजमध्यें ३०,३५ मैलांचें अंतर असल्यामुळें समुद्राचें पाणी दुर्भिणीनें पाहिल्याखेरीज ओळखतां येत नाहीं. शिवाय ऊन असल्यास, रविकिरणें मध्यें येण्यानें, परावर्तनादि व्यापार मेघमिश्रित वातावरणांत होऊन समुद्राच्या पाण्याचा विस्तीर्ण ढीग कांहीं एक विलक्षण रंगाचा दिसतो व या उदकाची लंबायमान रेखा पश्चिमेचे आभाळांत सदोदित ढळढळीत दिसत असते.

या पाइंटाच्या उत्तरेच्या बाजूस खालीं सावित्रीच्या खोऱ्यामध्यें व पलीकडे, अजमासें पन्नास पाऊणशें पर्वतांची उंच पंक्ति उभी आहे. तिच्या भयंकर व अक्राळ विक्राळ स्वरूपाचें वर्णन करवत नाहीं. दहा दहा पर्वतांची एक एक ओळ याप्रमाणें कित्येक ओळी बसल्या आहेत. प्रत्येक डोंगर एकमेकापासून भिन्न असून, मस्तकाचा नीट आणि अंकुचीदार सुळा वर गेलेला दिसतो, व शिवाय दोन्हीं बाजूचा कर्वताच्या धारेसारख्या खालपावेतों पोचलेल्या असतात. या ठिकाणीं वनस्पतींचा लेश देखील नाहीं, व एखाद्या किल्ल्याच्या कपाटावर चौंचीदार, लंगरी खिळ्यांच्या रांगी असतात तद्वत् नागवे, बोडके व मस्तकसहित सर्वांग भादरलेले, जळके, काळे कुळकुळीत, व मधून मधून किंचित् भुरे अशा प्रकारचे जे हे डोंगर त्यांचें उग्र व रौद्र रूप पाहून पाहणारांचें हृदय खरोखर भयभीत व चंचळ होऊन, दृष्टि स्थिरपणें ठरत नाहीं, व मनांत कल्पना येते कीं, मेघराजा जो मघवा ह्मणजे इंद्र यानें पर्जन्यवृष्टीच्या वेळेस अवज्ञा करून, वृष्टि न करणारे जे मेघ, त्यांना सुळीं देण्याकरितां एक भयंकर यंत्र तयार केलें आहे कीं काय? अथवा इंद्रानें पर्वतांचे पक्ष कापण्याकरितां या ठिकाणीं वरच्या जमवून ठेविल्या आहेत कीं काय? पण हल्लीं पर्वतांना पक्ष नाहींत, त्या अर्थी ह्या वर्ण्या कशास पाहिजेत असें वाटेल तर कवि भारवी यानें किरातार्जुनीय

काव्यांत हिमालयाचें वर्णन केलें आहे तें असें कीं:—

अविरतोज्झितवारिविपांडुभि
र्विरहितैरचिरद्युतिनेजसा ॥
उदितपक्षमिवारतनिस्वनैः
पृथुनितंबविलम्बिभिरम्बुदैः ॥

अशा प्रकारच्या पक्षांचें छेदन करण्यास ह्या बर्च्या समर्थ आहेत.

सारांश सर्व महाबलेश्वरापेक्षां या ठिकाणीं जो विशेष चमत्कार दृष्टीस पडतो तो खरोखर अवर्णनीय आहे. मेघमंडळास भिडणारे उंच पर्वत व त्यांच्या पायथ्यासभोंवतीं हजारों फुट खोलीचे खोरे, कित्येक अगदीं चिंचोळे नळीप्रमाणें असून, वरून कड्यांनीं आच्छादित असल्यामुळें आंत सूर्याचा प्रवेश न होतां, अंधकारवत् शांत, निबिड छाया असते असे; कित्येक मगरांप्रमाणें भयंकर तोंडें वासीत जाऊन पुढें अफाट मैदानामध्यें जाऊन मिळतात असे; आणि या खोऱ्यामध्यें पर्वतांतून उत्पन्न होऊन अजस्र कड्यावरून हजारों फुट खालीं उड्या टाकून ज्या नद्याः—

विविधकामहिता महितांभसः
स्फुटसरोजवना जवना नदीः

इत्यादि भारवी कवीनें वर्णन केलेल्या लक्षणांनीं अन्वित होऊन देशसमृद्धीस कारण होतात, त्यांचीं पात्रें, सर्पाकृति, व उन्हाळ्यांत शुष्क आणि जलशून्य दिसत असतात तीं; व ज्या कड्यांवरून ह्या नद्या उड्या टाकितात त्या कडयांला हजारों वर्षांपासून पडलेले विस्तीर्ण घट्टे दिसतात ते; तसेंच भगवान् परशुराम यांच्या चरणसंयोगानें व पुण्यचरित्रेंकरून पवित्र झालेली समुद्रतीरवर्ति सपाट भूमि, व तिजवर बाळडोंगर सोंगट्यांप्रमाणें दिसतात ते; व पुढें चित्र विचित्र मेघकांतिवत् समुद्रोदकाची राशि क्षितिजावर प्रकाशमान असते ती; इकडे पर्वतांवर ब्रह्मारण्यांतील तपोवनांमधील वृक्षसंमर्द, पुरातन तपश्चर्येचीं स्थानें, दऱ्या व गुहा इत्यादि या सर्वांचा एकत्र समुच्चय होऊन . एकसमुदायावच्छेदेंकरून दृष्टिगोचर होतो तेव्हां जो लोकोत्तर, निरतिशय, व अमानुष चमत्कार आणि सृष्टीची नैसर्गिकी स्थिति साक्षात् नेत्रांसमोर येते, तिजकडे लक्ष्य दिलें ह्मणजे पाहणाराच्या अंतःकरणाची वृत्ति काय होते हें त्यासच विचारिलें पाहिजे. कितीही मोठा पाषाणहृदय, नास्तिक असला तथापि या ठिकाणीं आणून त्याला उभें केलें तर निमिषमात्राच्या अवकाशांत सर्व पाखंड भंग होऊन तो ईश्वरपरायण होईल यांत किंचित् संदेह नाहीं. आपल्यासारख्यांचा तर ऊर दडपून गेल्यासारखा होतो, आणि गर्व असल्यास सर्व हरण होऊन वृत्ति लीन व नम्र होते. जिकडे पहावें तिकडे ईश्वर दिसूं लागतो, व अंतर्धामींची गडबड नाहींशी होऊन विचारास अवसर सांपडला ह्मणजे वाटतें कीं, जगदीश, जगन्नियंता, जगत्प्रतिपालक, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्ति, अनादि, अनंत, निराकार, निर्विकार, असा जो प्रभु त्याचा अपार महिमा व अगाधलीला किती आहे बरें? व आपण किती क्षुद्र व अकिंचनज्ञ आहों? परंतु आपलें सामर्थ्य तर कांहींच नाहीं. महान् महान् राजे व योद्धे ज्यांनीं शेंकडों वर्षें राज्य करून दिगंतरीं कीर्ति मिळवली त्यांचीही दुर्दशा आपल्याप्रमाणेंच आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर या ठिकाणीं तत्काळ दिसून येतें. तें असें कीं, कमळगड, प्रतापगड व पुरंदर,

हे तीन किल्ले येथून दिसत असतात. मुसलमान लोकांचें राज्य असतां या प्रांतीं विजापुरकराचें मुख्य ठाणें कमळगडावर असे, पुढें मराठ्यांनीं यवनांचा पराभव करून प्रतापगडीं आपलें ठाणें केलें, नंतर पेशव्यांनीं राज्यश्री भोगून पुरंदरास एकार्थीं आपलें माहेरघर केलें होतें. परंतु कोठें ते यवन, मराठे व पेशवे गेले त्यांचा पत्ता नाहीं. त्यांनीं या जागीं राजविलास भोगले, शूर कृत्यें केलीं, आणि यावच्चंद्रदिवाकर आपली सत्ता चालावी ह्मणून मजबूत व दुर्गम किल्ले बांधले पण हल्लीं ते किल्ले धुळीस मिळत चालले आहेत, व सर्व राजसत्ता आपल्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यास प्राप्त होऊन त्यांनींही या ठिकाणीं नहरास विलासाचें स्थान कायम केलें आहे, तेवढें मात्र शोभायमान दिसतें. बाकीच्यांचा लय झाला. तस्मात् हे ईश्वरा, आह्मीं मर्त्य अकिंचन, अनभिज्ञ, मानव आहों. आमचें तुझ्या अमानुष शक्तीपुढें काय सामर्थ्य? तुझा परम मित्र व भक्त जो अर्जुन त्यानें विश्वरूप पाहिल्यानंतर तुझा स्तव केला आहे त्याप्रमाणें तूं आहेस. ह्मणजे–

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानं ॥ वेत्तासि वेद्यंच परंच धाम त्वया ततं विश्वमनंतरूपं ॥ ह्मणूनः– "नमो नमस्तेस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोपि नमो नमस्ते" ॥ या प्रकरणाच्या शेवटीं इंग्लिश भाषा जाणणारे वाचकांस आमचें सांगणें आहे कीं वर्डस्वर्थ कवीचें "एक्सकर्शन" नांवाचें काव्य कितीएक जागीं अर्थ समजण्यास फार कठीण ह्मणून हाकाहाक आहे. परंतु महाबलेश्वरचे चमत्कार पाहिले ह्मणजे कवीचा अर्थ स्पष्ट लक्षांत येतो. हा अर्थ मनांत समजण्याचाच आहे. प्रगट करणें कविजनाला देखील सुलभ नाहीं. वर्डस्वर्थ कवीनें लिहिलें आहे कीं:–

The Clouds were Touched.
And in their silent faces did he read
Unutterable love. Sound needed none,
Nor any voice of joy; his spirit drank
The spectacle: sensation, soul and form
All melted into him; they swallowed up
His animal being: in them did he live
And by them did he live; they were his life.
In such access of mind, in such high hour
Of visitation from the living God,
Thought was not; in enjoyment it expired.
No thanks he breathed, he proffered no request
Rapt into still communion that transcends
The imperfect offices of prayer and praise,
His mind was a thanks-giving to the power
That made him; it was blessedness and love.
Early had he learnt
To reverence the Volume that displays
The mystery, the life which cannot die.
But in the mountains did he *feel* his faith.
Responsive to the writing, all things there
Breathed immortality, revolving life
And greatness still revolving; infinite;
There littleness was not; the least of things
Seemed infinite; and there his spirit shaped
Her prospects, nor did he believe he *saw*
That wonder, if his being thus became
Sublime and comprehensive. Low desires
Low thoughts had there no place, yet was his heart
Lowly; for he was meek in gratitude
Oft as he called those estaxies to minds
And whence they flowed; and from them he acquired.
Wisdom which works through patience; thence he learned
In oft-recurring hours of sober thought.
To look on Nature with a humble heart
Self questioned where he did not understand
And with a superstitius eye of love.

इंग्लंद देशांतील चमत्कार पहून मनावर ग्रह होतो त्याचें हें वर्णन झालें. परंतु एका विद्वान् अनुभविक इंग्लिश गृहस्थाने सांगितलें आहे कीं हिंदुस्थानांत जे चमत्कार दृष्टीस पडतात त्यांच्याशीं साम्यता केली ह्मणजे विलायतेच्या चमत्कारांची फार थोरवी वाटत नाहीं.

(पुढें चालेल.)

पुराण ग्रंथ.

(पुढें चालू.)

१४ वें वामन पुराण:-

त्रिविक्रमस्य माहात्म्यमधिकृत्य चतुर्मुखः
त्रिवर्गमभ्यधात्तच्च वामनं परिकीर्तितम् ॥
पुराणं दशसाहस्रं ख्यातं कल्पानुगं शिवं॥

भावार्थ-ज्या पुराणांत चतुर्मुख ब्रह्मदेवानें धर्मादि त्रिवर्गाचें, शिवकल्पाचें, व त्रिविक्रमाचे माहात्म्याचें वर्णन केलें आहे व ज्यांत १०,००० श्लोक आहेत तें वामन पुराण.

हल्लीं जें वामन पुराण उपलब्ध आहे त्यांत सुमारें सात हजार ग्रंथ आहे व तें पुलस्त्यानें नारदास सांगितलें आहे. त्यांतील बराच भाग शिवलिंगाचे अर्चेविषयीं आहे. वैष्णव पुराणांत असा प्रकार असणें हें कांहींसें चमत्कारिकच होय. यांतील बहुतेक आख्यानांत तीर्थांचें वर्णन आहे. ग्रंथारंभीं दक्षयज्ञाची कथा आहे. त्या यज्ञांत शिवानें ब्रह्महत्या केली तिच्या निरसनार्थ तो काशीस पापमोचन तीर्थास गेला त्याचें वर्णन केलें आहे. नंतर हिमालयांतील केदारेश्वर व बदरिकाश्रम या ठिकाणच्या लिंगांचें माहात्म्य दाखविण्याकरितां मदनदहनाची कथा सांगितली आहे. पुढें स्थाणू तीर्थाचें माहात्म्य आहे तें फार मोठें आहे. कांहीं कथा गोदावरीविषयीं आहेत. परंतु बहुतेक कथा गोदावरीचे उत्तरेकडील स्थलांविषयीं आहेत. पुढें स्वारोचिष मन्वंतरांत दैत्यांचा राजा बली यानें सर्व देवांस जिंकून टाकिल्यामुळें त्यास रसातळीं घालण्याकरितां वामन अवतार झाला त्याची कथा सांगितली आहे. त्यावरून या पुराणास वामन पुराण हें नांव पडलें आहे. यांत शिव किंवा विष्णु यांतून एकाचेंही विशेष माहात्म्य न वर्णितां दोघांनांही सारखाच मोठेपणा दिला आहे यावरून हे पंथ प्रबल होण्यापूर्वी हें रचिलें असावें असें दिसतें; परंतु याची भाषाशैली फार जुनाट दिसत नाहीं.

१५ वें कूर्म पुराण:-

यत्र धर्मार्थकामानां मोक्षस्यच रसातले।
माहात्म्यं कथयामास कूर्मरूपी जनार्दनः१
इंद्रद्युम्नप्रसंगेन ऋषिभिः शक्रसंनिधौ।
सप्तदशसहस्राणि लक्ष्मीकल्पानुसंगिकं२

भावार्थ-ज्यांत रसातळीं कूर्मरूपी जनार्दनानें धर्मार्थिकाममोक्ष यांचें इंद्रद्युम्नास माहात्म्य सांगितलेलें वर्णिलें आहे, ज्यांत लक्ष्मीकल्पांतील विषय आहेत व ज्यांत १७,००० श्लोक आहेत त्यास कूर्म पुराण ह्मणतात.

कूर्म पुराणाचे पहिले अध्यायांत कूर्म पुराणांत ६,००० श्लोक आहेत असें ह्मटलें आहे त्यांचा व वरील वर्णनाचा मेळ पडत नाहीं. ह्याच्या नांवावरून हें वैष्णव पुराण आहे असें कोणास वाटेल. परंतु वस्तुतः हें शैव पुराण आहे; कारण यांतील बहुतेक भागांत शिव व दुर्गा यांचे अर्चनाचा प्रकार फार आहे.

या पुराणाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत जगदुत्पत्ति, विष्णूचे अवतार, कृष्णापर्यंत झालेले सूर्यचंद्रवंशी राजे, व मन्वंतरें यांचें वर्णन आहे. मधून मधून महेश्वरस्तोत्रें; अंधकासुरपराजय; शक्ति, माहेश्वरी, शिवा, सती, व हैमवती यांची शिवापासून उत्पत्ति, व दुसऱ्या कांहीं शैवकथा आहेत. काशीमाहात्म्य ह्मणून एक प्रकरण आहे तें बरेंच मोठें आहे.

दुसऱ्या भागाचे दोन विभाग आहेत त्यांतील पहिल्यांत ईश्वरगीता व दुसऱ्यांत व्यासगीता आहे. ध्यानाचे योगानें शिवप्राप्ति कशी होते हें ईश्वरगीतेंत सांगितलें आहे, व वेदोक्तकर्मांनीं शिवप्राप्ति कशी होते हें व्यासगीतेंत सांगितलें आहे. या पुराणांत भैरव, वाम, आर्हत, व यामल हीं शास्त्रें लोकांस फसविण्याकरितां केलीं आहेत असें एके ठिकाणीं झटलें आहे. यावरून शाक्त व जैन या पंथांची प्रवृत्ति झाल्यावर हें झालें असें दिसतें.

१६ वें मत्स्यपुराण:—

श्रुतीनां यत्र कल्पादौ प्रवृत्त्यर्थं जनार्दनः।
मत्स्यरूपेण मनवे नरसिंहस्य वर्णनम् ॥ १
अधिकृत्याब्रवीत्सप्तकल्पवृत्तं मुनिव्रताः।
तन्मात्स्यमिति जानीध्वं सहस्राण्यथ विंशति ॥ २ ॥

भावार्थ— ज्यांत वेदांची प्रवृत्ति करण्याकरितां कल्पारंभीं मत्स्याचें रूप धारण करून विष्णूनें मनूस नरसिंहाची कथा व सप्तकल्पांतील गोष्टी सांगितल्या आहेत, तें मत्स्यपुराण. त्यांत २०,००० श्लोक आहेत.

ग्रंथारंभीं मत्स्यानें प्रलयकालीं मनूचें एका नौकेंत रक्षण केलें त्याची कथा सांगितली आहे. पुढें मनु व मत्स्यरूपी विष्णु यांचा संवाद झाला, त्याचें वर्णन आहे. त्यांत प्रथम उत्पत्ति, राजवंश, व वर्णाश्रमधर्म हीं आहेत. त्यांत गृहस्थाश्रमी पुरुषानें पुराणग्रंथ लिहून त्यांचें दान केलें असतां त्यास फार पुण्य लागतें हें सांगतांनां ५३ वे अध्यायांत सर्व पुराणांचीं नांवें दिलीं आहेत व त्यांतील विषयांचें दिग्प्रदर्शन थोडक्यांत केलें आहे. पुढें त्रिपुरासुरवध, तारकासुराशीं युद्ध, कार्तिकेयाचा जन्म, कामदेवदहन, उमेचा जन्म व विवाह, मयासुर व अंधकासुर यांचा वध इ० शैवकथा आहेत. मधून मधून विष्णूचे अवतारांच्या कथा व माहात्म्यें आहेत. त्यांत नर्मदामाहात्म्य चांगलें आहे. धर्मशास्त्र व नीतिशास्त्र यांवरही कांहीं अध्याय आहेत. पुढें एका अध्यायांत घरें कशीं बांधावीं व मूर्ति कशा कराव्या हें सांगितलें आहे. शेवटीं पुढें होणाऱ्या राजांचें वृत्त सांगून ग्रंथसमाप्ति केली आहे.

मत्स्यपुराणांत विष्णुपुराण, पद्मपुराण, व महाभारत यांतील पुष्कळ कथा आहेत यावरून तें फार जुनाट नाहीं असें दिसतें.

१७ वें गरुडपुराण:—

यदाच गारुडे कल्पे विश्वांडाद्गरुडोद्भवम्।
अधिकृत्याब्रवीद्विष्णुर्गारुडं तदिहोच्यते
तदष्टादश चैकंच सहस्राणीह पठ्यते।

भावार्थ— ज्यांत विष्णूनें गरुडकल्पीं गरुडजन्माची कथा सांगितली आहे व ज्यांत १९,००० श्लोक आहेत तें गरुडपुराण.

सांप्रत जें. गरुडपुराण उपलब्ध आहे त्यांत गरुडाचे जन्माची कथा नाहीं, व सुमारें ७,००० श्लोक मात्र त्यांत आढळतात. ग्रंथाच्या आरंभीं उत्पत्तीचें वर्णन आहे. परंतु पुढें पुराणांत जे विषय असावे ते न घालतां व्रतें, पवित्र दिवस, सूर्यक्षेत्रें व सूर्य आणि विष्णु यांचीं स्तोत्रें यांनीं बहुतेक भाग आटपिला आहे. नंतर ज्योतिष, सामुद्रिक, जवाहिऱ्याची विद्या, व वैद्यक हीं प्रकरणें आहेत. शेवटीं प्रेतकल्प झणून एक प्रकरण आहे त्यांत प्रेतसंस्कारादि गोष्टी आहेत.

१८ वें ब्रह्मांडपुराण:—

यच्च ब्रह्मांडमाहात्म्यमधिकृत्याब्रवीत्पुनः
तच्च द्वादशसाहस्रं ब्रह्मांडं द्विशताधिकं १

भविष्याणांच कल्पानां श्रूयते यत्र विस्तरः।
तद्ब्रह्मांडपुराणंच ब्रह्मणासमुदाहृतम् ॥२॥

भावार्थ— ज्यांत ब्रह्मदेवाच्या अंडाचें माहात्म्य व भविष्यकाळच्या कल्पांचें वर्णन आहे तें ब्रह्मांडपुराण. त्यांत १२,२००श्लोक आहेत.

स्कंदपुराणाप्रमाणेंच ब्रह्मांड पुराण कोठेंही समग्र उपलब्ध नाहीं. त्यांतील कांहीं खंडें व माहात्म्यें मात्र आढळतात असें ह्मणतात. एच् एच् विलसन् साहेबांस याची एक प्रत समग्र मिळाली होती. तिचे दोन भाग असून पहिल्यांत १२४ अध्याय व दुसऱ्यांत ७८अध्याय आहेत. आणि दोहों भागांतमिळून सुमारें १२,०००ग्रंथ आहे. त्यापैकीं पहिला भाग वायुपुराणाशीं अक्षरशः जमतो. दुसऱ्या भागांत कांची नगरींत अगस्त्यानें विष्णूच्या हयग्रीव अवतारास मुक्तीचें साधन विचारिल्यावरून हयग्रीवानें पराशक्तिपूजन हें मुक्तीचें साधन आहे असें सांगून ललिता देवीनें भांडासुराचा वध केला त्याची कथा सांगितली आहे.

समाप्त.

पतिविरहशोक.

(कानिटकर कृत)

जसें सोनाराच्या सुकनक मुशींतून निघतें ॥
घरी त्याच्या जैसें मुळिच मळकें कीट नसतें ॥
तशी होती तीच्या अतिविशद कांती तनुवरी ॥
जणों मूर्ती सारी बनविलि असे सद्गुणपुरी ॥ १७॥
नसे विद्या ! शिक्षा विदित तिजला पुस्तकमयी ॥
परंतु प्रेमें जी दिधलि पतिनें आत्महृदयीं ॥
"प्रिये ? स्निग्धे ? मुग्धे ?" मधुरवचनें बोलुनि सदा॥
स्वकांतेचें केलें मन बहु जयें शिक्षित सदा ॥ १८ ॥

तिचा तैसा भर्ता सकलगुणधर्त्ता प्रिय असे ॥
अनंगाला अंग त्रिनयन दयेनें जणुं दिसे ॥
जसा बाह्याकार प्रथम विधिनें त्या बनविला ॥
तसें अंतर्भागीं मन करूनिही रंग भरिला ॥ १९ ॥
स्वतां कीं सृष्टीनें निजशिशुस विद्या शिकविली ॥
कलीमध्यें साऱ्या मति निपुण त्याची घडविली ॥
न होती दुःसाध्या, सतत वनवासी नर जरी ॥
कृपा देवाजीची असलि, कमती कांहीं न तरी ॥२०॥
परंतु त्यामध्यें अनुपम असे एक गुण तो ॥
खऱ्या सर्वात्म्याच्या अतुलच कृपें मात्र मिळतो ॥
प्रसाद प्रेमाचा प्रकट जणुं केला प्रभुजिनें ॥
अशी गाण्याची कीं अति मधुर विद्या शिकविणें॥२१॥
पुराणीं यक्षांतें अवगत असे जी समजती ॥
समस्त प्राण्यांतें मुदित करणारी सुखद ती ॥
कला बाला जैशी प्रियतम निजस्त्रीहुन सती ॥
तयालागीं अन्यावरि परमधन्या सुयुवती ॥ २२ ॥
तिचा, प्राणेशाचा मिळुन बनला जीव सगळा ॥
गळा त्याचा तीचा अति मधुर हो फार विरळा ॥
शिवाच्या अर्धांगीं सुभग गिरिजा जेंवि वसते ॥
तशी ती गानस्त्री सतत पतिच्या देहिं वसते ॥२३॥
तिचा पांवा किंवा मुरलि अथवा वाद्यगण तो ॥
अशा नानावंत्रें अवयवसमूह प्रकटतो ॥
असे तैसें केव्हां अति मृदु सतारेंद्रिय तिला ॥
तिच्या प्राणामध्यें अखिल रमणीयांश भरला ॥२४॥
मनोज्ञा ऐशी ती प्रियसखिस विद्या शिकवि तो ॥
रची काव्यें कांहीं कुसुमकलिकाकाम्य कवि तो ॥
कधीं कामी कांता कवळुनि करें कोमल मना ॥
बसे कुंजीं कैसा कमलवदना काम्य ललना ॥२५॥
कधीं तो स्वस्त्रीच्या अति मृदुल अंकीं निजशिरा ॥
महास्नेहें ठेवी जणुं कुसुमसंघामधिं हिरा ॥
तदा ती आनंदें अतिमधुर गानामृत करी ॥
सखा त्या साध्वीचा धरि हृचिर तें अल्गुज करीं ॥२६॥
कधीं प्रेमें अंकीं बसवुनि सुखें प्राणसखिला ॥
सुखी तो गायाला शिकवि वनवासी नर भला ॥
सतारीला मांडीवर धरूनि ती वाजवुनिया ॥
वदे तींतें कांते सुपद ह्मण चालीवरच या ॥ २७ ॥

विनोदें बोले ती "बहुत करितां पालन कसें," ॥
"सतारीला घेतां परम लडिवाळें मज तसें ॥
न कां घ्याना ? कांहीं मजहुन असावी प्रियतमा ।
तिला घेतां अंकीं सवत मज भासे, प्रियतमा! ॥ २८॥
वदे तो हसोनी परिसुनि असे शब्द मधुर ॥
तुझ्यापेक्षां वाटे मज बहु हिचा स्पर्श रुचिर ॥
तुला सांगें तैसें मम वचन तूं ऐकशि न कां ? ॥
सदा कांते देशी रुसुनि बहु मानेस हिसका ॥ २९ ॥
हिला जैसें सांगें स्वर तसतसे काढित असे ॥
पहा गे ही हट्टी तुजसम मुळीं सुंदरि नसे ॥
न लाजे ही कांहीं उगिच न रुसे ती मजवरी ॥
सदा लागे तूतें मज समजवावें बहुपरी ॥ ३० ॥
हिला जेव्हां घेई सदयहृदयीं या निजकरें ॥
तदा ती लज्जेनें त्वरित सुमुखी दूर न सरे ॥
तुला घ्याया प्रेमें परि जइं सखे हात पसरीं ॥
क्षणीं त्या तूं माझ्या जवळुनिहि जाशी दुरदुरी॥३१॥
असे आनंदानें दिवस बहुधा काढिति सदा ॥
तयाला ती होई बहुगुणवती फार सुखदा ॥
खरे ते दोघे स्त्रीपुरुष जगतामाजिं दिसती ॥
सुखी अन्योन्याच्या सतत सहवासांत असती ॥३२॥
असे जें एकातें सुख, सुख असे तेंच अपरा ॥
जरी दुःखी आहे मधुनिं बहु तो एक—दुसरा ॥
जणों त्या दोघांचें मिळुन अवघें जीवित असे ॥
तथापि ब्रह्मयाच्या सुकुशलपणें भिन्न विलसे ॥ ३३ ॥
जणों राजाराणी सुभग वनराज्यांत दिसती ॥
हिमें प्रातःकाळीं सतत अभिषेकार्द्र घडती ॥
प्रजारूपी वृक्ष प्रतिदिनिं फला ते नृपवरा ॥
सुखें षष्ठांशाच्या वितरति मिषें काय मधुरा ॥ ३४ ॥
स्त्रिया वल्लीरूपी नवकुसुमगुच्छप्रसव तो ॥
स्वराज्ञीतें देती उघड मग तत्स्नेह दिसतो ॥
अहा तेव्हां पुष्पस्तनयुगभरें वांकति लता ॥
तयीं त्या साध्वीला प्रकट करिती आत्ममम्ता ॥३५॥
पशूपक्षी तैसे सकळ गणिती हा निजपती ॥
पशू मोठे मोठे सतत बहु राज्यास जपती ॥
पहा पक्षी कांहीं गुरुदुरित दुर्हानि जपती ॥
तळ्यामध्यें कोठें बक नृपति कल्याण जपती ॥ ३६ ॥
प्रभातीं गाणारे विहग अवघे होति हजर ॥
तदा त्या रायाच्या जवळ विविधा गाति मधुर ॥
स्त्रिया साळू मैनादिक सुगणिका प्रेमल रवा ॥
मुखें त्या काढोनी बहुत करती नाच बरवा ॥ ३७ ॥
तसे कांहीं पक्षी इतर विभुचे भाट बनती ॥
सकाळीं रायाला उठवुनिच बोभाट करिती ॥
"उठावें त्वां राया ! प्रकृति गण हे वाट बघती ॥
अशा थाटानें कीं विहगपतिचा घाट घटिती ॥३८॥
त्यजोनी निद्रेला, उठुनि नरनारी सुखवनीं ॥
लताकुंजीं, गुंजारत मधुप पाहून नयनीं ॥
तदा तो स्वस्त्रीच्या सह गडुनि जाई सुकवनीं ॥
प्रभातीचें त्याचे रमणिय भरे वर्णन मनीं ॥ ३९ ॥
सुखी प्राणी तो यापरि बहुत चैनींत बसला ॥
पुढें तों त्याच्या हा सततहि चमत्कार दिसला ॥
सभोंतीं कुंजाच्या अतिसुभग जें अंगण असे ॥
तयीं त्या मोरांचा गण बहु मधें नाचत असे ॥४०॥
मनुष्यांचा वारा नसुनि वनभागीं मग कसा ॥
नराच्या पक्षातें सहज तरि ये हा भरंवसा ॥
जणों सृष्टी त्यातें निजपति सुसेवाच शिकवी ॥
ह्मणोनी कोणीही कधिं न नरभीति प्रकटवी ॥ ४१ ॥
अशा राज्यामध्यें सतत नरनारी रमुनि तीं ॥
सुखानें काळातें बहुतदिन रानीं दवडिती ॥
न भासे दुःखाची स्थिति कधिं तयांतें स्थितित या ॥
झपाटा दैवाचा कठिण परि सोडी नच तयां ॥ ४२॥
असे स्वर्गामाजीं प्रबल अति तद्राज्य वरवें ॥
जयानें मोठ्याही कविंस नच तें भाग्य वदवे ॥
शिवाला सोडोनी, विसरुनि जगन्नायकहि ते ॥
सदा प्रालब्धाला नमिति बहु तत्शक्ति गमते ॥४३ ॥
तपासाठीं एका गिरिवरिं बसे सिद्ध सुचिर ॥
तपाच्या सामर्थ्यें बहुत बनलें तेज रुचिर ॥
गुहेच्या बाहेरीं कधिं न पडला जो बहु दिन ॥
सदा ध्यानामध्ये रत घडुनि गेलें ऋषिमन ॥ ४४ ॥
न त्यां दोघांतें हा कधिंहि दिसला काननिं मुनी ॥
धनी त्या रानाचे असति जरि तद्राज्य करुनी ॥
जटा त्या साधूच्या क्षितिवरि पहाहो पसरल्या ॥
जणों शीर्षस्थाना बहुत दिन होतां विसरल्या ॥ ४५॥

(पुढें चालेल.)

विविधज्ञानविस्तार गृहांत असलेलीं विक्रीचीं पुस्तकें.

कायदे व आक्ट वगैरे.

मराठी.	मू. कि. रु. आ.	टपा. रु. आ.
न्यायसारसंग्रह	२५—०	३—०
अपकृत्यशास्त्र	९—०	१—८
प्रमाणशास्त्र रा० सा० मुकुंदराव भास्करजीकृत	३—०	०—५
टार्टशास्त्रावरील टीका	१—८	०—२
करारसंबंधी नुकसानी परिमाण	१—४	०—१
पुराव्याचा आक्ट	०—८	०—२
कराराचा आक्ट	०—१४	०—२
सन १८७१ चा आक्ट ९	०—८	०—२
सन १८७० चा आक्ट ७	०—६	०—२
सन १८६० चा आक्ट ४५ (पिनलकोड)	१—८	०—२
सन १८७१ चा आक्ट ८ वा	०—६	०—१
सन १८६९ चा आक्ट १८ वा	०—६	०—१
सन १८६४ चा आक्ट २० वा	०—२	०—१
सन १८६५ चा आक्ट १० वा	०—४	०—१
हायकोर्टाचे निवाडे	१—४	०—२
सन १८६५ चा आक्ट ११ वा	१—८	०—३
सन १८७२चा आक्ट १० वा (क्रिमिनल प्रोसीजर कोड)	१—८	०—३
सन १८७४ चा आक्ट ११ वा	०—३	०—१
सन १८७४ चा आक्ट ३ रा. (चतनदारांच्या संबंधीं)	०—४	०—१

मनोरंजक पुस्तकें.

मोचनगड	०—१४	०—३
अभिज्ञानशाकुंतल नाटक	१—८	०—३
प्रेमबंधन (पूर्वार्ध)	१—८	०—५
सुवर्णमालिनी	१—८	०—३
रत्नप्रभा	१—४	०—३
अथेल्लो नाटक	१—८	०—३
स्वैरसकेशा नाटक	१—४	०—२
बोधसुधा किंवा एका तरूणाचा इतिहास	०—१२	०—२
श्री० सवाई माधवराव पेशवे यांचें नाटक	१—४	०—२
मंजुघोषा	१—४	०—२
चातुर्यसंग्रह	१—०	०—२
सायुज्यसदन नाटक	२—८	०—५
विलासिनी	१—४	०—३
जिल्ब्लास चरित्र भा० १ ला	१—४	०—३
श्री० मल्हाररावमहाराज नाटक	१—०	०—३
बर्थोल्ड चरित्र	७—०	०—१
वैराग्य	१—०	०—२
उपयुक्त चमत्कारसंग्रह भाग १ ला	०—५	०—१
,, ,, भाग २ रा	०—५	०—१
,, ,, भाग ३ रा	०—५	०—१
,, ,, भाग ४ था	०—५	०—१
,, ,, भाग ५ वा	०—५	०—१
,, ,, भाग ६ वा	०—५	०—१
,, ,, भाग ७ वा	०—५	०—१
मराठी प्रचारांतील म्हणी	०—७	०—१

इतर उपयुक्त व शालोपयोगी पुस्तकें.

तंतुवाद्य. (सतार शिकण्याचें पुस्तक)	१—८	०—३
शिल्पोपयुक्तसंग्रह	१—४	०—१
लाघवी लिपी	०—४	०—१
नेपोलियन बोनापार्टची शकुनवंती	०—३	०—१
पुष्पमाला (वे० शा० विष्णु शास्त्रीकृत)	०—४	०—१
राजव्यवहार कोश	०—४	०—१
सूपशास्त्र (पाकशास्त्र)	१—४	०—२
वेदांतसाराचें भाषांतर	०—८	०—२
शब्दरत्नावली	०—८	०—२
हिंदुशास्त्रांतील संख्यावाचक— दुर्बोध शब्दार्थ कोश	०—१२	०—२
पांचाळवर्णाचें मूळ (टीकेसहित)	०—६	०—१
विद्याधनप्रशंसा	०—८	०—२
संस्कृत प्रथम पुस्तकाचें भाषांतर	०—१२	०—२
मराठी भाषेचा कोश	२—८	०—६
अंकगणित भाग १ पूर्णांक	०—१०	०—२
मारिसकृत हिंदुस्थानचा सं० इतिहास (प्रश्नोत्तररूपानें)	०—५	०—१
राबिन्सन क्रूसो याचें चरित्र	०—१०	०—२
व्यवहारदर्पण भाग १ ला (धातूविषयीं)	०—१२	०—२
,, ,, भाग २ रा. (काचेविषयीं)	०—६	०—१
रघूचा सर्ग २ रा (भाषांतर— सहित)	०—१०	०—२
,, ,, स० ३ रा (भाषांतर)	०—१०	०—२

☞ याशिवाय शाळाखात्यांत उपयोगीं पडणारीं इंग्लिश, मराठी व गुजराती पुस्तकेंही येथें पैसा पाठविल्यास जरूर रवाना करण्यांत येतील.

Registered No. 102
1875

विविधज्ञानविस्तार.

हें पुस्तक प्रतिमासास एकदा निघतें. यांत शास्त्रीयविषय; स्त्रियांकरितां मनोरंजक व सन्मार्गवर्ती गोष्टी; रूपकें; कविता; विद्यार्थ्यांकरितां अन्यभाषांची माहिती, व भाषांतरें; इतिहास; देशज्ञान; विख्यात पुरुषांचीं चरित्रें; आरोग्यरक्षणार्थ सूचना; नवीन पुस्तकांवर टीका; नीतिवादाचे निबंध इत्यादिक विषयांचा संग्रह अवकाशानुसार होत असतो.

या पुस्तकाची किंमत.

वर्षाची आगाऊ.....रूपये ३.
सहामाही आगाऊ. .....रूपये २.
फुटकळ दर प्रतीस .....आणे ६.
टपालहशील वर्षाचें .....आणे ६.

वर्गणीदारांनीं आगाऊ वर्गणी आरंभापासून दोन महिन्यांचे आंतच पाठविण्याची मेहर्बानी करावी. नाहींतर दरसाल साडेचार रुपयांप्रमाणें त्यांकडे किंमत मागावी लागेल.

या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां व्याकरणसंबंधी, भाषासंबंधी किंवा वर लिहिलेल्या इतर कोणत्याही उपयुक्त विषयांसंबंधी प्रश्न, कोड्या व विचार, कोणी पाठविल्यास त्यांस अवश्य स्थळ मिळेल.

या पुस्तकाविषयीं हरएक प्रकरणीं पत्रव्यवहार मुंबईंत खतरओळींत नंबर १३ च्या घरांत पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी व्यवस्थापक यांशीं ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.